| २१५ | शाह, श्री.फारुक अन्वर (धुळे शहर) | ६ | ४ | ६०% |
| २१६ | शाह, श्री.पराग (घाटकोपर पुर्व) | ८ | २ | ८०% |
| २१७ | शेख, श्री.अस्लम रमजानअली (मालाड पश्चिम) | ९ | १ | ९०% |
| २१८ | शेख, श्री.रईस कासम (भिवंडी पुर्व) | ९ | १ | ९०% |
| २१९ | शेलार, ॲड.आशिष बाबाजी (वांद्रे पश्चिम) | ७ | ३ | ७०% |
| २२० | शेळके, श्री.सुनिल शंकरराव (मावळ) | ९ | १ | ९०% |
| २२१ | शिंदे, श्री.बबनराव विठ्ठलराव (माढा) | ० | १० | ०% |
| २२२ | शिंदे, श्री.महेश संभाजीराजे (कोरेगाव) | ९ | १ | ९०% |
| २२३ | शिंदे, श्रीमती प्रणिती सुशीलकुमार (सोलापूर शहर मध्य) | ९ | १ | ९०% |
| २२४ | शिंदे, श्री.संजयमामा विठ्ठलराव (करमाळा) | १० | -- | १००% |
| २२५ | शिंदे, श्री.श्यामसुंदर (लोहा) | ७ | ३ | ७०% |
| २२६ | शिंगणे, डॉ.राजेंद्र भास्करराव (सिंदखेड राजा) | ८ | २ | ८०% |
| २२७ | शिरोळे, श्री.सिध्दार्थ अनिल (शिवाजीनगर) | ५ | ५ | ५०% |
| २२८ | शिरसाट, श्री.संजय पांडुरंग (औरंगाबाद पश्चिम) | १० | -- | १००% |
| २२९ | सिद्दिकी, श्री.झीशान बाबा (वांद्रे पुर्व) | ७ | ३ | ७०% |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २३० | सोळंके, श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव (माजलगाव) | १० | -- | १००% |
| २३१ | सोनवणे, श्रीमती लताबाई चंद्रकांत (चोपडा) | ८ | २ | ८०% |
| २३२ | सुर्वे, श्री.प्रकाश राजाराम (मागाठाणे) | ४ | ६ | ४०% |
| २३३ | तनपुरे, श्री.प्राजक्त प्रसादराव (राहुरी) | ९ | १ | ९०% |
| २३४ | तापकीर, श्री.भिमराव (अण्णा) धोंडीबा (खडकवासला) | १० | -- | १००% |
| २३५ | ठाकरे, श्री.आदित्य उध्दव (वरळी) | ५ | ५ | ५०% |
| २३६ | ठाकरे, श्री.विकास पांडुरंग (नागपूर पश्चिम) | ९ | १ | ९०% |
| २३७ | ठाकूर, श्री.हितेंद्र विष्णु (वसई) | ८ | २ | ८०% |
| २३८ | ठाकूर, श्री.क्षितीज हितेंद्र (नालासोपारा) | ८ | २ | ८०% |
| २३९ | ठाकूर, श्री.प्रशांत रामशेठ (पनवेल) | १० | -- | १००% |
| २४० | ठाकूर, श्रीमती विद्या जयप्रकाश (गोरेगाव) | १० | -- | १००% |
| २४१ | ठाकूर, ॲड.यशोमती चंद्रकांत (तिवसा) | ८ | २ | ८०% |
| २४२ | थोपटे, श्री.संग्राम अनंतराव (भोर) | ८ | २ | ८०% |
| २४३ | थोरात, श्री.विजय उर्फ बाळासाहेब भाऊसाहेब (संगमनेर) | १० | -- | १००% |
| २४४ | थोरवे, श्री.महेंद्र सदाशिव (कर्जत) | ९ | १ | ९०% |
| २४५ | टिंगरे, श्री.सुनिल विजय (वडगाव शेरी) | १० | -- | १००% |
| २४६ | टोपे, श्री.राजेशभैय्या (घनसावंगी) | ७ | ३ | ७०% |
| २४७ | तुपे, श्री.चेतन विठ्ठल (हडपसर) | १० | -- | १००% |
| २४८ | वनगा, श्री.श्रीनिवास चिंतामण (पालघर) | १० | -- | १००% |
| २४९ | वायकर, श्री.रविंद्र दत्ताराम (जोगेश्वरी पूर्व) | १० | -- | १००% |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २५० | वानखडे, श्री.बळवंत बसवंत (दर्यापूर) | ९ | १ | ९०% |
| २५१ | वरपुडकर, श्री.सुरेश अंबादासराव (पाथरी) | ७ | ३ | ७०% |
| २५२ | उईके, श्री.अशोक रामाजी (राळेगांव) | १० | -- | १००% |
| २५३ | यादव (लोणीकर), श्री.बबनराव दत्तात्रय (परतूर) | १० | -- | १००% |
| २५४ | येरावार, श्री.मदन मधुकर (यवतमाळ) | ६ | ४ | ६०% |
| २५५ | झनक, श्री.अमित सुभाषराव (रिसोड) | ९ | १ | ९०% |

## विवरण क्रमांक ७

## महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ (डिसेंबर) च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील दैनंदिन कार्यवाहीचा संक्षिप्त वृत्तांत

### गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**अधिवेशनाचा शुभारंभ ' वंदे मातरम् ' या गीताच्या समूह गायनाने झाला.**

**यानंतर राज्य गीताचे समूह गायन झाले.**

**१.** (१) उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्र्यांनी, सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ७ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२३ सभागृहासमोर ठेवला.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ८ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ सभागृहासमोर ठेवला.

(३) गृहनिर्माण मंत्र्यांनी, सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ९ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) अध्यादेश, २०२३ सभागृहासमोर ठेवला.

**२.** सहकार मंत्र्यांनी, संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२)(ख) अन्वये राज्यपालांना असलेल्या अधिकारान्वये त्यांनी सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२३ मागे घेतल्याबाबत निर्गमित केलेले दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजीचे माननीय राज्यपालांचे आदेश सभागृहासमोर ठेवले.

**३.** वित्त मंत्र्यांनी, सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर केल्या आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ खंड (३) खाली मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन २०२३ -२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्याकरिता शिफारस केली आहे, असे सांगितले.

सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. पुरवणी मागण्यांचे विवरणपत्र माननीय सदस्यांना महाराष्ट्र विधिमंडळाच्या व शासनाच्या संकेतस्थळावरुन तसेच टपालखणाद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे. या मागण्यांवरील चर्चा व मतदान दिनांक ११ व १२ डिसेंबर, २०२३ रोजी होईल. दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमात घेण्यात येतील त्या विभागावरील कपात सूचना दिनांक ८ डिसेंबर, २०२३

रोजी तसेच दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमात घेण्यात येतील त्या विभागावरील कपात सूचना दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील, असेही माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**४.** सचिव-१ (कार्यभार) यांनी विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेले १ वि.स. विधेयक, माननीय राष्ट्रपतींची अधिसंमती मिळालेले १ वि.स. विधेयक आणि माननीय राज्यपालांची अधिसंमती मिळालेली १० वि.स.विधेयकांची यादी माननीय अध्यक्षांच्या निदेशानुसार सभागृहाला वाचून दाखविली.

**५.** माननीय अध्यक्षांनी अशासकीय कामकाजासंबंधी पुढील घोषणा केली -

"शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी अशासकीय कामकाज (ठराव) घेण्यात येणार आहेत. अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम बॅलटद्वारे निश्चित करण्यात आला असून त्याबाबतची माहिती सर्व सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे देण्यात आली आहे. बॅलटद्वारा काढण्यात आलेल्या ५ अशासकीय ठरावांमधून ३ अशासकीय ठराव चर्चेकरीता घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहेत. अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ अशासकीय विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो. तथापि, सध्या अशासकीय विधेयके व ठराव समिती नव्याने घटित करण्यात येत असल्याने मी शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर,२०२३ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी १५ मिनिटांचा वेळ पुरःस्थापनार्थ असलेल्या विधेयकांना व उर्वरित १३५ मिनिटांचा वेळ चर्चेकरिता घेण्यात येणाऱ्या खालील नमूद ठरावांना देत आहे :—

| | |
|---|---|
| (१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक – २४९ | ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| (२) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक – १६२ | ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| (३) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक – २९ | ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही |

वरीलपैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात येईल."

**६.** माननीय अध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ८ (१) अन्वये खालील सदस्यांना सभाध्यक्ष तालिकेवर नामनिर्देशित केल्याचे घोषित केले-

(१) श्री.संजय शिरसाट, वि.स.स.

(२) श्री.समीर कुणावार, वि.स.स.

(३) श्री.चेतन तुपे, वि.स.स.

(४) ॲड. (श्रीमती) यशोमती ठाकूर, वि.स.स

**७.** (१) उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांनी सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४५ – महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) (निरसन) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४६ – सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(३) गृहनिर्माण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(४) गृहनिर्माण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(५) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी, सन २०२३ चे वि.स.विधेयक क्रमांक ४८ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरः स्थापित केले.

(६) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी, सन २०२३ चे वि.स.विधेयक क्रमांक ४९ – चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरः स्थापित केले.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, 'अवकाळी पाऊस आणि मिचाँग चक्रीवादळ यामुळे कापूस, द्राक्ष, संत्रा, धान आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असणे' इ. बाबत स्थगन प्रस्तावाच्या सूचनेद्वारे चर्चेची मागणी केली व आपले म्हणणे मांडले.

उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांनी उपरोक्त विषयावर आपले म्हणणे मांडले.

माननीय अध्यक्षांनी, "या संदर्भात उद्या विरोधी पक्षाचा प्रस्ताव येऊ शकतो; त्यावेळी चर्चा घेतली जाईल" असे सांगितले.

**८.** माननीय अध्यक्षांनी, गोवर्धन मांगीलालजी शर्मा, वि.स.स. व माजी राज्यमंत्री; श्री. बबनराव दादाबा ढाकणे, माजी उपाध्यक्ष, माजी मंत्री व माजी विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा; सर्वश्री. गुलाबराव वामनराव पाटील, श्रीपतराव दिनकरराव शिंदे, शेख रशीद शेख शफी, राजाराम नथु ओझरे, वसंतराव जनार्दन कार्लेकर, गोविंद रामजी शेंडे, दिगंबर नारायण विशे, माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३**

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते यांनी, "नियम ५७ अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत नोटीस दिली असणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी "माननीय विरोधी पक्षनेत्यांनी स्थगन प्रस्तावाची नोटीस दिली असल्यामुळे त्यावर निर्णय द्यावा," इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

'राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये झालेला अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान' या विषयावर म.वि.स. नियम ५७ अन्वये दिलेल्या सूचनेतील विषय आजच्या कामकाज पत्रिकेवरील कोणत्याही बाबीशी निगडित नसल्यामुळे तसेच सूचनेतील विषयासंदर्भात गुरुवार दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी माननीय उप मुख्यमंत्री यांनी विस्तृत निवेदन दिलेले असून आज या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना देखील प्राप्त असल्यामुळे सदस्यांकडून प्राप्त झालेल्या दोन्ही सूचनांना मी अनुमती नाकारीत आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**१.** (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. अशोक चव्हाण, वि.स.स. यांनी, "मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीबाबत राज्यभर सुरू असलेले आंदोलन," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी (श्री. देवेंद्र फडणवीस) यांनी, "सदर मुद्यावर दोन्ही सभागृहांत चर्चा व्हावी अशी शासनाची भूमिका आहे. त्याबाबत माननीय अध्यक्षांनी वेळ निश्चित करावी" असे सांगितले.

'याबाबतचा निर्णय आजच घेण्यात येईल' असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**२.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असली तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सदर प्रस्तावांसंदर्भात अगदी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते यांनी, “राज्यात झालेला अवकाळी पाऊस, त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान, व त्यांना भरपाई मिळण्याची आवश्यकता” इ. बाबत आपले म्हणणे मांडले.

**३.** उपमुख्यमंत्र्यांनी (श्री. अजित पवार) यांनी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

माननीय अध्यक्षांनी, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कळविल्यानुसार दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजीपासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात खालील नमूद विभागांचे विधिमंडळातील कामकाज आपल्या मूळ विभागाचे कामकाज सांभाळून त्यापुढे नेमून दिलेले मंत्री पाहतील असे सांगितले.

| | |
|---|---|
| सामान्य प्रशासन विभाग | – श्री. शंभूराज देसाई |
| नगरविकास व माहिती तंत्रज्ञान विभाग | – श्री. उदय सामंत |
| परिवहन विभाग | – श्री. दादाजी भुसे, |
| सामाजिक न्याय व विशेष सहाय्य व दिव्यांग कल्याण विभाग | – श्री. गुलाबराव पाटील, |
| माहिती व जनसंपर्क विभाग | – श्री. संदिपानराव भुमरे, |
| पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | – श्री. दीपक केसरकर, |
| खनिकर्म विभाग | – श्री. अब्दुल सत्तार |

श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, “केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर घातलेली बंदी,” इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

माननीय अध्यक्षांनी, शासनाने यासंबंधी नोंद घ्यावी, असे सांगितले.

उपमुख्यमंत्र्यांनी, (श्री. अजित पवार) यांनी याबाबत खुलासा केला.

सर्वश्री. बाळासाहेब थोरात, नाना पटोले, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत काही सूचना केल्या.

माननीय अध्यक्षांनी या विषयावर चर्चा घेण्याबाबत गट नेते, मा. संसदीय कार्यमंत्री यांच्या समवेत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

मा. अध्यक्षांनी, आज शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजीच्या कामकाज पत्रिकेत क्रमांक एकवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली असल्याचे सांगितले.

४. (१) डॉ. जितेंद्र आव्हाड व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"ठाणे महापालिका मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती व इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालवीत असून या शाळांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, सद्यःस्थितीत महापालिका क्षेत्रातील ९८ इमारतींमध्ये १९८ शाळा चालविल्या जात असून यातील ६८ इमारतींची अवस्था दयनीय झालेली असल्याची गंभीर माहिती दिनांक २१ नाव्हेंबर, २०२३ रोजी उघडकीस येणे, या धोकादायक इमारतींमध्ये सद्यःस्थितीत शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांच्या जीविताचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, जुन्या जीर्णावस्थेत असलेल्या इमारतींचे प्लास्टर कधीही कोसळण्याच्या स्थितीत असून शौचालयांची दुरुस्ती झालेली नसल्याने इमारतींमध्ये सांडपाणी देखील तुंबण्याची स्थिती निर्माण झालेली असणे, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी महापालिका शाळांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी व नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, महापालिका शाळांच्या धोकादायक इमारती कोसळून गंभीर अपघात होऊन विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका होणार असतांनाही महापालिका प्रशासनाकडून हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जात असल्याने सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री बाळासाहेब थोरात व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"डहाणूपासून बोरिवलीपर्यंत एकही कर्करोग रुग्णालय नसल्यामुळे या भागातील रुग्णांना मुंबई व नवी मुंबईतील कर्करोग रुग्णालयांमध्ये उपचारासाठी पायपीट करावी लागणे, या पार्श्वभूमीवर मुंबई महानगर क्षेत्रात एखादे सुसज्ज कर्करोग रुग्णालय मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात असावे या संकल्पनेतून शासनाकडे प्रस्ताव पाठविणे, उक्त प्रस्तावाला शासनाने मान्यता दिल्यानंतर मीरा रोड येथे जागा निश्चित करून त्यासाठी सुरुवातीला १० कोटी रुपयांची तरतूद करणे, माहे एप्रिल, २०२३ मध्ये मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सदर रुग्णालयाचे भूमीपूजन होत असताना संपूर्ण रुग्णालयासाठी लागणारी १३४ कोटीची रक्कम शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा करणे,

सदर भूमीपूजन होऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतर अद्यापही निधी न मिळाल्यामुळे प्रस्तावित कर्करोग रुगणालयाच्या कामाला सुरुवातही न होणे, शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून देऊन सदर बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

मा. अध्यक्षांनी, आज शुक्रवार दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजीच्या कामकाजपत्रिकेत क्रमांक ४ व ५ वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आल्या असल्याचे सांगितले.

( ३ ) सर्वश्री अतुल भातखळकर व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"महाडमधील ब्ल्यू हेल्थ केअर लिमिटेड या कंपनीत झालेल्या स्फोटामध्ये सात कामगार ठार झाल्याची घटना माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये घडली असणे, त्यामुळे, रायगड, ठाणे, पालघर जिल्ह्यातील शेकडो रासायनिक कारखान्याच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असणे, त्यामध्ये, औद्योगिक क्षेत्राच्या परिसरात नागरी वस्ती नसावी, कंपन्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षेच्या सुविधा पुरवाव्यात, सांडपाण्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन व्हावे, कंपन्यांची अग्निशमन व्यवस्था असावी असे नियम असताना ही कंपनी व्यवस्थापनांकडून या नियमांचे पालन होत नसणे, त्यामुळे, झालेल्या दुर्घटनेची संपूर्ण चौकशी करण्याची गरज असणे, तसेच, दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, नियमांचे पालन न करणाऱ्या औद्योगिक कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

कामगार मंत्र्यांनी मा. मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**५. (अ) (१) सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४८ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ –**

सर्वश्री भास्कर जाधव व इतर वि.स.स. यांचा सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ७ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर ( सुधारणा ) अध्यादेश नापसंत करण्यासंबंधीचा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही.

उप मुख्यमंत्र्यांनी (श्री. अजित पवार), सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४८ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत पुढील सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. योगेश सागर
(२) श्री. अतुल बेनके
(३) ॲड. आशिष शेलार
(४) श्रीमती मनिषा चौधरी

उप मुख्यमंत्र्यांनी / वित्त मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४८ संमत झाले.

(२) **सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४९ – चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३–**

उप मुख्यमंत्र्यांनी (श्री. अजित पवार), सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४९ – चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य, श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा दुसरा, सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. यांचा तिसरा, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा चौथा आणि सर्वश्री भास्कर जाधव व रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत श्री. योगेश सागर यांनी भाग घेतला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४९ संमत झाले.

(ब) सहकार मंत्र्यांनी, म.वि.स. नियम १५४ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला –

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक ,२०२३ मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

सन २०२३ चे वि.स.वि. विधेयक क्रमांक १८ मागे घेण्यात आले.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी, संसदीय अभ्यास वर्गाच्या आयोजनाबाबत पुढील घोषणा केली –

"राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे दरवर्षी महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत राज्यातील विद्यापीठांतील "राज्यशास्त्र व लोकप्रशासन" या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार यावर्षीसुद्धा दिनांक ११ ते १८ डिसेंबर, २०२३ या कालावधीत ५० व्या सुवर्ण महोत्सवी संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर संसदीय अभ्यासवर्गाचे उद्‌घाटन माननीय मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व सर्व मान्यवरांच्या सन्मान्य उपस्थितीत सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता विधानपरिषद सभागृह, विधान भवन, नागपूर येथे होणार आहे. संसदीय अभ्यासवर्गासंबंधीची निमंत्रणपत्रिका व कार्यक्रमपत्रिका सर्व माननीय सदस्यांना त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. तरी सर्व माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संसदीय अभ्यासवर्गास उपस्थित राहून व्याख्यानांचा लाभ घ्यावा."

(४) ॲड. आशिष शेलार व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"राज्यात दिवसाकाठी ४० नवजात बालकांचा मृत्यू होत असल्याचे धक्कादायक आकडेवारी समोर आली असून यातील दोन तृतीयांश म्हणजेच तब्बल २५ हून अधिक बालके १ महिन्यांहून कमी वयाची असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या सुमारास निदर्शनास येणे, सदरील नवजात बालकांपैकी ६ जणांना श्वसनाचा त्रास होत असताना देखील संबंधित रुग्णालयात कृत्रिम श्वसन यंत्रणा आणि तिच्या वापरासाठी प्रशिक्षित वरिष्ठ कर्मचारी उपलब्ध नसल्याचे आढळून येणे, बहुसंख्य शासकीय प्राथमिक अतिदक्षता केंद्र (ICU) बालरोग व नवजात अतिदक्षता केंद्र (NICU) येथील गर्दी, अपुरा कर्मचारी वर्ग आणि स्वच्छतेच्या कमतरतेचा त्रास महिलांना भोगावा लागत असून या ठिकाणी नवजात बालके अत्यंत असुरक्षित असून त्यांना दुर्दैवी मृत्यूला सामोरे जावे लागत असल्याचे आढळून येणे, राज्यातील ग्रामीण भागातील वाढती प्रसूती व अर्भकांची संख्या जास्त असणे, परंतु रुग्णालयातील प्रसूती वाढूनही प्रशासन आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संख्येसह पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यात अपयश आलेले असणे, राज्यातील ग्रामीण भागातील प्रसूतीगृहांची संख्या वाढवून सदर ठिकाणी सुसज्य आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात नवजात बालकांचे

होत असलेले मृत्यू रोखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यानी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(अ) **(३) सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४७ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२३ –**

सर्वश्री भास्कर जाधव व इतर वि.स.स. यांचा सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ९ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) अध्यादेश नापसंत करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

गृहनिर्माण मंत्र्यांनी सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४७ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव व सर्वश्री भास्कर जाधव व रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४७ संमत झाले.

(४) **सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४६ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ –**

सर्वश्री भास्कर जाधव व इतर वि.स.स. यांचा सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ८– महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश नापसंत करण्यासंबंधीचा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४६ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव व सर्वश्री भास्कर जाधव व रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत श्री. सुनील राणे यांनी भाग घेतला.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४६ संमत झाले.

(५) सर्वश्री अबू आजमी व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“भाईंदर येथे शवागारात शीतपेट्या नादुरुस्त असल्यामुळे मृतदेह रुग्णवाहिकामध्ये ठेवावा लागल्याचा प्रकार येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात दिनांक १७ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, रुग्णालयात आवश्यक सुविधांबाबत रुग्ण कल्याण समितीच्या बैठकीत वारंवार मुद्दे उपस्थित केले जात असणे, परंतु त्यावर राज्य शासनाकडे पाठपुरवठा होत नसल्याचेही निदर्शनास येणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा येत असलेली शासनाची प्रतिकिया व उपाययोजना.”

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यानी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(अ) (५) सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४५ – महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) (निरसन) विधेयक, २०२३ –**

उप मुख्यमंत्र्यांनी (श्री. देवेंद्र फडणवीस) सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४५ – महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) (निरसन) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स.

यांचा तिसरा प्रस्ताव व सर्वश्री भास्कर जाधव व रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंड २ विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४५ संमत झाले.

**६.** (१) श्री. सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. यांचे सन २०२१ चे वि.स.वि. क्र. ३४ – महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१,

(२) श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचे सन २०२२ चे वि.स.वि. क्र. ४० – महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२२,

(३) डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे सन २०२२ चे वि.स.वि. क्र. ४१ – महाराष्ट्र परदेशातील रोजगार संरक्षण विधेयक, २०२२ तसेच

(४) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचे सन २०२३ चे वि.स.वि. क्र. ३९ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३.

ही विधेयके सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आली नाहीत.

**७.** आजच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक सात मधील अनुक्रमांक (१) वर दर्शविण्यात आलेला श्रीमती मनीषा चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक २४९ पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

डॉ. नितीन राऊत व श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांचे अशासकीय ठराव अनुक्रमे १६२ व २९ सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आले नाहीत.

श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(उक्त मुद्यामधील हिंदी मजकूर हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने कार्यवाहीत टंकलिखित करण्यात आलेला नाही.)

आज दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहात विरोधी पक्षाच्या अनेक सदस्यांनी अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान तसेच मराठा आरक्षणावर सभागृहात चर्चा याबाबत संसदीय कार्य मंत्र्यांशी चर्चा केली असून अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानी बाबतची चर्चा सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी घेण्यात येईल, तर मराठा आरक्षणावरील चर्चा मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी घेण्यात येईल, असे तालिका सभाध्यक्षांनी घोषित केले.

## सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३

**१.** (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) उप मुख्यमंत्री तथा विधि व न्याय मंत्र्यांनी,

(क) श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल व

(ख) श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांचा सन २०२१-२०२२ या अर्थिक वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्र्यांनी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) पणन मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा पासष्ठावा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "राज्यातील शेतकरी कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळे अडचणीत आलेला असणे" या विषयावर म.वि.स. नियम ५७ अन्वये सूचना दिलेली असून सदर सूचनेतील विषयावर म.वि.स. नियम १०१ अन्वये मान्य केलेली अल्पकालीन चर्चा आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर समाविष्ट आहे व चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य यांना उक्त विषयावर मुद्दा उपस्थित करता येईल असे सांगून माननीय अध्यक्षांनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

आज सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ३ सूचना प्राप्त झाल्या असल्या तरीदेखील आज सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवर सभागृहात चर्चा व मतदान (पहिला दिवस) असल्यामुळे महाराष्ट्र विधानसभा नियम २६० (५) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाहीत असे सांगून अध्यक्षांनी सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारल्याचे घोषित केले. तथापि श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी उक्त स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवर आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "राज्यातील सरकारी, निम-सरकारी कर्मचारी शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करणे" इ. बाबत उपस्थित केलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात आपले म्हणणे थोडक्यात मांडले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी मांडलेली माहिती गंभीर असल्याने याची शासनाने गंभीर नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, "राज्यातील अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तसेच नंदूरबार, बीड, नाशिक, अहमदनगर या भागात तीव्र कुपोषित मुलांच्या संख्येत वाढ होत असणे" इ. बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना उपस्थित केली.

शासनाने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

कामकाजपत्रिकेत दर्शविलेल्या दोन अल्पकालीन चर्चा एकत्रित करून त्यांच्यावर चर्चा घेण्यात येईल तसेच उक्त चर्चा अपूर्ण राहिल्यास उद्या सभागृहाच्या विशेष बैठकीत ती पूर्ण करण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स. यांनी, "बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाला शासनाच्या मोठ्या अधिकाऱ्याने भेट देऊन त्यांची समजूत काढण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, "धारावी येथे पुनर्वसन करत असताना दडपशाहीचा वापर करण्यात येणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात नोंद घेण्यात आली आहे असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री. अबु आजमी, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा -

(प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषणाचा मजकूर उपलब्ध नाही.)

(४) श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी, "एनआयए आणि एटीएसच्या माध्यमातून केलेली छापेमारी" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, "खार पश्चिम येथील येथे हनुमान नगर झोपडपट्टी वसाहत पुनर्विकासाचा प्रस्ताव मागील १५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचे संबंधित विकासकाने ओशिवारा येथे एकत्रीकरण केलेले असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

या संदर्भातील माहितीची नोंद घेतली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(६) श्री. अजय चौधरी. वि.स.स. यांनी, “एमएमआरडीएच्या माध्यमातून शिवडी-वरळी उन्नत मार्गाच्या सुरू असलेल्या कामादरम्यान सेना नगर, हनुमान नगर, एकात्मता व फुले नगर येथील जवळपास २५० झोपडीधारक बाधितांना ताडदेव येथे जागा देण्याचे मान्य केले असून देखील त्यांचे पुनर्वसन अद्याप झालेले नसणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) डॉ. विश्वजीत कदम, वि.स.स. यांनी, “सांगली जिल्ह्यातील जवळपास ५ हजार अंगणवाडी सेविका बेमुदत उपोषणाला बसलेल्या असणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स. यांनी, “खारपाण पट्ट्यामधील अमरावती जिल्ह्यातील अमरावती, भातकुली, दर्यापूर या तालुक्यातील आणि अकोला जिल्ह्यातील कोळी महादेव लोकांना अनुसूचित जातीची जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे मिळाली नसणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी, “दिनांक ८ नोव्हेंबर, २०२३ रोजी पिंपरी-चिंचवड येथील एका कंपनीला लागलेल्या आगीत ६ कामगार महिलांचा झालेला मृत्यू व महापालिकेने पिंपरी-चिंचवड शहरात आगीमुळे भाजलेल्या रुग्णांसाठी रुग्णालय नसणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**३.** सर्वश्री. विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांनी, “राज्यातील अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट आणि अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान आणि त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष” या विषयावर उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

आणि

श्री. रणधीर सावरकर व इतर वि.स.स. यांनी, “राज्यातील शेतकऱ्यांना भेडसावणारे विविध प्रश्न आणि त्यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना” या विषयावर उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा -

सदर अल्पकालीन चर्चासंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाहीत व अनुक्रमांक १ ची अल्पकालीन सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार हे सूचना वाचतील आणि भाषण करतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेते यांनी “राज्यातील अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट आणि अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान आणि त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष” या विषयावरील अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी, “राज्यातील शेतकऱ्यांना भेडसावणारे विविध प्रश्न आणि त्यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना” या विषयावरील अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

उपरोक्त प्रस्तावांवरील एकत्रित चर्चेस सुरुवात झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री. जयंत पाटील
(२) श्री. बालाजी कल्याणकर
(३) श्री. अनिल देशमुख
(४) डॉ. राजेंद्र शिंगणे
(५) श्री. भास्कर जाधव
(६) श्री. नारायण कुचे
(७) श्री. बच्चू कडू
(८) श्री. प्रकाश सोळंके
(९) डॉ. विश्वजित कदम
(१०) श्री. समीर कुणावार
(११) डॉ. संजय रायमूलकर
(१२) ॲड. आशिष जैस्वाल
(१३) श्री. राजेश टोपे
(१४) श्री. प्रशांत बंब (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

आजच्या कामकाजपत्रिकेतील विषय क्रमांक ३ वरील अल्पकालीन चर्चा उद्या मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ९-०० ते १०-४५ या वेळेत घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(१) महसूल व वन विभाग

(२) नगरविकास विभाग

(३) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग

आता महसूल व वन विभाग, नगरविकास विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग या विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेला घेण्यात येतील असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्यांवरील एकत्रित चर्चेची कार्यपद्धती माननीय तालिका सभाध्यक्षांनी विशद केली व विभागाच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यांची सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा जुलै,

२०१० पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे गृहित धरून चर्चेला आता सुरुवात होईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त मागण्या प्रस्तुत झाल्या.

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवर एकत्रित चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

---

(१) श्री. अशोक चव्हाण
(२) श्री. योगेश सागर
(३) श्री. बाबासाहेब पाटील
(४) प्रा. वर्षा गायकवाड
(५) श्री. संजय गायकवाड
(६) श्री. प्रकाश आबिटकर
(७) श्री. रईस शेख
(८) श्री. राम कदम
(९) डॉ. जितेंद्र आव्हाड
(१०) ॲड.आशिष जैस्वाल
(११) श्री. सुनिल प्रभू
(१२) श्री. बाळासाहेब थोरात
(१३) श्री. अमित साटम
(१४) श्री. बाळासाहेब आजबे
(१५) श्री. संजय गायकवाड
(१६) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेते
(१७) श्री. रवि राणा
(१८) श्री. कालिदास कोळंबकर
(१९) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैया नवघरे
(२०) श्री. रविंद्र वायकर
(२१) श्री. अमिन पटेल
(२२) श्री. सुनिल राणे
(२३) श्री. सुनिल भुसारा
(२४) श्रीमती यामिनी जाधव
(२५) श्रीमती गीता जैन
(२६) श्री. झिशान सिद्दीकी
(२७) श्रीमती मनिषा चौधरी
(२८) श्री. संग्राम जगताप
(२९) श्री. रमेश कोरगावकर
(३०) श्री. किशोर जोरगेवार
(३१) श्री. कैलास गोरंट्याल
(३२) श्री. संजय केळकर
(३३) श्री. संदिप क्षीरसागर
(३४) श्री. बालाजी कल्याणकर

| | |
|---|---|
| (३५) श्री. रविंद्र धंगेकर | (३६) श्री. दादाराव केचे |
| (३७) श्रीमती सरोज अहिरे | (३८) श्रीमती ऋतुजा लटके |
| (३९) श्रीमती मंजुळा गावित | (४०) श्री. सुभाष धोटे |
| (४१) श्रीमती सीमा हिरे | (४२) श्रीमती सुलभा खोडके |
| (४३) श्रीमती अश्विनी जगताप | (४४) श्री. शेखर निकम |
| (४५) श्री. दिलीप लांडे | (४६) श्री. विक्रम सावंत |
| (४७) श्री. समाधान आवताडे | (४८) श्री. दिलीप मोहिते |
| (४९) श्री. वैभव नाईक | (५०) श्री. देवेंद्र भुयार |
| (५१) श्री. मोहनराव हंबर्डे | (५२) श्री. गणपत गायकवाड |
| (५३) श्री. दीपक चव्हाण | (५४) श्री. अबु आझमी |
| (५५) श्री. विनोद निकोले | (५६) कॅप्टन आर. तमिल सेल्वन |
| (५७) श्री. निलेश लंके | |

वैद्यकीय शिक्षण मंत्री, उद्योग मंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता), महसूल मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री यांनी आपापल्या संबंधित विभागांच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवरील महसूल व वन विभाग, नगरविकास विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग या विभागांच्या पुरवणी मागण्या आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या एकत्रितपणे मतास टाकून संमत झाल्या.

**४.** पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३**

१. राज्यातील अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट आणि अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान आणि त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष,

आणि

२. राज्यातील शेतकऱ्यांना भेडसावणारे विविध प्रश्न आणि त्यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना

उपरोक्त दोन्ही प्रस्तावांवरील एकत्रित चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. प्रशांत बंब
(२) श्रीमती सुमन पाटील
(३) श्री. उदयसिंग राजपूत
(४) श्री. विनोद अग्रवाल
(५) श्री. अशोकराव चव्हाण
(६) श्री. हरिभाऊ बागडे
(७) श्री. दीपक चव्हाण
(८) श्री. रमेश बोरनारे
(९) श्री. सुरेश वरपुडकर
(१०) श्रीमती श्वेता महाले
(११) श्री. प्राजक्त तनपुरे
(१२) श्री. सुहास (अण्णा) कांदे
(१३) श्री. अमित झनक
(१४) श्री. बबनराव लोणीकर
(१५) श्री. दिलीपराव बनकर
(१६) श्री. कैलास पाटील
(१७) श्री. जितेश अंतापूरकर
(१८) कु. प्रणिती शिंदे
(१९) श्री. जयकुमार गोरे

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५८ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स. यांनी, 'मराठा आरक्षणासंदर्भात सभागृहात चर्चा घेण्यात यावी' इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

मराठा आरक्षणासंदर्भात निश्चितपणे चर्चा घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**१.** (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) संसदीय कार्य मंत्री यांनी, 'महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक १७ जुलै, २०२३ ते दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ७२० आश्वासनांची यादी तसेच, सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २०१ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(२) कृषी मंत्री यांनी,

(क) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल व

(ख) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा चौपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** संसदीय कार्य मंत्री यांनी, 'सर्वश्री नवाब मलिक (१९ दिवस), चेतन विठ्ठल तुपे (पाटील) (१९ दिवस), वि.स.स. यांचे सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनाच्या कालावधीतील विधानसभेच्या बैठकांना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडला.

अनुमती देण्यात आली.

(१) श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी, "कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांना भेटण्यासाठी शिर्डीचे वारकरी जात असताना त्या वारकऱ्यांच्या दिंडीमध्ये ट्रक घुसल्याने त्यामध्ये ४ वारकऱ्यांचे निधन व १० हून अधिक वारकरी जखमी होणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

मुख्यमंत्री यांनी याबाबत मदतीचे घोषणा केली.

(२) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती श्री. आनंद निरगुडे यांनी दिलेला राजीनामा" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने गंभीर नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(३) श्री. राजेश टोपे, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्रामध्ये व्यापाऱ्यांकडून आकारण्यात येत असलेला व्यावसायिक कर रद्द करण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष यांनी दिलेला राजीनामा याबाबत माननीय विरोधी पक्षनेता श्री. विजय वडेट्टीवार व सन्माननीय सदस्य यांनी उपस्थित केलेल्या विषयाच्या संदर्भात राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांनी स्पष्टीकरण दिले.

(३) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी, "वर्तक नगरमधील पोलीस वसाहतीच्या पुनर्बांधणीसाठी मागील अधिवेशनामध्ये मांडलेल्या लक्षवेधी सूचनेस, माननीय उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी, 'वसाहतीची पुनर्बांधणी लवकरात लवकर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात येतील असे उत्तर दिल्यानंतर एक वर्षे उलटून गेल्यावर देखील संबंधित अधिकाऱ्यांनी उक्त प्रकरणी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहिती नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांनी याबाबत नोंद घेतली.

(४) श्री. दिलीप मोहिते, वि.स.स. यांनी, "त्यांच्या मतदारसंघातील भिमाशंकरच्या शेजारी पठारावर असलेल्या पदरवाडी या आदिवासी गावाचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स. यांनी, "सोलापूर येथे होणारे श्रीअन्न उत्कृष्टता केंद्र रद्द करून ते बारामती येथे करण्यात येणार असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. अमित देशमुख, वि.स.स. यांनी, "लातूर जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. अंगद वाघमारे यांनी मातंग समाजाच्या मागण्यांसाठी बेमुदत उपोषण सुरू केलेले असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. यांनी, "सोलापूर येथे होणारे श्रीअन्न उत्कृष्टता केंद्र इतरत्र कोठेही स्थालांतरित न करता सोलापूर येथेच स्थापन करावे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. महेश बालदी, वि.स.स. यांनी, "उरण मतदारसंघातील खाडीला लागून असलेली कोपरोली ते पिरकोन या गावांमध्ये खाडीचे बंधारे तुटल्यामुळे २ ते ३ हजार एकर जमीन नापिकीकडे चालली आहे. त्यामुळे येथे शासनाने लवकरात लवकर बंदिस्ती करावी" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. राम सातपुते, वि.स.स. यांनी, "दुधाचे दर वाढविण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) डॉ. राजेंद्र शिंगणे, वि.स.स. यांनी, "बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा या तालुक्यातील साखरखेडा परिसरात ताडीच्या नावावर ड्रग्सची विक्री होत असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. जयकुमार रावल, वि.स.स. यांनी, "तापी बोराई योजनेमुळे सिंदखेडा व नंदूरबार तालुक्याचा विकास होणार असल्यामुळे ही योजना तत्काळ सुरू करण्यात यावी" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी, "पोलीस शिपाई भरती सन २०२३-२४ याद्वारे होणाऱ्या भरतीसाठी उमेदवारांची वयोमर्यादा वाढवून दिलेली असल्याने सदर भरतीस २ ते ३ महिन्यांची मुदतवाढ देण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांनी, ''परभणी जिल्ह्यात पिंपळदरी तालुका, गंगाखेड, पालन येथे रावराजूर व पूर्णामध्ये कावलगाव या ४ मंडळांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याची गरज" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्रीमती यशोमती ठाकूर, वि.स.स. यांनी, "एमआयडीसी नांदगाव पेठ येथे असलेली हर्मन फिनोकेम ही कंपनी दुसरीकडे जात असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, २०२४ ही सरळसेवा भरतीची जाहिरात जानेवारी महिन्यात देण्याऐवजी डिसेंबरमध्ये देऊन परीक्षार्थी मुलांना २ वर्षाच्या मुदतवाढीचा लाभ देण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत उचित कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१६) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, "आराम नगर येथील म्हाडाच्या वसाहतीमध्ये मुंबई महानगरपालिका कोणतीही व्यवस्था करीत नसल्यामुळे म्हाडाने दखल घेऊन अशा ठिकाणी मालमत्ता कराचे निर्धारण वाढवण्याचे प्रयत्न रोखण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्र नगरपरिषद राज्य सेवा गट-क परीक्षा २०२३ यासाठी दि. ११ जुलै २०२३ मध्ये आलेल्या जाहिरातीमध्ये स्थापत्य अभियंता, संगणक अभियंता, व विद्युत अभियंता, पाणीपुरवठा व मलनिस्सारण अभियंता, अग्निसेवा, स्वच्छता निरीक्षक, नगररचनाकार, कर निर्धारण, प्रशासकीय अधिकारी, लेखापाल व लेखापरीक्षक या संवर्गामध्ये अनेक जागा रिक्त असताना केवळ निवडक संवर्गातील जागाच भरल्या जात असणे"इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री. वैभव नाईक, वि.स.स. यांनी, "सिंधुदुर्ग जिल्ह्यात एलईडी व पर्ससीन नेटद्वारे मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या मासेमारी असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषणाचा मजकूर उपलब्ध नाही.)

(२०) श्रीमती वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, "मुंबई महिला अग्निशामक दलासाठी आपल्या राज्याचे स्वतंत्र धोरण नसणे, तसेच महिला अग्निशामक दलासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे तसेच इतरही अनेक सुविधा नसणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्री. शेखर निकम, वि.स.स. यांनी, "चिपळूण शहरामध्ये गेले २ दिवस सर्व विहिरी दूषित पाण्याने खराब झाल्यामुळे चिपळूण शहरातील अनेक लहान मुले आजारी पडलेली असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांनी, "चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यात विशेषतः राजुरा विधानसभा मतदारसंघात कार्यकर्ते गेल्या ७ तारखेपासून उपोषणाला बसलेले असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२३) श्री. दादाराव केचे, वि.स.स. यांनी, "वर्धा जिल्हातील सतत होत असलेल्या अवकाळी पावसामुळे आर्वी, आष्टी, कारंजा तालुक्यातील कापूस, तूर, चणे व गहू पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत देण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२४) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "जालन्यामध्ये श्री. गजानन तोर नावाच्या व्यक्तीवर दिवसाढवळ्या गोळ्या झाडण्यात येणे, अमरावतीमध्ये मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा मिळाला असणे, घाटकोपर, विक्रोळी येथील अंगणवाडीच्या पोषण आहारामध्ये उंदीर, पालीची विष्ठा आढळून येणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी मांडलेल्या माहितीचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने या विषयावर निवेदन करावे असे निर्देश माननीय अध्यक्षांनी दिले.

राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांनी याबाबत नोंद घेतली.

(२५) श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी, "पिंपरी-चिंचवड परिसरात फटाक्याच्या दारुपासून मेणबत्त्या बनविण्याच्या कारखाण्यात स्फोट होऊन त्यामध्ये ९ कामगार मयत झालेले असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२६) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी, “दुधाचा भाव शासन परिपत्रकानुसार ३४ रुपये असताना शेतकऱ्यांना मात्र जागेवर २५ ते २६ रुपये मिळत असल्याने पुणे,नाशिक व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सुरू केलेले आंदोलन” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२७) श्री. सुनिल राऊत, वि.स.स. यांनी, “मतदार संघातील कन्नमवार नगर येथे ५० ते ६० वर्षापूर्वी बांधलेल्या म्हाडाच्या जीर्ण व मोडकळीस आलेल्या जुन्या इमारतींना सीआरझेडमधून वगळून त्यांचा पुनर्विकास करण्याकरिता सरकारने लक्ष घालण्याची आवश्यकता” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२८) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी, “साकीनाका, घाटकोपर व विनोबा भावे पोलीस स्टेशन हद्दीत मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची सर्रास विक्री होत असणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२९) श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स. यांनी, “त्यांच्या मतदारसंघामध्ये दिनांक २८ नोव्हेंबर पासून मोठ्या प्रमाणात पडलेल्या अवकाळी पावसाने धान उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान व त्यांना तातडीने प्रति हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करण्याची आवश्यकता” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**४.** आज मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण २ सूचना प्राप्त झाल्या असल्या तरी देखील आज सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवर सभागृहात चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस) तसेच गिलोटीन असल्यामुळे महाराष्ट्र विधानसभा नियम २६० (५) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाहीत असे सांगून सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले व त्याऐवजी सन्माननीय सदस्यांनी उक्त सूचनांसंदर्भात थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी, “राज्याचा भ्रष्टाचारासह दंगलीमध्येही वरचा क्रमांक आल्याची नोंद एनसीआरबीने घेतली असणे” याबाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी दिलेल्या जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भातील स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

**५.** (१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

(२) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,

(३) इतर मागास बहुजन कल्याण विभाग.

आता उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या पुरवणी मागण्या चर्चेला घेण्यात येतील. या विभागांच्या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिके सोबत वितरित केला असून कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने ३० दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे गृहीत धरून चर्चेस प्रारंभ होईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात झाली.

मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुभाष धोटे
(२) श्री. संजय केळकर
(३) श्री. प्राजक्त तनपुरे
(४) श्री. विजय वडेट्टीवार

(चर्चा अपूर्ण)

श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. यांनी, ‘इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर इंडस्ट्रीमधील कामगारांचा मागील २१ दिवसांपासून संप सुरू असणे,’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननी सदस्यांनी भाग घेतला.

(५) श्री. संजय गायकवाड
(६) श्री. प्रकाश आवाडे
(७) श्री. जयंत पाटील
(८) श्री. रवि रणा
(९) श्री. नाना पटोले
(१०) श्री. अभिमन्यू पवार
(११) श्री. सुनिल शेळके
(१२) श्री. प्रकाश आबिटकर
(१३) श्री. देवेंद्र भुयारी
(१४) कुमारी प्रणिती शिंदे
(१५) श्रीमती मनिषा चौधरी
(१६) श्री. शेखर निकम
(१७) श्री. रविंद्र वायकर
(१८) श्री. बच्चू कडू
(१९) श्री. शिरीषदादा चौधरी
(२०) श्री. भिमराव (आण्णा) तापकीर
(२१) श्री. चंद्रकांत उर्फ राजूभैया नवघरे
(२२) डॉ. संजय रायमुलकर
(२३) श्री. मोहम्मद इस्माईल अब्दुल खलिक
(२४) डॉ. विश्वजीत कदम

(२५) श्री. हरिभाऊ बागडे (२६) श्री. निलेश लंके

(२७) श्री. रमेश कोरगावकर (२८) श्री. किशोर जोरगेवार

(२९) श्री. लहु कानडे

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री, उद्योग मंत्री यांनी उपरोक्त विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री यांनी उपरोक्त विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती केली.

उपरोक्त विभागांच्या मागण्या वितरित केलेल्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**चर्चारोध (गिलोटीन)**

**अनुदानाकरिता पुरवणी मागण्या-**

चर्चारोधानंतर असलेल्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक –

(१) सामान्य प्रशासन विभाग

(२) गृह विभाग

(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(५) वित्त विभाग

(६) सार्वजनिक बांधकाम विभाग

(७) जलसंपदा विभाग

(८) विधि व न्याय विभाग

(९) ग्रामविकास विभाग

(१०) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(११) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(१२) नियोजन विभाग

(१३) गृहनिर्माण विभाग

(१४) सार्वजनिक आरोग्य विभाग

(१५) आदिवासी विकास विभाग

(१६) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

(१७) उच्च व तंत्र शिक्षण विभाग

(१८) महिला व बाल विकास विभाग

(१९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

(२०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(२१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

(२२) अल्पसंख्याक विकास विभाग

(२३) मृद व जलसंधारण विभाग

आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**६. (अ) (१) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी,** 'सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५१ – महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(ब) (२) महसूल मंत्री यांनी,** 'सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५२ – महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारनेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**७.** ॲड. आशिष शेलार व इतर, वि.स.स. यांचा प्रस्ताव-

श्री. शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

"राज्यात गत तीन महिने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा मुद्दा आंदोलने, मोर्चे, अन्न सत्याग्रह इत्यादी माध्यमातून ऐरणीवर आला असणे, काही समाजकंटकांकडून आरक्षण मिळण्याकरिता जाळपोळ, दंगल इत्यादी माध्यमांचा वापर झाल्याचे निदर्शनास येणे, त्यापैकी काही गट मराठा समाजाचा ओबीसीत समावेश न करता स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी करीत असणे, तर काही गट मराठा समाजाला कुणबी ओबीसींचे दाखले द्यावेत म्हणून आग्रही असणे, यासोबतच राज्यातील ओबीसी जनमोर्चा, धनगर, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, बंजारा, मुस्लिम इत्यादी समाजही आरक्षणाच्या मागणीसाठी पुढे आल्याची बाब निदर्शनास येणे, कोळी व महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीत आरक्षणाचा लाभ मिळण्याबाबत व तसे दाखले देण्याबाबत होत असलेली मागणी, महायुती शासनाच्या काळात मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण परत मिळावे ही मराठा समाजाची अपेक्षा असणे, यासाठी क्युरेटिव्ह याचिकाही दाखल करण्यात आली असणे, न्यायमूर्ती भोसले समितीने सुचविलेल्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या असणे, मराठा आरक्षण प्रश्नी सरकारला मार्गदर्शन करण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तीन निवृत्त न्यायमूर्तीची समिती शासनाने गठीत केलेली असणे, इतर मागास समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची शासनाची भूमिका असणे, केंद्र शासनाच्या विश्‍वकर्मा योजनेची सांगड घालत राज्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी करून बारा बलुतेदारांना लाभ मिळवून देण्याचे शासनाचे धोरण असणे, राज्यातील बारा जातींचा ओबीसी म्हणून महाराष्ट्राच्या सुचित समावेश असणे, त्याच धर्तीवर केंद्राच्या सुचित समावेश करण्यासाठी तसा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्राकडे पाठविण्यात आला असणे, मराठा समाजाचा इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे काम युध्द पातळीवर सुरू असणे, निजामकालीन कुणबी समाजाच्या नोंदी तपासण्याचे काम युध्दपातळीवर सुरू असणे, सारथी, बार्टी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ व महाज्योतीप्रमाणे इतर मागासवर्गाच्या ओबीसी महामंडळाला समान निधी देण्याचे आदेश अर्थ मंत्रालयाकडून काढण्यात येणे, बंजारा तांडे रस्त्यांना जोडण्यासाठी संत सेवालाल महाराज जोड रस्ते योजना, धनगर वस्त्या रस्त्यांना जोडण्यासाठी यशवंतराव होळकर जोड रस्ते योजना व इतर मागासवर्ग विमुक्त जाती 'अ' भटक्या जमाती 'ब', 'ड' व विशेष

मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना राज्य शासनाकडून लागू करण्यात आली असणे, आरक्षण आंदोलनाकडे राजकीय चष्म्यातून न बघता सर्वच राजकीय पक्षांनी चर्चाविमर्शाच्या माध्यमातून आरक्षण प्रश्नी तोडगा काढण्याची आवश्यकता, अन्य आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी शासन कटिबध्द असणे, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अशोकराव चव्हाण

(२) श्री. प्रकाश सोळंके

(३) श्री. प्रकाश आबिटकर

(४) श्री. नितेश राणे

(५) श्री. पृथ्वीराज चव्हाण

(चर्चा अपूर्ण)

## बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३

( १ ) सर्वश्री महेश लांडगे, सुनिल प्रभू, श्रीमती अश्विनी जगताप, श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले—

"इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीला जोडणारी पवित्र इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पासाठी पुढाकार घेतला असणे, राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करीत असणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन, केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून 'नमामी गंगा' प्रकल्पाच्या धर्तीवर 'नमामी इंद्रायणी' हा नदी सुधार प्रकल्प हाती घेण्यात येणार असून पिंपरी-चिंचवडच्या जीवनवाहिनी असलेल्या पवना, इंद्रायणी आणि मुठा नद्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असणे, इंद्रायणी नदीबाबत राज्यातील वारकऱ्यांमध्ये श्रद्धा असून लाखो भाविक देहू आणि आळंदीत प्रतिवर्षी येत असणे, मात्र, पवित्र इंद्रायणी नदीची अवस्था पाहून त्यांना दुःख होत असणे, जलसृष्टी नष्ट झाली असून, पर्यावरण प्रेमींमधून संताप व्यक्त होत असणे, तसेच, पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पवना नदीच्या प्रदूषणाचा प्रश्नही अत्यंत ज्वलंत असल्याने पवना, इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांना गती देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी, माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

( २ ) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले—

"मिरा-भाईंदर शहर विकास आराखड्याची मुदत सन २०१७ मध्ये संपुष्टात आल्यानंतर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत मिरा-भाईंदर शहराचा नवीन विकास आराखडा नुकताच प्रसिध्द करण्यात येणे, परंतु, मिरा-भाईंदर शहरातील वाढती लोकसंख्या व वाढत्या मागणीनुसार नागरिकांना सोयी सुविधा देण्याकरिता विकास आराखड्यात काही बदल करणे गरजेचे असल्याचे आयुक्तांना लोकप्रतिनिधींसह नागरीकांकडून सुचविण्यात येणे, आयुक्तांना व महानगरपालिका प्रशासनाला विश्वासात न घेता नगररचना विभागाने विकास आराखडा प्रकाशित करणे, नविन विकास आराखड्यात मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए.च्या नियोजनाखाली ६ गावे असून त्या ६ गावांचा स्वतंत्र विकास आराखडा असणे, ६ गावांचा विकास आराखडा रद्द

करून ही गावे महानगरपालिकेत समाविष्ट करणे गरजेचे असणे, तसेच एम.एम.आर.डी.ए.च्या रेंटल हौसिंग योजनेची घरे महानगरपालिकेला कायमस्वरूपी देण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊन देखील अद्यापपर्यंत ही घरे महापालिकेच्या ताब्यात आलेली नसणे, तसेच दहिसर-भाईंदर लिंक रस्त्याचे काम लवकर सुरू होणे आवश्यक असल्यामुळे भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी प्रस्तावित लिंक रोड मधील जमिनी ताब्यात घेण्यासाठी नगरविकास विभागाने मंजूरी देऊन अधिसूचना काढणे गरजेचे असणे, नागरीकांसाठी महत्वाची असलेली सगळी आरक्षणे विकास आराखड्यात समाविष्ट करून आवश्यक त्याठिकाणी रस्ता रुंदीकरण या विषयांवर महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या सुचनेनुसार आराखड्यात बदल व नव्याने आरक्षणे प्रस्तावित करून जनतेचे हित लक्षात घेऊन आरक्षणे विकास आराखड्यात समाविष्ट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी, माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक-३ पुढे ढकलण्यात येत असून त्यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक-४ चर्चेला घेण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(४) श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"मौजे अस्दुल्लाबाद, ता. जि. नांदेड येथील हैद्राबाद इनाम रोख अनुदान कायदा १९५४ अन्वये इनाम देण्यात आलेल्या जमिनीवर वसाहत/नागरी वस्ती वसल्याचे निदर्शनास येणे, सदरची वस्ती गत ४० वर्षापासून असल्याचे स्पष्ट होणे, दरम्यानच्या काळात सदर जमिनी नागरी क्षेत्रात आल्यामुळे जमीनींचे ७/१२ बंद होऊन नगर रचना विभागाने भुमापन क्रमांक दिलेले असणे, सदर जमिनी नविन अविभाज्य शर्तीवर धारण करण्यात आल्या असणे, या जमिनींच्या हस्तांतरण व त्यावरील बांधकामांच्या दुरुस्तीसाठी बंधने असणे, जमीनीच्या वापराच्या नियमानुकुलनासाठी आकारण्यात येणाऱ्या दंड व अन्य रकमांबाबत समानता नसणे, सध्याची आकारणी अन्यायकारक असल्यामुळे धोरणात्मक निर्णयासाठी आवश्यक आकडेवारी व वित्तीय तपशिलासह मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता असणे, मात्र महसूल मंत्री यांनी स्पष्ट सूचना देवूनही महसूल विभागाने अद्याप कोणतीही कार्यवाही न करणे, परिणामतः दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथील महसुल मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय होऊनही पुढील कोणतीही कार्यवाही न होणे परिणामी स्थानिक नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री. रईस शेख, अबू आजमी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले—

श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"सध्या देशातील अंदाजे २४ लाख यंत्रमागापैकी ५०% म्हणजे अंदाजे १२ लाख साधे यंत्रमाग राज्यामध्ये असणे, या उद्योगामुळे शेती पाठोपाठ प्रचंड मोठा रोजगार उपलब्ध होत असणे, तसेच वस्त्रोद्योगातील सर्वाधिक महसूल यंत्रमाग क्षेत्रातून मिळत असणे, या क्षेत्राकडे राज्य सरकारचे पूर्णपणे दुर्लक्ष होणे, दिनांक २ जून, २०२३ रोजी जाहीर झालेल्या सन २०२३ ते २०२८ या पंचवार्षिक वस्त्रोद्योग धोरणामध्ये राज्यातील सध्याची यंत्र मागक्षेत्राची दखलही न घेणे, माहे जून, २०२३ च्या अखेरीस वस्त्रोद्योग मंत्री यांनी वस्त्रोद्योग धोरणातील दुरुस्त्यासाठी राज्यातील सर्व संघटनांच्या सूचना घेऊनही आजअखेर आलेल्या सूचनांचा कोणताही विचार न होणे,तसेच धोरणात कोणतीही दुरुस्ती न करणे, राज्यातील २७ हॉर्स पॉवरचे वरील यंत्रमाग धारकांना ७५ पैसे प्रति युनिट अतिरिक्त वीजदर सवलत देण्याची घोषणा तत्कालीन उपमुख्यमंत्री यांनी माहे मार्च, २०२१ मध्ये सभागृहात केली असतानाही अद्यापही अंमलबजावणी न होणे, २७ हॉर्स पॉवरचे खालील यंत्रमागधारकांना १ रुपया प्रति युनिट अतिरिक्त वीजदर सवलत देण्याच्या राज्य सरकारच्या घोषणेची अद्यापपर्यंत अंमलबजावणी न होणे, विदर्भ आणि मराठवाड्यात विद्युत शुल्क माफ असणे, एकाच राज्यातील यंत्रमागधारकांमध्ये दोन वेगवेगळे दर आणि उद्योगाला घातक अशी स्पर्धा निर्माण होणे, यंत्रमाग धारकांसाठी जाहीर केलेल्या स्थिर कर्जावरील ५% व्याजदर सवलतीचा लाभ न मिळणे, सूताची साठेबाजी, गैरव्यवहार, सतत बदलते सूतदर, व्यापारी वर्गातून वेळोवेळी जाहीर होणारी दिवाळखोरी, इत्यादी सर्व कारणांमुळे यंत्रमाग व्यवसाय मागील काही वर्षामध्ये संकटात येणे, या सर्व बाबीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या यंत्रमागक्षेत्राला स्थैर्य देण्यासाठी वस्त्रोद्योग धोरणामध्ये राज्य सरकारने करावयाच्या उपाययोजना, या क्षेत्रातील रोजगार निर्मिती क्षमता विचारात घेऊन या क्षेत्राच्या विकासासाठी कायमस्वरूपी उपाययोजना आणि स्थिर धोरण निश्चित करण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वस्त्रोद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"इंदापूर (जि. पुणे) येथील तसेच राज्यात पुणे, अहमदनगर, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, सातारा व औरंगाबाद या सात जिल्ह्यांमध्ये शेती महामंडळाच्या एकूण १४ मळ्यावर हजारो कामगारांपैकी ८०% कामगार अनुसूचित जाती/जमाती, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय प्रवर्गातील असणे, या कामगारांच्या राहत्या घरांची पडझड झाल्याने संसार उघड्यावर आले असणे, शासनाच्या माध्यमातून घरकूल योजनेतून घरेही मंजूर झाली असूनही जागेअभावी वंचित राहावे लागत असणे, निवृत्त व रोजंदार कामगार, कामावर असलेले व मयत कामगारांचे वारसदार यांना राहण्यासाठी महामंडळाकडे शिल्लक असलेल्या जमिनीपैकी दोन गुंठे जागा देऊन पंतप्रधान घरकूल योजनेच्या माध्यमातून घर बांधून मिळणेची मागणी सदर कामगारांच्या प्रश्नावर तत्कालीन शासनाने दिनांक ५ मे, १९९८ रोजी ना. रामराजे निंबाळकर समिती नेमलेली असणे, या समितीने कामगारांना जमिन व घर देण्यासाठी सकारात्मक शिफारशी केलेल्या असणे, समितीच्या शिफारशी स्वीकारण्याची मागणी, शेती महामंडळाच्या कामगारांना सध्या ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन दिले जाते, ६ वेतन आयोग लागू करण्याची महसूल विभागाकडे प्रलंबित असलेली मागणी मंजूर करण्याची आवश्यकता, कामगारांचा थकीत असणारा ४ था व ५ व्या वेतन आयोगाच्या वेतनाची फरक देण्याची मागणी, शेती महामंडळाकडे असणाऱ्या रिक्त जागांवर शेती महामंडळाच्या स्टॅपींग पॅटर्नप्रमाणे जागा भरण्याची मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) सर्वश्री रणधीर सावरकर, रवि राणा, प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"अमरावती विभागातील कोळी महादेव आदिवासींकडून अनुसूचित जमातीचे प्रमाण पत्र वितरित करण्याच्या मागणीची शासनाकडून अनेक वर्षांपासून दखल न घेतल्याने कोळी महादेव आदिवासी बांधवांवर अन्याय होणे, कोळी महादेव जातीच्या लोकांना सक्षम महसुली अधिकाऱ्यांकडून जातीचे प्रमाणपत्र वितरित करतांना, आदिवासी विकास विभागाचे अस्तित्वातील प्रचलित नियमांचे पालन न करणे, आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक ३० जून, २००४ अन्वये शासनाकडून विदर्भ प्रांतातील (पूर्वीचा बेरार प्रांत) कोळी महादेव जमातीची गावे आदिवासी गावे म्हणून घोषित केलेली असणे, घोषित गावातील कोळी महादेव जातीच्या लोकांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र वितरित

न करणे, महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ मधील नियम ३ (४) मधील तरतुदी महसूल अधिकाऱ्यांनी विचारात घेऊन अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना सन १९५० पूर्वीच्या उपलब्ध नसलेल्या पुराव्याची मागणी करून टाळाटाळ करू नये असे आदिवासी विकास विभाग निर्णय दिनांक २४ जानेवारी, २०२० अन्वये आदेश असणे, उप विभागीय अधिकारी यांनी पुराव्याची मागणी करणे, विदर्भ कोळी महादेव या जमातीचा अनुसूचित जमात असल्याच्या निजामकालीन, ब्रिटीशकालीन प्राचीन दस्तऐवज, नोंदी असणे, सदर कोळी महादेव जमातीचे विद्यार्थी, विकास योजनाचे लाभार्थी हे घटनादत्त अधिकारापासून वंचित होत असल्याने त्यांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र तातडीने वितरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५५ मिनिटांनी सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तीन तारांकित प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चोवीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

कु. प्रणिती शिंदे, वि.स. स. यांनी ता. प्र. क्रमांक ७१६६० ला उत्तर देताना मंत्री महोदयांनी केलेल्या वैयक्तिक आरोपाबाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला. तसेच संबंधित मंत्री महोदयांचे वक्तव्य रेकॉर्डवरून काढून टाकण्याबाबत व "याबाबत मी त्यांना दहावेळा पत्र दिले" असे माझ्या रेकॉर्डवर घेण्याबाबत विनंती केली.

सदरहू रेकॉर्ड तपासून जर का नियमांच्या विरुद्ध कार्यवाही झाली असेल तर ते रेकॉर्डवरुन काढण्यात येईल. तसेच काही अनपार्लमेंटरी आढळून आले तर ते देखील रेकॉर्डवरुन काढण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**२.** ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्र्यांनी "हुपरी (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील ग्रामपंचायतीमध्ये झालेला गैरव्यवहार" या विषयावरील डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ६६६६३ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**३.** माननीय अध्यक्षांनी, श्री. विठ्ठलराव कोंडाजी शिंदे, माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. अनिल देशमुख, वि.स.स. यांनी, 'विधानसभेचे माजी सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव कार्लेकर (वर्धा) यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीस मंत्रालयातील कार्यालयाशी वारंवार संपर्क करूनही अद्याप पेन्शन न मिळणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू माहिती संदर्भात संपूर्ण चौकशी करण्यात येऊन योग्य ती कारवाई केली जाईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**४.** (१) संसदीय कार्य मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वैधानिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) वने मंत्र्यांनी, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) संसदीय कार्य मंत्र्यांनी,

(क) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(ख) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(ग) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(घ) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(ड.) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(च) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(छ) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल,

(ज) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(४) संसदीय कार्य मंत्र्यांनी, विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, ' माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशाचे सरकारकडून पालन न होणे' इ.बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(१) श्री. सुनील केदार वि.स.स., यांची , " कार्वा फा.येथील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर अवघ्या ४८ तासातच साधना संजय जराते या महिलेचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे झालेला मृत्यू" या विषयावरील स्थगन प्रस्तावाची सूचना प्राप्त झालेली आहे. तथापि सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही तरीही विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे, असे निदेश देऊन माननीय अध्यक्षांनी या सूचनेस अनुमती नाकारली.

उर्वरित स्थगन प्रस्तावाच्या सूचना दालनात नाकारलेल्या असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, 'दिनांक १ जुलै, २०२३ रोजी समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातामध्ये २५ लोकांचा बळी जाणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. नाना पटोले , वि.स.स. यांनी, 'नागपूर हरीतक्रांतीचे जनक स्व.वसंतराव नाईक सभागृहाची घोषणा होऊन १२ वर्षांचा कालावधी पूर्ण होऊनही अद्यापपर्यंत सदरहू कामास सुरुवात झालेली नसणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) डॉ. विश्वजीत कदम , वि.स.स. यांनी, 'मागील दोन दिवसांपासून केंद्र सरकारचे दुष्काळी पथक राज्यातील दुष्काळी गावे व तालुक्यांची पाहणी करण्यासाठी राज्यात दाखल झालेले असून या पथकाने पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली व सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांची पाहणी न करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. अबू आझमी, वि.स.स.(हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने भाषण प्रलंबित.)

(५) श्री. अमिन पटेल, वि.स.स.(हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने भाषण प्रलंबित.)

(१) श्री. विजय वडेट्टीवार , विरोधी पक्ष नेते यांनी, ' नवी मुंबईतील करावे गावातील एका १५ वर्षीय मुलाने आत्महत्या केल्याची घटना सोमवारी निदर्शनास येणे, राज्यातील शाळांच्या वेळापत्रकात बदल करणे व शालेय विद्यार्थ्यांना अपुऱ्या झोपेमुळे मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार असे आजार जडल्याचे दिसून येत आहे.' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

विरोधी पक्ष नेता यांनी दिलेली माहिती अत्यंत गंभीर आणि अत्यंत संवेदनशील आहे. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाने या माहितीची दखल घेऊन योग्य त्या उपाययोजना कराव्यात, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(२) श्री. सुनील प्रभू , वि.स.स. यांनी, ' मुंबई व महाराष्ट्रात सर्वत्र ड्रग्जचे जाळे पसरले असल्यामुळे नागरिकांना याचा त्रास होत असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. रविंद्र वायकर, वि.स. स. यांनी, ' जोगेश्वरी- विक्रोळी लिंक रोडवरील शामनगर तलावातील म्हणजेच लोकमान्य टिळक गणेश विसर्जन तलावातील हजारो मासे मृत पावल्यामुळे तलाव परिसरात दुर्गंधी पसरणे.' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. अभिमन्यू पवार, वि.स. स. यांनी, ' पंतप्रधान राष्ट्रीय पीक विमा योजनेंतर्गत ८ लाख ६१ हजार ६७५ शेतकऱ्यांनी अर्जाद्वारे पीक विम्याची केली असून काही जुजबी कारणे काढून लातूर जिल्ह्यातील १ लाख शेतकऱ्यांचे अर्ज बाद करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. नितेश राणे, वि.स. स. यांनी, 'नाशिक जिल्ह्यातील भ्रद्रकाली परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे दररोज सुरू असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. सुनील टिंगरे, वि.स. स. यांनी, 'पुणे महानगरपलिकेचा नवीन टीडीआर घोटाळा समोर येणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स. स. यांनी, 'तीन-चार दिवसांपूर्वीच राष्ट्रीय तपास यंत्रणेने महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यातील पडघा, बोरिवली या ठिकाणी छापा टाकून १५ पेक्षा जास्त अतिरेक्यांना अटक करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. दिलीप लांडे, वि.स. स. यांनी, 'मुंबई शहरातील वाल्मिकीनगर, अंबिकानगर, संजयनगर या ठिकाणी गेल्या १५ दिवसांपासून पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर होणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स. स. यांनी, ‘ विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना गेल्या शनिवारी नाशिकमध्ये गंगापूर रोडवर एका टेम्पोमध्ये ऑक्सिजन सिलेंडर नेले जात असताना ते व्यवस्थित वाहून न नेल्यामुळे सदर ऑक्सिजन सिलेंडरचा स्फोट होणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) डॉ. भारती लव्हेकर, वि.स. स. यांनी, ‘ वर्सोवा मतदारसंघातील वेसावे खाडीमध्ये सुमारे ५५ लाख क्युबिक मीटर इतका प्रचंड प्रमाणात गाळ साचत चालला असून त्यामुळे मच्छीमार बांधव अस्वस्थ होणे .’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. बाबासाहेब पाटील, वि.स. स. यांनी, ‘ लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील सुगाव ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक जागेवर एका व्यक्तीने अतिक्रमण करणे.’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. दादाराव केचे, वि.स. स. यांनी, ‘ आर्वी विधानसभा मतदारसंघातील आष्टी हा शहिदांचा तालुका असूनही गेल्या ७० वर्षांमध्ये या तालुक्याचा अपेक्षित विकास होऊ न शकणे.’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, ‘मुंबई शहरामध्ये भटक्या कुत्र्यांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढलेला असणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) डॉ. देवराव होळी, वि.स. स. यांनी, ‘पूर्व विदर्भातील काशी म्हणून ओळख असलेल्या मार्कंडा तीर्थक्षेत्राचा सन २०१४ पासून पुरातत्त्व विभागाने कोणताही विकास केलेला नसणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स. स. यांनी, ‘टीडीसीआय आणि फेडरेशनचे खरेदी केंद्र बारदाणा नसल्यामुळे चार-पाच दिवसांपासून बंद असणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्री. हरिष पिंपळे, वि.स. स. यांनी, ‘विदर्भातील शेतकऱ्यांच्या पिकांचे अवकाळी पाऊस तसेच नीलगाई, रानडुक्करे यांच्यामुळे अतोनात नुकसान होऊनही शेतकऱ्यांना पुरेपूर नुकसानभरपाई न मिळणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. संभाजी पाटील-निलंगेकर, वि.स. स. यांनी, ‘कृषी आणि महसूल विभागाने लातूर जिल्ह्यातील ६० महसुली मंडळे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले असूनही त्यापैकी केवळ ३२ महसुली मंडळातील शेतकऱ्यांनाच पैसे देण्यात आले असून उर्वरित २८ महसुली मंडळांना पैसे न देणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री. सदानंद सरवणकर, वि.स. स. यांनी, 'सोमवारी दुपारी माझ्या मतदारसंघातील 'पार्टी' नावाच्या हॉटेलमधील झटपट मटक्यावर पडलेल्या धाडीमध्ये सुमारे १०० जणांना पकडण्यात येणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री. प्रताप सरनाईक, वि.स. स. यांनी, 'हलाल आणि झटका केवळ मटण व्यवसायापुरता असूनही महाराष्ट्र राज्यामध्ये काही कंपन्यांनी कपडे, महिलांची सौंदर्य प्रसाधने यावर देखील असा शिक्का मारला जात असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर फार मोठ्या प्रमाणावर आक्रमण होणे.' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांनी, 'राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये संगणक चालक म्हणून काम करणाऱ्या लोकांना शासन सेवेत घेण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन त्यांना न्याय देणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, ' ठाणे जिल्ह्यात विशेषतः दिवा भागामध्ये जवळपास ४५ अनधिकृत शाळा जाहीर झाल्या असून या शाळांना २९ कोटी रुपये वसुलीच्या नोटीसा सुद्धा गेल्या असताना ते पैसे अद्याप वसूल न होणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. राजू आवळे, वि.स.स. यांनी, ' हातकणंगले मतदारसंघामध्ये पारडी ग्रामपंचायतीअंतर्गत ५ हजार लोकसंख्या असलेल्या या गावामध्ये सन २००६-०७ मध्ये मंजूर झालेली जलस्वराज योजना फक्त कागदावरच असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स. यांनी, ' गोंदियातील आमगाव मतदारसंघामध्ये मागील वर्षी रोजगार हमी योजनेची कामे खूप कमी प्रमाणात करण्यात येऊनही काही ठेकेदारांच्या माध्यमातून रस्त्यांची, नाल्यांची कुठलीही कामे करता FTO तयार करून पैशाची मागणी पैशांची मागणी सरकारकडे केलेली असणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांनी, 'नांदेड ते जालना मार्गावरील स्थानिक प्रतिनिधी व शेतकरी यांना जमिनीच्या मूल्यांकनानुसार एमआयडीसीकडून वाढीव मोबदला मिळणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. लहू कानडे, वि.स.स. यांनी, 'अहमदनगरमधील श्रीरामपूर मतदारसंघात ४ दिवसांपूर्वी कोणतीही सूचना न देता अचानक नगर-मनमाड राष्ट्रीय महामार्गावरील कोल्हार येथील पूलाचे बांधकामाचे कारण सांगून राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक बाभळेश्वर मार्गे श्रीरामपूर शहरातून साध्या रस्त्यांवरून वळविणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. संजय जगताप, वि.स.स. यांनी, ' पुण्यातील पुरंदर मतदारसंघातील फुरसुंगी आणि उरळी या दोन गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. अमित झनक, वि.स.स. यांनी, ' राज्यात शेतकऱ्यांना सिंचन विहिरीकरिता प्रचलित असलेल्या रोजगार हमी योजना आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबी योजना या दोन्ही योजनांचे अनुदान एकसारखेच म्हणजे ४ लाख रुपये करण्यात येणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांनी, ' मुंबई शहरासाठी STP चे Tender मंजूर होऊन १ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असूनही STP Plant सुरू न झाल्यामुळे २०० MLD पेक्षा अधिकचे घाण पाणी समुद्रामध्ये थेट सोडण्यात येणे ' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची गंभीर नोंद घ्यावी आणि उचित कार्यवाही त्वरित करावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(१५) श्री. कैलाश गोरंट्याल, वि.स.स.(हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने भाषण प्रलंबित.)

(१६) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स. यांनी, 'सन २०२१-२०२२ या वर्षातील मुंबई पोलीस भरतीच्या प्रतीक्षा यादीतील जवळपास सर्वच उमेदवारांची मेडिकल चाचणी करण्यात आली असून त्यांना अद्याप नियुक्ती आदेश देण्यात आलेले नसणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक जिल्ह्यातील एकूण २ कोटी १६ लाख नागरिकांनी मैत्रेय कंपनीमध्ये पैसे गुंतवले असून या कंपनीने जळपास २८०० कोटी रुपयांचा घोटाळा करणे ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी, 'सांगलीतील जत मतदारसंघातील बसर्गी येथील रब्बी पिकांसाठी पाणी सोडणे व जमिनीचे खरेदी-विक्रीचे व्यवहार सुरू करण्यासाठी तेथील लोकांनी आज सकाळपासूनच रास्ता रोको आंदोलन सुरू केलेले असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री. शिरीषदादा चौधरी, वि.स.स. यांनी, 'जळगाव जिल्ह्यातील ७८ हजार ४२१ शेतकऱ्यांनी केळी पिकाचा पीक विमा काढलेला असून मागील हिवाळ्यामध्ये पीक विम्याच्या नियमांमध्ये अचानक बदल केल्यामुळे हजारो शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ न मिळणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २० ) श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, ‘ श्री. नारायण भाऊसाहेब करगंळ, राहणार करंजखेडा ता. पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील एका ४२ वर्षीय शेतकऱ्याने बँकेतील अधिकाऱ्याच्या त्रासाला आत्महत्या करणे.’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २१ ) श्री. राजेश टोपे, वि.स.स. यांनी, ‘ दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ रोजी कायम विनाअनुदानित धोरण राज्य शासनाने स्वीकारूनही राज्यातील ७८ महाविद्यालये या धोरणामध्ये बसत नसल्याने या महाविद्यालयांना अनुदान न देणे .’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २२ ) श्री. राजू पारवे, वि.स.स. यांनी, ‘ नागपूरमधील उमरेड मतदारसंघातील करंडल गावाजवळील अभयारण्यातील वाघाने दररोज त्या गावातील तीन-चार गायींची हत्या करणे.’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २३ ) श्री. राजन साळवी, वि.स.स. यांनी, ‘राजापूर तालुक्यामध्ये बारसू या ठिकाणी दिनांक २४ एप्रिल ते दिनांक ११ मे पर्यंत शासनाच्या वतीने करण्यात आलेल्या माती परीक्षणाविरुद्ध आंदोलन करणाऱ्या जवळपास ३६० लोकांवर दाखल केलेले गुन्हे शासनाने गुन्हे मागे घेणे.’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २४ ) श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांनी, ‘ सन २०१९ मध्ये ग्राम विकास व ऊर्जा विभागाने ग्राम विद्युत व्यवस्थापक हे पद निर्माण करून मानधन तत्त्वावर नियुक्त केलेल्या ५० कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होत असणे.’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २५ ) श्री. अनिल देशमुख, वि.स.स. यांनी, ‘विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस पडल्यामुळे नागपूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपैकी काटोल व नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसानीचे पंचनामे निरंक दाखविणे.’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २६ ) श्री. महेश बालदी, वि.स.स. यांनी, ‘सुमारे १५-२० दिवसांपूर्वी उरण-पनवेल भागातील रॉयल्टीचे ड्युप्लीकेट पासेस महसूल खात्याने पकडले असून त्यांनी पोलिसांकडे गुन्हा नोंदवणे ‘ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २७ ) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी, ‘ मुंबईतील अनेक रुग्णालयांमध्ये सिटी स्कॅन मशीन, एमआरआय मशीन बंद असल्यामुळे अनेक रुग्णांना खाजगी रुग्णालयामध्ये खाजगी डॉक्टरांकडे पाठविले जात असणे.’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २८ ) श्री. उदयसिंह राजपूत , वि.स.स. यांनी, ‘ कन्नड मतदारसंघात पांदरा या गावात नागल येथे सबस्टेशनला आतून सौर ऊर्जेचा १० मेगावॅटचा प्रकल्प असून तेथील १६ ठिकाणी लाईन्स

एकमेकांवर क्रॉस झालेल्या लाईन्सचे दुरुस्तीचे काम तातडीने करणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २९ ) श्री. रमेश कोरगावकर, वि.स.स. यांनी, 'भांडुप मतदारसंघात केदारे चौक, गरीब मशीद, रामनगर, रावते कंपाऊंड, तानाजी वाडी या सर्व ठिकाणी नाक्यानाक्यावर अमली पदार्थाचे सेवन केले जात असून त्याच बरोबर रात्रीच्या वेळेस गैरधंदे सुरू असणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३० ) श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांनी, 'अमरावती जिल्ह्यात पीक विम्याच्या प्रकरणां-बाबतीतील प्रकरणे सुरू असून धामणगाव रेल्वे मतदारसंघातील दोन तालुके २५ टक्क्यांमध्ये घेऊन एक तालुका सोडून देणे .' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३१ ) श्री. संजयमामा शिंदे, वि.स.स. यांनी, ' करमाळा माढा विधानसभा मतदारसंघातील जवळ जवळ ८ ते १० गावांतील लोक गेले १० दिवस उपोषणाकरिता बसलेले असणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३२ ) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांनी, ' गंगाखेड, पालम पूर्णा येथे मोठ्या प्रमाणात गारपीट झालेली असून तेथील शेतकरी अक्षरशः उद्ध्वस्त झालेला असणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३३ ) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, 'मुंबईमध्ये वाढत्या वाहनसंख्येमुळे जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, एल अँड टी कंपनीजवळ असलेला उड्डाणपूल, आयआयटी पवई जवळचा रस्ता पश्चिम द्रुतगती मार्गावरील मालाड ते अंधेरी भागातील रस्ता, भांडूप पंपिंग स्टेशन, भायखळा सिग्नल, पूर्व द्रुतगती मार्ग, सायन उड्डाण पूल, सोमय्या मैदानाजवळील रस्ता या सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा प्रश्न निर्माण झालेला असणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३४ ) श्री. वैभव नाईक, वि.स.स. यांनी, ' सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासनाने गेल्या वर्षी व या वर्षी भाताचा बोनस जाहीर केला नसणे तसेच सिंधुदुर्गातील शेतकऱ्यांनी आता शेती बरोबर दुधाचा व्यवसाय देखील सुरू केलेला असल्याने कोल्हापूरहून शेतकऱ्यांना गुरे-ढोरे वाहतूक करताना मुभा देणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३५ ) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, ' राज्यातील पांदण रस्त्यांच्या कामांना रॉयल्टीसाठी परवानगी मिळणे, रेती माफियांमुळे रेतीडेपोवर परिणाम होणे तसेच मातंग समाजातील लोकांना न्याय मिळवून देणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी, 'मौजे तळवडे, पुणे येथील शिवराज एंटरप्रायझेस येथे लागलेली आग' इ. बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये निवेदन केले.

माननीय अध्यक्षांनी पुढील घोषणा केली—

"सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येत आहे की, १४ व्या विधानसभेचे नागपूर येथे सध्या सुरू असलेले अधिवेशन हे या विधानसभेचे नागपूर येथील शेवटचे अधिवेशन असून माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय मंत्री, माननीय मुख्य प्रतोद, माननीय प्रतोद, माननीय गट नेते व विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य यांचे एकत्रित छायाचित्र गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी १० वाजून ५० मिनिटांनी विधानसभा सभागृहासमोरील पायऱ्यांवर काढण्यात येणार आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी एकत्रित छायाचित्र काढण्यासाठी विधानसभा सभागृहासमोरील पायऱ्यांवर वेळेवर उपस्थित रहावे."

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, ' राज्यातील लहान-मोठ्या उद्योगांचे इन्सपेक्शन करणे राज्य शासनाने बंद करणे' इ. बाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन उपस्थित केला.

शासनाने याची नोंद घ्यावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

**५.** पशुसंवर्धन मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५०— महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३ विधेयक मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, सुभाष धोटे, विकास ठाकरे, सुनील केदार, अमीन पटेल, संजय जगताप, नाना पटोले, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, सर्वश्री भास्कर जाधव, रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्याबाबतच्या चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. भास्कर जाधव (२) श्री. पृथ्वीराज चव्हाण

(३) श्री. बाळासाहेब थोरात (भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांनी, 'थोड्या वेळापूर्वीच लोकसभा सभागृहातील प्रेक्षक गॅलेरीतून दोन तरुणांनी सभागृहामध्ये उड्या मारल्या आणि विषारी वायूच्या सिलेंडरचा स्फोट केला. त्यामुळे आता लोकसभा सभागृहामध्ये अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे' अशी माहिती सभागृहाला दिली.

सर्व सन्माननीय सदस्यांना आवश्यक असतील तेवढ्यास पासची शिफारस करावी, अशी वारंवार विनंती केली असून सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने आता कोणीही पासची मागणी करु नये, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५०- महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(४) श्री. रविंद्र वायकर
(५) श्री. अशोक पवार
(६) श्री. बच्चू कडू
(७) श्री. मंगेश चव्हाण
(८) श्री. प्रताप अडसड

पशुसंवर्धन मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**६.** ' मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे व कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका' या विषयावर ॲड. आशिष शेलार, श्री. भरतशेट गोगावले, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, ॲड. माणिकराव कोकाटे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री संजय शिरसाट, किशोर पाटील, अतुल बेनके, नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, सर्वश्री सुनिल शेळके, रणधीर सावरकर, प्रकाश आबिटकर, चेतन तुपे, बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री प्रकाश सोळंके, संतोष दानवे, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री बाळासाहेब आजबे, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, यशवंत माने, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री रमेश बोरनारे, दिपक चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, दौलत दरोडा, संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिभाऊ बागडे, चंद्रकांत पाटील, बाबासाहेब पाटील, बच्चू कडू, जयकुमार गोरे, दिलीप लांडे, भिमराव तापकीर, योगेश कदम, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री. राजेश पवार, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिध्दार्थ शिरोळे, राम कदम, मंगेश

चव्हाण, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड. लक्ष्मण पवार, सौ. सीमा हिरे, सर्वश्री राम सातपुते, जयकुमार रावल, डॉ. संजय कुटे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, देवयानी फरांदे, सर्वश्री समाधान अवताडे, कालीदास कोळंबकर, ॲड. राहूल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव—

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) ॲड. आशिष शेलार (भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी, संसदेच्या हिवाळी अधिवेशना दरम्यान लोकसभेतील सुरक्षेमध्ये गंभीर चूक घडली असून आज लोकसभेचे कामकाज सुरू असताना प्रेक्षक गॅलरीतून दोन जणांनी सभागृहामध्ये उडी मारल्याबाबतच्या मुद्यावर आपले म्हणणे मांडले.

‘ मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे व कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका’ या विषयावर ॲड. आशिष शेलार, श्री. भरतशेट गोगावले, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, ॲड. माणिकराव कोकाटे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री संजय शिरसाट, किशोर पाटील, अतुल बेनके, नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, सर्वश्री सुनिल शेळके, रणधीर सावरकर, प्रकाश आबिटकर, चेतन तुपे, बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री प्रकाश सोळंके, संतोष दानवे, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री बाळासाहेब आजबे, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, यशवंत माने, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री रमेश बोरनारे, दिपक चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, दौलत दरोडा, संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिभाऊ बागडे, चंद्रकांत पाटील, बाबासाहेब पाटील, बच्चू कडू, जयकुमार गोरे, दिलीप लांडे, भिमराव तापकीर, योगेश कदम, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री. राजेश पवार, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिध्दार्थ शिरोळे, राम कदम, मंगेश चव्हाण, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड. लक्ष्मण पवार, सौ. सीमा हिरे, सर्वश्री राम सातपुते, जयकुमार रावल, डॉ. संजय कुटे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, देवयानी फरांदे, सर्वश्री समाधान अवताडे, कालीदास कोळंबकर, ॲड. राहूल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव—

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(२) श्री. नाना पटोले (३) श्री. राजेश टोपे

(४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी भाषण केले.

(५) श्री. भास्कर जाधव (भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, ‘नागपूर विधान भवनवर लहुजी शक्ती सेनेचा प्रचंड मोठा मोर्चा येणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय उपाध्यक्षांनी दिले.

‘ मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे व कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका’ या विषयावर ॲड. आशिष शेलार, श्री. भरतशेट गोगावले, डॉ.राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, ॲड. माणिकराव कोकाटे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री संजय शिरसाट, किशोर पाटील, अतुल बेनके, नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, सर्वश्री सुनिल शेळके, रणधीर सावरकर, प्रकाश आबिटकर, चेतन तुपे, बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री प्रकाश सोळंके, संतोष दानवे, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री बाळासाहेब आजबे, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, यशवंत माने, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री रमेश बोरनारे, दिपक चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, दौलत दरोडा, संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिभाऊ बागडे, चंद्रकांत पाटील, बाबासाहेब पाटील, बच्चू कडू, जयकुमार गोरे, दिलीप लांडे, भिमराव तापकीर, योगेश कदम, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री.राजेश पवार, ॲड.आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिध्दार्थ शिरोळे, राम कदम, मंगेश चव्हाण, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड. लक्ष्मण पवार, सौ. सीमा हिरे, सर्वश्री राम सातपुते, जयकुमार रावल, डॉ. संजय कुटे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, देवयानी फरांदे, सर्वश्री समाधान अवताडे, कालीदास कोळंबकर, ॲड. राहूल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव—

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(६) श्री. बच्चू कडू (७) डॉ. संजय कुटे

(८) श्री. अमिन पटेल (हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने भाषण प्रलंबित)

(९) श्री. बाळासाहेब आजबे (१०) श्री. ज्ञानराज चौगुले

(११) श्री. सुभाष देशमुख (१२) श्री. अमित देशमुख

(भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

## गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३

(१) श्री. सुनिल टिंगरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून पुणे शहरातील विशेषतः पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट भागातील अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मोहीम चालू असणे, नव्याने समाविष्ट झालेल्या भागात पूर्वी गोरगरीब नागरिकांनी ऐपतीनुसार अल्पक्षेत्राचे प्लॉट खरेदी केलेले असणे, त्यावर आता आयुष्याची जमापुंजी लावून बांधकामे करत असणे, परंतु अल्पक्षेत्राच्या प्लॉटवर महानगरपालिकेच्या परवानगीकरिता असलेल्या नियमावलीनुसार बांधकामे करणे अशक्य असणे, अशी बांधकामे होत असतांना महानगरपालिकेचे पूर्णपणे दुर्लक्ष असणे, बांधकामे पूर्णत्वास जात असतांना त्यावर कारवाई करून गोरगरिबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणे, अशा प्रकारांमुळे गोरगरीब लोकांच्या आयुष्यभराच्या कमाईचे पूर्ण नुकसान होणे, अशा नागरिकांना व त्यांच्या कुटुंबियांना प्रचंड मानसिक त्रास होणे, अशा मानसिक त्रासामुळे नागरिकांचे हृदयविकाराने मृत्यू होण्याच्या घटना घडणे, त्यामुळे गोरगरीब नागरिकांमध्ये शासनाच्या विरोधात प्रचंड असंतोष निर्माण झालेला असून या संदर्भात शासनाची तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. सुनिल कांबळे, मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“मातंग समाज हा महाराष्ट्रासह संपूर्ण देशात वास्तव्यास असणे, या समाजातील बहुतांशी नागरिक भूमिहीन असून, मोलमजुरी करून आपले जीवन जगत असणे, उच्च शिक्षणापासून हा समाज वंचित असणे, तसेच शासकीय सेवेत देखील या समाजातील युवकांची संख्या अत्यंत अल्प असणे, शासनाने त्यांच्या मागण्या व प्रश्न सोडवून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता, मातंग समाजास ‘अ’, ‘ब’, ‘क’, ‘ड’ अनुसार वर्गवारी करून स्वतंत्र आरक्षण त्वरित लागू करण्याची आवश्यकता, क्रांतिवीर वस्ताद लहुजी साळवे आयोगाच्या ८९ शिफारशींची अंमलबजावणी करणे या शिफारशीपैकी ज्या शिफारशी मंजूर आहेत त्या मंजूर असलेल्या शिफारशीनुसार शासनाने प्रत्येक विभागाला मातंग समाजासाठी ज्या सवलती जाहीर केलेल्या आहेत त्या सवलती समाज बांधवांपर्यंत न पोहोचणे, त्यामुळे त्या विभागामधील सवलती पासून मातंग समाजातील समाज बांधव वंचित राहणे,

गंजपेठ पुणे येथील लहुजी वस्ताद यांच्या क्रांती शाळेस लहुजी वस्ताद साळवे यांचे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोग त्वरित कार्यान्वित करून त्यांचे नाव राष्ट्रपुरुषांच्या यादीत समाविष्ट करण्याची आवश्यकता, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळातर्फे थेट कर्ज प्रकरण त्वरित सुरू करणे आणि अण्णाभाऊ साठे महामंडळाचे थकीत कर्ज माफ करण्याची आवश्यकता, मातंग समाजाच्या या सर्व मागण्यांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पाणीपुरवठा मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

( ३ ) श्रीमती जयश्री जाधव, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"कोल्हापूर शहरातील शाहू मिलच्या सुमारे २६.८१ एकर जागेवर राजर्षी शाहु महाराजांचे यथोचित स्मारक करण्याची घोषणा तत्कालीन शासनाने दिनांक १८ डिसेंबर, २०२२ रोजी केली असणे, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१३ मध्ये सुमारे ५ कोटी व दिनांक ८ जानेवारी, २०१३ रोजी १ कोटी रुपयांचा निधी शासनाने जाहीर केला असेही निदर्शनास येणे, सदर शाहू मिलची जागा राज्याच्या वस्त्रोद्योग महामंडळाच्या ताब्यात असणे, ही जागा विनामुल्य कोल्हापूर महानगर पालिकेकडे हस्तांतरीत करण्यासाठी शासनाने अद्याप कोणती कार्यवाही किंवा उपाययोजना केल्या नसणे, तसेच शाहू मिल विकास आराखडा यासाठी महानगर पालिकेने सुमारे ४०० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनास सादर केला असणे परंतु शासनाने अद्याप कोणतीही कारवाई सदर प्रस्ताव प्रकरणी केली नसल्याने, सदर प्रस्ताव प्रलंबित असणे, तसेच छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रस्तावित उपरोक्त प्रस्तावास शासनाने मान्यता दिली नसल्याने शासनाने जागतिक पातळीवर आपल्या कार्याचा ठसा उमटवलेल्या आदर्श राजाच्या स्मारकाची परवड होत असल्यामुळे संपूर्ण शाहू प्रेमी सर्व जातीधर्माच्या लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, तसेच शासनाने तातडीने उपरोक्त छत्रपती शाहू महाराजांच्या स्मारकाचे काम सुरू करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे अनेकदा करण्यात आलेली असणे, परंतु शासनाने सदर प्रकरणी निधी वितरणाबाबत केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी कोल्हापूरवासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. समीर मेघे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांना सन २०१८ ते सन २०१९ दरम्यान प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे, उपरोक्त दोन्ही मंजूर योजनाच्या निविदा प्रक्रिया सन २०१९ मध्ये पूर्ण होऊन कामाचे रुपये २१ कोटी किंमतीचे कार्यारंभ आदेश R.G.Sanap Construction Company व अ.क्र.२ वरील कामाचे रुपये ३२ कोटी किमतीचे कार्यारंभ आदेश M.M.Holambe Construction Company या कंत्राटदारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून देण्यात येणे, कार्यारंभ आदेशानुसार सदर कामे साधारणतः २० महिन्याच्या कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित असताना कंत्राटदारांकडून अत्यंत मंद गतीने कामे होत असल्याचे निदर्शनास येणे, सदर बाब स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री महोदय, सचिव व व्यवस्थापकीय संचालक मजिप्रा यांचे निदर्शनास आणून दिल्यानंतर व ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष चर्चा करुनही तसेच संबंधितांना वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असतानाही सदर योजना अद्यापि पूर्ण होऊ न शकणे, हिंगणा तालुक्यातील दोन्ही योजनांची कामे या दोन्ही कंत्राटदारांच्या अनुत्साहामुळे व कार्यपध्दतीमुळे न झाल्याने शासनाचा अनुक्रमे रुपये १७ कोटी व रुपये २६ कोटी खर्च झाला असतांना त्या योजनांचा लाभ इसासनी, निलडोह व डिगडोह येथील गावातील नागरिकांना न मिळणे, तसेच येथील नागरिकांची पिण्याच्या पाण्याबाबतची प्राथमिक स्वरुपातील सुविधा दर्जेदार व यशस्वीपणे सुरू होण्यासाठी संबंधितांना कालबद्ध कार्यक्रम करण्याची व सदर कामे प्रलंबित ठेवण्याबाबतची चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजाच्या पत्रिकेमध्ये सकाळच्या सत्रात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ७ व ८ पुढे ढकलण्यात येत असल्याची घोषणा माननीय तालिका सभाध्यक्षांनी केली.

(५) श्री. दादाराव केचे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"आर्वी तालुक्यातील लोअर वर्धा प्रकल्पातील निंबोली (शेंडे), अहिरवाडा, ईठलापुर, सर्कसपुर, वाठोडा, भाईपुर, अंबिकापुर, वागदा, नेरी, पिपरी, अल्लीपुर, टोणा, राजापुर, बोरगांव (हातला), बाभुळगांव ही गांवे निम्न वर्धा प्रकल्प व आष्टी तालुक्यातील सावंगा (पुन.) हे गांव अप्पर वर्धा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या गावाचे पुनर्वसन झालेले असणे, त्या गावात भूमिहीन, बेघर व

अतिक्रमित नागरिकांना अजूनपर्यत नवीन पुनर्वसन मध्ये भूखंड मिळालेले नसणे, तेथे शासकीय जागा व खुल्या जागेमध्ये मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध असणे, तसेच बाभुळगांव येथे खाजगी जागा सुध्दा उपलब्ध असणे, परंतु त्यांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मिळणाऱ्या घरकूल योजनेपासून वंचित राहावे लागत असणे, त्यांची नावे तेथील मतदार यादीत व आधार कार्ड मध्ये असणे, येथील नागरिकांत पट्टे न मिळाल्यामुळे त्यांना कोणत्याही योजनेचा लाभ घेता येत नसणे, त्यामुळे तेथील नागरिकांना शासनाद्वारे शासकीय व खुल्या जागेमधील शिल्लक जागेवर भुखंड वाटप करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री विजय वडेट्टीवार, अशोक चव्हाण, सुरेश वरपुडकर, डॉ. नितीन राऊत, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री अमिन पटेल, अस्लम शेख, अमित देशमुख, धिरज देशमुख, अमित झनक, राजेश एकडे, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री सुभाष धोटे, सुनिल केदार, विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, संजय जगताप, ऋतुराज पाटील, विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मौजे बेलोरा, जेना (ता. भद्रावती, जि. चंद्रपूर) या गावाची ३३० एकर शेतजमीन सन २००० मध्ये मे. सेंट्रल कॉलरीज कंपनी मर्यादित नागपूर या कंपनीने स्थानिकांना कायमस्वरुपी नोकरीची आश्वासन देऊन कवडीमोल भावाने खरेदी करणे, या कंपनीच्या माध्यमातून पॉवर प्लांट उभारणे व त्याकरिता लागणारा कोळसा स्थानिक शेतजमीनीमधून उत्खनन करण्यात येणार असणे, स्थानिकांना रोजगार मिळणार या आशेने गावकऱ्यांनी आपल्या शेतजमीनी या कंपनीला १९,००० प्रतर एकरप्रमाणे विकल्या असणे, परंतु या शेतजमीनीवर मे.सेंट्रल कॉलरीज कंपनी मर्यादित, नागपूर यांनी कोणताही पॉवर प्लांट न उभारता सर्रासपणे अवैध कोळसा उत्खननाचे काम सुरू करून खाजगी बाजार पेठेत विकणे, या प्रकरणाची दखल शासनाने घेऊन सन २००४ मध्ये या कंपनीच्या बेलोरा, जेना येथील कोळसा उत्खननावर बंदी घालून कंपनीचे काम कायमचे बंद करणे, सदर कंपनीने ज्या शेतजमीनी स्थानिकांकडून खरेदी केल्या त्या सर्व शेतजमीनी शासनाच्या मदतीने कोर्टामार्फत अरविंदो रियालिटी अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. कंपनीने सन २०२२-२३ मध्ये खरेदी करून अरविंदो कोलमाईन्स हयाकंपनीच्या माध्यमातून कोळसा उत्खननास सुरुवात करणे, याबाबत ज्या शेतकऱ्यांची शेतजमीन या प्रकल्पासाठी घेण्यात आली होती त्या शेतधारकांच्या मागण्यांबाबत अरविंदो

कंपनीच्या व्यवस्थापनानेही आजतागायत कोणताही प्रतिसाद दिला नसणे, त्यामुळे शेतधारकांचे एकमेव उदरनिर्वाहाचे साधन असलेली शेतजमीन जाऊन २३ वर्षे झालेली असतानाही अद्यापही रोजगाराच्या प्रतिक्षेत असणे, जमीन जाणे तसेच रोजगारही न मिळणे या विवंचनेत हे जमीनधारक जीवन जगत असणे, याबाबत संबंधित शेतधारकांवर झालेल्या अन्यायाचे निवारण करण्याकरिता त्यांना शेतजमिनीचा वाढीव मोबदला देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ९ वाजून ४८ मिनिटांनी सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११ वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर दुपारी १२-०० वाजता सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करून सामुहिक छायाचित्र घेण्याचा कार्यक्रम घेण्यात येईल, अशी घोषणा माननीय अध्यक्षांनी केली.

१ (अ)(१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठ्ठावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १८८ ते २१४ सभागृहासमोर ठेवण्यात आली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ०२ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ३२ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**२.** (१) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्र्यांनी,

(क) जिल्हा खनिज प्रतिष्ठान, अहमदनगर, भंडारा, गोंदिया, धाराशिव, सिंधुदूर्ग, नाशिक व सोलापूर या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते २०२२-२०२३ व जिल्हा खनिज प्रतिष्ठान चंद्रपूर व यवतमाळ यांचे सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल,

(ख) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ग) महा मुंबई मेट्रो (एम ३) संचलन महामंडळ मर्यादित यांचे सन २०१९-२०२०, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल,

(घ) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल व

(ड.) मॉयल लिमिटेड यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा एकसष्ठावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) गृहनिर्माण मंत्र्यांनी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमधील संगणक परिचालकांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातूनच पगार मिळणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने या माहितीची नोंद घ्यावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, नोंद घेतली असल्याचे सांगितले.

श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांनी, "जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई यांनी नाताळ सणानिमित्ताने ध्वनिक्षेपणाची काढलेली चुकीची अधिसूचना." इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सदर माहितीची शासनाने शहानिशा करून योग्य ती उपाययोजना करावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी, "राज्यातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची वीज देयकांमुळे झालेली दुरवस्था," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

**४.** सचिव (१) (कार्यभार) यांनी, शुक्रवार दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत खालील घोषणा केली—

शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी अशासकीय कामकाज घेण्यात येणार आहे. उक्त दिवशी अशासकीय कामकाजातील विचारार्थ एकूण १२ अशासकीय विधेयके चर्चेकरिता घेण्यासाठी निश्चित करण्यात आले आहेत. अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ अशासकीय विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो. तथापि, सध्या अशासकीय विधेयके व ठराव समिती

नव्याने घटित करण्यात येत असल्याने मी शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी १८ मिनिटांचा वेळ पुरःस्थापनार्थ अशासकीय विधेयकांना व उर्वरित १३२ मिनिटांचा वेळ चर्चेकरीता घेण्यात येणाऱ्या खालील नमूद अशासकीय विधेयकांना देत आहे.

(१) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१९ - श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(२) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०१९ - श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे. ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(३) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(४) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(५) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - श्री. अमित साटम, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(६) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(७) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक २०२० - श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(८) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(९) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ०२ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२२ - श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(१०) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४- महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ - श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(११) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२३ - डॉ. जितेंद्र आव्हाड वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(१२) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ - डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचे ११ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

वरीलपैकी कोणत्याही विधेयकाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या विधेयकाला देण्यात येईल.

(१) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांनी, "आरक्षणाच्या मागणीसाठी आल्यानंतर मुंबईतून परतताना धनगर समाजाच्या एका सरपंचाचा अपघातात झालेला मृत्यू, अपघातातील मृताच्या तसेच जखमींच्या कुटुंबीयांना मदत देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांनी, "पुणे आणि चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात पोट-निवडणूक न घेतल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे," इ. बाबत मुद्दा माहितीचा उपस्थित केला.

(३) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते, वि.स.स. यांनी, "राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेची इमारत पाडून वाढीव एफएसआयनुसार त्या जागेचा पुनर्विकास करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला प्रस्तावित करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. अबु आजमी, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा - हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी मजकूर प्रलंबित.

(५) श्री. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, "एमटीएनएल कार्यालयाच्या बाजूच्या भूखंडावर आरक्षणानुसार म्हाडातर्फे प्राण्यांचा दवाखाना सुरू करण्यासाठी तातडीने परवानग्या देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी, "पुणे शहरात निश्चित वेळेत बांधकामे होत नसल्यामुळे त्याचा ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना होत असलेला त्रास पाहता यासंदर्भात एसओपी तयार करण्याबाबत महापालिकेला निर्देश देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. यांनी, "पुणे महानगरपालिकेमध्ये अनेक वर्षांपूर्वी समाविष्ट होऊनही अनेक गावांना अद्याप पाण्याची सोय न मिळणे, तसेच साफसफाई होणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**५.** (७) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"औसा विधानसभा मतदारसंघात अनेक उपकेंद्र अतिरिक्त भार असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेती पंपाला सुरळीत वीजपुरवठा होत नसणे, मौजे माळूंब्रा येथे ३३/११ KV उपकेंद्र कृषी धोरण २०२० अंतर्गत कृषी आकस्मिक निधीतून मंजूर करण्यात येणे, सदरील कामाच्या जागेची कार्यवाही जिल्हाधिकारी, लातूर यांनी पूर्ण केली असणे, सदरील कामासाठी निधी उपलब्ध नसल्याने कामे प्रलंबित असणे, RDSS अंतर्गत भारत सरकारच्या निधीतून औसा मतदारसंघातील हालसी हत्तरगा, आशिव, उजनी, याकतपूर, येल्लोरी या ठिकाणी ३३/११ KV उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले असणे, औसा उप केंद्रातील ५ MV रोहित्राची १० MV क्षमता वाढ करण्याबाबत प्रस्तावित केले असणे, एम.आय.डी.सी., औसा नागरसोगा, जवळगा पो., खरोसा, तपसे चिंचोली, एरंडी, औसा, या उपकेंद्राच्या ठिकाणी अतिरिक्त ५ MV चे रोहित्र प्रस्तावित करण्यात आले असणे. दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी मुख्य अभियंता, महावितरण परिमंडळ कार्यालय, लातूर यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालय, औसा येथील आढावा बैठकीत मुख्य अभियंता यांनी इतिवृत्तांतच्या अनुषंगाने अतिरिक्त विद्युत वाहिनी, उपकेंद्रातील नवीन रोहित्र तसेच नवीन उपकेंद्राचे कामांचे प्रस्ताव RDSS अंतर्गत समावेश करण्याबाबत तसेच जळालेली रोहित्र तीन दिवसात दुरुस्त करून बसवण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असणे, परंतु आढावा बैठकीच्या अनुषंगाने दिलेल्या सूचनाबाबत अधीक्षक अभियंता, लातूर कार्यालयामार्फत कार्यवाही झाली नसणे, त्यामुळे जनतेत तीव्र नाराजी निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी (ऊर्जा) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री. आशिष शेलार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"महादेव ॲपच्या माध्यमातून संपूर्ण देशभरात ऑनलाईन बेटींग करण्यासाठी अनेक बेटींग ॲपच्या निर्मिती करण्यात आलेली असणे, सदर बेटींग ॲपच्या माध्यमातून देशभरातील अनेक सामान्य गरीब माणसांची फसवणूक केली असून या ॲपमधील पैसे बांग्लादेशी नागरिकांचे बनावट भारतीय कागदपत्रे बनवून एयु स्मॉल फायनान्स बँक या बँकेत हजारो बनावट खाते उघडून यातून

आर्थिक व्यवहार केलेला असल्यामुळे तसेच शासनास देय असलेला २८ टक्के सेवा व वस्तुकर बुडविल्याप्रकरणी या ॲपवर एफआयआर ४७३ दिनांक ७ नोव्हेंबर, २०२३ गुन्हा नोंदवण्यात येणे, या एफआयआरमधील आरोपी क्र.२ अमीत शर्मा हा मुंबई बॉम्बं स्फोट हल्ल्यातील आरोपी व अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम यांचा भाऊ मुस्ताकीन याचा भागीदार असणे, या दोघांवर महादेव ॲपला पैसे पुरविण्याचा आरोप असून अमीत शर्मा यांनी मुस्तोकीन यांचे मोठ्या प्रमाणात पैसे विजय जैन यांच्यार जे.पी. इन्फ्रा, मुंबई या बांधकाम व्यावसायिक कंपनीत गुंतविलेले असणे, तसेच अमीत शर्मा आणि विजय जैन यांचा दिंडोशी, मुंबई येथे जे पी डेक हा बांधकाम प्रकल्प सुरू असून सदर प्रकल्पाला श्री. ररेश शहा व एडलवाईस (EDELWEISS) या फायनान्स कंपनीने निधी पुरविलेला असणे, त्यामुळे देशविरोधी गुन्हेगार असलेल्या दाऊदशी संबंध असलेल्या अमित शर्मा यांच्या कंपनीला पैसे पुरविणे यावर अमीत शर्मा व ररेश शहा एडलवाईस या कंपनीची त्वरीत चौकशी करून यातील दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उप मुख्यमंत्र्यांनी (गृह) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"कोयना धरणातील ३७.५० टीएमसी पाणी सांगली जिल्ह्याचे हक्काचे असून कालवा समितीच्या बैठकीत त्याचे नियोजन झालेले असणे, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी पाणी सोडण्याची गरज असणे, पण प्रत्येकवेळा धरणातून पाणी सोडण्यासाठी अधिकाऱ्यांना शासनस्तरावरुन आदेश येणे, तसेच कोयना प्रकल्पातून पाणी बंद केल्यामुळे ताकारी योजनेचे ११ पैकी केवळ तीन पंप चालू असून पंधरा दिवस आधीच ताकारीचे आवर्तन बंद झाल्यामुळे कडेगाव, तासगाव तालुक्यातील रब्बी पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होणे, त्याबाबत शासनाने चौकशी करून सांगली जिल्ह्याचे हक्काचे पाणी सोडण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्र्यांनी (जलसंपदा) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर येथील सुमारे ८९९४.६८ एकर जमीन तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या दिनांक ५ सप्टेंबर, २००८ रोजीच्या आदेशान्वये दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड या खाजगी कंपनीकडे बेकायदेशीररित्या हस्तांतरित करणे, सदर कंपनीने फक्त २९०५ एकर एवढ्या जमीन मिळकतीवर दावा करणे, परंतु दिनांक ११ डिसेंबर, २०१५ चे जिल्हाधिकारी ठाणे यांचे पत्राचे अनुषंगाने, तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी ८९९४. ६८ एकर जमीन कंपनीच्या नावे करणे, मीरा भाईंदरची जवळपास संपूर्ण जमिनी जिल्हाधिकारी ठाणे यांच्या दिनांक ५ सप्टेंबर, २००८ च्या आदेशाने वादग्रस्त झालेली असल्यामुळे यात केवळ लोकांच्या स्वमालकीच्या जमिनीच नाही तर युएलसी कायद्याच्या कलम २० नुसार सूट मिळालेल्या मोठ्या प्रमाणात सरकारी जमीन देखील जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशाने विवादित झालेली असून सन २००८ पूर्वी बांधलेल्या हजारो सोसायट्या असणे, याठिकाणी मोठ्या संख्येने सोसायट्यांना पुनर्विकासाची आवश्यकता, शासन किंवा त्यांचे अधिकारी सोसायट्यांना मदत करत नसल्यामुळे, फ्लॅट खरेदीदारांना कंपनीची बेकायदेशीर मागणी पूर्ण करण्यासाठी पैसे भरण्यास भाग पाडले जाणे, अन्यथा सक्षम प्राधिकाऱ्याकडून डीम्ड कन्व्हेयन्सचे अर्ज नाकारले जात असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास येणे, त्यामुळे तेथील जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याप्रकरणी चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी, "महान ज्येष्ठ पार्श्वगायक मोहम्मद रफी यांचे जन्मशताब्दी वर्ष २४ डिसेंबर, २०२३ पासून सुरू होत असून ते साजरे करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त सूचनेबाबत शासनातर्फे कार्यक्रम घेण्यात येईल, असे उप मुख्यमंत्र्यांनी (देवेंद्र फडणवीस) सांगितले.

(९) श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी, "पेण तालुक्यातील खारेपाटणमध्ये शेतकऱ्यांचे सुरू असलेले उपोषण आंदोलन," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स. यांनी, "महानंद दूध डेअरीच्या कामगारांच्या प्रश्नांबाबत सौ. प्रिया पिटके यांचे मागील तीन दिवसांपासून सुरू असलेले उपोषण," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सरकारने दखल घ्यावी, असे निदेश उपाध्यक्षांनी दिले.

६.  ॲड. आशिष शेलार, श्री. भरतशेट गोगावले, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, ॲड. माणिकराव कोकाटे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री संजय शिरसाट, किशोर पाटील, अतुल बेनके, नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, सर्वश्री सुनिल शेळके, रणधीर सावरकर, प्रकाश आबिटकर, चेतन तुपे, बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री प्रकाश सोळंके, संतोष दानवे, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री बाळासाहेब आजबे, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, यशवंत माने, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री रमेश बोरनारे, दिपक चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, दौलत दरोडा, संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिभाऊ बागडे, चंद्रकांत पाटील, बाबासाहेब पाटील, बच्चू कडू, जयकुमार गोरे, दिलीप लांडे, भिमराव तापकीर, योगेश कदम, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री. राजेश पवार, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिध्दार्थ शिरोळे, राम कदम, मंगेश चव्हाण, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड. लक्ष्मण पवार, सौ. सीमा हिरे, सर्वश्री राम सातपुते, जयकुमार रावल, डॉ. संजय कुटे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, देवयानी फरांदे, सर्वश्री समाधान अवताडे, कालीदास कोळंबकर, ॲड. राहूल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स.यांचा पुढील प्रस्ताव.

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला)

(चर्चा पुढे सुरू)

“मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे व कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.” इ. बाबत. प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) डॉ. जितेंद्र आव्हाड
(२) श्री. हरिभाऊ बागडे
(३) श्री. कैलास घाडगे-पाटील
(४) श्री. सुरेश वरपूडकर
(५) श्री. अबु आजमी
(६) श्री. संजय गायकवाड

(चर्चा अपूर्ण)

मुख्यमंत्र्यांनी, “राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या,” इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

ॲड. आशिष शेलार, श्री. भरतशेट गोगावले, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, ॲड. माणिकराव कोकाटे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री संजय शिरसाट, किशोर पाटील, अतुल बेनके, नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, सर्वश्री सुनिल शेळके, रणधीर सावरकर, प्रकाश

आबिटकर, चेतन तुपे, बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री प्रकाश सोळंके, संतोष दानवे, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री बाळासाहेब आजबे, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, यशवंत माने, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री रमेश बोरनारे, दिपक चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, दौलत दरोडा, संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिभाऊ बागडे, चंद्रकांत पाटील, बाबासाहेब पाटील, बच्चू कडू, जयकुमार गोरे, दिलीप लांडे, भिमराव तापकीर, योगेश कदम, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री. राजेश पवार, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिध्दार्थ शिरोळे, राम कदम, मंगेश चव्हाण, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड. लक्ष्मण पवार, सौ. सीमा हिरे, सर्वश्री राम सातपुते, जयकुमार रावल, डॉ. संजय कुटे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, देवयानी फरांदे, सर्वश्री समाधान अवताडे, कालीदास कोळंबकर, ॲड. राहूल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स.यांचा पुढील प्रस्ताव. (चर्चा पुढे सुरू)

"मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे व कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका." इ. बाबत प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(७) श्री. दिलीप बनकर

(८) श्री. नारायण कुचे

(९) डॉ. विश्वजित कदम

(१०) श्री. जयंत पाटील

(चर्चा अपूर्ण)

(११) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते, यांनी, "राज्यातील २७ हजार ग्रामपंचायत संगणक परिचालकांचे सुरू असलेले आंदोलन," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सरकराने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, याबाबत दखल घेतली असल्याचे सांगितले.

(१२) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते, यांनी, "मानधनात वाढ करण्यासाठी राज्यातील पोलीस पाटलांचा निघालेला मोर्चा," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सरकराने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, या बाबत दखल घेतली असल्याचे सांगितले.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(११) श्री. अनिल बाबर
(१२) श्री. रत्नाकर गुट्टे
(१३) डॉ. राहुल आहेर
(१४) श्री. बाळासाहेब थोरात
(१५) डॉ. किरण लहामटे
(१६) श्री. सुनील प्रभू
(१७) श्री. बबनराव लोणीकर
(१८) श्री. संजय जगताप
(१९) श्री. अनिल देशमुख
(२०) श्री. दिलीप लांडे
(२१) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते
(२२) श्री. राणा जगजित सिंह पाटील
(२३) श्रीमती सरोज अहिरे
(२४) श्री. रमेश बोरनारे
(२५) श्री. अभिमन्यू पवार
(२६) श्री. मोहनराव हंबर्डे
(२७) श्री. अशोक पवार
(२८) श्री. बालाजी कल्याणकर
(२९) श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर
(३०) श्री. पी.एन. पाटील
(३१) श्री. दीपक चव्हाण
(३२) श्री. योगेश कदम
(३३) श्री. संतोष दानवे
(३४) श्री. राजू आवळे
(३५) श्री. रोहित पवार
(३६) श्री. राजेंद्र राऊत
(३७) श्री. जयकुमार गोरे
(३८) श्री. बाबासाहेब पाटील
(३९) श्रीमती श्वेता महाले
(४०) श्री. शेखर निकम
(४१) श्रीमती मोनिका राजळे
(४२) श्रीमती अश्विनी लक्ष्मण जगताप
(४३) श्रीमती मनिषा चौधरी
(४४) श्री. यशवंत माने
(४५) श्री. राजेश पवार
(४६) श्री. प्राजक्त तनपुरे
(४७) श्री. राम सातपुते (चर्चा अपूर्ण)

सभागृहाचे बैठक रात्री ११ वाजून ३८ मिनिटांनी ५ मिनिटांकरिता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक रात्री ११ वाजून ४३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(४८) श्री. सुनिल भुसारा

(४९) श्री. सिद्धार्थ शिरोळे

(५०) श्री. समाधान आवताडे

(५१) ॲड. राहुल ढिकले

(५२) श्री. महेश लांडगे

(५३) श्री. भिमराव तापकीर

(५४) ॲड. राहुल कूल

(५५) श्री. तानाजी मुटकुळे

(५६) श्री. सुरेश भोळे

तालिका सभाध्यक्ष (श्री. चेतन तुपे) यांनी, म.वि.स. नियम २९३ अन्वये मराठा आरक्षणावरील चर्चा संपल्याचे घोषित केले.

## शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३

(१) श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिडकोच्या वाळुंज प्रकल्पातील भुसंपादनातील दिरंगाई व विकास कामे यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कोणतेही कार्य सिडको, जिल्हाधिकारी यांच्याकडून न होणे, सेवा-सुविधा, रस्ते यांच्याकरीता आवश्यक असलेल्या जमिनींचे संपादन आणि त्याचा विकास सिडकोद्वारे होऊनच प्रकल्प अन्य प्राधिकरणांस हस्तांतरित करण्याचे ठरणे, उलटपक्षी सेवा सुविधांचा विकास पूर्ण न करता प्रकल्प हस्तांतरण करण्याबाबत सिडकोने दिनांक १४ संप्टेंबर, २०२३ रोजी जन/शासना विरोधी ठराव घेणे, सिडकोच्या या कृतीच्या विरोधात मंत्री, लोकप्रतिनिधी, जनता यांनी दिलेले निवेदने विचारात न घेता प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडून प्रकल्प हस्तांतरणांबाबतची कार्यवाही सत्वर होणे, अशी सत्वरता मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशांसाठी न होणे, प्रकल्पाच्या विकास कामांसाठी तुटपुंजा निधी दर्शवून प्रकल्प हस्तांतरण करणे, रस्ते अर्धवटरित्या सोडून देणे, हक्कभंग मांडण्यासाठी मागितलेली माहिती उपलब्ध करून न देणे, मुख्यमंत्री, शासन, लोकप्रतिनिधी यांना डावलून अधिकारी वर्गाकडून मनमानी पद्धतीने कार्यवाही करण्यात येणे, सभागृहात दिलेले आश्वासन आणि शासनाचा निर्णय यावर हेतुपुरःस्सरपणे कार्यवाही न होण्यामुळे सामान्य जनतेमध्ये शासन व सिडकोबद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊन शासन, सिडकोची प्रतिमा मलिन होणे, त्यामुळे सभागृहास दिलेल्या आश्वासनानुसार प्रकल्पाचे ठरल्याप्रमाणे विकास कामे पूर्ण करण्यासाठी सिडकोला निर्देश देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरीता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"मुंबईतील आरे कॉलनी युनिट २० येथील ५० वर्ष पुरातन राम मंदिर सांस्कृतिक केंद्राच्या जागेवर कब्रस्थान बनविण्याचा प्रयत्न काही सामाजिक व्यक्तींकडून होत असल्याचे निदर्शनास येणे, सदर सांस्कृतिक केंद्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणीकृत असल्याबची बाब निदर्शनास येणे, दिनांक ११ नोव्हेंबर, २०१३ रोजी सदरहू ट्रस्टला सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम राबविण्यासाठी 'कल्याण केंद्र' म्हणून मान्यता मिळालेली असणे, माहे ऑगस्ट, २०१४

मध्ये स्व.श्री. गुरुदास कामत यांनी त्यांच्या संसद सदस्यत्वाच्या कालावधीत स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत विकास करण्याबाबत तत्कालीन उपायुक्तांना शिफारस केली असल्याचे निदर्शनास येणे, तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी अंजुमन तालीम-उल-कुरान सुन्नी ताहा मस्जिद नावाच्या मुस्लिम ट्रस्टला जमिनीचा तातपुरता ताबा देण्याचे निर्देश दिले असल्याचे निदर्शनास येणे, मात्र जागेचा तपशील निश्चित नसल्याचे निदर्शनास येणे, सदरहू जागा मुस्लिम स्मशानभुमीसाठी काही सामाजिक व्यक्तींनी बळजबरीने घेण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास येणे, यांसंदर्भांत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी पत्रव्यवहार करुनही तसेच स्थानिक नागरिकांनी ही बाब महानगरपालिकेच्या निदर्शनास आणल्यानंतरही याबाबीकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत स्थानिक नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणे, अशाप्रकारे पुरातन राम मंदिराच्या व सांस्कृतिक केंद्राच्या जागेवर स्थानिक मुस्लिमांकडून व समाजकंटकांकडून कब्रस्तान निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याने हिंदू व मुस्लिमांमध्ये नाहक जातीय तेढ निर्माण होऊन प्रशासन याबाबीस पाठीशी घालत असल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले–

"३३-११ या योजनेच्या अंतर्गत मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर पीटीसीची निर्मिती होत असणे, परंतु या पीटीसी विद्यमान धोरणानुसार फक्त भाडेतत्त्वावर देण्याची योजना असल्यामुळे या सदनिका प्रकल्पग्रस्तांना देता येत नसणे, त्यामध्ये, आजमितीला मुंबई शहरात विकास प्रकल्प बाधित लोकांची संख्या एक लाखापेक्षा जास्त असणे, तसेच, तयार पीटीसी या भाडेतत्त्वावर मिळत असल्यामुळे प्रकल्पग्रस्त त्याठिकाणी जाण्यास तयार होत नसणे, त्यामुळे, पीटीसी या प्रकल्पग्रस्त सदनिकांमध्ये परावर्तित केल्याने प्रकल्पग्रस्तांना घर मिळून मुंबई शहरामधील अनेक स्थगित प्रकल्प मार्गी लागणे, त्यामुळे, पीटीसीचे प्रकल्पग्रस्त सदनिकांच्या मध्ये परिवर्तन करण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. सुनिल शेळके,वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यामध्ये जलजीवन मिशन योजनेंतर्गत एकूण ११४ पाणी योजना मंजूर झालेल्या असणे, त्यापैकी कोंडीवडे आमा, वडेश्वर, माऊ, सावळा, कोंडीवडे नामा, वडेश्वर, घोणशेत, केवरे, चावसर, गहुंजे, वळख, शिरदे, कुसवली, नागाथली, थुगाव, कुसगाव पमा, कुरवंडे, करंजगाव, साई-नाणोली, बऊर, ठाकूरसाई, धामणे, चिखलसे, डाहुली, वरसोली, सूदवडी, धनगव्हाण, राजपुरी, खांड, उकसान, कुणे-अनसुटे, खांडशी, नवलाख उंबरे, जाधववाडी, मिंडेवाडी, बधलवाडी, येलघोळ या ३७ गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मंजूर कामांना सन २०२१ मध्ये कार्यारंभ आदेश दिलेला असणे, यातील बहुतांश कामांची मुदत संपुष्टात आलेली असून सदर कामे अद्यापही अर्धवट अवस्थेत असणे, मुदत संपल्यानंतर नाममात्र रक्कम आकारणे व दंडात्मक कारवाई केलेली दाखवून सदर ठेकेदारांना कामांची मुदत वाढवून देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, ठेकेदार निकृष्ट दर्जाचे काम करीत असून योजनेतील साहित्य देखील अत्यंत निकृष्ट दर्जाचे वापरल्याने सदर कामांची गुणवत्ता कमी होणे, यामुळे शासन निधीचा मोठा अपव्यय होत असून संबंधित कंत्राटदरांची शासनस्तरावर चौकशी करून सदर कामांचे तृतीय पक्ष लेखापरीक्षण व्हावे अशी स्थानिकांकडून वारंवार मागणी होत असणे, परंतु सदर गंभीर विषयाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाविषयी पसरलेली तीव्र नाराजी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेते यांनी आजच्या कामकाजपत्रिकेतील विशेष बैठकीच्या कामकाजामध्ये क्रमांक - ५ वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना सोमवारी नियमित बैठकीमध्ये घेण्यात यावी अशी विनंती केली.

(५) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे बांधकाम केलेल्या इमारतीमधील घर हस्तांतरण करणेबाबतची असलेली दहा वर्षाची अट शिथिल करून पाच वर्षे इतकी करण्याबाबत राज्य शासनाने अनेक वेळा आश्वासन देऊनही अद्याप झो.पु. पुनर्विकास प्रकल्पातील घरे हस्तांतरणाची अट शासनातर्फे शिथिल करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई शहर व उपनगरात झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील १० वर्षांच्या आतील सुमारे ६६ हजाराहून अधिक रहिवाशी कुटुंबांनी घरे विकत घेतली असून अद्याप त्यांच्या नावे हस्तांतरित झाली नसल्याने त्यांना संरक्षण प्राप्त होत नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, सदरहू

प्रकरणी राज्य शासनाने झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील घरे हस्तांतरणासाठी असलेली १० वर्षाची अट शिथिल करून ५ वर्षे करण्याबाबत राज्य शासनाने शासन निर्णय जारी करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी एसआरए योजनेतील रहिवाशी कुटुंबांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. संतोष बांगर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले–

"माहे नोव्हेंबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेतील रस्त्याच्या कामातील पेव्हर ब्लॉक बसवण्यास सन २०१९ पासून दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ पर्यंत मान्यता नसताना त्या काळात झालेल्या सर्व कामांना विशेष बाब म्हणून पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देण्याचा अनियमितपणा झाल्याने राज्यात कोट्यवधी रुपयांचा निधी वाटप करण्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी मंजुरी दिल्याची बाब उघडकीस येणे, शा.नि.क्र. ता.मु. यो.२०१७/प्र.क्र.४४/योजना १, दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ नुसार पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचा समावेश त्यामध्ये करण्यात येणे, सन २०१९ ते दिनांक २४ एप्रिल, २०२३ पर्यंत मंत्रालयीन-क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी संगनमत करून कोट्यवधी रुपयांचा निधी बेकायदेशीररित्या मंजूर करून खर्च करण्यात येणे, दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाला नियोजन व वित्त विभाग व मंत्रिमंडळाची मान्यता नसणे, वित्तीय अधिकार नियमावलीची अंमलबजावणी न करणे, तसेच हिंगोली जिल्ह्यातील तांडावस्ती सुधार योजनेतील पूर्ण झालेल्या कामाची देयके समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून मंत्रालयात प्रस्ताव सादर करून ८ ते १० महिन्यांचा कालावधी होणे, सचिवांकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवण्यास टाळाटाळ करणे, त्याला मंजुरी मिळूनही निधी वितरित न होणे, यामुळे सदरहू कामे केलेल्या ठेकेदारांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहणे, मात्र दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ पर्यंतच्या बेकायदेशीर कामांच्या निधीचे वाटप तातडीने करण्यात आल्याबाबत जनसामान्यांमध्ये निर्माण झालेली तीव्र चीड व संतापाची भावना, यावर शासनाने केलेली कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेत विशेष बैठकीतील अनुक्रमांक ६ वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५२ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, "आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये मराठा आरक्षणाच्या प्रस्तावाचा उल्लेख नसणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला तो योग्य असून त्यात आता सुधारणा केली जाईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या विषयासंदर्भात शुद्धीपत्रक काढण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**१.** (१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठरा प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) मृद व जलसंधारण मंत्र्यांनी, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) उप मुख्यमंत्र्यांनी, लोकलेखा समितीच्या सन २००१-२००२ च्या आठव्या अहवालातील परिच्छेद १.२८ नुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी केलेल्या सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षातील पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(३) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी खालील अहवाल सभागृहासमोर ठेवले -

(क) डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ख) सोमय्या विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल व तसेच,

(ग) डी.वाय.पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे कोल्हापूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल.

( ३ ) कामगार मंत्र्यांनी पुढील अहवाल विलंबाच्या कारणांसह सभागृहासमोर ठेवले—

(क) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, रायगड यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल.

(ख) अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, अमरावती यांचा सन २०१९- २०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचा सातवा, आठवा वार्षिक अहवाल.

(ग) सोलापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सोलापूर यांचा सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल.

(घ) सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल.

(ड.) अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०२१- २०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल.

(च) पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ यांचे सन २०१७- २०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अडतीसावा, एकोणचाळीसावा, चाळीसावा व एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल.

(छ) पिंपरी-चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०२०- २०२१ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल.

(ज) अकोला-वाशिम-बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल.

(झ) सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा तेहतीसावा वार्षिक अहवाल.

(त्र) यवतमाळ जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पाचवा वार्षिक अहवाल.

(ट) दि क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल.

(ठ) दि खोका मेकींग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २०२१- २०२२ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल.

(ड) परभणी-हिंगोली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, परभणी यांचे सन २०१७-२०१८ ते २०१८-२०१९ या वर्षांचा चौदावा, पंधरावा वार्षिक अहवाल.

(ढ) किराणा बाजार आणि दुकाने माथाडी मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल.

(ण) औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२१- २०२२ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल.

**३.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनास दालनात अनुमती नाकारली आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. नितेश राणे, वि.स.स. यांनी, "सन १९९३ मध्ये मुंबई शहरात झालेल्या बॉम्ब स्फोटातील मुख्य आरोपी हा उबाठा सेनेचे नाशिक महानगर प्रमुख यांच्याबरोबर पार्टी करत असताना आढळणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. दादाजी भुसे व ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

या प्रकरणाची SIT च्या माध्यमातून time bound पद्धतीने चौकशी करण्यात येईल व दोषींवर कारवाई करण्यात येईल असे उपमुख्यमंत्री (श्री. देवेंद्र फडणवीस) यांनी सांगितले.

(३) श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी, "सत्यशोधक शेतकरी सभा आणि सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा यांच्या वतीने नंदुरबार ते मुंबई असा बिऱ्हाड मोर्चा दिनांक ७ डिसेंबरपासून निघालेला असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. कुणाल पाटील यांनी दिलेल्या माहितीची शासनाने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सदर प्रकरणी शासनाने मार्ग काढण्याचा प्रयत्न केला असून निश्चितपणे शासन पुन्हा त्यांच्याशी चर्चा करेल असे उपमुख्यमंत्री (श्री. देवेंद्र फडणवीस) यांनी सांगितले.

(४) श्री. रईस शेख, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा.

(प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित.)

(५) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी, "गेल्या एक वर्षापासून महानंद डेअरीचे कर्मचारी/ कामगार त्यांच्या विविध मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करीत असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(६) श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांनी, "नगर जिल्ह्यातून सुरत-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गासाठी भू-संपादनाचे काम सुरू असून भू-संपादनाचा मोबदला देताना २ हा गुणांक ग्राह्य धरुन त्याप्रमाणे जमीनधारकांना मोबदला देण्यात यावा." इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी, "मुंबईतील सर्व सीएनजीपी म्हाडा इमारतींच्या दुरुस्तीसाठी लवकरात लवकर ३०० कोटी रुपये निधी मंजूर करून तो म्हाडाकडे वर्ग करण्याची आवश्यकता." इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

४. (१) श्री. बळवंत वानखडे, वि.स.स. यांनी, "संपूर्ण महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविका, मदतनीस या गेल्या ४ डिसेंबरपासून संपावर असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी, "जत तालुक्यात जनावरांवर लाल कुडतरीचा रोग आलेला असून त्याचे लसीकरण शासनाच्या दवाखान्यात गेल्या ८-१० दिवसांपासून उपलब्ध नसणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, "कर्जत तालुक्यातील सुमारे ५४ गावे हे कुकडी धरण प्रकल्पावर अवलंबून असून सदर प्रकल्पातून पाणी सोडण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांनी, "मलकापूर येथील अवसायनात काढल्या गेलेल्या सूतगिरणीच्या मालमत्तेचे व मशिनरीचे रक्षण करणाऱ्या सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांचा पगार तातडीने होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स. यांनी, "सालेकसा तालुक्यातील गोरले येथे एका प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत ३ वर्षांपासून तसेच देवरी तालुक्यातील पालांदूर येथे १ वर्षापासून प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधून तयार असून आतापर्यंत या दोन्ही ठिकाणी डॉक्टर्स, नर्सेस किंवा इतर संबंधित कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आलेला नसणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) ॲड. आशिष जैस्वाल, वि.स.स. यांनी, "संगणक चालक, परिचारिका, पोलीस पाटील आणि शालेय पोषण आहार योजनेतील स्वयंपाक करणाऱ्या महिला किंवा इतर अनेक कर्मचारी

जे मानधनावर काम करतात त्यांच्या मानधनामध्ये महागाई निर्देशांक दरानुसार वाढ करण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी, "शासकीय अभियांत्रिकी विद्यालय, पॉलिटेक्निक, कृषी महाविद्यालय या संस्थांची मैदाने सर्वसामान्यांसाठी बंद करण्यात आली असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी, "अकोले तालुक्यात निळवंडे उजवा आणि डावा कालवा या दोन्ही कालव्यांना जेथे अस्तरीकरण करण्याची मागणी केली जात आहे तेथे अस्तरीकरण मंजूर करण्याची तसेच तेथील शेतकऱ्यांच्या पिकांचे जे नुकसान झाले त्या नुकसानीबद्दल भरपाई मिळण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. अतुल बेनके, वि.स.स. यांनी, "जुन्नर तालुक्यातील नारायणगाव भागामध्ये दहशतवादी पथकाने म्हणजे ATS ने दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या ८ बांग्लादेशी लोकांना पकडले असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे, वि.स.स. यांनी, "हिंगोली जिल्ह्यात जुलै, सप्टेंबर आणि नोव्हेंबर महिन्यांमध्ये सातत्याने झालेल्या अतिवृष्टीमुळे सर्वच पिकांचे अतोनात नुकसान होणे त्यामुळे शेतकऱ्यांना २५ टक्के पीक विमा अग्रीम रक्कम मिळावी आणि नुकसान भरपाई मिळण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, "मागील १६ वर्षापासून रखडलेली एक माऊली बंदर पखाडी नावाची एक एस.आर.ए. योजना व कुलस्वामिनी शेजार समितीने तक्रारी करून तेथील ३ हजार लोकांच्या घराचा प्रश्न प्रलंबित ठेवला असून येथील विकासकामार्फत कोणतीही कार्यवाही न होता तेथील लोकांचे त्याने मागील ४ वर्षांपासून भाडे देणे बंद केले असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. यांनी, "महावितरणने नव्याने जाहिरात प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुषंगाने सन २०१९ च्या जाहिरातीनुसार प्रतीक्षायादीतील पात्र उमेदवारांचा रिक्त असलेल्या १६ पदांच्या भरतीसाठी प्राधान्याने विचार करावा. तसेच अंगणवाडी सेविका, संगणक चालक हे देखील लाखोंच्या संख्येने मैदानावर उपोषणास बसलेले असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, "वर्सोवा मतदारसंघातील ओशिवरा मॅटर्निटी होम (Oshiwara Maternity Home) लोटस इमारतीमध्ये स्थलांतरित करण्याची आवश्यकता" इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, “दहिसर मधील शैलेंद्रनगर येथील अकबर मार्केटजवळ म्हाडाच्या इमारती व डी.पी.रोड भागामध्ये भंगार गोळा करणाऱ्या माणसांनी अतिक्रमण केले असणे” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांनी, “म्हाडाच्या मालकीच्या सदनिका व शिबिर हे बेकायदेशीररीत्या विकले जात असणे तसेच पुनर्विकासासाठी सदनिका खाली करण्यासाठी अधिकाऱ्यांकडून म्हाडा इमारतीमधील भाडेकरुची harassment केली जात असणे.” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्री.राजू कारेमोरे, वि.स.स. यांनी, “पूर्व विदर्भामध्ये शेतकरी धान उत्पादन शासनामार्फत Sub-agent संस्थेकडे विकत असून सदर संस्थेकडून शेतकऱ्यांची लूट केली जात असणे.” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी, “राज्यातील सर्व अंगणवाडी सेविका काही दिवसांपासून बेमुदत संपावर असून त्यांच्या अनेक मागण्या प्रलंबित असणे.” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स. यांनी, “हिंगोली विधानसभा मतदारसंघातील माळुरा व भांडेगाव या दोन महसूल मंडळाचा समावेश दुष्काळ व अतिवृष्टीच्या यादीमध्ये करण्यात आलेला नसणे” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी, “कांदिवली भागामध्ये स्वरक्षणासाठी महिला रास्ता रोको करून आंदोलन करीत असणे तसेच काजुपाडा पाईपलाईन, उमा महेश्वर मंदिर व खैरण रोड या भागातील मुख्य रस्त्यांवर अनधिकृत पार्किंग केल्यामुळे त्या रस्त्यांवरुन शाळेमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना व नोकरीनिमित्त बाहेर जाणाऱ्या लोकांना मोठ्या प्रमाणावर त्रास होत असणे” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२०) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स. यांनी, “तासगाव तालुक्यातील द्राक्ष बागांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्यामुळे तेथील सर्व शेतकऱ्यांना शासनाने लवकरात लवकर मदत देण्याची आवश्यकता” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांनी, “मालाड भागामध्ये शिया कम्युनिटीसाठी स्मशानभूमी मंजूर करण्यात असून शासनाने याबाबीची ताबडतोब दखल घ्यावी.” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

मालाड येथील दफनभूमीचा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे शासनाने पुढील ३० दिवसांमध्ये आवश्यक उपाययोजना करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

( २२ ) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, "ख्रिश्चन समाजाला दिनांक २४ डिसेंबर, २०२३ रोजीच्या रात्री १०.०० नंतर साऊंड वाजविण्याची परवानगी हवी असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबतची सवस्तिर माहिती घेऊन शासनाने योग्य ती कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

( २३ ) श्री. भीमराव तापकीर, वि.स.स. यांनी, "पुणे शहर पोलिसांनी कोथरुडमध्ये केलेल्या कारवाईमुळे दहशतवादी कारवाईची गुप्त माहिती यंत्रणेच्या हाती लागली असून या कारवाईमध्ये सहभागी असलेल्या सर्व पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात यावा." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २४ ) श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स. यांनी, "केंद्र शासनाच्या परिपत्रकानुसार व माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने महसूल व वन विभागाने मार्च, २०२३ मध्ये राज्याच्या भूसंपादन नियम, २०१४ मधील नियम क्रमांक १९ मध्ये दुरुस्तीसाठी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध केली असून सदर अधिसूचना अंतिम करण्यासाठी शासनाकडून प्रचंड दिरंगाई होत असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २५ ) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, "ठाणे येथे ऑलिम्पिक दर्जाचा तरण तलावाचे उद्‌घाटन होऊनही अद्याप सदर तरण तलाव सुरू नसणे तसेच कलाभवन गेल्या ३ वर्षांपासून बंद असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २६ ) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी, "बेलापूर किल्ल्याचे संवर्धन करण्याचे काम गेले एक वर्ष बंद असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २६ ) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी, "दि. २२ जानेवारी, २०२४ रोजी अयोध्येमध्ये श्रीराम मंदिराचा उद्‌घाटन समारंभ होणार असल्यामुळे माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार एखादी शासकीय सुट्टी रद्द करून त्यादिवशी शासकीय सुट्टी जाहीर करावी." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

सभागृहाच्या भावना विचारात घेता शासनाने दि. २२ जानेवारी, २०२४ संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी केलेल्या विनंतीचा विचार करावा असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२७) श्री. पी. एन. पाटील, वि.स.स. यांनी, “कोल्हापूरजवळ कोल्हापूर ते रत्नागिरी फोर वे रस्ता जात असताना प्राधिकरणाच्या एरियामध्ये शेतकऱ्यांना जमीन घेतल्यामुळे मिळणारे अनुदानाचे पैसे ५० टक्क्यांनी कमी असणे.” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२८) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी, “चंद्रपूर जिल्ह्यात नव्याने दारु दुकानांना परवाना देत असताना शासनाने जे नियम, बंधने घातलेली आहेत त्यांचे पालन होण्याची आवश्यकता.” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२९) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, “शासनाने आदिवासी, नक्षलग्रस्त व जंगलव्याप्त प्रदेश म्हणून गडचिरोली जिल्ह्यासाठी दिलेल्या आदेशाप्रमाणेच गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देखील १२ तास वीज पुरवठा करण्यात यावा.” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

उर्वरित माहितीचे मुद्दे लक्षवेधी सूचनांवरील चर्चेनंतर घेण्यात येतील. आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक ८ चर्चेकरिता घेऊ या असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**५.** (८) श्री. समाधान आवताडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मृद व जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधले—

“पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील मौजे तामदर्डी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथे को. प. बंधारा प्रस्तावित असणे, सदर बंधाऱ्यामुळे तालुका मंगळवेढा मधील तामदर्डी, तांडोर, सिद्धापूर माचनूर व ब्रह्मपुरी तर तालुका मोहोळ मधील आरबळी, मिरी, बेगमपूर, घोडेश्वर, इनकी व दक्षिण सोलापूर मधील वडापूर या गावांना याचा मोठा लाभ होणे, सदर बंधाऱ्याचा पाणीसाठा ५०० द.ल.घ.मी इतका असून ह्यामुळे जवळपास ५२५ हे. इतके क्षेत्र ओलिताखाली येणे, सदर बंधारा व्हावा याकरिता अनेक दिवसांपासून ग्रामस्थांची व लोकप्रतिनिधींची मागणी असणे, सदरच्या प्रस्तावाची तांत्रिक व प्रशासकीय बाबी पूर्ण होऊन देखील आवश्यक असलेला निधी अद्याप उपलब्ध न होणे, सदरची गावे आणि विशेषतः मंगळवेढा तालुका हा अवर्षण प्रवण क्षेत्रात येणे, यामुळे येथील शेतकरी व नागरिकांना नेहमी पिण्याच्या पाण्याच्या व शेतीकरिता आवश्यक पाण्यापासून वंचित रहात असणे, सदरचा बंधारा अद्याप न झाल्यामुळे येथील शेतकरी व नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी प्रचंड असंतोष निर्माण होणे, सदर बंधारा त्वरित बांधण्यासाठी निधीची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

मृद व जलसंधारण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

“नागपूर नगराला वसविणारे, गोंड समाजाचे आराध्य, गोंड राजे बख्त बुलंद शाह यांनी एन.आय. टी (नासुप्र) यांच्या विशेष विनंतीवरून एकूण २२ एकर जागा एन.आय. टी (नासुप्र) ला देणे, जागा देताना त्यातील ३.३६ एकर जागा राजघाट करिता संरक्षित करून त्या ठिकाणी ऐतिहासिक वास्तू निर्माण करावी ही अट ठेवून जागा देणे, भावी पिढीला नागपूर शहराचा इतिहास माहीत व्हावा, नागपूर शहराला वसविणारे गोंड राजे बंख्त बुलंद शाह यांना उचित सन्मान मिळावा याकरिता सदर जागा संरक्षित करावी अशी अट असणे, मात्र एकीकडे नागपूर शहराच्या विकासाकरिता कोट्यवधी रुपयांचा निधी दिला जात असताना नागपूर नगरीचे निर्माते गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या सन्मानार्थ राजघाट परिसराचे सौंदर्यीकरण करून गोंडीयन सांस्कृतिक समाज भवन करण्याकडे सरकारचे पूर्णतः दुर्लक्ष होणे, परिणामी गोंड राजे बख्त बुलंद शाह राजघाट सक्करदरा या परिसराची दुरावस्था झाली असून तेथे अतिक्रमण होणे, नागपूरच्या इतिहासासोबत व आदिवासी समाजासोबत फार मोठा अन्याय असणे, त्यामुळे गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या सन्मानार्थ राजघाट परिसराचे सौंदर्यीकरण करून गोंडीयन सांस्कृतिक समाज भवन निर्माण करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्री (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले —

“महानगरपालिका क्षेत्रालगतच्या परिक्षेत्राचा विकास करण्यासाठी महानगर प्रदेश विकास प्राधिकरण होणे, सन २०१५ साली स्थापन झालेले पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण चांगल्या प्रकारे कार्यरत असणे, त्यामुळे पुणे जिल्ह्याची प्रगती झालेली असणे, सन २०१७ साली स्थापन करण्यात आलेले नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण योग्य पद्धतीने कार्यरत नसणे, नाशिक महानगरपालिका क्षेत्रालगत गावांचा समावेश fringe area अंतर्गत समावेश असल्याने या जागेचा सुनियोजित पद्धतीने विकास होणे आवश्यक असणे, परंतु विकास आराखडा तयार केला नसल्यामुळे विकास नियोजनबद्ध होत नसणे, नाशिक विकास प्राधिकरण येथे वरिष्ठ प्रशासकीय सेवेतील अधिकारी देणे गरजेचे असताना सक्षम अधिकारी दिला नसणे तांत्रिक कामकाज करण्यासाठी अभियांत्रिकी कर्मचारी नसणे, सन २०२६-२७ मध्ये नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार असणे, यात बाहेरून येणाऱ्या वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेत

सन २०१७ साली विकास आराखडा तयार केला असणे, या प्रस्तावित बाह्य वळण रस्त्याची मागणी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे करणे, मा. मुख्यमंत्री यांनी एमएसआरडीसी ला प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देणे, एमएसआरडीसीने काम न करणे, ग्रामीण हद्दीतील रस्त्याचे क्षेत्र आरक्षित करण्यासाठी कलम २०(३) व २०(४) अंतर्गत कार्यवाही करण्याची आवश्यकता, प्रशासनाचे याबाबीकडे होत असलेले दुर्लक्ष, याचा विपरीत परिणाम नाशिकच्या विकासावर व सिंहस्थ कुंभ मेळ्याच्या नियोजनावर होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले —

"राज्यातील गडचिरोली जिल्ह्यात किमान आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरीप व रब्बी हंगामातील धान भरडाई करून होणाऱ्या सीएमआर कच्चा तांदूळ तयार करण्याचे काम स्थानिक मायाश्री राईस, मायाश्री ॲग्रो व मायाश्री फूड इंडस्ट्रीज वडसा यांना देण्यात आले असणे; सदरहू मिलर्सकडे धान भरडाईसाठी लागणारी यंत्र-सामग्री नसतांना बनावट कागदपत्र व बनावट प्रतिज्ञालेख जोडून आदिवासी विकास महामंडळ तथा जिल्हाधिकारी/ अध्यक्ष भात भरडाई समन्वय समिती गडचिरोली यांचेकडे सादर करून धान भरडाई चे काम चुकीच्या पद्धतीने मिळवुन शासनाची दिशाभूल करणे, याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रार केली असता मिलर्सकडून फसवणूक झाल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न झाले असणे; केंद्र शासनाच्या निर्देशानुसार व मिलर्स सोबत केलेल्या अटी शर्तीनुसार विनिर्देशात बसणारा (FAQ) दर्जाच्या सीएमआर तांदूळ बदलून जमा करून घेण्याचे निर्देश देऊनही संबधित अधिकाऱ्याचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असून केंद्र शासनाच्या सूचनेनुसार व विनिर्देशात बसणारा (FAQ) सीएमआर तांदूळ विहित कालमर्यादेत जमा न केल्याने धानाचा अपहार केल्याप्रकरणी इंडस्ट्री संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता असतांना याकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाप्रती जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"नाशिक येथील एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्रात विद्युत विनियमासंदर्भात सुविधा उपलब्ध असणे, त्यामध्ये ६५० एकर जागा रेल्वेमार्ग, प्रशासकीय इमारती, कामगार वसाहत, राख साठवणूक बंधारा, पाणी इत्यादी आवश्यक सोयी-सुविधांचा समावेश असणे, तसेच शासनाने एकलहरे येथे ६६० मेगावॅट प्रकल्प दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ रोजी मंजूर करून देखील शासनाने स्थगित ठेवणे, सन २०२३ मधील पावसाळी अधिवेशनामध्ये उपस्थितीत केलेल्या लक्षवेधीच्या उत्तरामध्ये विद्यमान ऊर्जा मंत्री यांनी केंद्र शासनाच्या प्रस्तावित धोरणामुळे व शासनाने दिनांक १७ जून, २०२० रोजीच्या पत्रानुसार पुढील पाच वर्षांत राज्यात कोणताही औष्णिक वीज प्रकल्प प्रस्तावित नमूद करणे, तसेच दिनांक २ जून, २०२० रोजी मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत नवीन औष्णिक वीज प्रकल्प राबविता येणार नसणे, याबाबतचा संदर्भ सदर उत्तरात असणे असे असतांना देखील नाशिक येथील एकलहरे औष्णिक वीज प्रकल्पास मान्यता न देणे, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत कोराडी सुपर क्रिटिकल वीज प्रकल्पास मान्यता देणे, परिणामी नाशिकमधील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उप मुख्यमंत्र्यांनी (ऊर्जा) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. संदिप क्षीरसागर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"मराठा समाजाच्या आरक्षण आंदोलनांचे निमित्त साधून दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी बीड जिल्ह्यातील काही ठिकाणी व बीड शहरात भर दुपारी जाळपोळीच्या घटना घडणे, सदर घटना घडत असतांना जमावधारकांनी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधीच्या राहत्या घरावर जीवघेणा हल्ला करून घर पेटवून देणे, चारचाकी वाहने जाळून टाकणे तसेच त्यांचे घरातील सदस्यांच्या जीवितास धोका होईल, असे क्रूर कृत्य करण्यांत येणे तसेच बार्शी रोडवरील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यालय देखील पेटवून दिल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे आढळणे, मराठा समाजाने आरक्षणासंदर्भात यापूर्वी अनेक आंदोलन केली असून ही आंदोलने शांततेत शिस्तीत व सनदशीर मार्गाने केलेली असणे, त्यामुळे आंदोलन करणारा मराठा बांधव असे हिंसक व जीवघेणे आंदोलन करणे शक्य नसणे, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेला जीवघेणा हल्ला, मराठा समाजाने किंवा स्थानिकांनी केलेला नसून काही समाजकंटकांनी केला असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येणे, याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना

पुनःश्च घडू नयेत याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री (गृह) व पोलीस महासंचालक यांना कळविण्यांत आलेले असणे, परंतु अद्यापही कारवाई न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उप मुख्यमंत्र्यांनी (गृह) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. जयकुमार रावल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले —

"प्रकाशा बुराई उपसा जलसिंचन योजना ता.जि.नंदुरबार योजनेला सन १९९९ मध्ये ११० कोटींच्या रकमेस प्रशासकीय मान्यता मिळणे, त्यानंतर योजनेचे काम सुरू होऊन त्यावर १०९ कोटी रुपये खर्च करण्यात येणे, त्यातून हाटमोहिदा गावाजवळ जॅकवेल तसेच योजनेच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील पाईपलाईनचे काम देखील पूर्ण होणे, प्रशासकीय मान्यतेसाठी झालेल्या विलंबामुळे प्रकल्पाच्या उभारणी खर्चामध्ये वाढ होणे, त्याकरीता सबंधित विभागाने शासनाकडे उक्त प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे सन २०१९ पासून सादर करण्यात येणे, परंतु त्यावर अद्याप निर्णय न झाल्यामुळे योजनेचे काम थांबणे, त्यामुळे नंदुरबार, सिंदखेडा आणि साक्री तालुक्यातील जवळपास ५० पेक्षा जास्त कायमस्वरूपी दुष्काळी गावांचा पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न अवलंबून असणे, नुकत्याच शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी तालुक्यांच्या यादीत देखील सिंदखेडा आणि नंदुरबार या दोन्ही तालुक्यांचा समावेश असणे, तर साक्री तालुक्यातील दुसाने महसूल मंडळाचा देखील समावेश असणे, कायमस्वरूपी दुष्काळी भाग असल्याने येथे हरीतक्रांती आणण्याकरीता प्रकाशा बुराई उपसा जलसिंचन योजना महत्त्वाकांक्षी प्रकल्प असणे, परंतु सुप्रमा देण्याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"जय भवानी एस.आर.ए. गृहनिर्माण संस्था, गोरेगाव (पश्चिम) या सोसायटीला माहे ऑक्टोबर, २०२३ च्या सुमारास आग लागलेली असणे, सात मजली इमारतीला लागलेल्या आगीत ९ जण मृत्यूमुखी व ४० हून अधिक रहिवाशी जखमी होणे, दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांना सरकारकडून

पाच लाख रुपयांची मदत जाहीर होणे, प्रत्यक्षात पूर्ण मदत अद्यापपर्यंत मिळालेली नसणे, इमारतीच्या दुरुस्तीचा वेग वाढविण्याची गरज, गत २ महिन्यांहून अधिककाळ तेथील रहिवासी बेघर होणे, एस.आर.ए. प्रकल्पांतर्गत बांधण्यात येणाऱ्या आणि बांधलेल्या अनेक इमारतींमध्ये आगप्रतिबंधक उपाययोजनांचा अभाव असल्याचे समोर येणे, अशा इमारती उभ्या राहताना विकासकाकडून अनेक नियम डावलल्याचे निदर्शनास येणे, जुन्या रहिवाशांच्या बांधकामात अनेक वेळा विकासकाकडून दुजाभाव करण्यात येणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.

(चर्चा अपूर्ण)

मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर ही चर्चा On-leg ठेवतो. काही विधेयके पुरःस्थापित करून ही चर्चा घेऊ. त्यानंतर प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करु असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**६.** (अ) (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ५४ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ५६ - जी.एच.रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ, पुणे, विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ५७ - जी.एच.रायसोनी कौशल्य तंत्र विद्यापीठ, नागपूर, विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(४) क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ५३ – महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

आता आजच्या कामकाजपत्रिकेवरील सूचना क्रमांक ९ वरील चर्चा पुढे सुरू करण्यात येत आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, अशोक चव्हाण, सुनिल प्रभू, चेतन तुपे, वि.स.स. यांनी, "एस.आर.ए. प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींमधील सुविधांच्या अभावामुळे होत असलेले अपघात व तेथील नागरिकांची होत असलेली गैरसोय" इ. बाबत उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना — चर्चा पुढे सुरू

काही प्रश्नोत्तरे झाली.

आता विधेयक क्रमांक ५२ मांडण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(ब) महसूल मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५२ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सन्माननीय सदस्य श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेस सुरुवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते

(२) श्री.रविंद्र वायकर

(३) श्री.बळवंत वानखडे

(४) डॉ. देवराव होळी

(५) श्री.दीपक चव्हाण

(६) श्री.सुनील राणे

उपरोक्त विधेयकावरील चर्चेस महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**७.** सर्वश्री विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव –

प्रा. श्रीमती वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९३ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले—

"राज्यातील वाढती महागाई, बेरोजगारी, गुन्हेगारी व सामाजिक सलोखा राखण्यात सरकारला आलेले अपयश, पेट्रोल, डिझेल, गॅस, वीज, प्रवास, किराणा, शाळा फी, वैद्यकीय खर्च यात

मोठ्या प्रमाणावर दरवाढ झालेली असल्यामुळे गोरगरीब, सर्वसामान्यांना जगणे कठीण झाले असणे, महागाई रोखण्यासाठी शासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नसणे, राज्यात उद्योगवाढीसाठी चालना देण्यास शासनाकडून पावले उचलली जात नसल्यामुळे राज्यात गुंतवणूक होत नसणे, राज्यातील उद्योग बाहेरील राज्यात स्थलांतरित होणे, परिणामी बेरोजगारी वाढणे, राज्यात विशेषतः विदर्भ, मराठवाड्यात रोजगार आणण्यात सकारात्मक पावले शासनाकडून उचलली जात नसणे, विदर्भासाठी मिहान प्रकल्प महत्त्वाचा असताना नव्याने उद्योगच न आल्याने मिहानचा उद्देश सफल होत नसणे, कंत्राटी पद्धतीने नोकरभरतीचा निर्णय झाल्याने तसेच एमपीएससीमध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे शासकीय भरती ठप्प झाली असणे, परिणामी बेरोजगारी वाढल्याने युवा पिढीत नैराश्याची भावना निर्माण झाली असणे, तसेच, वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्याने घेतला असला तरी केंद्र शासनाकडे अनेक महिन्यांपासून प्रलंबित असणे, परिणामी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेष निर्मूलनाचे काम थांबलेले असणे, विदर्भ आणि मराठवाड्यासाठी गत दीड वर्षात सरकारने केलेल्या घोषणांची अंमलबजावणी झालेली नसणे, या भागातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असणे, राज्यात, विशेषतः विदर्भ, मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांची वाढलेली संख्या, कापूस, संत्रा, सोयाबीन उत्पादक सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे अडचणीत आले असणे, धानाला १००० रुपये बोनस देण्याची आवश्यकता, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात झालेली वाढ व शेतीचे झालेले नुकसान, अत्यल्प मिळत असलेली मदत, राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडालेला असणे, औषध व उपकरण खरेदी, पुरवठा, रुग्णालयातील मनुष्यबळ वाढविणे, यातील शासनाच्या निष्क्रियतेमुळे गोरगरीबांना रुग्णसेवा न मिळणे, ठाणे, नांदेड आणि राज्यातील इतर भागात शासकीय रुग्णालयात रुग्णमृत्यूचे व बालमृत्यूचे वाढलेले प्रमाण, राज्यात प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नसणे, वैद्यकीय शिक्षण व रुग्णालयातील गैरप्रकार थांबविण्याची आवश्यकता, एमएमआरडीएचे, विशेषतः मुंबई व मुंबई उपनगरातील अनेक विकास प्रकल्प रखडलेले असणे, धारावी पुनर्विकासात शासनाने विकासकधार्जिणी भूमिका घेतलेली असणे, धारावी प्रकल्पाच्या नावावर होणारा टी.डी.आर. महाघोटाळा व दडपशाही, लोकप्रतिनिधी नसताना मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून अनेक धोरणात्मक निर्णय घेतले जात असून मुंबईकरांच्या पैशाची उधळपट्टी सुरू असणे, मुंबई महापालिका अग्निशमन दलातील अनेक गैरप्रकार उघडकीस येणे, पीएमजीपी योजनेतून जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, मुंबई व राज्यात हवेच्या प्रदूषणाने सर्वोच्च पातळी गाठली असणे, मुंबईतील खुल्या जागा खाजगी संस्थांना देण्याच्या धोरणाचा पुनर्विचार करण्याची गरज, मुंबईतील झोपडपट्ट्यांना स्लम घोषित न केल्यामुळे पुनर्विकासात निर्माण झालेला अडथळा, नागरी सुविधा

न मिळणे, कोळीवाडा व गावठाण विकासाबाबतच्या धोरणात आवश्यक बदल करण्याची आवश्यकता, पनवेल तालुक्यातील रहिवाशांनी नैना प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी सुरू केलेले आमरण उपोषण, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ५०० पेक्षा जास्त अनधिकृत इमारतींची बांधकामे झाली असून अजूनही सुरू असणे, महानगर पालिकेचे त्यावर कोणतेही नियंत्रण नसणे, महानगर पालिकेने विकासकांना अतिरिक्त टीडीआर बहाल करणे, वाढत्या शहरीकरणामुळे वाहतुकीच्या समस्येसह विविध भागात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली टंचाई, तसेच ठाणे महानगर पालिकेत मोठ्या प्रमाणात सुरू असलेला भ्रष्टाचार, ठाणे (पूर्व) कोपरी भागातील अनेक जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींना विकास आराखड्यामध्ये रस्ता नसल्यामुळे त्यांच्या पुनर्विकासामध्ये निर्माण होत असलेल्या अडचणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची भूमिका."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

---

(१) डॉ. जितेंद्र आव्हाड

(२) श्री. मंगेश कुडाळकर

(३) ॲड. आशिष शेलार

(४) श्री. रईस शेख

(५) श्री. रविंद्र वायकर

(६) श्री. नाना पटोले (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

म.वि.स. नियम २९३ अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चा आता स्थगित करण्यात येत असून सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले हे ऑन-लेग राहतील. आजच्या कामकाज पत्रिकेवरील अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात येत आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

## सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३

सर्वश्री नाना पटोले, जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "कोंढाळी-नागपूर महामार्गावरील सोलार इंडस्ट्रीजमध्ये झालेला स्फोट", तसेच, "जळीत रुग्णांवर उपचार करण्यासाठी नागपूर येथे प्रस्तावित असलेल्या "National Programme for Prevention and Management of Burn Injuries" हा प्रकल्प अद्याप पूर्णत्वास न येणे" या दोन्ही विषयावर म.वि.स. नियम ५७ अन्वये दिलेल्या सूचनांतील विषय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवरील कुठल्याही बाबीशी निगडित नाही. तसेच, या विषयांवर स्थगन प्रस्तावाच्या सूचना देखील प्राप्त आहेत. सबब, उपरोक्त सूचना म.वि.स. नियम ५७ च्या निकषात बसत नसल्यामुळे सदरहू सूचनांना माननीय अध्यक्षांनी अनुमती नाकारली.

सर्वश्री नाना पटोले, विजय वडेट्टीवार व अनिल देशमुख, वि.स.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्य सर्वश्री नाना पटोले, अनिल देशमुख व माननीय विरोधी पक्ष नेते, श्री.विजय वडेट्टीवार यांनी जी माहिती दिली व जो मुद्दा आज सभागृहात मांडलेला आहे, तो अत्यंत गंभीर आहे. शासनाने या संदर्भातील गंभीर नोंद घेऊन या विषयाबाबतचे निवेदन करावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "मी या अधिवेशनामध्ये दोन घटनांचा उल्लेख केला होता. त्यावर आपण शासनास निवेदन करण्यास सांगितले होते. परंतु शासनाने अद्याप ते निवेदन केलेले नसणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

ज्या-ज्या विषयावरील निवेदन करण्यासंदर्भातील सूचना व निदेश शासनाला दिले आहेत, ती सर्व निवेदने हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन करेल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

१. (अ) (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सोळा प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मंत्री यांनी, "सातारा ते कागल राष्ट्रीय महामार्गावरील किणी व तासवडे येथील टोल नाक्यांवर बेकायदेशीर टोल वसुली होत असल्याबाबत" या विषयावरील श्री. संजय केळकर, वि.स.स. यांचा दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ६७५२१ च्या अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** सर्वश्री सुनिल केदार, कुणाल पाटील, नाना पटोले, बाळासाहेब थोरात, अनिल देशमुख, रोहित पवार, जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "चाकडोह, जि. नागपूर येथील सोलार एक्सप्लोझिव्ह कंपनीत दि.१७ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता झालेल्या स्फोटात ६ महिला व ३ पुरुषांसह एकूण ९ कामगारांचा मृत्यू तर, ३ जण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना" या विषयावर म.वि.स. नियम ९७ अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली असून सूचनेतील विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे असे निर्देश देऊन माननीय अध्यक्षांनी सदरहू सूचनेस अनुमती नाकारली.

**३.** (१) ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांनी, ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला तातडीने आरक्षण देण्यात यावे व धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात यावा, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेते यांनी, चाकडोह जि. नागपूर येथील अपघाताच्या दुर्घटनेसंदर्भात मुद्दा पुन्हा उपस्थित केला.

(२) श्री. राजन साळवी, वि.स.स. यांनी, "रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामपंचायत क्षेत्रातील घर दुरुस्तीचे अधिकार पुर्वीपासून ग्रामपंचायतीकडे होते. परंतु शासनाने ते अधिकार तहसीलदार, प्रांत व जिल्हाधिकारी यांना दिले असणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

श्री. जयंत पाटील वि.स.स. यांनी, "सांगली जिल्ह्यातील सरपंच, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक, ग्रामपंचायत कर्मचारी व संगणक परिचालक यांच्या विविध मागण्यांसाठी त्यांनी सर्व ग्रामपंचायती बंद ठेवून तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर धरणे धरण्याचा निर्णय घेतलेला असणे," इ. बाबत दिलेल्या सूचनेच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. अबु आझमी, वि.स.स. यांनी, (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने भाषण प्रलंबित).

(२) श्री. संग्राम थोपटे, वि.प.स. यांनी, "शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी करण्यासंदर्भात प्रकरणे लवकर निकाली काढणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) श्री. शांताराम मोरे, वि.प.स. यांनी, "वाडा-शिवडी हा रस्ता पावसामुळे वाहून जाणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

याबाबत तातडीने चौकशी करून कारवाई करण्यात येईल असे राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांनी सांगितले.

(४) श्री. रविंद्र धंगेकर, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्रातील रिक्षा चालकांना मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार योग्यता प्रमाणपत्राची फी माफ करण्यात यावी व महामंडळामार्फत आर्थिक मदत देण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५) श्री. अशोक चव्हाण, वि.स.स. यांनी, "सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम, २०२२ च्या अनुषंगाने दिनांक ९ सप्टेंबर, २००० पूर्वी निवड झालेल्या मात्र नियुक्ती मिळू न शकलेल्या उमेदवारांकरिता अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतरही संबंधित उमेदवारांना अधिसंख्य पदावर नियुक्ती मिळाली नसणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(६) श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांनी, "बुलढाणा जिल्ह्यातील नगर परिषद, मलकापूर येथे औद्योगिक नगरी अधिनियम कलम १६७ (अ) नुसार थकबाकीची रक्कम प्रदान करण्याबाबत सूट देण्याचे अधिकार राज्य शासनास असूनसुद्धा त्यानुसार शास्तीची रक्कम माफ होण्याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे स्थानिक नागरीकांमध्ये शासनाप्रती प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(७) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "खर्डी, ता. शहापूर, जि. ठाणे येथील दुसऱ्या टप्प्यामधील खर्डी व घाणेपाडा येथील स्थगित केलेल्या अधिग्रहीत जमिनींचा मोबदला त्वरित अदा करण्यात न आल्याने स्थानिक शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, तसेच विविध मागण्यांबाबत पोलीस पाटील वारंवार आंदोलन करीत असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(८) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी, "राज्य शासनाच्या थेट खेळाडू भरतीसाठीच्या यादीत ऑलिम्पिक मान्यता प्राप्त खेळ खो-खो, कबड्डी व बुद्धिबळ या स्पर्धासह 'मल्लखांब' या स्पर्धेचा समावेश करण्याची नितांत आवश्यकता तसेच राज्य शासनाच्या थेट खेळाडू भरतीसाठीच्या यादीत 'मल्लखांब' या स्पर्धेचा समावेश करून केंद्र शासनाचा सर्वोच्च पुरस्कार पटकाविणाऱ्या कु.हिमानी परब हिला शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत तातडीने सकारात्मक कार्यवाही करण्यात यावी." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(९) श्री. कैलास पाटील, वि.स.स. यांनी, "मुस्लिम समाजातील मागासलेल्या ५० जातींना आरक्षण देण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी तसेच मातंग समाजाची देखील अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेची मागणी पूर्ण करून मातंग समाजाला न्याय द्यावा." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१०) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी, "भगूर नगरपरिषदेची पाणीपुरवठा योजना व एस.टी.पी. या संदर्भात मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद, भगूर यांचेकडे पाठपुरावा करून देखील ही कामे जाणिवपूर्वक प्रलंबित ठेवली जात असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(११) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, "मुंबई उपनगरात कांदिवली, बोरीवली आणि गोरेगांव भागामध्ये व प्रबोधनकार ठाकरे नगरात सन १९८४ दरम्यान म्हाडाने मोठ्या प्रमाणात बैठ्या वसाहतीच्या पुनर्विकास करणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१२) श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, "माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये लडाखच्या सियाचीन येथील लाईन ऑफ ड्युटी येथे तैनात असताना बुलडाण्याच्या पिंपळगाव सराई गावातील सुपूत्र अक्षय लक्ष्मण गवते हे शहीद झाले आहेत, परंतु सदरील जवान अग्नीवीर योजनेतून सैन्यात भरती झाला असल्याने सदरहू जवानास gratuity, कुटुंबास पेन्शन यासारखे कुठलेही लाभ मिळत नसणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१३) श्री. लहू कानडे, वि.स.स. यांनी, "श्रीरामपूर (जिल्हा अहमदनगर) येथील बस स्थानकाच्या नूतनीकरणाचा बीओटीचा प्रस्ताव शासनाने तातडीने मंजूर करावा." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी, "अकोला शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रुग्णालयात रुग्णांवर उपचार करण्यास होत असलेला हलगर्जीपणा." इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१५) श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स. यांनी, (प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे प्रलंबित असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित आहे.).

**४.** (१) सर्वश्री लहु कानडे, सुनिल प्रभू व विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. लहु कानडे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील अभियांत्रिकी, औषधी निर्माण शास्त्र, तंत्रनिकेतन, हॉटेल व्यवस्थापन आणि आर्किटेक्चर या व्यावसायिक अभ्यासक्रमातील अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची सन २०२१ - २२ आणि सन २०२२ - २३ पासून ची शिष्यवृत्ती देण्यात आली नसल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा यासाठी सन २०१८-१९ मध्ये डीबीटी योजना सुरू करण्यात येणे, या शिष्यवृत्तीच्या भरवशावरच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात मोफत प्रवेश दिला जात असणे, मात्र दोन वर्ष शिष्यवृत्तीची रक्कम मिळत नसल्याने विनाअनुदानित महाविद्यालयासमोर आर्थिक संकट उभे राहणे, केंद्र शासनाकडून सन २०२१-२२ पासून अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती न देण्यात येणे, तसेच अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना गत दोन वर्षापासून निर्वाह भत्ता व परीक्षा शुल्काची रक्कम मिळालेली नसणे, शासनाच्या शुल्क नियंत्रण समितीतर्फे गत पाच वर्षापासून शुल्क वाढवण्यात आलेले नसणे, शिष्यवृत्तीची रक्कम देखील थांबवण्यात येणे, यामुळे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांमध्ये भवितव्य धोक्यात आल्याची भावना निर्माण होणे, अशा प्रकारे अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांमध्ये शासनाबद्दल पसरलेली नाराजीची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती, निधी, निर्वाह भत्ते, परीक्षा शुल्क व इतर सुविधा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"नांदेड (हुजुर साहेब) येथे शीख समाजाचे पवित्र स्थान जगप्रसिद्ध सचखंड गुरूद्वारा असणे, सदर गुरुद्वाराच्या १९५६ च्या कायद्यात शासनाने दुरुस्ती केली असणे, त्यात कलम ११ चा समावेश असणे त्यात गुरुद्वारा बोर्डाचा अध्यक्ष निवडीचा अधिकार सरकारकडे आला असणे,परंतु या निर्णयाची पंजप्यारे साहिब आणि शीख समाजात प्रचंड नाराजी पसरली असणे,तसेच दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ नांदेड गुरुद्वारा येथे तत्कालीन मुख्यमंत्री आले असता त्यांनी सन २०१४ मध्ये कलम ११ मध्ये सुधारणा रद्द करून पूर्वीप्रमाणे कलम ११ करण्याची घोषणा केली असणे, परंतु घोषणेची शासनाकडून अंमलबजावणी झाली नसणे, गुरूद्वारा बोर्डबाबत समाजाच्या ३ प्रमुख मागण्या असणे १) शासनाने सन २०१४ वर्षी गुरूद्वारा बोर्ड यांचे कलम ११ यात सुधारणा केल्या त्या रद्द करणे, २) सुमारे ३ वर्षापासून उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन शासनाकडून

करण्यात आले नसणे, गुरुद्वारा बोर्डाची निवडणुक लोकशाही पद्धतीने तातडीने घेण्यात यावी अशी मागणी स्थानिक शीख समाजाची असणे, ३ ) गुरूद्वारा बोर्डाच्या नियमात काही बदल करावयाचे असल्यास, शासनाने नांदेड स्थानिक शीख बांधवांच्या भावना व त्यांची मागणी प्रमाणेच ॲक्ट मध्ये बदल करण्याची आवश्यकता, स्थानिक शीख समाजाच्या संमतीविना कोणतेही बदल न करण्याची मागणी, शीख समाज बांधवांमध्ये शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची भावना पसरलेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

महसूल मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रंश्नानोत्तरे झाली.

( ३ ) सर्वश्री विजय वडेट्टीवार, अशोक चव्हाण, सुरेश वरपुडकर, डॉ. नितीन राऊत, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री अमिन पटेल, अस्लम शेख, अमित देशमुख, धिरज देशमुख, अमित झनक, राजेश एकडे, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री सुभाष धोटे, सुनिल केदार, विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, संजय जगताप, ऋतुराज पाटील, विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विजय वडेट्टीवार वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"मौजे बेलोरा, जेना ( ता.भद्रावती, जि.चंद्रपूर ) या गावाची ३३० एकर शेतजमीन सन २००० मध्ये मे. सेंट्रल कॉलरीज कंपनी मर्यादित नागपूर या कंपनीने स्थानिकांना कायमस्वरुपी नोकरीची आश्वासन देऊन कवडीमोल भावाने खरेदी करणे, या कंपनीच्या माध्यमातून पॉवर प्लांट उभारणे व त्याकरिता लागणारा कोळसा स्थानिक शेतजमीनीमधून उत्खनन करण्यात येणार असणे, स्थानिकांना रोजगार मिळणार या आशेने गावकऱ्यांनी आपल्या शेतजमीनी या कंपनीला १९,००० प्रति एकरप्रमाणे विकल्या असणे, परंतु या शेतजमीनीवर मे.सेंट्रल कॉलरीज कंपनी मर्यादित, नागपूर यांनी कोणताही पॉवर प्लांट न उभारता सर्रासपणे अवैध कोळसा उत्खननाचे काम सुरू करून खाजगी बाजार पेठेत विकणे, या प्रकरणाची दखल शासनाने घेऊन सन २००४ मध्ये या कंपनीच्या बेलोरा, जेना येथील कोळसा उत्खननावर बंदी घालून कंपनीचे काम कायमचे बंद करणे, सदर कंपनीने ज्या शेतजमीनी स्थानिकांकडून खरेदी केल्या त्या सर्व शेतजमीनी शासनाच्या मदतीने कोर्टामार्फत अरविंदो रियालिटी अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीने सन २०२२-२३ मध्ये खरेदी करून अरविंदो कोलमाईन्स ह्या कंपनीच्या माध्यमातून कोळसा उत्खननास सुरुवात करणे, याबाबत ज्या शेतकऱ्यांची शेतजमीन या प्रकल्पासाठी घेण्यात आली होती त्या शेतधारकांच्या मागण्यांबाबत अरविंदो कंपनीच्या व्यवस्थापनानेही आजतागायत कोणताही प्रतिसाद दिला नसणे,

त्यामुळे शेतधारकांचे एकमेव उदरनिर्वाहाचे साधन असलेली शेतजमीन जाऊन २३ वर्षे झालेली असतानाही अद्यापही रोजगाराच्या प्रतीक्षेत असणे, जमीन जाणे तसेच रोजगारही न मिळणे या विवंचनेत हे जमीनधारक जीवनजगत असणे, याबाबत संबंधित शेतधारकांवर झालेल्या अन्यायाचे निवारण करण्याकरिता त्यांना शेतजमीनीचा वाढीव मोबदला देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पणन मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"प्रस्तावित कराड-चिपळूण रेल्वेमार्गामुळे कोकणातील सागरी बंदरे उर्वरित जिल्ह्यांशी जोडली जाणार असणे, यामुळे कोकणातील औद्योगिक विकासाला चालना मिळणार असणे, कोकण व पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या कराड-चिपळूण रेल्वे प्रकल्पाचे दिनांक १४ ऑगस्ट २०१६ रोजी भूमीपूजन होऊनही प्रकल्प प्रलंबित असणे, या कामाबाबत दिनांक २१ मार्च २०२३ रोजी चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना बंदरे व खनिकर्म मंत्री यांनी कराड-चिपळूण रेल्वेमार्गासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा तसेच महिन्याभरात बैठक घेण्यात येणार असल्याचे सभागृहास आश्वासित करणे, शासनाकडून केंद्र शासनाकडे या प्रकल्पाकरिता पाठपुरावा करण्यात आल्याबाबतची माहिती सांगण्यात न येणे, बंदरे व खनिकर्म मंत्री यांच्याकडून अद्याप कोणत्याही बैठकीचे नियोजन न करण्यात आल्यामुळे शासनाला सभागृहातील दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला असणे, कोकण व पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला चालना देणाऱ्या या रेल्वे प्रकल्पाबाबत लोकप्रतिनिधींच्या प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर रेल्वे प्रकल्प तातडीने पूर्ण होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) (मुख्यमंत्री यांचेकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री हरिभाऊ बागडे, शंकरराव गडाख, राम सातपुते, श्रीमती अश्विनी जगताप, ॲड.राहुल कुल, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. हरिभाऊ बागडे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यात शेतीपूरक व्यवसाय बहुतांश शेतकरी दूध व्यवसाय करीत असणे, सहकाराच्या ८५ दूध संघ व १५ खाजगी संघ दररोज १ कोटी १५ लक्ष लिटर संकलन करणे, सहकार संघाच्या माध्यमातून ४२ लक्ष लिटर व खाजगी संस्थे मार्फत १ कोटी ३ लक्ष लिटर दूध संकलन होणे, पाऊस व उष्णते मुळे पशु खाद्य महाग झाले असणे, लंपी आजारामुळे राज्यामध्ये गाई व म्हशी मृत पावल्यामुळे दूध उत्पन्नात घट होणे, दूध पावडर चे भाव घटल्याने भाव पडणे, तसेच दुग्धजन्य पदार्थांवर सेवा व वस्तु करामुळे व पॅकिंग आणि पुरवठ्यासाठी मनुष्यबळ लागणे, यामुळे खर्चात वाढ होणे, दूध उत्पादक संघ तोट्यात जाणे, कोरोंना काळात रेस्टॉरंट, मिठाई दुकान बंद असतांना दूध दरात घट झाली असणे, त्या काळात दूध विक्री करणे कठीण झाले असणे, त्यामुळे शेतकऱ्यांनी त्याचे उत्पादन कमी करणे, बनावट भेसळयुक्त दूध विक्री होऊन आरोग्यावर घातक परिणाम व असाध्य आजार होणे, शासकीय धोरण व खाजगी कंपन्यांच्या स्पर्धेमुळे अनेक वर्षापासून दुग्धव्यवसाय अस्थिर असणे, दूध उत्पादकांचा चारा, वैरण, सुग्रास, ढेप, औषधे, पशुवैद्यकीय कृत्रिमरेतण, याचा उत्पादन खर्च मिळालेल्या दूध दरा पेक्षा जास्त असणे, त्यामुळे दूध उत्पादन कमी होणे, दूध उत्पादकांना मदत करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

दुग्ध व्यवसाय विकास मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पुनावळे हद्दीतील वनविभागाच्या २६ हेक्टर जागेवर सन २००८ मध्ये कचरा डेपोसाठी आरक्षण टाकण्यात येणे, गत पंधरा वर्षात या भागात विविध शैक्षणिक संस्था, मोठे गृह प्रकल्प, हिंजवडी आयटीपार्क असल्याने लाखो नागरिक, अभियंते नोकरीनिमित्त स्थायिक झालेले असणे, वन विभागाच्या ५७ एकर जागेत कचरा डेपो झाल्यास परिसरातील वृक्ष नष्ट होण्याचा धोका निर्माण होणे,सदर भाग डोंगराचा असल्याने पावसाळ्यात कचरा डेपोतील दूषित पाणी सखल भागात व पवना नदीच्या पात्रात येऊन पिण्याचे पाणी दूषित होऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता, पुनावळे येथील आरक्षित जागेच्या बदल्यात पालिकेच्या वतीने वन विभागाला चंद्रपूर येथे २२ हेक्टर खाजगी जमीन ९ कोटी रुपयांना खरेदी करून देण्याच्या मनपाच्या प्रस्तावास स्थगिती देण्याची आवश्यकता, औद्योगिकीकरणामुळे शुद्ध हवेची पातळी खालावलेली असताना वृक्ष तोड करून कचरा डेपो बनविण्याचा प्रस्ताव अनाकलनीय, अव्यावहारिक असणे, वन विभागाच्या २६ हेक्टर जागेवर विविध प्रकारचे दाट वृक्ष

असून कचरा डेपो निर्माण केल्यास पर्यावरणाची हानी होण्याची शक्यता, पुणे विमानतळापासून पुनावळेचे अवकाशातील अंतर केवळ ११ किमी असून कायद्यानुसार किमान २० कि. मी. अंतर आवश्यक असतानाही महानगरपालिका कायद्यातील तरतुदींचे पालन न करता कचरा डेपोचा घाट घालण्यात येणे, पुनावळे येथील वन विभागाच्या जागेवर कचरा डेपोसाठी राखीव असलेल्या जागेच्या हस्तांरणाच्या प्रक्रियेस तातडीने स्थगिती देण्याची आवश्यकता, उद्योगनगरीतील नागरिक, पर्यावरण संरक्षक संस्था यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग (मुख्यमंत्री यांच्याकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नानोत्तरे झाली.

श्री. विकास कुंभारे वि.स.स. यांनी, "हलबा समाजाला जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यात न येणे." इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषि मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"धुळे जिल्ह्यात पुरेसा पाऊस झाला नसल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, ज्या मंडळामध्ये ३१ दिवसांपेक्षा जास्त पावसाचा खंड होता त्या मंडळातील शेतकऱ्यांना पिक विम्याची अग्रीम रक्कम देण्याची मागणी झालेली असणे, जिल्ह्यातील २ लाख ४६ हजार ८४७ शेतकऱ्यांनी खरीप हंगामात २ लाख ५३ हजार ८२३ हेक्टर क्षेत्राचा पिक विमा काढलेला असणे, त्यात धुळे तालुक्यातील ६७ हजार ५८१ हेक्टर क्षेत्रातील ८० हजार ५८६ शेतकऱ्यांचा समावेश असणे, राज्य सरकारने पीक विमा कंपन्यांना २४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अग्रीम रक्कम देण्याचे आदेश दिले असतानाही विमा कंपनी टाळाटाळ करीत असणे, कृषि विभागाने ६५ टक्के नुकसान झाले असल्याचा अहवाल दिलेला असून आयुक्तांनी ते मान्य केलेले असतानाही विमा कंपनी फक्त ५३ टक्के नुकसान झाल्याचे दाखवीत असणे, त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना अग्रीमच्या लाभापासून वंचित राहणार असल्याचे दिसून येणे, विमा कंपन्या शेतकऱ्यांची फसवणूक करीत असणे, त्यामुळे शासनाने या सर्व विमा कंपन्यांचा ताळेबंद तपासावा, विशेष तपास पथक नेमून विमा कंपन्या शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याप्रकरणी शोध घेण्याची आवश्यकता, शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने विमाधारक शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

कृषी मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"वर्सोवा, मुंबई येथील जेव्हीएलआर मार्गावरील बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल हा एसव्ही रोड ते इन्फिनिटी मॉल लिंक रोड पर्यंतचा विस्तारित पूल व रस्ता गत अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, त्यामुळे वर्सोवा विभागात मोठ्या प्रमाणावर वाहतुकीचा प्रश्न निर्माण होणे, सदर वाहतुकीचा प्रश्न संपुष्टात आणण्यासाठी बाळासाहेब ठाकरे पूल लिंक रोडपर्यंत विस्तारित करणे अत्यंत आवश्यक असून सध्या याच मार्गावरून मेट्रोचे कामदेखील सुरू असणे, पूल निर्मितीकरिता मुंबई महानगर पालिकेतर्फे एमएमआरडीए ला ३८४.५० कोटी रुपये (एकूण ७६८.८५ कोटी रुपयांपैकी ५० टक्के निधी) देखील वर्ग करण्यात येणे, परंतु इन्फिनिटी मॉल ते पश्चिम द्रुतगती महार्गाकडील भाग अद्यापपर्यंत अपूर्ण असल्याचे माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, सदर कामासाठी आवश्यक जमीन अधिग्रहण प्रक्रिया अद्याप पूर्ण करण्यात आलेली नसून सदर जागेवरील झोपड्यांची अतिक्रमणे देखील हटविण्यात न येणे, तसेच सदर प्रकल्पासाठी सल्लागाराची नेमणूकही केलेली नसणे, सदर विलंबामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण होणे, याप्रकरणी वर्सोवा येथील इन्फिनिटी मॉल ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडील भागाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

धुळे जिल्ह्यात पुरेसा पाऊस झाला नसल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, इ. बाबत दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा पुढे सुरू झाली.

कृषी मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

वर्सोवा, मुंबई येथील जेव्हीएलआर मार्गावरील बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल हा एसव्ही रोड ते इन्फिनिटी मॉल लिंक रोडपर्यंतचा विस्तारित पूल व रस्ता गत अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, इ. बाबत दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा पुढे सुरू झाली.

उद्योग मंत्री (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) प्रा. (श्रीमती) वर्षा गायकवाड, वि.स.स, यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्री यांचे लक्ष वेधले :—

मुंबईतील बेस्ट उपक्रमात सध्या सहा हजारांपेक्षा अधिक कंत्राटी कर्मचारी असून यात अनेक महिला वाहकांचाही समावेश असणे, माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये धारावी आगारातील कंत्राटी महिला वाहकांसाठी असलेल्या विश्रांती कक्षाचे छत कोसळल्याची घडलेली घटना, बेस्ट उपक्रमात कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागत असणे, असून सदर कंत्राटी वाहक महिलांना अत्यंत तुटपुंजे वेतन मिळणे, कंत्राटी वाहक महिलांना बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांमधून कर्तव्य बजावत असतानाही तिकीट काढावं लागत असणे, बेस्टच्या आगारांमध्ये या कंत्राटी वाहक महिलांसाठी असलेल्या स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत बिकट असणे, कर्तव्य बजावताना असताना बस शेवटच्या थांब्यावर पोहोचल्यानंतर तिथे असलेल्या चौकीच्या ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृह नसणे, महिला वाहकांना पुरुषांसाठीच्या स्वच्छतागृहांमध्येच जावे लागत असणे, बहुतांश महिला वाहकांना मूत्राशयाचे विकार होत असल्याचेही निदर्शनास येणे, त्यामुळे महिला वाहकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, बेस्टमध्ये कमतरता असलेल्या कामगारांची भरती करावी आणि कंत्राटी सेवेत असलेल्या महिला वाहकांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची तसेच सदर महिला वाहकांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

१. राज्यातील अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट आणि अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान आणि त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष.

आणि

२. राज्यातील शेतकऱ्यांना भेडसावणारे विविध प्रश्न आणि त्यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

उपरोक्त विषयावरील अल्पकालीन चर्चा पुढे सुरू झाली.

मुख्यमंत्री यांनी चर्चेस उत्तर दिले.

अल्पकालीन चर्चा संपली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

(अ) उद्योग मंत्री यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता), सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक-३६ महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ यांस संयुक्त समितीच्या अहवालानुसार विधानपरिषदेने दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे सहमती देण्यात यावी, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी पुढील विधेयके सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले :—

(अ) सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५८ – महाराष्ट्र मराठी भाषा विद्यापीठ विधेयक, २०२३.

(ब) सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५९ - महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विधेयक, २०२३.

(२) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ६० – महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(१) क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५३ - महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ (सुधारणा) विधेयक,२०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, सुभाष धोटे, विकास ठाकरे, सुनील केदार, अमीन पटेल, वि.स.स. यांचा, दुसरा प्रस्ताव श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा व तिसरा प्रस्ताव श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्याचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल आत सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरूवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.विजय वडेट्टीवार (विरोधी पक्षनेता) (२) श्री.नाना पटोले

(३) श्री.पृथ्वीराज चव्हाण (४) श्री.रविंद्र वायकर

उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी उपरोक्त विधयकाच्या संदर्भातील माहिती सभागृहास दिली.

विधेयक विचार घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५४ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक,२०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री अस्लम शेख, सुभाष धोटे, विकास ठाकरे, सुनील केदार, अमीन पटेल, यांचा पहिला प्रस्ताव. दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.मोहनराव हंबर्डे यांचा. तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्याचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल आत सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरूवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री.प्राजक्त तनपुरे (२) श्री.पृथ्वीराज चव्हाण

(३) श्री. राजेश टोपे

(चर्चा अपूर्ण..)

सर्वश्री सुनिल केदार व इतर वि.स.स. यांनी, "सोलर इंडस्ट्रीज, नागपूर येथे झालेला अपघात" इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेस अनुलक्षून माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "अमरावतीमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा सापडणे" या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या माहितीच्या मुद्यास अनुलक्षून माननीय उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी निवेदन केले.

(२) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "जालन्यामध्ये गजानन तौर या इसमावर झालेला गोळीबार" या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या माहितीच्या मुद्यास अनुलक्षून उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांनी निवेदन केले.

(२) सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५४ -महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक,२०२३ या विधेयकावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

| | |
|---|---|
| (४) श्री. रविंद्र वायकर | (५) श्री. सुनिल राणे |
| (६) ॲड.पराग अळवणी | (७) प्रा.(श्रीमती) वर्षा गायकवाड |
| (८) श्री.ज्ञानराज चौगुले | (९) श्री.शेखर निकम |
| (१०) श्री. मिहिर कोटेचा | (११) डॉ. विश्वजीत कदम |
| (१२) श्री.अभिमन्यू पवार | |

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) संसदीय कार्य मंत्री यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५६ - जी. एच. रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ, पुणे, विधेयक,२०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री, अस्लम शेख, सुभाष धोटे, विकास ठाकरे, सुनील केदार, अमीन पटेल, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव. श्री.मोहनराव हंबर्डे वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव. श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्याचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल आत सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरूवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(४) संसदीय कार्य मंत्री यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - जी. एच. रायसोनी कौशल्य तंत्र विद्यापीठ, नागपूर, विधेयक,२०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री, अस्लम शेख, सुभाष धोटे, विकास ठाकरे, सुनील केदार, अमीन पटेल, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव आहे. श्री.मोहनराव हंबर्डे वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्याचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल आत सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरूवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री सुनिल केदार वि.स.स. यांनी, "श्रीमती साधना संजय जराते, रा. कारवाफा, ता.धानोरा, जि.गडचिरोली या महिलेचा कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर ४८ तासात मृत्यू होणे" इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेस अनुलक्षून माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांनी निवेदन केले.

श्री. प्राजक्त तनपुरे वि.स.स. यांनी, आवाजी मताने विधेयक संमत करताना जर आम्ही मागणी केली असेल तर आपल्याला पोल घ्यावा लागतो. याबाबत नेमका काय नियम आहे, त्याबद्दल आपण आम्हाला मार्गदर्शन करावे, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

"राज्यातील वाढती महागाई, बेरोजगारी, गुन्हेगारी, परिणामी निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती, प्रदूषण, मुंबईच्या विविध समस्या याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना" इ. बाबत दिलेला प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री. नाना पटोले
(२) श्री. प्रताप अडसड
(३) श्री.अनिल देशमुख
(४) श्री.सुनिल प्रभू
(५) श्रीमती गिता जैन
(६) श्री. राजेश एकडे
(७)डॉ. देवराव होळी
(८) श्री. प्राजक्त तनपुरे
(९) श्रीमती ऋतुजा लटके
(१०) श्रीमती यामिनी जाधव
(११) श्री. कालीदास कोळंबकर
(१२) श्री. देवेंद्र भुयारी
(१३) श्री.हिरामन खोसकर
(१४) श्री. नामदेव ससाणे
(१५) श्री. अभिमन्यू पवार
(१६) श्री. मिहिर कोटेचा
(१७) ॲड. आकाश फुंडकर
(१८) श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे
(१९) श्री. कृष्णा गजबे
(२०) श्री. राजू पारवे
(२१) श्री. सुनिल राणे
(२२) श्री. रमेश कोरगावकर
(२३) श्री. सहसराम कोरोटे
(२४) श्री.जितेश अंतापूरकर
(२५) श्री. अशुतोष काळे
(२६) श्री. विनोद अग्रवाल
(२७) श्री. सुनिल भुसारा

प्रस्तावावरील चर्चा संपली असल्याचे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

**मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३**

(१) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"अकोले (जि.अहमदनगर) मतदारसंघातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्राम सडक योजना मधील घेतलेल्या कामात ठेकेदाराकडून होत असलेली दिरंगाई, साईट पट्टी शिवाय काम, देखभाल दुरुस्ती यामध्ये होत असलेली टाळाटाळ, अपूर्ण

कामाची पूर्ण देयके काढण्यात येणे, खड्डे न बुजवता देयके घेण्यात येणे, मंजूर रस्ते पूर्ण न करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याप्रकरणी सबंधित अधिकारी व ठेकेदारांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

तालिका सभाध्यक्षांनी, लक्षवेधी सूचना क्र. १,२,३,४, ७,८ व १० या पुढे ढकलण्यात आल्या असल्याचे सांगितले.

(२) सर्वश्री. अमिन पटेल, बाळासाहेब थोरात, अस्लम शेख, झीशान सिद्दिकी, प्रा. वर्षा गायकवाड, श्री.नानाभाऊ पटोले, श्रीमती सुलभा खोडके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. संग्राम थोपटे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना -

श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"मुंबई मधील डोंगरी विभागात इमारत क्र. ६ -६ए, नवरोजी हिल रोड क्र. १, २४ डी नवरोजी हिल रोड क्रमांक ४ ही जुनी व जीर्ण इमारत असणे, या इमारतीची दुरुस्ती गत काही वर्षांपासून झालेली नसणे, या इमारतीमध्ये राहणाऱ्या सदनिकाधारकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, सदनिकाधारकांकडून या इमारतीची दुरुस्ती करण्याची वारंवार होत असलेली मागणी, इमारत दुरुस्तीसाठी म्हाडाकडे निधी उपलब्ध नसणे, सदनिकाधारकांनी याबाबत चौकशी केली असता कंत्राटदाराने म्हाडाकडे दुरुस्ती केल्याचे दाखवून पैसे घेतल्याचे सदनिकाधारकांच्या निदर्शनास येणे, याबाबत कंत्राटदाराकडे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याच्याकडून कोणतेही सहकार्य न मिळणे, असाच प्रकार इमामवाडा रोड येथील यास्मिन मंझील या इमारतीच्या बाबतीत घडणे, कंत्राटदाराकडून म्हाडाची फसवणूक करण्यात येणे, परिणामी या इमारतीमधील सदनिकाधारकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री. नानाभाऊ पटोले, बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्रीमती सुलभा खोडके, यासंबंधी सर्वश्री अमिन पटेल, बळवंत वानखडे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना -

श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"नवी मुंबईतील तळोजा, खांदेश्वर रेल्वे स्टेशन, मानसरोवर रेल्वे स्टेशन, खारघर रेल्वे स्टेशन, जुईनगर रेल्वे स्टेशन येथे सुरू असलेल्या बांधकामामुळे नवी मुंबईत धुळीचे साम्राज्य पसरणे, सदर बांधकामाच्या ठिकाणी प्रदुषणाचे कोणतेही नियम पाळले जात नसणे, शापूरजी पालनजी कंपनी कडून नियमांचे उल्लंघन होणे, या बांधकामांच्या ठिकाणी प्रदुषणाचे कोणतेही नियम पाळले जात नसणे, नवी मुंबईत प्रदूषण करण्याचे काम ज्या गृहसंकुलाचे सुरू असणे त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर वायु प्रदूषण होत असणे, बांधकामामुळे हवेमध्ये धुलीकणांचे प्रमाण प्रचंड वाढले असणे, परिणामी नागरिकांना विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना श्वसनाचे आजार मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येणे, आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उद्योग मंत्री, (श्री.एकनाथ शिंदे, माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून १२ मिनिटांनी सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री.नाना पटोले, वि.स.स. यांनी आज सकाळी विशेष बैठकीमध्ये त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांच्या अनुषंगाने अनुमतीने सभागृहापुढे स्पष्टीकरण दिले.

सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांना सभागृहाच्या वतीने आश्वासित करण्यात येते की, जर हेतुपुरस्सर कोणताही आरोप केला गेला असेल तर रेकॉर्ड तपासून ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

१. (१) पाच तारांकित प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोतरांच्या यादीतील सतरा प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. सहसचिवांनी, गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

३. उद्योग मंत्र्यांनी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवला.

४. आज प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचना दालनात नाकारलेल्या असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, राज्यातील ३२ जिल्ह्यातील सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांच्या विविध समस्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पंचायत समिती सदस्यांना मतदानाचा अधिकार देणेबाबतचा मुद्दा उपस्थित केला व त्याबाबत आपले म्हणणे मांडले.

श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांनी केंद्र सरकारकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळत असलेल्या पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीबाबत मुद्दा उपस्थित केला व त्याबाबत आपले म्हणणे मांडले.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनीही याबाबत आपले म्हणणे मांडले

श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी, "उबाठा सेनेच्या नेत्या श्रीमती सुषमा अंधारे यांनी त्यांना आलेल्या निनावी पत्राच्या आधारे पुणे येथे श्रीमती देवयानी फरांदे यांच्या विरोधात पत्रकार परिषद घेणे " इ. बाबत विशेषाधिकारभंगाची सूचना दिली देऊन त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडले.

सदरहू हक्कभंगाचा प्रस्ताव तपासून पाहण्यात येईल, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

५. (१) श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांनी, 'मुंबई शहरातील मालाड येथील गायकवाड नगर येथील म्हाडा कॉलनीत ५०-५० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या लोकांना घराबाहेर काढण्याचे षडयंत्र सुरू असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय अध्यक्षांनी, आज एकूण ४ हक्कभंगाच्या सूचना सादर करण्यात आलेल्या असून त्यावर उचित निर्णय घेतल्यानंतर सन्माननीय सदस्यांना तो प्रस्ताव सभागृहामध्ये मांडण्यासाठी परवानगी दिली जाईल, असे सांगितले.

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी, 'बेलापूर महामार्गावर महापालिकेकडे जाण्यासाठी underground bridge उभारून तेथे सतत होणारे अपघात टाळता येणे ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. नारायण कुचे, वि.स.स. यांनी, 'राज्यातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचा गेल्या दहा-पंधरा दिवसांपासून संप सुरू असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, ‘ पुणे जिल्ह्यातील जनरल मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतील १ हजार ११९ कामगार हे गेल्या १४ वर्षांपासून कायमस्वरुपी असलेल्या कामगारांना या कंपनीने दबावतंत्राचा वापर करून सेपरेशन पॅकेज न देता कामगारांना बेकायदेशीरपणे कामावरून काढून टाकणे ’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

श्री.नाना पटोले, वि.स.स. यांनी, ‘विधानसभा सभागृहात कामकाजाचा भडीमार सुरू असल्यामुळे एकाही प्रश्नाला न्याय मिळत नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज अधिक दोन दिवस वाढवणे’ इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. राम कदम, वि.स.स. यांनी, ‘श्री. मनोजकुमार शर्मा, आय.पी.एस. अधिकारी यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडणे’ इ. बाबत मुद्दा मांडला.

श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनीही याबाबत आपले आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल हे स्वतः कामकाज सल्लागार समितीचे सदस्य असून आज ३.०० वाजता कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये त्यांनी हा विषय उपस्थित केल्यानंतर त्यावर निर्णय घ्यावा, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(४) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांनी, ‘अतिशय महत्त्वपूर्ण अशा पद्धतीच्या गावाच्या सेवा करणाऱ्या लोकांकडे कमालीचे दुर्लक्ष झाल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामपंचायत कर्मचारी संपावर जाणे तसेच शासकीय आकृतिबंधामध्ये एकूण अनुकंपाच्या बाबतीत १० टक्क्यानुसार त्यांना शासकीय सेवेत घेण्यासंबंधीचा जो निर्णय आहे तो खूप रेंगाळलेला असणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी, ‘मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असलेल्या घोडबंदर येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून न्यायालयाच्या इमारतीचे जवळपास सन २०१४ पासून सुरू असलेले काम अद्याप पूर्ण न होणे ’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांनी मतदारसंघातून जालना ते नांदेड हा समृद्धी महामार्गासाठी भूसंपादित केलेल्या जमिनीच्या बाबतीत शेतकऱ्यांना अतिशय चुकीच्या पद्धतीने मोबदला दिला जात असून कोरोना महामारीमुळे मागील दोन वर्षे जमिनीचे मूल्यांकन करण्यात आलेले नसणे ’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, कामकाजपत्रिकेमध्ये त्यांच्या एकाही लक्षवेधी सूचनेचा समावेश नसल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू मुद्याबाबत चौकशी करण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांनी, गेल्या २ वर्षात माननीय अध्यक्षांनी जे काही आदेश दिले आहेत ते अधिकारी गांभीर्याने घेत नसून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

या संबंधी योग्य ती कारवाई केली जाईल असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

तसेच गेल्या ६ अधिवेशनांमध्ये संबंधित निदेशांच्या संबंधी काय कार्यवाही झालेली आहे, या संबंधीचा अहवाल सदना समोर मांडण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(७) श्री. अनिल देशमुख, वि.स.स. यांनी, 'राज्यातील रिमांड होममध्ये १८ वर्षांवरील बेवारस, अनाथ व दिव्यांग मुले मुली यांना बाहेर न काढता त्यांना तेथेच राहू देणे तसेच राज्य शासनाने ओबीसीच्या कमी घरकुलांचा जो लक्षांक दिला आहे तो वाढवून देणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. चिमणराव पाटील, वि.स.स. यांनी, 'राज्य शासनाने एनडीआरएफच्या निकषानुसार महाराष्ट्रात जाहीर केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त उर्वरित तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर न केल्यामुळे तेथील मंडळांचा दुष्काळ सदृश तालुक्यात समावेश करणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) कॅ. तमिल सेल्वन, वि.स.स. ( प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे भाषण प्रलंबित) .

(१०) श्री. सुनील शेळके, वि.स.स. यांनी, 'तळेगाव दाभाडे या शहरात प्रधानमंत्री आवास योजनेत सन २०१९ ते २०२१ या काळात सदनिकांची लॉटरी पद्धतीने सोडत काढण्यात आलेल्या अल्प उत्पन्न व अल्प भू-धारकांना त्यांच्या हक्काचे घर तत्काळ मिळावे ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांनी, 'राळेगाव मतदारसंघात जुलै, २०२३ च्या दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकाचे अतोनात नुकसान झाल्यानंतर वैयक्तिक तक्रार नोंदवलेल्या शेतकऱ्यांना त्यांचे पीक विमा मंजूर असून ज्यांनी तक्रारी नोंद केलेल्या नाहीत त्यांना अद्यापपर्यंत पीक विमा मिळालेला नसणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्र शासनाने कर्मवीर कन्नमवार साहेब, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची शासकीय / निमशासकीय कार्यालयामध्ये जयंती व पुण्यतिथी साजरी करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( १३ ) श्रीमती गीता जैन, वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्रातील स्वतःचे घर नसलेल्या कित्येक व्यक्ती अकरा महिने भाडेतत्त्वावर राहत असून त्यांना महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान योजना, अशा योजनांचा लाभ देणे किंवा फ्री अन्न देणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( १४ ) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्र राज्य वीज लाईन स्टाफ बचाव कृती समितीने हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान न्याय्य मागण्यांकरिता आंदोलन सुरू करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( १५ ) श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. यांनी, 'राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या तसेच आशा वर्कर यांना शासकीय कर्मचारी घोषित करून वेतनश्रेणी, ग्रॅच्युईटी, भविष्य निर्वाह निधी देणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( १६ ) श्री. सुरेश भोळे, वि.स.स. यांनी, 'जळगाव जिल्ह्यात जवळ जवळ ५१९ पतसंस्थांपैकी कमीत कमी १३६ पतसंस्था अडचणीत आलेल्या असून त्यात २६५०१ लोकांचे पैसे त्या पतसंस्थेत अडकले असणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( १७ ) श्रीमती ऋजुता लटके, वि.स.स. यांनी, 'घरेलू कामगार व त्यांच्या संघटनांनी संपूर्ण राज्यात मोर्चा काढलेला असून घरेलू कामगारांना श्रमिक म्हणून दर्जा देणे व शासनाचे सर्व लाभ देणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( १८ ) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी, 'मुंबईतील काळाचौकी येथील अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले असणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( १९ ) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, 'मुंबई व मुंबई उपनगरात ४४ कोळीवाडे व एकूण ६० कोळीवाडे असून सदर कोळीवाड्यांचे सीमांकन करण्याचे काम अद्यापपर्यंत प्रलंबित असून ते काही ठिकाणी सुरू व काही ठिकाणी बंद असणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २० ) श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स. यांनी, 'पोलीस पाटील, ग्रामपंचायत संगणक परिचालक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, गट प्रवर्तक, शिक्षक व कर्मचारी यांना जुनी पेन्शन देण्याबाबत असंघटीत कामगारांनी मागण्या करणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २१ ) श्री. चंद्रकांत निंबा पाटील, वि.स.स. यांनी, 'जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी पीक विमा नाकारल्यामुळे केळी उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात सापडणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री.अमिन पटेल, वि.स.स. ( प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे भाषणातील मजकूर उपलब्ध नाही) .

(२३) ॲड. राहुल ढिकले, वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्रात धार्मिक तणावाच्या घटना समोर येत असताना दिनांक ११/०६/२०२३ रोजी व त्या सुमारास मालेगाव येथे अंदाजे ११:०० वाजेपासून ते दुपारी ०१:०० पर्यंत मालेगाव येथील एम.एस.जी कॉलेज, कॉन्फरन्स हॉल, कॅम्प रोड येथे हिंदू मुलांचा धर्मांतराचा प्रकार उघडकीस आलेला असणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२४) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, 'लातूर जिल्ह्यातील औसा व निलंगा तालुक्यातील पूर्णतः भूकंपग्रस्तांचे व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांना कायमस्वरूपी बारमाही रोजगार उपलब्ध करून देण्याची गरज असणे .' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२५) श्री. राजेश पाटील, वि.स.स. यांनी, 'राज्यातील अंगणवाडी शिक्षिका व ग्रामपंचायतीतील संगणक परिचालक मागील १२ वर्षांपासून तुटपुंज्या मानधनावर काम करीत असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२६) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांनी, 'दिनांक ६ डिसेंबर, २०२३ रोजी गुंडापुरी, ता. भामरागड, जि. गडचिरोली येथे एक तांत्रिक, त्याची पत्नी व १० वर्षाच्या मुलीचा अंधश्रद्धा, मांत्रिक, तांत्रिक यामुळे तिहेरी खून करण्यात येणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२७) श्री. नारायण कुचे, वि.स.स. यांनी, 'केंद्र शासनाच्या नीती आयोगाच्या मानव विकास निर्देशांकानुसार कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या महाराष्ट्र राज्यामधील जालना जिल्ह्यातील बदनापूर आणि परतूर या दोन तालुक्यांच्या विकासासाठी शासनाने ताबडतोब निधी उपलब्ध करून देणे ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२८) श्री. राजेश टोपे, वि.स.स. यांनी, 'मराठवाड्यातील जंगल/वन जमिनींमधील वानर व माकडांसह सर्वच वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागणे तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या डॉक्टरांचे हल्ल्यापासून संरक्षण करणाऱ्या कायद्याची राज्यामध्ये प्रभावी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२९) कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. यांनी, 'सोलापूर महानगरपालिकेमध्ये सन १९९५ नंतरचे २४९ रोजंदारी म्हणून कार्यरत असलेल्या सेवकांना सेवेत कायम करण्यासाठी सध्याचे मुख्यमंत्री व तत्कालीन नगरविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५ जानेवारी, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत सदर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव सोलापूर महानगरपालिकेने शासनाला प्रस्ताव सादर केल्यानंतरही नगरविकास विभागाकडून यावर कोणतीही कार्यवाही न होणे तसेच मुंबईमध्ये

भारतीय युवा मोर्चाचे पदाधिकारी श्री. अश्वजीत गायकवाड यांनी एका महिलेला गाडीने फरफटत नेणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३०) श्री. सुनील टिंगरे, वि.स.स. यांनी, 'पुणे शहरातील पदपथावरील टपरी व्यवसाय, हातगाड्या, भाजीवाले यांच्या अतिअतिक्रमणमुळे नाईलाजास्तव पदपाथवर न चालता बऱ्याचशा नागरिकांना रोडवर चालावे लागल्याने वारंवार अपघात होणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

६. (१) ॲड. आशिष जैस्वाल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"नागपूर जिल्ह्यातील देवलापार येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित असून ७२ गावांचा समावेश असणे, शासनाने राज्यातील तालुक्यांच्या विभाजनाच्या अनुषंगाने नव्याने निकष ठरविण्यासाठी तालुका पुनर्रचना समिती स्थापन करणे, तालुका पुनर्रचना समितीला शासनाने वारंवार मुदतवाढ देणे, मात्र तालुका पुनर्रचना समितीने अद्याप निकष न ठरविणे, परिणामी देवलापार तालुका निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असताना विधानसभेचा ४ वर्षांचा कालावधी पूर्ण होऊनही याबाबत निर्णय न होणे, याबाबत वारंवार अनेक मागण्या करुनही त्या प्रलंबित असणे, वेगवेगळ्या समितींचा अहवाल येणार असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात येणे, या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, दुर्गम आदिवासी तालुक्यातील नागरिकांची वेगवेगळ्या कामांसाठी होणारी भटकंती व निर्माण होणारा त्रास, देवलापार येथे अप्पर तहसीलदार हे पद मंजूर करूनही नियमित तहसीलदार व इतर अधिकारी उपलब्ध नसणे, त्यामुळे आदिवासी नागरिकांमध्ये नैराश्याची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करण्याची आवश्यकता, त्यास होणारा विलंब, देवलापार तालुका निर्मितीबाबत नागरिकांकडून स्थानिक लोकप्रतिनिधीकडे वारंवार होणारी विचारणा, त्यामुळे देवलापार तालुका निर्मितीच्या प्रस्तावास मंजुरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"महाराष्ट्र जमीन महसूल नियम, २०१९ मध्ये भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनींना भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याकरिता दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी

अधिसूचना काढण्यात येणे, सदर भोगवटादार वर्ग रूपांतरित करण्याकरिता अधिसूचनेमध्ये २ वर्षांचा कालावधी देणे, सदर अधिसूचनेत रूपांतरित करण्याकरिता वर्गवारीनुसार बाजार मूल्याच्या १० ते १५ टक्के रक्कम आकारणे, या दोन वर्षांचा कालावधीमध्ये गृहनिर्माण संस्थांकडून हस्तांतरण करीता अर्ज सादर न होणे, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी सदर अधिसूचनेचा कालावधी संपुष्टात येणे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिनांक ७ मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणे, हस्तांतरण प्रक्रियेकरिता सदस्य हस्तांतर होणे आवश्यक असणे, सदस्य हस्तांतरणाचा कालावधी अधिक असणे, जिल्हाधिकारी कार्यालाकडून सामान्य रहिवाशांना याप्रकरणी नाहक वेळ काढूपणा केल्याचे दिसून येणे, यामुळे फ्री होल्ड प्रक्रिया देखील मंद गतीने चालणे,जीर्ण झालेल्या इमारतीच्या गृहनिर्माण संस्थांना १० ते १५% ऐवजी २.५% बाजार मूल्याचे शुल्क आकारण्यात यावे अशी नागरिकांची वारंवार मागणी होणे, पावसाळी अधिवेशनात मा.अध्यक्ष्य महोदय यांच्यासमवेत बैठक होऊनसुद्धा अद्याप याप्रकरणी निर्णय न होणे, धोरणात त्रुटी असल्याकारणाने पुनर्विकास होत नसल्याने जीर्ण असलेल्या इमारतींमध्ये जेष्ठ नागरिकांना राहावे लागणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) डॉ. राजेन्द्र शिंगणे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" साखरखेर्डा( जि. बुलढाणा ) या गावाच्या ठिकाणी मोठी बाजारपेठ असून मध्यवर्ती ठिकाण असणे, शेतमाल व दैंनदिन जीवनात लागणाऱ्या सर्व वस्तु खरेदी करण्यासाठी २६ खेड्यांतील ग्रामस्थ या ठिकाणी येत असणे, सदर गाव प्रमुख रस्त्यांना जोडण्यात आलेले असल्यामुळे याठिकाणी सर्वच सोयीसुविधा उपलब्ध असणे, सदर गाव तालुक्याचे ठिकाण म्हणून घोषित करण्याची मागणी तेथील नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे करुनसुध्दा त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, साखरखेर्डा हे गाव तालुक्याचे ठिकाण म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी, 'साकीनाका पोलीस स्टेशन मुंबई या परिसरात बॉम्बे केमिकल कंपनी, पहिला माळा, श्रीनगर, साकीनाका या ठिकाणी सुरू असलेल्या हुक्काबारचा मालक श्री.

बिलाल शेख याने काल रात्री काही महिला त्या रस्त्यावरुन जात असताना गुंडाकडून त्या महिलांना धमकी देऊन एका महिलेला जखमी करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. महेन्द्र थोरवे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"रिलायन्स गॅस कंपनीने रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील नागोठाणेपासून कर्जत, खोपोली, खालापूर या तालुक्यातून गुजरात राज्यातील दहेज श्री.महेंद्र थोरवे...पर्यंत गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी जमिनी उपलब्ध करून दिलेल्या प्रकल्पबाधीत शेकडो शेतकऱ्यांना जमीन व पिकाची नुकसान भरपाई अद्यापपर्यंत दिली नसल्याची बाब दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, सन १९६२ च्या कायद्याप्रमाणे शेतजमीनी पुर्ववत करून देण्याची आवश्यकता असतांनाही संबंधित कंपनीकडून अद्यापर्यंत शेतजमीन पुर्ववत करून देण्यात आलेली नसणे, तसेच रिलायन्स गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अतिरिक्त रक्कम देतांना रेडिरेकनर सोडून धनाकर्षाप्रमाणे रक्कम देणे, सदरहू रिलायन्स गॅस कंपनीने जमीन व पिकाची नुकसान भरपाई देतांना कांही शेतकऱ्यांना ८० हजार रुपये प्रती गुंठा तर कांही शेतकऱ्यांना ५ ते ८ लाख रुपये प्रती गुंठा भाव देण्यात येणे, सदर कंपनीने नुकसान भरपाई देतांना भेदभाव करून चुकीचा भाव दिल्यामुळे या विरोधात शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन करून निषेध व्यक्त करणे, सदर प्रकरणी बैठक घेऊन निर्णय घेण्याचे शासनाने आश्वासन देऊनही अद्याप यावर कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याने सदरहू प्रकल्पबाधित शेतकऱ्यांवर झालेला अन्याय, यामुळे प्रकल्पबाधित शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. सुहास अण्णा कांदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"नाशिक जिल्ह्यातील व्यावसायिक श्री.अशोक कटारिया नामक व्यक्तीने शासनाची तसेच आर्थिक अडचणीत असलेल्या गोरगरीब शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी खरेदी करणे, ते स्वतः व त्यांचे कुटुंबीय आणि त्यांचे नातेवाईक मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ नुसार शेतकरी असल्याबाबतचा कोणताही सक्षम पुरावा नसणे, तसेच कलम ६३ नुसार सक्षम अधिकारी यांची परवानगी न घेणे, श्री.अशोक कटारिया यांच्या तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि नातेवाईकांच्या नावे नाशिक, इगतपुरी, त्र्यंबक, सिन्नर, निफाड

तसेच नाशिक जिल्ह्यात सर्वच तालुक्यात अनेक ठिकाणी शेतजमिनी खरेदी केल्याचे आढळून येणे, महसूल कलमात पात्र नसतानाही शासनाची फसवणूक केलेली असणे, शेत जमीन खरेदी करण्यास गैरमार्गाचा वापर करणे, महसूल अधिनियमात स्पष्ट तरतुदीनुसार मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८चे कलम ८४ नुसार मिळकतीचे हस्तांतरण किंवा हे विधिग्राह्य आहे असे समजून सदर जमिनीची कलम ८४ क नुसार सरकार जमा करून सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्यात शासनाला आलेले अपयश, शेकडो एकर जमिनी खरेदी करण्यासाठी महसूल प्रशासनातील अनेक अधिकाऱ्यांशी असलेले श्री.कटारिया यांचे असलेले हितसंबंध, अशा या भूमाफियांविरोधात नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, सदर भूमाफियाला मदत करणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्याविरोधात कोणतीही कठोर कारवाई शासन करीत नसल्याने शासनाविरोधात निर्माण झालेला तीव्र संताप व चीड, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"म्हारळ, कल्याण, ठाणे येथिल स.न. ४० ते ५८ मधील एकूण ८३ एकर ०९ गुंठे जमीन १९५० रोजी मूळ शेतकऱ्यांना पूर्ण मोबदला देउन रीतसर संपादन करण्यात येणे, त्यानंतर १९५५ ला शेतकरी यांनी एकत्र येउन म्हारळ सह सामुदायिक शेतीसंस्था स्थापन करून एक वर्षासाठी लिजवर कसण्यासाठी मागणे, जिल्हाधिकारी यानी संपादित केलेली जमीन ६२ एकर ०९ गुंठे व शासन मालकीची २१ एकर अशी ८३ एकर ०९ गुंठे जमीन संस्थेला एक वर्षासाठी लिजवर शेतीसाठी देण्यात येणे, परंतु जिल्हाधिकारी यांचे आदेशनुसार जमिनीवर अतिक्रमण ठरवुन जमीन खाली करण्याचे आदेश देण्यात आले, संस्थेने त.रा.मंत्री महसूल याचेकडे खोटे अपिल दाखल केले व संस्थेने सदरच्या ६२ एकर ०९ गुंठे जमिनीचा मोबदला न देता शेतकऱ्यांच्या संपादन केल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होणे, असा खोटा अर्ज केला व त.मा. राज्यमंत्री (महसूल) यांनी संपादनचे रेकॉर्डची शहानिशा न करता व संस्थेचे खोटे म्हणणे ग्राह्य धरुन दिनांक २३ फेब्रुवारी, १९९६ रोजीचा बनावट आदेशाने जमिनी कब्जेहक्कने संस्थेस परत केल्या व २१ एकर शासनाची जमीन शासनास परत करण्याचे आदेश काढणे, परंतु शासनाची २१ एकर जमीन देखील जिल्हाधिकारी यांनी फक्त कागदोपत्री जमा करणे, सदर २१ एकर जमीन बेकायदेशीरपणे विकासकाच्या ताब्यात असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. नरेन्द्र भोंडेकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"भंडारा जिल्ह्यात दिनांक २८ मे, २०२३ रोजी कोतवाल भरती प्रक्रिया जिल्हाधिकारी यांनी आपल्या मर्जीतील अधिकारी नेमणूक करून आयोजीत केली असणे, सदर भरती प्रक्रियेची लेखी परिक्षा सुरू असतांना जिल्हाधिकारी कार्यालयातील लिपिकाच्या भ्रमणध्वनीत लेखी परिक्षेसबंधी स्क्रीनशॉट दिसून येणे, सदर स्क्रीनशॉट हा लेखी परिक्षेच्या कालावधीतील असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येणे, त्याप्रकरणी भंडारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात येणे, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी निवास स्थान रोजंदारी काम करणाऱ्या मुलांना १०० पैकी १०० गुण मिळणे, त्यामुळे सदर घोळ हा जिल्हाधिकारी कार्यालयातून झाला असणे, सदर प्रकरणी शासनाची व परिक्षेच्या उमेदवारंची फसवणूक करण्यात आली असणे, कोतवाल भरती लेखी परिक्षेकरिता मोठ्या प्रमाणात पैशाचा गैरव्यवहार झाल्याचे उघड होणे, सदर परिक्षा रद्द करण्यात आलेली असणे, यामुळे परिक्षेकरिता तयारी करणाऱ्या सक्षम उमेदवारांची घोर निराशा होणे, सदर प्रकरणात ३ आरोपींवर गुन्हा नोंद होणे परिणामी या सर्व प्रकरणात सहभागी वरिष्ठ अधिकारी अजून पर्यंत मोकळे असणे, याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाही बाबत लोकांना शंका निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात जनआंदोलन होण्याची शक्यता निर्माण होणे, परिणामी या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची तसेच रद्द झालेली परिक्षा सत्वर घेण्याची युवकांची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) सर्वश्री. संजय केळकर, किसन कथोरे, ॲड. आशिष शेलार, श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना -

श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"ठाणे महापालिका क्षेत्रातील मौजे माजिवडा येथील नाल्याचा काही भाग बुजवून कोणताही नकाशा मंजूर न करता तसेच बाळकुम पाडा नं.१ दादलानी पार्क रोड येथे महापालिकेची परवानगी न घेता अनधिकृतपणे तळ अधिक आठ मजल्याची अनधिकृत बांधकाम उभे राहणे, तसेच बाळकुम पाडा नं २ शासकीय भूखंडावर अतिक्रमण करून बेकायदेशीर बांधकाम सुरू असल्याची

तक्रार दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ रोजी करण्यात आली असूनही कोणतीच कारवाई न होणे, सदर अनधिकृत बांधकामे राजरोसपणे उभी रहात असताना व याबाबत सबंधित प्रशासनाच्या निदर्शनास आणून देखील प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करणे, परिणामी, शहरांमध्ये अनधिकृत बांधकामाची पेव फुटणे, त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी ही बाब निदर्शनास आणूनही अद्याप अनधिकृत बांधकामावर कोणतीही कारवाई न होणे, ही गंभीर बाब असून यामध्ये ठेकेदार व अधिकारी यांच्या संगनमताने होत असल्याची नागरिकांची तक्रार असणे, या प्रकरणी चौकशी करून दोषी व्यक्तींविरुध्द दंडात्मक कारवाई करून उभारण्यात आलेले अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्र्यांनी, मुख्यमंत्री यांच्याकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. भीमराव तापकीर, वि.स.स. यांनी त्यांच्या लक्षवेधी सूचनेच्या मूळ प्रारूपात बदल केल्याचे सांगितले.

सदरहू लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माननीय अध्यक्ष यांच्यासमोर निर्णय घेण्यात येईल, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(९) श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“राज्यातील महानगरपालिकांच्या हद्दीमध्ये वाढ झाल्यामुळे नव्याने अनेक गावे समाविष्ट झालेली असणे, या गावांमधील आधीच अस्तित्वात असलेली अनुदानित/विनाअनुदानित, स्वयं अर्थसहाय्यित शाळा/महाविद्यालये मनपा हद्दीत समाविष्ट होणे, या शाळा/महाविद्यालयांच्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या, ग्रामपंचायत किंवा तत्सम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काळापासूनच्या इमारतीत, प्रत्यक्षात ३५/४० वर्षांपासून शिक्षण खात्याच्या रीतसर परवानगीने शाळा सुरू असणे, आता मनपा क्षेत्रामध्ये समाविष्ट झाल्याने दर्जावाढ किंवा त्याच इमारतींमध्ये/प्रांगणात स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर मराठी / इंग्रजी माध्यमाचे अभ्यासक्रम नव्याने सुरू करणे अथवा प्राथमिक ते माध्यमिक दर्जावाढीसाठी, इयत्ता नववी ते बारावीच्या तुकड्या सुरू करण्यासाठी मान्यता घेणे इत्यादी कामांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार परवानगी घेण्याच्या कामी पूर्वीच्या पक्क्या इमारतींसाठी सुद्धा मनपा बांधकाम नियमानुसार नव्याने बांधकाम परवाना व पूर्णत्वाचा दाखला इत्यादी दाखले मागणी, परवानग्या दीर्घकाळ प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्य महागड्या खाजगी शाळांमधून शिक्षण घेण्याची आलेली वेळ, त्यामुळे त्यांचे मोठ्या

प्रमाणावर होत असलेले शैक्षणिक/आर्थिक नुकसान, परिणामी होत असलेली हालअपेष्टा, आधीपासून अस्तित्वात असलेल्या, रीतसर सुरू असलेल्या, मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या पूर्वीच्या ग्रामपंचायत हद्दीतील शाळांना दर्जावाढ, तुकडीवाढ, इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करणे इत्यादींसाठी परवानग्या देताना बांधकाम विषयक आणि अन्य जाचक अटी काढून सरसकट परवानग्या देण्यासाठी सर्वसमावेशक धोरण आखून सत्वर अमलात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी, मुख्यमंत्री यांच्याकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) डॉ. विनय कोरे, श्री.मानसिंग नाईक वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना -

डॉ. विनय कोरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"शितुर वारून (ता. शाहुवाडी, कोल्हापूर) पैकी तळीचा धनगरवाडा येथे दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शाळकरी मुलीचा बळी घेतल्याची घटना समोर आली असणे, सहा महिन्यात बिबट्याने दोन वेळा हल्ला केला असून हल्ले थांबत नाहीत, तसेच यापूर्वी व आता हल्ला केलेला बिबट्या वन खात्याला अद्याप सापडला नसणे, तसेच त्याला पकडण्यात अपयश येणे तरी अगदीच सीमेजवळ ज्या धनगरवाड्या आहेत आणि जर त्यांची तयारी पुनर्वसित व्हायची असेल तर वन जमिनी ज्या वनखात्याच्या जमिनीच्या वनापासून लांब आहेत व नागरी वस्तीच्या जवळ आहेत अशा वन जमिनीमध्ये त्यांचे पुनर्वसनाकरिता जमीन उपलब्ध करून त्या जमिनी वन खात्याकडे वर्ग करण्याची आवश्यकता, लोकांचा जीव वाचवणे, त्यांना मूळ सेवा-सुविधा देतानाच वन खात्यामुळे येणाऱ्या अडचणीतून मुक्त करणे, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) श्री. मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोअर परेल यांची वापरात असलेली इमारत मोडकळीस आल्याने तसेच जागा अपुरी पडत असल्याकारणाने जागा नवीन जागा ११६ बी, आर.बी. चांदोरकर मार्ग, आगरी पाडा, मुंबई-११ येथे देण्याचे शासन निर्णयाद्वारे ठरणे, परंतु त्यास तत्कालीन

शासनाने कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात न येणे, आणि सन २०२० मध्ये मंजूर झालेल्या डीपी २०३४ मध्ये हे आरक्षण बदलून इतर शिक्षण असे करण्यात येणे, तसेच सदरील मक्त्याने दिलेल्या भूभागाचे संपूर्ण विहित भुई भाडे शासनाकडून महानगरपालिकेला अद्याप प्राप्त झालेले नाही अशा रूपाचे कारण दाखवून ती जागा परत घेण्याचा निर्णय घेण्यात ठराव करण्यात येणे, तसेच सदरील भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून काढून घेऊन त्या जागेवर उर्दू लर्निंग सेंटर उर्दू भवन उभारण्याचा निर्णय परस्पर घेण्यात येणे, तसेच तीन महिन्यांचे आतच म्हणजे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये साडेबारा कोटी रुपयांचे उर्दू लर्निंग सेंटर उभारण्यासंदर्भातील निविदा ही मागविण्यात येणे, तसेच सदर निविदा मागवून प्रक्रिया राबवून सदर जागेवर उर्दू लर्निंग सेंटर संदर्भात बांधकाम सुरू करण्यात येणे, तसेच सर्व बैठका बी.एम सी ने कोरोनाकाळात घेणे, आणि याबाबतीत कोणत्याही बैठकीचे पुरावे नसणे किंवा इतिवृत्त नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी, मुख्यमंत्री यांच्याकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१२) श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. महेश (दादा) लांडगे वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना -

श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"पुणे जिल्ह्यातील भोसरी विधानसभा मतदार संघातील लोकसंख्या सुमारे १० लाखांच्या पुढे असून विविध कामे, रस्ते तसेच विविध प्रकल्प केवळ भूसंपादनामुळे प्रलंबित असून याबाबत जिल्हाधिकारी प्रशासनाकडे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडेही पाठपुरावा करुनही संबंधित विकासकामांचे भूसंपादन अभावी विकासकामांना दिरंगाई होत असणे, महानगरपालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयाचा अभाव असणे, नागरी प्रकल्प आणि पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करणे काळाची गरज असून भूसंपादन हा प्रमुख अडथळा ठरत असणे, आरक्षणांचा विकास करण्याशिवाय पर्याय नसणे, परिणामी निवासी क्षेत्र वाढत असणे, समाविष्ट गावांमधील अनेक रस्ते भूसंपादना अभावी प्रलंबित असल्याने त्यामुळे प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी महानगरपालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन, नगरविकास विभाग यांचा समन्वय दिसत नसणे, तसेच निधी अभावी भूसंपादन प्रक्रिया रखडलेली असणे, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी, मुख्यमंत्री यांच्याकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**७.** ‘राज्यातील वाढती महागाई, बेरोजगारी, गुन्हेगारी, परिणामी निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती, प्रदूषण, मुंबईच्या विविध समस्या याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना’, या विषयावर सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुरेश वरपुडकर, अमीन पटेल, सुनिल प्रभू, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) , कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री रविंद्र वायकर, भास्कर जाधव, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अमित देशमुख, पी.एन. (सडोलीकर) पाटील, शिरीषकुमार नाईक, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री राजेश एकडे, संजय जगताप, बळवंत वानखडे, विक्रमसिंह सावंत, राजू पारवे, राजू आवळे, रोहित पवार, मोहनराव हंबर्डे, बाळासाहेब पाटील, राजेश टोपे, कुणाल पाटील, सुनिल राऊत, धीरज देशमुख, सुभाष धोटे, रणजित कांबळे, शिरीष चौधरी, राजन साळवी, शंकरराव गडाख, ऋतुराज पाटील, श्रीमती प्रतिभा धानोरकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री सहसराम कोरोटे, वैभव नाईक, सुनिल भुसारा, संदिप क्षीरसागर, कैलास गौरंट्याल, मानसिंग नाईक, श्रीमती सुमन पाटील, ॲड. अशोक पवार, सर्वश्री हिरामण खोसकर, प्राजक्त तनपुरे, अस्लम शेख, झिशान सिध्दीकी, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, माधवराव जवळगावकर-पाटील, लहु कानडे, संग्राम थोपटे, रविंद्र धंगेकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव-

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेता (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

(१३ ) सर्वश्री. ज्ञानराज चौगुले, अभिमन्यू पवार, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना -

श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“सन १९९३ मध्ये झालेल्या भूकंपात लातूर धाराशीव जिल्ह्यात प्रचंड जीवित व वित्त हानी झाली असणे, सदरील भूकंपातील जमीनदोस्त ५२ गावांचे पुनर्वसन आणि बाधित ब व क वर्गवारीच्या गावाच्या घरांच्या दुरुस्तीसाठी अनुदान दिले असणे, भूकंप बधितांच्या घरांच्या हस्तांतरणाचे निर्बंध उठवणे, किल्लारी येथील ८ व ९ व्या फेरीचे घर वाटप करणे, कारला कुमठा या गावांचे पुनर्वसन करणे, दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ चा भूकंपग्रस्तासाठीचा अन्यायकारक आदेश रद्द करणे, पुनर्वसित गावातील अंतर्गत अंतर्गत रस्ते व नाली बांधकाम आदि मूलभूत सुविधासाठी आवश्यक निधीची तरतूद करणे, मौजे सारणी सह ब व क वर्गवारीच्या गावातील

२०११ पूर्वीची शासकीय व खाजगी जमिनीतील घरे नियमित करणे, कोयना भूकंप पुनर्वसन समितीत भूकंपग्रस्त औसा, उमरगा, लोहारा, निलंगा या चार तालुक्याचा समावेश करणे, सन १९९३ मधील व तदनंतरच्या भूकंपग्रस्त नागरिकांसाठी असलेल्या शासकीय नौकरीच्या आरक्षणात दिनांक १८ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार १९६७ साली झालेल्या भूकंपाचा समावेश केल्याने भूकंपग्रस्त किल्लारी व परिसरातील नागरिकावर अन्यायाची भावना निर्माण होणे, सदरील अन्यायकारक निर्णय रद्द करणे आदि वरील सर्व विषयांबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत मा.उपसभापती यांनी शासनास निर्देश देणे, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, मुख्यमंत्री यांच्याकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

८. 'मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे व कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका' या विषयावर ॲड. आशिष शेलार, श्री. भरतशेट गोगावले, डॉ.राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, ॲड. माणिकराव कोकाटे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री संजय शिरसाट, किशोर पाटील, अतुल बेनके, नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, सर्वश्री सुनिल शेळके, रणधीर सावरकर, प्रकाश आबिटकर, चेतन तुपे, बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री प्रकाश सोळंके, संतोष दानवे, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री बाळासाहेब आजबे, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, यशवंत माने, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री रमेश बोरनारे, दिपक चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, दौलत दरोडा, संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिभाऊ बागडे, चंद्रकांत पाटील, बाबासाहेब पाटील, बच्चू कडू, जयकुमार गोरे, दिलीप लांडे, भिमराव तापकीर, योगेश कदम, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री.राजेश पवार, ॲड.आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिध्दार्थ शिरोळे, राम कदम, मंगेश चव्हाण, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड. लक्ष्मण पवार, सौ. सीमा हिरे, सर्वश्री राम सातपुते, जयकुमार रावल, डॉ. संजय कुटे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, देवयानी फरांदे, सर्वश्री समाधान अवताडे, कालीदास कोळंबकर, ॲड. राहुल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स.यांचा प्रस्ताव-

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला .

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेस माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केलेला असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

९. (१) उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक ६०- महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) विधेयक, २०२३ विधेयक मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

१०. संसदीय कार्य मंत्र्यांनी, कामकाज सल्लागार समितीची बैठक आज मंगळवार दि. १९ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर केले व संमत करावे, असा प्रस्ताव मांडला.

(२) सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक ५८- महाराष्ट्र मराठी भाषा विद्यापीठ विधेयक, २०२३ विधेयक –

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी उपरोक्त विधेयक मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांचा पहिला प्रस्ताव , श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचा दुसरा प्रस्ताव , सर्वश्री अस्लम शेख, नाना पटोले, सुभाष धोटे, विकास ठाकरे, सुनील केदार, अमीन पटेल व संजय जगताप यांचा तिसरा प्रस्ताव, श्री.मोहनराव हंबर्डे यांचा चौथा प्रस्ताव , श्री.रविंद्र वायकर यांचा पाचवा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत कोणाही सदस्यांनी भाग घेतला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक ५९- महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विधेयक, २०२३ –

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी उपरोक्त विधेयक मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(ब) (१) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३ यावर विचार करण्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव-

कामगार मंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला :—

> ''सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३ यावर विचार करण्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानसभेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावी.''

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(ब) (२) १. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक,

२. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

३. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ - बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

४. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ - अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,

५. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ - महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, यावर विचार

करण्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव-

उद्योग मंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला :—

" १. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक,

२. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,

३. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ - बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

४. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ - अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

५. सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ - महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स) , वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, या पाचही विधेयकांवर विचार करण्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानसभेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावी.''

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

माननीय अध्यक्षांनी कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाच्या संमतीसाठी सादर करीत असल्याचे सांगितले.

प्रतिवृत्त संमत करण्याबाबतचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

११. सहसचिवांनी, विधान परिषदेकडून आलेला पुढील संदेश सभागृहास वाचून दाखविला :—

'कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानसभेच्या माहितीसाठी पाठविला आहे :—

सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ – स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२२ दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १४९ अन्वये महाराष्ट्र विधानपरिषदेत मागे घेण्यात आले आहे'.

'लक्षवेधी सूचना क्रमांक १० च्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांना आपली भूमिका आलेली नसल्याने सदर विषयाच्या संदर्भात माझ्या दालनात पुढील ३ आठवड्यांच्या आत बैठक बोलावून उक्त विषयाला न्याय देण्यात येईल' असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

१२. 'राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचार, चोरीचे गुन्हे, दलितांना अमानुष वागणूक, खंडणी व ऑनलाईन फसवणूक, सायबर क्राईममधील वाढ, केंद्र शासनाकडील प्रलंबित शक्ती कायदा, खाद्य पदार्थांमधील भेसळ, महामार्गावर होणारी आर्थिक लूट, अवैध वाहतूक, प्रदूषण, अनधिकृत लॉटरी, महिलांचे आरक्षण, अवैध बांधकामातील भ्रष्टाचार, आर्थिक नियोजनातील बेशिस्तपणा याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे' या विषयावर सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, भास्कर जाधव, नानाभाऊ पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. राजेश टोपे, अमित देशमुख, अस्लम शेख, अमीन पटेल, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री. सुनिल प्रभू, रविंद्र वायकर, राजन साळवी, प्रकाश फातर्पेकर, सुनिल राऊत, रमेश कोरगांवकर, रोहित पवार, राहुल पाटील, सुभाष धोटे, बाळासाहेब पाटील, संजय पोतनीस, सुरेश वरपुडकर, कैलास गोरंट्याल, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) , श्रीमती सुलभा खोडके, श्री राजेश एकडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर,सर्वश्री. बळवंत वानखडे, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, मोहनराव हंबर्डे, धीरज देशमुख, हिरामण खोसकर, रविंद्र धंगेकर, कैलास पाटील, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री. कुणाल पाटील, पी.एन. (सडोलीकर) पाटील, विनोद निकोले, सुनिल भुसारा, ॲड. अशोक पवार, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, अनिल देशमुख, प्राजक्त तनपुरे, संग्राम थोपटे, जितेश अंतापूरकर, नितीन देशमुख, उदयसिंग राजपूत, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. शिरीष चौधरी, अमित झनक, रणजित कांबळे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सुनिल केदार, विकास ठाकरे, राजू पारवे, सहसराम कोरोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, झिशान सिध्दीकी, लहु कानडे, ऋतुराज पाटील, श्रीमती जयश्री जाधव, श्री. राजू आवळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव-

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले :—

"राज्यात ढासळलेली कायदा सुव्यवस्था, ड्रग्ज, चरस, गांजा इत्यादी अंमली पदार्थांची अवैध मार्गाने सर्रासपणे सुरू असलेली विक्री, तसेच मेफेड्रॉन (एमडी) चे मोठ्या प्रमाणात सापडलेले अवैध साठे, महिलांवर होणारे अत्याचार, बलात्कार, विनयभंग, अपहरण तसेच

कौटुंबिक हिसांचारात झालेली वाढ, उप राजधानी नागपूरमध्ये अधिवेशन सुरू असताना कडेकोट सुरक्षा व्यवस्था असूनही ड्रग्जची खरेदी-विक्री सुरू असल्याचे निदर्शनास येणे, ३०० पेक्षा अधिक मुलींना फसवून व अमिष दाखवून पळवून नेल्याच्या घडलेल्या घटना, विविध पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकांकडून विनयभंगाच्या तक्रारी नोंदवून घेण्यास करण्यात येत असलेली टाळाटाळ, मुंबई पोलिसांच्या आकडेवारीनुसार मुंबईत महिला अत्याचाराच्या एकूण ४,४०३ गुन्ह्यांच्या घटना घडणे, विनयभंग व अश्लील वर्तनाच्या एकूण १,५७२ घटना नोंदविण्यात आल्या असून याच कालावधीत ४४२ बलात्काराच्या गुन्ह्याची नोंद होणे, नागपूर शहरातील गुन्ह्यांचा दर एन.सी.आर.बी.च्या आकडेवारीनुसार मुंबई व पुण्यापेक्षा अधिक असणे नागपुरातील चोरीचा दर राज्यात सर्वाधिक असून हे शहर देशात सहाव्या स्थानी असणे, नागपूर शहरातील सुरक्षित पार्किंगमधून देखील वाहने चोरीस जात असून यासंदर्भात दिवसाला चार-पाच गुन्ह्यांची नोंद होत असणे, बीड जिल्ह्यात अनुसूचित जमातीतील स्त्रीचा तिच्या कुटुंबीयांसमोर विनयभंग करण्यात येणे, नुकताच देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा झाला असताना अद्यापि दलित बांधव राज्यात असुरक्षित असून त्यांना मिळणारी अमानुष वागणूक तसेच त्यांना करण्यात आलेल्या मारहाणीत झालेले मृत्यू, राज्यात काही वर्षांपासून लैंगिक शोषणासारख्या सायबर गुन्ह्यांच्या प्रकरणांतही वाढ होत असून या गुन्ह्यांमध्ये उकल होण्याचे प्रमाण अत्यल्प असणे, लैंगिक शोषणासारख्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात खंडणी वसूल करण्याचे व ऑनलाईन फसवणूकीचे प्रकार वाढीस लागणे, मुंबईसह राज्यात अनधिकृतरित्या सुरू असलेल्या लॉटरीने धुमाकूळ घातला असून अनधिकृत मशीन्स अनेक छोट्या दुकानांमध्ये बसवून सर्वसामान्यांची व शासनाची करोडो रूपयांची होणारी फसवणूक, या लॉटरीमुळे अनेक नागरिकांचे संसार उद्ध्वस्त होणे, मुंबईतील फोर्ट परिसरात ऑनलाईन बनावट लॉटरीबाबत माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाण्यात अनेक गुन्ह्यांची नोंद असणे, तसेच मुंबईतील इतरही अनेक बेकायदेशीर ऑनलाईन लॉटरीविरूद्ध गुन्हे दाखल असूनही संबंधित पोलीस निरीक्षक कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असणे, सायबर क्राईमच्या माध्यमातून सर्वसामान्यांची होत असलेली लाखो रूपयांची फसवणूक, सायबर सुरक्षेसाठी क्षमतावाढ करण्याची गरज, ऑनलाईन गेम्सचा प्रसार करण्यासाठी हिंदी, मराठी चित्रपट कलाकारांसह क्रिकेटर जाहिरात करीत असल्याने याकडे तरूण आकर्षित होऊन आर्थिक अडचण, नैराश्य, शिक्षण व कुटुंबाकडे दुर्लक्ष, कर्जबाजारीपणा, निद्रानाश इत्यादी समस्या उध्दभवून पैसे हरल्याने अनेकांनी आत्महत्या करणे, राज्यात व केंद्रात सत्ता असतानाही विधीमंडळाने मंजूर केलेला आणि केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेला शक्ती कायदा मंजुरीच्या प्रतीक्षेत असणे, महामार्ग पोलीस मदत केंद्र तपासणीच्या नावाखाली वाहनधारक व चालकांची करीत असलेली आर्थिक लूट, राज्यात चोरट्या मार्गाने अवैधपणे होणारी दारूची वाहतूक, अवैधमार्गाने सुरू असलेली दारूची विक्री तसेच या विभागात सुरू असलेला भ्रष्टाचार,

अन्न व औषध प्रशासन विभागाकडून औषधी कंपन्यांवर धाडी घालून कारवाई करण्याचा बनाव करण्यात येणे, पनीर, दूध, मावा, मिठाई इत्यादी खाद्यपदार्थांमधील भेसळ रोखण्यास आलेले अपयश, राज्यात बंदी असलेला गुटखा, सुगंधीत तंबाखू व तत्सम पदार्थांची परराज्यातून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या होणारी वाहतूक व त्यांची ठिकठिकाणी सर्रासपणे सुरू असलेली विक्री, मुंबई, पुणे, नागपूरसह इतर शहरांत निर्माण झालेले प्रदूषण कमी करण्यास शासनास आलेले अपयश, परिणामी लहान बालकांसह सर्वांनाच गंभीर स्वरूपाच्या आजारांनी ग्रासणे, विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणात महिलांना आरक्षण नसणे, शालेय शिक्षणाची झालेली दुरावस्था, सिंचनाच्या प्रलंबित योजना पूर्ण करून जलयुक्त शिवार योजना कमी पर्जन्यमान असलेल्या भागात प्राधान्याने राबविण्याची आवश्यकता, विविध महानगरपालिका हद्दीत विकासकांकडून करण्यात आलेले अवैध बांधकाम व त्यातून करण्यात आलेला भ्रष्टाचार, राज्याच्या आर्थिक नियोजनात वाढलेला बेशिस्तपणा, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व भूमिका."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री. अमित साटम (२) श्री.अनिल देशमुख

(३) श्री. रविंद्र वायकर (४) श्रीमती प्रतिभा धानोरकर

(चर्चा अपूर्ण)

(१) श्री. श्यामसुंदर शिंदे, वि.स.स. यांनी, 'मतदारसंघातील तालुक्यात लाल कंधारी जातीच्या गायींचे संवर्धन व संशोधन केंद्र सन १९८८ मध्ये मंजूर झालेले असून ते आता तेथून बीड येथे हलविण्याचा निर्णय झालेला असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(२) कॅप्टन आर.तमिल सेल्वन ( प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषणातील मजकूर उपलब्ध नाही.)

(३) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, 'राज्य शासन व केंद्र शासनाच्या एनपीएस धोरणामुळे सर्व कर्मचाऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

'राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचार, चोरीचे गुन्हे, दलितांना अमानुष वागणूक, खंडणी व ऑनलाईन फसवणूक, सायबर क्राईममधील वाढ, केंद्र शासनाकडील प्रलंबित

शक्ती कायदा, खाद्य पदार्थांमधील भेसळ, महामार्गावर होणारी आर्थिक लूट, अवैध वाहतूक, प्रदूषण, अनधिकृत लॉटरी, महिलांचे आरक्षण, अवैध बांधकामातील भ्रष्टाचार, आर्थिक नियोजनातील बेशिस्तपणा याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे ' या विषयावर सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, भास्कर जाधव, नानाभाऊ पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. राजेश टोपे, अमित देशमुख, अस्लम शेख, अमीन पटेल, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री. सुनिल प्रभू, रविंद्र वायकर, राजन साळवी, प्रकाश फातर्पेकर, सुनिल राऊत, रमेश कोरगांवकर, रोहित पवार, राहुल पाटील, सुभाष धोटे, बाळासाहेब पाटील, संजय पोतनीस, सुरेश वरपुडकर, कैलास गौरंट्याल, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती सुलभा खोडके, श्री राजेश एकडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर,सर्वश्री. बळवंत वानखडे, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, मोहनराव हंबर्डे, धीरज देशमुख, हिरामण खोसकर, रविंद्र धंगेकर, कैलास पाटील, श्रीमती ॠतुजा लटके, सर्वश्री. कुणाल पाटील, पी.एन. (सडोलीकर) पाटील, विनोद निकोले, सुनिल भुसारा, ॲड. अशोक पवार, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, अनिल देशमुख, प्राजक्त तनपुरे, संग्राम थोपटे, जितेश अंतापूरकर, नितीन देशमुख, उदयसिंग राजपूत, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. शिरीष चौधरी, अमित झनक, रणजित कांबळे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सुनिल केदार, विकास ठाकरे, राजू पारवे, सहसराम कोरोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, झिशान सिध्दीकी, लहु कानडे, ॠतुराज पाटील, श्रीमती जयश्री जाधव, श्री. राजू आवळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव-

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

| | |
|---|---|
| (५) श्री. सुनील राणे | (६) श्री. झिशान सिद्दिकी |
| (७) श्री. सुनील टिंगरे | (९) श्री. प्रकाश फातर्पेकर |
| (१०) श्री.अबु आजमी | (११) श्री.अमिन पटेल |
| (१२) श्रीमती मनिषा चौधरी | (१३) श्री. रोहित पवार |
| (१३) श्री. राम कदम | (१४) श्री. रमेश कोरगावकर |
| (१५) श्री. बळवंत वानखेडे | (१६) श्री. जयकुमार गोरे |
| (१७) श्री. सुनील भुसारा | (१८) श्री. सचिन कल्याणशेट्टी |
| (१९) श्री. विक्रमसिंह सावंत | (२०) श्री. कैलास पाटील (घाडगे) |

(२१) श्री. रविंद्र धंगेकर (२२) श्री. रमेश बोरनारे

(२३) श्री. वैभव नाईक (२४) ॲड. राहुल कुल

(चर्चा अपूर्ण)

**बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३**

(१) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"चंद्रपूर जिल्ह्यात चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अस्तित्वात असणे, सदर बँकेचे काही संचालक बँकेच्या पैशाचा अपव्यय करीत असणे, काही संचालकावर गुन्हे दाखल असणे, बँकेच्या संचालक मंडळाची मुदत समाप्त होऊन देखील शासनाने निवडणुका घेतल्या नसणे, बँकेच्या सी.ओ.वर देखील गंभीर गुन्हे दाखल असणे, बँकेतील संचालक अनेकवेळा चुकीचे निर्णय घेत असल्याचे निदर्शनास येत असणे, नोकर भरतीच्या नावावर काही संचालकांनी बेरोजगारांची दिशाभूल केलेली असणे, शेतकरी सन्मान निधीचा वापर काही संचालक आपल्या खाजगी संस्थेसाठी करीत असणे, अद्यापही शासनाने या बँकेवर प्रशासकाची नेमणुक केली नसणे, अनेक चुकीच्या कारणाने बँक चर्चेत असणे, या बँकेवर प्रशासकाची नेमणूक करण्याची शेतकऱ्यांकडून मागणी होत असणे याकरिता शासनाने त्वरित चौकशी करून करावयाची कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया."

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्य शासनाच्या ऊर्जा, सार्वजनिक-आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, ग्रामविकास, सामाजिक न्याय, उद्योग, कामगार, परिवहन, नगरविकास, महसूल, उच्च व तंत्रशिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत यासह सर्व अधिनस्त विभागामध्ये राज्यशासनाच्या पॅनेलवर असलेल्या व खुल्या निविदेत सहभागी झालेल्या ठेकेदार सदस्यांमार्फत हजारो कंत्राटी कर्मचारी कार्यरत असणे, परंतु यासर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामगार कायद्याप्रमाणे किमान-वेतन अधिनियम, १९४८, मुंबई कामगार कायद्याप्रमाणे किमान वेतन अधिनियम १९९३, राज्य कामगार विमा अधिनियम, १९४८, बोनस प्रदान अधिनियम १९६५, तोषदान प्रदान

अधिनियम १९७२, कंत्राटी कामगार (नियमन-व-निर्मूलन) अधिनियम १९७०, कामगार-भविष्य-निर्वाह-निधी अधिनियम १९५२, महाराष्ट्र-कामगार-किमान-घरभाडे-अधिनियम १९८३, यासह रजावेतन, सेवातर पर्यवेक्षकीय शुल्क, कामगारांच्या हिश्श्यापोटी मुळ पगार, विशेषभत्ता यामधून १.७५ टक्के, इ.एस.आय. नं १२ टक्के, भविष्यनिर्वाह निधी व उपरोक्त टक्केवारीनुसार मालकाचा हिस्सा ई.एम.आय. ४.७५ टक्के, भविष्यनिर्वाह निधी १३.६१ टक्के संबंधित कार्यालयांकडे भरणे बंधनकारक असताना असे न करणे, तसेच कामगारांचे नावे ई.पी. एफ. व ई.एस.आय. महामंडळाकडे स्वतंत्र कोड नंबर्स घेऊन त्या खात्यावर दरमहा वर्गणी (कामगार व मालक हिस्सा) जमा करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असणे, परंतु संबंधित ठेकेदार यांचेकडून याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसून कंत्राटी कामगारांची आर्थिक पिळवणूक करण्याचे काम करणे, यामुळे सर्वसामान्य कामगारांमध्ये शासनाविरोधी पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामगार कायद्याप्रमाणे सेवा-सुविधा देण्याबाबत प्राधान्याने करावयाची कार्यवाही व शासनाची याबाबतची प्रतिक्रिया."

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. भीमराव तापकीर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"पुणे, खडकवासला विधानसभा मतदारसंघात वाहतुकीची समस्या गंभीर असणे, स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्ग जलद गतीने सुरू करणे व त्यासाठी बालाजीनगर येथे स्थानक निर्माण करणे, खडकवासला ते खराडी या पुणे मेट्रो मार्गिकेचा डीपीआर तयार होत असताना या मार्गाचे शेवटचे स्थानक खडकवासला धरण पर्यंत वाढवणे, पौड फाटा ते माणिकबाग या मेट्रोच्या नव्या मार्गांच्या सर्वंकष प्रकल्प डीपीआर, भूसंपादनासाठी मंजुरी मिळाली असणे, हा प्रस्तावात कोथरूड, कर्वेनगर, वारजे आणि सिंहगड रस्ता भाग मेट्रोने जोडला जाणार असल्याने या मार्गातील वारजे ते पुढे प्रवाश्यांची संख्या व भागाची लोकसंख्या पाहता हा मार्ग शिवणे, उत्तमनगर, कोंढवे-धावडे, कोपरे पर्यन्त वाढवून तेथे नवीन स्थानक करण्याची आवश्यकता असणे, पालिकेत समाविष्ट झालेल्या गावातील मुख्य रस्त्यांची दुर्दशा झाली असणे, डीपी रस्ते ताब्यात घेण्यात आले नसणे, अनेक डीपी रस्ते अतिक्रमनांनी बाधित झाले असणे, शहरातील पर्यायी रस्त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष होत असणे, ताब्यात आलेल्या, ताब्यात येऊनसुद्धा विकसित झाले नसलेल्या रस्त्यांची माहिती वेळेत मिळत नसणे, डीपीचे रस्ते पूर्ण क्षमतेने विकसित करण्यास पथ विभागास अपयश आले असणे, सह पुणे-सातारा रस्त्यावरील फसलेला बिआरटी प्रकल्प, सनसिटी रोड ते ३०

मी. रुंद मुठा नदीवरचा पूल मधील त्रुटी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्यावरील शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४ ही सन्माननीय सदस्य डॉ. बालाजी किणीकर यांनी प्रदूषणाच्या संदर्भात दिली होती. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सर्व मुद्यांचे निराकरण केले जाईल, असे मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य यांना आश्वासित करून लक्षवेधी सूचना मागे घेण्याची विनंती केल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना मागे घेण्यात येत आहे, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(४) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राजपूत, राजपूत भामटा परदेशी राजपूत समुदाय मुळतः पर राज्यातून पिढ्यान पिढ्या भटकंतीने राज्यात स्थायिक झालेला असणे, सन १९४२ च्या रेजुलेशन प्रमाणे ओल्ड बॉम्बे स्टेट, तत्कालीन ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांना "इंटरमिजिएट" जात म्हणून मागासवर्गीय म्हणून समाविष्ट केलेले असणे, १८५७ च्या बंडा नंतर ब्रिटिशांनी या जातीला गुन्हेगारी जात म्हणून ओळख दिल्याने आणि इंग्रजांचा ससेमिरा पाठीशी लागल्याने या समुदायाची स्थिरता झालेली नसणे, त्यामुळे निरक्षरता, बेरोजगारीचे प्रमाण अधिक असणे, ब्रिटिशांच्या जाचांना सामोरे जावे लागत असल्याने सातत्याच्या भटकंतीने असुरक्षितता व गरिबीमध्ये प्रचंड वाढ होणे, तत्कालीन विपरीत परिस्थितीमुळे त्यांच्यात असलेली असुरक्षिततेची भावना बेफिकीर प्रवृत्ती गुन्हेगारीची पार्श्वभूमीमुळे झालेली मानसिक अवहेलना याचा सर्वांगीण विकासावर झालेला विपरीत परिणाम, जनजागृतीमुळे शिक्षणाचे प्रमाण वाढणे, परंतु सुशिक्षित बेरोजगारांमध्ये मोठ्या प्रमाणात या समुदायाची संख्या असणे, तसेच महिला वर्गामध्ये शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण, त्यामुळे अकुशलतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे बेरोजगारी वाढलेली असणे, पर्यायाने आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांमध्ये त्यांचे प्रमाण अधिक असणे, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे बाबत तत्वतः मान्य करण्यात आलेले आहे मात्र अद्याप त्याच्यावर कार्यवाही झालेली नसणे, यामुळे या समुदायात निर्माण होणारा तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. बच्चू कडू, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील अनाथ बालकांच्या कल्याणार्थ शासनाकडे प्रलंबित मागण्यांसंदर्भात राज्य शासनाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०२०, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२०, दिनांक १७ मार्च, २०२१, दिनांक १२ मे, २०२२ या दिनांकांना बैठकी होऊनही अद्यापपर्यंत अनाथांच्या मागण्या पूर्ण न होणे, सदर लोकपतिनिधींनी वारंवार पत्रव्यवहार करूनही शासनाकडून अनाथांच्या मागण्यांकडे होत असलेले दुर्लक्ष, राज्यातील अनाथ मुला-मुलींवर वयाची १८ वर्ष पूर्ण केल्यानंतर उपजिविकेचा, निवासाचा, सुरक्षेचा प्रश्न उभा राहत असून शासनाने या समस्येकडे अत्यंत गंभीरपणे आणि संवेदनशीलतेने लक्ष देण्याची गरज, राज्य शासनाच्या अनास्थेमुळे १८ वर्षावरील अनाथ मुला-मुलींमध्ये पसरलेली संतापाची आणि अस्वस्थतेची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महिला व बाल विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) ॲड. आकाश फुंडकर व श्री प्रताप अडसड, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यात जिल्हानिहाय अन्नधान्य वाहतूक कंत्राट निश्‍चितीसाठी, पुरवठा विभागाद्वारे मागील कंत्राटदाराना साखळी करून चढ्या दराने कंत्राट प्रदान करण्यासाठी प्रचलित शासन निर्णय दिनांक २० एप्रिल, २०१७ रद्द करून शासन निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी निर्गमित करणे, साखळीकरून निविदा सादर करण्यासाठी निविदाकारांच्या पात्रतेसाठी वाहनक्षमतेसंदर्भात ५.९ आणि ५.१७ अशी वेगवेगळी तरतूद करण्यात आली असणे, त्यानुसार शासन स्तरावर निविदा प्रक्रिया राबवून मागील कंत्राटदारानाच चढ्या दराने शासन स्तरावरून कंत्राटे प्रदान करण्यात येणे, निविदा प्राप्त झाल्यानंतर विशिष्ट निविदाकारांसाठी निविदेच्या अटी शर्ती मध्ये बदल/शिथिल करण्यात येणे, उदाहरणार्थ यवतमाळ जिल्ह्यातील मागील कंत्राटदार सिल्वर रोडलाइन्सने एकूण १० जिल्ह्यात निविदा सादर केल्या असणे, सदर निविदा प्रक्रियेअंती त्यांनी चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती जिल्ह्यासाठी सादर केलेल्या निविदा मंजूर करून कंत्राट प्रदान करण्यास शासन स्तरावरून मान्यता देण्यात येणे, सिल्वर रोडलाइन्स यांनी पात्रतेसाठी आवश्यक वाहन क्षमते बाबतची अट क्र ५.१७ नुसार ७ दिवसात जिल्हानिहाय आवश्यक वाहनक्षमतेची पूर्तता

केली किंवा नाही याबाबत खुलासा करण्याची आवश्यकता असणे, अधिकाऱ्यांच्या संगनमताने कंत्राटे मिळविणाऱ्या सिल्वर रोडलाइन्स आणि यासारख्या इतर निविदाकारांना प्रदान केलेले सर्व कंत्राटे रद्द करून त्यांना कायम स्वरूपी काळ्या यादीत टाकणे, सर्व दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करणे, संपूर्ण प्रक्रियेत शासनाचे कोट्यवधी रुपयांच्या झालेल्या नुकसानची वसूली आणि प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. बबनराव लोणीकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"शेगाव – पंढरपूर हा राष्टीय महामार्ग ४५० कि.मी. लांबीचा असून बुलढाणा जिल्ह्यातील लोणारपासून मंठा परतूर माजलगाव बीड सरहद्दी पर्यंत काम मेगा इंजीनिअर्स कंपनीने घेतलेले असणे, पुर्णा, कसुरा, गोदावरी, माजलगाव जवळील केसापूरी कॅम्प असे पाच पुलाचे काम केले नसणे, माजलगाव केसापुरी कँम्प १ कि.मी., गोदावरी नदीवळ २ कि.मी., आष्टी येथे ५०० मीटर, परतूर शहरात ५०० मीटर सिमेंट रस्त्याचे काम आजही कंपनीने पूर्ण केलेले नसणे, याबाबत अनेकदा जिल्हाधिकारी, जालना यांच्या कार्यालयात बैठका होणे, रस्ते विकास महामंडळाने दंडाची आकारणी करणे, अनामत रक्कम जप्त करणे, काळ्या यादीची नोटीस देणे, अशी कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, याबाबत तात्काळ चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजाच्या पत्रिकेमध्ये सकाळच्या सत्रात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८ बाबत मंत्रिमहोदयांनी प्रकृती ठीक नसल्यामुळे येणार नसल्याचे कळविले असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उद्योग मंत्र्यांनी, "लक्षवेधी सूचना क्र. ८ कोकणाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री वैभव नाईक, राजन साळवी, शेखर निकम यांच्याशी चर्चा केल्यानंतर माननीय कृषी मंत्र्यांनी बैठकीचे आश्वासन दिले आहे. या बैठकीमध्ये सर्व गोष्टी पूर्ण होणार आहेत. आंबा बागायतदारांना व्याजाचे पैसे द्यायचे होते त्या बाबत मुख्यमंत्री महोदयांनी ८ दिवसांपूर्वी सही केली आहे. पुढील दोन दिवसात आंबा बागायतदारांना व्याजाचे पैसे मिळणार आहेत," असे सांगितले.

(८) श्री. महेश शिंदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबई येथील विकास टप्पा दोन मार्केट एक या मार्केटमधील एफएसआय वाटप करतांना मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी व संचालक मंडळ दोषी असल्याबाबतचा मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तत्कालीन प्रशासक व विद्यमान राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्ह दाखल करण्याचे आदेश देण्यात येणे, या आदेशाच्या विरोधात संबधित दोषींनी याचिका दाखल करून (१४०४६/२०१६) सदर आदेशाला स्थगिती मिळवली असून सदर आदेश देतांना शासनाचे म्हणणे मांडण्याचे आदेश देण्यात येणे, असे असतांना सात वर्ष उलटले तरी शासनाने आपले म्हणणे अद्यापही न मांडणे, यामुळे विद्यमान संचालक मंडळात सदस्य म्हणून हे दोषी कार्यरत असून बाजार समितीची लूट करीत असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पणन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) सर्वश्री महेश बालदी, प्रशांत ठाकूर, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. महेश बालदी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"नवी मुंबई प्रकल्पाकरिता सिडको प्रशासनाने ९५ गावातील शेतक-यांच्या हजारो एकर जमिनी सन १९८० साली संपादित केल्या असणे, सिडकोने विकसित केलेल्या क्षेत्रात संपादित जमिनीच्या १२.५ टक्के जमिन देण्याचा शासनाचा निर्णय झाला असणे, सदर निर्णय होऊन जवळपास २५ ते ३० वर्षांचा कालावधी होऊनसुध्दा करंजाडे, द्रोणागिरी नोड येथील सिडकोने अद्यापपर्यंत जवळपास ४६१ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना १२.५० टक्के योजनांअंतर्गत भूखंडाचे वाटप केले नसणे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्यासाठी भूखंड शिल्लक नसल्याचे कारण सिडको प्रशासन देत असणे, दुसरीकडे चाणजे, मातिवली, बेलोंडाखार येथील अविकसित क्षेत्र खरेदी केलेल्या नवी मुंबई येथील बिल्डरांना व व्यावसायिक यांना आर्थिक लाभासाठी उलवे येथे तातडीने शासनाच्या नवीन परिपत्रकाप्रमाणे २२.५० टक्के भूखंडाचे वाटप करत असणे, उक्त प्रकल्पासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनी देऊन आपले रोजगाराचे साधन कायमस्वरूपी

गमावले असणे, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सिडको प्रशासनाने कोणतेही आरक्षण न ठेवल्यामुळे स्थानिक प्रकल्पग्रस्तांवर उपासमारीची वेळ आली असणे, त्यामुळे उक्त विभागातील शेतकरी व नागरिकांमध्ये सिडको प्रशासनाच्या विरोधात प्रचंड चीड निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने सिडको प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने योजनेचा लाभ देण्याबाबत तसेच प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगारांना सिडकोमध्ये नोकर भरतीमध्ये १०० टक्के आरक्षण देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५० मिनिटांनी सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११ वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री. अशोक चव्हाण व श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "मराठा आरक्षण," इ. बाबत सूचना दिली असल्याचे सांगितले.

प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत प्राप्त झालेल्या सूचनेवरील विषय आजच्या दिवसभराच्या कामकाजपत्रिकेवरील कोणत्याही बाबीशी निगडित नाही. तसेच उपरोक्त विषयांवर माननीय दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी सभागृहात यापूर्वीच विस्तृत उत्तर दिले आहे. सबब, सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त सूचना म.वि.स. नियम ५७ च्या निकषात बसत नसल्यामुळे सदरहू सूचनांना अनुमती नाकारीत आहे, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

१. (१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "पुरवणी मागण्यांमध्ये विरोधी पक्षांना निधी न मिळणे व लोकसभेत बोलण्यासाठी उभे राहिले तरी खासदारांवर कारवाई करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

या सभागृहात देशातील इतर सभागृहात घडलेल्या कृत्याची चर्चा होऊ न देणे, ही संविधानिक शिस्त कायम ठेवणे ही जबाबदारी आहे. त्यामुळे सदर विषयावर चर्चा करू देण्यास अनुकूल नसल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २१५ ते २१९ सभागृहासमोर ठेवण्यात आली.

२. (१) राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे मा. राज्यपाल महोदयांना सादर केलेले सन २०१० चा १, सन २०१३ चे २, सन २०१४ चे ९, सन २०१५ चे ३, सन २०१९ चा १ आणि सन २०२० चा १ असे एकूण १७ विशेष अहवाल त्यावरील शासनाच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवले.

२) उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी,

(अ) महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम-६ (१) नुसार सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र,

(ब) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूमिकेवर कामगिरी लेखापरीक्षण अहवाल तसेच

(क) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) "सन २०२२-२०२३ या वर्षाचा विनियोजन लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी, हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाडयाचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे," या विषयावरील श्री.दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी झालेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) वस्त्रोद्योग मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा व महामंडळाची उपकंपनी प्रताप मिल, अमळनेर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पंचावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(५) इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचे सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. सह सचिवांनी, विधानसभेने पारित केलेली विधयके विधानपरिषदेकडून या अधिवेशनात शिफारशीशिवाय परत करण्यात आली यांची यादी वाचून दाखविली.

४. आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते यांनी, "आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना दिली जाणारी मदत अत्यंत तोकडी असून शेतकऱ्यांच्या मदतीमध्ये वाढ करणे, तसेच त्यांचे कर्ज आहे माफ करणे," इ.बाबत म.वि.स. ५७ अन्वये नोटीस दिली असल्याचे सांगितले व शासनाने या संदर्भात निवेदन करावे, अशी विनंती केली.

श्री. अनिल देशमुख, वि.स.स. यांनी, "श्री. सचिव बहादुरे, वय – २९, रा. मोरखजहांगिर, ता. यवतमाळ या शेतकऱ्याने विधान भवन परिसरामध्ये कीटकनाशक पिऊन आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न," इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असल्याचे सांगून त्यावर योग्य निर्णय घ्यावा, अशी विनंती केली.

श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, "राज्य शासनाकडून विविध स्पर्धा परीक्षांसाठी घेण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये कपात करणे तसेच पेपरफुटीला आळा घालण्यासाठी कायदा करणे," इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना उपस्थित केली.

वने मंत्र्यांनी त्याबाबत खुलासा केला.

डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केंद्रात २६ नोव्हेंबरपासून सुरू असलेले आंदोलन," इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

(१) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी, "मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम., सायन आणि नायर रुग्णालयातील सी.एम.ओ. संपावर जाणे, या डॉक्टरांच्या वेतनातील तफावत लवकरात लवकर मिटविणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांनी, "मागासवर्ग आयोगामार्फत झाडे, झाडेकापू, झाडेकुणबी व इतर तत्सम जमातीचा तपास करून त्यांना तात्काळ एन.टी. (सी) प्रवर्गाचे प्रणाणपत्र देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांनी, "अहमदनगर जिल्ह्यात जिल्हा न्यायालयांमध्ये विविध पदांसाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेत अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांना मुदतवाढ देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. नितेश राणे, वि.स.स. यांनी, "वर्धा जिल्ह्यात एकतर्फी प्रेमप्रकरणात मुलीला धमकविण्याचे प्रकार येऊनही त्यावर पोलिसांनी कोणतीही कारवाई न केल्यामुळे त्या मुलीचे आणि कुटुंबीयाचे जीवन धोक्यात येणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, "वन जमिनी, सागरी किल्ले, समुद्र किनारे, रेल्वे मार्ग आणि सरकारी जागांवर झालेली अतिक्रमणे व अवैध धार्मिक स्थळे हटविण्यासाठी सरकारने विशेष मोहीम राबविणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. राजन साळवी, वि.स.स. यांनी, "रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा बागायतदारांचे विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ११ डिसेंबरपासून सुरू असलेले साखळी उपोषण," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. जयकुमार रावल, वि.स.स. यांनी, "जवाहर नागरी सहकारी पतसंस्था, दोंडाईचा यांच्या पूर्वीच्या संचालकांवर गुन्हा नोंदवून एस.आय.टी. मार्फत चौकशी करणे," तसेच "शिंदखेडा तालुक्यातील विखरण येथे उपलब्ध असलेल्या सुविधा विचारात घेऊन तिथे ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) प्रा. श्रीमती वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, "बार्टी संस्थेच्या पीएचडीधारक संशोधकांना अद्याप फेलोशिपचे प्रमाणपत्र देण्यात न आल्यामुळे त्यांनी सुरू केलेले उपोषण," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) ॲड. आशिष जैस्वाल, वि.स.स. यांनी, "विविध आवास योजनांसाठी भूखंड उपलब्ध नसणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी, "संपूर्ण विदर्भातील शेतकऱ्यांचे ठिबक सिंचनाचे अनुदान रखडणे," तसेच "ग्रामपंचायतीच्या संगणक परिचालकगांचे सुरू असलेले आंदोलन," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, "बोरिवली येथी भन्साळी रुग्णालयाचे काम सुरू करून रुग्णालय सुरू करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. अनिल देशमुख, वि.स.स. यांनी, "हिंगणघाट शहरामध्ये शासकीय महाविद्यालय सुरू करण्याच्या मागणीसाठी गेल्या २०८ दिवसांपासून सुरू असलेले आंदोलन," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री बोलतील, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(१३) श्री. राम सातपुते, वि.स.स. यांनी, "अजलूज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीयांच्या वसतिगृहासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून निधी देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स. यांनी, "सातारा जिल्ह्यातील ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक आणि सर्व संगणक परिचालकांचे सुरू असलेले आंदोलन," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी, "घुग्घुस नगरपंचायतीचे नाव पंतप्रधान आवास योजनेमध्ये सॉफ्टवेअरवर नोंद करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे," तसेच "मोदी आवास योजनेतून वयोवृद्धांसाठी जात प्रमाणपत्राची अट रद्द करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

५. सर्वश्री. विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांचा पुढील प्रस्ताव.

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला) (चर्चा पुढे सुरू)

"राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचार, चोरीचे गुन्हे, दलितांना अमानुष वागणूक, खंडणी व ऑनलाईन फसवणूक, सायबर क्राईममधील वाढ, केंद्र शासनाकडील प्रलंबित शक्ती कायदा, खाद्य पदार्थांमधील भेसळ, महामार्गावर होणारी आर्थिक लूट, अवैध वाहतूक, प्रदूषण, अनधिकृत लॉटरी, महिलांचे आरक्षण, अवैध बांधकामातील भ्रष्टाचार, आर्थिक नियोजनातील बेशिस्तपणा याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे," इ.बाबत. प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

श्री. कुणाल पाटील व श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, "आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये असलेला औचित्याचे मुद्दा हा विषय बाजूला सारून अन्य विषय चर्चेला घेणे," इ.बाबत कामकाजाबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

आज या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्ष नेता, श्री.जयंत पाटील व डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. बोलणार आहेत. त्यानंतर या प्रस्तावावर मंत्री महोदय रिप्लाय देखील देणार आहेत. त्यामुळे आता या सन्माननीय सदस्यांनी प्रस्तावावर बोलणे अत्यंत आवश्यक आहे. तीन सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर लगेच औचित्याचे मुद्दे चर्चेला घेण्यात येतील व त्यानंतर लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

"राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचार, चोरीचे गुन्हे, दलितांना अमानुष वागणूक, खंडणी व ऑनलाईन फसवणूक, सायबर क्राईममधील वाढ, केंद्र शासनाकडील प्रलंबित शक्ती कायदा, खाद्य पदार्थांमधील भेसळ, महामार्गावर होणारी आर्थिक लूट, अवैध वाहतूक, प्रदूषण, अनधिकृत लॉटरी, महिलांचे आरक्षण, अवैध बांधकामातील भ्रष्टाचार, आर्थिक नियोजनातील बेशिस्तपणा याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे," इ.बाबत.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते (भाषण पूर्ण)

६. (अ) गृहनिर्माण मंत्र्यांनी, म.वि.स. नियम १५४ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला –

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

सन २०२३ चे वि.स.वि. विधेयक क्रमांक २१ मागे घेण्यात आले.

(ब) (१) गृहनिर्माण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्र. ६२ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

"राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचार, चोरीचे गुन्हे, दलितांना अमानुष वागणूक, खंडणी व ऑनलाईन फसवणूक, सायबर क्राईममधील वाढ, केंद्र शासनाकडील प्रलंबित शक्ती कायदा, खाद्य पदार्थांमधील भेसळ, महामार्गावर होणारी आर्थिक लूट, अवैध वाहतूक, प्रदूषण, अनधिकृत लॉटरी, महिलांचे आरक्षण, अवैध बांधकामातील भ्रष्टाचार, आर्थिक नियोजनातील बेशिस्तपणा याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे," इ.बाबत प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री. जयंत पाटील (३) डॉ. जितेंद्र आव्हाड

(क) (१) सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ –

गृहनिर्माण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत पुढील सदस्यांनी भाग घेतला.

(१) डॉ. जितेंद्र आव्हाड

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ६२ संमत झाले.

(१) उप मुख्यमंत्र्यांनी, "वर्धा जिल्ह्यातील प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालय," इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

"राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचार, चोरीचे गुन्हे, दलितांना अमानुष वागणूक, खंडणी व ऑनलाईन फसवणूक, सायबर क्राईममधील वाढ, केंद्र शासनाकडील प्रलंबित शक्ती कायदा, खाद्य पदार्थांमधील भेसळ, महामार्गावर होणारी आर्थिक लूट, अवैध वाहतूक, प्रदूषण, अनधिकृत लॉटरी, महिलांचे आरक्षण, अवैध बांधकामातील भ्रष्टाचार, आर्थिक नियोजनातील बेशिस्तपणा याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे," इ.बाबत प्रस्तावावरील चर्चेला उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

श्री. बळवंत वानखडे, वि.स.स. यांनी, "नाचवणे येथे एका वाहनाखाली एकाच कुटुंबातील सहा जणांना चिरडणे, त्यापैकी तिघांचा जागीच मृत्यू होणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी, या विषयाची नोंद घेऊन आताच कारवाईचे आदेश देतो, असे सांगितले.

"राज्यातील वाढती महागाई, बेरोजगारी, गुन्हेगारी, परिणामी निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती, प्रदूषण, मुंबईच्या विविध समस्या याबाबत शासनाने करावायाची उपाययोजना," तसेच

"राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचार, चोरीचे गुन्हे, दलितांना अमानुष वागणूक, खंडणी व ऑनलाईन फसवणूक, सायबर क्राईममधील वाढ, केंद्र शासनाकडील प्रलंबित शक्ती कायदा, खाद्य पदार्थांमधील भेसळ, महामार्गावर होणारी आर्थिक लूट, अवैध वाहतूक, प्रदूषण, अनधिकृत लॉटरी, महिलांचे आरक्षण, अवैध बांधकामातील भ्रष्टाचार, आर्थिक नियोजनातील बेशिस्तपणा याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे," इ.बाबत प्रस्तावावरील चर्चेला मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते व प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी उत्तरादाखल भाषण केले.

(२) पशु संवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी, "राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर ५ रुपये अनुदान देणे," इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(३) महिला व बाल विकास मंत्र्यांनी, "घाटकोपर पूर्व (मुंबई उपनगर) येथील घरपोच आहार पुरवठा (THR) संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेली कारवाई," इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(४) महिला व बाल विकास मंत्र्यांनी, "राज्यातील बालकांचे कुपोषण व बालमृत्यू," इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(क) (२) सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ६१ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ –

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ६१ – युनिव्हर्सल स्किलटेक विद्यापीठ, वसई विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ६१ संमत झाले.

श्री. किशोर पाटील, वि.स.स. यांनी, "पाचोरा आणि भडगाव तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीची मिळकत बेकायदा विकणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्यावर आपले मत मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनी, या विषयाची नोंद घेऊन आताच कारवाईचे आदेश देतो, असे सांगितले.

"राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचार, चोरीचे गुन्हे, दलितांना अमानुष वागणूक, खंडणी व ऑनलाईन फसवणूक, सायबर क्राईममधील वाढ, केंद्र शासनाकडील प्रलंबित शक्ती कायदा, खाद्य पदार्थांमधील भेसळ, महामार्गावर होणारी आर्थिक लूट, अवैध वाहतूक, प्रदूषण, अनधिकृत लॉटरी, महिलांचे आरक्षण, अवैध बांधकामातील भ्रष्टाचार, आर्थिक नियोजनातील बेशिस्तपणा याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे," इ.बाबत मुख्यमंत्र्यांनी अधिक खुलासा केला.

सभागृहाने दोन्ही प्रस्तावांवर विचार केला असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

पाचोरा येथील मिळकतीच्या विक्रीबाबत—

या प्रकरणी जिल्हाधिकारी, जळगाव यांनी तात्काळ चौकशी करण्याची सूचना देण्यात येईल तसेच अहवाल प्राप्त झाल्यावर कारवाई करण्यात येईल, असे महसूल मंत्र्यांनी सांगितले.

७.   ( १ ) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"दहिसर येथील भारतीय विमान पत्तन प्राधिकरणाच्या अखत्यारीमधील असलेली निवासी घरे व इमारतीचे केंद्र शासनाच्या कठोर नियमांमुळे पुर्नवसन करणे शक्य होत नसल्याची बाब निदर्शनास येणे, रडार यंत्रणामुळे काही विशिष्ट मर्यादेच्या परिसरात विशिष्ट उंचीवरुन कोणतेही बांधकाम करण्यात येऊ नये असे निर्बंध घातलेले असणे, दहिसर, बोरिवली, मिरा रोड या भागातील भारतीय विमान पतन प्राधिकरणाच्या परिसरात असलेल्या इमारतीचा पुनर्विकास खोळंबला असल्याने रहिवाशांमध्ये निर्माण झालेली प्रचंड नाराजी, तसेच या परिसरातील पुनर्विकास व एसआरएचे अनेक प्रकल्प राबवितांना विकासकांना परवानगी न मिळणे, रेरा प्राधिकरणाच्या नियमानुसार वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याची असलेली अट, यामुळे विकासक दुहेरी संकटात सापडलेले असणे, झोपडपट्टी क्षेत्र व इमारती पाडून टाकल्याने बेघर झालेल्या रहिवाशांना भाडे देणे शक्य न झाल्याने रहिवाशांमध्ये निर्माण झालेली तीव्र नाराजी, तसेच तेथील नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री महोदयांनी केंद्र शासनाकडे निवेदन देऊन सन २०१७ साली केंद्र सरकारने एमएमआरडीएला दिलेली जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेला उद्यानासाठी देण्याची विनंती केलेली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिका सदर जागेकरिता आवश्यक मोबदला भरण्यास तयार असूनही अद्याप केंद्र शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, त्याकरिता शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून संबंधित निर्बंध शिथिल करणे व सदर जागा उद्यानाकरिता उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

( १ ) श्री. अबु आजमी, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा (हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी मजकूर प्रलंबित.)

उपरोक्त मुद्याबाबत नोंद घेतली असल्याचे उद्योग मंत्र्यांनी सांगितले.

( १ ) श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स. यांनी, "कर्माण या गावातील शाळेच्या शिक्षकाचे जातीयवादी वागणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. यांनी, "राज्यातील २७,८३७ ग्रामपंचायतींमध्ये खाजगी कंपनीमार्फत नियुक्त १९,७६७ संगणक परिचालकांचे थकीत वेतन मिळणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, "बार्टीच्या सन २०२२ मधील सर्व पात्र पीएचडी संशोधकांना सुमारे २१ महिन्यांपासून प्रलंबित असलेली पीएचडी फेलोशिक नोंदणी दिनांकापासून मिळणे," तसेच "शाळांमध्ये शिकविण्यात येणाऱ्या खाजगी अभ्यासक्रमामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा देशाच्या महान व्यक्तिमत्त्वांमध्ये उल्लेख नसणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी, "राज्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ वा कल्याणकारी मंडळ स्थापन करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. भीमराव तापकीर, वि.स.स. यांनी, "खडकवासला नजीकच्या नांदेड सिटी येथील रहिवाशांना कोणत्याही सोयी-सुविधा न देता महापालिकेने मिळकत करताची देयके पाठविणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. राजेश पाटील, वि.स.स. यांनी, "चंदगड तालुक्यातील हिरे सरंजाम येथील १६ हजार १ हेक्टर क्षेत्राची व ६ हजार ९१ हेक्टर क्षेत्रातील वर्ग-२ ची जमीन वर्ग-१ मध्ये निकाली काढण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना आदेश देणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) डॉ. संजय रायमूलकर, वि.स.स. यांनी, "इमारतीपेठ येथील शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपनीचे लायसन्स रद्द करून चौकशी करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. शेखर निकम, वि.स.स. यांनी, "नवीन वाळू धोरणामध्ये हातपाटीसारख्या छोट्या व्यावसायिकांना सामावून घेणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. निलेश लंके, वि.स.स. यांनी, "नाथसागर जलाशयामध्ये सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीस स्थानिकांना केलेला विरोध" तसेच "अंगणवाडी सेविका व मिनी अंगणवाडी सेविकांना दरमहा २६ हजार रुपये व मदतनिसांना २० हजार रुपये मानधन देणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, "बोरिवली (पूर्व) येथील दौलतनगर, संजयनगर, साईनाथ नगर, पुष्पविहार कॉलनी व इंदिरानगर या वस्तीतील घरांवर रेल्वे पोलिसांतर्फे सुरू असलेली कारवाई स्थगित करण्यासाठी राज्य शासनाने शिफारस करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्र राज्य समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेचे शासन सेवेत समायोजनासाठी सुरू असलेले आंदोलन तसेच ऊर्जा विभागातील कंत्राटी कामगारांचीदेखील सेवेमध्ये सामावून घेण्याची मागणी," तसेच "भुसावळजवळील औष्णिक ऊर्जा स्थानकाजवळ ओव्हरलोड वाहनांवर नियंत्रण आणणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. रईस शेख, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा (हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी मजकूर प्रलंबित.)

(१३) श्री. अनिल देखमुख, वि.स.स. यांनी, "राज्यातील पोलीस पाटील संघटनेचे मागण्यांसाठी सुरू असलेले आंदोलन," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी, "शिंदखेडा तालुक्यातील जिंदाल पावर लि. च्या प्रकल्पाच्या मान्यता प्राप्त कामांना वारंवार स्थगिती मिळणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. बच्चू कडू, वि.स.स. यांनी, "द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक महामंडळ तयार करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स. यांनी, "एमपीएससीमार्फत भरण्यात येणारी तहसीलदार, उप विभागीय अधिकारी, नायब तहसीलदार आणि भूमी अभिलेख अधीक्षक यांची सुमारे ५०० रिक्त पदे तातडीने भरणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. दादाराव केचे, वि.स.स. यांनी, "वरुड, तिवसा, पुलगाव, धामणगाव या परिसरात वैद्यकीय महाविद्यालय आणि नवीन एमआयडीसी स्थापन करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांनी, "गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय बांधकामांवर शासनाचे फलक लावणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री. राजेश पाटील, वि.स.स. यांनी, "पालघर जिल्ह्या मुख्यालयात सेवारत असलेल्या राज्य शासनाच्या सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणे एकस्तर वेतनश्रेणी अनुज्ञेय करणे तसेच पालघर जिल्ह्यातील २२ गावांमध्ये वीज पुरवठ्याकरिता आवश्यक असलेल्या सब-स्टेशनकरिता मौजे ढेकाळे येथील जागा महसूल विभागाने उपलब्ध करून देणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२०) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, “महाराष्ट्र राज्यात धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत धनगर समाजाचे सुरू असलेली आंदोलने,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्रीमती ऋतुजा लटके, वि.स.स. यांनी, “राज्यातील सर्व जाती धर्माचे सफाई कामगार यांचे वारसांना वारसा हक्काने नोकरी देण्याच्या निर्णयावर असलेली स्थगिती उठविण्याबाबत राज्य शासनाने पुढाकार घेणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री. कैलास गोरंटयाल, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा (हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी मजकूर प्रलंबित.)

(२३) श्री. पी.एन. पाटील, वि.स.स. यांनी, “कोल्हापूर जिल्ह्यातील धरणांच्या पाण्याचा वाढविण्यात आलेला दर कमी करणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२४) श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी, “जत तालुक्यातील २९ गावांना स्वतंत्र पाणी पुरवठा योजना मंजूर करणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२५) श्री. प्रकाश आवाडे, वि.स.स. यांनी, “अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा वर्कर यांना शासन सेवेत कायमस्वरुपी घेणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२६) श्री. अबु आजमी, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा (हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी मजकूर प्रलंबित.)

(२७) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स. यांनी, “आरमोरी, कुरखेडा, वळसा, कुरची या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करणे तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२८) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. यांनी, “शिरवाळा येथील अल्पवयीन मुलीने केलेल्या आत्महत्याप्रकरणी पोलिसांना शासनाच्या मार्फत तातडीने सूचना देणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. सुरेश भोळे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“जळगाव शहरातील एमआयडीसी लगत असलेल्या जागेमध्ये कोणतेही नवीन उद्योग आलेले नसून या ठिकाणी स्टार्ट अप इंडियाच्या माध्यमातून जळगाव शहरात नवीन उद्योगाचे प्रकल्प आणण्यात न येणे, जळगाव एमआयडीसी मधील उद्योजकांकडून २ प्रकारचे कर एमआयडीसी

तसेच महापालिका यांच्याकडून घेण्यात येत असणे, एमआयडीसी ही स्पेशल अथॉरिटी असून संबंधित कर हा एमआयडीसी यांनीच वसूल करून उद्योजकांना सुख-सुविधा पुरविण्यात न येणे, जळगाव शहर एमआयडीसी मध्ये स्वतंत्र अग्निशमन केंद्र अस्तित्वात नसणे, जळगाव शहरातील एमआयडीसी मध्ये गटार, पिण्याचे पाणी पाइपलाईन, रस्ते, इत्यादी मूलभूत सुख-सुविधा नसणे, जळगाव शहरातील एमआयडीसी मध्ये कामगारांना वेळेवर काम न मिळणे, त्यामुळे शहरात बेरोजगार नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात निर्माण होणे, जळगाव शहरातील नागरिकांना रोजगार नसल्याने मोठ्या प्रमाणात युवा कामगारांनी चोरी, गुंडा गर्दी करणे, या सारखे गुन्हे मोठ्या प्रमाणात करणे, जळगाव शहरातील एम.आय.डी.सी. मध्ये नव्याने उद्योग न येणे, त्यामुळे जळगाव शहरातील इंजिनियर, एमबीए झालेले मॅनेजर, अकाउटंट, आयटीआय धारक यांनी रोजगार मिळण्यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक या सारख्या शहरात जाणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

( ३ ) सर्वश्री मंगेश चव्हाण, विजय वडेट्टीवार, अशोक चव्हाण, अस्लम शेख, धीरज देशमुख, विकास ठाकरे, सुनील केदार, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

ॲड. राहुल कूल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"जळगांव येथील बि.एच.आर. या पतसंस्थेमध्ये नोव्हेंबर, २०२० मध्ये पुणे येथे नोंद झालेल्या तिन्ही गुन्हयात फिर्यादी हजर नसतांना विस्मयकारकरित्या गु.र.क्र. ७५४/२०२० गुन्हयाची नोंद रात्रौ २३.५६ वा. पोलीस ठाणे शिक्रापूर, पुणे ग्रामीण पोलीस, गु.र.क्र. ७७३/२०२० गुन्हयाची नोंद सकाळी २.३३ वा. पोलीस ठाणे डेक्कन पुणे शहर पोलीस आयुक्तालय, गु.र.क्र. ३०६ / २०२० गुन्हयाची नोंद सकाळी ००.१० वा. पोलिस ठाणे आळंदी पिपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयात, सदरील गुन्हे एकाच दिवशी म्हणजे दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० रोजी नोंदविण्यात आलेले असणे, तसेच पुणे शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत डेक्कन पोलीस ठाण्यातील गु.र.क्र. ६७३/२०२० हा गुन्हयासाठीच्या कार्यालयीन टिप्पणीत खाडाखोड करून पाने देखील बदलविण्यात आलेली असणे, विशेष आश्चर्याची बाब म्हणजे सदरील गुन्हे हे जरी दिनांक २५ व २६ नोव्हेंबर, २०२० रोजी नोंदविण्यात आलेले असतांना, सदरील गुन्हयाकामी तपासाकरीता जाणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता पूर्वीच म्हणजे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी फर्दापूर येथील अजंता गेस्ट हाउस बुक करण्यात आलेले असणे, या उपरोक्त गंभीर प्रकरणात तक्रार दिल्यानंतर राज्य गुन्हे

अन्वेषण विभाग म.रा.पुणे यांना उपरोक्त गुन्हयासंदर्भात पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या गैरप्रकाराबाबतीत चौकशी करण्याचे आदेश दिलेले असतांना, त्यासंबंधात चौकशी करून अहवाल सादर करण्यात आलेला आहे किंवा कसे ? याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उपमुख्यमंत्र्यांनी (गृह) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. समीर कुणावार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"सन १९९६-९७ या कालावधीत वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर, सेलू तसेच सिंदी (रेल्वे), कळमना, मारडा, दिग्रज, भोसा, उमराव व इतर गावातील सुमारे ११८५ शेतकऱ्यांच्या तसेच नागपूर जिल्ह्यातील सुमारे १८२६ शेतकऱ्यांच्या याप्रमाणे एकूण ३०११ शेतकऱ्यांच्या शेतजमिनी या "निम्न वना प्रकल्पांतर्गत" अधिग्रहीत झालेल्या असणे, शेतजमीन अधिग्रहीत करताना मोहगाव येथील काही शेतकऱ्यांना प्रति एकर ६० ते ६५ लाख रुपये व इतर गावातील शेतकऱ्यांना प्रती एकर फक्त ३० ते ३५ हजार रुपये अशा तफावतीने वितरित करण्यात येणे, उर्वरित २० टक्के रक्कम व भू-भाडे पट्टी व्याजासह नंतर देण्याचे आश्वासन तत्कालीन नागपूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), अजनी, नागपूर या विभागातील अधिकाऱ्यांनी दिले असणे, परंतु २७ वर्षे उलटूनही अद्यापि सदर गावातील शेतकऱ्यांना भू-भाडे पट्टी व्याजासह मिळाली नसणे, सन २०१८ मध्ये शेतकऱ्यांनी भू-भाडे पट्टीची रक्कम मिळण्याबाबत संबंधित विभागाकडे अर्ज करून देखील अद्यापपर्यंत भू-भाडे पट्टीची रक्कम देण्यात आलेली नसणे, परिणामी सर्व शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र संताप, आजच्या बाजारमूल्यानुसार भू-भाडे पट्टी व्याजासह मिळण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी, शेतकरी/ शेतकरी संघटनांनी वारंवार संबंधित विभागाकडे निवेदने देवूनही शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे निम्म वना प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या अधिग्रहीत झालेल्या जमिनीचे उर्वरित २० टक्के रक्कम व भूभाडेपट्टी प्रचलित बाजारमुल्यानुसार देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी (जलसंपदा) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री, विजय वडेट्टीवार, राजेश एकडे, अमित झनक, बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.बळवंत वानखडे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी शा.नि.क्र. ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.संकुल २००६/५ क्र.१९९/पं.स. ७, दिनांक १ सप्टेंबर २००८ नुसार बी.ओ.टी. तत्त्वावर विविध ठिकाणी बांधकामे प्रस्तावित केली असणे, या शासन निर्णयानुसार भूखंड खाजगी विकासकाला ३० वर्षांसाठी रु.१००/- चौ.मी. प्रति वर्ष या दराने भाडेपट्ट्यावर देता येईल अशी तरतूद असणे, सदर शासन निर्णय सन २००८ साली निर्गमित झाला असून, सन २००८ चे रेडी रेकनरचे दर व आजचे दर यात मोठ्या प्रमाणात फरक पडला असणे, या १५ वर्षाच्या कालावधीत बाजारमूल्याचे भाव २०० ते ३०० पटीने वाढले असतानाही सन २००८ च्या बाजारमूल्याप्रमाणे जाहिरात व निविदा काढण्यात आली असणे, या बी.ओ.टी तत्त्वानुसार जागा भाडेपट्याने देऊनसुद्धा जिल्हा परिषद, बुलढाणा यांना आर्थिक फायदा न होणे, त्यामुळे सदरहू जाहिरात केवळ विकासकाच्या आर्थिक फायद्यासाठी दिल्याची शंका निर्माण होणे, विकासकाकडून प्रमाणात प्रिमियम न घेणे, परिणामी तर जिल्हा परिषद सेस फंडाचे नुकसान होणे, या बी.ओ.टी तत्त्वावरील बांधकामामध्ये फक्त विकासकाचाच फायदा बघणे, या प्रकरणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार करणे, याबाबत शासनाने चौकशी करून जि.प. (बी.ओ.टी) बांधकामाला स्थगिती देऊन नवीन बाजारमूल्याप्रमाणे जि.प. बुलढाणा यांना सुधारित निविदा तयार करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय अध्यक्षांनी, हिवाळी अधिवेशन काळातील कामकाजाचा आढावा सभागृहासमोर ठेवला.

माननीय अध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे, असे घोषित केले.

माननीय अध्यक्षांनी, सत्र समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा पुढील संदेश वाचून दाखविला -

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी रमेश बैस, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधानसभेचे सत्र संस्थगित करीत आहे."

विधानसभेचे अधिवेशन रात्री ७ वाजून ४८ मिनिटांनी संस्थगित झाले.

## विवरण क्रमांक ८

महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८ (१) अन्वये, गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजी नामनिर्देशित केलेली सभाध्यक्षांची तालिका :—

(१) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

(२) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

(३) श्री. चेतन तुपे, वि.स.स.

(४) ॲड. श्रीमती यशोमती ठाकूर, वि.स.स.

* * *

# विवरण क्रमांक ९

## विविध समित्यांवर/संस्थांवर/मंडळांवर/विद्यापीठांवर सदस्यांची निवडणूक व नामनियुक्ती

**निरंक**

* * *

# विवरण क्रमांक १०

## विविध समित्यांच्या बैठकी

| अ.क्र. | समितीचे नाव | बैठकीचा वार व दिनांक | बैठकीत झालेले कामकाज |
|---|---|---|---|
| १) | कामकाज सल्लागार समिती | बुधवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२ | विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक बुधवार, दि. २९ नोव्हेंबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० वा. कक्ष क्रमांक ०४३, तळमजला, विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासंबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करून पुढील निर्णय घेतले :—<br><br>**:: निर्णय ::**<br><br>(१) सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर ते बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ या कालावधीतील कामकाज निश्चित करण्यात आले. विधानसभा कामकाज सल्लागार समितीची पुढील बैठक मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर,२०२३ रोजी विधानभवन,नागपूर येथे घेण्याचे निश्चित करण्यात झाले.<br><br>(२) अधिवेशन कालावधीत विधानसभा सभागृहाच्या दिवसाच्या कामकाजाचा असुधारित क्रम सायं. ०७.०० वाजेपर्यंत तयार करण्यात यावा व मागणीनुरूप मंत्री महोदयांच्या कार्यालयास सुधारणेच्या अधीनतेने, उपलब्ध करून देण्यात यावा. |

| अ.क्र. | समितीचे नाव | बैठकीचा वार व दिनांक | बैठकीत झालेले कामकाज |
|---|---|---|---|
| २) | कामकाज सल्लागार समिती | मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर,२०२३ | **मा. संसदीय कार्यमंत्री :** महोदय, विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक आज मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ०३-०० वाजता कक्ष क्रमांक ००३, तळ मजला, नवीन इमारत, विधान भवन, नागपूर येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने सभागृहापुढील कामकाजाचा आढावा घेवून सभागृहाचे कामकाज उद्या म्हणजेच बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजीपर्यंत घेण्याचे निश्चित केले आहे. |

# विवरण क्रमांक ११

## शासकीय विधेयकासंबंधी सांख्यिकीय माहिती

## सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरः-स्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक | विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६-महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२. | सामान्य प्रशासन | श्री. एकनाथ शिंदे | २६ डिसेंबर २०२२ | २६ डिसेंबर २०२२ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २८ डिसेंबर २०२२ | विधान-परिषदेत दि. २५ मार्च, २०२३ रोजी दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठविले.<br>दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी विधानपरिषदे-मध्ये अहवाल सादर करण्यात आला व विधेयक संमत करण्यात आले. | — | — | — | — | दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजी विधान-सभेत सहमती देण्यात आली. |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरः-स्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक | विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ | सहकार | श्री.दिलीप वळसे-पाटील | १७ जुलै २०२३ | १७ जुलै २०२३ | -- | ८ डिसेंबर २०२३ रोजी विधान-सभेत मागे घेण्यात आले. | | — | — | — | — | — |
| ३ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ | गृहनिर्माण | श्री.अतुल सावे | १७ जुलै २०२३ | १७ जुलै २०२३ | -- | ८ डिसेंबर २०२३ रोजी विधान-सभेत मागे घेण्यात आले. | | — | — | — | — | — |
| ४ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ - महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) (निरसन) विधेयक, २०२३ | गृह | श्री.देवेंद्र फडणवीस | ७ डिसेंबर २०२२ | ७ डिसेंबर २०२२ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ८ डिसेंबर २०२३ | ११ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरः- स्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका- संबंधी प्रस्ताव | विधान- सभेत संमत झाल्याचा दिनांक | विधान- परिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ | उच्च व तंत्र | श्री.चंद्रकांत (दादा) पाटील | ७ डिसेंबर २०२३ | ७ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ८ डिसेंबर २०२३ | १२ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| ६ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२३ | गृहनिर्माण | श्री.अतुल सावे | ७ डिसेंबर २०२३ | ७ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ८ डिसेंबर २०२३ | १२ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| ७ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ | वित्त | श्री.अजित पवार | ७ डिसेंबर २०२३ | ७ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ८ डिसेंबर २०२३ | ११ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरः-स्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक | विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ - चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ | वित्त | श्री.अजित पवार | ७ डिसेंबर २०२३ | ७ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ८ डिसेंबर २०२३ | ११ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| ९ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३ | पशुसंवर्धन | श्री. राधाकृष्ण विखे-पाटील | १२ डिसेंबर २०२३ | १२ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १३ डिसेंबर २०२३ | २० डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| १० | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३ | वित्त | श्री.अजित पवार | १२ डिसेंबर २०२३ | १२ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १२ डिसेंबर २०२३ | १२ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरः-स्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक | विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०२३ | महसूल | श्री. राधाकृष्ण विखे-पाटील | १२ डिसेंबर २०२३ | १३ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १५ डिसेंबर २०२३ | २० डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| १२ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ | क्रीडा व युवक कल्याण | श्री.संजय बनसोडे | १५ डिसेंबर २०२३ | १५ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १५ डिसेंबर २०२३ | १९ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| १३ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, २०२३ | उच्च व तंत्र | श्री.चंद्रकांत (दादा) पाटील | १५ डिसेंबर २०२३ | १५ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १८ डिसेंबर २०२३ | १९ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरः-स्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक | विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६ - जी.एच. रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ, पुणे, विधेयक, २०२३ | कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नाविन्यता | श्री.मंगल प्रभात लोढा | १५ डिसेंबर २०२३ | १५ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १८ डिसेंबर २०२३ | १९ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| १५ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५७ - जी.एच. रायसोनी कौशल्य तंत्र विद्यापीठ, नागपूर, विधेयक, २०२३ | कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नाविन्यता | श्री.मंगल प्रभात लोढा | १५ डिसेंबर २०२३ | १५ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १८ डिसेंबर २०२३ | १९ डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| १६ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८ - महाराष्ट्र मराठी भाषा विद्यापीठ विधेयक २०२३ | उच्च व तंत्र | श्री.चंद्रकांत (दादा) पाटील | १८ डिसेंबर २०२३ | १८ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १९ डिसेंबर २०२३ | २० डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरः- स्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका- संबंधी प्रस्ताव | विधान- सभेत संमत झाल्याचा दिनांक | विधान- परिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९ - महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विधेयक, २०२३ | उच्च व तंत्र | श्री.चंद्रकांत (दादा) पाटील | १८ डिसेंबर २०२३ | १८ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १९ डिसेंबर २०२३ | २० डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| १८ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६० - महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) विधेयक, २०२३ | उद्योग, ऊर्जा व कामगार | श्री.देवेंद्र फडणवीस | १८ डिसेंबर २०२३ | १८ डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १९ डिसेंबर २०२३ | २० डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |
| १९ | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ - युनिव्हर्सल स्किलटेक विद्यापीठ, वसई विधेयक, २०२३ | कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नाविन्यता | श्री.मंगल प्रभात लोढा | २० डिसेंबर २०२३ | २० डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २० डिसेंबर २०२३ | २० डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरः-स्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक | विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ | गृहनिर्माण | श्री.अतुल सावे | २० डिसेंबर २०२३ | २० डिसेंबर २०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २० डिसेंबर २०२३ | २० डिसेंबर २०२३ | — | — | — | — | — |

# विवरण क्रमांक १२

## संविधान सुधारणेच्या अनुसमर्थनाचा प्रस्ताव

### निरंक

* * *

# विवरण क्रमांक १३

## पुरःस्थापित अशासकीय विधेयके

### निरंक

**टिप :** खालील अशासकीय विधेयके पुरःस्थापनार्थ शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली होती. परंतु उक्त दिवसाचे अशासकीय कामकाज पुढे ढकलल्याने सदरहू कामकाज होऊ शकले नाही.

| | |
|---|---|
| (१) | सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४—महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१—**श्री. सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. यांचे.** |
| (२) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४०—महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२२—**श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचे.** |
| (३) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१—महाराष्ट्र परदेशातील रोजगार संरक्षण विधेयक, २०२२—**डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे.** |
| (४) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९—मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३—**श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचे.** |
| (५) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५—महाराष्ट्र राज्य दुय्यम पशुवैद्यकीय परिषद विधेयक, २०२३—**श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स. आणि श्री. अतुल बेनके, वि.स.स. यांचे.** |

* * *

# विवरण क्रमांक १४

## विचारात घेण्यात आलेले अशासकीय विधेयके

## निरंक

**टिप :** खालील अशासकीय विधेयके विचारार्थ शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली होती. परंतु उक्त दिवसाचे अशासकीय कामकाज पुढे ढकलल्याने सदरहू कामकाज होऊ शकले नाही.

| | |
|---|---|
| (१) | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१९ - **श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे** |
| (२) | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०१९ - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.** |
| (३) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे** |
| (४) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे** |
| (५) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - **श्री.अमित साटम, वि.स.स. यांचे** |
| (६) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे** |
| (७) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक २०२० - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे** |
| (८) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.सुनील प्रभू, वि.स.स. यांचे** |

| | |
|---|---|
| (९) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ०२ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचे** |
| (१०) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४- महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचे** |
| (११) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२३ - **डॉ.जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचे** |
| (१२) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ - **श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचे** |

* * *

# विवरण क्रमांक १५

## भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये व म.वि.स. नियम १५९ (२) अन्वये अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी प्रस्ताव

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) अन्वये व म.वि.स. नियम १५९ (२) अन्वये सन २०२३ चे अध्यादेश क्र. ७ नापसंत करण्यासंबंधी प्रस्तावाच्या आलेल्या एकूण १४ सूचना, म.वि.स. नियम १५९(२) अन्वये सन २०२३ चे अध्यादेश क्र. ८ नापसंत करण्यासंबंधी प्रस्तावाच्या आलेल्या एकूण १३ सूचना, म.वि.स. नियम १५९(२) अन्वये सन २०२३ चे अध्यादेश क्र. ९ नापसंत करण्यासंबंधी प्रस्तावाच्या आलेल्या एकूण १४ सूचना प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | प्रभारी सदस्य | विषय | चर्चेचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | १) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.<br>२) श्री. नाना पटोले, वि.स.स.<br>३) श्री. संजय जगताप, वि.स.स.<br>४) श्री. सुरेश वरपुडकर, वि.स.स.<br>५) श्री. अमीन पटेल, वि.स.स.<br>६) श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स.<br>७) श्री. अस्लम शेख, वि.स.स.<br>८) श्री. अमित झनक, वि.स.स.<br>९) श्री. सुनील केदार, वि.स.स.<br>१०) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.<br>११) श्री. बळवंत वानखडे, वि.स.स.<br>१२) श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स.<br>१३) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स.<br>१४) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. | सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ७—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२३ | निरंक | नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही. |

| अ. क्र. | प्रभारी सदस्य | विषय | चर्चेचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| २ | १) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.<br>२) श्री. नाना पटोले, वि.स.स.<br>३) श्री. संजय जगताप, वि.स.स.<br>४) श्री. सुरेश वरपुडकर, वि.स.स.<br>५) श्री. अमीन पटेल, वि.स.स.<br>६) श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स.<br>७) श्री. अस्लम शेख, वि.स.स.<br>८) श्री. अमित झनक, वि.स.स.<br>९) श्री. सुनील केदार, वि.स.स.<br>१०) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.<br>११) श्री. बळवंत वानखडे, वि.स.स.<br>१२) श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स.<br>१३) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. | सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ८ — महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ | निरंक | नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही. |
| ३ | १) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.<br>२) श्री. नाना पटोले, वि.स.स.<br>३) श्री. संजय जगताप, वि.स.स.<br>४) श्री. सुरेश वरपुडकर, वि.स.स.<br>५) श्री. अमीन पटेल, वि.स.स.<br>६) श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स.<br>७) श्री. अस्लम शेख, वि.स.स.<br>८) श्री. अमित झनक, वि.स.स.<br>९) श्री. सुनील केदार, वि.स.स.<br>१०) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.<br>११) श्री. बळवंत वानखडे, वि.स.स.<br>१२) श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स.<br>१३) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स.<br>१४) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. | सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ९ — महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) अध्यादेश, २०२३ | निरंक | नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही. |

* * *

# विवरण क्रमांक १६

## (अ) महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३-२०२४ च्या पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान दिनांक ११ व १२ डिसेंबर, २०२३ रोजी मागण्या मंजूर झाल्या.

**पुरवणी मागण्यांवर चर्चेसाठी प्राथम्यक्रमात असलेले विभाग**

| अ. क्र. | विभागाचे नाव | एकूण मागण्या | | मागण्यावर चर्चा व मतदानाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | | (४) |
| (१) | महसूल व वन विभाग | ०४ | | दिनांक ११ डिसेंबर, २०२३ |
| (२) | नगविकास विभाग | ०४ | | |
| (३) | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग | ०२ | | |
| (४) | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | ०८ | | दिनांक १२ डिसेंबर, २०२३ |
| (५) | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | ०१ | | |
| (६) | इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग | ०२ | | |
| | **एकूण** | **२१** | | |

**(ब) दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चारोधानंतर मतास टाकण्यात आलेल्या पुरवणी खर्चाच्या मागण्या**

| अ. क्र. | विभागांची नावे | एकूण मागण्या |
|---|---|---|
| (१) | सामान्य प्रशासन विभाग | ०२ |
| (२) | गृह विभाग | ०७ |
| (३) | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | ०३ |
| (४) | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ०२ |
| (५) | वित्त विभाग | ०४ |

| अ. क्र. | विभागांची नावे | एकूण मागण्या |
|---|---|---|
| (६) | सार्वजनिक बांधकाम विभाग | ०७ |
| (७) | जलसंपदा विभाग | ०२ |
| (८) | विधि व न्याय विभाग | ०३ |
| (९) | ग्रामविकास विभाग | ०४ |
| (१०) | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ०२ |
| (११) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | ०२ |
| (१२) | नियोजन विभाग | ४० |
| (१३) | गृहनिर्माण विभाग | ०१ |
| (१४) | सार्वजनिक आरोग्य विभाग | ०३ |
| (१५) | आदिवासी विकास विभाग | ०२ |
| (१६) | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ०१ |
| (१७) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ०५ |
| (१८) | महिला व बालविकास विभाग | ०२ |
| (१९) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | ०१ |
| (२०) | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय | ०२ |
| (२१) | पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग | ०१ |
| (२२) | अल्पसंख्याक विकास विभाग | ०२ |
| (२३) | मृद व जलसंधारण विभाग | ०२ |
| | **एकूण मागण्या** | **१००** |
| | **एकूण : २१ + १०० = १२१**<br>**(अ) (ब)** | |

# विवरण क्रमांक १७

## सन २०२३-२०२४ चे पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील कपात सूचना

| अ. क्र. | विभाग | एकूण | मान्य | अमान्य | चर्चा व मतदानाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | महसूल व वन विभाग | १९ | ११ | ८ | दिनांक ११ डिसेंबर, २०२३ |
| २ | नगरविकास विभाग | ५७ | ३७ | २० | |
| ३. | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग | ११ | ६ | ५ | |
| ४. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | ३० | १२ | १८ | दिनांक १२ डिसेंबर, २०२३ |
| ५. | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | ९ | ९ | ० | |
| ६ | इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग | ९ | ६ | ३ | |
| | **एकूण** | **१३५** | **८१** | **५४** | |

| अ. क्र. | **प्राथम्यक्रमात नसलेल्या विभागांची नावे** | |
|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन विभाग | सदर विभाग प्राथम्यक्रमात नसल्यामुळे त्या विभागांवर कपात सूचना स्विकारण्यात आल्या नाहीत. |
| २ | गृह विभाग | |
| ३ | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | |
| ४ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | |
| ५ | वित्त विभाग | |
| ६ | सार्वजनिक बांधकाम विभाग | |
| ७ | जलसंपदा विभाग | |
| ८ | विधि व न्याय विभाग | |
| ९ | ग्रामविकास विभाग | |
| १० | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | |
| ११ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | |
| १२ | नियोजन विभाग | |
| १३ | गृहनिर्माण विभाग | |
| १४ | सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| १५ | आदिवासी विकास विभाग | |
| १६ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | |
| १७ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | |
| १८ | महिला व बालविकास विभाग | |
| १९ | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | |
| २० | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय | |
| २१ | पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग | |
| २२ | अल्पसंख्याक विकास विभाग | |
| २३ | मृद व जलसंधारण विभाग | |

# विवरण क्रमांक १८

## सन २०२३-२०२४ च्या पुरवणी विनियोजन विरोधक (पुरवणी विनियोजन विधेयक दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी संमत झाले) पुरवणी विनियोजन विधेयकावरील मुद्दे

| सदस्यांचे नाव | स्विकृत | अस्विकृत | एकूण |
|---|---|---|---|
| श्री. नाना पटोले, वि.स.स. | ६ | २ | ८ |
| श्री. सुनिल केदार, वि.स.स. | ४ | ३ | ७ |
| **एकूण** | **१०** | **५** | **१५** |

# विवरण क्रमांक १९

## अध्यक्षांना पदावरून दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ११ अन्वये)

**निरंक**

* * *

# विवरण क्रमांक २०

## उपाध्यक्षांना पदावरून दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ११ अन्वये)

**निरंक**

* * *

# विवरण क्रमांक २१

## निंदाव्यंजक प्रस्ताव

(म.वि.स. नियम २३ अन्वये)

| अ. क्र. | सदस्याचे नाव | विषय | सभागृहात मांडल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री. विजय वडेट्टीवार, मा. विरोधी पक्ष नेता | "अतिवृष्टी, दुष्काळ व अवकाळीमुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याबाबत सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहात महाराष्ट्र विधानसभा नियम १०१ अन्वये अल्पकालिन चर्चा उपस्थित करण्यात आली. या प्रस्तावावर विधानसभा सभागृहात सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ व मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी सर्वपक्षीय चर्चा करण्यात आली. राज्यात झालेली अतिवृष्टी, त्यानंतर पडलेल्या दुष्काळ व त्यानंतर अवकाळी पाऊस एकाच वर्षात अशा एका पेक्षा एक नैसर्गिक आपत्ती ओढविलेली असताना, अद्याप शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही. पीक विमा कंपन्यांच्या मुजोरपणामुळे शेतकरी पीक विम्यापासूनही वंचित राहीला आहे. याबाबत तातडीने रोख मदत जाहीर करण्याची आवश्यकता असताना चर्चेच्या माध्यमातून शासनाकडे मागणी करण्यात आली. विधानसभेच्या प्रचलित प्रथा व परंपरेनुसार या प्रस्तावावर सभागृहात चर्चा संपल्याबरोबर संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांनी त्यास ठोस उत्तर देणे अपेक्षित असते. तथापि, सदर प्रस्तावावर चर्चा होऊन चार दिवस उलटले असून शेतकरी हवालदील झालेला असतनाही आजमितीस शासनाकडून कोणतेही उत्तर सभागृहास देण्यात आलेले नाही अथवा कोणतीही मदत नुकसानग्रस्तांस करण्यात आलेली नाही. यावरून शेतकऱ्यांप्रती शासनाच्या असलेल्या उदासिनतेचा हे सभागृह या ठरावाद्वारे तीव्र निषेध करीत आहे." | १८ डिसेंबर, २०२३ |

# विवरण क्रमांक २२

## म.वि.स. नियम ३५ अन्वये एखाद्या व्यक्तीविरुद्ध करावयाच्या अभिकथनासंबंधी दिलेल्या सूचना

**निरंक**

* * *

# विवरण क्रमांक २३

## म.वि.स. नियम ४७ अन्वये मंत्र्यांनी केलेली निवेदन

| अ. क्र. (१) | मंत्री (२) | विषय (३) | सभागृहात निवेदन केल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १ | डॉ. सुरेश खाडे, कामगार मंत्री | मौजे तळवडे, पुणे येथील मेणबत्ती तयार करण्यात येणाऱ्या कारखान्यास लागलेल्या आगीच्या दुर्घटनेबाबत | १३ डिसेंबर, २०२३ |
| २ | श्री. एकनाथ शिंदे, मा. मुख्य मंत्री | राज्यातील राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी समन्वय संघटनेने आपल्या विविध मागण्यांसाठी दिलेल्या निवेदनाबाबत | १४ डिसेंबर, २०२३ |
| ३ | श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उप मुख्यमंत्री | वर्धा जिल्ह्यातील प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालयाबाबत | २० डिसेंबर, २०२३ |
| ४ | श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री | राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर ५ रुपये अनुदान देण्याबाबत | २० डिसेंबर, २०२३ |
| ५ | कु. आदिती तटकरे, महिला व बाल विकास मंत्री | घाटकोपर पूर्व (मुंबई उपनगर) येथील घरपोच आहार पुरवठा (THR) संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेली कारवाईबाबत | २० डिसेंबर, २०२३ |
| ६ | कु. आदिती तटकरे, महिला व बाल विकास मंत्री | राज्यातील बालकांचे कुपोषण व बाल-मृत्यूबाबत | २० डिसेंबर, २०२३ |

# विवरण क्रमांक २४

## सदस्यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

(म.वि.स. नियम ४८ अन्वये)

**निरंक**

* * *

# विवरण क्रमांक २५

## नियम स्थगित करण्याबाबतचा प्रस्ताव

म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव

| | |
|---|---|
| एकूण प्राप्त झालेले प्रस्ताव | २२ |
| मान्य झालेले प्रस्ताव | — |
| अमान्य झालेले प्रस्ताव | २२ |

| अ. क्र. | दिनांक | सदस्यांची नावे | विषय | मान्य/ अमान्य |
|---|---|---|---|---|
| १ | ८ डिसेंबर २०२३ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | राज्यात अनेक जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसान भरपाई-साठी विशेष पॅकेज जाहीर करण्याबाबत. | अमान्य |
| २ | ८ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ भरीव आर्थिक मदत देणेसंबंधी. | अमान्य |
| ३ | ११ डिसेंबर २०२३ | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स | कांदा निर्यातीवर बंदीमुळे राज्यातील शेतकरी अडचणी आल्याबाबत. | अमान्य |
| ४ | १२ डिसेंबर २०२३ | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स | राज्यातील सरकारी-निमसरकारी शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याबाबत. | अमान्य |

| अ. क्र. | दिनांक | सदस्यांची नावे | विषय | मान्य/ अमान्य |
|---|---|---|---|---|
| ५ | १२ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | समृद्धी महामार्गावर अपघातग्रस्त झालेल्या मृतांचया कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत. | अमान्य |
| ६ | १२ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | राज्यात आरोग्य सेवेचा बोजवारा उडाल्याबाबत. | अमान्य |
| ७ | १३ डिसेंबर २०२३ | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स | राज्यातील सरकारी-निमसरकारी शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याबाबत दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी बेमुदत संपावर जाण्याचा देण्यात आलेला इशारा. | अमान्य |
| ८ | १३ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | राज्यात आरोग्य सेवेचा बोजवारा उडाल्याबाबत. | अमान्य |
| ९ | १३ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | समृद्धी महामार्गावर दिनांक १ जुलै, २०२३ रोजी झालेल्या भीषण अपघातामध्ये मृत्यू पावलेल्या २० परिवारातील २५ मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २५ लाख रूपयांची आर्थिक मदत देण्यात येईल अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेची तातडीने पुर्तता करणे यासंबंधी. | अमान्य |

| अ. क्र. | दिनांक | सदस्यांची नावे | विषय | मान्य/ अमान्य |
|---|---|---|---|---|
| १० | १४ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | समृद्धी महामार्गावर दिनांक १ जुलै, २०२३ रोजी झालेल्या भीषण अपघातामध्ये मृत्यू पावलेल्या २० परिवारातील २५ मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २५ लाख रूपयांची आर्थिक मदत देण्यात येईल अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेची तातडीने पुर्तता करणे यासंबंधी. | अमान्य |
| ११ | १५ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | रूधाना, ता. संग्रामपूर (जि. बुलढाणा) येथील शेतकरी श्री. विठ्ठल उगळकार यांच्या शेतामध्ये विद्युत कनेक्शन नसतानाही महावितरणाने त्यांच्या नावे तब्बल ८५ हजार रूपयांचे वीज बील दिल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी उघडकीस येणे. | अमान्य |
| १२ | १५ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | मुक्तळ, ता. बोदवड (जि. जळगाव) येथील इ. पहिली ते सातवी पर्यंतच्या शाळेत १५१ विद्यार्थी शिक्षण घेत असताना या शाळेत केवळ दोनच शिक्षक असल्याची धक्कादायक बाब दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी उघडकीस येणे. | अमान्य |

| अ. क्र. | दिनांक | सदस्यांची नावे | विषय | मान्य/ अमान्य |
|---|---|---|---|---|
| १३ | १८ डिसेंबर २०२३ | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स | कोंढाळी-नागपूर महामार्गावरील सोलर एक्सपोसिव्ह लिमिटेड या दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीत दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी भीषण स्फोट ९ कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत. | अमान्य |
| १४ | १८ डिसेंबर २०२३ | श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, वि. स. स | नागपूर बाजारगांव येथील स्फोटक निर्मिती कंपनीत झालेल्या स्फोटात ९ कामगारांचा झालेला मृत्यू. | अमान्य |
| १५ | १८ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | नागपूर जिल्ह्यातील बाजार गाव येथे संरक्षण क्षेत्रासाठी शस्त्रास्त्रांचे उत्पादन करणाऱ्या सोलर ग्रुपच्या इकॉनॉमिक एक्सप्लोजिव्ह लिमिटेड या कंपनीत झालेल्या स्फोटात ९ कामगारांचा मृत्यू झाला. | अमान्य |
| १६ | १८ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | जळीत रूग्णांवर अद्ययावत उपचार करण्यासाठी N.P.P.M.B. हा प्रकल्प पूर्णत्वास नेणेसंबंधी. | अमान्य |

| अ. क्र. | दिनांक | सदस्यांची नावे | विषय | मान्य/ अमान्य |
|---|---|---|---|---|
| १७ | १८ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | नागपूर जिल्ह्यातील बाजार गाव येथे संरक्षण क्षेत्रासाठी शस्त्रास्त्रांचे उत्पादन करणाऱ्या सोलर ग्रुपच्या इकॉनॉमिक एक्सप्लोजिव्ह लिमिटेड या कंपनीत स्फोट होऊन ९ कामगारांचा झालेला मृत्यू. | अमान्य |
| १८ | १८ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती अपघातामध्ये मृत पावल्यामुळे घरातील कर्ता पुरूष निघून गेल्याने त्यांच्या कुटुंबियांना आधार मिळण्यासाठी किमान २५ लाख रूपये आर्थिक मदत देणेसंबंधी. | अमान्य |
| १९ | १९ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | आगीत भाजलेल्या रूग्णांवर अद्ययावत उपचार करण्यासाठी N.P.P.M.B. हा प्रकल्प पूर्णत्वास नेणेसंबंधी. | अमान्य |
| २० | १९ डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती अपघातामध्ये मृत पावल्यामुळे घरातील कर्ता पुरूष निघून गेल्याने त्यांच्या कुटुंबियांना आधार मिळण्यासाठी किमान २५ लाख रूपये आर्थिक मदत देणेसंबंधी. | अमान्य |

| अ. क्र. | दिनांक | सदस्यांची नावे | विषय | मान्य/ अमान्य |
|---|---|---|---|---|
| २१ | २० डिसेंबर २०२३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स | आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला १ लाख रूपये मदत देण्याऐवजी कमीत कमी ३ लाख रूपये मदत देणेसंबंधी. | अमान्य |
| २२ | २० डिसेंबर २०२३ | श्री. अशोकराव चव्हाण, वि. स. स | मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत राज्य सरकारने सुस्पष्ट भूमिका व दिशा जाहीर करण्याची आग्रही मागणीबाबत. | अमान्य |

# विवरण क्रमांक २६

## अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) सर्वसाधारण

| अ.क्र<br>(१) | सदस्यांचे नांव<br>(२) | विषय<br>(३) | सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| १ | श्री. अस्लम शेख, वि.स.स. | मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दिनांक १८ मे, १९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू केलेली असणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात आलेली असणे, परंतु सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळाला असून २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळ्यांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी होऊ शकलेले नसणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पन्नधारक असणे, अनेक गाळेधारकांकडे पैसे नसल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळेधारकांसाठी नवीन विक्री योजना जाहीर करून निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | १४ डिसेंबर, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |

| अ.क्र<br>(१) | सदस्यांचे नांव<br>(२) | विषय<br>(३) | सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| २ | श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. | "पुणे जिल्ह्यातील हवेली तालुका अंतर्गत सिंहगड किल्ला हा ऐतिहासिक असणे, सदर किल्ल्यावर दरवर्षी दीड ते दोन कोटी इतिहासप्रेमी, निसर्गप्रेमी, गडप्रेमी, पर्यटक भेटी देत असणे, सिंहगड किल्ल्याच्या एकूण ३१.२६ हेक्टर क्षेत्रापैकी २६.२६ हेक्टर वन विभागाच्या अखत्यारीत असणे, या किल्ल्याची मोठ्याप्रमाणात पडझड झालेली असणे, आजमितीपर्यंत या किल्ल्यास पाहीजे तसा भरीव निधी प्राप्त झाला नसल्यामुळे दुरुस्ती व विकासाची अनेक कामे निधी अभावी प्रलंबित असणे, पर्यटन विभाग, पुरातत्व विभाग, वन विभाग, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग इत्यादी विभागांचा एकत्रितपणे सर्वसमावेशक विकास आराखडा प्रलंबित असणे, सिंहगड किल्ल्यावर भगवा ध्वज बसविण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, परंतु महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे वारंवार पत्रव्यवहार, बैठक, दूरध्वनीद्वारे संपर्क साधून देखील त्यांनी याकडे जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला आवश्यक त्या सर्व ना हरकतीसह प्रस्ताव देखील सादर होणे, भगवा ध्वज बसविण्याच्या कामाचा शुभारंभ निश्चित कालमर्यादेत करण्याची आवश्यकता असणे, छत्रपती राजाराम महाराज समाधी स्थळाची पडझड व दुरवस्था झालेली असणे, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने | १४ डिसेंबर, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |

| अ.क्र<br><br>(१) | सदस्यांचे नांव<br><br>(२) | विषय<br><br>(३) | सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | | सिंहगड किल्ल्यासाठी पाणीपुरवठा योजनेसाठी वारंवार पाठपुरावा करून देखील योजना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षतेमुळे प्रलंबित असणे, सिंहगड किल्ल्यावरील कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या अनेक वास्तू, बांधकामे उद्‌घाटन, लोकार्पण होऊनही वापराविना पडून असणे, तळई उद्यान पर्यटकांसाठी खुले करण्याची आवश्यकता, प्रवेश शुल्काच्या निधीच्या खर्चामध्ये अनियमितता आढळून येणे, वन विभागाच्या वाजवी हस्तक्षेपामुळे सिंहगड किल्ल्याचा विकास व सुधारणा प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असणे, आराखड्यात अमृतेश्वर मेट व कळकीचे मेट या आदिवासी पाड्यांचा, कोळीवाड्यांचा समावेश करण्याची आवश्यकता, मौजे घेरा सिंहगड ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील आतकरवाडीला गावठाण दर्जा मिळणे प्रलंबित असणे, किल्ले सिंहगडाचे गतवैभव पुनश्चः मिळवून देण्यासाठी सिंहगड किल्ल्याचा एकत्रितपणे सर्वसमावेशक असा परिपूर्ण विकास आराखड्याकरिता आवश्यक असलेला निधी शासनाने तात्काळ मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | |

| अ.क्र<br><br><br>(१) | सदस्यांचे नांव<br><br><br>(२) | विषय<br><br><br>(३) | सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अश्विनी जगताप, वि.स.स. | " उद्योगनगरी पुनावळे येथील पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या हद्दीतील वनविभागाची २६ हेक्टर जागा असून सदर जागा महानगर पालिका प्रशासनाने मागणी केल्याने महानगर पालिकेकडे हस्तांतरित करण्यात येणे, सदर जागेवर पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेने सन २००८ साली कचरा डेपोसाठी आरक्षण टाकण्यात येणे, त्यावेळी तेथे नागरीकरण नसणे, तथापि गत पंधरा वर्षात या भागात विविध शैक्षणिक संस्था, मोठे गृह प्रकल्प, पुनावळे लगत हिंजवडी आय टी पार्क असल्याने अनेक ठिकाणाहून नागरिक, अभियंते येथे नोकरी व व्यवसायानिमित्त स्थायिक होत असल्याने तेथे लोकसंख्या वाढण्याची शक्यता असणे, पुनावळे कचरा डेपोसाठी वन विभागाची ५७ एकर जागा संपादित झाल्यास संपूर्ण परिसरातील वृक्ष नष्ट होण्याचा धोका निर्माण होणे, सदर भाग हा उंच डोंगराचा असल्याने पावसाळ्यात कचरा डेपोतील दुषित पाणी सखल भागात व पवनेच्या पात्रात येऊन पिण्याचे पाणी दुषित होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती निर्माण होणे, पुनावळे येथील आरक्षित जागेच्या बदल्यात पालिकेच्या वतीने वन विभागाला चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा, अंधारी व्याघ्रप्रकल्प शेजारील २२ हेक्टर खाजगी जमीन ९ कोटी रुपयांना खरेदी करून देण्याच्या महानगरपालिका प्रशासनाच्या प्रस्तावास | १४ डिसेंबर, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |

| अ.क्र<br><br><br>(१) | सदस्यांचे नांव<br><br><br>(२) | विषय<br><br><br>(३) | सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | | तातडीने स्थगिती देण्याची आवश्यकता, पिंपरी-चिंचवड शहरातील औद्योगिकीकरण लक्षात घेता शुद्ध हवेची पातळी आधीच खालावलेली असताना पुनावळे येथे वृक्ष तोड करून कचरा डेपो बनविण्याचा प्रस्ताव अनाकलनीय आणि अव्यवहारिक असणे, पुनावळे येथे कचरा डेपो झाल्यास येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता, सध्या वन विभागाच्या २६ हेक्टर जागेवरती अनेक प्रकारची दाट वृक्षे असून सदर कचरा डेपो येथे निर्माण केल्यास या जागेवरील संपूर्ण वृक्षतोड करावी लागल्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होणे, पुणे विमानतळापासून पुनावळेचे अवकाशातील अंतर केवळ ११ किमी असून कायद्यानुसार हे अंतर किमान २० किमी आवश्यक असतानाही महानगर पालिका कायद्यातील तरतुदींचे पालन न करणे, पुनावळे येथील कचरा डेपोसाठी राखीव असलेल्या वन विभागाच्या जागेचे महानगर पालिकेकडून हस्तांरणाच्या प्रक्रियेस तातडीने स्थगिती देण्याची आवश्यकता, उद्योग नगरीतील सर्वपक्षीय नागरिक तसेच हौसिंग फेडरेशन, सामाजिक संस्था, पर्यावरण संरक्षक संस्था यांची पुनावळे कचरा डेपो रद्द करण्याची होत असलेली आग्रहाची मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | |

# विवरण क्रमांक २७

## मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ९५ अन्वये)

काही नाही.

# विवरण क्रमांक २८

## मंत्रिमंडळावर विश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव

(म.वि.स. नियम २३ अन्वये)

निरंक.

# विवरण क्रमांक २९

## स्थगन प्रस्ताव

(म.वि.स. नियम ९७ अन्वये)

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | अतिवृष्टी, दुष्काळ व अवकाळी पावसामुळे उद्धवस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याबाबत. | अमान्य | ७ डिसेंबर, २०२३ |
| २ | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | अतिवृष्टी, दुष्काळ व अवकाळी पावसामुळे उद्धवस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ३ | श्री. अबू आजमी, वि.स.स. | मुंबई शहरातील रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे होत असलेले अपघात | अमान्य | ८ डिसेंबर, २०२३ |
| ४ | श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. | दिनांक २५, २६ व २७ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यात झालेला गारपिटीसह अवकाळी पाऊसाने झालेले शेतकऱ्यांचे नूकसान.. | अमान्य | -- " -- |
| ५ | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | दूध दर कमी होत असल्याने दूध संघांना प्रति लिटर अनुदान देण्याची होत असलेली मागणी. | अमान्य | -- " -- |
| ६ | श्री. सुनिल केदार, वि.स.स. | दिनांक २५, २६ व २७ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यात झालेला गारपिटीसह अवकाळी पाऊसाने झालेले शेतकऱ्यांचे नुकसान. | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ७ | श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. | शेतकऱ्यांना मिळालेल्या कांदा अनुदानाची रक्कम परत करण्यासाठी संचालक मंडळाकडून दलालामार्फत शेतकऱ्यांवर दबाव टाकत असल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ८ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | राज्यात कापूस जिनिंग-प्रेसिंग बंद असल्याने २५ हजार कामगार बेरोजगार झाल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ९ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | दिनांक २५, २६ व २७ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यात झालेला गारपिटीसह अवकाळी पाऊसाने झालेले शेतकऱ्यांचे नुकसान. | अमान्य | -- " -- |
| १० | श्री. सुनिल केदार, वि.स.स. | गडचिरोली जिल्ह्यातील गुंडापुरात तीन जणाची झालेली हत्या | अमान्य | -- " -- |
| ११ | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | माता व बालमृत्यू रोखण्यात शासनाला आलेले अपयश | अमान्य | ११ डिसेंबर, २०२३ |
| १२ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | राज्यातील सरकारी-निमसरकारी शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| १३ | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | रायगड जिल्ह्यातील नैना प्रकल्प रद्द करुन "एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली" (युडीसीपीआर) लागू करणे व इतर मागण्यांसाठी दिनांक ६ डिसेंबर, २०२३ रोजीपासून शेतकरी व भूमिपूत्र आमरण उपोषणास बसणे. | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १४ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | महाबीज महामंडळामध्ये २९१ पदे रिक्त असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांवर वाढत असलेला ताण. | अमान्य | १२ डिसेंबर, २०२३ |
| १५ | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | भ्रष्टाचारासोबत दंगलीतही राज्याचा देशात अव्वल नंबर असणे. | अमान्य | -- " -- |
| १६ | श्री. सुनिल केदार, वि.स.स. | कारवाफा (ता.धानोरा, जि. गडचिरोली) येथील कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर अवघ्या ४८ तासातच साधना संजय जराते या महिलेचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे जिल्हा सामान्य रूग्णालय, गडचिरोली येथे झालेला मृत्यू. | अमान्य (दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी निवेदन झाले.) | १३ डिसेंबर, २०२३ |
| १७ | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | जव्हार (जि.पालघर) येथील आदिवासी मुलांच्या शाळा व शौचालयांची झालेली दुरावस्था. | अमान्य | -- " -- |
| १८ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | नागपूर येथील वसंतराव नाईक ऑडिटोरियमचे १२ वर्षे लोटूनही भूमिपूजन न झाल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| १९ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | दिनांक १ जुलै, २०२३ रोजी समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघामध्ये मृत्यू पावलेल्या मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून केवळ ५ लाख रूपये आणि पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रूपये अशी एकूण ७ लाख रूपयांची अत्यल्प मदत दिल्याबाबत. | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | विषय (३) | निर्णय (४) | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख (५) |
|---|---|---|---|---|
| २० | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | राज्यात शासकीय रुग्णालयात औषधांसह जीवरक्षक औषधांचा तुटवडा, डॉक्टरांची रिक्त पदे, वैद्यकीय उपकरणांचा अभाव, अनाकलनीय कारणास्तव औषध खरेदीस होणारा विलंब त्यामुळे रुग्णांचा होत असलेला मृत्यू. | अमान्य | -- " -- |
| २१ | श्री. सुनिल केदार, वि.स.स. | बोदवड (जि. जळगाव) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना पटांगणावर एकत्र बसवून पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण सर्वच विद्यार्थ्यांना एकत्र देण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना माणसिक त्रास सहन करावा लागत असल्याबाबत. | अमान्य | १४ डिसेंबर, २०२३ |
| २२ | श्री. सुनिल केदार, वि.स.स. | नागपूर बुटीबोरी परिसरातील पंतजली फूड कंपनीत कुलींग टॉवरचे काम करतांना कामगाराचा झालेला मृत्यू. | अमान्य | -- " -- |
| २३ | श्री. रवींद्र धंगेकर, वि.स.स. | पुणे खडकवासला साखळी प्रकल्पातील पाणीसाठी कमी होत असल्याने शहरावर पाणीटंचाईचे निर्माण झालेले सावट. | अमान्य | -- " -- |
| २४ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | राज्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या संगणक परिचालकांच्या मागण्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| २५ | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करुन फलटण तालुक्यात एका तासात १६ महिलांची केलेली गर्भलिंग निदान चाचणी. | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २६ | श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. | १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत राज्याला रुपये २२,७१३ कोटीचा निधी न मिळाल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| २७ | श्री. कुणाल पाटील, वि.स.स. | दहा हजार आदिवासी शेतकऱ्यांचा महामोर्च्याच्या शिष्टमंडळास पाच तास विधानभवनाबाहेर बसवून ठेवण्यात आल्याबाबत. | अमान्य | १५ डिसेंबर, २०२३ |
| २८ | श्री. सुनिल केदार, वि.स.स. | दहा हजार आदिवासी शेतकऱ्यांचा महामोर्च्याच्या शिष्टमंडळास पाच तास विधानभवनाबाहेर बसवून ठेवण्यात आल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| २९ | श्री. सुभाष धोटे, वि.स.स. | दहा हजार आदिवासी शेतकऱ्यांचा महामोर्च्याच्या शिष्टमंडळास पाच तास विधानभवनाबाहेर बसवून ठेवण्यात आल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ३० | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | रूधाना, (ता. संग्रामपूर, जि.बुलढाणा) येथील शेतकरी श्री. विठ्ठल उगळकार यांच्या शेतामध्ये विद्युत कनेक्शन नसतानाही महावितरणने त्यांच्या नावे तब्बल ८५ हजार रूपयांचे वीज बील दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे. | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ३१ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | मुक्तळ, (ता. बोदवड, जि. जळगाव) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना पटांगणावर एकत्र बसवून पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण सर्वच विघार्थ्यांना एकत्र देण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना माणसिक त्रास सहन करावा लागत असल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ३२ | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. | नागपूर पश्चिम येथील गौरखेडे कॉम्प्लेक्सजवळ रस्त्याच्या बाजूला असलेला खोल खड्डा नागपूर महानगरपालिकेचे अधिकाऱ्यांनी कचरा, हिरवा कचरा टाकून भरल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ३३ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | राज्यातील सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत. | अमान्य | -- " -- |
| ३४ | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. | नागपूर महानगरपालिकेने नोव्हेंबर, २०१९ मध्ये दोन खाजगी कंपनी A G Enviro आणि बिव्हीजी इंडिया यांना शहरातील कचरा संकलन आणि भांडेवाडी डंपिंग यार्डपर्यंत वाहतूक करण्यासाठी नियुक्त केल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ३५ | श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. | १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत राज्याला रुपये २२,७१३ कोटी निधी न मिळाल्याबाबत. | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ३६ | श्री. सुनिल केदार, श्री. सुभाष धोटे, वि.स.स. | किरणापूर (ता.सावनेर, जि. नागपूर) येथे प्रकल्पाच्या नावाने शासनाची करोडो रूपयाची फसवणूक केल्याबाबत. | अमान्य | १८ डिसेंबर, २०२३ |
| ३७ | श्री. सुनिल केदार, वि.स.स. | चाकडोह (जि. नागपूर) येथील सोलार एक्सप्लोसिव कंपनीत दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता झालेल्या स्फोटात ६ महिला व ३ पुरुषांसह एकूण ९ कामगारांचा मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना. | अमान्य (दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी निवेदन झाले.) | -- " -- |
| ३८ | श्री. कुणाल पाटील, वि.स.स. | चाकडोह (जि. नागपूर) येथील सोलार एक्सप्लोसिव कंपनीत दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता झालेल्या स्फोटात ६ महिला व ३ पुरुषांसह एकूण ९ कामगारांचा मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना. | अमान्य (दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी निवेदन झाले.) | -- " -- |
| ३९ | श्री. सुनिल केदार, वि.स.स. | नागपूर कोटोल मार्गावर ट्रकने क्लासिक गाडीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाल्याबाबत. | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ४० | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | चाकडोह (जि. नागपूर) येथील सोलार एक्सप्लोसिव कंपनीत दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता झालेल्या स्फोटात ६ महिला व ३ पुरुषांसह एकूण ९ कामगारांचा मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना. | अमान्य (दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी निवेदन झाले.) | -- " -- |
| ४१ | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | चाकडोह (जि. नागपूर) येथील सोलार एक्सप्लोसिव कंपनीत दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता झालेल्या स्फोटात ६ महिला व ३ पुरुषांसह एकूण ९ कामगारांचा मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना. | अमान्य (दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी निवेदन झाले.) | -- " -- |
| ४२ | श्री. अनिल देशमुख, श्री. रोहित पवार, वि.स.स. | चाकडोह (जि. नागपूर) येथील सोलार एक्सप्लोसिव कंपनीत दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता झालेल्या स्फोटात ६ महिला व ३ पुरुषांसह एकूण ९ कामगारांचा मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना. | अमान्य (दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी निवेदन झाले.) | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ४३ | श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. | चाकडोह (जि. नागपूर) येथील सोलार एक्सप्लोसिव कंपनीत दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता झालेल्या स्फोटात ६ महिला व ३ पुरुषांसह एकूण ९ कामगारांचा मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना. | अमान्य (दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी निवेदन झाले.) | -- " -- |
| ४४ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | चाकडोह (जि. नागपूर) येथील सोलार एक्सप्लोसिव कंपनीत दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता झालेल्या स्फोटात ६ महिला व ३ पुरुषांसह एकूण ९ कामगारांचा मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना. | अमान्य (दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी निवेदन झाले.) | -- " -- |
| ४५ | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. | नागपूर पश्चिम येथील गौरखेडे कॉम्प्लेक्सजवळ रस्त्याच्या बाजूला सुमारे १० मीटर किंवा त्याहून अधिक खोल खड्डे असल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| ४६ | श्री. संग्राम थोपटे, वि.स.स. | दुध महासंघातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
| --- | --- | --- | --- | --- |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ४७ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | चाकडोह (जि. नागपूर) येथील सोलार एक्सप्लोसिव कंपनीत दिनाक १७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता झालेल्या स्फोटात ६ महिला व ३ पुरुषांसह एकूण ९ कामगारांचा मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना. | अमान्य (दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी निवेदन झाले.) | -- " -- |
| ४८ | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | सांगली जिल्ह्यातील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामरोजगारसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक यांनी त्यांच्या विविध मागण्यां मान्य करण्यात याव्यात, यासाठी दि.१९/१२/२०२३ रोजी सांगली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या पंचायत समिती कार्यालयासमोर केलेले धरणे आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय. | अमान्य | -- " -- |
| ४९ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | राज्यातील पोलीस पाटलांच्या प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत. | अमान्य | -- " -- |
| ५० | श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. | पुणे महानगरपालिकेने बंडगार्डन पासून मुंडव्यापर्यंत असा पाच ते सहा किलोमीटर लांबीचा रस्ता नदीपात्रामध्ये ब्लू लाईनच्या आत तयार करण्याबाबत. | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ५१ | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | करोनाचा नवा व्हेरियन्ट JN-1 या संक्रमित विशाणुचे संक्रमण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करणेबाबत. | अमान्य | १९ डिसेंबर, २०२३ |
| ५२ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | आगीत भाजलेल्या रूग्णांवर अद्ययावत उपचार करण्यासाठी N.P.P.M.B. हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ५३ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | अपघातामध्ये मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना शासनाकडून किमान २५ लाख रूपये आर्थिक मदत देण्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ५४ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | महाराष्ट्र राज्यातील तमाम पंचायत समिती सदस्यांच्या मूलभूत मागण्या तातडीने पूर्ण करण्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ५५ | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | चेंबूर येथील शासकीय मुलामुलींच्या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना मिळत असलेले निकृष्ट दर्जाचे जेवण | अमान्य | -- " -- |
| ५६ | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. | नागपूर पश्चिम येथील गौरखेडे कॉम्प्लेक्सजवळ गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याबाबत. | अमान्य | -- " -- |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ५७ | श्री. सुनिल केदार, वि.स.स. | अवैध दारू विक्रेताने चारचाकी वाहनाने सहाजणांना चिरडल्यामुळे तीन जनांचा झालेला मृत्यू व तिघे गंभीर जखमी झाल्याबाबत. | अमान्य | २० डिसेंबर, २०२३ |
| ५८ | श्री. रोहित पवार, श्री. अनिल देशमुख, वि.स.स. | दिनांक १६ डिसेंबर २०२३ रोजी लातूर येथे झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंता परीक्षेत गैरव्यवहार झाल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ५९ | श्री. अनिल देशमुख, श्री. रोहित पवार, वि.स.स. | विधानभवन परिसरात युवा शेतकऱ्यांचे आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ६० | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी भागात परप्रांतीय निराधारांकडून वेठबिगारीची कामे करुन घेणेबाबत. | अमान्य | -- " -- |
| ६१ | श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स. | मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत राज्य सरकारने सुस्पष्ट भूमिका व दिशा जाहीर करण्याबाबत. | अमान्य | -- " -- |

# विवरण क्रमांक ३०

## सभागृहात उपस्थित करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे

| क्रमांक<br>(१) | सदस्याचे नाव<br>(२) | थोडक्यात विषय<br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| १ | श्री. बळवंत वानखडे, वि.स.स. | महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या संपावर तोडगा काढण्याबाबत. | १५ डिसेंबर, २०२३ |
| २ | श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. | जत तालुक्यातील जनावरांना लाल कुडतरीच्या रोगाची लागण झाली असून त्यांना लवकरात लवकर या आजारावर लस उपलब्ध करून देण्याबाबत. | -- " -- |
| ३ | श्री. रोहित पवार, वि.स.स. | कर्जत तालुक्यातील ५४ गावांना कुकडी धरण प्रकल्पातून पाणी पुरवठा करण्याबाबत. | -- " -- |
| ४ | श्री. राजेश एकडे, वि.स.स. | सहकारी सूतगिरणी येथे काम करणाऱ्या सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांचा पगार तातडीने करण्याबाबत. | -- " -- |
| ५ | श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स. | सालेकसा तालुक्यातील गोरले व देवरी तालुक्यातील पालांदूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्याबाबत. | -- " -- |
| ६ | ॲड आशिष जैस्वाल, वि.स.स. | संगणक चालक, परिचारिका, पोलीस पाटील आणि शालेय पोषण आहार योजनेतील कर्मचाऱ्यांना मानधनामध्ये महागाई निर्देशांक दरानुसार वाढ करण्याबाबत. | -- " -- |
| ७ | श्री. सिध्दार्थ शिरोळे, वि.स.स. | पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी विद्यालय, पॉलिटेक्निक, कृषी महाविद्यालय या संस्थांची मैदाने नागरिकांना फिरण्यासाठी आणि तरुणांना मैदानी खेळ खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्याबाबत. | -- " -- |

| क्रमांक<br><br><br><br>(१) | सदस्याचे नाव<br><br><br><br>(२) | थोडक्यात विषय<br><br><br><br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ८ | डॉ. किरण लहामटे, वि.स.स. | निळवंडे उजवा आणि डावा कालवा यापैकी डाव्या कालव्यातून पाणी विसर्ग केल्यामुळे तेथील पाण्याची गळती होऊन त्या भागातील शेतकऱ्यांच्या पिकाचे जे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत. | -- " -- |
| ९ | श्री. अतुल बेनके, वि.स.स. | जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथे ATS ने दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या ८ बांगलादेशीय लोकांना पकडले असून त्यांची संपूर्ण चौकशी करण्याबाबत. | -- " -- |
| १० | श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स. | हिंगोली जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून त्यांना २५ टक्के पीक विमा अग्रीम रक्कम व नुकसान भरपाई मिळण्याबाबत. | -- " -- |
| ११ | श्री. योगेश सागर, वि.स.स. | माऊली बंदर पखाडी नावाची एक एस.आर.ए. योजना १६ वर्षापासून बंद असून कुलस्वामिनी शेजार समितीच्या नोंदणीकृत नसलेल्या समितीकडून ३ हजार नागरीकांसाठी निर्माण झालेला धोका दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कारवाई करण्याबाबत. | -- " -- |
| १२ | श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. | सन २०१९ मधील जाहिरातीनुसार प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांना रिक्त असलेल्या १६ पदांच्या भरतीसाठी प्राधान्य देण्याबाबत. | -- " -- |
| १३ | डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. | वर्सोवा येथील ओशिवरा मेटर्निटी होम मोडकळीस आल्यानंतर टोपीवाला येथे स्थलांतरीत करण्यात आले होते ते पुन्हा मुंबईतील लोटस इमारतीमध्ये स्थलांतरित करण्याबाबत. | -- " -- |

| क्रमांक<br><br>(१) | सदस्याचे नाव<br><br>(२) | थोडक्यात विषय<br><br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| १४ | श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. | दहिसर, शैलेंद्रनगर नगर येथील अकबर मार्केट जवळ भंगार गोळा करणाऱ्या माणसांनी अतिक्रमण केले असून तेथे इलेक्ट्रिक केबल जाळून प्रदुषण निर्माण करणाऱ्या व्यक्तिंवर कारवाई करण्याबाबत. | -- " -- |
| १५ | श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. | म्हाडाच्या मालकीच्या सदनिका व शिबिर बेकायदेशीरित्या विकणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत. | -- " -- |
| १६ | श्री. राजू कारेमोरे, वि.स.स. | पूर्व विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर धानाचे उत्पादन होत असून सब-ऐजंट संस्था जनप्रतिनिधींची बैठक घेऊन शेतकऱ्यांसाठी चांगला मार्ग काढण्याबाबत. | -- " -- |
| १७ | श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. | अंगणवाडी सेविकांच्या मागण्या सोडविण्याबाबत. | -- " -- |
| १८ | श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स. | हिंगोली येथील माळुरा व भांडेगाच या दोन महसूल मंडळांचा समावेश दुष्काळ व अतिवृष्टीच्या यादीमध्ये करण्याबाबत. | -- " -- |
| १९ | श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स. | हिंगोली येथील शेतकऱ्यांना तात्काळ विमा वितरीत करण्याबाबत. | -- " -- |
| २० | श्री. दिलीप लांडे, वि.स.स. | कांदिवली मधील काजुपाडा पाईपलाईन, उमा महेश्वर मंदिर व खैरणे रोड या भागातील मुख्य रस्त्यांवर अनधिकृत पार्किंगबाबत. | -- " -- |
| २१ | श्रीमती सुमन पाटील, वि.स.स. | द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळण्याबाबत. | -- " -- |
| २२ | श्री अस्लम शेख, वि.स.स. | मालाड भागामध्ये शिया कम्युनिटीसाठी मंजूर झालेल्या स्मशानभूमीची शासनाने तातडीने दखल घेण्याबाबत. | -- " -- |

| क्रमांक (१) | सदस्याचे नाव (२) | थोडक्यात विषय (३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २३ | श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. | पुणे शहर पोलिसांनी पकडलेल्या दोन दहशतवाद्यांमुळे देशभरातील दहशतवादी हल्ल्याचा कट उघडकीस येणे. | -- " -- |
| २४ | श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स. | महसूल व वन विभागाने मार्च, २०२३ मध्ये राज्याच्या भूसंपादन नियम, २०१४ मधील नियम क्रमांक १९ मध्ये दुरुस्तीसाठी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध केलेल्या असून ३० दिवसात प्रसिद्ध करावयाची अधिसूचना अंतिम करण्यासाठी शासनाकडून दिरंगाई होत असल्याबाबत. | -- " -- |
| २५ | श्री. संजय केळकर, वि.स.स. | ठाणे येथील ऑलिम्पीक दर्जाचा तरण तलाव उद्घाटन होऊनही अद्याप सुरू नसल्याबाबत. तसेच ठाणे येथील कलाभवनाची झालेली दुरावस्था | -- " -- |
| २६ | श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. | बेलापूर किल्ल्याच्या संवर्धनाचे सुरू असलेले काम तातडीने पूर्ण करण्याबाबत. | -- " -- |
| २७ | श्री. पी. एन. पाटील-सडोलीकर, वि.स.स. | कोल्हापूर ते रत्नागिरी येथील रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या असून त्यांना ५० टक्क्यांपेक्षा कमी रक्कम मिळत असल्याबाबत. | -- " -- |
| २८ | श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. | दारु दुकानांना परवाना देत असताना शासनाने जे नियम, बंधने घातलेली आहेत त्यांचे पालन करण्याबाबत. | -- " -- |
| २९ | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १२ तास वीज पुरवठा करण्याबाबत. | -- " -- |
| ३० | ॲड. राहुल कुल, वि.स.स. | मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत. | १८ डिसेंबर, २०२३ |

| क्रमांक<br><br><br><br>(१) | सदस्याचे नाव<br><br><br><br>(२) | थोडक्यात विषय<br><br><br><br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| ३१ | श्री. राजन साळवी, वि.स.स. | रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामपंचायत क्षेत्रातील घर बांधणी व दुरुस्तीच्या अधिकार देण्याबाबत. | -- " -- |
| ३२ | श्री. अबू आझमी, वि.स.स. | (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित) | -- " -- |
| ३३ | श्री. संग्राम थोपटे, वि.स.स. | भूमि अभिलेख विभाग हा ब्रिटीशकालीन सर्वांत जूना विभाग असून शेतजमिनीची मोजणी, नगर भूमापन मोजणीबाबत. | -- " -- |
| ३४ | श्री. शांताराम मोरे, वि.स.स. | वाडा-भिवंडी रस्ता सिमेंट काँक्रीटचा करण्याबाबत. | -- " -- |
| ३५ | श्री. रविंद्र धंगेकर, वि.स.स. | राज्य शासनाने सन २०१४ मध्ये रिक्षा चालक व मालकांसाठी एक कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याबाबत. | -- " -- |
| ३६ | श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स. | राज्य शासनाने ईएसबीसी आणि एसईबीसी प्रवर्गातील उमेदवारांकरिता दिलेले आरक्षण न्यायालीयन निवाड्यामुळे खारिज झाल्याबाबत. | -- " -- |
| ३७ | श्री. राजेश एकडे, वि.स.स. | बुलढाणा जिल्ह्यातील नगर परिषद, मलकापूर येथे सन २०१७-१८ पर्यंत मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या करदात्या नागरिकांना थकीत रकमेवर शास्तीमध्ये सूट मिळण्याबाबत. | -- " -- |
| ३८ | श्री. नाना पटोले, वि.स.स. | खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील नियोजित महाराष्ट्र राज्य औद्योगिक क्षेत्रामधील गावनिहाय क्षेत्रामधील जमिनीचा मोबदला न मिळाल्याबाबत. | -- " -- |
| ३९ | श्री. नाना पटोले, वि.स.स. | पोलीस पाटलांच्या प्रलंबित मागण्याबाबत. | -- " -- |

| क्रमांक<br><br>(१) | सदस्याचे नाव<br><br>(२) | थोडक्यात विषय<br><br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ४० | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | राज्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतच्या तरतुदीबाबत. | -- " -- |
| ४१ | श्री. कैलास पाटील (घाडगे), वि.स.स. | अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थी युवक व युवतींना शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत. | -- " -- |
| ४२ | श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. | भगूर नगरपरिषदेची पाणीपुरवठा योजना व एस.टी.पी. यासंदर्भात मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद, भगूर यांचेकडे पाठपुरावा करण्याबाबत. | -- " -- |
| ४३ | श्री. योगेश सागर, वि.स.स. | म्हाडाच्या चारकोप आणि गोराईमधील बैठ्या वसाहतीतील भाडेपट्ट्याबाबत. | -- " -- |
| ४४ | श्री. रोहित पवार, वि.स.स. | पिंपळगाव सराई (जि.बुलढाणा) येथील शहीद सुपूत्र अक्षय लक्ष्मण गवते यांच्या मृत्यूप्रश्चात त्यांना केंद्र शासनाकडून इतर लाभ मिळण्याबाबत. | -- " -- |
| ४५ | श्री. लहू कानडे, वि.स.स. | श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील बस स्थानकाची इमारत मोडकळीस आल्याबाबत. | -- " -- |
| ४६ | श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. | अकोला जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंतर्गत महिला रुग्णांच्या उपचारात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत. | -- " -- |
| ४७ | श्री. कौलास गोरंटयाल, वि.स.स. | (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित) | -- " -- |
| ४८ | श्री. अस्लम शेख, वि.स.स. | मुंबई शहरातील मालाड येथील गायकवाड नगर येथे ५० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना रेडी रेकनरनुसार पैसे घेऊन त्यांना घरे मालकी हक्काप्रमाणे देण्याबाबत. | १९ डिसेंबर, २०२३ |

| क्रमांक<br><br>(१) | सदस्याचे नाव<br><br>(२) | थोडक्यात विषय<br><br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ४९ | श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. | बेलापूर महामार्गावर महापालिकेकडे जाण्यासाठी अंडरग्राऊंड ब्रीज बांधण्याबाबत. | -- " -- |
| ५० | श्री. नारायण कुचे, वि.स.स. | राज्यातील अंगणवाडी कर्मचारी संपामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याबाबत. | -- " -- |
| ५१ | श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. | ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाकडे झालेले दुर्लक्ष | -- " -- |
| ५२ | श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. | मिरा-भाईंदर शहरात न्यायालयाचे कामकाज सुरू करण्याबाबत. | -- " -- |
| ५३ | श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. | विष्णुपूरी प्रकल्पालगत असलेल्या जमिनीला बागायती जमिनीचा दर्जा देण्याबाबत. | -- " -- |
| ५४ | श्री. अनिल देशमुख, वि.स.स. | राज्यातील रिमांड होममध्ये १८ वर्षानंतरही बेवारस, अनाथ व दिव्यांग मुला, मुलींना राहण्यास देण्याबाबत. | -- " -- |
| ५५ | श्री. चिमणराव पाटील, वि.स.स. | कापूस, ज्वारी, बाजरी व मका या पिकांचा रब्बी हंगामी विमा योजनेमध्ये समावेश करण्याबाबत. | -- " -- |
| ५६ | कॅ. आर. तमिल सेल्वन, वि.स.स. | (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित) | -- " -- |
| ५७ | श्री. सुनिल शेळके, वि.स.स. | तळेगाव दाभाडे या शहरात प्रधानमंत्री आवास योजनेत अल्प उत्पन्न व अल्पभूधारकांना सन २०१९ ते २०२१ या कालावधीत सदिनकांची लॉटरी पद्धतीने काढण्यात आलेल्या सोडतीमधील काही नागरीकांकडून अतिरिक्त मागणी न करता त्यांना त्यांच्या हक्काचे घर तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत. | -- " -- |

| क्रमांक<br>(१) | सदस्याचे नाव<br>(२) | थोडक्यात विषय<br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ५८ | प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. | राळेगाव येथे जुलै २०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे नुकसान झाले त्यांना पीक विमा मंजूर करावा व सर्व तालुके दुष्काळी घोषित करण्याबाबत. | -- " -- |
| ५९ | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | महाराष्ट्र शासनाने कर्मवीर कन्नमवार साहेब, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची शासकीय/निम शासकीय कार्यालयामध्ये जयंती व पुण्यतिथी साजरी करण्याबाबत. | -- " -- |
| ६० | श्रीमती गिता जैन, वि.स.स. | स्वतःचे घर नसल्याने अकरा महिन्यांचा करार करून भाड्याने राहणाऱ्या नागरीकांना रेशन कार्ड फक्त अन्नधान्य वाटपाचा लाभ मिळण्यासाठी देण्याबाबत. | -- " -- |
| ६१ | श्री. संजय गायकवाड, वि.स.स. | महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ ते महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या ज्वलंत मागण्यांबाबत. | -- " -- |
| ६२ | श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. | राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत. | -- " -- |
| ६३ | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | जळगाव जिल्ह्यातील ठेवीदारांच्या प्रश्नांबाबत. | -- " -- |
| ६४ | श्रीमती ऋतुजा लटके, वि.स.स. | घरेलु कामगारांच्या विविध मागण्यांबाबत. | -- " -- |
| ६५ | श्री. अजय चौधरी, वि.स.स. | मुंबईतील काळाचौकी येथील अभुदयनगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाचे काम अनेक वर्षापासून रखडल्याबाबत. | -- " -- |
| ६६ | डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. | मुंबई व मुंबई उपनगरातील कोळीवाड्यांचे सीमांकन करण्याचे काम अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याबाबत. | -- " -- |

| क्रमांक (१) | सदस्याचे नाव (२) | थोडक्यात विषय (३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ६७ | श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स. | पोलिस पाटील, ग्रामपंचायत संगणक परिचालक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, गटप्रवर्तक, असंघटीत कामगार यांच्या मागण्या मान्य करून त्यांना न्याय देण्याबाबत. | -- " -- |
| ६८ | श्री. चंद्रकांत पाटील, वि.स.स. | मुक्ताईनगर, रावेर व बोदवड या तीन तालुक्यांतील केळी उत्पादक शेतकऱ्यांबाबत. | -- " -- |
| ६९ | श्री. अमीन पटेल, वि.स.स. | (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित) | |
| ७० | ॲड. राहूल ढिकले, वि.स.स. | एम.एस.जी कॉलेज मालेगाव येथे करियर गाईडन्सचा नावाखाली हिंदू विद्यार्थ्यांचे धर्मांतरण करण्याबाबत. | -- " -- |
| ७१ | श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. | पशुसंवर्धन विभागाच्या योजनांच्या लक्षांकात वाढ करण्याबाबत. | -- " -- |
| ७२ | श्री. राजेश पाटील, वि.स.स. | महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत अंतर्गत काम करणाऱ्या संगणक परिचालकांच्या प्रलंबित असलेल्या समस्यांबाबत. | -- " -- |
| ७३ | श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. | महाराष्ट्र राज्यामध्ये नरबळी, काळी जादू करणाऱ्यांविरोधातील कायद्याची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्याबाबत. | -- " -- |
| ७४ | श्री. नारायण कुचे, वि.स.स. | प्रत्येक गावाचा वेगळा विकास आराखडा तयार करून त्यांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत. | |
| ७५ | श्री. राजेश टोपे, वि.स.स. | सन २०१८ मध्ये वन संरक्षक यादीमधील दिनांक २७ सप्टेंबर रोजी रद्द करण्यात आलेला शासन निर्णय जसेच्या तसे लागू करण्याबाबत. | -- " -- |

| क्रमांक<br><br>(१) | सदस्याचे नाव<br><br>(२) | थोडक्यात विषय<br><br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ७६ | श्री. राजेश टोपे, वि.स.स. | राज्यात कायदा असतानाही अनेक रुग्णांच्या नातेवाईकांकडून डॉक्टरांना होत असलेली मारहाण | -- " -- |
| ७७ | कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. | रोजंदारी तत्वावरील २४९ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत. | -- " -- |
| ७८ | कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. | भारतीय जनता युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांच्या मुलाने महिलेवर केलेल्या अत्याचाराबाबत. | -- " -- |
| ७९ | श्री. सुनिल टिंगरे, वि.स.स. | पुणे शहरामध्ये फुटपाथवरील अतिक्रमणे हटवण्याबाबत. | -- " -- |
| ८० | श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स. | मौजे. करमाड (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील उर्दू शाळेतील शिक्षक श्री. सय्यद ख्वाजा माजीदुल्ला खान याची चौकशी करण्याबाबत. | २० डिसेंबर, २०२३ |
| ८१ | श्री. बळवंत वानखडे, वि.स.स. | राज्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालक यांच्या मागण्यांबाबत. | -- " -- |
| ८२ | डॉ. नितीन राऊत, वि.स.स. | बार्टीच्या सन २०२२ मधील सर्व पात्र पीएचडी संशोधकांना सुमारे २१ महिन्यांपासून प्रलंबित असलेली पीएचडी फेलोशीप नोंदणी दिनांकापासून देण्याबाबत. | -- " -- |
| ८३ | डॉ. नितीन राऊत, वि.स.स. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नामोल्लेख टाळून त्यांचा अनादर करणाऱ्या नवी दिल्ली येथील गोयल ब्रदर प्रकाशन पुस्तकावर बंदी घालण्याबाबत. | -- " -- |
| ८४ | श्री. संजय गायकवाड, वि.स.स. | राज्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ वा कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत. | -- " -- |
| ८५ | श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. | पुणे महानगरपालिका हद्दीतील नागरी समस्या सोडविण्याबाबत. | -- " -- |
| ८६ | श्री. राजेश नरसिंगराव पाटील, वि.स.स. | चंदगड तालुक्यातील हिरे सरंजामचा प्रश्न मार्च, २०२४ पर्यंत निकाली काढण्याबाबत. | -- " -- |

| क्रमांक<br><br>(१) | सदस्याचे नाव<br><br>(२) | थोडक्यात विषय<br><br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ८७ | श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. | कांदा बीज उत्पादक शेतकऱ्यांवर होत असलेला अन्यायाबाबत. | -- " -- |
| ८८ | श्री. शेखर निकम, वि.स.स. | पारंपारीक हातपाटी वाळू व्यावसायिकांच्या समस्यांबाबत. | -- " -- |
| ८९ | श्री. निलेश लंके, वि.स.स. | छत्रपती संभाजीनगर व नगर जिल्ह्याचा समावेश असलेल्या नाथसागर जलाशयामध्ये तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीस केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या मंजूरीचा फेर विचार करण्याबाबत. | -- " -- |
| ९० | श्री. निलेश लंके, वि.स.स. | राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या विविध मागण्या गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याबाबत. | -- " -- |
| ९१ | श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. | मुंबईतील बोरिवली (पूर्व) येथील नूतन नगर, नेहरूनगर, संतोष नगर, दौलत नगर व दहिसर (प) येथील इंदिरानगर या वस्तीत सुमारे १२०० झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनाकडून झोपडी निष्काषित करण्याची वारंवार नोटीस बजाविण्यात येत असल्याबाबत. | -- " -- |
| ९२ | श्री. संजय सावकारे, वि.स.स. | शेती शिवारातील ओव्हरहेड विज तारांची चोरी होत असल्याने विज पुरवठा खंडित होत असल्याबाबत. | -- " -- |
| ९३ | श्री. रईस शेख, वि.स.स. | (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित) | -- " -- |
| ९४ | श्री. अनिल देशमुख, वि.स.स. | राज्यातील पोलिस पाटीलांच्या विविध मागण्यांबाबत. | -- " -- |
| ९५ | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | शिंदखेडा तालुक्यात जिंदाल पॉवर लिमिटेडच्या थर्मल पॉवर प्लँटबाबत. | -- " -- |

| क्रमांक (१) | सदस्याचे नाव (२) | थोडक्यात विषय (३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ९६ | श्री. बच्चू कडू, वि.स.स. | द्राक्ष उत्पादक शेतकरी, संत्रा उत्पादक शेतकरी आणि आंबा उत्पादक शेतकरी पार धुळीस मिळाल्याबाबत. | -- " -- |
| ९७ | श्री. हरीष पिंपळे, वि.स.स. | MPSC मार्फत भरण्यात येणारी तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, नायब तहसिलदार आणि भूमी अभिलेख अधीक्षक यांची पदे रिक्त असल्याबाबत. | -- " -- |
| ९८ | श्री. दादाराव केचे, वि.स.स. | आष्टी तालुक्यात MIDC स्थापन करण्याबाबत. | -- " -- |
| ९९ | डॉ. देवराव होळी, वि.स.स. | गडचिरोली जिल्ह्यात जेवढ्या काही राज्य शासनाच्या योजना सुरू असतील किंवा शासनाकडून जो निधी दिला जात असेल त्या कार्यक्रमांचे स्थानिक आमदारांना विश्वासात घेऊन लोकार्पण किंवा उद्घाटन करून त्यासंबंधीचे महाराष्ट्र शासनाचे फलक लावण्याबाबत. | -- " -- |
| १०० | श्री. राजेश रघुनाथ पाटील, वि.स.स. | पालघर जिल्हा मुख्यालयात सेवारत असलेल्या राज्य शासनाच्या सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणेच एकस्तर वेतनश्रेणी लागु करण्याबाबत. | -- " -- |
| १०१ | श्री. राजेश रघुनाथ पाटील, वि.स.स. | पालघर जिल्ह्यातील २२ गावे विजेपासून वंचित असल्याबाबत. | -- " -- |
| १०२ | श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. | राज्यातील धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीत करण्याबाबत. | -- " -- |
| १०३ | श्रीमती ऋतुजा लटके, वि.स.स. | महाराष्ट्रातील सर्व गोरगरिब सफाई कामगारांना न्याय मिळवून देण्याबाबत. | -- " -- |

| क्रमांक<br><br>(१) | सदस्याचे नाव<br><br>(२) | थोडक्यात विषय<br><br>(३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| १०४ | श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स. | (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित) | -- " -- |
| १०५ | श्री. पी.एन.पाटील (सडोलीकर) वि.स.स. | कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी नदीतील पाण्याच्या दराबाबत. | -- " -- |
| १०६ | श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. | जत तालुकातील पिण्याच्या पाण्याबरोबर जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा निर्माण झालेल्या प्रश्नाबाबत. | -- " -- |
| १०७ | श्री. प्रकाश आवाडे, वि.स.स. | महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा वर्कर यांना शासन सेवेत कायमस्वरुपी घेण्याबाबत. | -- " -- |
| १०८ | श्री. अबू आजमी, वि.स.स. | (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित) | -- " -- |
| १०९ | श्री. कृष्णा गजबे, वि.स.स. | आरमोरी, कुरखेडा, वळसा, कुरची या तालुका हा दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत. | -- " -- |
| ११० | श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. | शिरवाळा जिल्हा सातारा येथील अक्षय लांडगे या युवकाने अल्प वयीन मुलीचा विनयभंग केल्याबाबत. | -- " -- |

# विवरण क्रमांक ३१

## औचित्याच्या मुद्यांवरील माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

निरंक

# विवरण क्रमांक ३२

## पॉईट ऑफ इन्फॉरमेशनच्या माध्यमातून मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार संबंधित मंत्र्यांनी केलेली निवेदन

निरंक

# विवरण क्रमांक ३३

## अल्पकालीन चर्चा

(म.वि.स. नियम १०१ अन्वये)

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. रणधीर सावरकर, ॲड. आशिष जैस्वाल, सर्वश्री बबनराव शिंदे, नारायण कुचे, चिमणराव पाटील, प्रकाश सोळंके, प्रशांत बंब, ज्ञानराज चौगुले, डॉ. राजेंद्र शिंगणे, ॲड. आशिष शेलार, डॉ. संजय रायमूलकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री रमेश बोरनारे, दिलीप मोहिते, हरिभाऊ बागडे, सुहास कांदे, बाबासाहेब पाटील, बबनराव लोणीकर, ॲड.शहाजीबापू पाटील, सर्वश्री बाळासाहेब आजबे, प्रकाश भारसाकळे, किशोर पाटील, राजू कारेमोरे, संभाजी निलंगेकर-पाटील, नरेंद्र भोंडेकर, मनोहर चंद्रिकापुरे, डॉ. विनय कोरे, सर्वश्री किशोर जोरगेवार, | “राज्यात ज्या शेतकऱ्यांनी सन २०१९ नंतर शेतीचे नवीन खाते उघडले आहे त्या शेतकऱ्यांना पीएम किसान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना या योजनांचा लाभ मिळत नसणे, राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पेरण्यांची चिंता सतावत असताना काढणी झालेल्या खरीपांच्या पिकांना योग्य भाव मिळेल की नाही अशी चिंता शेतकऱ्यांना भेडसावत असणे, राज्यात कापूस, सोयाबीन, तूर, धान, कांदा, केळी, संत्रा या पिकांचे नासाडी झाली असणे, सोयाबीनचे दर हमी भावापेक्षा खाली गेल्याचे निदर्शनास येणे, केंद्र सरकारने कांद्याची किमान निर्यातमूल्य (एमईपी) थेट ८०० डॉलर प्रतिटन करण्याचा निर्णय घेतल्याने कांदा निर्यातीला खिळ बसल्याचे निदर्शनास येणे, राज्य शासनाने शेतकऱ्यांना २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत केली असणे, एनडीआरएफ निकषाप्रमाणे केंद्र सरकारने ४० तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले असून उर्वरित सर्व तालुक्यांची जबाबदारी राज्य शासनाने घेतली असणे, जे नुकसान झाले आहे त्यासह शेतकऱ्यांच्या यापुर्वीच्या देखील सर्व नुकसानीची भरपाई देण्यास सरकार कटीबध्द असणे,पैनगंगा ते वैनगंगा जोडणी प्रकल्पास मान्यता देण्यात येणे, शासनाने | ११ व १२ डिसेंबर, २०२३ रोजी सत्तारुढ पक्ष व विरोधी पक्षाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर एकत्रित रित्या चर्चा झाली व दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी उत्तर देण्यात आले. |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | चंद्रकांत नवघरे, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, नितीन पवार, डॉ. संजय कुटे, सौ. मंजुळा गावित, सर्वश्री सुनिल शेळके, जयकुमार रावल, बच्चू कडू, निलेश लंके, राणाजगजितसिंह पाटील, अनिल बाबर, आशुतोष काळे, राजेंद्र पाटणी, प्रकाश आबिटकर, मदन येरावार, महेश शिंदे, प्रा. डॉ. अशोक उईके, सर्वश्री भरतशेट गोगावले, कृष्णा खोपडे, संतोष बांगर, काशिराम पावरा, श्रीमती लताबाई सोनावणे, सर्वश्री विकास कुंभारे, महेंद्र दळवी, गणपत गायकवाड, महेंद्र थोरवे, संजय सावकारे, संजय शिरसाट, जयकुमार गोरे, श्रीनिवास वनगा, ॲड राहूल कुल, श्री. शांताराम मोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री संजय गायकवाड, समीर मेघे, बालाजी कल्याणकर, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री प्रशांत ठाकूर, | केंद्राच्या निकषात न बसणाऱ्या १२०० मंडळांना दुष्काळसदृश जाहिर केले असणे, तसेच २० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात २५ टक्के अग्रीम राशी जमा करणे, राज्यात हळद उत्पादनात वाढ होत असल्याने हळद निर्यातीला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, आदर्श गाव योजनेत निवड झालेल्या गावांना दिल्या जाणाऱ्या निधीत हेक्टरी १० हजार रुपयांची वाढ होणे, लोकसहभाग आणि जलसंधारणाच्या कामातून राज्यात व देशात ओळख निर्माण करणाऱ्या आदर्श गाव राळेगणसिध्दी व हिवरे बाजार गावांच्या धर्तीवर राज्यातील अन्य गावांचा विकास व्हावा याकरिता शासनाने आदर्श गाव योजना प्रकल्प व संकल्प समिती गठीत करणे, दुष्काळी भागातील गावे, गावकऱ्यांचा एकोपा व लोकसहभाग अधिक असलेल्या गावात जलसंधारण ग्रामविकासाची कामे करताना सप्तसूत्रीनुसार अंमलबजावणी करण्याचे शासनाचे धोरण असणे, रब्बी हंगामासंबंधी फळ पिक विमा योजनेत सहभागाबाबत कार्यवाही सुरु असणे, केळी पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेतून शेतकरी विमा संरक्षण देण्यात येणे, पिक विमा योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांकडून सातबारा उताऱ्यावर २०२३-२४ संबंधी केळी पिकांची नोंद नसल्यास स्वयंघोषणापत्रावर केळी लागवड केली आहे अशी घोषणा केल्यास त्याला पिक विमा योजनेत सहभागी करुन | |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | नितेश राणे, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्रीमती सीमा हिरे, मोनिका राजळे, सर्वश्री हरिष पिंपळे, मोहन मते, विजय रहांगडाले, कृष्णा गजबे, समीर कुणावार, किर्तीकुमार भांगडीया, डॉ. देवराव होळी, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री संजिवरेड्डी बोदकुरवार, दादाराव केचे, ॲड आकाश फुंडकर, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री तानाजी मुटकुळे, संतोष दानवे, सर्वश्री भिमराव तापकीर, महेश लांडगे, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री धनंजय गाडगीळ, सुरेश भोळे, ॲड. राहूल ढिकले, सर्वश्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, श्वेता महाले, नमिता मुंदडा, सर्वश्री राम सातपुते, राजेश पाडवी, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, टेकचंद सावरकर, नामदेव ससाणे, भिमराव केराम, राजेश पवार, दिलीप बोरसे, | घ्यावे म्हणून शासनाकडून बँकांना निदेश देणे, विदर्भातील कृषी क्षेत्राचा फायदा व्हावा याकरिता कृषी महाविद्यालयाच्या जागेवर शासनाकडून कृषी तज्ज्ञ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्याचा शासनाचा मानस असणे, अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | रविशेठ पाटील, सिध्दार्थ शिरोळे, सुनिल कांबळे, अभिमन्यू पवार, सचिन कल्याण-शेट्टी, समाधान आवताडे, श्रीमती अश्विनी जगताप, वि.स.स. | | |
| २ | सर्वश्री. विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, सुनिल केदार, वि.स.स. | "राज्यातील शेतकऱ्यांवर यावर्षी एकामागून एक संकटे येणे, सुरूवातीला अतिवृष्टी, नंतर दुष्काळ आणि गारपिटीसह आलेल्या अवकाळी पावसाने शेतकरी पूर्णतः उद्ध्वस्त होणे, ७५% पेक्षा अधिक भागात भीषण दुष्काळी परिस्थिती असताना दुष्काळ जाहीर करण्यात शासनाकडून अक्षम्य विलंब होणे, आतापर्यंत १०२१ महसुली मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित केली तरी अद्याप अनेक दुष्काळी तालुक्यांचा समावेश झालेला नसणे, विमा कंपन्यांच्या दबावापोटी व त्यांना आर्थिक लाभ करून दिल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण होणे, जाहिराती, "शासन आपल्या दारी" सारखे कार्यक्रम, ठेकेदारांची गौणखनिज रॉयल्टी माफी, बियरवरील उत्पादन शुल्क माफी यासाठी तत्परतेने निर्णय घेणारे सरकार सरसकट दुष्काळ जाहीर करण्यात हात आखडता घेत असणे, अतिवृष्टी व दुष्काळाच्या प्रस्तावांबाबत केंद्राची कोणतीही हालचाल दिसत नसल्यामुळे केंद्राकडून शेतकऱ्यांना | ११ व १२ डिसेंबर, २०२३ रोजी सत्तारुढ पक्ष व विरोधी पक्षाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर एकत्रित रित्या चर्चा झाली व दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी उत्तर देण्यात आले. |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | | भरीव मदत मिळण्याची आशा नसणे, त्यामुळे कितीही आर्थिक भार पडला व कर्ज झाले तरी शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी राज्य शासनाने सरसकट दुष्काळ जाहीर करून राज्याच्या तिजोरीतून मदत करण्याची होत असलेली मागणी, तथापि, शासनाची इच्छाशक्ती नसणे, दुष्काळी उपाययोजना, शेतकऱ्यांना तातडीची मदत, तसेच नैसर्गिक आपत्तीबरोबरच केंद्र व राज्य सरकारने अनेक समस्या शेतकऱ्यांसमोर उभ्या केल्या असणे, दीड वर्षात सर्वाधिक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येणे, शेतकरी कर्जाच्या बोजाखाली असून उत्पन्नच नसल्यामुळे चालू हंगामापर्यंतच्या संपूर्ण कर्जाची माफी करून शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याची नितांत आवश्यकता, नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात गारपिटीसह पडलेल्या अवकाळी पावसामुळे २२ जिल्ह्यांतील सुमारे साडेचार लाख हेक्टर पेक्षा अधिक पिकांचे नुकसान होणे, अद्यापही या पंचनाम्यांचे काम पूर्ण झालेले नसणे, अवकाळी पावसामुळे मागील हंगामात काढून ठेवलेल्या पिकांचीही नासधूस झाली असून पंचनाम्यात याचाही समावेश करण्याची आवश्यकता, मिचौंग चक्रीवादळाच्या दुष्परिणामांमुळे राज्यातील | |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | | पिकांचेही नुकसान होणे, अवकाळी पावसामुळे पिकांवर बुरशीजन्य व कीड रोगाची लागण होणे, याबाबतच्या उपाययोजना करण्याची आवश्यकता, राज्यातील बहुतांश विभागातील पाणीसाठ्याने निचांकी पातळी गाठलेली असणे, त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागणे, अस्मानी व सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये, बागायती शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये आर्थिक मदत देण्याची, दावणीला चारा व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची आवश्यकता, या सर्व प्रकरणांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |

# विवरण क्रमांक ३४

## अल्पकालीन चर्चेच्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

(म.वि.स. नियम १०१ अन्वये)

निरंक

# विवरण क्रमांक - ३५
## लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये )

एकूण प्राप्त सूचना : २४१४
एकूण स्विकृत संख्या : ०३३९
एकूण चर्चा झालेले संख्या : ००७३

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | “ठाणे महापालिका मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती व इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालवित असून या शाळांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, सद्य:स्थितीत महापालिका क्षेत्रातील ९८ इमारतींमध्ये १९८ शाळा चालविल्या जात असून यातील ६८ इमारतींची अवस्था दयनीय झालेली असल्याची गंभीर माहिती दिनांक २१ नाव्हेंबर, २०२३ रोजी उघडकीस येणे, या धोकादायक इमारतींमध्ये सद्य:स्थितीत शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांच्या जिविताचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, जुन्या जीर्णावस्थेत असलेल्या इमारतींचे प्लास्टर कधीही कोसळण्याच्या स्थितीत असून शौचालयांची दुरुस्ती झालेली नसल्याने इमारतींमध्ये सांडपाणी देखील तुंबण्याची स्थिती निर्माण झालेली असणे, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी महापालिका शाळांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी व नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, महापालिका शाळांच्या धोकादायक इमारती कोसळून गंभीर अपघात होऊन विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका होणार असतांनाही महापालिका प्रशासनाकडून हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जात असल्याने सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, अशोक चव्हाण, अबू आजमी, वि. स. स. | दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २. | "डहाणूपासून बोरिवलीपर्यंत एकही कर्करोग रुग्णालय नसल्यामुळे या भागातील रुग्णांना मुंबई व नवी मुंबईतील कर्करोग रुग्णालयांमध्ये उपचारासाठी पायपीट करावी लागणे, या पार्श्वभूमीवर मुंबई महानगर क्षेत्रात एखादे सुसज्ज कर्करोग रुग्णालय मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात असावे या संकल्पनेतून शासनाकडे प्रस्ताव पाठविणे, उक्त प्रस्तावाला शासनाने मान्यता दिल्यानंतर मीरा रोड येथे जागा निश्चित करून त्यासाठी सुरुवातीला १० कोटी रुपयांची तरतूद करणे, माहे एप्रिल, २०२३ मध्ये मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सदर रुग्णालयाचे भूमीपूजन होत असताना संपूर्ण रुग्णालयासाठी लागणारी १३४ कोटीची रक्कम शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा करणे, सदर भूमीपूजन होऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतर अद्यापही निधी न मिळाल्यामुळे प्रस्तावित कर्करोग रुगणालयाच्या कामाला सुरुवातही न होणे, शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून देऊन सदर बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | सर्वश्री. बाळासाहेब थोरात, नानाभाऊ पटोले, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. राजेश एकडे, संजय जगताप, शिरीष चौधरी, श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. | दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ३. | "महाडमधील ब्ल्यु हेल्थ केअर लिमिटेड या कंपनीत झालेल्या स्फोटामध्ये सात कामगार ठार झाल्याची घटना माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये घडली असणे, त्यामुळे, रायगड, ठाणे, पालघर जिल्ह्यातील शेकडो रासायनिक कारखान्याच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असणे, त्यामध्ये, औद्योगिक क्षेत्राच्या परिसरात नागरी वस्ती नसावी, कंपन्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षेच्या सुविधा पुरवाव्यात, सांडपाण्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन व्हावे, कंपन्यांची अग्निशमन व्यवस्था असावी असे नियम असताना ही कंपनी व्यवस्थापनांकडून या नियमांचे पालन होत नसणे, त्यामुळे, झालेल्या दुर्घटनेची संपूर्ण चौकशी करण्याची गरज असणे, तसेच, दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, | सर्वश्री. अतुल भातखळकर, भास्कर जाधव, बाळासाहेब थोरात, नानाभाऊ पटोले, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. राजेश एकडे, संजय जगताप, शिरीष चौधरी, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. संजय पोतनीस, मोहन मते, संजय केळकर, | दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नियमांचे पालन न करणाऱ्या औद्योगिक कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | सुनिल प्रभू, रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अनिल देशमुख, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. चेतन तुपे, योगेश सागर, गणपत गायकवाड, कुमार आयलानी, विजय वडेट्टीवार, वि. स. स. | |
| ४. | "भाईंदर येथे शवागारात शीतपेट्या नादुरुस्त असल्यामुळे मृतदेह रुग्णवाहिकामध्ये ठेवावा लागल्याचा प्रकार येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात दिनांक १७ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शणास येणे, रुग्णालयात आवश्यक सुविधांबाबत रुग्ण कल्याण समितीच्या बैठकीत वारंवार मुद्दे उपस्थित केले जात असणे, परंतु त्यावर राज्य शासनाकडे पाठपुरवठा होत नसल्याचेही निदर्शनास येणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा येत असलेली शासनाची प्रतिकिया व उपाययोजना." | सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, वि. स. स. | दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ५. | "राज्यात दिवसाकाठी ४० नवजात बालकांचा मृत्यू होत असल्याचे धक्कादायक आकडेवारी समोर आली असून यातील दोन तृतीयांश म्हणजेच तब्बल २५ हून अधिक बालके १ महिन्यांहून कमी वयाची असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या सुमारास निदर्शनास येणे, सदरील नवजात बालकांपैकी ६ जणांना श्वसनाचा त्रास होत असताना देखील संबंधित रुग्णालयात कृत्रिम श्वसन यंत्रणा आणि तिच्या वापरासाठी प्रशिक्षित वरिष्ठ कर्मचारी उपलब्ध नसल्याचे आढळून येणे, बहुसंख्य शासकीय प्राथमिक अतिवदक्षता केंद्र (PICU) बालरोग व नवजात अतिदक्षता केंद्र (NICU) येथील गर्दी, अपुरा कर्मचारी वर्ग आणि स्वच्छतेच्या कमतरतेचा त्रास महिलांना भोगावा लागत असून या ठिकाणी नवजात | ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. किसन कथोरे, जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अनिल देशमुख, रोहित पवार, सुनिल केदार, अस्लम शेख, सुभाष धोटे, अबू आजमी, भास्कर जाधव, बाळासाहेब थोरात, नानाभाऊ पटोले, प्रा. वर्षा | दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | बालके अत्यंत असुरक्षित असून त्यांना दुर्दैवी मृत्युला सामोरे जावे लागत असल्याचे आढळून येणे, राज्यातील ग्रामीण भागातील वाढती प्रसूती व अर्भकांची संख्या जास्त असणे, परंतु रुग्णालयातील प्रसूती वाढूनही प्रशासन आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संख्येसह पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यात अपयशी ठरणे, राज्यातील ग्रामीण भागातील प्रसूतीगृहांची संख्या वाढवून सदर ठिकाणी सुसज्य आरोग्य सुविधा पुरविण्याकरीता त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात नवजात बालकांचे होत असलेले मृत्यू रोखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | गायकवाड, सर्वश्री. राजेश एकडे, सर्वश्री. संजय जगताप, शिरीष चौधरी, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. अमित देशमुख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. झीशान सिद्दिकी, चंद्रकांत नवघरे, जयकुमार रावल, अजय चौधरी, वैभव नाईक, सुरेश वरपुडकर, अशोक चव्हाण, विजय वडेट्टीवार, संतोष दानवे, संजय गायकवाड, डॉ. नितिन राऊत, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. चेतन तुपे, योगेश सागर, मंगेश चव्हाण, रईस शेख, राजकुमार पटेल, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री. रविंद्र वायकर, विकास ठाकरे, श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. | |
| ६. | "इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीला जोडणारी पवित्र इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पासाठी पुढाकार घेतला असणे, राज्य आणि केंद्र | सर्वश्री. महेश लांडगे, सुनिल प्रभू, श्रीमती अश्विनी जगताप, | दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सरकारकडे पाठपुरावा करीत असणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन, केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून -नमामी गंगा॰ प्रकल्पाच्या धर्तीवर -नमामी इंद्रायणी॰ हा नदी सुधार प्रकल्प हाती घेण्यात येणार असून पिंपरी-चिंचवडच्या जीवनवाहिनी असलेल्या पवना, इंद्रायणी आणि मुठा नद्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असणे, इंद्रायणी नदीबाबत राज्यातील वारकऱ्यांमध्ये श्रद्धा असून लाखो भाविक देहू आणि आळंदीत प्रतिवर्षी येत असणे, मात्र, पवित्र इंद्रायणी नदीची अवस्था पाहून त्यांना दुःख होत असणे, जलसृष्टी नष्ट झाली असून, पर्यावरण प्रेमींमधून संताप व्यक्त होत असणे, तसेच, पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पवना नदीच्या प्रदूषणाचा प्रश्नही अत्यंत ज्वलंत असल्याने पवना, इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांना गती देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स. | चर्चा झाली. |
| ७. | "मिरा-भाईंदर शहर विकास आराखड्याची मुदत सन २०१७ मध्ये संपुष्टात आल्यानंतर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत मिरा-भाईंदर शहराचा नवीन विकास आराखडा नुकताच प्रसिध्द करण्यात येणे, परंतु, मिरा-भाईंदर शहरातील वाढती लोकसंख्या व वाढत्या मागणीनुसार नागरिकांना सोयी सुविधा देण्याकरिता विकास आराखड्यात काही बदल करणे गरजेचे असल्याचे आयुक्तांना लोकप्रतिनिधींसह नागरीकांकडून सुचविण्यात येणे, आयुक्तांना व महानगरपालिका प्रशासनाला विश्वासात न घेता नगररचना विभागाने विकास आराखडा प्रकाशित करणे, नविन विकास आराखड्यात मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए.च्या नियोजनाखाली ६ गावे असून त्या ६ गावांचा स्वतंत्र विकास आराखडा असणे, ६ गावांचा विकास आराखडा रद्द करून ही गावे महानगरपालिकेत समाविष्ट करणे गरजेचे असणे, तसेच एम.एम.आर.डी.ए.च्या रेंटल | श्री. प्रताप सरनाईक, वि. स. स. | दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | हौसिंग योजनेची घरे महानगरपालिकेला कायमस्वरूपी देण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊन देखील अद्यापपर्यंत ही घरे महापालिकेच्या ताब्यात आलेली नसणे, तसेच दहिसर-भाईंदर लिंक रस्त्याचे काम लवकर सुरू होणे आवश्यक असल्यामुळे भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी प्रस्तावित लिंक रोड मधील जमिनी ताब्यात घेण्यासाठी नगरविकास विभागाने मंजूरी देऊन अधिसूचना काढणे गरजेचे असणे, नागरीकांसाठी महत्वाची असलेली सगळी आरक्षणे विकास आराखड्यात समाविष्ट करून आवश्यक त्याठिकाणी रस्ता रुंदीकरण या विषयांवर महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या सुचनेनुसार आराखड्यात बदल व नव्याने आरक्षणे प्रस्तावित करून जनतेचे हित लक्षात घेऊन आरक्षणे विकास आराखड्यात समाविष्ट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ८. | "मौजे अस्दुल्लाबाद, ता.जि.नांदेड येथील हैद्राबाद इनाम रोख अनुदान कायदा १९५४ अन्वये इनाम देण्यात आलेल्या जमिनीवर वसाहत/नागरी वस्ती वसल्याचे निदर्शनास येणे, सदरची वस्ती गत ४० वर्षापासून असल्याचे स्पष्ट होणे, दरम्यानच्या काळात सदर जमिनी नागरी क्षेत्रात आल्यामुळे जमीनींचे ७/१२ बंद होऊन नगर रचना विभागाने भुमापन क्रमांक दिलेले असणे, सदर जमिनी नविन अविभाज्य शर्तीवर धारण करण्यात आल्या असणे, या जमिनींच्या हस्तांतरण व त्यावरील बांधकामांच्या दुरुस्तीसाठी बंधने असणे, जमीनीच्या वापराच्या नियमानुकुलनासाठी आकारण्यात येणाऱ्या दंड व अन्य रकमांबाबत समानता नसणे, सध्याची आकारणी अन्यायकारक असल्यामुळे धोरणात्मक निर्णयासाठी आवश्यक आकडेवारी व वित्तीय तपशिलासह मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता असणे, मात्र महसूल मंत्री यांनी स्पष्ट सूचना देवूनही महसूल विभागाने अद्याप कोणतीही | श्री. अशोक चव्हाण, वि. स. स. | दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कार्यवाही न करणे, परिमणत: दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथील महसुल मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय होऊनही पुढील कोणतीही कार्यवाही न होणे परिणामी स्थानिक नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ९. | "इंदापूर (जि. पुणे) येथील तसेच राज्यात पुणे, अहमदनगर, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, सातारा व औरंगाबाद या सात जिल्ह्यांमध्ये शेती महामंडळाच्या एकूण १४ मळ्यावर हजारो कामगारांपैकी ८०% कामगार असुसूचित जाती/जमाती, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय प्रवर्गातील असणे, या कामगारांच्या राहत्या घरांची पडझड झाल्याने संसार उघड्यावर आले असणे, शासनाच्या माध्यमातून घरकुल योजनेतून घरेही मंजूर झाली असूनही जागेअभावी वंचित राहावे लागत असणे, निवृत्त व रोजंदार कामगार ,कामावर असलेले व मयत कामगारांचे वारसदार यांना राहण्यासाठी महामंडळाकडे शिल्लक असलेल्या जमिनीपैकी दोन गुंठे जागा देऊन पंतप्रधान घरकुल योजनेच्या माध्यमातून घर बांधून मिळणेची मागणी, सदर कामगारांच्या प्रश्नावर तत्कालीन शासनाने दिनांक ५ मे, १९९८ रोजी ना. रामराजे निंबाळकर समिती नेमलेली असणे, या समितीने कामगारांना जमिन व घर देण्यासाठी सकारात्मक शिफारशी केलेल्या असणे, समितीच्या शिफारशी स्वीकारण्याची मागणी, शेती महामंडळाच्या कामगारांना सध्या ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन दिले जाते, ६ वेतन आयोग लागू करण्याची महसूल विभागाकडे प्रलंबित असलेली मागणी मंजूर करण्याची आवश्यकता, कामगारांचा थकीत असणारा ४ था व ५ व्या वेतन आयोगाच्या वेतनाची फरक देण्याची मागणी, शेती महामंडळाकडे असणाऱ्या रिक्त जागांवर शेती महामंडळाच्या स्टॅपींग पॅटर्नप्रमाणे जागा भरण्याची | श्री. दत्तात्रय भरणे, वि. स. स. | दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १०. | "सध्या देशातील अंदाजे २४ लाख यंत्रमागांपैकी ५०% म्हणजे अंदाजे १२ लाख साधे यंत्रमाग राज्यामध्ये असणे, या उद्योगामुळे शेती पाठोपाठ प्रचंड मोठा रोजगार उपलब्ध होत असणे, तसेच वस्त्रोद्योगातील सर्वाधिक महसूल यंत्रमाग क्षेत्रातून मिळत असणे, या क्षेत्राकडे राज्य सरकारचे पूर्णपणे दुर्लक्ष होणे, दिनांक २ जून, २०२३ रोजी जाहीर झालेल्या सन २०२३ ते २०२८ या पंचवार्षिक वस्त्रोद्योग धोरणामध्ये राज्यातील सध्याची यंत्रमागक्षेत्राची दखलही न घेणे, माहे जून, २०२३ च्या अखेरीस वस्त्रोद्योग मंत्री यांनी वस्त्रोद्योग धोरणातील दुरुस्त्यासाठी राज्यातील सर्व संघटनांच्या सूचना घेऊनही आजअखेर आलेल्या सूचनांचा कोणताही विचार न होणे,तसेच धोरणात कोणतीही दुरुस्ती न करणे, राज्यातील २७ हॉर्स पॉवरचे वरील यंत्रमाग धारकांना ७५ पैसे प्रति युनिट अतिरिक्त वीजदर सवलत देण्याची घोषणा तत्कालिन उपमुख्यमंत्री यांनी माहे मार्च, २०२१ मध्ये सभागृहात केली असतानाही अद्यापही अंमलबजावणी न होणे, २७ हॉर्स पॉवरचे खालील यंत्रमागधारकांना १ रुपया प्रति युनिट अतिरिक्त वीजदर सवलत देण्याच्या राज्य सरकारच्या घोषणेची अद्याप पर्यंत अंमलबजावणी न होणे, विदर्भ आणि मराठवाड्यात विद्युत शुल्क माफ असणे, एकाच राज्यातील यंत्रमागधारकांमध्ये दोन वेगवेगळे दर आणि उद्योगाला घातक अशी स्पर्धा निर्माण होणे, यंत्रमाग धारकांसाठी जाहीर केलेल्या स्थिर कर्जावरील ५% व्याजदर सवलतीचा लाभ न मिळणे, सूताची साठेबाजी, गैरव्यवहार, सतत बदलते सूतदर, व्यापारी वर्गातून वेळोवेळी जाहीर होणारी दिवाळखोरी, इत्यादी सर्व कारणांमुळे यंत्रमाग व्यवसाय मागील काही वर्षा मध्ये संकटात येणे, या सर्व बाबीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या यंत्रमागक्षेत्राला स्थैर्य देण्यासाठी वस्त्रोद्योग | सर्वश्री. रईस शेख, अबू आजमी, वि. स. स. | दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | धोरणामध्ये राज्य सरकारने करावयाच्या उपायोजना, या क्षेत्रातील रोजगार निर्मिती क्षमता विचारात घेऊन या क्षेत्राच्या विकासासाठी कायमस्वरूपी उपाययोजना आणि स्थिर धोरण निश्चित करण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ११. | “अमरावती विभागातील कोळी महादेव आदिवासींकडून अनुसूचित जमातीचे प्रमाण पत्र वितरीत करण्याच्या मागणीची शासनाकडून अनेक वर्षांपासून दखल न घेतल्याने, कोळी महादेव आदिवासी बांधवांवर अन्याय होणे, कोळी महादेव जातीच्या लोकांना सक्षम महसुली अधिकाऱ्यांकडून जातीचे प्रमाणपत्र वितरीत करतांना, आदिवासी विकास विभागाचे अस्तित्वातील प्रचलित नियमांचे पालन न करणे, आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक ३० जून, २००४ अन्वये शासनाकडून विदर्भ प्रांतातील (पूर्वीचा बेरार प्रांत) कोळी महादेव जमातीची गावे आदिवासी गावे म्हणून घोषित केलेली असणे, घोषित गावातील कोळी महादेव जातीच्या लोकांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र वितरित न करणे, महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ मधील नियम ३ (४) मधील तरतुदी महसूल अधिकाऱ्यांनी विचारात घेऊन अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना सन १९५० पूर्वीच्या उपलब्ध नसलेल्या पुराव्याची मागणी करून टाळाटाळ करू नये असे आदिवासी विकास विभाग निर्णय दिनांक २४ जानेवारी, २०२० अन्वये आदेश असणे, उप विभागीय अधिकारी यांनी पुराव्याची मागणी करणे, विदर्भ कोळी महादेव या जमातीचा अनुसूचित जमात असल्याच्या निजामकालीन, ब्रिटीशकालीन प्राचीन दस्तऐवज, नोंदी असणे, सदर कोळी महादेव जमातीचे विद्यार्थी, विकास योजनाचे लाभार्थी हे घटनादत्त अधिकारापासून वंचित होत असल्याने त्यांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र | सर्वश्री. रणधीर सावरकर, रवि राणा, प्रकाश भारसाकळे, वि. स. स. | दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | तातडीने वितरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| १२. | "मातंग समाज हा महाराष्ट्रासह संपुर्ण देशात वास्तव्यास असणे, या समाजातील बहुतांशी नागरिक भूमीहीन असून, मोलमजुरी करून आपले जीवन जगत असणे, उच्च शिक्षणापासून हा समाज वंचित असणे, तसेच शासकीय सेवेत देखील या समाजातील युवकांची संख्या अत्यंत अल्प असणे, शासनाने त्यांच्या मागण्या व प्रश्न सोडवून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता, मातंग समाजास अ, ब, क, ड अनुसार वर्गवारी करून स्वतंत्र आरक्षण त्वरित लागू करण्याची आवश्यकता, क्रांतिवीर वस्ताद लहुजी साळवे आयोगाच्या ८९ शिफारशींची अंमलबजावणी करणे या शिफारशीपैकी ज्या शिफारशी मंजूर आहेत त्या मंजूर असलेल्या शिफारशीनुसार शासनाने प्रत्येक विभागाला मातंग समाजासाठी ज्या सवलती जाहीर केलेल्या आहेत त्या सवलती समाज बांधवांपर्यंत न पोहोचणे, त्यामुळे त्या विभागामधील सवलती पासून मातंग समाजातील समाज बांधव वंचित राहणे, गंजपेठ पुणे येथील लहुजी वस्ताद यांच्या क्रांती शाळेस लहुजी वस्ताद साळवे यांचे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोग त्वरित कार्यान्वित करून त्यांचे नाव राष्ट्रपुरुषांच्या यादीत समाविष्ट करण्याची आवश्यकता, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळातर्फे थेट कर्ज प्रकरण त्वरित सुरू करणे आणि अण्णाभाऊ साठे महामंडळाचे थकीत कर्ज माफ करण्याची आवश्यकता, मातंग समाजाच्या या सर्व मागण्यांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. सुनिल कांबळे, मोहनराव हंबर्डे, वि. स. स. | दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| १३. | "पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून पुणे शहरातील विशेषतः पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट भागातील अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मोहीम | श्री. सुनिल टिंगरे, वि. स. स. | दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | चालू असणे, नव्याने समाविष्ट झालेल्या भागात पूर्वी गोरगरीब नागरिकांनी ऐपतीनुसार अल्पक्षेत्राचे प्लॉट खरेदी केलेले असणे, त्यावर आता आयुष्याची जमापुंजी लावून बांधकामे करत असणे, परंतु अल्पक्षेत्राच्या प्लॉटवर महानगरपालिकेच्या परवानगीकरिता असलेल्या नियमावलीनुसार बांधकामे करणे अशक्य असणे, अशी बांधकामे होत असतांना महानगरपालिकेचे पूर्णपणे दुर्लक्ष असणे, बांधकामे पूर्णत्वास जात असतांना त्यावर कारवाई करून गोरगरिबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणे, अशा प्रकारांमुळे गोरगरीब लोकांच्या आयुष्यभराच्या कमाईचे पूर्ण नुकसान होणे, अशा नागरिकांना व त्यांच्या कुटुंबियांना प्रचंड मानसिक त्रास होणे, अशा मानसिक त्रासामुळे नागरिकांचे हृदयविकाराने मृत्यू होण्याच्या घटना घडणे, त्यामुळे गोरगरीब नागरिकांमध्ये शासनाच्या विरोधात प्रचंड असंतोष निर्माण झालेला असून या संदर्भात शासनाची तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | चर्चा झाली. |
| १४. | "कोल्हापूर शहरातील शाहू मिलच्या सुमारे २६.८१ एकर जागेवर राजर्षी शाहु महाराजांचे यथोचित स्मारक करण्याची घोषणा तत्कालीन शासनाने दिनांक १८ डिसेंबर, २०२२ रोजी केली असणे, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१३ मध्ये सुमारे ५ कोटी व दिनांक ८ जानेवारी, २०१३ रोजी १ कोटी रुपयांचा निधी शासनाने जाहीर केला असेही निदर्शनास येणे, सदर शाहू मिलची जागा राज्याच्या वस्त्रोद्योग महामंडळाच्या ताब्यात असणे, ही जागा विनामुल्य कोल्हापूर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यासाठी शासनाने अद्याप कोणती कार्यवाही किंवा उपाययोजना केल्या नसणे, तसेच शाहू मिल विकास आराखडा यासाठी महानगरपालिकेने सुमारे ४०० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनास सादर केला असणे परंतु शासनाने अद्याप कोणतीही कारवाई सदर प्रस्ताव प्रकरणी केली नसल्याने, सदर प्रस्ताव प्रलंबित असणे,तसेच छत्रपती शाहू महाराज यांच्या | श्रीमती जयश्री जाधव, वि. स. स. | दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रस्तावित उपरोक्त प्रस्तावास शासनाने मान्यता दिली नसल्याने शासनाने जागतिक पातळीवर आपल्या कार्याचा ठसा उमटवलेल्या आदर्श राजाच्या स्मारकाची परवड होत असल्यामुळे संपूर्ण शाहू प्रेमी सर्व जातीधर्माच्या लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, तसेच शासनाने तातडीने उपरोक्त छत्रपती शाहू महाराजांच्या स्मारकाचे काम सुरू करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे अनेकदा करण्यात आलेली असणे, परंतु शासनाने सदर प्रकरणी निधी वितरणाबाबत केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी कोल्हापूरवासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १५. | "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांना सन २०१८ ते सन २०१९ दरम्यान प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे, उपरोक्त दोन्ही मंजूर योजनाच्या निविदा प्रक्रिया सन २०१९ मध्ये पूर्ण होवून कामाचे रुपये २१ कोटी किंमतीचे कार्यारंभ आदेश R.G.Sanap Construction Company व अ.क्र.२ वरील कामाचे रुपये ३२ कोटी किमतीचे कार्यारंभ आदेश M.M.Holambe Construction Company या कंत्राटदारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून देण्यात येणे, कार्यारंभ आदेशानुसार सदर कामे साधारणत: २० महिन्याच्या कालावधीत पूर्ण होणे अपेक्षीत असताना कंत्राटदारांकडून अत्यंत मंद गतीने कामे होत असल्याचे निदर्शनास येणे, सदर बाब स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री महोदय, सचिव व व्यवस्थापकीय संचालक मजिप्रा यांचे निदर्शनास आणून दिल्यानंतर व ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष चर्चा करूनही तसेच संबंधितांना वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असतानाही सदर योजना अद्यापि पूर्ण होवू न शकणे, हिंगणा तालुक्यातील दोन्ही योजनांची कामे या दोन्ही | श्री. समिर मेघे, वि. स. स. | दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कंत्राटदारांच्या अनुत्साहामुळे व कार्यपध्दतीमुळे न झाल्याने शासनाचा अनुक्रमे रुपये १७ कोटी व रुपये २६ कोटी खर्च झाला असतांना त्या योजनांचा लाभ इसासनी, निलडोह व डिगडोह येथील गावातील नागरिकांना न मिळणे, तसेच येथील नागरीकांची पिण्याच्या पाण्याबाबतची प्राथमिक स्वरुपातील सुविधा दर्जेदार व यशस्वीपणे सुरू होण्यासाठी संबंधितांना कालबद्ध कार्यक्रम करण्याची व सदर कामे प्रलंबित ठेवण्याबाबतची चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १६. | "आर्वी तालुक्यातील लोअर वर्धा प्रकल्पातील निंबोली (शेंडे), अहिरवाडा, ईठलापुर, सर्कसपुर, वाठोडा, भाईपुर, अंबिकापुर, वागदा, नेरी, पिपरी, अल्लीपुर, टोणा, राजापुर, बोरगांव (हातला), बाभुळगांव ही गांवे निम्न वर्धा प्रकल्प व आष्टी तालुक्यातील सावंगा (पुन.) हे गांव अप्पर वर्धा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या गावाचे पुनर्वसन झालेले असणे, त्या गावात भुमीहीन, बेघर व अतिक्रमीत नागरिकांना अजून पर्यंत नविन पुनर्वसन मध्ये भुखंड मिळालेले नसणे, तेथे शासकीय जागा व खुल्या जागेमध्ये मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध असणे, तसेच बाभुळगांव येथे खाजगी जागा सुध्दा उपलब्ध असणे, परंतु त्यांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मिळणाऱ्या घरकुल योजने पासुन वंचित राहावे लागत असणे, त्यांची नावे तेथील मतदार यादीत व आधार कार्ड मध्ये असणे, येथील नागरिकांत पट्टे न मिळाल्यामुळे त्यांना कोणत्याही योजनेचा लाभ घेता येत नसणे, त्यामुळे तेथील नागरिकांना शासनाद्वारे शासकीय व खुल्या जागेमधील शिल्लक जागेवर भुखंड वाटप करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. दादाराव केचे, वि. स. स. | दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| १७. | "ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर येथील सुमारे ८९९४. ६८ एकर जमीन तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या | सर्वश्री. नानाभाऊ पटोले, बाळासाहेब | दिनांक १४ डिसेंबर, |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | दिनांक ५ सप्टेंबर, २००८ रोजीच्या आदेशान्वये दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड या खाजगी कंपनीकडे बेकायदेशीररित्या हस्तांतरित करणे, सदर कंपनीने फक्त २९०५ एकर एवढ्या जमिन मिळकतीवर दावा करणे, परंतु दिनांक ११ डिसेंबर, २०१५ चे जिल्हाधिकारी ठाणे यांचे पत्राचे अनुषंगाने, तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी ८९९४. ६८ एकर जमीन कंपनीच्या नावे करणे, मीरा भाईंदरची जवळपास संपूर्ण जमिनी जिल्हाधिकारी ठाणे यांच्या दिनांक ५ सप्टेंबर, २००८ च्या आदेशाने वादग्रस्त झालेली असल्यामुळे यात केवळ लोकांच्या स्वमालकीच्या जमिनीच नाही तर युएलसी कायद्याच्या कलम २० नुसार सूट मिळालेल्या मोठ्या प्रमाणात सरकारी जमीन देखील जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशाने विवादित झालेली असून सन २००८ पूर्वी बांधलेल्या हजारो सोसायट्या असणे, याठिकाणी मोठ्या संख्येने सोसायट्यांना पुनर्विकासाची आवश्यकता, शासन किंवा त्यांचे अधिकारी सोसायट्यांना मदत करत नसल्यामुळे, फ्लॅट खरेदीदारांना कंपनीची बेकायदेशीर मागणी पूर्ण करण्यासाठी पैसे भरण्यास भाग पाडले जाणे, अन्यथा सक्षम प्राधिकाऱ्याकडून डीम्ड कन्व्हेयन्सचे अर्ज नाकारले जात असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास येणे, त्यामुळे तेथील जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याप्रकरणी चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | थोरात, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, वि. स. स. | २०२३ रोजी चर्चा झाली. |
| १८. | "औसा विधानसभा मतदारसंघात अनेक उपकेंद्र अतिरिक्त भार असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेती पंपाला सुरळीत वीजपुरवठा होत नसणे, मौजे माळूंब्रा येथे ३३/११ KV उपकेंद्र कृषी धोरण २०२० अंतर्गत कृषी आकस्मिक निधीतून मंजूर करण्यात येणे, सदरील कामाच्या जागेची कार्यवाही जिल्हाधिकारी, लातूर यांनी | श्री. अभिमन्यु पवार, वि. स. स. | दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | पूर्ण केली असणे, सदरील कामासाठी निधी उपलब्ध नसल्याने कामे प्रलंबित असणे, RDSS अंतर्गत भारत सरकारच्या निधीतून औसा मतदारसंघातील हालसी हत्तरगा, आशिव, उजनी, याकतपूर, येल्लोरी या ठिकाणी ३३/११ KV उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले असणे, औसा उप केंद्रातील ५ MV रोहित्राची १० MV क्षमता वाढ करण्याबाबत प्रस्तावित केले असणे, एम.आय.डी.सी., औसा नागरसोगा, जवळगा पो., खरोसा, तपसे चिंचोली, एरंडी, औसा, या उपकेंद्राच्या ठिकाणी अतिरिक्त ५ MV चे रोहित्र प्रस्तावित करण्यात आले असणे. दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी मुख्य अभियंता, महावितरण परिमंडळ कार्यालय, लातूर यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालय, औसा येथील आढावा बैठकीत मुख्य अभियंता यांनी इतिवृत्तांतच्या अनुषंगाने अतिरिक्त विद्युत वाहिनी, उपकेंद्रातील नवीन रोहित्र तसेच नवीन उपकेंद्राचे कामांचे प्रस्ताव RDSS अंतर्गत समावेश करण्याबाबत तसेच जळालेली रोहित्र तीन दिवसात दुरुस्त करून बसवण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असणे, परंतु आढावा बैठकीच्या अनुषंगाने दिलेल्या सूचनाबाबत अधिक्षक अभियंता, लातूर कार्यालयामार्फत कार्यवाही झाली नसणे, त्यामुळे जनतेत तीव्र नाराजी निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १९. | "महादेव ॲपच्या माध्यमातून संपूर्ण देशभरात ऑनलाईन बेटींग करण्यासाठी अनेक बेटींग ॲपच्या निर्मिती करण्यात आलेली असणे, सदर बेटींग ॲपच्या माध्यमातून देशभरातील अनेक सामान्य गरीब माणसांची फसवणूक केली असून या ॲपमधील पैसे बांग्लादेशी नागरिकांचे बनावट भारतीय कागदपत्रे बनवून एयु स्मॉल फायनान्स बँक या बँकेत हजारो बनावट खाते उघडून यातून आर्थिक व्यवहार केलेला असल्यामुळे तसेच शासनास देय असलेला २८ टक्के सेवा व वस्तुकर बुडविल्याप्रकरणी या ॲपवर एफआयआर ४७३ दिनांक ७ | ॲड. आशिष शेलार, वि. स. स. | दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नोव्हेंबर, २०२३ गुन्हा नोंदवण्यात येणे, या एफआयआरमधील आरोपी क्र. २ अमीत शर्मा हा मुंबई बॉम्बं स्फोट हल्ल्यातील आरोपी व अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम यांचा भाऊ मुस्ताकीन याचा भागीदार असणे, या दोघांवर महादेव ॲपला पैसे पुरविण्याचा आरोप असून अमीत शर्मा यांनी मुस्तोकीन यांचे मोठ्या प्रमाणात पैसे विजय जैन यांच्यार जे.पी. इन्फ्रा,मुंबई या बांधकाम व्यावसायिक कंपनीत गुंतविलेले असणे, तसेच अमीत शर्मा आणि विजय जैन यांचा दिंडोशी, मुंबई येथे जे पी डेक हा बांधकाम प्रकल्प सुरू असून सदर प्रकल्पाला श्री.ररेश शहा व एडलवाईस (EDELWEISS) या फायनान्स कंपनीने निधी पुरविलेला असणे,त्यामुळे देशविरोधी गुन्हेगार असलेल्या दाऊदशी संबंध असलेल्या अमित शर्मा यांच्या कंपनीला पैसे पुरविणे यावर अमीत शर्मा व ररेश शहा एडलवाईस या कंपनीची त्वरीत चौकशी करून यातील दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | | |
| २०. | "कोयना धरणातील ३७.५० टीएमसी पाणी सांगली जिल्ह्याचे हक्काचे असून कालवा समितीच्या बैठकीत त्याचे नियोजन झालेले असणे, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी पाणी सोडण्याची गरज असणे, पण प्रत्येकवेळा धरणातून पाणी सोडण्यासाठी अधिकाऱ्यांना शासनस्तरावरुन आदेश येणे, तसेच कोयना प्रकल्पातून पाणी बंद केल्यामुळे ताकारी योजनेचे ११ पैकी केवळ तीन पंप चालू असून पंधरा दिवस आधीच ताकारीचे आवर्तन बंद झाल्यामुळे कडेगाव, तासगाव तालुक्यातील रब्बी पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होणे, त्याबाबत शासनाने चौकशी करून सांगली जिल्ह्याचे हक्काचे पाणी सोडण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | श्री. जयंत पाटील, वि. स. स. | दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| २१. | "छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिडकोच्या वाळुंज | श्री. प्रकाश सोळंके, | दिनांक १५ |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रकल्पातील भुसंपादनातील दिरंगाई व विकास कामे यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कोणतेही कार्य सिडको, जिल्हाधिकारी यांच्याकडुन न होणे, सेवा-सुविधा, रस्ते यांच्याकरीता आवश्यक असलेल्या जमिनींचे संपादन आणि त्याचा विकास सिडको द्वारे होऊनच प्रकल्प अन्य प्राधिकरणांस हस्तांतरीत करण्याचे ठरणे, उलटपक्षी सेवा सुविधांचा विकास पुर्ण न करता प्रकल्प हस्तांतरण करण्याबाबत सिडकोने दिनांक १४ संप्टेंबर, २०२३ रोजी जन/शासना विरोधी ठराव घेणे, सिडकोच्या या कृतीच्या विरोधात मंत्री, लोकप्रतिनिधी, जनता यांनी दिलेले निवेदने विचारात न घेता प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडुन प्रकल्प हस्तांतरणांबाबतची कार्यवाही सत्वर होणे, अशी सत्वरता मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशांसाठी न होणे, प्रकल्पाच्या विकास कामांसाठी तुटपुंजा निधी दर्शवून प्रकल्प हस्तांतरण करणे, रस्ते अर्धवटरित्या सोडून देणे, हक्कभंग मांडण्यासाठी मागितलेली माहिती उपलब्ध करून न देणे, मुख्यमंत्री, शासन, लोकप्रतिनिधी यांना डावलून अधिकारी वर्गाकडुन मनमानी पध्दतीने कार्यवाही करण्यात येणे, सभागृहात दिलेले आश्वासन आणि शासनाचा निर्णय यावर हेतुपुरस्सरपणे कार्यवाही न होण्यामुळे सामान्य जनतेमध्ये शासन व सिडकोबद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊन शासन, सिडकोची प्रतिमा मलिन होणे, त्यामुळे सभागृहास दिलेल्या आश्वासनानुसार प्रकल्पाचे ठरल्याप्रमाणे विकास कामे पुर्णकरण्यासाठी सिडकोला निर्देश देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | वि. स. स. | डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| २२. | "मुंबईतील आरे कॉलनी युनिट २० येथील ५० वर्ष पुरातन राम मंदिर सांस्कृतिक केंद्राच्या जागेवर कब्रस्थान बनविण्याचा प्रयत्न काही सामाजिक व्यक्तींकडून होत असल्याचे निदर्शनास येणे, सदर | श्री. योगेश सागर, वि. स. स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सांस्कृतिक केंद्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणीकृत असल्याबची बाब निदर्शनास येणे, दिनांक ११ नोव्हेंबर २०१३ रोजी सदरहू ट्रस्टला सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम राबविण्यासाठी 'कल्याण केंद्र' म्हणून मान्यता मिळालेली असणे, माहे ऑगस्ट २०१४ मध्ये स्व.श्री.गुरुदास कामत यांनी त्यांच्या संसद सदस्यत्वाच्या कालावधीत स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत विकास करण्याबाबत तत्कालीन उपायुक्तांना शिफारस केली असल्याचे निदर्शनास येणे, तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी अंजुमन तालीम-उल-कुरान सुन्नी ताहा मस्जिद नावाच्या मुस्लिम ट्रस्टला जमिनीचा तात्पुरता ताबा देण्याचे निर्देश दिले असल्याचे निदर्शनास येणे, मात्र जागेचा तपशील निश्चित नसल्याचे निदर्शनास येणे, सदरहू जागा मुस्लिम स्मशानभुमीसाठी काही सामाजिक व्यक्तींनी बळजबरीने घेण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास येणे, यांसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी पत्रव्यवहार करूनही तसेच स्थानिक नागरिकांनी ही बाब महानगरपालिकेच्या निदर्शनास आणल्यानंतरही याबाबीकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत स्थानिक नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणे, अशाप्रकारे पुरातन राम मंदिराच्या व सांस्कृतिक केंद्राच्या जागेवर स्थानिक मुस्लिमांकडून व समाजकंटकांकडून कब्रस्तान निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याने हिंदू व मुस्लिमांमध्ये नाहक जातीय तेढ निर्माण होऊन प्रशासन याबाबीस पाठीशी घालत असल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २३. | "३३-११ या योजनेच्या अंतर्गत मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर पीटीसीची निर्मिती होत असणे, परंतु या पीटीसी विद्यमान धोरणानुसार फक्त भाडेतत्त्वावर देण्याची योजना असल्यामुळे या सदनिका | श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रकल्पग्रस्तांना देता येत नसणे, त्यामध्ये, आजमितीला मुंबई शहरात विकास प्रकल्प बाधित लोकांची संख्या एक लाखापेक्षा जास्त असणे, तसेच, तयार पीटीसी या भाडेतत्त्वावर मिळत असल्यामुळे प्रकल्पग्रस्त त्याठिकाणी जाण्यास तयार होत नसणे, त्यामुळे, पीटीसी या प्रकल्पग्रस्त सदनिकांमध्ये परावर्तित केल्याने प्रकल्पग्रस्तांना घर मिळून मुंबई शहरामधील अनेक स्थगित प्रकल्प मार्गी लागणे, त्यामुळे, पीटीसीचे प्रकल्पग्रस्त सदनिकांच्या मध्ये परिवर्तन करण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २४. | "मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे बांधकाम केलेल्या इमारतीमधील घर हस्तांतरण करणेबाबतची असलेली दहा वर्षाची अट शिथील करून पाच वर्षे इतकी करण्याबाबत राज्य शासनाने अनेक वेळा आश्वासन देऊनही अद्याप झो.पु. पुनर्विकास प्रकल्पातील घरे हस्तांतरणाची अट शासनातर्फे शिथील करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई शहर व उपनगरात झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील १० वर्षाच्या आतील सुमारे ६६ हजाराहून अधिक रहिवाशी कुटुंबांनी घरे विकत घेतली असून अद्याप त्यांच्या नावे हस्तांतरीत झाली नसल्याने त्यांना संरक्षण प्राप्त होत नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, सदरहू प्रकरणी राज्य शासनाने झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील घरे हस्तांतरणासाठी असलेली १० वर्षाची अट शिथील करून ५ वर्षे करण्याबाबत राज्य शासनाने शासन निर्णय जारी करून त्याची तात्काळ अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी एसआरए योजनेतील रहिवाशी कुटुंबांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५. | "पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यामध्ये जलजीवन मिशन योजनेंतर्गत एकूण ११४ पाणी योजना मंजुर झालेल्या असणे, त्यापैकी कोंडीवडे आमा, वडेश्वर, माऊ, सावळा, कोंडीवडे नामा, वडेश्वर, घोणशेत, केवरे, चावसर, गहुंजे, वळख, शिरदे, कुसवली, नागाथली, थुगाव, कुसगाव पमा, कुरवंडे, करंजगाव, साई — नाणोली, बऊर, ठाकूरसाई, धामणे, चिखलसे, डाहुली, वरसोली, सूदवडी, धनगव्हाण, राजपुरी, खांड, उकसान, कुणे — अनसुटे, खांडशी, नवलाख उंबरे, जाधववाडी, मिंडेवाडी, बधलवाडी, येलघोळ या ३७ गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मंजुर कामांना सन २०२१ मध्ये कार्यारंभ आदेश दिलेला असणे, यातील बहुतांश कामांची मुदत संपुष्टात आलेली असुन सदर कामे अद्यापही अर्धवट अवस्थेत असणे, मुदत संपल्यानंतर नाममात्र रक्कम आकारणे व दंडात्मक कारवाई केलेली दाखवुन सदर ठेकेदारांना कामांची मुदत वाढवून देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, ठेकेदार निकृष्ट दर्जाचे काम करीत असून योजनेतील साहित्य देखील अत्यंत निकृष्ट दर्जाचे वापरल्याने सदर कामांची गुणवत्ता कमी होणे, यामुळे शासन निधीचा मोठा अपव्यय होत असून संबंधित कंत्राटदरांची शासन स्तरावर चौकशी करून सदर कामांचे तृतीय पक्ष लेखापरीक्षण व्हावे अशी स्थानिकांकडून वारंवार मागणी होत असणे, परंतु सदर गंभीर विषयाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाविषयी पसरलेली तीव्र नाराजी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. सुनिल शेळके, वि. स. स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| २६. | "माहे नोव्हेंबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेतील रस्त्याच्या कामातील पेव्हर ब्लॉक बसवण्यास सन २०१९ पासून दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ पर्यंत मान्यता नसताना त्या काळात झालेल्या सर्व कामांना विशेष बाब | श्री. संतोष बांगर, वि.स.स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | म्हणून पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देण्याचा अनियमितपणा झाल्याने राज्यात कोट्यवधी रुपयांचा निधी वाटप करण्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी मंजुरी दिल्याची बाब उघडकीस येणे, शा.नि.क्र. ता.मु.यो.२०१७/प्र.क्र.४४/योजना १, दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ नुसार पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचा समावेश त्यामध्ये करण्यात येणे, सन २०१९ ते दिनांक २४ एप्रिल, २०२३ पर्यंत मंत्रालयीन-क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी संगनमत करून कोट्यवधी रुपयांचा निधी बेकायदेशीररित्या मंजूर करून खर्च करण्यात येणे, दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाला नियोजन व वित्त विभाग व मंत्रिमंडळाची मान्यता नसणे, वित्तीय अधिकार नियमावलीची अंमलबजावणी न करणे, तसेच हिंगोली जिल्ह्यातील तांडावस्ती सुधार योजनेतील पूर्ण झालेल्या कामाची देयके समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून मंत्रालयात प्रस्ताव सादर करून ८ ते १० महिन्यांचा कालावधी होणे, सचिवांकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवण्यास टाळाटाळ करणे, त्याला मंजुरी मिळूनही निधी वितरीत न होणे, यामुळे सदरहू कामे केलेल्या ठेकेदारांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहणे, मात्र दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ पर्यंतच्या बेकायदेशीर कामांच्या निधीचे वाटप तातडीने करण्यात आल्याबाबत जनसामान्यांमध्ये निर्माण झालेली तीव्र चीड व संतापाची भावना, यावर शासनाने केलेली कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया." | | |
| २७. | "नागपूर नगराला वसविणारे, गोंड समाजाचे आराध्य, गोंड राजे बख्त बुलंद शाह यांनी एन.आय. टी (नासुप्र) यांच्या विशेष विनंतीवरून एकूण २२ एकर जागा एन.आय. टी (नासुप्र) ला देणे, जागा देताना त्यातील ३.३६ एकर जागा राजघाट करिता संरक्षित करून त्या ठिकाणी ऐतिहासिक वास्तू निर्माण करावी ही अट ठेवून जागा देणे, भावी पिढीला नागपूर शहराचा इतिहास माहीत व्हावा, नागपूर शहराला वसविणारे गोंड राजे | डॉ. देवराव होळी, वि. स. स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | बंख्त बुलंद शाह यांना उचित सन्मान मिळावा याकरिता सदर जागा संरक्षित करावी अशी अट असणे, मात्र एकीकडे नागपूर शहराच्या विकासाकरिता कोट्यवधी रुपयांचा निधी दिला जात असताना नागपूर नगरीचे निर्माते गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या सन्मानार्थ राजघाट परिसराचे सौंदर्यीकरण करून गोंडीयन सांस्कृतिक समाज भवन करण्याकडे सरकारचे पूर्णतः दुर्लक्ष होणे, परिणामी गोंड राजे बख्त बुलंद शाह राजघाट सक्करदरा या परिसराची दुरावस्था झाली असून तेथे अतिक्रमण होणे, नागपूरच्या इतिहासासोबत व आदिवासी समाजासोबत फार मोठा अन्याय असणे, त्यामुळे गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या सन्मानार्थ राजघाट परिसराचे सौंदर्यीकरण करून गोंडीयन सांस्कृतिक समाज भवन निर्माण करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २८. | "महानगरपालिका क्षेत्रालगतच्या परिक्षेत्राचा विकास करण्यासाठी महानगर प्रदेश विकास प्राधिकरण होणे, सन २०१५ साली स्थापन झालेले पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण चांगल्या प्रकारे कार्यरत असणे, त्यामुळे पुणे जिल्ह्याची प्रगती झालेली असणे, सन २०१७ साली स्थापन करण्यात आलेले नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण योग्य पद्धतीने कार्यरत नसणे, नाशिक महानगरपालिका क्षेत्रालगत गावांचा समावेश fringe area अंतर्गत समावेश असल्याने या जागेचा सुनियोजित पद्धतीने विकास होणे आवश्यक असणे, परंतु विकास आराखडा तयार केला नसल्यामुळे विकास नियोजनबद्ध होत नसणे, नाशिक विकास प्राधिकरण येथे वरिष्ठ प्रशासकीय सेवेतील अधिकारी देणे गरजेचे असताना सक्षम अधिकारी दिला नसणे तांत्रिक कामकाज करण्यासाठी अभियांत्रिकी कर्मचारी नसणे, सन २०२६-२७ मध्ये नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार असणे, यात बाहेरून येणाऱ्या वाहतुकीचे | श्रीमती देवयानी फरांदे, वि. स. स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | नियोजन करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेत सन २०१७ साली विकास आराखडा तयार केला असणे, या प्रस्तावित बाह्य वळण रस्त्याची मागणी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे करणे, मा. मुख्यमंत्री यांनी एमएसआरडीसी ला प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देणे, एमएसआरडीसीने काम न करणे, ग्रामीण हद्दीतील रस्त्याचे क्षेत्र आरक्षित करण्यासाठी कलम २०(३) व २०(४) अंतर्गत कार्यवाही करण्याची आवश्यकता, प्रशासनाचे याबाबीकडे होत असलेले दुर्लक्ष, याचा विपरीत परिणाम नाशिकच्या विकासावर व सिंहस्थ कुंभ मेळ्याच्या नियोजनावर होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २९. | "नाशिक येथील एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्रात विद्युत विनियमासंदर्भात सुविधा उपलब्ध असणे,त्यामध्ये ६५० एकर जागा रेल्वेमार्ग, प्रशासकीय इमारती, कामगार वसाहत, राख साठवणूक बंधारा, पाणी इत्यादी आवश्यक सोयीसुविधांचा समावेश असणे, तसेच शासनाने एकलहरे येथे ६६० मेगावॅट प्रकल्प दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ रोजी मंजूर करून देखील शासनाने स्थगित ठेवणे, सन २०२३ मधील पावसाळी अधिवेशनामध्ये उपस्थितीत केलेल्या लक्षवेधीच्या उत्तरामध्ये विद्यमान ऊर्जा मंत्री यांनी केंद्र शासनाच्या प्रस्तावित धोरणामुळे व शासनाने दिनांक १७ जून २०२० रोजी च्या पत्रानुसार पुढील पाच वर्षांत राज्यात कोणताही औष्णिक वीज प्रकल्प प्रस्तावित नमूद करणे, तसेच दिनांक ०२ जून २०२० रोजी मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीत नवीन औष्णिक वीज प्रकल्प राबविता येणार नसणे, याबाबतचा संदर्भ सदर उत्तरात असणे असे असतांना देखील नाशिक येथील एकलहरे औष्णिक वीज प्रकल्पास मान्यता न देणे, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत कोराडी सुपर क्रिटिकल वीज प्रकल्पास मान्यता देणे, परिणामी नाशिकमधील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती सरोज आहिरे, वि. स. स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०. | "मराठा समाजाच्या आरक्षण आंदोलनांचे निमित्त साधून दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी बीड जिल्ह्यातील काही ठिकाणी व बीड शहरात भर दुपारी जाळपोळीच्या घटना घडणे, सदर घटना घडत असतांना जमावधारकांनी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधीच्या राहत्या घरावर जीवघेणा हल्ला करून घर पेटवून देणे, चारचाकी वाहने जाळून टाकणे तसेच त्यांचे घरातील सदस्यांच्या जिवीतास धोका होईल, असे कूर कृत्य करण्यांत येणे तसेच बार्शी रोडवरील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्यालय देखील पेटवून दिल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे आढळणे, मराठा समाजाने आरक्षणासंदर्भात यापूर्वी अनेक आंदोलन केली असुन ही आंदोलने शांततेत शिस्तीत व सनदशीर मार्गाने केलेली असणे, त्यामुळे आंदोलन करणारा मराठा बांधव असे हिंसक व जीवघेणे आंदोलन करणे शक्य नसणे, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेला जीवघेणा हल्ला, मराठा समाजाने किंवा स्थानिकांनी केलेला नसून काही समाजकंटकांनी केला असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येणे, याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना पुन:श्च घडू नयेत याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री (गृह) व पोलीस महासंचालक यांना कळविण्यांत आलेले असणे, परंतु अद्यापही कारवाई न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री संदिप क्षिरसागर, रोहित पवार, सुनिल भुसारा, अजय चौधरी, संजय गायकवाड, जयंत पाटील, वि.स.स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ३१. | "प्रकाशा बुराई उपसा जलसिंचन योजना ता.जि.नंदूरबार योजनेला सन १९९९ मध्ये ११० कोटींच्या रकमेस प्रशासकीय मान्यता मिळणे, त्यानंतर योजनेचे काम सुरू होवून त्यावर १०९ कोटी रुपये खर्च करण्यात येणे, त्यातून हाटमोहिदा गावाजवळ जॅकवेल तसेच योजनेच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील | श्री. जयकुमार रावल, वि. स. स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | पाईपलाईनचे काम देखील पूर्ण होणे, प्रशासकीय मान्यतेसाठी झालेल्या विलंबामुळे प्रकल्पाच्या उभारणी खर्चामध्ये वाढ होणे, त्याकरीता सबंधित विभागाने शासनाकडे उक्त प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे सन २०१९ पासून सादर करण्यात येणे, परंतु त्यावर अद्याप निर्णय न झाल्यामुळे योजनेचे काम थांबणे, त्यामुळे नंदुरबार, सिंदखेडा आणि साक्री तालुक्यातील जवळपास ५० पेक्षा जास्त कायमस्वरूपी दुष्काळी गावांचा पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न अवलंबून असणे, नुकत्याच शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी तालुक्यांच्या यादीतदेखील सिंदखेडा आणि नंदुरबार या दोन्ही तालुक्यांचा समावेश असणे, तर साक्री तालुक्यातील दुसाने महसूल मंडळाचा देखील समावेश असणे, कायमस्वरूपी दुष्काळी भाग असल्याने येथे हरीतक्रांती आणण्याकरिता प्रकाशा बुराई उपसा जलसिंचन योजना महत्वाकांक्षी प्रकल्प असणे, परंतु सुप्रमा देण्याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ३२. | "राज्यातील गडचिरोली जिल्ह्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरीप व रब्बी हंगामातील धान भरडाई करून होणाऱ्या सीएमआर कच्चा तांदूळ तयार करण्याचे काम स्थानिक मायाश्री राईस, मायाश्री ॲग्रो व मायाश्री फूड इंडस्ट्रीज वडसा यांना देण्यात आले असणे; सदरहू मिलर्सकडे धान भरडाईसाठी लागणारी यंत्र-सामग्री नसतांना बनावट कागदपत्र व बनावट प्रतिज्ञालेख जोडून आदिवासी विकास महामंडळ तथा जिल्हाधिकारी/ अध्यक्ष भात भरडाई समन्वय समिती गडचिरोली यांचेकडे सादर करून धान भरडाई चे काम चुकीच्या पद्धतीने मिळवुन शासनाची दिशाभूल करणे, याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रार केली असता मिलर्सकडून फसवणूक झाल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न झाले असणे; केंद्र शासनाच्या | श्री. सुभाष धोटे, वि. स. स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | निर्देशानुसार व मिलर्स सोबत केलेल्या अटी शर्तीनुसार विनिर्देशात बसणारा (FAQ) दर्जाच्या सीएमआर तांदूळ बदलून जमा करून घेण्याचे निर्देश देऊनही संबधित अधिकाऱ्याचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असून केंद्र शासनाच्या सूचनेनुसार व विनिर्देशात बसणारा (FAQ) सीएमआर तांदूळ विहित कालमर्यादेत जमा न केल्याने धानाचा अपहार केल्याप्रकरणी इंडस्ट्री संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता असताना याकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाप्रती जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ३३. | "पेण अर्बन बँक यांच्या रायगड जिल्ह्यामध्ये १५ व मुंबई मध्ये ३ अशा एकूण १८ शाखा असणे, सदर बँकेमध्ये ७५८ कोटी रुपयांचा महाघोटाळा झाल्यामुळे दिनांक २३ सप्टेंबर, २०१० रोजी रिझर्व बँकेने निर्बंध आणल्याने सदर बँक बंद होणे, या बँकेमध्ये एकूण १ लाख ९८ हजार ठेवीदार असून सदर बँकेत ४२ हजार भागधारक असणे, सर्व ठेवीदार व भागधारक यांना न्याय मिळवून देण्यासाठी पेण अर्बन बँक संघर्ष समिती स्थापन केलेली असणे, सदर समितीने वारंवार शासनाकडे न्याय मिळण्याबाबत मागणी केलेली असणे, पेण अर्बन बँक बंद झाल्यामुळे अनेक लोकांचे संसार उध्वस्त झाले असून मानसिक तणावामुळे आजपर्यंत जवळपास ४०० लोकांचा मृत्यु झालेला असणे, त्याच प्रमाणे सदर बँकेतील हजारो ठेवीदार व खातेदार आर्थिक संकटात सापडणे व त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत असणे, याप्रकरणी चौकशी करून पेण अर्बन बँक ठेवीदार व खातेदार यांना योग्य तो न्याय मिळवून देण्यात यावा अशी मागणी कर्जत येथील लोकप्रतिनिधींनी मा. सहकार मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी व तत्पूर्वी अनेक वेळा केलेली असणे, शासनाने याप्रकरणी विशेष लक्ष देऊन पेण अर्बन बँक ठेवीदार व खातेदारांना न्याय मिळवून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. महेंद्र थोरवे, वि. स. स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३४. | "पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील मौजे तामदर्डी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथे को. प. बंधारा प्रस्तावित असणे, सदर बंधाऱ्यामुळे तालुका मंगळवेढा मधील तामदर्डी, तांडोर,सिद्धापूर माचनूर व ब्रह्मपुरी तर तालुका मोहोळ मधील आरबळी, मिरी, बेगमपूर, घोडेश्वर, इनकी व दक्षिण सोलापूर मधील वडापूर या गावांना याचा मोठा लाभ होणे, सदर बंधाऱ्याचा पाणीसाठा ५०० द.ल.घ.मी इतका असून ह्यामुळे जवळपास ५२५ हे. इतके क्षेत्र ओलिताखाली येणे, सदर बंधारा व्हावा याकरिता अनेक दिवसांपासून ग्रामस्थांची व लोकप्रतिनिधींची मागणी असणे, सदरच्या प्रस्तावाची तांत्रिक व प्रशासकीय बाबी पूर्ण होऊन देखील आवश्यक असलेला निधी अद्याप उपलब्ध न होणे, सदरची गावे आणि विशेषतः मंगळवेढा तालुका हा अवर्षण प्रवण क्षेत्रात येणे, यामुळे येथील शेतकरी व नागरिकांना नेहमी पिण्याच्या पाण्याच्या व शेतीकरिता आवश्यक पाण्यापासून वंचित रहात असणे, सदरचा बंधारा अद्याप न झाल्यामुळे येथील शेतकरी व नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी प्रचंड असंतोष निर्माण होणे, सदर बंधारा त्वरीत बांधण्यासाठी निधीची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. समाधान अवताडे, वि. स. स. | दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ३५. | "राज्यातील अभियांत्रिकी, औषधी निर्माण शास्त्र, तंत्रनिकेतन, हॉटेल व्यवस्थापन आणि आर्किटेक्चर या व्यावसायिक अभ्यासक्रमातील अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची सन २०२१ - २२ आणि सन २०२२ - २३ पासून ची शिष्यवृत्ती देण्यात आली नसल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा यासाठी सन २०१८-१९ मध्ये डीबीटी योजना सुरू करण्यात येणे, या शिष्यवृत्तीच्या भरवशावरच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात मोफत प्रवेश | सर्वश्री लहू कानडे, सुनिल प्रभू, विजय वडेट्टीवार, वि. स. स. | दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | दिला जात असणे, मात्र दोन वर्ष शिष्यवृत्तीची रक्कम मिळत नसल्याने विनाअनुदानित महाविद्यालयासमोर आर्थिक संकट उभे राहणे, केंद्र शासनाकडून सन २०२१-२२ पासून अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती न देण्यात येणे, तसेच अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना गत दोन वर्षापासून निर्वाह भत्ता व परीक्षा शुल्काची रक्कम मिळालेली नसणे, शासनाच्या शुल्क नियंत्रण समितीतर्फे गत पाच वर्षापासून शुल्क वाढवण्यात आलेले नसणे, शिष्यवृत्तीची रक्कम देखील थांबवण्यात येणे, यामुळे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांमध्ये भवितव्य धोक्यात आल्याची भावना निर्माण होणे, अशाप्रकारे अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांमध्ये शासनाबद्दल पसरलेली नाराजीची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती, निधी, निर्वाह भत्ते, परीक्षा शुल्क व इतर सुविधा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ३६. | "नांदेड (हुजुर साहेब) येथे शीख समाजाचे पवित्र स्थान जगप्रसिद्ध सचखंड गुरूद्वारा असणे, सदर गुरुद्वाराच्या १९५६ च्या कायद्यात शासनाने दुरुस्ती केली असणे, त्यात कलम ११ चा समावेश असणे त्यात गुरुद्वारा बोर्डाचा अध्यक्ष निवडीचा अधिकार सरकार कडे आला असणे,परंतु या निर्णयाची पंजप्यारे साहिब आणि शीख समाजात प्रचंड नाराजी पसरली असणे,तसेच दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ नांदेड गुरुद्वारा येथे तत्कालीन मुख्यमंत्री आले असता त्यांनी सन २०१४ मध्ये कलम ११ मध्ये सुधारणा रद्द करून पूर्वीप्रमाणे कलम ११ करण्याची घोषणा केली असणे, परंतु घोषणेची शासनाकडून अंमलबजावणी झाली नसणे, गुरूद्वारा बोर्डबाबत समाजाच्या ३ प्रमुख मागण्या असणे १) शासनाने सन २०१४ वर्षी गुरूद्वारा बोर्ड यांचे कलम ११ यात सुधारणा केल्या त्या रद्द करणे २) सुमारे ३ वर्षापासून उच्च | श्री. मोहनराव हंबर्डे, वि. स. स. | दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | न्यायालयाच्या आदेशाचे पालन शासनाकडून करण्यात आले नसणे, गुरुद्वारा बोर्डाची निवडणुक लोकशाही पद्धतीने तातडीने घेण्यात यावी अशी मागणी स्थानिक शीख समाजाची असणे ३) गुरूद्वारा बोर्डाच्या नियमात काही बदल करावयाचे असल्यास, शासनाने नांदेड स्थानिक शीख बांधवांच्या भावना व त्यांची मागणी प्रमाणेच ॲक्ट मध्ये बदल करण्याची आवश्यकता, स्थानिक शीख समाजाच्या संमतीविना कोणतेही बदल न करण्याची मागणी, शीख समाज बांधवांमध्ये शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची भावना पसरलेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३७. | "मौजे बेलोरा, जेना (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) या गावाची ३३० एकर शेतजमीन सन २००० मध्ये मे.सेंट्रल कॉलरीज कंपनी मर्यादित नागपूर या कंपनीने स्थानिकांना कायमस्वरुपी नोकरीची आश्वासन देऊन कवडीमोल भावाने खरेदी करणे, या कंपनीच्या माध्यमातून पॉवर प्लांट उभारणे व त्याकरिता लागणारा कोळसा स्थानिक शेतजमीनीमधून उत्खनन करण्यात येणार असणे, स्थानिकांना रोजगार मिळणार या आशेने गावकऱ्यांनी आपल्या शेतजमीनी याकंपनीला १९,००० प्रति एकरप्रमाणे विकल्या असणे, परंतु या शेतजमीनीवर मे.सेंट्रल कॉलरीज कंपनी मर्यादित, नागपूर यांनी कोणताही पॉवर प्लांट न उभारता सर्रासपणे अवैध कोळसा उत्खननाचे काम सुरू करून खाजगी बाजार पेठेत विकणे, या प्रकरणाची दखल शासनाने घेऊन सन २००४ मध्ये या कंपनीच्या बेलोरा, जेना येथील कोळसा उत्खननावर बंदी घालून कंपनीचे काम कायमचे बंद करणे, सदर कंपनीने ज्या शेतजमीनी स्थानिकांकडून खरेदी केल्या त्या सर्व शेतजमीनी शासनाच्या मदतीने कोर्टामार्फत अरविंदो रियालिटी अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीने सन २०२२-२३ मध्ये खरेदी करून अरविंदो कोलमाईन्स ह्याकंपनीच्या माध्यमातून कोळसा | सर्वश्री विजय वडेट्टीवार, अशोक चव्हाण, सुरेश वरपुडकर, डॉ. नितिन राऊत, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री अमिन पटेल, अस्लम शेख, अमित देशमुख, धिरज देशमुख, अमित झनक, राजेश एकडे, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री सुभाष धोटे, सुनिल केदार, विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, संजय जगताप, ऋतुराज पाटील, विक्रमसिंह सावंत, | दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | उत्खननास सुरुवात करणे, याबाबत ज्या शेतकऱ्यांची शेतजमीन या प्रकल्पासाठी घेण्यात आली होती त्या शेतधारकांच्या मागण्यांबाबत अरविंदो कंपनीच्या व्यवस्थापनानेही आजतागायत कोणताही प्रतिसाद दिला नसणे, त्यामुळे शेतधारकांचे एकमेव उदरनिर्वाहाचे साधन असलेली शेतजमीन जाऊन २३ वर्षे झालेली असतानाही अद्यापही रोजगाराच्या प्रतिक्षेत असणे, जमीन जाणे तसेच रोजगारही न मिळणे या विवंचनेत हे जमिनधारक जीवनजगत असणे, याबाबत संबंधित शेतधारकांवर झालेल्या अन्यायाचे निवारण करण्याकरिता त्यांना शेतजमीनीचा वाढीव मोबदला देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | वि. स. स. | |
| ३८. | "राज्यात शेतीपूरक व्यवसाय बहुतांश शेतकरी दूध व्यवसाय करीत असणे, सहकाराच्या ८५ दूध संघ व १५ खाजगी संघ दररोज १ कोटी १५ लक्ष लिटर संकलन करणे, सहकार संघाच्या माध्यमातून ४२ लक्ष लिटर व खाजगी संस्थेमार्फत १ कोटी ३ लक्ष लिटर दूध संकलन होणे, पाऊस व उष्णते मुळे पशु खाद्य महाग झाले असणे, लंपी आजारामुळे राज्यामध्ये गाई व म्हशी मृत पावल्यामुळे दूध उत्पन्नात घट होणे, दूध पावडरचे भाव घटल्याने भाव पडणे, तसेच दुग्धजन्य पदार्थांवर सेवा व वस्तु करामुळे व पॅकिंग आणि पुरवठ्यासाठी मनुष्यबळ लागणे, यामुळे खर्चात वाढ होणे, दूध उत्पादक संघ तोट्यात जाणे, कोरोंना काळात रेस्टॉरंट, मिठाई दुकान बंद असतांना दूध दरात घट झाली असणे, त्या काळात दूध विक्री करणे कठीण झाले असणे, त्यामुळे शेतकऱ्यांनी त्याचे उत्पादन कमी करणे, बनावट भेसळयुक्त दूध विक्री होऊन आरोग्यावर घातक परिणाम व असाध्य आजार होणे, शासकीय धोरण व खाजगी कंपन्यांच्या स्पर्धेमुळे अनेक वर्षापासून दुग्धव्यवसाय अस्थिर असणे, दूध उत्पादकांचा चारा, वैरण, सुग्रास, ढेप, औषधे, पशुवैद्यकीय कृत्रिमरेतण, याचा उत्पादन | सर्वश्री. हरिभाऊ बागडे, शंकरराव गडाख, राम सातपुते, श्रीमती अश्विनी जगताप, ॲड.राहुल कुल, वि. स. स. | दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | खर्च मिळालेल्या दूध दरापेक्षा जास्त असणे, त्यामुळे दूध उत्पादन कमी होणे, दूध उत्पादकांना मदत करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ३९. | "प्रस्तावित कराड-चिपळूण रेल्वेमार्गामुळे कोकणातील सागरी बंदरे उर्वरित जिल्ह्यांशी जोडली जाणार असणे, यामुळे कोकणातील औद्योगिक विकासाला चालना मिळणार असणे, कोकण व पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या कराड-चिपळूण रेल्वे प्रकल्पाचे दिनांक १४ ऑगस्ट २०१६ रोजी भूमीपूजन होऊनही प्रकल्प प्रलंबित असणे, या कामाबाबत दिनांक २१ मार्च २०२३ रोजी चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना बंदरे व खनिकर्म मंत्री यांनी कराड-चिपळूण रेल्वेमार्गासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा तसेच महिन्याभरात बैठक घेण्यात येणार असल्याचे सभागृहास आश्वासित करणे, शासनाकडून केंद्र शासनाकडे या प्रकल्पाकरिता पाठपुरावा करण्यात आल्याबाबतची माहिती सांगण्यात न येणे, बंदरे व खनिकर्म मंत्री यांच्याकडून अद्याप कोणत्याही बैठकीचे नियोजन न करण्यात आल्यामुळे शासनाला सभागृहातील दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला असणे, कोकण व पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला चालना देणाऱ्या या रेल्वे प्रकल्पाबाबत लोकप्रतिनिधींच्या प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर रेल्वे प्रकल्प तातडीने पुर्ण होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि. स. स. | दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ४०. | "पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या पुनावळे हद्दीतील वनविभागाच्या २६ हेक्टर जागेवर सन २००८ मध्ये कचरा डेपोसाठी आरक्षण टाकण्यात येणे, गत पंधरा वर्षात या भागात विविध शैक्षणिक संस्था, मोठे गृह प्रकल्प, हिंजवडी आयटीपार्क असल्याने लाखो नागरिक, अभियंते नोकरीनिमित्त स्थायिक झालेले असणे, वन विभागाच्या ५७ एकर जागेत कचरा डेपो झाल्यास परिसरातील वृक्ष नष्ट होण्याचा धोका निर्माण होणे,सदर | श्रीमती अश्विनी जगताप, श्री. जयंत पाटील, वि. स. स. | दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | भाग डोंगराचा असल्याने पावसाळ्यात कचरा डेपोतील दुषित पाणी सखल भागात व पवना नदीच्या पात्रात येऊन पिण्याचे पाणी दुषित होऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता, पुनावळे येथील आरक्षित जागेच्या बदल्यात पालिकेच्या वतीने वन विभागाला चंद्रपूर येथे २२ हेक्टर खाजगी जमीन ९ कोटी रुपयांना खरेदी करून देण्याच्या मनपाच्या प्रस्तावास स्थगिती देण्याची आवश्यकता, औद्योगिकीकरणामुळे शुद्ध हवेची पातळी खालावलेली असताना वृक्ष तोड करून कचरा डेपो बनविण्याचा प्रस्ताव अनाकलनिय, अव्यवहारिक असणे, वन विभागाच्या २६ हेक्टर जागेवर विविध प्रकारचे दाट वृक्ष असून कचरा डेपो निर्माण केल्यास पर्यावरणाची हानी होण्याची शक्यता, पुणे विमानतळापासून पुनावळेचे अवकाशातील अंतर केवळ ११ किमी असून कायद्यानुसार किमान २० कि. मी. अंतर आवश्यक असतानाही महानगर पालिका कायद्यातील तरतुदींचे पालन न करता कचरा डेपोचा घाट घालण्यात येणे, पुनावळे येथील वन विभागाच्या जागेवर कचरा डेपोसाठी राखीव असलेल्या जागेच्या हस्तांतरणाच्या प्रक्रियेस तातडीने स्थगिती देण्याची आवश्यकता, उद्योगनगरीतील नागरिक, पर्यावरण संरक्षक संस्था यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४१. | "वर्सोवा, मुंबई येथील जेव्हीएलआर मार्गावरील बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल हा एसव्ही रोड ते इन्फिनिटी मॉल लिंक रोड पर्यंतचा विस्तारित पूल व रस्ता गत अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, त्यामुळे वर्सोवा विभागात मोठ्या प्रमाणावर वाहतुकीचा प्रश्न निर्माण होणे, सदर वाहतुकीचा प्रश्न संपुष्टात आणण्यासाठी बाळासाहेब ठाकरे पूल लिंक रोड पर्यंत विस्तारित करणे अत्यंत आवश्यक असून सध्या याच मार्गावरून मेट्रोचे कामदेखील सुरू असणे, पूल निर्मितीकरिता मुंबई महानगर पालिकेतर्फे | डॉ. भारती लव्हेकर, वि. स. स. | दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | एमएमआरडीए ला ३८४.५० कोटी रुपये (एकूण ७६८.८५ कोटी रुपयांपैकी ५० टक्के निधी) देखील वर्ग करण्यात येणे, परंतु इन्फिनिटी मॉल ते पश्चिम द्रुतगती महार्गाकडील भाग अद्यापपर्यंत अपूर्ण असल्याचे माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, सदर कामासाठी आवश्यक जमिन अधिग्रहण प्रक्रिया अद्याप पूर्ण करण्यात आलेली नसून सदर जागेवरील झोपड्यांची अतिक्रमणे देखील हटविण्यात न येणे, तसेच सदर प्रकल्पासाठी सल्लागाराची नेमणूकही केलेली नसणे, सदर विलंबामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण होणे, याप्रकरणी वर्सोवा येथील इन्फिनिटी मॉल ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडील भागाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४२. | "मुंबईतील बेस्ट उपक्रमात सध्या सहा हजारांपेक्षा अधिक कंत्राटी कर्मचारी असून यात अनेक महिला वाहकांचाही समावेश असणे, माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये धारावी आगारातील कंत्राटी महिला वाहकांसाठी असलेल्या विश्रांती कक्षाचे छत कोसळल्याची घडलेली घटना, बेस्ट उपक्रमात कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागत असणे, असून सदर कंत्राटी वाहक महिलांना अत्यंत तुटपुंजे वेतन मिळणे, कंत्राटी वाहक महिलांना बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांमधून कर्तव्य बजावत असतानाही तिकीट काढावं लागत असणे, बेस्टच्या आगारांमध्ये या कंत्राटी वाहक महिलांसाठी असलेल्या स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत बिकट असणे, कर्तव्य बजावताना असताना बस शेवटच्या थांब्यावर पोहोचल्यानंतर तिथे असलेल्या चौकीच्या ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृह नसणे, महिला वाहकांना पुरुषांसाठीच्या स्वच्छतागृहांमध्येच जावे लागत असणे, बहुतांश महिला वाहकांना मूत्राशयाचे विकार होत असल्याचेही | प्रा. वर्षा गायकवाड, वि. स. स. | दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | निदर्शनास येणे, त्यामुळे महिला वाहकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, बेस्टमध्ये कमतरता असलेल्या कामगारांची भरती करावी आणि कंत्राटी सेवेत असलेल्या महिला वाहकांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची तसेच सदर महिला वाहकांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४३. | "धुळे जिल्ह्यात पुरेसा पाऊस झाला नसल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, ज्या मंडळामध्ये ३१ दिवसांपेक्षा जास्त पावसाचा खंड होता,त्या मंडळातील शेतकऱ्यांना पिक विम्याची अग्रीम रक्कम देण्याची मागणी झालेली असणे, जिल्ह्यातील २ लाख ४६ हजार ८४७ शेतकऱ्यांनी खरीप हंगामात २ लाख ५३ हजार ८२३ हेक्टर क्षेत्राचा पिक विमा काढलेला असणे, त्यात धुळे तालुक्यातील ६७ हजार ५८१ हेक्टर क्षेत्रातील ८० हजार ५८६ शेतकऱ्यांचा समावेश असणे, राज्य सरकारने पीक विमा कंपन्यांना २४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अग्रीम रक्कम देण्याचे आदेश दिले असतानाही विमा कंपनी टाळाटाळ करीत असणे, कृषि विभागाने ६५ टक्के नुकसान झाले असल्याचा अहवाल दिलेला असून आयुक्तांनी ते मान्य केलेले असतानाही विमा कंपनी फक्त ५३ टक्के नुकसान झाल्याचे दाखवीत असणे, त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना अग्रीमच्या लाभापासून वंचित राहणार असल्याचे दिसून येणे, विमा कंपन्या शेतकऱ्यांची फसवणूक करीत असणे, त्यामुळे शासनाने या सर्व विमा कंपन्यांचा ताळेबंद तपासावा, विशेष तपास पथक नेमून विमा कंपन्या शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याप्रकरणी शोध घेण्याची आवश्यकता, शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने विमाधारक शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. कुणाल पाटील, वि. स. स. | दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ४४. | "महाराष्ट्र जमीन महसूल नियम २०१९ मध्ये भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनींना भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याकरिता दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी अधिसूचना काढण्यात येणे, सदर भोगवटादार वर्ग रूपांतरित करण्याकरिता अधिसूचनेमध्ये २ वर्षाचा कालावधी देणे, सदर अधिसूचनेत रूपांतरित करण्याकरिता वर्गवारीनुसार बाजार मूल्याच्या १० ते १५ टक्के रक्कम आकारणे, या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये गृहनिर्माण संस्थांकडून हस्तांतरण करीता अर्ज सादर न होणे, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी सदर अधिसूचनेचा कालावधी संपुष्टात येणे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिनांक ७ मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणे, हस्तांतरण प्रक्रियेकरिता सदस्य हस्तांतर होणे आवश्यक असणे, सदस्य हस्तांतरणाचा कालावधी अधिक असणे, जिल्हाधिकारी कार्यालाकडून सामान्य रहिवाशांना याप्रकरणी नाहक वेळ काढूपणा केल्याचे दिसून येणे, यामुळे फ्री होल्ड प्रक्रिया देखील मंद गतीने चालणे, जीर्ण झालेल्या इमारतीच्या गृहनिर्माण संस्थांना १० ते १५% ऐवजी २.५% बाजार मूल्याचे शुल्क आकारण्यात यावे अशी नागरिकांची वारंवार मागणी होणे, पावसाळी अधिवेशनात मा.अध्यक्ष्य महोदय यांच्यासमवेत बैठक होऊनसुद्धा अद्याप याप्रकरणी निर्णय न होणे, धोरणात त्रुटी असल्याकारणाने पुनर्विकास होत नसल्याने जीर्ण असलेल्या इमारतींमध्ये जेष्ठ नागरिकांना राहावे लागणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. मंगेश कुडाळकर, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ४५. | "नागपूर जिल्ह्यातील देवलापार येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित असून ७२ गावांचा समावेश असणे, शासनाने राज्यातील तालुक्यांच्या विभाजनाच्या अनुषंगाने नव्याने निकष ठरविण्यासाठी तालुका पुनर्रचना समिती स्थापन करणे, तालुका पुनर्रचना | ॲड. आशिष जयस्वाल, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | समितीला शासनाने वारंवार मुदतवाढ देणे, मात्र तालुका पुनर्रचना समितीने अद्याप निकष न ठरविणे, परिणामी देवलापार तालुका निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असताना विधानसभेचा ४ वर्षांचा कालावधी पूर्ण होऊनही याबाबत निर्णय न होणे, याबाबत वारंवार अनेक मागण्या करूनही त्या प्रलंबित असणे, वेगवेगळ्या समितींचा अहवाल येणार असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात येणे, या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, दुर्गम आदिवासी तालुक्यातील नागरिकांची वेगवेगळ्या कामांसाठी होणारी भटकंती व निर्माण होणारा त्रास, देवलापार येथे अप्पर तहसीलदार हे पद मंजूर करूनही नियमित तहसीलदार व इतर अधिकारी उपलब्ध नसणे, त्यामुळे आदिवासी नागरिकांमध्ये नैराश्याची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करण्याची आवश्यकता, त्यास होणारा विलंब, देवलापार तालुका निर्मितीबाबत नागरिकांकडून स्थानिक लोकप्रतिनिधीकडे वारंवार होणारी विचारणा, त्यामुळे देवलापार तालुका निर्मितीच्या प्रस्तावास मंजुरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४६. | "साखरखेर्डा (जि. बुलढाणा) या गावाच्या ठिकाणी मोठी बाजारपेठ असून मध्यवर्ती ठिकाण असणे, शेतमाल व दैंनदिन जीवनात लागणाऱ्या सर्व वस्तु खरेदी करण्यासाठी २६ खेडयांतील ग्रामस्थ याठिकाणी येत असणे, सदर गाव प्रमुख रस्त्यांना जोडण्यात आलेले असल्यामुळे याठिकाणी सर्वच सोयीसुविधा उपलब्ध असणे, सदर गाव तालुक्याचे ठिकाण म्हणून घोषित करण्याची मागणी तेथील नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे करूनसुध्दा त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, साखरखेर्डा हे गाव तालुक्याचे ठिकाण म्हणून घोषित करण्याची | डॉ.राजेंद्र शिंगणे, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४७. | "रिलायन्स गॅस कंपनीने रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील नागोठाणेपासून कर्जत, खोपोली, खालापूर या तालुक्यातून गुजरात राज्यातील दहेज पर्यंत गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी जमिनी उपलब्ध करून दिलेल्या प्रकल्पबाधीत शेकडो शेतकऱ्यांना जमीन व पिकाची नुकसान भरपाई अद्यापपर्यंत दिली नसल्याची बाब दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, सन १९६२ च्या कायद्याप्रमाणे शेतजमीनी पुर्ववत करून देण्याची आवश्यकता असतांनाही संबंधित कंपनीकडून अद्यापर्यंत शेतजमीन पुर्ववत करून देण्यात आलेली नसणे, तसेच रिलायन्स गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अतिरिक्त रक्कम देतांना रेडिरेकनर सोडून धनाकर्षाप्रमाणे रक्कम देणे, सदरहू रिलायन्स गॅस कंपनीने जमीन व पिकाची नुकसान भरपाई देतांना कांही शेतकऱ्यांना ८० हजार रुपये प्रती गुंठा तर कांही शेतकऱ्यांना ५ ते ८ लाख रुपये प्रती गुंठा भाव देण्यात येणे, सदर कंपनीने नुकसान भरपाई देतांना भेदभाव करून चुकीचा भाव दिल्यामुळे या विरोधात शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन करून निषेध व्यक्त करणे, सदर प्रकरणी बैठक घेऊन निर्णय घेण्याचे शासनाने आश्वासन देऊनही अद्याप यावर कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याने सदरहू प्रकल्पबाधित शेतकऱ्यांवर झालेला अन्याय, यामुळे प्रकल्पबाधित शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. महेंद्र थोरवे, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ४८. | "अकोले (जि.अहमदनगर) मतदार संघातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्राम सडक योजना मधील घेतलेल्या कामात ठेकेदाराकडून होत असलेली दिरंगाई, साईट पट्टी शिवाय काम, देखभाल दुरुस्ती यामध्ये होत असलेली टाळाटाळ, अपूर्ण कामाची पूर्ण देयके काढण्यात येणे, | डॉ. किरण लहामटे, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | खड्डे न बुजवता देयके घेण्यात येणे, मंजूर रस्ते पूर्ण न करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसलेला तीव्र असंतोष, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याप्रकरणी सबंधित अधिकारी व ठेकेदारांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना." | | |
| ४९. | "मुंबई मधील डोंगरी विभागात इमारत क्र. ६ -६ए , नवरोजी हिल रोड क्र. १, २४ डी नवरोजी हिल रोड क्रमांक ४ ही जुनी व जीर्ण इमारत असणे, या इमारतीची दुरुस्ती गत काही वर्षापासून झालेली नसणे, या इमारतीमध्ये राहणाऱ्या सदनिकाधारकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, सदनिकाधारकांकडून या इमारतीची दुरुस्ती करण्याची वारंवार होत असलेली मागणी, इमारत दुरुस्तीसाठी म्हाडाकडे निधी उपलब्ध नसणे, सदनिकाधारकांनी याबाबत चौकशी केली असता कंत्राटदाराने म्हाडाकडे दुरुस्ती केल्याचे दाखवून पैसे घेतल्याचे सदनिकाधारकांच्या निदर्शनास येणे, याबाबत कंत्राटदाराकडे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याच्याकडून कोणतेही सहकार्य न मिळणे, असाच प्रकार इमामवाडा रोड येथील यास्मिन मंझील या इमारतीच्या बाबतीत घडणे, कंत्राटदाराकडून म्हाडाची फसवणूक करण्यात येणे, परिणामी या इमारतीमधील सदनिकाधारकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. अमिन पटेल, बाळासाहेब थोरात, अस्लम शेख, झीशान सिद्दिकी, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. नानाभाऊ पटोले, श्रीमती सुलभा खोडके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. संग्राम थोपटे, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ५०. | "नवी मुंबईतील तळोजा, खांदेश्वर रेल्वे स्टेशन, मानसरोवर रेल्वे स्टेशन, खारघर रेल्वे स्टेशन, जुईनगर रेल्वे स्टेशन येथे सुरू असलेल्या बांधकामामुळे नवी मुंबईत धुळीचे साम्राज्य परसणे, सदर बांधकामाच्या ठिकाणी प्रदुषणाचे कोणतेही नियम पाळले जात नसणे, शापूरजी पालनजी कंपनी कडून नियमांचे उल्लंघन होणे, या बांधकामांच्या ठिकाणी प्रदुषणाचे कोणतेही नियम पाळले जात नसणे, नवी मुंबईत प्रदुषण करण्याचे काम | सर्वश्री. नानाभाऊ पटोले, बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | ज्या गृहसंकुलाचे सुरू असणे त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर वायु प्रदूषण होत असणे, बांधकामामुळे हवेमध्ये धुलीकणांचे प्रमाण प्रचंड वाढले असणे, परिणामी नागरिकांना विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना श्वसनाचे आजार मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येणे, आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | अमिन पटेल, बळवंत वानखडे, वि. स. स. | |
| ५१. | "नाशिक जिल्ह्यातील व्यावसायिक अशोक कटारिया नामक व्यक्तीने शासनाची तसेच आर्थिक अडचणीत असलेल्या गोरगरीब शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी खरेदी करणे, ते स्वतः व त्यांचे कुटुंबीय आणि त्यांचे नातेवाईक मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ नुसार शेतकरी असल्याबाबतचा कोणताही सक्षम पुरावा नसणे, तसेच कलम ६३ नुसार सक्षम अधिकारी यांची परवानगी न घेणे, श्री.अशोक कटारिया यांच्या तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या आणि नातेवाईकांच्या नावे नाशिक, इगतपुरी, त्र्यंबक, सिन्नर, निफाड तसेच नाशिक जिल्ह्यात सर्वच तालुक्यात अनेक ठिकाणी शेतजमिनी खरेदी केल्याचे आढळून येणे, महसूल कलमात पात्र नसतानाही शासनाची फसवणूक केलेली असणे, शेत जमीन खरेदी करण्यास गैरमार्गाचा वापर करणे, महसूल अधिनियमात स्पष्ट तरतुदीनुसार मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८चे कलम ८४ नुसार मिळकतीचे हस्तांतरण किंवा हे विधिग्राह्य आहे असे समजून सदर जमिनीची कलम ८४ क नुसार सरकार जमा करून सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्यात शासनाला आलेले अपयश, शेकडो एकर जमिनी खरेदी करण्यासाठी महसूल प्रशासनातील अनेक अधिकाऱ्यांशी असलेले श्री.कटारिया यांचे असलेले हितसंबंध, अशा या भूमाफियांविरोधात नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, सदर भूमाफियाला मदत करणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्याविरोधात कोणतीही | श्री. सुहास कांदे, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कठोर कारवाई शासन करीत नसल्याने शासनाविरोधात निर्माण झालेला तीव्र संताप व चीड, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ५२. | "राज्यातील महानगरपालिकांच्या हद्दीमध्ये वाढ झाल्यामुळे नव्याने अनेक गावे समाविष्ट झालेली असणे, या गावांमधील आधीच अस्तित्वात असलेली अनुदानित/विनाअनुदानित, स्वयं अर्थसहाय्यित शाळा/महाविद्यालये मनपा हद्दीत समाविष्ट होणे, या शाळा/महाविद्यालयांच्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या, ग्रामपंचायत किंवा तत्सम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काळापासूनच्या इमारतीत,प्रत्यक्षात ३५/४० वर्षांपासून शिक्षण खात्याच्या रीतसर परवानगीने शाळा सुरू असणे,आता मनपा क्षेत्रामध्ये समाविष्ट झाल्याने दर्जावाढ किंवा त्याच इमारतींमध्ये/प्रांगणात स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर मराठी / इंग्रजी माध्यमाचे अभ्यासक्रम नव्याने सुरू करणे अथवा प्राथमिक ते माध्यमिक दर्जावाढीसाठी, इयत्ता नववी ते बारावीच्या तुकड्या सुरू करण्यासाठी मान्यता घेणे इत्यादी कामांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार परवानगी घेण्याच्या कामी पूर्वीच्या पक्क्या इमारतींसाठी सुद्धा मनपा बांधकाम नियमानुसार नव्याने बांधकाम परवाना व पूर्णत्वाचा दाखला इत्यादी (Commencement/Completion Certificate) दाखले मागणी, परवानग्या दीर्घकाळ प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्य महागड्या खाजगी शाळांमधून शिक्षण घेण्याची आलेली वेळ, त्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणावर होत असलेले शैक्षणिक/आर्थिक नुकसान, परिणामी होत असलेली हालअपेष्टा, आधीपासून अस्तित्वात असलेल्या, रीतसर सुरू असलेल्या, मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या पूर्वीच्या ग्रामपंचायत हद्दीतील शाळांना दर्जावाढ, तुकडीवाढ, इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करणे इत्यादींसाठी परवानग्या देताना बांधकाम विषयक आणि अन्य जाचक अटी काढून सरसकट परवानग्या | श्री. चेतन तुपे, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | देण्यासाठी सर्वसमावेशक धोरण आखून सत्वर अमलात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ५३. | "औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोअर परेल यांची वापरात असलेली इमारत मोडकळीस आल्याने तसेच जागा अपुरी पडत असल्याकारणाने जागा नवीन जागा ११६ बी, आर.बी. चांदोरकर मार्ग, आगरी पाडा, मुंबई-११ येथे देण्याचे शासन निर्णयाद्वारे ठरणे, परंतु त्यास तत्कालीन शासनाने कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात न येणे, आणि सन २०२० मध्ये मंजूर झालेल्या डीपी २०३४ मध्ये हे आरक्षण बदलून इतर शिक्षण असे करण्यात येणे, तसेच सदरील मक्त्याने दिलेल्या भूभागाचे संपूर्ण विहित भुई भाडे शासनाकडून महानगरपालिकेला अद्याप प्राप्त झालेले नाही अशा रूपाचे कारण दाखवून ती जागा परत घेण्याचा निर्णय घेण्यात ठराव करण्यात येणे, तसेच सदरील भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून काढून घेऊन त्या जागेवर उर्दू लर्निंग सेंटर उर्दू भवन उभारण्याचा निर्णय परस्पर घेण्यात येणे, तसेच तीन महिन्याचे आतच म्हणजे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये साडेबारा कोटी रुपयांचे उर्दू लर्निंग सेंटर उभारण्यासंदर्भातील निविदा ही मागविण्यात येणे, तसेच सदर निविदा मागवून प्रक्रिया राबवून सदर जागेवर उर्दू लर्निंग सेंटर संदर्भात बांधकाम सुरू करण्यात येणे, तसेच सर्व बैठका बी.एम सी ने कोरोनाकाळात घेणे, आणि याबाबतीत कोणत्याही बैठकीचे पुरावे नसणे किंवा इतिवृत्त नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. मिहीर कोटेचा, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ५४. | "पुणे जिल्ह्यातील भोसरी विधानसभा मतदार संघातील लोकसंख्या सुमारे १० लाखांच्या पुढे असून विविध कामे, रस्ते तसेच विविध प्रकल्प केवळ भूसंपादनामुळे प्रलंबित असून याबाबत जिल्हाधिकारी प्रशासनाकडे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडेही पाठपुरावा करूनही संबंधित विकासकामांचे भूसंपादन अभावी | श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. महेश लांडगे, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | विकासकामांना दिरंगाई होत असणे, महानगरपालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयाचा अभाव असणे, नागरी प्रकल्प आणि पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करणे काळाची गरज असून भूसंपादन हा प्रमुख अडथळा ठरत असणे, आरक्षणांचा विकास करण्याशिवाय पर्याय नसणे, परिणामी निवासी क्षेत्र वाढत असणे, समाविष्ट गावांमधील अनेक रस्ते भूसंपादना अभावी प्रलंबित असल्याने त्यामुळे प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी महानगरपालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन, नगरविकास विभाग यांचा समन्वय दिसत नसणे, तसेच निधी अभावी भूसंपादन प्रक्रिया रखडलेली असणे, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ५५. | "म्हारळ, कल्याण, ठाणे येथिल स.न. ४० ते ५८ मधील एकूण ८३ एकर ०९ गुंठे जमिन १९५० रोजी मूळ शेतकऱ्यांना पूर्ण मोबदला देउन रितसर संपादन करण्यात येणे, त्यानंतर १९५५ ला शेतकरी यांनी एकत्र येउन म्हारळ सह सामुदायीक शेतीसंस्था स्थापन करून एक वर्षासाठी लिजवर कसण्यासाठी मागणे, जिल्हाधिकारी यानी संपादीत केलेली जमीन ६२ एकर ०९ गुंठे व शासन मालकीची २१ एकर अशी ८३ एकर ०९ गुंठे जमीन संस्थेला एक वर्षासाठी लिजवर शेतीसाठी देण्यात येणे, परंतु जिल्हाधिकारी यांचे आदेशनुसार जमिनीवर अतिक्रमण ठरवुन जमीन खाली करण्याचे आदेश देण्यात आले, संस्थेने त.रा.मंत्री महसुल याचेकडे खोटे अपिल दाखल केले व संस्थेने सदरच्या ६२ एकर ०९ गुंठे जमिनीचा मोबदला न देता शेतकऱ्यांच्या संपादन केल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होणे, असा खोटा अर्ज केला व त.मा.राज्यमंत्री (महसुल) यांनी संपादनचे रेकॉर्डची शहनिशा न करता व संस्थेचे खोटे म्हणणे ग्राहय धरुन दिनांक २३ फेब्रुवारी, १९९६ रोजीचा बनावट आदेशाने जमिनी कब्जेहक्कने संस्थेस | श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | परत केल्या व २१ एकर शासनाची जमीन शासनास परत करण्याचे आदेश काढणे, परंतु शासनाची २१ एकर जमीन देखील जिल्हाधिकारी यांनी फक्त कागदोपत्री जमा करणे, सदर २१ एकर जमिन बेकायदेशीरपणे विकासकाच्या ताब्यात असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ५६. | "भंडारा जिल्ह्यात दिनांक २८ मे, २०२३ रोजी कोतवाल भरती प्रक्रिया जिल्हाधिकारी यांनी आपल्या मर्जीतील अधिकारी नेमणूक करून आयोजीत केली असणे, सदर भरती प्रक्रियेची लेखी परिक्षा सुरू असतांना जिल्हाधिकारी कार्यालयातील लिपीकाच्या भ्रमणध्वनीत लेखी परिक्षेसबंधी स्क्रिन शॉट दिसून येणे, सदर स्क्रिन शॉट हा लेखी परिक्षेच्या कालावधीतील असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येणे, त्याप्रकरणी भंडारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात येणे, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी निवास स्थान रोजंदारी काम करणाऱ्या मुलांना १०० पैकी १०० गुण मिळ, त्यामुळे सदर घोळ हा जिल्हाधिकारी कार्यालयातून झाला असणे, सदर प्रकरणी शासनाची व परिक्षेच्या उमेदवारंची फसवणूक करण्यात आली असणे, कोतवाल भरती लेखी परिक्षेकरीता मोठ्या प्रमाणात पैशाचा गैरव्यवहार झाल्याचे उघड होणे, सदर परिक्षा रद्द करण्यात आलेली असणे, यामुळे परिक्षेकरीता तयारी करणाऱ्या सक्षम उमेदवारांची घोर निराशा होणे, सदर प्रकरणात ३ आरोपींवर गुन्हा नोंद होणे परिणामी या सर्व प्रकरणात सहभागी वरिष्ठ अधिकारी अजून पर्यंत मोकळे असणे, याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाही बाबत लोकांना शंका निर्माण होवून मोठ्या प्रमाणात जनआंदोलन होण्याची शक्यता निर्माण होणे, परिणामी या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची तसेच रद्द झालेली परिक्षा सत्वर घेण्याची युवकांची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. नरेंद्र भोंडेकर, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ५७. | "शितुर वारून (ता.शाहुवाडी, कोल्हापूर) पैकी तळीचा धनगरवाडा येथे दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शाळकरी मुलीचा बळी घेतल्याची घटना समोर आली असणे, सहा महिन्यात बिबट्याने दोन वेळा हल्ला केला असून हल्ले थांबत नाहीत, तसेच यापूर्वी व आता हल्ला केलेला बिबट्या वन खात्याला अद्याप सापडला नसणे, तसेच त्याला पकडण्यात अपयश येणे तरी अगदीच सिमेजवळ जे धनगर वाड्या आहेत आणि जर त्यांची तयारी पुनर्वसित व्हायची असेल तर वन जमिनी ज्या वनखात्याच्या जमिनीच्या वनापासून लांब आहेत व नागरी वस्तीच्या जवळ आहेत अशा वन जमिनीमध्ये त्यांचे पुनर्वसन करिता जमीन उपलब्ध करून त्या जमिनी वन खात्याकडे वर्ग करण्याची आवश्यकता, लोकांचा जीव वाचवणे, त्यांना मुळ सेवा-सुविधा देतानाच वन खात्यामुळे येणाऱ्या अडचणीतून मुक्त करणे, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ. विनय कोरे, श्री.मानसिंग नाईक, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ५८. | "सन १९९३ मध्ये झालेल्या भूकंपात लातूर धाराशीव जिल्ह्यात प्रचंड जीवित व वित्त हानी झाली असणे, सदरील भूकंपातील जमीनदोस्त ५२ गावांचे पुनर्वसन आणि बाधित ब व क वर्गवारीच्या गावाच्या घरांच्या दुरुस्तीसाठी अनुदान दिले असणे, भूकंप बधितांच्या घरांच्या हस्तांतरणाचे निर्बंध उठवणे, किल्लारी येथील ८ व ९ व्या फेरीचे घर वाटप करणे, कारला कुमठा या गावांचे पुनर्वसन करणे, दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ चा भूकंपग्रस्तासाठीचा अन्यायकारक आदेश रद्द करणे, पुनर्वसित गावातील अंतर्गत अंतर्गत रस्ते व नाली बांधकाम आदि मूलभूत सुविधासाठी आवश्यक निधीची तरतूद करणे, मौजे सारणी सह ब व क वर्गवारीच्या गावातील २०११ पूर्वीची शासकीय व खाजगी जमिनीतील घरे नियमित करणे, कोयना भूकंप पुनर्वसन समीतीत भूकंपग्रस्त औसा, उमरगा, लोहारा, निलंगा या | सर्वश्री. ज्ञानराज चौगुले, अभिमन्यु पवार, वि. स. स. | दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | चार तालुक्याचा समावेश करणे, सन १९९३ मधील व तदनंतरच्या भूकंपग्रस्त नागरिकांसाठी असलेल्या शासकीय नौकरीच्या आरक्षणात दिनांक १८ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार १९६७ साली झालेल्या भूकंपाचा समावेश केल्याने भूकंपग्रस्त किल्लारी व परिसरातील नागरिकावर अन्यायाची भावना निर्माण होणे, सदरील अन्यायकारक निर्णय रद्द करणे आदि वरील सर्व विषयांबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत मा.उपसभापती, विधानपरिषद यांनी शासनास निर्देश देणे, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ५९. | "राज्यातील अनाथ बालकांच्या कल्याणार्थ शासनाकडे प्रलंबित मागण्यांसंदर्भात राज्य शासनाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०२०, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२०, दिनांक १७ मार्च, २०२१, दिनांक १२ मे, २०२२ या दिनांकांना बैठकी होऊनही अद्यापपर्यंत अनाथांच्या मागण्या पूर्ण न होणे, सदर लोकपतिनिधींनी वारंवार पत्रव्यवहार करूनही शासनाकडून अनाथांच्या मागण्यांकडे होत असलेले दुर्लक्ष, राज्यातील अनाथ मुला-मुलींवर वयाची १८ वर्ष पूर्ण केल्यानंतर उपजिविकेचा, निवासाचा, सुरक्षेचा प्रश्न उभा राहत असून शासनाने या समस्येकडे अत्यंत गंभीरपणे आणि संवेदनशीलतेने लक्ष देण्याची गरज, राज्य शासनाच्या अनास्थेमुळे १८ वर्षावरील अनाथ मुला-मुलींमध्ये पसरलेली संतापाची आणि अस्वस्थतेची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. बच्चू कडू, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ६०. | "चंद्रपूर जिल्ह्यात चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अस्तित्वात असणे, सदर बँकेचे काही संचालक बँकेच्या पैशाचा अपव्यय करीत असणे, काही संचालकावर गुन्हे दाखल असणे, बँकेच्या संचालक मंडळाची मुदत समाप्त होऊन देखील शासनाने निवडणुका घेतल्या नसणे, बँकेच्या सी.ओ.वर देखील | श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | गंभीर गुन्हे दाखल असणे, बँकेतील संचालक अनेकवेळा चुकीचे निर्णय घेत असल्याचे निदर्शनास येत असणे, नोकर भरतीच्या नावावर काही संचालकांनी बेरोजगारांची दिशाभूल केलेली असणे, शेतकरी सन्मान निधीचा वापर काही संचालक आपल्या खाजगी संस्थेसाठी करीत असणे, अद्यापही शासनाने या बँकेवर प्रशासकाची नेमणुक केली नसणे, अनेक चुकीच्या कारणाने बँक चर्चेत असणे, या बँकेवर प्रशासकाची नेमणूक करण्याची शेतकऱ्यांकडून मागणी होत असणे याकरिता शासनाने त्वरीत चौकशी करून करावयाची कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ६१. | "पुणे, खडकवासला विधानसभा मतदारसंघात वाहतुकीची समस्या गंभीर असणे, स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्ग जलद गतीने सुरू करणे व त्यासाठी बालाजीनगर येथे स्थानक निर्माण करणे, खडकवासला ते खराडी या पुणे मेट्रो मार्गिकेचा डीपीआर तयार होत असताना या मार्गाचे शेवटचे स्थानक खडकवासला धरण पर्यंत वाढवणे, पौड फाटा ते माणिकबाग या मेट्रोच्या नव्या मार्गांच्या सर्वंकष प्रकल्प डीपीआर, भूसंपादनासाठी मंजुरी मिळाली असणे, हा प्रस्तावात कोथरूड, कर्वेनगर, वारजे आणि सिंहगड रस्ता भाग मेट्रोने जोडला जाणार असल्याने या मार्गातील वारजे ते पुढे प्रवाश्यांची संख्या व भागाची लोकसंख्या पाहता हा मार्ग शिवणे, उत्तमनगर, कोंढवे-धावडे, कोपरे पर्यन्त वाढवून तेथे नवीन स्थानक करण्याची आवश्यकता असणे, पालिकेत समाविष्ट झालेल्या गावातील मुख्य रस्त्यांची दुर्दशा झाली असणे, डीपी रस्ते ताब्यात घेण्यात आले नसणे, अनेक डीपी रस्ते अतिक्रमनांनी बाधित झाले असणे, शहरातील पर्यायी रस्त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष होत असणे, ताब्यात आलेल्या, ताब्यात येऊन सुद्धा विकसित झाले नसलेल्या रस्त्यांची माहिती वेळेत मिळत नसणे, डीपी चे रस्ते पूर्ण क्षमतेने विकसित करण्यास पथ विभागास अपयश आले असणे, | श्री. भिमराव तापकीर, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सह पुणे-सातारा रस्त्यावरील फसलेला बिआरटी प्रकल्प, सनसिटी रोड ते ३० मी. रुंद मुठा नदीवरचा पूल मधील त्रुटी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्यावरील शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ६२. | "राजपूत, राजपूत भामटा परदेशी राजपूत समुदाय मुळतः पर राज्यातून पिढ्यान पिढ्या भटकंतीने राज्यात स्थायिक झालेला असणे, सन १९४२ च्या रेजुलेशन प्रमाणे ओल्ड बॉम्बे स्टेट, तत्कालीन ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांना "इंटरमिजिएट" जात म्हणून मागासवर्गीय म्हणून समाविष्ट केलेले असणे, १८५७ च्या बंडा नंतर ब्रिटिशांनी या जातीला गुन्हेगारी जात म्हणून ओळख दिल्याने आणि इंग्रजांचा ससेमिरा पाठीशी लागल्याने या समुदायाची स्थिरता झालेली नसणे, त्यामुळे निरक्षरता, बेरोजगारीचे प्रमाण अधिक असणे, ब्रिटिशांच्या जाचांना सामोरे जावे लागत असल्याने सातत्याच्या भटकंतीने असुरक्षितता व गरिबीमध्ये प्रचंड वाढ होणे, तत्कालीन विपरीत परिस्थितीमुळे त्यांच्यात असलेली असुरक्षिततेची भावना बेफिकीर प्रवृत्ती गुन्हेगारीची पार्श्वभूमीमुळे झालेली मानसिक अवहेलना याचा सर्वांगीण विकासावर झालेला विपरीत परिणाम, जनजागृतीमुळे शिक्षणाचे प्रमाण वाढणे, परंतु सुशिक्षित बेरोजगारांमध्ये मोठ्या प्रमाणात या समुदायाची संख्या असणे, तसेच महिला वर्गामध्ये शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण, त्यामुळे अकुशलतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे बेरोजगारी वाढलेली असणे, पर्यायाने आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांमध्ये त्यांचे प्रमाण अधिक असणे, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे बाबत तत्वतः मान्य करण्यात आलेले आहे मात्र अद्याप त्याच्यावर कार्यवाही झालेली नसणे, यामुळे या समुदायात निर्माण होणारा तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." | श्रीमती श्वेता महाले, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ६३. | "राज्यात जिल्हानीहाय अन्नधान्य वाहतूक कंत्राट निश्चितीसाठी, पुरवठा विभागाद्वारे मागील कंत्राटदाराना साखळी करून चढ्यादराने कंत्राट प्रदान करण्यासाठी प्रचलित शासननिर्णय दिनांक २० एप्रिल, २०१७ रद्द करून शासननिर्णय दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी निर्गमित करणे, साखळीकरून निविदा सादर करण्यासाठी निविदाकारांच्या पात्रतेसाठी वाहनक्षमतेसंदर्भात ५.९ आणि ५.१७ अशी वेगवेगळी तरतूद करण्यात आली असणे, त्यानुसार शासनस्तरावर निविदाप्रक्रिया राबवून मागील कंत्राटदारानाच चढयादराने शासनस्तरावरून कंत्राटे प्रदान करण्यात येणे, निविदा प्राप्त झाल्यानंतर विशिष्ट निविदाकारांसाठी निविदेच्या अटीशर्ती मध्ये बदल/शिथिल करण्यात येणे, उदाहरणार्थ यवतमाळ जिल्ह्यातील मागील कंत्राटदार सिल्वर रोडलाइन्सने एकूण १० जिल्ह्यात निविदा सादर केल्या असणे, सदर निविदाप्रक्रियेअंती त्यांनी चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती जिल्ह्यासाठी सादर केलेल्या निविदा मंजूर करून कंत्राट प्रदान करण्यास शासनस्तरावरून मान्यता देण्यात येणे, सिल्वर रोडलाइन्स यांनी पात्रतेसाठी आवश्यक वाहन क्षमते बाबतची अट क्र ५.१७ नुसार ७ दिवसात जिल्हानिहाय आवश्यक वाहनक्षमतेची पूर्तता केली किंवा नाही याबाबत खुलासा करण्याची आवश्यकता असणे, अधिकाऱ्यांच्या संगनमताने कंत्राटे मिळविणाऱ्या सिल्वर रोडलाइन्स आणि यासारख्या इतर निविदाकारांना प्रदान केलेले सर्व कंत्राटे रद्द करून त्यांना कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकणे, सर्व दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करणे, संपूर्ण प्रक्रियेत शासनाचे कोट्यवधी रुपयांच्या झालेल्या नुकसानची वसुली आणि प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | ॲड. आकाश फुंडकर, श्री. प्रताप अडसड, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ६४. | "शेगाव — पंढरपूर हा राष्टीय महामार्ग ४५० कि.मी. लांबीचा असून बुलढाणा जिल्ह्यातील लोणारपासून मंठा परतूर माजलगाव बीड सरहद्दी पर्यंत काम मेगा इंजीनिअर्स कंपनीने घेतलेले असणे, पुर्णा, कसुरा, गोदावरी, माजलगाव जवळील केसापूरी कॅम्प असे पाच पुलाचे काम केले नसणे, माजलगाव केसापुरी कॅम्प १ कि.मी., गोदावरी नदीवळ २ कि.मी., आष्टी येथे ५०० मीटर, परतूर शहरात ५०० मीटर सिमेंट रस्त्याचे काम आजही कंपनीने पूर्ण केलेले नसणे, याबाबत अनेकदा जिल्हाधिकारी, जालना यांच्या कार्यालयात बैठका होणे, रस्ते विकास महामंडळाने दंडाची आकारणी करणे, अनामत रक्कम जप्त करणे, काळ्या यादीची नोटीस देणे, अशी कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, याबाबत तात्काळ चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. बबनराव लोणीकर, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ६५. | "कोकणात विशेषत: सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा व काजू बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, फळपीक विमा योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा व काजू उत्पादक ३७ हजार ८०१ शेतकऱ्यांनी विमा भरलेला असणे, त्यापैकी ३४ हजार ९३९ शेतकऱ्यांना विमा योजनेचा लाभ मिळणार असल्याची अंतरिम यादी तयार झालेली असणे, परंतू राज्य व केंद्र शासनाने पीकविमा योजनेचा हप्ता भरलेला नसल्यामुळे आंबा व काजू उत्पादक शेतकरी अद्यापही विम्याच्या रक्कमेपासून वंचित असणे, पीकविमा योजनेचा कालावधी दिनांक १ डिसेंबर ते १५ मे असा असून विम्याचा कालावधी संपल्यानंतर ४५ दिवसानंतर म्हणजेच १ जुलैच्या दरम्यान पीकविमा नुकसान भरपाईची रक्कम देणे क्रमप्राप्त असणे, तथापी शासनाने पीकविमा योजनेचा हिस्सा न भरल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा व काजू उत्पादक शेतकरी १२० कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईपासून वंचित असणे, उक्त | सर्वश्री. वैभव नाईक, राजन साळवी, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करून गणेशोत्सवापूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम देण्यात यावी अशी केलेली मागणी, तसेच दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी ओरोस येथे जिल्हा कृषी अधिकक्ष कार्यालयासमोर धरणे आंदोलन छेडण्याचा दिलेला इशारा, तथापी अद्याप शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम प्राप्त झालेली नसणे, परिणामी कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकरी यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ६६. | "राज्य शासनाच्या ऊर्जा, सार्वजनिक-आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, ग्रामविकास, सामाजिक न्याय, उद्योग, कामगार, परिवहन, नगरविकास, महसूल, उच्च व तंत्रशिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत यासह सर्व अधिनस्त विभागामध्ये राज्यशासनाच्या पॅनेलवर असलेल्या व खुल्या निविदेत सहभागी झालेल्या ठेकेदार सदस्यांमार्फत हजारो कंत्राटी कर्मचारी कार्यरत असणे, परंतु यासर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामगार कायद्याप्रमाणे किमान-वेतन अधिनियम १९४८, मुंबई कामगार कायद्याप्रमाणे किमान वेतन अधिनियम, १९९३, राज्य कामगार विमा अधिनियम १९४८, बोनस प्रदान अधिनियम १९६५, तोषदान प्रदान अधिनियम, १९७२, कंत्राटी कामगार (नियमन-व-निर्मूलन) अधिनियम १९७०, कामगार-भविष्य-निर्वाह-निधी अधिनियम, १९५२, महाराष्ट्र-कामगार-किमान-घरभाडे-अधिनियम, १९८३, यासह रजावेतन, सेवातर पर्यवेक्षकीय शुल्क, कामगारांच्या हिश्श्यापोटी मुळ पगार, विशेषभत्ता यामधून १.७५ टक्के, इ.एस.आय. नं १२टक्के, भविष्यनिर्वाह निधी व उपरोक्त टक्केवारीनुसार मालकाचा हिस्सा ई.एम.आय. ४.७५ टक्के, भविष्यनिर्वाहनिधी १३.६१ टक्के संबंधित कार्यालयांकडे | श्री. प्रकाश आबिटकर, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | भरणे बंधनकारक असताना असे न करणे, तसेच कामगारांचे नावे ई.पी.एफ. व ई.एस.आय. महामंडळाकडे स्वतंत्र कोड नंबर्स घेऊन त्या खात्यावर दरमहा वर्गणी (कामगार व मालक हिस्सा) जमा करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असणे, परंतु संबंधित ठेकेदार यांचेकडून याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसून कंत्राटी कामगारांची आर्थिक पिळवणूक करण्याचे काम करणे, यामुळे सर्वसामान्य कामगारांमध्ये शासनाविरोधी पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामगार कायद्याप्रमाणे सेवा-सुविधा देण्याबाबत प्राधान्याने करावयाची कार्यवाही व शासनाची याबाबतची प्रतिक्रिया." | | |
| ६७. | "मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबई येथील विकास टप्पा दोन मार्केट एक या मार्केटमधील एफएसआय वाटप करतांना मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी व संचालक मंडळ दोषी असल्याबाबतचा मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तत्कालिन प्रशासक व विद्यमान राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्ह दाखल करण्याचे आदेश देण्यात येणे, या आदेशाच्या विरोधात संबधित दोषींनी याचिका दाखल करून (१४०४६/२०१६) सदर आदेशाला स्थगिती मिळवली असून सदर आदेश देतांना शासनाचे म्हणणे मांडण्याचे आदेश देण्यात येणे,असे असतांना सात वर्ष उलटले तरी शासनाने आपले म्हणणे अद्यापही न मांडणे, यामुळे विद्यमान संचालक मंडळात सदस्य म्हणून हे दोषी कार्यरत असून बाजार समितीची लूट करीत असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. महेश शिंदे, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ६८. | "नवी मुंबई प्रकल्पाकरिता सिडको प्रशासनाने ९५ गावातील शेतक-यांच्या हजारो एकर जमिनी सन १९८० साली संपादित केल्या असणे, सिडकोने विकसित केलेल्या क्षेत्रात संपादित जमिनीच्या १२.५ टक्के जमिन देण्याचा शासनाचा निर्णय झाला असणे, सदर निर्णय होऊन जवळपास २५ ते ३० वर्षांचा कालावधी होऊनसुध्दा करंजाडे, द्रोणागिरी नोड येथील सिडकोने अद्यापपर्यंत जवळपास ४६१ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना १२.५० टक्के योजनांअंतर्गत भूखंडाचे वाटप केले नसणे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्यासाठी भूखंड शिल्लक नसल्याचे कारण सिडको प्रशासन देत असणे, दुसरीकडे चाणजे, मातिवली, बेलोंडाखार येथील अविकसित क्षेत्र खरेदी केलेल्या नवी मुंबई येथील बिल्डरांना व व्यावसायिक यांना आर्थिक लाभासाठी उलवे येथे तातडीने शासनाच्या नवीन परिपत्रकाप्रमाणे २२.५० टक्के भूखंडाचे वाटप करत असणे, उक्त प्रकल्पासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनी देऊन आपले रोजगाराचे साधन कायमस्वरूपी गमावले असणे, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सिडको प्रशासनाने कोणतेही आरक्षण न ठेवल्यामुळे स्थानिक प्रकल्पग्रस्तांवर उपासमारीची वेळ आली असणे, त्यामुळे उक्त विभागातील शेतकरी व नागरिकांमध्ये सिडको प्रशासनाच्या विरोधात प्रचंड चिड निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने सिडको प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने योजनेचा लाभ देण्याबाबत तसेच प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगारांना सिडकोमध्ये नोकर भरतीमध्ये १०० टक्के आरक्षण देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| ६९. | "दहिसर येथील भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या अखत्यारीमधील असलेली निवासी घरे व इमारतीचे केंद्र शासनाच्या कठोर नियमांमुळे पुर्नवसन करणे शक्य होत नसल्याची बाब निदर्शनास येणे, रडार यंत्रणामुळे काही | श्रीमती मनिषा चौधरी, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | विशिष्ट मर्यादेच्या परिसरात विशिष्ट उंचीवरुन कोणतेही बांधकाम करण्यात येऊ नये असे निर्बंध घातलेले असणे, दहिसर, बोरिवली, मिरा रोड या भागातील भारतीय विमान पतन प्राधिकरणाच्या परिसरात असलेल्या इमारतीचा पुनर्विकास खोळंबला असल्याने रहिवाशांमध्ये निर्माण झालेली प्रचंड नाराजी, तसेच या परिसरातील पुनर्विकास व एसआरएचे अनेक प्रकल्प राबवितांना विकासकांना परवानगी न मिळणे, रेरा प्राधिकरणाच्या नियमानुसार वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याची असलेली अट, यामुळे विकासक दुहेरी संकटात सापडलेले असणे, झोपडपट्टी क्षेत्र व इमारती पाडून टाकल्याने बेघर झालेल्या रहिवाशांना भाडे देणे शक्य न झाल्याने रहिवाशांमध्ये निर्माण झालेली तीव्र नाराजी, तसेच तेथील नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने मा. मुख्यमंत्री महोदयांनी केंद्र शासनाकडे निवेदन देऊन सन २०१७ साली केंद्र सरकारने एमएमआरडीएला दिलेली जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेला उद्यानासाठी देण्याची विनंती केलेली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिका सदर जागेकरिता आवश्यक मोबदला भरण्यास तयार असूनही अद्याप केंद्र शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, त्याकरीता शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून संबंधित निर्बंध शिथिल करणे व सदर जागा उद्यानाकरीता उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ७०. | "सन १९९६-९७ या कालावधीत वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर, सेलू तसेच सिंदी (रेल्वे), कळमना, मारडा, दिग्रज, भोसा, उमराव व इतर गावातील सुमारे ११८५ शेतकऱ्यांच्या तसेच नागपूर जिल्ह्यातील सुमारे १८२६ शेतकऱ्यांच्या याप्रमाणे एकूण ३०११ शेतकऱ्यांच्या शेतजमिनी या "निम्म वना प्रकल्पांतर्गत" अधिग्रहीत झालेल्या असणे, शेतजमीन अधिग्रहीत करताना | श्री. समीर कुणावार, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | मोहगाव येथील काही शेतकऱ्यांना प्रति एकर ६० ते ६५ लाख रुपये व इतर गावातील शेतकऱ्यांना प्रती एकर फक्त ३० ते ३५ हजार रुपये अशा तफावतीने वितरीत करण्यात येणे, उर्वरित २० टक्के रक्कम व भू-भाडे पट्टी व्याजासह नंतर देण्याचे आश्वासन तत्कालिन नागपूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), अजनी, नागपूर या विभागातील अधिकाऱ्यांनी दिले असणे, परंतु २७ वर्षे उलटूनही अद्यापि सदर गावातील शेतकऱ्यांना भू-भाडे पट्टी व्याजासह मिळाली नसणे, सन २०१८ मध्ये शेतकऱ्यांनी भू-भाडे पट्टीची रक्कम मिळण्याबाबत संबंधित विभागाकडे अर्ज करून देखील अद्यापपर्यंत भू-भाडे पट्टीची रक्कम देण्यात आलेली नसणे, परिणामी सर्व शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र संताप, आजच्या बाजारमूल्यानुसार भू-भाडे पट्टी व्याजासह मिळण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी, शेतकरी/ शेतकरी संघटनांनी वारंवार संबंधित विभागाकडे निवेदने देवूनही शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे निम्म वना प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या अधिग्रहीत झालेल्या जमिनीचे उर्वरित २० टक्के रक्कम व भूभाडेपट्टी प्रचलित बाजारमुल्यानुसार देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ७१. | "जळगांव येथील बि.एच.आर. या पतसंस्थेमध्ये नोव्हेंबर, २०२० मध्ये पुणे येथे नोंद झालेल्या तिन्ही गुन्ह्यात फिर्यादी हजर नसतांना विस्मयकारकरित्या गु.र.क्र. ७५४/२०२० गुन्हयाची नोंद रात्रौ २३.५६ वा. पोलीस ठाणे शिक्रापूर, पुणे ग्रामीण पोलीस, गु.र.क्र. ७७३/२०२० गुन्ह्याची नोंद सकाळी २.३३ वा. पोलीस ठाणे डेक्कन पुणे शहर पोलीस आयुक्तालय, गु.र.क्र. ३०६ / २०२० गुन्ह्याची नोंद सकाळी ००.१० वा. पोलीस ठाणे आळंदी पिपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात, सदरील गुन्हे एकाच दिवशी म्हणजे दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० रोजी नोंदविण्यात आलेले असणे, तसेच पुणे शहर पोलीस | सर्वश्री मंगेश चव्हाण, विजय वडेट्टीवार, अशोक चव्हाण, अस्लम शेख, धिरज देशमुख, विकास ठाकरे, सुनिल केदार, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | आयुक्तालयाअंतर्गत डेक्कन पोलीस ठाण्यातील गु.र.क्र. ६७३/२०२० हा गुन्ह्यासाठीच्या कार्यालयीन टिप्पणीत खाडाखोड करून पाने देखिल बदलविण्यात आलेली असणे, विशेष आश्चर्याची बाब म्हणजे सदरील गुन्हे हे जरी दिनांक २५ व २६ नोव्हेंबर, २०२० रोजी नोंदविण्यात आलेले असतांना, सदरील गुन्ह्याकामी तपासाकरीता जाणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता पूर्वीच म्हणजे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी फर्दापूर येथील अजंता गेस्ट हाउस बुक करण्यात आलेले असणे, या उपरोक्त गंभीर प्रकरणात तक्रार दिल्यानंतर राज्य गुन्हे अन्वेषण विभाग म.रा.पुणे यांना उपरोक्त गुन्ह्यासंदर्भात पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या गैरप्रकाराबाबतीत चौकशी करण्याचे आदेश दिलेले असतांना, त्यासंबंधात चौकशी करून अहवाल सादर करण्यात आलेला आहे किंवा कसे ? याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ७२. | "जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी शा.नि.क्र. ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.संकुल २००६/५ क्र.१९९/पं.स. ७, दिनांक १ सप्टेंबर २००८ नुसार बी.ओ.टी. तत्वावर विविध ठिकाणी बांधकामे प्रस्तावित केली असणे, या शासन निर्णयानुसार भूखंड खाजगी विकासकाला ३० वर्षांसाठी रु.१००/- चौ.मी. प्रति वर्ष या दराने भाडेपट्ट्यावर देता येईल अशी तरतूद असणे, सदर शासन निर्णय सन २००८ साली निर्गमित झाला असून, सन २००८ चे रेडी रेकनरचे दर व आजचे दर यात मोठ्या प्रमाणात फरक पडला असणे, या १५ वर्षाच्या कालावधीत बाजारमूल्याचे भाव २०० ते ३०० पटीने वाढले असतानाही सन २००८ च्या बाजारमूल्याप्रमाणे जाहिरात व निविदा काढण्यात आली असणे, या बी.ओ.टी तत्त्वानुसार जागा भाडेपट्याने देऊनसुद्धा जिल्हा परिषद, बुलढाणा यांना आर्थिक फायदा न होणे, त्यामुळे सदरहू जाहिरात केवळ विकासकाच्या आर्थिक फायद्यासाठी दिल्याची शंका | सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राजेश एकडे, अमित झनक, बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बळवंत वानखडे, वि.स.स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | निर्माण होणे, विकासकाकडून प्रमाणात प्रिमियर न घेणे, परिणामी तर जिल्हा परिषद सेस फंडाचे नुकसान होणे, या बी.ओ.टी तत्वावरील बांधकामामध्ये फक्त विकासकाचाच फायदा बघणे, या प्रकरणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार करणे, याबाबत शासनाने चौकशी करून जि.प. (बी.ओ.टी) बांधकामाला स्थगिती देऊन नवीन बाजारमूल्याप्रमाणे जि.प. बुलढाणा यांना सुधारित निविदा तयार करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ७३. | "जळगाव शहरातील एमआयडीसी लगत असलेल्या जागेमध्ये कोणतेही नवीन उद्योग आलेले नसून या ठिकाणी स्टार्ट अप इंडियाच्या माध्यमातून जळगाव शहरात नवीन उद्योगाचे प्रकल्प आणण्यात न येणे, जळगाव एमआयडीसी मधील उद्योजकांकडून २ प्रकारचे कर एमआयडीसी तसेच महापालिका यांच्याकडून घेण्यात येत असणे, एमआयडीसी ही स्पेशल अथॉरिटी असून संबंधित कर हा एमआयडीसी यांनीच वसूल करून उद्योजकांना सुख सुविधा पुरविण्यात न येणे, जळगाव शहर एमआयडीसी मध्ये स्वतंत्र अग्निशमन केंद्र अस्तिवात नसणे, जळगाव शहरातील एमआयडीसी मध्ये गटार, पिण्याचे पाणी पाइपलाईन, रस्ते, इत्यादी मूलभूत सुखसुविधा नसणे, जळगाव शहरातील एमआयडीसी मध्ये कामगारांना वेळेवर काम न मिळणे, त्यामुळे शहरात बेरोजगार नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात निर्माण होणे, जळगाव शहरातील नागरिकांना रोजगार नसल्याने मोठ्या प्रमाणात युवा कामगारांनी चोरी, गुंडा गर्दी करणे, या सारखे गुन्हे मोठ्या प्रमाणात करणे, जळगाव शहरातील एम आय डी सी मध्ये नव्याने उद्योग न येणे, त्यामुळे जळगाव शहरातील इंजिनियर, एमबीए झालेले मॅनेजर, अकाउंटंट, आयटीआय धारक यांनी रोजगार मिळण्यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक या सारख्या शहरात जाणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. सुरेश भोळे, वि. स. स. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ७४. | "नांदेड दक्षिण मतदारसंघातील हडको परिसरातील शाहुनगर भागातील संभाजी बिग्रेडचे माजी जिल्हा संघटक साईनाथ व्यंकटी टरके (वय - ३२) या सुशिक्षित तरुणान यांनी शुक्रवारी रात्री आपल्या निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली असणे त्या मयत तरुणांनी या मागील १० दिवसांपासून मला मराठा आरक्षणासाठी क्रांती करावयाची आहे, मराठा आंदोलन क्रांतीसाठी मी माझे जीवन संपवत आहे समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे, एक मराठा, लाख मराठ अशी चिठ्ठी लिहून ठेवली असल्याचे आढळून आले असणे, याप्रकरणी व्यंकटी टकरे यांनी फिर्याद दाखल केली असणे,तसेच सदर तरुण हा वाणिज्य शाखेचा पदवीधर विद्यार्थी ,तसेच मयत साईनाथ व्यंकटी टरके वय ३२ वर्ष यांच्या पश्चात आई वडील, पत्नी, मुलगी, तिन बहीणी असणे, तसेच मराठा आरक्षणासाठी नांदेड जिल्ह्यातील हा सहावा बळी गेला असणे त्यामुळे सदर मयत तरुणांचे संपूर्ण कुटुंबीय यांचे वर दुःखाचा डोंगर कोसळला असणे, मराठा समाजाला आरक्षण मिळावे या करीता जीवाचे बलिदान दिले असणे, त्यामुळे शासनाने तातडीने मराठा समाजाला आरक्षण देणे बाबत निर्णय करण्याची आवश्यकता असणे, तसेच आत्महत्या केलेल्या साईनाथ यांच्या कुटुंबीयांना शासनाने तातडीने आर्थिक मदत व त्याच्या लहान बालकांचा उज्वल भविष्यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी जनमानसातुंन करण्यात येत असणे, मराठा समाजात शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची भावना पसरलेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. | कित्ता |
| ७५. | "अमरावती जिल्ह्यामध्ये विविध शासकीय यंत्रणेच्या कार्यालयात विविध संवर्गाची पदे रिक्त असणे, ज्यामुळे लोकप्रतिनिधी यांना लोकाभिमुख विकास कामे करून घेण्यासाठी विलंब होत असणे, ज्यामुळे नागरिकांना मूलभूत सुविधा मिळत नसणे, परिणामी लोकांची कामे | श्री.रवि राणा, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | वेळेवर होत नसणे, त्यांना न्याय मिळत नसणे, अशा परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण होणे, याची दखल शासनाने घेणे अत्यावश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ७६. | "शासनाने वेळोवेळी आश्वस्थ केल्यावर सुद्धा अकोला (शिवणी) येथील विमानतळ विस्तारीकरणाचे काम गेल्या अनेक वर्षापासून केवळ जमीन भूसंपादन अभावी रखडलेले असणे, विमानतळ विस्तारीकरणाचे काम त्वरित करण्याकरिता जनतेने व लोक प्रतिनिधींची केलेली मागणी, हवाई वाहतुकी अभावी पश्चिम विदर्भातील औद्योगिक व आर्थिक विकास खुंटणे, पश्चिम विदर्भाचा विकास साधण्यासाठी अकोला विमानतळाची स्थापना सन १९४३ साली होणे, राज्यातील तत्कालीन २० विमानतळापैकी एक अकोला विमानतळ असणे, विमानतळाची धावपट्टी विस्तारित करण्यासाठी आवश्यक ६०.६८ हे. जमीन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला यांचे कडून हस्तांतरित झालेली असणे, तथापि आवश्यक २०.२४ हेक्टर खाजगी जमीन अद्याप संपादित न झाल्याने विमानतळ विस्तारीकरणाचे काम रखडणे, याबाबत सन २०२२ च्या विधानसभा दुसरे अधिवेशन (पावसाळी) तसेच २०२२ तिसरे विधानसभा अधिवेशन (हिवाळी) मध्ये चर्चा घडून येणे, खाजगी जमीन संपादनासाठी मागणी केलेला निधी उपलब्ध करून देण्यात येईल अशी शासनाच्या वतीने सभागृहात घोषणा करणे, तसेच विमानतळ विस्तारीकरणाचे काम करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासोबतच काम तातडीने सुरू करण्यासाठी जानेवारी-२०२३ च्या दुसऱ्या सप्ताहात बैठक घेण्यासंबंधी आश्वस्त करणे, तसेच सदर विमानतळ विस्तारीकरणाचे काम तातडीने सुरू होत नसल्याने पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांचा विकास खुंटीत होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री.रणधीर सावरकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| ७७. | "पालघर या आदिवासी बहुल जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर पालघर जिल्हा प्रशासकीय मुख्यालय दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी पासून मौजे कोळेगाव, ता.जि.पालघर येथे स्थलांतरीत करण्यात आल्याने जिल्हास्तरीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना सामान्यप्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक ६ ऑगस्ट, २००२ व दिनांक १२ फेब्रुवारी, २००३ अन्वये अनुज्ञेय केलेली एकस्तर वेतनश्रेणी योजना बंद होणे, नक्षलग्रस्त भागातील विशेषकृती कार्यक्रमांतर्गत विविध एकत्रित आदेश निर्गमित केल्यानुसार आदिवासी विकास विभाग दिनांक ५ फेब्रुवारी, १९९९ रोजीच्या शासन निर्णयामधील प्रचलित सवलतीतील स्तंभ -१ (क) प्रोत्साहन भत्याच्या अटी मध्ये ज्या ६ अटी नमूद करण्यात आल्या आहेत, त्यापैकी अट क्र.२ आणि ६ वगळण्यात येणे, उर्वरित क्र.९ तसेच क्र.३ ते ५ या अटीमध्ये कोणताही बदल नसणे, असे असतांनाही अनुज्ञेय असलेले एकस्तर वेतन व प्रोत्साहन भत्ता जिल्हा कोषागार अधिकारी पालघर यांचेकडील दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या परिपत्रक अन्वये बंद करण्यात येणे, पालघर जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणाहून संपूर्ण जिल्ह्याच्या क्षेत्रीय कारभार हाताळला जात असल्याने जिल्हास्तरीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना देखील क्षेत्रीयस्तरावर यावे-जावे लागत असणे, सदर जिल्हास्तरीय कार्यालयाच्या ठिकाणी शासनाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांमध्ये एकस्तर वेतनश्रेणी लागू होत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याने अधिकारी/कर्मचाऱ्यांमध्ये उदासिनतेच्या भावनेतून इतरत्र बदली करण्याची परिस्थिती निर्माण होणे, परिणामी जिल्हास्तरीय कार्यालय प्रमुखांना प्रशासकीय कामकाज करण्यास अडचणी निर्माण होत असल्याने पालघर जिल्हा मुख्यालयात सेवारत असलेल्या राज्य शासनाच्या सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणेच एकस्तर वेतनश्रेणी | श्री.सुनिल भुसारा, श्री.लहू कानडे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अनुज्ञेय करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ७८. | "जिल्हास्तरीय लहान वृत्तपत्र, संपादकांचे अनेक प्रश्न राज्य शासनाकडे प्रलंबित असणे, सर्व शासकीय योजनांना वृत्तपत्रे नेहमीच मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देत असणे, परंतु शासकीय जाहिराती देताना मात्र ‘क’ वर्गातील वृत्तपत्रांपेक्षा मोठी वृत्तपत्रे व वाहिन्या यांनाच शासनातर्फे झुकते माप दिले जाणे, त्यामुळे शासनाकडून या वृत्तपत्रांसंबंधी विविध अटी लावल्या जात असल्याने या छोट्या वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात येणे, शासनमान्य जाहिरात यादीवरील वृत्तपत्रांची माहिती व जनसंपर्क विभागाकडून दर दोन वर्षांनी पडताळणी होणे, यातील ‘क’ वर्गातील वृत्तपत्रांच्या पडताळणीच्यावेळी कागद खरेदीबाबतची जी.एस.टी.ची बिले वृत्तपत्रांकडे असणे सक्तीचे करण्यात येणे, ‘क’ वृत्तपत्रांसाठीही जी.एस.टी. देयकाची अट शिथिल करण्याची मागणी करण्यात येणे, शासनाच्या सन २०१९ च्या संदेश प्रसारण धोरणातील जाहिरात वितरणाच्या अटींची अंमलबजावणी शासनाकडून होत नसणे, त्यामध्ये ‘क’ वर्गातील वृतपत्रांना प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संपादक सहकारी संघाने करणे, यासंस्थेचे मुख्यालय असलेल्या फलटण, जि.सातारा येथील पूर्वी बंद पडलेले शासनाचे उपजिल्हा माहिती कार्यालय पूर्ववत सुरू करण्याची होत असलेली मागणी, शासनाचे ‘क’ वर्गीय वृत्तपत्रांना जाहिराती देण्याचे धोरण, जीएसटी देयकाची अट तसेंच अधिसूचीत संदेश प्रसारण धोरण, २०१९ च्या अंमलबजावणीतील दुर्लक्ष पाहता लहान-लहान वृत्तपत्र व्यवसाय बंद करावा लागण्याची निर्माण झालेली परिस्थिती, परिणामी छोट्या वृत्तपत्र व्यवसायिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. दिपक चव्हाण, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ७९. | "राज्यात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत केलेल्या सर्वेक्षणाअंती राज्यातील ५७७ बस स्थानकांपैकी ३९४ बसस्थानकांची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, तेथे प्रवाशांना आवश्यक त्या कोणत्याही सोयी-सुविधा पुरविण्यात येत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होणे, राज्य परिवहन महामंडळाने सार्वजनिक खाजगी भागिदारी अंतर्गत "बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा" (बी.ओ.टी.) या धोरणानुसार बस स्थानकांचा पुनर्विकास करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी न होणे, सन २०१६ मध्ये परिवहन विभागाने राज्यातील बसस्थानकांचे बसपोर्टमध्ये रुपांतर करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येणे, मोक्याच्या जागा असलेल्या विविध बसस्थानकांच्या जागेचे मुल्यमापन करून आराखडे तयार करण्याचे काम खाजगी कंपनीला देण्याचे निश्चित करणे, परंतु निविदा प्रसिद्ध न झाल्याने सदरचे काम अद्यापही प्रलंबित असणे, त्यातच मुंबई सेंट्रल येथील राज्य परिवहन महामंडळच्या जीर्ण झालेल्या मध्यवर्ती इमारतीच्या पुनर्विकासाचा ४६१ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, दरम्यानच्या काळात तेथे छताचे प्लॅस्टर कोसळून दुर्घटना घडूनही अद्यापही त्याची दुरुस्ती करण्यात न येणे, उपरोक्त बसस्थानकांमध्ये दुरुस्ती व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात येणे, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करून राज्यातील राज्य परिवहन बसस्थानकांची दुरुस्ती व अद्ययावत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.लहू कानडे, ॲड.आशिष शेलार, ॲड.पराग अळवणी, कॅप्टन आर.सेल्वन, सर्वश्री अमित साटम, पराग शाह, प्रशांत ठाकूर, मंगेश कुडाळकर, कुणाल पाटील, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री विक्रमसिंह सावंत, नानाभाऊ पटोले, ऋतुराज पाटील, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री बाळासाहेब थोरात, अमित झनक, जितेश अंतापूरकर, पृथ्वीराज चव्हाण, डॉ.राहूल पाटील, श्रीमती सीमा हिरे, श्री.नरेंद्र भोंडेकर, श्रीमती लताबाई सोनवणे, सर्वश्री दौलत दरोडा, बळवंत वानखडे, अनिल बाबर, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री समीर कुणावार, अतुल भातखळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री महेश | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | | बालदी, मिहीर कोटेचा, समाधान अवताडे, संजय जगताप, अमिन पटेल, विकास ठाकरे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री मोहनराव हंबर्डे, अस्लम शेख, सुनील केदार, शिरीष चौधरी, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री विनोद निकोले, दादाराव केचे, संजय रायमुलकर, वि.स.स. | |
| ८०. | "अमरावती विभाग नियंत्रक रा.प. महामंडळ यांचे आस्थापनेवरील विशेष मागास प्रवर्गातील वाहक, चालक व सहाय्यक या एस.टी. कर्मचाऱ्यांचे लोकप्रतिनिधींनीही मागणी प्रमाणे त्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी व त्यांना ऑन लोण बेसीसवर अमरावती जिल्ह्यात कामावर सामावुन घेण्यासाठी या संबंधी मागणीसाठी एस.टी. परिवहन विभागाचे मंत्री तथा राज्याचे मुख्यमंत्री यांचे कार्यालयाकडे मुख्यमंत्री सचिवालय कक्ष विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती येथील विशेष कार्य अधिकारी यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी पत्र क्र.३६६/२०२३ पत्र पाठविले असणे व दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ चे पत्र क्र.६७०/२०२३ विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती येथील उप आयुक्त (सां.प्र) यांनीही मुख्यमंत्री | श्री. रवि राणा, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सचिवालयाचे प्रधान सचिव, अप्पर मुख्य सचिव, गृह परिवहन मंत्रालय, व उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक रा.प.महामंडळाच्या मुंबई यांना पत्र पाठवले असणे, विशेषत: एस.टी. महामंडळाच्या अमरावती विभाग नियंत्रक यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र.४२०७/२०२३ दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ पत्र प्रमाणे वरील मागणी मान्य करण्यासाठी अहवाल वाहतूक भवन मुंबई यांचे कार्यालयास पाठवला असून तो प्राप्त झाला असणे, तरी सुद्धा अनेक दिवसापासून शासनाकडे सातत्याने लोकप्रतिनिधी यांचा पाठपुरावा असूनही एस.टी. कर्मचाऱ्यांच्या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असणे, सदर कर्मचाऱ्यांमध्ये शासन प्रति निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना राज्यातील एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा प्रलंबित मागण्या तातडीने सोडविण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ८१. | "मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी अमरावती या कार्यालयाने अपर मुख्य सचिव यांचेकडे अमरावती जिल्ह्यामध्ये परिवहन विभाग संबंधी अनेक कामाचे प्रस्ताव पाठविले असून त्यामध्ये लोकाभिमुख कामाचा समावेष असणे, ज्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील नवीन अंजनगाव सुर्जी बस डेपो, भातकुली शहर बस डेपो, धारणी व चिखलदरा बस डेपो, तिवसा बस डेपो आदि मागण्यांसह अमरावती जिल्ह्यात नवीन बसेस उपलब्ध करून देणे आदि मांगण्या शासनाकडे जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी पाठविल्या असणे, अद्यापपर्यंत यासंबधी कोणताच निर्णय झालेला नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. रवि राणा,<br>वि. स. स. | कित्ता |
| ८२. | "श्रीक्षेत्र वीर (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे श्रीनाथ म्हस्कोबाच्या दर्शनासाठी पुणे जिल्ह्यासह राज्यभरातून भाविक वर्षभर असणे, यात्रा, दसरा, दर अमावास्येला येथे लाखो भाविक गर्दी करीत असणे, पुरंदर | श्री. संजय जगताप,<br>श्री. विकास ठाकरे,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | तालुक्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने वीर हे मोठे गाव असणे, परंतु येथे येणाऱ्या भाविकांसाठी सुसज्ज बस स्थानक उभारण्याबाबत एस.टी. महामंडळ दुर्लक्ष करीत असणे, त्यामुळे येथे भाविक-भक्तांना उन्हात ताटकळत बसची वाट पहावी लागत असणे, विद्यार्थी, दररोज नोकरी निमित्त प्रवास करावा लागणारे नोकरदार यांची मोठी गैरसोय होत असणे, त्यामुळे येथे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन सुसज्ज बस स्थानक उभारावे, अशी आग्रही मागणी असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ८३. | "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सरळ सेवा भरती २०१९ सोलापूर विभाग यांच्याकडून नियुक्त पत्र मिळण्याबाबतची मागणी केलेली असणे, ४३ चालक तथावाहक या पदाकरिता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडे चालकाची ४८ दिवस व वाहकाचे पंधरा दिवस सेवा पूर्व प्रशिक्षण पूर्ण केलेले असणे, त्या प्रशिक्षणानंतर त्यांना अद्याप महामंडळाने नोकरीत सामावून घेतलेले नसल्याने हे उमेदवार नाराजी व्यक्त करीत असणे, त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व मुले नाराजी व्यक्त करत असून दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी दिलेल्या जाहिरातीनुसार तसेच दिनांक १७ एप्रिल, २०२३ ला प्रशिक्षणासाठी बोलवलेल्या उमेदवारांनी दिनांक ४ जुलै, २०२३ प्रशिक्षण पूर्ण करूनही नियुक्ती न दिल्याने ते वंचित असल्याने ते नाराजी व्यक्त करीत असणे, सोलापूर विभागांमध्ये ५९१ पदाची भरती होती त्यापैकी ५४८ लोकांना नियुक्तीपत्र देण्यात आले मात्र राहिलेले ४३ चालक तथा वाहक प्रशिक्षणार्थीना अद्यापपर्यंत नियुक्ती न दिल्याने त्यांची नियुक्ती शासनाने करावी अशी त्यांची मागणी असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि. स. स. | किता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ८४. | "जि.पालघर गुजरात सीमेवरील तलासरी (दापचेरी) आरटीओ चेकपोस्टवर परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने वाहनांना मोठ्या प्रमाणात बिना पावती प्रवेश देऊन खाजगी वसुली करण्यात येऊन यामध्ये आर्थिक घोटाळा करण्यात येत असल्याचा प्रकार निदर्शनास येणे, ओव्हरलोड ट्रकची खाजगी वसुली २५ ते ३० हजार रुपयांपर्यंत करण्यात येणे, कागदपत्रे ओके असली तरी हजार रुपयांपर्यंत बिन पावतीचा प्रवेश द्यावा लागणे, ठाणे परिवहन अधिकारी व त्यांचे संबधित अधिकारी यांचे आशिर्वादाने तलासरी चेकपोस्टवर बेकायदेशीररित्या वसुलीचे रॅकेट सुरू असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, या रस्त्यावर आरटीओचे अधिकारी, कर्मचारी हे सरकारी गणवेश न घालता साधे कपडे घालून वसुली करीत असणे, विक्रमगडचे लोकप्रतिनिधींनी चेकपोस्टवरील अवैध वसुलीबाबत केंद्र व राज्याचे मुख्यमंत्री यांचेकडे लेखी तक्रार केली असणे, लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून मोटार वाहन निरीक्षक निलोबा ज्योतिबा तांदळे यांना लाच घेताना रंगेहात पकडणे, चेकपोस्टवरील अवैध वसुली करून आर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी अद्याप कोणतीच कारवाई करण्यात न येणे, यास्तव ठाण्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.रवी गायकवाड यांच्यासह तलासरी पोस्टचे मोटार वाहन निरीक्षक, सहायक मोटार वाहन निरीक्षक, फ्लाईंग स्कॉड अधिकारी यांना तातडीने निलंबित करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक खात्यामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुरेश भोळे, वि. स. स. | कित्ता |
| ८५. | "मुंबईतील वायू प्रदूषण रोखण्याकरिता केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने शासनास शिफारशी केल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, तसेच, शासनास कृती आराखडा सादर करण्याचे सांगितले असणे, त्यामध्ये, मुंबईतील मोठ्या | श्री.अतुल भातखळकर, ॲड.आशिष शेलार, श्री.किसन कथोरे, ॲड.पराग अळवणी, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रमाणात सुरू झालेली इमारतींची बांधकामे, मेट्रो, रस्त्यांचे काँक्रिटीकरण, सागरी किनारा मार्गाची कामे, वाहनांची वाढणारी संख्या इत्यादींमुळे तसेच हवेच्या स्थितीमध्ये होणाऱ्या बदलांमुळे प्रदूषण वाढत असणे, तसेच, वाढत्या हवा प्रदूषणामुळे त्याचा आरोग्यावर मोठा परिणाम होत असणे, त्यामुळे, बांधकामे आणि विकासकामांवर देखरेख ठेवणे व शहरातील हवेची ढासळती गुणवत्ता, वाढते प्रदूषण याचा अभ्यास करून उपाययोजना करण्याची गरज असणे, तसेच, धुळीला अटकाव करून प्रदूषण रोखण्यासाठी संपूर्ण मुंबई शहरात हवा शुद्धीकरण यंत्र (एअर प्युरीफायर) बसवण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. पराग शाह, कॅप्टन आर. सेल्वन, श्री. मिहीर कोटेचा, श्री.समाधान अवताडे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, श्री. अमित देशमुख,श्री. बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. अस्लम शेख, श्री. झीशान सिद्दिकी, श्री. सुनिल केदार, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. नानाभाऊ पटोले, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. राजेश एकडे, श्री. संजय जगताप, श्री. शिरीष चौधरी, श्रीमती प्रतिभा धानोरकर,श्री. अबू आजमी, श्री. अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री. संग्राम थोपटे, श्री. संजय केळकर, श्री. विनोद निकोले, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. योगेश सागर, श्री. रईस शेख, श्रीमती यामिनी | |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | | यशवंत जाधव, श्रीमती लताबाई सोनवणे, श्रीमती मंजुळा गावीत, श्रीमती श्वेता महाले, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. रोहित पवार, श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | |
| ८६. | "चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिकरणामुळे जल, वायू आणि ध्वनी प्रदूषणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने जीवघेण्या आजारांमुळे मानवाला मोठी किंमत चुकवावी लागत असणे, विविध खनिज संपतीचे विक्रमी उत्पादन होत असतांना नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या समांतर यंत्रणा बिनकामी ठरल्या असणे, दिवसेंदिवस होणारा नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास व कृत्रिम प्रदूषणाने दरवर्षी विविध आजारांमुळे हजारों नागरिकांचा बळी जात असणे, जिल्ह्यातील उद्योगामुळे प्रदुषित धुळीकणांची संख्या वाढली असल्याने वातावरणात विषारी घटक पसरल्याने आरोग्यासाठी सर्वाधिक धोका निर्माण झाला असणे, पर्यावरणाच्या संवर्धनासाठी विविध प्रकारचे मूलभूत कायदे आहेत, त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने जिल्ह्यात जल, ध्वनी व प्रदूषणाची समस्या सर्वानाच अस्वस्थ करणारी असल्याने या प्रकरणी तक्रार करूनही संबंधित यंत्रणा/शासनामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, याकडे कंपनी प्रशासनाचे/शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे सर्वसामान्य जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुभाष धोटे, श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. संजय जगताप, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. अस्लम शेख, श्री. शिरीष चौधरी, वि. स. स. | कित्ता |
| ८७. | "मुंबईच्या हवेत खालावत जाणाऱ्या दर्जाबाबत आणि त्यांच्याशी संबंधित आरोग्यविषयक समस्याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यास मुंबई | श्री. योगेश सागर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | पालिकेसह संबंधित यंत्रणातर्फे कोणत्याच उपाययोजना केल्या जात नसल्याचे ताशेरे मा. उच्च न्यायालयाने ओढले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, मुंबईतील एकही भाग प्रदूषणमुक्त नसल्याची टिपणी करून शहरातील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत चालल्या बाबत उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने चिंता व्यक्त केली असणे, याप्रकरणी स्वतःहून जनहित याचिका दाखल करून घेत असल्याचे स्पष्ट करीत न्यायालयाने या प्रकरणी राज्याचे महाधिवक्ता यांना सहकार्यासाठी पाचारण केलेले असणे, मुंबईत साथीच्या आजारापासून मुक्ती मिळवण्यासाठी पालिका प्रशासन त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करणे, अलीकडेच प्रदूषण मुक्तीसाठी पालिकेने मार्गदर्शक सूचना जारी केल्या परंतु पालिकेकडे पर्याप्त मनुष्यबळच नसल्याने पालिकेकडून या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी कशी होणार हा प्रश्न निर्माण झालेला असणे, तसेच पालिका व राज्य सरकारच्या रुग्णालयामध्ये चतुर्थ श्रेणीचे सुमारे एक लाख पंचेचाळीस हजार कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, पालिकेच्या कीटकनाशक विभागात अनेकपदे रिक्त असणे, स्वाइन फ्लू, डेंगू, मलेरिया सारख्या साथीच्या आजाराचा प्रादुर्भाव वाढत असतानाही मुंबईतील प्रदूषणाचे स्तर वाढत जाणे, मनुष्यबळाचे कमतरतेमुळे प्रदूषण व साथीच्या आजारावर प्रतिबंधाकात्मक उपाययोजना राबवताना पालिकेला अपयश येत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ८८. | "राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील मे. लॉयडस मेटल स्टील प्लांट, घुग्गुस ह्या कारखान्याकडून कामगारांचे आरोग्य, सुरक्षा व परिसरातील पर्यावरणाबाबत सुरुवातीपासून ते आजतागायत औद्योगिक स्वास्थ्य व सुरक्षा नियमांचे सर्रासपणे उल्लंघन केले जात असणे, या कंपनीमध्ये व परिसरात नेहमीच गंभीर स्वरूपाचे तसेच | श्री. सुभाष धोटे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | किरकोळ प्राणघातक, गंभीर असे अनेक अपघात घडले असणे, प्रदूषणविषयक मानकत्वाचे पालन सदर कंपनीकडून होत नसल्याने सदरहू कंपनीला non compliance of consent condition बाबत नोटीस बजावण्यात येणे, दिनांक ७/१२/२०२२, ४/८/२०२२ आणि १३/९/२०२२ रोजी environment MT १९८६, water pollution MT १९७४, MT pollution अशा विविध प्रकरणात कंपनीला नोटीस देण्यात आलेली असणे, सदरहू कंपनीमुळे घुग्गुस आणि परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या वाढत असणे, यामुळे सदरहू उद्योगावर तात्काळ विशेष समिती नेमून या सर्व प्रकरणांचे सोशल ऑडिट करण्याची तसेच पर्यावरण कायदा १९८६ ची विविध कलमे व फॅक्टरी ऍक्ट कायद्याचे वारंवार उल्लंघन होत असल्याने नकठोर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, सदर प्रकरणी संबंधित कोल माईन्स प्रशासन, स्थानिक यंत्रणा/शासनामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, याकडे कंपनी प्रशासनाचे/शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे विभागातील सर्वसामान्य जनतेत शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ८९. | "राज्यात विशेषत: चंद्रपूर, नागपूर, जळगांव जिल्ह्यात माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये प्रदुषणात मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, आधीच प्रदूषित असलेल्या चंद्रपूर जिल्हात नोव्हेंबर महिन्याचे ३० पैकी ३० दिवस प्रदूषित असणे, परिणामी नागरीकांना अस्थमा, निमोनिआ, सर्दी, खोकला आदी श्वसनाच्या आजाराला सामोरे जावे लागणे, अशीच परिस्थिती जळगाव जिल्ह्यात असणे, जळगांव जिल्ह्यातही नोव्हेंबर महिन्यात ३० दिवस प्रदुषित असल्याचे उघडकीस येणे, तसेच राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरातील सिव्हिल लाइन्स, महाल, अंबाझरी व रामनगर या चारही केंद्राची | श्री. किशोर जोरगेवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या आकडेवारीनुसार नोव्हेंबर महिन्यातील संपूर्ण ३० दिवस प्रदूषित असल्याचे निदर्शनास येणे, ब्युरो, शहरीकरण व औद्योगिकरणाने चंद्रपूर जिल्ह्यात जल, वायु, ध्वनी व मृद प्रदुषणाने नागरीक त्रस्त झालेले असणे, विविध श्वसनाचे आजार होऊन त्यांचा जीव धोक्यात येणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करून चंद्रपूर, नागपूर, जळगांव या जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यातील वाढत्या प्रदुषणावर नियंत्रण आणण्याची तसेच सक्षम उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ९०. | "भिवंडी येथील कामवरी नदी किनारी वसलेल्या शेलार ग्रामपंचायत हदीत अनधिकृतपणे डाईंगचे कारखाने सुरू असणे, यामध्ये खेमिश्री डाईंग प्रोशिजर, शिवकृपा सिंथेटिक, जेजे फॅब्रिक्स प्रा.लि., जय अंबे प्रोसेसर, सनविन इंडस्ट्री, इन्वील कॅन्सलटन, शत्रुंजय डाईंग, सिल्कॉन सिंथेटिक्स, वालचंद यर्न, संतोष प्रोसेसर, पायनापल इंडस्ट्री, त्रिशूल डाईंग प्रोसेसर, चुर सिंथेटिक, चुर सिंथेटिक व इतर कारखाने कापडावर रंगप्रक्रिया केलेले रसायनयुक्त पाणी नदीपात्रात सोडत असणे, यामुळे कामवरी नदी प्रदूषित होत असणे,व यामुळे स्थानिक नागरिकांना खोकला, श्रसनाचा त्रास मोठ्या प्रमाणात होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येत असणे, या ठिकाणी अनधिकृतपणे सुरू असलेल्या डाईंगच्या कारखान्यांसाठी महानगरपालिका हद्दीतील नळ पाणी योजनेतून पाण्याची चोरी करणे, टँकर माफियांकडून पाण्याचा साठा पुरविण्यात येत असणे, सदर टँकर चालकांकडे कोणतेही कागदपत्र नसतानाही टँकर चालविले जात असणे, याबाबत कल्याण प्रादेशिक कार्यालयाकडून तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळ व अधिकारी जाणून बुजून कोणतीही कारवाई केली जात | श्री. रईस शेख, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नसणे, यामध्ये कल्याण प्रादेशिक अधिकारी व त्यांचे स्वीय सहायक यांच्या संगनमताने सदर कारखाने अनधिकृतपणे सुरू असणे, उपरोक्त प्रकरणी स्थानिक नागरिकांनी शासनाकडे अनेक वेळा तक्रारी करून चौकशी करण्याची मागणी करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ९१. | "अंबरनाथ शहरात दिवसेंदिवस वाढते प्रदूषण, अंबरनाथ येथील हवा गुणवत्ता निर्देशांक १४८ वर पोहोचल्याने येथील वातावरण आरोग्यदायी नसल्याचे निदर्शनास येणे, अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यातील रासायनिक कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट वालधूनी नदीपात्रात सोडण्यात येणे, याबाबत स्थानिक नागरीकांकडून संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करण्यात येणे, परंतु संबंधित विभागाकडून किरकोळ कारवाई करून उक्त कंपन्यांना पाठीशी घालण्यात येणे, तसेच एमआयडीसीतील सांडपाणी अंबरनाथ शहरातील मोठ्या नाल्यात सोडण्यात येणे, असे असतांनाही संबंधित दोषी कंपन्यांवर कोणतीच कठोर कारवाई करण्यात न येणे, त्यामुळे मोरिवली गाव, अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रातील रहिवाशांना होणाऱ्या दुष्परिणामास शासन/संबंधित कारखानदार जबाबदार असणे, प्रदूषण करणाऱ्या कंपन्या शासनाने बंद केल्या असतांना त्यांना पुन्हा सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आलेल्या असणे, परिणामी स्थानिक नागरीकांत वाढते भितीचे तीव्र असंतोषाचे वातावरण, अंबरनाथ शहरात प्रदूषण पसरवणाऱ्या रासायनिक कारखान्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे मार्च, २०२३ मध्ये लेखी निवेदनाद्वारे करणे, मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर प्रकरणी तात्काळ कारवाई करण्याच्या लेखी सुचना पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिवांना दिलेल्या असणे, तथापि अद्यापपर्यंत कोणतीच ठोस कारवाई झालेली | डॉ. बालाजी किणीकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नसणे, शासनाने उक्त प्रकरणी तात्काळ चौकशी करून अंबरनाथ शहरात प्रदूषण पसरवणाऱ्या कारखान्यांवर व त्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ९२. | "कोल्हापूर बायोमेडिकल वेस्ट विल्हेवाटीसाठी मे.एस.एस.सर्विसेस कोल्हापूर महानगरपालिका व मे.एस.एस.सर्विसेस इचलकरंजी महानगरपालिका या कंपनीकडे कंत्राट असणे, ह्या कंपन्या नगरपालिकाअंतर्गत काही तालुक्यात बायोमेडिकल वेस्टच्या विल्हेवाटीचे काम सक्षमपणे करणे, याशिवाय श्री.गोविंद बायोमेडिकल प्रा.लि.कुडाळ (सिधुदूर्ग) ही कंपनी बायोमेडिकल वेस्टचे विल्हेवाट करण्यासाठी क्षमतेने काम करीत असणे, या तीनही कंपन्या सक्षम, अनुभवी व कुशल कर्मचारी याबाबतीत स्वयंपूर्ण असणे, या कंपन्यांची प्रत्येकी १० हजार बेडची क्षमता कमी असली तरी नवीन कंपनीस मान्यता देणे नियमबाह्य असणे, याशिवाय नवीन कंपनीस परवानगी देताना ७५ कि.मी.ची मर्यादा असणे, असा नियम असताना येथे आरोग्यम वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.ला प्लॉन्ट उभारणीस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मान्यता देणे, खरेतर या कंपनीकडे पुरेशी क्षमता, अनुभव नसणे, त्यांना परवानगी देताना कागदपत्रांची पूर्तता व निविदा प्रक्रिया राबविलेली नसणे, नवीन इन्सीनरेटरची १५० किलो प्रती तास क्षमतेच्या उभारणीची मागणी केली असता, २५० किलो प्रती तास क्षमतेचा इन्सीनरेटरची नियमबाह्य उभारणी करण्यास दिलेली संमती चुकीचे असणे, त्यामुळे ही परवानगी देताना आर्थिक हितसंबंध असल्याची चर्चा असणे, या प्रकल्पास मान्यता देताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारावर गदा आणून मान्यता देणे, त्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ९३. | "रायगड जिल्ह्यातील तळोजा (ता.पनवेल) औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांमार्फत रात्री अपरात्री तसेच पहाटेच्या वेळीत सोडण्यात येणाऱ्या रासायनिक दुषित वायुमुळे पनवेल, नविन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, कामोठे, खारघर परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, उक्त बाब सभागृहात वारंवार शासनाच्या निदर्शनास आणुनसुद्धा शासनाच्या अक्षम्य होणाऱ्या दुर्लक्षामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई होत नसणे, पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या उक्त औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कारखान्यांवर कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांच्या मनात संबंधित विभागाबाबत चिड निर्माण होत असणे, या औद्योगिक वसाहतीच्या परिसरातील खारघर, कळंबोली, तळोजा आणि पनवेल परिसरातील अनेक नागरिक आपली घरे सोडून अन्यत्र स्थलांतरीत होणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची सदर प्रदुषण करणाऱ्या कारखान्यांच्या बरोबर साटेलोट असल्याची भावना असणे, दुषित वायु सोडणाऱ्या कारखान्यांवर तसेच उक्त परिसरातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. प्रशांत ठाकूर, श्री. समीर कुणावार, श्री. महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि. स. स. | कित्ता |
| ९४. | "राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकूण ४ विभागीय कोल माईन्स कार्यरत असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासनाच्या निकषानुसार वेकोली परिसरात वृक्ष लागवड करण्याकरिता निविदा काढण्यात आलेली असणे, सदरहू वृक्ष लागवडीचे काम मध्यप्रदेश राज्य वनविकास निगम कार्यालय, छिंदवाडा येथील ठेकेदारास मंजूर झालेले असणे, सदरहू ठेकेदार कंपनीने शासनाच्या निकषानुसार करारात नमूद केलेली | श्री. सुभाष धोटे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | विशिष्ट जातीची वृक्ष लागवड न करता मनमानी पद्धतीने प्रोसोपीस जुलीप्लोरा जातीचे काटेरी वनस्पतीची लागवड करून अधिकाऱ्यांशी संगनमत करून कोट्यावधी रुपये रकमेच्या बिलाची उचल करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, मात्र सदरहू कोल माईन्स कंपन्याकडून परिसरातील पर्यावरण/वातावरण प्रदूषित केले जात असतांना कोणतीही प्रतिबंधात्मक उपाययोजना न करता नागरिकांच्या आरोग्याशी बेदरकारपणे खेळले जात असणे, यामुळे परिसरातील नागरिक प्रदुषणामुळे विविध आजारांचे बळी पडल्या जात असल्याचे निदर्शनास येणे, माईन्सचे काम सुरू करतेवेळी ज्या स्थितीत परिसर होता ती स्थिती माईन्स बंद करतांना नसल्याचे निदर्शनास येणे; सदर प्रकरणी संबंधित कोल माईन्स प्रशासन, स्थानिक यंत्रणा/शासनामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, याकडे प्रशासनाचे/शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे विभागातील सर्वसामान्य जनतेत शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ९५. | "विमुक्त जाती अ मध्ये मोठ्या प्रमाणात बनावट जात प्रमाणपत्र घेऊन अनेक दिवसांपासून घुसखोरी सुरू असणे, त्यामुळे खऱ्या विमुक्त जाती "अ" च्या तरुणांवर अन्याय होत असून या संदर्भात माहितीच्या अधिकाराद्वारे मागविलेल्या माहितीत केवळ बुलढाणा जिल्ह्यातील जवळपास ५०० प्रकरणे उघडकीस आली असणे, सामाजिक न्याय विभाग आणि बार्टी, पुणे संस्थेकडून बनावट प्रकरणाची तपासणी करण्याकरिता यवतमाळ जात पडताळणी समितीला आदेश देण्यात आले असणे, त्यांनी तपासलेल्या ५० प्रकरणांमध्ये ५० ही प्रकरणे बनावट निघाली असणे, बार्टीचे महासंचालक यांनी शासनाकडे अद्यापही बनावट प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकारी व लाभार्थ्यांवर कोणतीही कारवाई झालेली | श्री. इंद्रनिल नाईक, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नसणे, विमुक्त जाती "अ" मध्ये प्रचंड निर्माण झालेला तीव्र असंतोष, मागील अधिवेशनात मा.मंत्री महोदयांनी एस.आय.टी. मार्फत या प्रकरणात चौकशीकरिता समिती गठीत करण्याची घोषणासभागृहात केलेली असणे, परंतु अद्याप सदर समिती गठीत न होणे, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ ला गोरसेना संघटनेने प्रचंड मोठा मोर्चा या संदर्भात काढलेला असणे, परंतु शासनाने कोणतीही दखल न घेणे हा फार मोठा अन्याय असून या संदर्भात एस.आय.टी. नेमण्याची केलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ९६. | "नागपूर महानगरपालिकेने नोव्हेंबर, २०१९ मध्ये ए जी इंविरो आणि बिव्हीजी इंडिया या दोन खाजगी कंपन्यांना शहरातील कचरा संकलन आणि भांडेवाडी डंपिंगयार्डपर्यंत वाहतूक करण्यासाठी करोडो रुपयांचे कंत्राट देऊन नियुक्त करणे, जुने ऑपरेटर कंपनीच्या तुलनेत या दोन खाजगीकंपन्यांना मनपाणे जास्तीचे दर देण्यात येत असणे, महानगरपालिकेचे अधिकारी या दोन्ही खाजगी ऑपरेटरला मिश्रीत कचऱ्यांचे पैसे अदाकरणे, यामूळे दरवर्षी जनतेच्या कोट्यवधी रूपयांची उधळपट्टी होत असणे, गेल्या चार वर्षांत या ऑपरेटर्सनी कधी ही विलणीकरण केलेला कचरा उचलला नसताना ही मनपा अधिकाऱ्यांशी संगनमत बिलाची उचल करणे, या दोन्ही ऑपरेटरांना घनकचऱ्यात माती मिश्रीत करतांना अनेकवेळा अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले असतानाही याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, मनपाच्या सर्वसाधारण सभेत या विषयावर चर्चा करण्यात येऊन या दोन्ही ऑपरेटरचे कंत्राट रद्द करण्यासंदर्भात अनेक वेळा ठराव करण्यात येऊन सुध्या अध्यापही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, नागपूर मनपाच्या अधिकाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग करून घनकचरा व्यवस्थापन विभागात | श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे, श्री. विकास ठाकरे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. संजय जगताप, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. शिरीष चौधरी, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नियुक्त करण्यात आलेल्या या दोन ऑपरेटरला गेल्या ४ वर्षांपासून कोट्यावधी रुपयांचा आर्थिक लाभ देण्यात येणे, त्यामुळे मनपाला किमान ३० कोटीं पेक्षा ही जास्त आर्थिक फटका बसणार असणे, याबाबत तक्रार होऊन सुध्या अद्यापही चौकशी होत नसल्याने नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष या प्रकरणी सखोल चौकशी करून कठोर कारवाई करणे, तसेच निविदा रद्द करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ९७. | "सिडकोद्वारा बांधण्यात येणारी ६७ हजार घरे व व्यावसायिक गाळ्यांची विक्री होण्यासाठी व त्याचे ब्रॅन्डिंग, मॉर्केटींग व विक्री करण्यासाठी सिडकोने मे. हेलिओस प्रा.लि. व मे. थॉट्रेन डिझाईन प्रा.लि. या संयुक्त भागीदारात असलेल्या कंपनीला ६९९ कोटींचे कंत्राट देण्यात येणे, या कंत्राटाच्या अनुषंगाने सल्ला देणाऱ्या कंपनीला एका घराच्या (सदनिकेच्या) विक्रीमागे एक लाख रूपये दलाली देण्याचे ठरविण्यात येणे, ज्या मार्केटींग कंपनीला सिडकोने सल्ला देण्यासाठी व घर विक्रीसाठी ६९९ कोटींचे कंत्राट दिले आहे त्याच सल्लागार कम मार्केटींग कंपनीच्या माध्यमातून घरांच्या विक्रीसाठी विविध जाहिरात प्रकांरावर व इव्हेंटवर तब्बल १५० कोटींचा खर्च करण्याचा प्रस्ताव मांडण्यात येणे, या एकाच कंपनीला करोडो रूपयांच्या कंत्राट देऊन आर्थिक लाभ देण्यामागे सिडकोची भुमिका संशयास्पद निर्माण होणे, त्यामुळे नगरविकास विभागाने ३ ऑगस्ट २०२३ रोजी सिडकोच्या व्यवस्थापकीस संचालकांना पत्र पाठवून तातडीने त्याच दिवशी सविस्तर अहवाल सादर करण्यास सांगितलेले असणे, तरीसुद्धा याकडे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करून अघापही अहवाल सादर केलेला नसणे, त्यामुळे हा करोडो रूपयांच्या कंत्राट प्रकरणात सिडकोच्या अधिकाऱ्यांची भुमिका संशयास्पद असणे, या गंभीर प्रकरणी कोणतीच चौकशी होत नसल्याने याकडे शासनाचे होत असलेले | श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. राजेश एकडे, श्री. संजय जगताप, श्री. शिरीष चौधरी, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. संजय पोतनीस, श्री. निलेश लंके, श्री. अजय चौधरी, डॉ. राहूल पाटील, श्री. सुनील राणे, श्री. राजकुमार पटेल, श्री. रविंद्र वायकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांत पसरत असलेले तिव्र असंतोष व सतांपाचे वातावरण परिणामी या गंभीर प्रकरणी उच्च स्तरीय अधिकाऱ्यामार्फत चौकशी करून संबधितावर कार्यवाही होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ९८. | "पुण्यातील कसब्यामधील शनिवारवाड्या भोवतीच्या व पातळेश्वर,आगाखान पॅलेस आदि जुन्या वाडयांचा कित्येक वर्षे खुंटलेला विकास, ऐतिहासिक वारसा असलेल्या वाड्यांचा विकास रखडलेला असल्यामुळे या वाड्यांमध्ये राहणाऱ्या हजारो नागरिकांना जुन्या जीर्ण झालेल्या वाड्यांमध्ये राहण्याची आलेली वेळ, नागरिकांची आर्थिक स्थिती बेताची असल्याने अन्यत्र जाताही येईना अशी अवस्था असणे, शनिवारवाडा परिसरातील बाधित जुन्या वाड्यातील हजारो नागरिक गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ आपल्या न्याय मागण्यांसाठी लढा देत असणे, वाड्यांच्या पुनर्विकास तातडीने व्हावा याकरिता शासनाकडे सातत्याने सर्व स्तरावरुन मागणी करून ही जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ, केंद्रिय पुरातत्व विभागाच्या १०० मीटरमधील बांधकामाच्या नियमांनी शनिवारवाडा परिसरातील वाड्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांचा जीव मेटाकुटीला येणे, १०० व २०० मीटर परिघातील जुन्या वाड्यांचा विकास होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना, ऐतिहासिक वास्तूंचे जतन करतांना १०० मीटरमधील परिसरातील बांधकामाबाबत अस्तित्वात असलेल्या कायदयात दुरुस्ती होण्याची आवश्यकता, पुणे शहराचा स्मार्ट सिटी मध्ये समावेश करणे, परंतु कसबा पेठेतील या जुन्या वाड्यांच्या प्रश्नाकडे मात्र करण्यात येत असलेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने गांभीर्याने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. रवींद्र धंगेकर, श्री. संग्राम थोपटे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ९९. | "मुंबईस्थित चेंबूरच्या आणिक गाव येथील महापालिकेतील शाळेतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून विषबाधा झाले असल्याची खळबळजनक बाब दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२३ वा त्यासुमारास निदर्शणास येणे, मध्यान्हाचे जेवण केल्यानंतर शाळेतील १६ विद्यार्थ्यांना मळमळ व उलटीचा त्रास होणे, त्यानंतर त्यांना शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात येऊन त्यांच्यावर उपचार करण्यात येणे, उपचार घेणारे विद्यार्थी १२ ते १३ वर्षे वयोगटातील असल्याचे निदर्शणास येणे, सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. अबू आजमी, श्री. निलेश लंके, श्री. राजकुमार पटेल, वि. स. स. | कित्ता |
| १००. | "मुंबईमध्ये शेकडो किमीच्या भूमिगत मलवाहिन्या असणे, त्यांच्या सफाईसाठी मॅनहोलमध्ये माणसे उतरवली जाणे, मॅनहोलमधील विषारी वायुमुळे अनेक कंत्राटी कर्मचारी मृत्युमुखी पडणे, काही कर्मचाऱ्यांना श्वसनाचे जीवघेणे विकार जडणे, भूमिगत गटारात उतरून हाताने मैला साफ करण्यास बंदी असणे, मुंबई महापालिकेकडे आधुनिक व स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित यंत्रसामग्री उपलब्ध असताना देखील आजही सफाई कामगारांना मॅनहोलच्या घाणीत माणूस उतरवून भूमिगत गटारांची सफाई करण्यात येणे, भूमिगत गटारांमध्ये सफाई करताना गोवंडीमध्ये दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू होणे, कांदिवली येथे भूमिगत गटारातून सफाई करून बाहेर येताना कामगाराच्या अंगावरून गाडी जाणे, आतापर्यंत ४१ जणांचा भूमिगत गटारात पडून मृत्यू होणे, सफाई कामगाराच्या सुरक्षेसाठी कोणतीही प्रणाली किंवा साहित्य देण्यात न येणे, यामुळे सफाई कामगारांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. अमिन पटेल, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. अस्लम शेख, श्री. झीशान सिद्दिकी, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. नानाभाऊ पटोले, श्रीमती सुलभा खोडके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. संग्राम थोपटे, श्री. सुनिल केदार, श्री. रईस शेख, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १०१. | "दक्षिण मुंबईमध्ये पायधुनी, भुलेश्वर, उमरखाडी, कामाठीपुरा, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड हा परिसर सतत गजबजलेला असणे, या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, येथील परिसरात इमारती कोसळण्याचे प्रकार घडत असणे, विशेषतः पावसाळ्यामध्ये येथील इमारतींमधील रहिवाशी जीव मुठीत घेऊन रहाणे, या परिसरातील अनेक इमारती या अतिशय जुन्या झाल्या असल्याने या भागात दरवर्षी दुर्घटना घडून अनेक लोकांचे मृत्यू होत असणे, प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे येथील अनेक जुन्या इमारतीत बेकायदा बांधकामे आढळून येणे, यामुळे शासनाने येथील इमारतींचे सर्वेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची नितांत आवश्यकता, याप्रकरणी संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी शासनाकडून मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास होत असलेला विलंब, परिणामी येथील जुन्या इमारतींमधील रहिवाश्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री.अमिन पटेल, श्री.बाळासाहेब थोरात, श्री.अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री.नानाभाऊ पटोले, श्री.अमित विलासराव देशमुख, श्रीमती सुलभा खोडके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. संग्राम थोपटे, श्री. सुनिल केदार, वि. स. स. | कित्ता |
| १०२. | "नाशिक महानगरपालिकेने आगामी कुंभमेळा लक्षात घेता आपातकालीन लक्ष ठेवण्यासाठी नाशिक शहरात २०० विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात येणे, या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावर इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर उभारले जात असणे, ९ महिन्यांच्या या कामासाठी दिनांक ५ जुलै, २०२२ रोजी निविदा प्रक्रिया पूर्ण करणे, मुख्य कार्यकारी अधिकारी नाशिक स्मार्ट सिटी प्रकल्प सीईओ यांनी या कामासाठी ६० कोटीं रुपयांचे टेंडर काढणे, हे काम सेक्युटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला देण्यात येणे, या कंपनीची उलाढाल ३५ कोटीं रुपयांची नसतांना सुद्धा या कंपनीला काम देण्यात येणे, या कंपनीने दिलेले सीए सर्टिफिकेट सुद्धा बनावट असल्याचे आढळून येणे, | श्रीमती सरोज आहिरे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | या कामात मोठ्या प्रमाणात झालेला भ्रष्टाचार, या कामाची चौकशी करून संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची तेथील नागरिकांसह संबंधित लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग, यांचेकडे दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ रोजी केलेली मागणी, याबाबत चौकशी करून संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १०३. | "ठाणे महापालिका क्षेत्रातील मौजे माजिवडा येथील नाल्याचा काही भाग बुजवून कोणताही नकाशा मंजूर न करता तसेच बाळकुम पाडा नं.१ दादलानी पार्क रोड येथे महापालिकेची परवानगी न घेता तळ अधिक आठ मजल्याचे अनधिकृत बांधकाम करणे, तसेच बाळकुम पाडा नं २ शासकीय भूखंडावर अतिक्रमण करून बेकायदेशीर बांधकाम सुरू असल्याची तक्रार दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी करण्यात येऊन देखील कोणतीच कारवाई न होणे, सदर अनधिकृत बांधकामे राजरोसपणे उभी रहात असताना व याबाबत सबंधित प्रशासनाच्या निदर्शनास आणून देखील प्रशासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष, परिणामी शहरांमध्ये अनधिकृत बांधकामाची झालेली वाढ, त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी वेळोवेळी ही बाब निदर्शनास आणूनही अद्याप अनधिकृत बांधकामावर कोणतीही कारवाई न होणे, ही गंभीर बाब असून यामध्ये ठेकेदार व अधिकारी यांच्या संगनमताने होत असल्याची नागरिकांची तक्रार असणे, या प्रकरणी चौकशी करून दोषी व्यक्तींविरुध्द दंडात्मक कारवाई करून उभारण्यात आलेले अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संजय केळकर, श्री. किसन कथोरे, ॲड. आशिष शेलार, श्री. हिरामण खोसकर, वि. स. स. | कित्ता |
| १०४. | "सन २०१७- २०१८ पर्यंत मालमत्ता कराचा एक रकमी भरणा करणाऱ्या करदात्यांना थकीत रकमेवर आकारण्यात आलेली शास्ती माफ करण्याबाबतचा | श्री. राजेश एकडे, श्री. बाळासाहेब थोरात, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रस्ताव पाठवण्याबाबतचा निर्णय नगर परिषद ने घेतलेला असणे, नगरपरिषद मलकापूर यांनी शासनाकडे शास्ती मध्ये सूट माफी मिळण्याबाबत सविनय अर्ज सादर केलेला असणे, माननीय उप संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी माननीय कक्ष अधिकारी नगर विकास विभाग मंत्रालय यांना पत्र देऊन थकीत रक्कम प्रदान करणे करता सूट देणेबाबत नगरपरिषद औद्योगिक नागरी अधिनियमाच्या कलम १६७ (अ) नुसार असे अधिकार शासनास असल्याचे नमूद करणे, शासन स्तरावरून योग्य तो निर्णय घेण्याबाबत सह पत्रान्वये संदर्भीय केलेली असणे, मुख्याधिकारी नगरपरिषद मलकापूर यांनी सादर केलेली शास्तीसह व शास्ती शिवाय मालमत्ता कर वसुलीचा अहवालानुसार मालमत्ता करांमध्ये शास्तीबाबत मोठ्या प्रमाणात करदात्यांमध्ये असंतोष असल्याबाबत निर्देशनास येणे, शासन स्तरावरून मालमत्ता करा वरील शास्ती माफ झाल्यास निव्वळ मालमत्ता कर वसुली मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता असणे, थकीत कर वसुलीच्या रकमेवरील शास्ती माफ करण्याबाबत नगरपरिषद औद्योगिक नागरी अधिनियम कलम १६७ (अ) नुसार थकबाकीची रक्कम प्रदान करण्याबाबत सूट देण्याचे अधिकार राज्य शासनास असणे, त्यानुसार शास्तीची रक्कम माफ होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बळवंत वानखडे, श्री. अमित झनक, वि. स. स. | |
| १०५. | "नागपूर शहरातील मौजा सीताबर्डी, सिव्हिल लाइन्स येथे मेसर्स भगीरथ रियल्टी प्रायव्हेट लिमिटेडने भूखंड क्रमांक २३१, CTS- १७५१, वॉर्ड क्रमांक-४०, टेम्पल रोड, उंच इमारतीचे बांधकाम नऊ महिन्यांपूर्वी इमारत नकाशा मंजूर नसताना सुरू करणे, नागपूर महानगरपालिकेच्या नगररचना विभाग आणि धरमपेठ झोनने जून, २०२३ मध्ये मेसर्स भगीरथ रियल्टी प्रायव्हेट लिमिटेडला नोटीस बजावली असतानाही त्यांच्यावर | श्री.विकास ठाकरे, श्री.नानाभाऊ पटोले, श्री.संजय जगताप, श्री.सुनिल केदार, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.अस्लम शेख, श्री. शिरीष चौधरी, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कोणतीच कारवाई न करणे, संरक्षण मंत्रालयाने दिनांक १८ मे, २०११ रोजी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती आणि संरक्षण आस्थापनांपासून ५०० मीटरच्या परिघात बांधकामांना मनाई केली असतानाही नागपूर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या अभियंत्यांनी मेसर्स भगीरथ रियल्टीच्या उंच इमारतीचा इमारत नकाशा संरक्षण आस्थापनांपासून ५०० मीटरच्या परिघात मंजूर करणे, तसेच UDCPR, MRTP कायदा, संरक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे स्पष्ट उल्लंघन करणे, याप्रकरणी नागपूर महानगरपालिकेच्या महापालिका आयुक्तांकडे तक्रार करूनही नागपूर महानगरपालिका आणि महापालिका आयुक्तांनी कोणतीच कारवाई न करणे, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून सदरच्या बेकायदा बांधकामाबाबत संबंधीत दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अमिन पटेल, श्री.धिरज देशमुख, श्री. राजेश एकडे, वि. स. स. | |
| १०६. | "मुंबईतील कांजुरमार्ग येथील डंम्पिंगवर दररोज सुमारे ५ हजार मे. टन कचऱ्याची बायोरिॲक्टर पद्धतीने विल्हेवाट लावली जाणे, या पद्धतीने विल्हेवाट लावल्यामुळे दुर्गधीची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने गेल्या कांही महिन्यांपासून कचऱ्याची असह्य दुर्गंधीमुळे मुलुंड, भांडूप, कांजुरमार्ग, विक्रोळी, घाटकोपर, चेंबुर, कुर्ला या भागातील नागरिक हैराण, होणे, या भागातील दुर्गंधीमुळे चक्कर येणे, श्वास घेण्यास येत असलेले अडथळे, डोकेदुखी, डोळे चुरचुरणे, सुका खोकला, घशाला संसर्ग होत असल्याच्या तक्रारी, यापूर्वी या दुर्गधीचा त्रास मुलुंड, भांडूप, कांजुर, विक्रोळीपर्यंत होती परंतु आता मध्यतंरी काळात हा त्रास घाटकोपर, चेंबुर, कुर्ला, शीव येथील नागरिकांना जाणवत असणे, डम्पिंग ग्राऊंडबाबत स्थानिकांनी सातत्याने तक्रारी, आंदोलने करूनही | श्री. सुनिल राऊत, श्री. मिहीर कोटेचा, श्री. पराग शाह, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रशासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, कांजूरमार्ग क्षेपणभूमी ही जागा पाणथळ जागा असल्याने या जागेचा कुठल्याही प्रकारच्या क्षेपण भूमीकरिता कायद्यांचे उल्लंघन करून होत असलेला वापर, तसेच घन कचऱ्याचे एकत्रिकरण करण्याकरिता कायद्याची परवानगी आवश्यक असतांनाही मुंबई महानगर पालिकेला राज्य पर्यावरण मंडळाकडून देण्यात आलेली बेकायदेशीर मान्यता, सदरहू परिसरातील खाडी आणि ठाणेखाडी परिसर हे स्थलांतरित पक्षांच माहेर घर या ठिकाणी पेन्टेड स्टॉक, बदक इत्यादि पक्षांच निवास आजतागायत लाखो स्थलांतरित पक्षी येथे वास्तव्यास येत असणे, येथील क्षेपण भूमीमुळे स्थलांतरित पक्षांदेखील अन्य ठिकाणी स्थलांतरित होण्याची वेळ, क्षेपण भूमीवरिल कचऱ्यावर कोणतीच प्रक्रिया केली जात नसल्याने परिसरातील नागरिकांना प्रचंड दुर्गंधी युक्त प्रदुभार्वामुळे आरोग्य धोक्यात, बायारि ॲक्टर लॅड फिल हे तंत्रज्ञान मनुष्य वस्तीपासून साधारण १० कि.मी अंतरावर राबविण्यात येते, क्षेपणभूमी मनुष्यवस्ती केवळ २०० मिटरवर आहे त्यामुळे हे तंत्रज्ञान म्हणजे केवळ धुक फेकच, शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, नागरिकांमध्ये शासनाबददल निर्माण झालेली चिडेची व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १०७. | "माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास, मुंबई येथील हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ या हॉटेल व्यवस्थापनाने हॉटेल भूखंडा शेजारील ३,०३६.२७ रिक्रिएशन ग्राऊंडचा उपयोग हॉटेलच्या दोन कुलिंग टॉवरची उभारणी करून बेकायदेशीररित्या करीत असल्याची कबुली विधानसभेत उपस्थित करण्यात आलेल्या एका मुद्याच्या स्पष्टीकरणात उघडकीस येणे, सीटीएस क्र. ३४५४ हा भूखंड मुंबई मनपास अद्यापही हस्तांतरीत न करणे, हॉटेल व्यवस्थापनामार्फत मनोरंजनाचे मैदान म्हणून आरक्षित | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | असलेल्या सुमारे ३० ते ३५ हजार चौ.फूट जागेचा वापर बेकायदेशीररित्या करण्यात येत असून त्यावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन त्यातून दरमहा लाखो रुपयांचे उत्पन्न हॉटेल ग्रँड हयात यांना मिळत असून याकडे मुंबई मनपा प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण करून हॉटेल ग्रँड हयात शासकीय भूखंडाचा गैरवापर करीत असल्याच्या तक्रारी मुंबई मनपा प्रशासन, आयुक्त तसेच प्रधान सचिव, नगरविकास यांचेकडे करूनही मुंबई मनपा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी हॉटेल व्यवस्थापनाशी केलेल्या आर्थिक हात मिळवणीमुळे विधानसभेला खोटी उत्तरे व माहिती सादरकरून लोकप्रतिनिधींची केलेली दिशाभूल व हॉटेल ग्रँड हयात व्यवस्थापनाला गैरकारभार करण्यास केलेले सहकार्य, यामुळे हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ यांना कोट्यवधी रुपयांचा झालेला आर्थिकनफा, याकडे मुंबई मनपा प्रशासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी तक्रारदारांच्या मनात मुंबई मनपा प्रशासनाच्या हेतूबद्दल व अक्षम्य दिरंगाईबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १०८. | "मुंबई, पुणे, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक आणि राज्यातील अन्य मोठ्या शहरात अनधिकृत रुफटॉप हॉटेल्सची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असणे, या हॉटेल्समध्ये विनापरवाना हुक्का पार्लर आणि पब सुरू असून ड्रगचा पुरवठा व सेवन केले जात असणे, अग्निसुरक्षाविषयक उपाययोजनांच्या अभावामुळे जीवितास धोका निर्माण झाला असणे, यापूर्वी हॉटेल आगीच्या घटना मुंबई, पुण्यात घडल्या असणे, महापालिका, अग्निशमन, राज्य उत्पादन शुल्क, आरोग्य विभाग आणि पोलीस दलामधील भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असणे, रात्री उशिरापर्यंत रुफटॉप हॉटेल्समधील आवाज, | श्री. विजय वडेट्टीवार,<br>श्री. सुनिल कांबळे,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | गोंगाट आणि राड्यामुळे सर्वसामान्यांचे जिणे त्रासदायक झाले असणे, अशा हॉटेल्समध्ये गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा वावर वाढला असणे, इमारतीची गच्ची सामुदायिक मालकीची असताना व्यावसायिक कारणासाठी रुफटॉप हॉटेल्सला परवानगी दिली असणे, मुंबई महापालिकेने लोकप्रतिनिधींना डावलून आयुक्तांच्या अधिकारात धोरण तयार केले असणे, यास शासनाची मान्यता नसणे, रुफटॉप हॉटेलबाबत सर्व राज्यासाठी धोरण तयार करावे, सध्याची सर्व रुफटॉप हॉटेल बंद करावीत, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी पत्रान्वये शासनास केली असणे, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी जनतेच्या जीविताचा व कायदा व सुवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १०९. | "कल्याण- डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील डोंबिवली एमआयडीसी येथील विभा कंपनीच्या जागेत महापालिकेतर्फे उभारण्यात आलेले कोव्हीड सेंटर, डोंबिवली औदयोगिक क्षेत्रातील मे.विभा मेचोनो इलेक्ट्रिक इंडिया प्रा.लि या कपंनीला प्लॉट न अे-११८ आणि अे-११९ फेज-१ या वाटप करण्यात आलेल्या भूखंडापैकी महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाला देण्यात आलेल्या जागेवर कोव्हीड सेंटर उभारण्यात येणे, सदरहू कोव्हीड सेंटर उभारण्याकरिता औद्योगिक विकास महामंडळाने परवानगी दिलेली नसतांना कोव्हीड सेंटर उभारण्यात येणे, सदर कोव्हीड सेंटरकरिता एकूण रुपये ६,५६,५९,००९/- ची रक्कम आजमितीपनर्यत अदायगीकरिता प्राप्त होणे,त्यापैकी अदयाप रक्कम रु.४,९२,६७,६२६/- ची देयके प्रलंबित असणे, सदर कोव्हीड सेंटर करिता औदयोगिक विकास महामंडळाची परवानगी नसतांना सदरहू भूखंडावर कोव्हीड सेंटर उभारण्यामागची कारणे काय आहेत याबाबत तसेच याकरिता आलेल खर्च कोणत्या विभागामार्फत करण्यात आलेला आहे याबाबतही सखोल | श्री. रवींद्र धंगेकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | चौकशी होणे गरजेचे असणे, संबंधित विभागाची परवानगी नसतांना बेकायदेशीरपणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या कोव्हीड सेटरची सखोल चौकशी करून यात झालेल्या भ्रष्टाचार व गैरव्यवहाराबाबत शासन स्तरावर सखोल चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ११०. | "नोव्हेंबर, २०२३ च्या शेवटच्या सुमारास मुंबईतील एक उत्तर विभागातील प्लॉट नंबर ८९ (पिटी) या भूखंडावर करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम, संबंधित विकासकाने उक्त भूखंडावर सदगुरु एस.आर.ए. गृहनिर्माण संस्थेचे अनधिकृत बांधकाम करणे, सदर बांधकाम करताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिलेल्या मंजुरी पेक्षा जास्तीचे बांधकाम करून एस.आर.ए.चे नियम व अटी चे पालन न केल्याची बाब तपासात उघडकीस येणे, सदर इमारतीचे बांधकाम सुरू असतानाच झोपु प्राधिकरणाने एक ते दहा मजल्याचे भोगवटा प्रमाणपत्र विकासकाला देणे, मंजूर आराखड्याप्रमाणे इमारतीमध्ये सात लिफ्ट लावणे, आवश्यक असतानाही सदर विकासकाने इमारतीतील रहिवाशांना लिफ्टची सुविधा न देणे, बांधकाम नसताना देखील इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देऊन एस.आर.ए. व म.न.पा., अधिकाऱ्यांनी विकासकाशी केलेल्या आर्थिक हात मिळवणीमूळे या बेकायदेशीर बांधकामाविरोधात नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही एस.आर.ए व म.न.पा.ने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व विकासकाला दिलेल्या सर्व परवानग्या रद्द करण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये एस.आर.ए.कडे केलेली असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांच्या मागणीकडे एस.आर.ए करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे | श्री. निलेश लंके, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींच्या मनात एस.आर.ए. च्या नाकर्तेपणाच्या भूमिकेबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १११. | "मुंबईतील कांजूरमार्ग (प), पवई-चांदिवली येथील सीटीएस नं. ४६/४, साहिल एक्झॉटीका या १२ मजली बांधकाम करण्यात आलेल्या इमारतीमध्ये मे.बॉम्बे कन्स्ट्रियक्शन एण्ड इंजिनिअरींग कंपनीच्या विकासकाने मोठ्या प्रमाणात बांधकामात फेरफार करून अनाधिकृत बांधकामे केल्याचा प्रकार नुकताच दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३ रोजी निदर्शनास येणे, सदरहू मालकाने इमारतीच्या बालकनीचे क्षेत्र सदनिकेच्या क्षेत्रफळात समावेश करणे, मंजूर नकाशानुसार एका मजल्यावर ४ फ्लॅटची परवानगी असताना ६ फ्लॅटचे बांधकाम करून दोन फ्लॅटचे बेकायदा बांधकाम करणे, मंजूर आराखड्यात उद्यानाची निर्मिती करण्याचे नमूद असताना प्रत्यक्षात उद्यान निर्माण न करणे, इमारतीलगत असलेला डोंगर खणून वाहन पार्किंगसाठी बांधकाम करण्यात येणे, इमारतीच्या सभोवताली पालिकेच्या नियमानुसार मोकळी जागा न सोडल्याने आगीची घटना घडल्यास अग्निशमन वाहन आतमध्ये येऊन पूर्णपणे फिरु न शकणे, अशा प्रकारे विकासकाने इमारतीच्या बांधकामात मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकाम, गैरप्रकार व त्रुटी ठेवल्या असतानाही मुंबई महापालिकेच्या इमारत प्रस्ताव विभाग व महापालिकेच्या एल-वार्ड विभाग कार्यालयाने सदरहू इमारतीस पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र बेकायदेशीररित्या निर्गमित केल्याचा उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करून संबंधित विकासक, आर्किटेक्ट व त्यास मदत करणारे पालिका अधिकारी यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ११२. | "मुलुंड आणि भांडुपमध्ये महापालिकेकडून प्रकल्पग्रस्तांसाठी घरे बांधली जात आहेत. या घरांच्या कंत्राटात मोठा आर्थिक घोटाळा झालेला असून मुंबई महापालिकेने प्रकल्पग्रस्तांसाठी कुठे, किती घरे, सदनिका लागणार याचा काहीही अभ्यास केलेला नाही. फक्त विकासकांच्या फायदासाठी प्रत्येक परिमंडळात पाच हजार सदनिका बांधण्याचे पालिका आयुक्तांनी घोषित केले आहे. मुलुंड, भांडुप येथे प्रमोद रांका / चोराडिया यांच्या दोन कंपन्यांना एका किलोमीटर अंतरावर दहा हजार घरे बांधण्यास देऊन या अंतर्गत आयुक्तांनी घोटाळा केला आहे.. यासाठी ५.४ एफएसआय मोफत देण्यात आला असून, पालिकेचे सगळे कर, शुल्क माफ करण्यात आले आहेत, या प्रकल्पात विकासक ३०० चौरस फुटांची सदनिका ११ लाखात बांधणार असून, एका सदनिकेसाठी बाजार भाव, रेडी रेकनर दाराने पालिका ३८ लाख रुपये देणार आहे. पालिकेच्या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून सगळे कर, एफएसआय मोफत दिले आहे, ही बाब दुर्लक्ष केली, मुलूंड पूर्वची सध्याची लोकसंख्या १ लाख आहे, यात ५०,००० लोकांची भर होणार आहे त्यामुळे स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा कमी पडतील, या प्रकल्पामुळे मुलुंड पूर्वेच्या नागरिकांवर दूरगामी परिणाम होणार असून एका किलोमीटर अंतरावर मुलुंडमध्ये दहा हजार सदनिका का, असा प्रश्न उपस्थित करत या भ्रष्ट प्रस्तावाचा पुनर्विचार व्हावा याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. मिहीर कोटेचा,<br>श्री. पराग शाह,<br>वि. स. स. | कित्ता |
| ११३. | "छत्रपती संभाजीनगर झालर क्षेत्रातील २८ गावांसाठी सन २००८ मध्ये १५,१८४ हेक्टर विकासासाठी सिडको प्लॅनींग ॲथॉरिटी नियुक्त करणे, सिडकोची प्लॅनींग ॲथॉरिटी नियुक्ती झाल्यानंतर झालर क्षेत्रातील गावातील बांधकामासाठी पुर्ण पणे विकास शुल्क व बांधकाम निधी जमा करणे, गावांमध्ये १८ वर्षामध्ये पायाभूत सोई-सुविधांसाठी खर्च केलेला नसणे, | श्री. हरिभाऊ बागडे,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सिडकोने २०१४ मध्ये ठराव करून विकास करण्यास सक्षम नसल्याचे सांगणे, झालर क्षेत्राचा विकास आराखडा मधील E.P. चा नकाशा प्रलंबित असणे, प्रारूप आराखडा मंजूर असूनही मार्किंग नसल्याने अनधिकृत वसाहती निर्माण होणे, विकास निधी व बांधकाम शुल्क भरून पाणी, रस्ते, ड्रेनेज, लाइट ची कुठलीही व्यवस्था न झाल्याने नागरिकांची गैरसोय होत असणे, त्या गावातील ग्रामपंचायतींना विकास कामासाठी सिडको कडे जमा झालेला विकास शुल्क निधि ग्रामपंचायत कडे वर्ग करण्याकरिता होत असलेली मागणी व सिडको झालर क्षेत्र प्राधिकरणा (AMRDA) कडे हस्तांतरित करून विकास शुल्क, अतिक्रमण, अभियांत्रिकी विभाग, ड्रेनेज, वित्त व लेखा, अनधिकृत बांधकाम प्रतिबंधक निर्मूलन विभाग, मालमत्ता विभाग सर्व पदे भरून पूर्ण क्षमतेने स्वतंत्र कार्यालय करणेबाबत होत असलेली नागरिकांची आग्रही मागणी असणे, वास्तव्यास असलेल्या नागरिकांमध्ये विकास न झाल्यामुळे निर्माण झालेली अस्वस्थता व असंतोष, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ११४. | "मुंबईतील सांताक्रुझ (पूर्व) महापालिकेच्या एच/पूर्व विभागातील कोलेकल्याण गावात न.भू.क्र.२३६४ ते २३७७ या भूखंडावर डिसी रुल ३३(७) अन्वये पुनर्विकास प्रकल्पात मे.डॉल्फीन डेव्हलपर्स या कंपनीच्या विकासकांने पश्चिम उपनगरे कार्यालयात पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करताना रस्त्याचे बाधित क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत न करता सुमारे १० कोटी रुपये किमतीचा एफ.एस.आय. हडप केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, विकासकाने बनावट ताबा पावती बनवून त्यावर एच/पूर्व विभागाच्या सहाय्यक अभियंता, परिरक्षण यांची खोटी स्वाक्षरी करून सदरहू ताबा पावती प्रस्तावात सादर करणे, विकासकाने | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नियमानुसार बाधित रस्त्याचे ८३.०२ चौ.मी. अधिक ३५ टक्के फंजीबल चटईक्षेत्र मिळून बाजारभावानुसार १० कोटी रुपये किमतीच्या २५०० चौ.फू.क्षेत्र हडप करून गैरव्यवहार करून महापालिकेचे आर्थिक नुकसान करणे, याबाबत मंगला शिंदे, कार्यकारी संपादिका, तत्काल एक्शन राष्ट्रीय हिंदी समाचार पत्र यांनी दिनांक १० मे, २०२३ रोजी सहाय्यक महापालिका आयुक्त, एच/पूर्व विभाग कार्यालय यांना लेखी तक्रार केल्यानंतर सहाय्यक अभियंता, परिरक्षण एच/पूर्व यांनी वरिष्ठा पोलीस निरीक्षक, वाकोला पोलीस ठाणे यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजी तक्रार करूनही अद्याप पोलिसांनी कारवाई न करणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ११५. | "अमरावती जिल्ह्यातील अप्पर वर्धा प्रकल्प सिभोंरा डॅम येथुन अमरावती महानगरपालिका शहरासाठी पाणी पुरवठा करणारी जी पाईप लाईन टाकली असणे, त्या पाईप लाईनची वयोमर्यादा सपुष्टांत येणार असणे, त्यामुळे वारंवार ही पिण्याची पाईप लाईन फुटुन लिकीज होत असणे, ज्यामुळे शहराला होणारी पाणीपुरवठा प्रभावित होत असणे, या संबधाने नवीन पाईप लाईन टाकण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री, पाणीपुरवठा मंत्री यांचेकडे प्रस्ताव नवीन पाईप लाईन टाकण्यासाठी मागणी केली असणे, लोकप्रतिनिधी यांची मागणी विचारात घेऊन उच्चाधिकार कमेटीचे अध्यक्ष मुख्य सचिव यांचे अध्यक्षेतखाली बैठकीमध्ये मान्यता देऊन पुढील कार्यवाही प्रस्ताव पाठविला असणे, नवीन पाईप लाईन टाकण्याचा प्रस्ताव अंदाजे १००० हजार कोटी रुपयाचा असणे, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. रवि राणा, वि. स. स. | कित्ता |
| ११६. | "अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा येथे रोप सस्पेंशन ब्रिज (स्कायवॉक) यासाठी महाराष्ट्र शासनाने सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करणे, | श्री. रवि राणा, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | चिखलदरा नगरपरिषद (३९४ हे.) आणि चिखलदरा नगरपालिकेला लागून असलेली चार गावे परिषद उदा. शाहपूर (५१९ हे.), अलाडोह (१४६ हे.),लवादा (१३१ हे.) आणि मोथा (७४६ हे.). रोप सस्पेंसिन ब्रिज (स्कायवॉक) बांधण्यासाठी कार्यादेश जारी करण्यात आला असणे, दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१९ रोजी कंत्राटदार हे क्षेत्र फॉरेस्ट झोन अंतर्गत येत असल्याने सिडकोने जंगलातून NOC करीता अर्ज केला असून वन्यजीव विभाग आणि खालील परवानग्या मिळाल्या असणे, वन (संरक्षण) अधिनियम १९८० च्या कलम-२ अंतर्गत "तत्त्वतः" मान्यता दिनांक १९ जानेवारी, २०२२ व दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी वन (संरक्षण) अधिनियम १९८० च्या कलम-२ अंतर्गत" अंतिम मान्यता" राज्य वन्यजीव मंडळाकडून (SBWL) दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी परवानगी-नॅशनल बोर्ड ऑफ वाइल्डलाइफ (NBWL) कडून दिनांक १९ मे, २०२३ रोजी परवानगी असणे, कामाची प्रगती ७७.००% काम पूर्ण झाले असणे, दरम्यान, सल्लागार एम. के.सी. पाठक यांनी संबंधित आणखी काही तपास सुचवला असणे, ज्यामध्ये उच्चस्तरीय तांत्रिक समितीने या चाचण्या सुचवल्या असणे या कामी शासनाने लक्ष घालून तातडीने स्कायवॉकचे काम पुर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ११७. | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात गेल्या २५ वर्षापासून बेलापूर ते वाशी पर्यंत लावण्यात आलेल्या एल.ई.डी. डिजिटल बोर्ड (जाहिरात नामफलक) चे करार हे एकाच ठेकेदाराला देण्यात येत असणे, तसेच एकाच ठेकेदाराला हे काम मिळत असणे, सदर ठेकेदाराचे धागेदोरे हे कोणत्या महापालिका अधिकाऱ्याबरोबर असणे, तसेच या एल.ई.डी. डिजिटल बोर्ड (जाहिरात नामफलक) चे निविदा प्रक्रिया होते का याबाबत चौकशी करण्याची आवश्यकता असणे, तसेच एकाच ठेकेदाराला | श्रीमती मंदा म्हात्रे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सदरचे काम मिळत असल्याने उर्वरित ठेकेदारांना काम न मिळाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत असणे, या करिता सदर ठेकेदाराची अहर्ता व कागदपत्रांची पडताळणी करणे, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ११८. | "नागपूर पश्चिम येथील गौरखेडे कॉम्प्लेक्सजवळ रस्त्याच्या बाजूला सुमारे १० मीटर किंवा त्याहून अधिक खोल खड्डा असून नागपूर महानगरपालिकेचे अधिकारी, नागपूर महानगरपालिकेचे दोन ट्रक टिप्पर, मिनी टिप्पर, जेसीबी व मनुष्यबळाच्या सहाय्याने हा खड्डा एक वर्षापासून बांधकाम व पाडाव कचरा, हिरवा कचरा टाकून भरणे, खड्डा असलेली आणि बाजूच्या जमीन दोन बिल्डरच्या मालकीची असणे, हा खड्डा भरावा अशी या दोन बिल्डरची इच्छा असल्याने म्हणून नागपूर महानगरपालिकेचे सार्वजनिक पैसे, यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ वापरण्यात येणे, कचऱ्याला आग लागली आणि नागपूर पश्चिम मध्ये अनेकांना दुर्गंधी, धूर, धोकादायक राख आदींमुळे चार दिवस खूप त्रास सहन करावा लागणे, या घोटाळ्यामुळे जनतेच्या पैशाची उधळपट्टी करण्यात येणे, सेमिनरी हिल्स आणि वायु सेना नगर हे दोन टेकड्यांवर वसलेले असून पावसाचे पाणी सुरळीतपणे जलाशयांमध्ये जाण्यासाठी हा खड्डा महत्त्वाची भूमिका बजावत असतानाही सदर खड्डा भरल्याने पावसाचे पाणी रस्त्यावरून वाहू लागत असल्याने, त्यामुळे पर्यावरण व्यवस्थेतही अडथळा निर्माण होणे, या गंभीर अनियमिततेमुळे यामध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे उघड होत असल्याने याप्रकरणी सखोल चौकशी करूनसंबंधित महानगर पालिका अधिकारी यांच्या विरुद्ध निलंबनाची कारवाई याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. विकास ठाकरे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. सुनिल केदार, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. अस्लम शेख, श्री. शिरीष चौधरी, वि. स. स. | कित्ता |
| ११९. | "ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील सर्वे नंबर ३५/३/२ क्षेत्र | श्री. किसन कथोरे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | ५७.०० हे. आर. ही जमीन खाजगी जमीन मालक श्री रामकृष्ण शंकर जोशी व इतर यांची असणे, परंतू सदर जमिनीवर नगरपरिषदेने अतिक्रमण करून शाळेचे बांधकाम करण्यात येणे याबाबत सन २००९ च्या डिसेंबरमध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक २०९३ उपस्थित केलेला असणे, त्यावेळी नगरपालिकेच्या नावाने सातबारा करण्याची कार्यवाही सुरू असल्याबाबत उत्तर देण्यात येणे, जमीन मालकाने जागा खाली करून देण्याबाबत नोटिसा बजावणे २०१० पासून नगरपरिषदेने शाळेच्या आरक्षणाबाबत एमएमआरडीएकडे प्रस्ताव पाठवणे एमएमआरडीएने जमिनीबाबत २०१९ मध्ये शासनाच्या नगरविकास विभागाकडे मार्गदर्शन मागवण्यात येणे, नगरपरिषदेने तहसीलदार यांच्याकडे जमीन धारकास कोणताही मोबदला न देता सात-बारा उताऱ्यावर नगरपरिषदेच्या नावाची नोंद घेणे बाबत अर्ज करणे परंतु तहसीलदार यांनी नगरपरिषदेची मागणी फेटाळण्यात येणे, नगरपरिषदेच्या शाळेत मोठ्या प्रमाणात विद्यार्थी संख्या असल्याने नगर परिषदेने जागामालक श्री. रामकृष्ण जोशी यांना नोटीस पाठवून नवीन वर्ग खोल्या इमारत बांधकाम करण्यासाठी संमती मागण्यात येणे, टीडीआर किंवा मोबदला न दिल्याने जागा मालक बेचैन होणे, जागेचा प्रश्न प्रलंबित असल्याने शाळेतील हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर टांगती तलवार असणे, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १२०. | "स्थानिक लोप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन समिती यांचेकडे शहरातील दलीत समाजाच्या भागातील विविध विकास करणेसाठी माननीय पालकमंत्री कोल्हापूर यांचे कडे डीपीडीसी मधून दलीत वस्ती योजनेतून सुमारे ६ कोटी रुपयाची मागणी केली असताना अद्याप कोणताही निधी दिलेला नसणे, तसेच जिल्हा नियोजन समितीच्या नगरोथान योजने अंतर्गत सुमारे १४ कोटी रुपयांचा | श्रीमती जयश्री जाधव, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | निधीची मागणी केलेली असताना त्याकडे ही सदर प्रशासनाने पाठ फिरवली असणे, परंतु जिल्हा नियोजन समिती कोल्हापूर यांनी नगरोथान मध्ये केवळ ५० लक्ष येवढाच तुटपुंज्या निधीला मान्यता देण्यात आली असणे, शहरातील दलीत वस्ती योजनेतून सुमारे ७ कोटी निधी असताना विरोधी पक्षातील स्थानिक लोकप्रतिनिधींना मागणी केल्यानंतरही फक्त १ कोटी १४ लक्ष येवढाच तुटपुंजा निधी दिलेला असणे, परंतु दलीत वस्ती व नग्रोथान दोन्ही मिळून सुमारे २६ ते २८ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली असल्याचे धक्कादायक प्रकार उघडकीस आलेला असणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचवलेले कामे नाकारून उपरोक्त निधीच्या कामास कुणाच्या आदेशावरून मान्यता देण्यात आली आहे ? त्यामुळे शासनाने तातडीने सदर DPDC निधी वाटपाच्या कामात झालेला हस्तक्षेप व आर्थिक भ्रष्टाचार याची तात्काळ चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करून सदरचा निधी थांबवावा अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून करण्यात येत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १२१. | "आपल्या विभागामार्फत बीड न.प.ला देण्यात आलेल्या विविध शासन निर्णय व प्रशासकीय मान्यतेच्या आधारे कामनिहाय माहिती घेतली असल्यास असे दिसून येणे की, गत चार ते साडे चार वर्षामध्ये नगरपरिषदेने व तत्सम अधिकारी यांनी बहुतांश कामे दुबार केवळ कागदोपत्री व निकृष्ट दर्जाचे दाखवून सदरील कामावरील देयके निकाली काढलेली असणे, तसेच विविध लेखाशिर्षातील कामामध्ये किंवा त्या कामावरील कालावधी चालू असतांनाच न.प.फंडातून देखिल कामे सुचविलेली असणे, झालेल्या अनियमिततेची, कागदोपत्री कामाची व दुबार कामांची स्तरनिहाय, लेखाशिर्ष निहाय आपल्या कार्यालयाच्यावतीने, गुणवत्ता नियंत्रण कार्यालयाच्यावतीने व बाह्य यंत्रणेच्यामार्फत | श्री. संदिप क्षिरसागर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नियमोचीत तात्काळ चौकशी होणे बाबत आदेशीत होणे, सदरील कामे दुबार दाखविण्यात आलेली असणे, तसेच कागदोपत्री व निकृष्ट दर्जाचे असणे, या बाबतीत अनेक वेळा माझ्याकडे व संबंधित कार्यालयाकडे तक्रारी देखिल झालेल्या असणे, आजपर्यंत संबंधित कार्यालयाने जी टाळाटाळ केलेली असणे, त्याचाच अर्थ असा होत आहे की, संबंधित कार्यालयाने याविषयी अनियमितता केलेली दिसून येणे, याबाबत शासनाने चौकशी करून माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या व अनियमितता करणार्‍या संबंधित मुख्याधिकारी व अन्य अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १२२. | "मिरा-भाईंदर महानगरपालिका येथे माहे फेब्रुवारी, २०२२ पासून कार्यरत असलेले सहाय्यक आयुक्त श्री.सचिन बच्छाव यांची २६.०२.२०२२ रोजी बदली सहाय्यक आयुक्त म्हणून ठाणे येथे करण्यात येणे, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरुन त्यांना कार्यमुक्त करण्यात आल्यानंतरही त्यांनी ते ठाणे महानगरपालिकेत रुजू न होणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग आणि मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे माहे जून, २०२३ मध्ये प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदनाव्दारे तक्रार दाखल केलेली असणे, तद्नंतर श्री.सचिन बच्छाव यांची बदली सहाय्य आयुक्त, गट-ब, नगरपरिषद, संचनालय, नवी मुंबई येथे दि.१२.०७.२०२३ रोजी करण्यात येणे, तथापी ते माहे सप्टेंबर, २०२३ अखेरपर्यंत नवी मुंबई येथेही रुजू न होणे, उपरोक्त सहाय्यक अधिकारी यांची इतरत्र बदली होऊनही ते मिरा-भाईंदर महानगरपालिकेत गेल्या १५ ते १६ महिन्यापासून ठाण मांडूण बसणे, ही बाब गंभीर असून याप्रकरणी तातडीने चौकशी करून शासकीय नियमांचे उल्लंघन करून बदलीच्या ठिकाणी रूजू न होता एकाच ठिकाणी ठाण | श्रीमती गीता जैन, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | मांडून बसणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केलेली असणे, तथापी अद्याप उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही झालेली नसणे, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १२३. | "पुणे जिल्ह्यातील वाघोली गावाचा सुमारे दोन वर्षापूर्वी पुणे महानगर-पालिकेमध्ये समावेश झालेला असून या गावाची लोकसंख्या सुमारे साडेतीन लाख इतकी असणे, वाघोलीतील नागरिकांच्या मुलभूत समस्येबाबत आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांच्या कार्यालयात दिनांक २० सप्टेंबर, २०२३ रोजी बैठक झालेली असणे, या बैठकीमध्ये बकोरी रोड, फुलमळा, आयव्ही इस्टेट रोड वरील हजारो नागरिकांना अरुंद रस्त्यामुळे मनस्ताप सहन करावा लागत असणे, या रोड वरील मालक व व्यावसायिक यांच्यातील वादामुळे रस्त्यांचे रुंदीकरण न झाल्याने नागरिकांची अवस्था दयनीय असणे तसेच जलनि:सारण वाहिनी नसल्याने रस्त्यावर पाणी साचून नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागणे, सदरच्या जागेचे सर्व्हेक्षण करून पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात सदरच्या जागा घेणेबाबतची चर्चा होणे, वाघेश्वर चौक ते बाईफ रोड पर्यंत सेवा मार्ग करण्याची आवश्यकता, सांडपाण्याची व्यवस्थेकरिता विकास आराखडा करून नवीन जलनि:सारण वाहिनी तातडीने टाकण्याची आवश्यकता, यासाठी STP करिता निधीची व घनकचरा प्रकल्प उभारण्याची आवश्यकता असणे, वाघोलीमध्ये सुमारे ४७५ पेक्षा जास्त सोसायट्या असून या सोसायट्यांमधील नागरिकांना रस्ते, जलनि:सारण या सारख्या अडचणींना सामोरे जावे लागणे, त्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | ॲड. अशोक पवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १२४. | "घाटकोपर प. येथील मुंबई भारत सोसायटी, जंगलेश्वर महादेव मंदिर रोड, सुभाष नगर, असल्फा व्हिलेज येथे असलेल्या "मदरसा मस्जिद अरबिया सिराजुल उलुम" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका बेकायदेशीर बांधकाम झालेले असणे,सदर बांधकाम जुलै, २०२०च्या सुमारास कोविड-१९ चा फायदा घेऊन सुरू झालेले असणे, त्यानंतर दिनांक ४ डिसेंबर, २०२० रोजी व त्यासुमारास वरिष्ठ अभियंता, इमारत आणि कारखाना विभाग, एलवॉर्ड, कुर्ला यांना तक्रार पत्र देणे, तरी देखील बेकायदेशीर बांधकामावर कारवाई न होणे, त्यानंतर पुन्हा दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ रोजी सहाय्यक आयुक्त, एलवॉर्ड, कुर्ला यांना पत्र देणे, सहायक आयुक्तांच्या सूचनेनुसार अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून देखील कारवाई करण्यास टाळाटाळ करणे, सदर मज्जित ज्या ठिकाणी आहे तो भूखंड उद्यान म्हणून आरक्षित असणे, याबाबत सर्व पुरावे महानगरपालिकेचे असतांना देखील श्री.नितिन कांबळे तत्कालीन (पदयुक्त अधिकारी,बी अँड एफ,एलवॉर्ड), श्री रामेश्वर वाकडे (एई,बी अँड एफ,एल वॉर्ड), श्री.शिल्पेश दिनकर वाघमोडे (जेई,बी अँड एफ,एल वॉर्ड,कुर्ला), श्री दत्ता (मुकादम,बी अँड एफ,एल वॉर्ड,कुर्ला) यांनी कारवाई न करणे, तसेच सदर बांधकाम चालू ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैशांची देवाणघेवाण झालेली असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे असणे, तसेच सदर अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकाम करण्यासाठी तोंडी परवानगी देऊन बांधकाम चालू ठेवणे, तसेच सदर अधिकाऱ्यांच्या आणि त्यांचा नातेवाइकांचा संपत्तीमध्ये वाढ होण्याची बाब निदर्शनास येणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक यांच्याकडून उच्चस्थरिय चौकशीची मागणी होत असणे, सदर अनधिकृत बांधकामावर कारवाही करू असे आयुक्तांनी सांगितल्यानंतर देखील अद्याप कारवाई झालेली नसणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी देखील | श्री. नितेश राणे,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कोणतीही दखल न घेता उलटी कारवाई करण्याची धमकी देणे, याप्रकरणी स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण होणे, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १२५. | "धुळे महानगरपालिका हद्दीत येणाऱ्या बालमंदिर, प्राथमिक, माध्यमिक शाळा, कॉलेजस, महाविद्यालये, वसतिगृह यांना धुळे महानगरपालिकेने प्रचंड मालमत्ता कर लावलेला असणे, राज्यातील खाजगी संस्थांना मालमत्ता कररात सूट देण्यात आल्याचे तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री यांनी निर्देश दिलेले असणे, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३२ अन्वये सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठी भोगवटा असलेल्या इमारतींना करमाफी देणे बाबतची नोंदही असणे, तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे कडील दाखल अपील २०३ / २००८ तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्याकडे दाखल केलेले अपील २०२ / २०१२ चा निकालात शैक्षणिक संस्थांना कर्जमाफी देण्याचे स्पष्ट आदेश असणे, तसेच धुळे महानगरपालिकेत हद्दवाढ झाल्यानंतर धुळे तालुक्यातील ११ गावे समाविष्ट झालेली असणे, सदर गावांमधील बहुसंख्य नागरिक हे शेतकरी असून त्यांचा जोडधंदा हा दुग्धव्यवसाय असणे, या शेतकऱ्यांच्या गुरांचा गोठ्यांना धुळे महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कराची अन्यायकारक व बेकायदेशीर आकारणी करण्यात आलेली असणे, तरी सदर संस्थांना व शेतकऱ्यांना करमाफी मिळणे गरजेचे असणे, तसेच शासनाचे परिपत्रकही असणे, परंतु धुळे महानगरपालिका प्रचंड कर लादत असल्याने सदर संस्थाचालक व शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, शासनाने सरसकट करमाफी देण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. कुणाल पाटील , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १२६. | "नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिका आयुक्त व निविदा समिती प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व इंडो इंजिनिअरिंग प्रोजेक्ट कार्पोरेशन नागपूर या सर्वांनी नियोजनबद्ध व प्रकल्प रकमेपेक्षा जास्त रक्कमेची निविदा मंजूर केल्याने मालेगाव महानगरपालिकेला प्रथमदर्शनी सुमारे ११० कोटीचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास येणे, या निविदेत पात्र ठरविण्यात आलेले इंडो इंजिनिअरिंग प्रोजेक्ट्स नागपूर यांनी निविदेमध्ये पात्र होणेसाठी इम्फाल माणिपूर महानगरपालिकेचे सादर केलेले वर्क इन हॅन्ड वर्क कम्प्लिशन सर्टिफिकेट आमचे नसल्याचे त्यांनीच आयुक्त म.न.पा मालेगावला लेखी पत्राद्वारे प्रमाणित करून दिले असणे, संबंधित ठेकेदाराने मालेगाव महानगरपालिकेची फसवणूक केली याला जबाबदार सर्व घटकावर एसीबी मार्फत चौकशी करून संबंधितांविरुद्ध फसवणुकीचे गुन्हे दाखल करावे अशी स्थानिकांची मागणी असणे, इंडो इंजीनियरिंग कंपनी राज्यांमध्ये जेथेजेथे कामे सरू आहेत त्या सर्व कामांची चौकशी होणे याबाबत मा प्रधान सचिव, नगर विकास विभाग २ लेखी स्वरूपात तक्रारी देणे. परंतु याबाबत कोणतेही कारवाई न करणे, माजी नगरसेवकांनी १३ तारखेला केलेल्या तक्रारीनुसार टेंडर प्रोसेस बनावट प्रकरणी आयुक्त मनपा व टेंडर कमिटी व पीएमसी यांनी संगनमत केलेल्या या टेंडर प्रकरणाच्या भ्रष्टाचार प्रकरणी आयुक्त व निविदा समितीच्या व पीएमसी समितीच्या सदस्यांवर कठोर कारवाई, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. देवेंद्र भुयार, वि. स. स. | कित्ता |
| १२७. | "नाशिक जिल्ह्यातील आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य शासनाकडून विकास कामासाठी निधीची मागणी केली जात असतानाच २०१५ मध्ये पार पडलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी शासनाने महापालिकेला दिलेल्या हजारो कोटी रुपयांच्या खर्चाचे ऑडीट झाले नसल्याची बाब जुलै, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात व | श्रीमती सीमा हिरे, ॲड. राहुल ढिकले, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | त्यासुमारास निदर्शनास येणे, सन २०१५ व १६ मध्ये नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा झाला त्यासाठी राज्य शासनाने जवळपास २३७८ कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्राला सादर केला, राज्य सरकारने नाशिक महानगरपालिकेला १०५२.६१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणे, राज्य शासनाच्या अखत्यारीतील विविध विभागांना देखील निधी मंजूर करण्यात येणे, शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला ६६० कोटी रुपये तर जलसंपदा विभागाला १६९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणे, जिल्हाधिकारी कार्यालयासाठी ९८ कोटी रुपये तर नाशिक ग्रामीण व शहर पोलिसांसाठी ९३ कोटी रुपयांचा निधी मंजूर होणे, प्राप्त झालेल्या निधीतून कामाचे तसेच निधीचे लेखापरीक्षणच झाले नसल्याची गंभीर बाब समोर येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १२८. | "मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरामध्ये शासनाची अनेक विकास कामे सुरू असणे, त्यामध्ये एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणामार्फत सुर्या धरण पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलवाहिन्या अंथरणे, ४५ मिटर रूंद रस्त्यावर मेट्रोचे काम, काहीठिकाणी उद्यानासाठी, खेळाच्या मैदानासाठी तर काही ठिकाणी तरण तलाव व इतर विकास कामे प्रस्तावित असणे, या कामाकरिता आरक्षित किंवा सुविधा भुखंडांचावापर करण्यात येत असणे, खाजगी जागामालकी असलेल्या मे.सेव्हन इलेव्हन हॉटेल प्रा.लि. या कंपनीच्या आडमुठे धोरणामुळे व राजकियहस्तक्षेप व गुंडगिरीचा वापर करून आरक्षित भुखंड ताब्यात न देता शासकिय विकास कामे अडविण्यात आलेली असल्याचे निदर्शनास येणे, सुर्या धरण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत जलवाहिन्या टाकण्यासाठी जागा मालकाच्या संमतीने रस्ता वापरण्यात येत असतांनाही सदरहू कंपनीने रस्ता बंदकेल्याने जलवाहिन्या अंथरण्याचे काम थांबविण्यात | श्री. प्रताप सरनाईक, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | येणे, मेट्रो-९ च्या कामांतर्गत काशिगाव येथे ४५ मिटर रस्त्यावर मेट्रो स्टेशनसाठी भुसंपादनाद्वारे जागा प्रशासनाच्या ताब्यात देण्याकरिता जमीन मालक म्हणून उपरोक्त कंपनीने महानगरपालिकेच्या ताब्यात जमीन दिलेली असणे, तसेच आरक्षण क्र. २४६, २४३ २३३, २७५ चा अनधिकृतरित्या वाणिज्याकरिता उपयोग करण्यात येणे, त्याच प्रमाणे विकास योजनेतील शाळा क्र. ३२८ व २५२ या जागा खाजगी संस्था चालकांना सत्तेचा दुरूपयोग करून बेकायदेशीररित्या नाममात्र दराने देण्यात येणे, शासनाने तातडीने उक्त प्रकरणी चौकशी करून शासकिय कामामध्ये आडकाठी आणणाऱ्या उपरोक्त विकासक कंपन्यावर व संबंधितांवर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १२९. | "नाशिक महानगरपालिका अंतर्गत रस्ते स्वच्छता करण्यासाठी व पेस्ट कंट्रोल करण्यासाठी ठेका देण्यात येणे, या ठेकेदाराचे काम अत्यंत समाधानकारक असणे, लोक प्रतिनिधी व नागरिकांनी याबाबत मोठ्या प्रमाणावर नाशिक महानगरपालिकेला तक्रार केलेली असणे, असे असताना देखील सदर ठेकेदारांना मुदतवाढ देण्यात येणे, सदर ठेकेदारांकडून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबत मोठ्या प्रमाणावर लूट केली जाणे, कर्मचाऱ्यांना किमान वेतन देणे आवश्यक असताना देखील सदर वेतन न देता कर्मचाऱ्यांच्या खात्यातून परस्पर रक्कम काढून घेणे, अनेक कर्मचाऱ्यांच्या खात्यातून एकाच वेळी सारख्या स्वरूपाची रक्कम काढून घेणे, पेस्ट कंट्रोल ठेकेदाराकडून योग्य प्रकाराने काम होत नसल्यामुळे शहरात डेंगू सारखी लाट निर्माण होणे, डेंगू मुळे नागरिकांचा मृत्यू होत असताना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून मात्र डेंगू बाबतची खरी आकडेवारी लपवण्यात येणे, महानगरपालिकेत अधिकारी व ठेकेदार यांच्यात संगणमत झाल्यामुळे महानगरपालिकेची होत असणारी मोठी लूट, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती देवयानी फरांदे,श्री. नितीन पवार , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३०. | "पुणे, खडकवासला विधानसभा मतदारसंघात वाहतुकीची समस्या गंभीर असणे, स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्ग जलद गतीने सुरू करणे व त्यासाठी बालाजीनगर येथे स्थानक निर्माण करणे, खडकवासला ते खराडी या पुणे मेट्रो मार्गिकेचा डीपीआर तयार होत असताना या मार्गाचे शेवटचे स्थानक खडकवासला धरण पर्यंत वाढवणे, पौड फाटा ते माणिकबाग या मेट्रोच्या नव्या मार्गांच्या सर्वंकष प्रकल्प डीपीआर, भूसंपादनासाठी मंजुरी मिळाली असणे, हा प्रस्तावात कोथरूड, कर्वेनगर, वारजे आणि सिंहगड रस्ता भाग मेट्रोने जोडला जाणार असल्याने या मार्गातील वारजे ते पुढे प्रवाश्यांची संख्या व भागाची लोकसंख्या पाहता हा मार्ग शिवणे, उत्तमनगर, कोंढवे-धावडे, कोपरे पर्यन्त वाढवून तेथे नवीन स्थानक करण्याची आवश्यकता असणे, पालिकेत समाविष्ट झालेल्या गावातील मुख्य रस्त्यांची दुर्दशा झाली असणे, डीपी रस्ते ताब्यात घेण्यात आले नसणे, अनेक डीपी रस्ते अतिक्रमनांनी बाधित झाले असणे, शहरातील पर्यायी रस्त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष होत असणे, ताब्यात आलेल्या, ताब्यात येऊन सुद्धा विकसित झाले नसलेल्या रस्त्यांची माहिती वेळेत मिळत नसणे, डीपी चे रस्ते पूर्ण क्षमतेने विकसित करण्यास पथ विभागास अपयश आले असणे, सह पुणे-सातारा रस्त्यावरील फसलेला बिआरटी प्रकल्प, सनसिटी रोड ते ३० मी. रुंद मुठा नदीवरचा पूल मधील त्रुटी याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. भिमराव तापकीर, वि. स. स. | कित्ता |
| १३१. | "मुंबईतील गोरेगांव (पूर्व), ऑबेरॉय मॉल समोरील शाम वाडी येथील न.भू.क्र.१०८, मौजे दिंडोशी येथील राखीव भूखंडावर मुंबई पोलीस आयुक्त परिमंडळ १२ कार्यालय व दिंडोशी पोलीस ठाणेचे बांधकाम करण्याकरिता सदरहू भूखंड महसूल विभागाने गृह विभागास हस्तांतरीत करूनही अद्याप यावर शासनाने यापुढील | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी गृह विभागास हस्तांतरीत झालेल्या भूखंडावर मुंबई पोलीस उपायुक्त परिमंडळ-१२ व दिंडोशी पोलीस ठाण्याचे बांधकामासाठी आवश्यक निधी मंजूर करून सदरहू बांधकाम तातडीने सुरू करण्याच्यादृष्टीने याबाबत शासनाकडे पत्र व्यवहार व पाठपुरावा करूनही अद्याप त्याची शासनाकडून दखल घेण्यात न येणे, यामुळे सद्य:स्थितीत दहिसर येथे असलेले पोलीस उपायुक्त कार्यालय परिमंडळ १२ येथे प्रशासकीय कामे करण्यासाठी तसेच दिंडोशी पोलीस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांची तक्रारीसंबंधींची कामे करण्यासाठी अपुऱ्या जागेमुळे होत असलेली गैरसोय अद्यापही कायम असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १३२. | "मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून, बृहनमुंबई महानगरपालिका महत्त्वपूर्ण असे विकासाचे व पायाभूत सुविधांचे प्रकल्प राबवित असणे, प्रकल्प राबवताना महापालिकेतील अभियंता संवर्ग या सर्व कामांचा कणा असणे, या संवर्गातील कनिष्ठ, दुय्यम, सहाय्यक, कार्यकारी, उप प्रमुख, व प्रमुख अभियंता अशी रचना असणे, मागील काही काळापासून या सर्व पदांवरील पदोन्नतीचे कामे रखडलेली असणे, यातील सर्वात महत्त्वाचा घटक असलेल्या कार्यकारी अभियंता या पदासाठी सहाय्यक अभियंता संवर्गातील अभियंत्यांच्या पदोन्नतीने कार्यकारी अभियंता श्रेणीत समावेश होणे अपेक्षित असणे, सद्य:स्थितीत -कार्यकारी अभियंता॰ संवर्गातील स्थापत्य अभियंता व विद्युत व यांत्रिकी अभियंते असे मिळून सुमारे १०० हून अधिक पदे ४०% इतकी पदे रिक्त असणे, सदर रिक्त पदे भरण्यासाठी महापालिकेतर्फे अंतिम सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध होऊन सुद्धा गेल्या सहा ते आठ महिन्यात यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, सदर बाब गंभीर | श्री. अमित साटम, श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | असून ‘कार्यकारी अभियंता’ हे महत्वपूर्ण पद रिक्त राहिल्याने एकंदर मुंबई शहरातील विकासाच्या व पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांच्या कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच प्रशासनिक गतिमानतेवर याचा विपरीत परिणाम होऊ नये याकरिता महापालिकेतर्फे कार्यकारी अभियंतांची पदे लवकरात लवकर भरण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १३३. | "राज्याच्या काही कायद्यांमुळे सरसकट आदिवासी बांधवांच्या जमिनी हस्तांतरण प्रक्रियेवर असणारी बंधने, केंद्र शासनाच्या २० वर्षांपूर्वीच्या धोरणानुसार विविध ठिकाणी संरक्षित झालेल्या संवेदनशील पर्यावरण क्षेत्रातील बहुतांशी जमिनी आदिवासी बांधवांचा असणे, वर्षानुवर्ष आदिवासीचे अर्थकारण जल, जंगल, जमीन यापर्यंतच मर्यादित राहणे, पारंपरिक रोजगाराच्या साधनातून अन्य समाजासारखा विकास न होणे, राज्यातील संवेदनशील पर्यावरणीय क्षेत्राची आणखी बहुतांशी एकाच मापदंडावर झालेली असणे, मोठ्या प्रमाणात बफर झोन ठेवणे, सद्य:स्थितीत राज्यातील मुंबई, पुणे विकसित व मोठ्या प्रमाणात लोकसंख्येची घनता असलेल्या शहरांलगत संवेदनशील पर्यावरणीय भागात नागरिकरणाची गुणवत्ता असून देखील या कायद्याचे निर्बंध आणि कठोरत्म नियम यामुळे विकासास होत असलेला प्रतिबंध, तसेच शहरातील प्रचंड लोकसंख्येच्या घनतेमुळे पर्यावरणावर होणारे विपरीत परिणाम, २० वर्षांत लोकसंख्या व तत्सम बाबीची नैसर्गिकरित्या झालेली वाढ विचारात घेऊन किमान या बफर झोनमध्ये संवेदनशील पर्यावर्णीय क्षेत्रास बाधा न आणता मर्यादित प्रमाणात सामान्य नागरिक विकासास परवानगी देण्याची निर्माण झालेली आवश्यकता, सातत्याने आदिवासी बांधवांकडून शासनाकडे होत असलेली आग्रहाची मागणी, केंद्र शासनाने दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी संवेदनशील पर्यावरणीय क्षेत्रात मर्यादित प्रमाणात बदल करण्याबाबतचे अधिकार राज्य | श्री. शांताराम मोरे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | शासनास प्रदान केलेले असणे, यामुळे नागरिकांसाठी मर्यादित प्रमाणात शिथिलता देऊन आदिवासी बांधवांवरील अन्याय दूर करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १३४. | "ठाणे जिल्ह्यातील कळवा येथील एन. एम. एम. कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या गृहनिर्माण संस्थेची पुनर्बांधणी करार करून अशा बिल्डर यांनी हा प्रकल्प राबवताना शासनाचे तसेच महानगरपालिका व रेरा कायद्याचे उल्लंघन केल्याचा प्रकार निदर्शनास येणे, त्यामुळे त्या सोसायटीतील मूळ रहिवासी यांचे भविष्य व भवितव्य धोक्यात येणे, सदर सोसायटीच्या लगत जय त्रिमूर्ती सोसायटी असून सदर दोन संस्थांमध्ये जमिनीबाबत वाद असल्याने एन. एम. एम. सोसायटी व पुनर्बांधणी करणाऱ्या आशर बिल्डर या दोघांमध्ये झालेल्या करारात वाद दिसून येणे, रेल्वेची जमीन अधिकृत न करता त्यावर ठाणे मनपा सार्वजनिक वापरासाठी रस्ता बांधून याबाबत रेल्वे मंत्रालयाने चौकशीची मागणी करणे, सदरचा प्रकल्प हा बेकायदेशीर उभा केल्यामुळे हा प्रकल्प अडचणी सापडल्याने रहिवाशांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून करावयाची संबंधित विकासावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. नानाभाऊ पटोले , वि. स. स. | कित्ता |
| १३५. | "मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी एन. के. पाटील यांच्या विरोधात स्थानिक नागरिक, नगरपालिकेतील कर्मचारी व अनेक सामाजिक संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी असंख्य तक्रारी शासनाकडे दाखल केलेल्या असणे, सदर मुख्याधिकारी आपल्या कर्तव्यात उदासीन असल्याने परिणामी शहरामधील आरोग्य, पाणी, स्वच्छता यांसह इतर नागरी मुलभूत सुविधांचा प्रश्न उपस्थित झालेला असणे, शहरातील विकासकामांबाबत अनेकदा लोकप्रतिनिधी | श्री. सुनिल शेळके , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | म्हणून सुचना करूनही सदर गंभीर विषयांबाबत श्री.पाटील यांच्याकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ होत असणे, नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांसोबत श्री.पाटील अर्वाच्य भाषेत बोलत असून अनेक महिला कर्मचाऱ्यांसोबत असभ्यपणे लज्जास्पद अशी वर्तणूक करत असल्याचे देखील निदर्शनास येणे, कर्मचाऱ्यांचा भविष्यनिर्वाह निधी तसेच राज्य कर्मचारी विमा योजनेची रक्कम न भरता घनकचरा व्यवस्थापनेची बिले मात्र तत्परतेने अदा करून एक प्रकारे कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळत असल्याच्या तक्रारी शासनाकडे दाखल असणे, कित्येकदा कार्यालयीन वेळेमध्ये श्री.पाटील हे त्यांच्या निवासस्थानी थांबत असणे. वरीलविषयांबाबत स्थानिक पत्रकारांनी वृत्त प्रसारित केले असता त्यांच्याशी अशोभनीय वर्तन करणे. अश्या भ्रष्ट, उदासीन व कर्तव्यात कसूर करण्याऱ्या तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यावर शासनाने कठोर कारवाई करून त्याचे कायमस्वरूपी निलंबन व्हावे अशी स्थानिक नागरिकांकडून होत असलेलेली तीव्र मागणी. परंतु सदर मागणीकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष. सदर विषयाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १३६. | "मुंबई महानगरपालिकेच्या पी उत्तर, मालाड (प) विभागात प्रभारी वसाहत अधिकारी नेहा दुबे यांनी माहे फेब्रवारी, २०२३ मध्ये कार्यभार स्विकारताच वळणई परिवर्तन एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, न.भू.क्र.१ पे २ और्लेम मालाड (प.) या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे मे.मकसूद राणा व निमेश देसाई विकासक सिध्दार्थ इंटरप्रायजेस यांच्याशी संगनमत करून दर्पणा राणे यांची दुबे यांच्या पालिकेच्या कार्यालयात झोपु व इतर पालिकेच्या कामासाठी नियमबाह्य नियुक्ती करणे,ही नियुक्ती महापालिकेच्या प्रचलित नियमांचे उल्लंघन करून करण्यात आली असून तीचे वेतन नेमके कोणामार्फत देण्यात येते याबाबत | श्री. संतोष बांगर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | स्पष्टता नसणे, पालिकेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपु प्राधिकरणी, वांद्रे, मुंबई यांना पुरवणी परिशिष्ठ-२ ची पात्रता यादी दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी पाठविण्यात येणे, सदर यादीमध्ये शासन निर्णय १६ मे, २०१५ ब व दिनांक १६ मे, २०१८ नुसार २० झोपडीधारक पात्र ठरविण्यात येणे, त्यापैकी अनेक झोपडीधारकांनी पालिकेकडे अर्ज न करताही प्रभारी वसाहत अधिकारी यांनी झोपडीधारक व विकासक यांची पडताळणी न करता यादी एसआरएला पाठवणे, विकासक सुधारित परिशिष्ठ-२ ची यादी व सुधारीत टेबल सर्व्हे नकाशा पालिकेला दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी पुरवणी यादी देऊनही पालिकेने एसआरएला पाठविण्यास सहा महिन्यांचा विलंब करणे, पात्र झोपडीधारकांना घरे मिळण्यापासून प्रस्तावात त्रृटी ठेवून एसआरएला पाठविण्यात येणे, जाणीवपुर्वक वंचित ठेवण्याचा वसाहत अधीकारी यांचा कुटील डाव असणे, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १३७. | "पिंपरी-चिंचवड महापालिकेने स्मार्ट सिटी व सीसीटिव्ही प्रकल्प-१ या अंतर्गत शहरामध्ये साधारणतः ६००० कॅमेरे लावण्यात येणे, सदर यंत्रणा उभारणेसाठी साधारणतः रुपये ५०० कोटी खर्च करण्यात येणे, परिणामी एवढा प्रचंड खर्च करून देखील यंत्रणा उभारल्यापासुन आजतागायत फक्त १००० पेक्षा कमी कॅमेरे सुरू असणे, अद्यापपर्यंत संपुर्ण सीसीटिव्ही यंत्रणा चालु झाली नसताना सदर ठेकेदारांना १००% रक्कम महापालिकेकडून अदा करण्यात येणे, सदर यंत्रणेतील महत्त्वाचे साहित्य कॅमेरे, सर्व्हर, डेटा स्टोरेज इत्यादी युरोप, अमेरीका येथील कंपन्यात उत्पादित असण्याची अट असताना ते इतर मागासलेल्या देशातील निकृष्ट दर्जाचे साहित्य मागवून ते साहित्य सीसीटीव्ही प्रकल्पासाठी संबंधित ठेकेदाराकडून वापरण्यात येणे, एचपी कंपनीचा सर्व्हर, डेटा स्टोरेज इ. अमेरीका येथील | श्री. महेश लांडगे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | उत्पादित कंपन्यातील पुरविणे आवश्यक असताना त्यानी मागासलेल्या देशातील उत्पादित कंपन्याचे साहित्य मागवून ते वापरण्यात येणे, यामुळे मनपाचे तांत्रीक व आर्थिक नुकसान करण्याचा जाणूनबुजुन झालेला प्रयत्न, या अनुषंगाने संबंधित ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट कामाची चौकशी होऊन ठेकेदाराकडून काम करताना झालेल्या फसवणूकीची चौकशी करण्याची आवश्यकता व दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यावर कठोर कारवाई याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १३८. | "भिवंडी महानगरपालिका हद्दीमध्ये अंजूर फाटा ते कल्याण रोड स्थित सिमेंटचे रोड बनवून तयार असतांना एमएमआरडीए मेट्रो-५ कासार वडवली-कल्याण-वाया भिवंडीच्या कामासाठी त्या ठिकाणी मध्य भागातून १५ फुटरस्ता व्यापुन बॅरीकेट लावण्यात येणे, या बॅरीकेटमुळे रस्ता अरुंद झाला असून तेथून मोठमोठे डंपर ट्रक ट्रॉली वाहन जात असल्याडमुळे संपुर्ण रस्ता खड्डेमय होऊन नादुरुस्त झाला याची जबाबदारी मेट्रो - ५ चे ठेकेदार ॲफकॉन कंपनी यांनी जबाबदारी घेणे, याबाबत वेळोवेळी आयुक्त एमएमआरडीए यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ व मुख्यमंत्री मंत्रालय यांना दिनांक १४ जूलै, २०२२ रोजी तक्रार प्राप्त असूनही संबंधित विभागाकडून एमएमएआरडीएचे ठेकेदार ॲफकॉन कंपनी विरुद्ध कारवाई न करता कल्याणपर्यंत प्रकल्प न करता ८०० कोटीरुपयांचे बिलेअदा करण्यात येणे, नादुरुस्त रस्त्यांना संपुर्णपणे जबाबदार ॲफकॉन कंपनी व एमएमआरडीए असुन या नादुरुस्त रस्त्यांचे सिसि करण्यासाठी महानगरपालिकेकडे अडीच कोटी रुपये पर्यंतचे निधी उपलब्ध नसून याची संपूर्ण सर्वस्वी जबाबदारी एमएमआरडीए व ॲफकॉन कंपनी यांची आहे मेट्रो-५ चि निविदा ही ८९८ कोटीची असुन या प्रकल्पात रोडरस्त्यांचे नुकसान होणाऱ्या सिसि रोडच्या देखभाल व दुरुस्तीसह हि निविदा ॲफकॉन कंपनीला | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | एमएमआरडीएच्या माध्यमातून देण्यात येणे, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ३ कोटी रुपये खर्च येणार असून एमएमआरडीएनी ॲफकॉन कंपनीच्या बिलाच्या रक्कमेतुन ३ कोटी रुपयांची रक्कम कापुन या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी भिवंडी महापालिकेला अदा करण्याची आवश्याकता, सदर मेट्रो-५ च्या प्रकल्पात नादुरुस्त झालेल्या रस्त्यांची सिसिरोडनुसार दुरुस्त होण्यासाठी तात्काळ ॲफकॉन कंपनीच्या बिलातून ३ कोटी रुपये वगळून एमएमआडीएने भिवंडी महानगरपालिकेला देण्याकरिता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १३९. | "भिवंडी एमएमआरडीए हद्दीतील मौजे-राहनाळ व काल्हेर गाव याठिकाणी एमएमआरडीए कडुन अनियमित परवानग्या देण्यात आलेले असुन मौजे-राहनाळ येथील सर्व्हे क्रं. १३१ मध्ये एकाच सातबाऱ्यावरती दोन परवानग्या दिलेल्या असणे, सदर जागेची मिळकत रोडसाठी सोडून ०.२ प्रमाणे एफएसआय मंजुर करून संपुर्ण सातबाऱ्याचे चटईक्षेत्र हरिधारा कॉम्प्लेक्समध्ये वापरण्यात येणे, परंतु भिवंडी महापालिकेच्या प्रस्तावित रिंगरोडसाठी सोडण्यात आलेली जागेवर पुनःश्च एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार करून नव्याने रोडसाठी सोडण्यात आलेल्या जागेमध्ये अनाधिकृतरीत्या परवानगी देऊन इमारत बांधण्यांत येणे,पदाचा गैरवापर करून संबंधित अधिकाऱ्यांनी अनाधिकृतरित्या बनावट पध्दतीने परवानगी दिल्याने संबंधित अधिकाऱ्यांवरती गुन्हा दाखल होणेकामी भिवंडी महानगरपालिकेने व स्थानिक नागरीकांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी व दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री यांना तक्रार देण्यात येणे, सदर तक्रारीच्याक अनुषंगाने सदर अधिकाऱ्यांना तात्काळ निष्कासीत करण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १४०. | "भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनपा शाळेचे इमारती, रस्ते व सार्वजनिक शौचालयांची पुनर्बांधणी महाप्रीतमार्फत करून मिळणेसाठी महापालिकेने कित्येक वर्ष शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणे, महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) यांनी १०० कोटीच्या वर निधी मंजुर केल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी हे प्रकरण दाबुन ठेवणे, भिवंडी महानगरपालिकेला घरपट्टी पाणीपट्टी खेरीज कोणतेही उत्पन्न नसून सुद्धा त्यांच्या मागण्या पूर्ण करित नसणे, परंतु महाप्रितचा निधी हा भिवंडी महापालिकेचा हक्काचा निधी असुन तो त्यांना मिळण्यासाठी शासन दरबारी अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, महाप्रितच्या माध्यमातून भिवंडी महापालिकेचे मंजुर झालेले १०० कोटीचा वरचा निधी तात्काळ मंजुर करून उर्जा विभाग, नगरविकास विभाग यांनी उपाययोजना कराव्यात, शासनाने तात्काळ भिवंडी महापालिकेला निधी मंजुर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |
| १४१. | "भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीत धामणकर नाका ते ताडाली रेल्वे फाटक सिमेंट रस्ता जुना वार्ड क्रं. १८ व नविन वार्ड क्रं. २२ या वार्डामधील पायाभूत सुविधांसाठी शासनाने आजतागायत भिवंडी महापालिकेला कुठलाही निधी मंजुर न होणे, भिवंडी महापालिकेकडुन १०० डाईंग प्रोसेसींग व लाखो पॉवरलूम लघुद्योग उद्योगांकडुन केंद्र शासनाला व महाराष्ट्र शासनाला मोठ्या प्रमाणावर इंकम टॅक्स, वॅट सर्व्हिस टॅक्स, जीएसटी सेल टॅक्स, सेंट्रल एक्साईज स्टॅम्प ड्युटी, बिनशेती कर आकारणी, शिक्षण कर, स्ट्रेट एक्साईज माध्यमातून ५०० कोटी रुपये आतापर्यंत महसुल संबंधित प्राधिकरणांनी फक्त एकाचवार्डातुनच जमा केले असणे, शासनाने तात्काळ याची गंभीर दखल घेण्यासाठी व पायाभूत सुविधांना मोठ्या प्रमाणावर निधी | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | मंजुर करण्यासाठी दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी प्रधानसचिव, नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, कामगार विभाग, उद्योग विभाग, वस्त्रोद्योग विभाग व गलिच्छ वस्ती विभाग यांना निवेदन सादर करण्या त येणे, सदर निवेदनावर कोणतीच कारवाई झालेली नसणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही." | | |
| १४२. | "भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीत टोरेंट पॉवर कंपनी लि. यांचे २००७ ते २०२३ पर्यंतचे थकबाकी वसुलीबाबत महानगरपालिकेने विजवितरण व्यवस्थेतील पायाभूत उपकरणे ज्या जागेवर आहेत त्या जागेवरील भुईभाडे व मालमत्ता करापोटी दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजी ३८५ कोटी महावितरणाच्या फ्रेंचायसी कंपनी टोरेंट पॉवरला भरण्याचे आदेशीत केले होते तसे न भरल्यास त्यांची जंगम मालमत्ता रद्द करण्याची नोटीस काढली असता तात्कालीन शासनाने परिपत्रक काढुन नोटीस रद्द करण्यात आली असणे, वास्तविक परिपत्रकाच्या आदेशात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि-ड प्रकरण-८ कराधन नियम ४२ च्या तरतुदीनुसार जंगम/स्थावर मालमत्तेची अटकावनी करु नये म्हणुन जप्तीची नोटीस रद्द करण्यासाठी परीपत्रक काढण्यात येणे, महापालिकेने दिनांक २७ मे, २०१९ रोजी टोरेंट पॉवरला दिलेली माफीचें परीपत्रक तुर्त रद्द करून भुईभाडे व मालमत्ता करापोटी थकबाकी तात्काळ वसुलीचे आदेश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |
| १४३. | "भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका २०२३ पुढील २० वर्षासाठी मसुदा विकास आराखडा तयार करण्यात येणे,भिवंडी महानगरपालिकेतील एकूण १३ गावांचे गुगल संकेतस्थळावरुन पाहणी करून विकास आराखडा बनवताना मोठ्या प्रमाणावर आरक्षणे टाकल्यामुळे भिवंडीतील जनतेमध्ये असंतोष निर्माण होणे, ५०००च्या वरती हरकती/सुचना महानगरपालिकेकडे | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | टपालामार्फत देण्यात येणे, त्यांचा मनमानी कारभार कायम ठेवल्यामुळे दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ रोजी सदर विकास आरखडा रद्द करणेसाठी मा मुख्यमंत्री व संचालक नगररचना विभाग पुणे यांच्याकडे तक्रार दाखल करणे, त्यानूसार शासनाने संबंधित नगररचना विभागाला सुचना कराव्यात भिवंडी महापालिकेतील फेणे कामतघरगाव भादवडगाव टेमघरगाव याठिकाणी टाकण्यात आलेले मलनिःसारण व उदंचन व जलशुध्दीकरण प्रकल्पासाठी २०० एकर शासकीय वनजमिनी असल्यामुळे खाजगी जमिनीवरील आरक्षणे काढुन वाढत्या लोकसंख्येमुळे व परवडणारे घरांसाठी बहुतांश खाजगी जमिनी रहिवासी विभाग म्हणुन ठेवण्यात येणे, जास्तीत जास्त खाजगी जमिनीतील आरक्षणे हटवून अस्तित्वात व मोकळे असलेल्या २०० एकर शासकीय जमिनीवरील लोक उपयोगी विकासकामे मलनिःसारण व उदंचन व जलशुध्दीकरण केंद्रे उभारण्यासाठी जास्तीत जास्त परवडणारे घरे निर्माण होण्यासाठी भविष्यातील वाढती लोकसंख्या पाहता खाजगी जमिनीवरील आरक्षण हटवणे गरजेचे असल्याने सदरचा विकास आराखडा रद्द करून नव्याने विकास आराखडा बनवण्याकरिता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १४४. | "राज्यातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात घर आणि सुविधा मिळावी या उद्दात्त हेतूने राज्य शासनाने स्पेशल टाऊनशिप प्रकल्प मंजुरीचे धोरण आखणे, त्यानुसार अनेक स्पेशल टाऊनशिप प्रकल्पना मंजुरी देणे, पुणे जिल्ह्यातील नेरेदत्तवाडी, हिंजवडी येतील एक्सर्बिया टाऊनशिप प्रकल्पाला मंजुरी देण्यात देणे, विकासकाने विविध प्रलोभन दाखवून सदनिका खरेदीदारांना आकर्षित करणे, सदर प्रकल्पात ३००० हुन अधिक सदनिकांचे बांधकाम करून त्याची विक्री विकासकाने करणे, राज्य शासनाने स्पेशल टाऊनशिप प्रकल्पाना प्रचलितपेक्षा वाढीव चटई क्षेत्र, सदनिका विक्री वर ५०% | ॲड. राहूल कुल,<br>श्री. जयकुमार गोरे,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | मुद्रांकशुल्क माफी देणे, अशा प्रकल्पांमध्ये विकासकांनी विविध पायाभूत सुविधा देण्याची अट विकसकावर बंधन असणे, सदर अटींचे विकासकाने पालन न करणे, प्रकल्पातील बांधून झालेल्या सदनिका विक्री केल्यावर प्रकल्पाकडे दुर्लक्ष करून बांधकाम चालू करण्याच्या अटीशर्ती जाणीव पूर्ण न पाळणे, एक्सर्बिया टाऊनशिप प्रकल्पाच्या संचालक विकासक हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होणे, हिंजवडी पोलीस ठाणे (पुणे) येथे सदर प्रकल्पातील संचालकांवर गुन्हा दाखल होणे, मात्र गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ नसल्याची बाब समोर येणे, वर्ष उलटून गेले तरी दोषारोपपत्र दाखल न होणे, ३००० हुन अधिक सदनिकांधारकांना न्याय मिळण्यास विलंब होत असणे, स्पेशल टाऊनशिप प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर प्रकल्पाकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १४५. | "ठाणे व मिरा-भाईंदर शहरामध्ये सुरू असलेल्या मेट्रो-४ च्या मोघरपाडा कारशेडचे तसेच मेट्रो-९ च्या डोंगरी कारशेडच्या कामासंदर्भातही शासनस्तरावर अंतीमनिर्णय झालेला असणे, गेल्या ५ ते ६ वर्षापासून ठाणे व मिरा-भाईंदर शहरातील सुमारे ४० लाख नागरिक हे काम कधी पुर्ण होईल याची वाट बघत असणे, परंतू, एम.एम.आर.डी.ए. चे अधिकारी व ठेकेदारांनी अवलंबिलेल्या नितीमुळे हे काम दिवसेंदिवस लांबत जाणे, त्यातच मेट्रो-४ व मेट्रो-९ या दोन्ही मार्गाना जोडणाऱ्या गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मेट्रोची निविदा प्रक्रिया देखील अद्यापपर्यंत झालेली नसल्यामुळे हे काम संथगतीने होत असून स्थानिक नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागणे, एम.एम.आर.डी.ए.च्या अधिकाऱ्यांच्या आडमुठे धोरणामुळे हे काम रखडलेले असणे, त्यातच एम.एम.आर.डी.ए. मार्फत ठेका मिळालेल्या काही | श्री. प्रताप सरनाईक, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | ठेकेदार कंपन्यांनी अतिशय निकृष्ठ दर्जाचे काम केलेले असून देखील मेट्रो-४ व मेट्रो-९ चे संबंधित अधिकारी ठेकेदाराला पाठीशी घालत असणे, दिनांक ६ डिसेंबर, २०२३ रोजी एम.एम.आर.डी.ए.च्या टाटा कंस्ट्रक्शन या कंपनीने केलेल्या चुकीमुळे मेट्रो-४ च्या तीनहात जंक्शन येथे एका कामगाराचा झालेला मृत्यु, सदरच्या ठेकेदाराने कुठल्याही कामगार कायद्याचे पालन केलेले नसणे, तथापि एम.एम.आर.डी.ए.च्या अधिकाऱ्यांचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने याप्रकरणी चौकशी करून मेट्रो-४, व मेट्रो-९ चे काम लवकरात-लवकर पूर्ण होण्याच्या अनुषंगाने याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १४६. | "जळगाव शहर महानगरपलिका मध्ये गेल्या १० वर्षापासून प्रलंबित असलेले अनुकंप भरतीमध्ये काही कर्मचाऱ्यांच वारसांना नियुक्ती न देण्यात येणे, महापालिकेतील रिक्त असलेले पदे हे त्वरित भरण्यात न येणे, महानगरपालिकेतील लेखा परीक्षण मध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना नियुक्ती न देणे, जळगाव महापालिकेने २०२३-२४ साठी घरगुती व इतर कर वाढीव करण्यात आला असून वाढीव कर कमी न करणे, जळगाव शहरातील २३६८ गाडीधारकांचा प्रश्न प्रलंबित असून त्याची नियमांची अधिसूचना करण्यात न येणे, जळगाव शहरातील भोईटे मार्केट येथील महापालिकेने गाळे सील केले असने, जळगाव शहरातील नागरिकांसाठी अमृत योजना २.० ही अजुन पर्यंत लागू न होणे, जळगाव महानगरपालिकेचे खुले भूखंड विकसित करण्यात न येणे, जळगाव शहरातील एमआयडीसी लागत असलेल्या जागेमध्ये कोणतेही नवीन उद्योग आलेले नसून या ठिकाणी स्टार्ट अप इंडियाच्या माध्यमातून जळगाव शहरात नवीन उद्योगाचे प्रकल्प आणण्यात न येणे, जळगाव एमआयडीसी मधील उद्योजकांकडून २ प्रकारचे कर एमआयडीसी तसेच महापालिका यांच्याकडून घेण्यात येत असून | श्री. सुरेश भोळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | एमआयडीसी ही स्पेशल अथॉरिटी असून संबंधित कर हा एमआयडीसी यांनीच वसूल करून उद्योजकांना सुख-सुविधा पुरविण्यात न येणे, जळगाव शहर एमआयडीसी मध्ये स्वतंत्र अग्निशमन केंद्र निर्माण न करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १४७. | "पुण्यातील पेठांमध्ये असलेल्या जुन्या वाडयांना झोपडपट्टी असल्याचे दाखवून त्याचा झोपु योजनेअंतर्गत पुनर्विकास करण्याचा प्रकार समोर आल्यानंतर महापालिका आयुक्तांनी सर्व प्रकल्पाची चौकशी करण्याकरिता तीन अधिकाऱ्यांची नेमलेली त्रिसदस्यीय समिती, शहराच्या मध्यवर्ती भागातील जुने वाडे झोपडपट्टी भासवून तेथे एसआरए योजना राबविण्याचा उदयोग कांही बांधकाम व्यावसायिक, राजकीय एजंट आणि क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी, उप अअभियंत्यानी लावलेला सपाटा, या वाड्याला एसआरए चा दर्जा मिळाल्याने महापालिकेचे बांधकाम विकसन शुल्कही बुडणे, विकासकांनी तेथे टीडीआर खर्ची पाडून स्वत:च्या केलेला फायदा, महापालिका आयुक्तांनी एसआरए च्या मुख्याधिकाऱ्यांना जुन्या वाड्यांना एसआरए अंतर्गत देण्यात आलेल्या परवानग्या तात्काळ स्थगित बांधकाम बंद करण्याबाबत पत्र, एसआरए ने शासनाला पत्राद्वारे शहरातील एखादया भागात झोपडपट्टी सदृश भाग असल्यास आणि महापालिकेच्या संबंधित विभागाने त्याबाबत अभिप्राय दिल्यास अशा ठिकाणी एसआरए राबविण्यात येणे, व त्यास मान्यता देण्यात यावी अशी करण्यात आलेली मागणी, त्यानुसार जुने वाडे झोपडपट्टी भासवून तेथे एसआरए योजना राबविण्याचा प्रयत्न, महापालिका आयुक्तानी झोपडपट्टी सदृशच्या ७० अभिप्रयाची महापालिकेच्या वतीने चौकशी, चौकशी पूर्ण होईपर्यत पुणे महानगरपिालकेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून जे अहवाल पाठविण्यात आलेले आहेत आणि जे झो.पु.प्रा. कडून अद्याप मान्य करण्यात आलेले | श्री. रवींद्र धंगेकर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नाही असे सर्व प्रस्ताव तात्काळ स्थगित करण्याचे आदेश, झो.पुनर्वसन प्रा. हे सध्या झोपडपट्टी पुनर्वसनाचे प्राधिकरण न राहत पुणे शहरातील जुने वाडे आणि इमारती यांच्या पुनर्वसनासाठी बनलेले प्राधिकरण असल्याचा होत असलेला आरोप, शासनाने चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या दोषींविरुध्द कारवाई मान्यता दिलेल्या प्रेकल्पांना तात्काळ स्थगिती देण्यात यावी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १४८. | "बीड न.प.ला विविध लेखाशिर्ष अंतर्गत जवळपास ४ कोटी रूपयाच्या प्रशासकीय मान्यतेची मंजुरी असणे, बहुतांश ठिकाणची कामे निव्वळ कागदोपत्री दाखवुन देयके उचलल्याचे दिसून येणे, मुळात बीड न.प.कडे पाणी पुरवठा वीज कनेक्शनचे ३६ कोटी रूपये थकीत असणे, तरी सुद्धा न.प.बीडने गांभीर्याने न घेता सदरील स्वउत्पन्न इतरत्र खर्च केल्याचे दिसून येणे, संबंधित कामे न.प.बीडच्या स्वउत्पन्नात दाखवुन बहुतांश कामे कागदोपत्री व निकृष्ट दर्जाची दाखवुन कामाची देयके वितरीत झालेली असणे, सदरील कामाची माहिती मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्याधिकारी, न.प.बीड यांना मागितली असता ती अद्यापपर्यंत दिलेली नसणे, दुबार व बनावट कामे झाल्याने शहरातील सामान्य जनतेत असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, यापुर्वी देखिल होत असलेल्या दुबार कामाच्या बाबतीत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी व आपल्या कार्यालयाकडे या बाबतीत तक्रारी प्राप्त असणे, सदरील झालेल्या अनियमिततेची आपल्या कार्यालयाच्या वतीने तात्काळ नियमोचीत स्तरनिहाय चैकशी होणे अपेक्षित असणे, यामध्ये कोणत्याही स्वरूपाची दुबार अनियमितता होणार नाही याची खातरजमा होणे, शासनाच्या न.प.स्वउत्पन्नाच्या निधीचा झालेल्या अपव्यया बाबत शासनस्तरावरून सत्वर कार्यवाही होणे बाबत आदेशीत | श्री. संदिप क्षिरसागर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | होणे, तसेच २०१९ ते जानेवारी २०२३ व ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ या काळातील तपशीलवार माहिती अद्यापही प्राप्त नसणे, तसेच न.प.बीडकडून जिल्हा मजुर संघाकडे शिफारस होत असतांना बहुतांश कामाचे एकच जावक क्रमांक दोन वेळेस वापरल्याचे दिसून येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १४९. | "गोदावरी ही नदी गंगा नदी नंतरची भारतातील सर्वात मोठी नदी असणे, गोदावरी नदीला भारतातील दक्षिणगंगा म्हणून संबोधले जाणे, गोदावरी नदीला विशेष धार्मिक महत्त्व असणे, गोदावरी नदीच्या काठी नाशिक शहरातील पंचवटी येथे प्रसिद्ध व प्राचीन तीर्थक्षेत्र असणे, नाशिक शहरातील गोदाकाठावरील पंचवटी व तपोवन येथे दर बारा वर्षांनी हिंदू धर्मांचा सर्वात मोठा कुंभमेळा भरत असणे, सदरील कुंभमेळाला जगभरातून व देशभरातून लाखो भाविक येत असणे, पुढील कुंभमेळा सन २०२७ मध्ये असणे, नाशिक महानगरपालिका प्रशासन, केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून -नमामि गंगा, प्रकल्पाच्या धर्तीवर -नमामि गोदावरी॰ हा नदी सुधार प्रकल्प हाती घेण्यात येत असणे, गोदावरी नदीची अवस्था अत्यंत दयनीय झाली असणे, पवित्र गोदावरी नदीची अवस्था पाहून भाविक व नागरिकांना दुःख होत असणे, प्रदूषित सांडपाणी, प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट गोदावरी नदी मध्ये व उपनद्या मध्ये सोडत असणे, गोदावरी नदीतील जलसृष्टी नष्ट होणे, भाविक व नागरिक तसेच पर्यावरण प्रेमी व्यक्ती मधून संताप व्यक्त होत असणे, तसेच नाशिक शहर व इतर खेडेगावातील पाणीपुरवठा योजना ह्या गोदावरी नदीवर अवलंबून असणे, गोदावरी नदी सुधार प्रकल्पांतर्गत -नमामि गोदावरी॰ प्रकल्पांना तातडीने गती देण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | ॲड. राहुल ढिकले , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १५०. | "शासनाने "मेट्रो रेल्वे, मोनो रेल्वे" या सारखे "महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प" म्हणून घोषित केलेले असणे, सदर निर्णयातील मार्गिका ९ दहिसर मिरा-भाईंदर हा प्रकल्प मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत घोषित करण्यात आलेल्या यादीमध्ये अंतर्भूत असणे, त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम १२४ ब-३ ब अन्वये मुंबई महानगर क्षेत्रामधील महानगरपालिकांनी इमारत परवानगी वेळेस घेण्यात येणाऱ्या विकासाच्या आकारामध्ये अतिरिक्त १००% विकास आकारणी सुरू केलेली असणे, यासह vital urban transport project अंतर्गत स्टॅम्प ड्युटी व अन्य शासकीय अतिरिक्त पैसे आकारले जाणे, दिनांक २ डिसेंबर, २०२० पासून शासनामार्फत UDCPR नियमावली संपूर्ण राज्याकरीता लागू करण्यात येणे, त्यानुसार वरील प्रमाणे vital urban transport project अंतर्गत अतिरिक्त १००% विकास आकार घेण्याची तरतूद नमुद असणे, सदर प्रकरणात अतिरिक्त ५०% चटई क्षेत्र व ॲन्सिलरी क्षेत्र वापरणेबाबत चालू वर्षातील रेडिरेकनर नुसार प्रिमिअम क्षेत्र आकारले जात असणे, यासह विकासक विकास आकार व अन्य शुल्कांचा भरणा करीत असणे, त्याचा शहरातील विकासकांवर अतिरिक्त बोजा येत असणे, परिणामी नागरिकांमध्ये वाढता असंतोष, विकास आकारा व्यतिरिक्त vital urban transport project अंतर्गत अतिरिक्त १००% विकास आकार आकारण्यात येऊ नये अशी नागरिकांकडून होत असलेले मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती गीता जैन, वि. स. स. | कित्ता |
| १५१. | "वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात आगीच्या घटना सातत्याने वाढत असतानाही, महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी पद गेले सात ते आठ वर्षापासून रिक्त असल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, आगीच्या वाढत्या घटना विचारात घेता शासनाच्या नगर | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | विकास विभागाने महापालिकेचे सहाय्यक अग्निशमन अधिकारी सुरेंद्र सावंत यांची वसई-विरार महापालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी पदावर एक वर्षाच्या प्रतिनियुक्ती करण्याचे जारी केलेले परिपत्रक राजकीय दबाव आणून रद्द करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार, शासनाने वसई-विरार महापालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी पद भरण्याकरिता जारी केलेले परिपत्रक रद्द केल्याने सदर पद हे प्रभारी अधिकारी दिलीप पालव यांचेकडेच कायम ठेवणे, विरारच्या विजय वल्लभ हॉस्पीटलला आयसीयू कक्षात आग लागून झालेली भीषण घटना, बहुसंख्य खाजगी रुग्णालयात फायर ऑडीट करण्यात न येणे, अनेक निर्माणाधीन इमारतींमध्ये शहानिशा न करता आर्थिक संगनमताने फायर ना हरकत दाखला देणे, वसईत वाढत असलेल्या आगीच्या घटना, त्यावर अग्निशमन विभागाकडून कोणतीही प्रभावी अंमलबजावणी करण्यात न येणे, तत्कालीन आयुक्त यांनी प्रभारी अधिकारी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करणे, त्या चौकशीचा अहवाल अद्यापपर्यंत न येणे, मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद न भरण्यात काय गौडबंगाल आहे व यात कोणाचे हित जपले जात आहे यासंदर्भात होत असलेली उलटसुलट चर्चा, मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद तातडीने भरण्याची जनतेतून होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १५२. | "मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून शासनाच्या नियमांची पायमल्ली करून अधिकार नसताना दंड माफिया निर्णय घेऊन शासनाचा व महानगरपालिकेचा शेकडो कोटी रुपयांचा महसूल बुडविल्याची धक्कादायक बाब माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये उघडकीस येणे, दिनांक १२ मे, २०२१ रोजीचे परिपत्रक क्रमांक CHE/DP/१६१/Gen, २०२१-२२, सदर दंड माफी | श्री. समाधान अवताडे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | देताना आयुक्तांनी कोवीडचे कारण नमूद करणे, परंतु ज्या इमारतींना फायदा झाला त्यातील बऱ्याच इमारती १० ते १५ वर्षापूर्वीच्या असणे, त्या इमारतीवर MRIP कायद्यानुसार मंजुर झालेल्या प्लॅनप्रमाणे पुनसंचयीत न करता त्या बेकायदेशीर इमारतींना संरक्षण देणे, विकासकांचा आर्थिक फायदा करण्यासाठी दंड माफी करणे, विकासकांनी मोफत चटई क्षेत्राचे बेकायदेशीररित्या केलेल्या उल्लंघनाला निवासी क्षेत्रामध्ये रुपांतर करून नियमित करण्यासाठी लागणाऱ्या दंडाला माफ करणे, हा बेकायदेशीर निर्णय केवळ ठराविक विकासकांच्या फायद्यासाठी असून त्यामुळे सरसकट माफी देण्याचा निर्णय घेणे, यामुळे शासनाचे प्रचंड आर्थिक नुकसान होऊन शासनाच्या अधिकारात हस्तक्षेप केल्याचे उघड होणे, याचा संदर्भ राज्यातील इतर महानगरपालिका प्रशासन घेऊन भविष्यात चुकीचे व बेकायदेशीर निर्णय होण्याची दाट शक्यता, यावर शासनाचे मुख्य सचिवांमार्फत चौकशी करून संबंधितांवर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १५३. | "मौजा नारी (जि. नागपूर) येथील प्लॉट नं.६ वर पुलकीतसिंग बविन्दरसिंग खंडूला यांनी बांधकाम करण्याकरिता मा.उपसंचालक साहेब, शहर विकास कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर, यांच्या कार्यालयाकडून क्र. एनएमओ/बी/२०२३/एपीएल/०१४०२ दिनांक २९ मार्च, २०२३ रोजी घेण्यात येणे, या प्लॉटला लागूनच असलेल्या प्लॉट नं.५ या मालकीमध्ये असलेल्या समाविष्ट असलेल्या गुरुपितसिंग हरजिंदसिंग खंडूजा यांची संमती घेण्यात न येणे, सदरहू परवानगी देतांना खोटी माहिती पुरविण्यात येणे, पुलकीतसिंग यांचे वडिल बविन्दनसिंग जगतसिंग खंडूजा हे दिनांक २८ मार्च, २०२१ रोजी मृत्यू झालेले असतांनाही खोटी सही करून शपथ पत्र क्र.५५७३ दिनांक २७ मार्च, २०२३ नोटरी | श्री. सुनिल प्रभू , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | करून दिशाभूल करण्यात येणे, सदरही गुन्हा फौजदारी गुन्हा असून त्यासंदर्भातही कोणतीच कारवाई न करणे, याकरिता बांधकामाची दिलेली परवानगी रद्द करून सद्यःस्थितीत असलेले बांधकाम निष्कासित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १५४. | "शहापूर, आसनगांव रेल्वे स्टेशनजवळ (जि.ठाणे) येथे "कर्मपंचतत्व" या नावाच्या गृहनिर्माण प्रकल्पाचे सन २०१४ मध्ये घोषणा करणे, रुपये ७ हजार सुरुवातीला देऊन पुढील पाच वर्ष दरमहा ७ हजार रुपये देण्याची योजना, हळूहळू दरमहा पैसे भरण्याची योजना असल्याने यामध्ये भाजीवाले, ऑटोरिक्षवाले, शिंपी, मोलकरीण इत्यादी सुमारे ११,५०० गोरगरीबांनी सुरुवातीचे पैसे भरणे, त्यानंतर विकासकाने सदर घरांचे बांधकाम अनेक वर्ष सुरू न करणे, सदर व्यक्तींनी आधार कार्ड , बँकेचे पासबुक यासारखी कोणतीही कागदपत्रे न दिली असतांनाही बँकानी लाखो रुपयांचे कर्ज घेतल्याचे दाखवून ग्राहकांची फसवणूक करणे, गेले ९ ते १० वर्षे कोणतेही इमारतीच्या पायाचेसुद्धा काम झाले नसणे, परिणामी या गोरगरीब जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित विकासकांवर कारवाई करण्याची तसेच या गोरगरीब जनतेचे पैसे परत देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |
| १५५. | "पुण्याच्या ससून रुग्णालयातून ललित पाटील हा ड्रग माफिया फरार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, या माफियाची दिनांक १० डिसेंबर, २०२० दिवशी अटक होऊन अद्यापपावेतो एकही दिवस त्याची चौकशीच झाली नसून त्याला पोलीस कस्टडीही झाली नसल्याचे निदर्शनास येणे, तसेच, या प्रकरणात काही पोलीस अधिकारी तसेच | श्री. अतुल भातखळकर, श्री. रवींद्र धंगेकर, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. संजय जगताप, श्री. संग्राम थोपटे, ॲड. पराग अळवणी, श्री. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | रुग्णालय अधिकारीही सामील असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे, यामध्ये राजकीय लागेबांधे असल्याचे उघडकीस येणे, तसेच, राज्यात अंमली पदार्थ विक्रीवर बंदी असताना अंमली पदार्थांची सर्रास विक्री चालू असून ड्रग्स, गांजा यासारख्या अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी ड्रग्ज माफिया इंटरनेटचा वापर करत असणे, त्यामुळे, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज असणे, तसेच, चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, राज्याला ड्रग्सचा विळखा बसू नये, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | पराग शाह, कॅप्टन आर. सेल्वन, ॲड. आशिष शेलार, श्री. मिहीर कोटेचा, श्री. समाधान अवताडे, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अनिल देशमुख, श्री. रोहित पवार, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. भास्कर जाधव, श्री. अबू आजमी, श्री. बाळासाहेब थोरात, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. राजेश एकडे, श्री. शिरीष चौधरी, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. कुमार आयलानी, श्री. गणपत गायकवाड, श्री. किसन कथोरे, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. सुनील राणे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. चेतन तुपे, श्री. सुनिल टिंगरे, श्रीमती अश्विनी जगताप, श्री. रविंद्र वायकर, श्री. सुनिल कांबळे, | |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | | श्री. रमेश कोरगांवकर, श्री. दिलीप लांडे, श्री. अस्लम शेख, वि. स. स. | |
| १५६. | "दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पुसेसावळी गावात समाजमाध्यमांवर प्रसिध्द झालेल्या आक्षेपार्ह मॅसेजवरुन जमावा-जमावामध्ये दंगल उसळून त्या दुर्घटनेत एकाचा दुर्देवी मृत्यू तर १५ जण गंभीररित्या जखमी झाल्याचे निदर्शनास येणे, सदर दंगलीमध्ये जमावाने फरशी, दांडकी, दगडगोटे वापरल्याचे व जाळपोळ करून तेथील वाहनांची तोडफोड व हातगाड्याची मोडतोड केली असल्याचेही त्यासुमारास निदर्शनास आले असणे, त्यामुळे सदर दंगलीदरम्यान पोलिसांना संचारबंदी लागू करावी लागणे, तसेच खबरदारीचा उपाय म्हणून काही काळ पोलिसांना जिल्ह्यातील इंटरनेट सेवा बंद ठेवावी लागण्याची पोलिसांवर आलेली पाळी, सदर दंगलीमागचे नेमके कारण काय आहे व त्यात पोलिसांनी किती आरोपींना अटक करून कोणते गुन्हे दाखल केले आहेत, याबाबत अद्याप अवगत न होणे, त्यामुळे निर्माण झालेली संभ्रमावस्था, त्यामुळे या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, परिणामी तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, सदर दंगलीमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या तरुणाच्या कुटूंबियांना शासनाकडून आर्थिक मदत देण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अनिल देशमुख, श्री. रोहित पवार, श्री. चेतन तुपे, श्री. पृथ्वीराज चव्हाण, श्री. विश्वजित कदम, श्री. बाळासाहेब थोरात, कुमारी प्रणिती शिंदे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. ऋतुराज पाटील, श्री. संग्राम थोपटे, श्री. अमित देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. महेश लांडगे , वि. स. स. | कित्ता |
| १५७. | "मुंबई, पुणेसह संपूर्ण राज्यात सार्वजनिक उत्सवाचा उद्देश बाजूला करून प्रत्येक सार्वजनिक उत्सवात डीजेचा होत असलेला वापर, डीजेच्या आवाजामुळे शरीरावर होणारा परिणाम, ध्वनीप्रदुषण होऊन निसर्गाचे | श्री. भास्कर जाधव, श्री. संजय पोतनीस, श्री. बाळासाहेब थोरात, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | बिघडणारे संतुलन, लाऊडस्पीकर आणि डीजेच्या आवाजाने कायमचे आणि तात्पुरते येणारे बहिरेपण, तसेच ह्रदय बंद पडून होणारे मृत्यू, लेझर लाईटच्या प्रखरतेमुळे अनेकांची गेलेली दृष्टी, नाशिक येथे गणेश विसर्जनाच्या मिरवणूकीत ध्वनी प्रदुषणामुळे कानांच्या आजाराच्या तक्रारीमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, नेत्रविकार तज्ज्ञाकडे तपासणी केली असता नेत्रपटलावर रक्त साकळल्याचे आढळून येणे, शिवाय भाजल्यासारख्या जखमा आढळून येणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, डीजे व लेझरच्या वापरास सार्वजनिक उत्सवात बंदी घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया". | श्री. नानाभाऊ पटोले, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. राजेश एकडे, श्री. संजय जगताप, श्री. शिरीष चौधरी, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनील राणे, श्रीमती अश्विनी जगताप, वि. स. स. | |
| १५८. | "बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेर्डा परिसरात अंमली पदार्थांची व ड्रग्जची होत असलेली खुलेआम विक्री, त्यामुळे तेथील तरुण वर्ग नशेच्या आहारी जात असणे, अंमली पदार्थांच्या सेवनामुळे तेथील तरुण मोठ्या प्रमाणात मृत्यूमुखी पडत असणे, ड्रग्जच्या अतिसेवनामुळे अनेक तरुणांवर विविध रुग्णालयात औषधोपचार सुरू असणे, या अंमली पदार्थांची विक्री साखरखेर्डा बसस्थानक वॉर्ड नं. १ ते ६ याठिकाणी खुलेआम सुरू असल्यामुळे विद्यार्थी वर्ग व तरुण वर्गांना सहज उपलब्ध होत असणे, हे अंमली पदार्थ व ड्रग्जची होत असलेली विक्रीवर आळा घालण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याची विनंती ए आय एम आय एम च्या वतीने जिल्हाधिकारी, बुलढाणा व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदनाद्वारे केलेली असणे, या अंमली पदार्थाच्या विक्रीवर आळा घालण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | डॉ. राजेंद्र शिंगणे , वि. स. स. | कित्ता |
| १५९. | "पालघर जिल्ह्याला ११२ कि.मी. चा सागरी किनारा लाभला असून या किना-यावर दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी पासून पोलिसांकडून सागरी गस्त बंद | श्री. सुनिल भुसारा , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | असणे, या सागरी सुरक्षिततेसाठी खासगी बोटीची उपलब्धता व्हावी यासाठी बोटीची उपलब्धता व्हावी यासाठी पोलीस मुख्यालयातून प्रस्ताव मंत्रालयात सादर करण्यात येऊन अद्यापही त्यास मान्यता न मिळणे, पालघर जिल्ह्यात तारापूर अणुऊर्जा केंद्र, भाभा अणुसंशोधन केंद्र तसेच डहाणू येथील औष्णिक ऊर्जा प्रकल्प समुद्रकिनारी वसलेले असून देशासाठी संवेदनाशील असणाऱ्या प्रकल्पाच्या दृष्टीकोनातून तसेच राष्ट्रीय सुरक्षितात वाऱ्यावर पडल्याचे दिसून येणे, याबाबत शासनाने तातडीने पोलीस मुख्यालयाकडून पाठविलेला प्रस्तावाला मान्यता देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १६०. | "मु.पो.अनगर, ता.मोहोळ (जि.सोलापूर) येथील श्रीमती उज्वला थिटे या विधवा महिलेकडे श्री.राजन पाटील यांच्या मुलांनी शरीरसुखाची मागणी करणे, ती मागणी धुडकवल्याचा रागधरुन श्री.राजन पाटील व त्यांच्या मुलांनी श्रीमती थिटे यांना मानसिक व शारीरिक त्रास देणे, श्री.पाटील व त्यांच्यामुलांनी श्रीमती थिटे यांच्यामुलावर खोटी ॲक्ट्रॉसिटीकेस दाखल करावयास लावून त्यांना व मुलाला जीवे मारण्याची धमकी देणे, श्रीमती थिटे यांच्या राहत्या खरी दरोडा व शेतामध्ये दरोडा टाकण्यात येऊन घरातील ११ तोळे सोने व सर्व संसार उपयोगी वस्तू चोरी करण्यात येणे,श्रीमती थिटे ह्या मोहोळ पोलीस स्टेशनला तक्रार द्यावयास गेल्या असता पोलीस निरीक्षक श्री. घुगे व सहायक पोलीस निरीक्षक डुणगे यांनी श्री. पाटील यांच्या दबावाखाली तकलादू तक्रार दाखल करणे, श्री.पाटील यांनी बँक अधिकारी यांना हाताशी धरुन थिटे यांचे ऊस बिल अनधिकृतपणे सोसायटी कर्जामध्ये वसूल करणे, श्री.पाटील यांची ४ कोटी रुपयांची थकबाकी असतानाही त्यांना सूट देणे, मात्र श्रीमती थिटे यांच्या १३ लक्ष थकीत कर्ज रकमेसाठी २८ एकर जमीन बँकेने तारण ठेवणे, | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | मजुरांना शेतात काम करू नये म्हणून धमकावणे, शेत जाळणे, घराची लाईटपाणी तोडणे, किराण साहित्य, दूध देण्यास प्रतिबंध करणे, घरावर दगड फेकणे अशा प्रकारामुळे श्रीमती थिटे यांना दहशतीच्या सावटाखाली जगावे लागल्यामुळे त्यांना त्याचे घर, गाव, जमीन सोडून जाण्याची वेळ आल्याने त्यांच्या मुलाला त्याचे शिक्षण अर्धवट सोडायला लागणे, श्रीमती थिटे यांना संरक्षण देऊन त्यांनी मोहोळ पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीची वरिष्ठांमार्फत पुनश्च चौकशी करण्याबाबत तसेच दोषी बँक अधिकारी व पोलीस अधिकाऱ्यांची विभागनिहाय चौकशी करण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १६१. | "राज्यात ठाणे शहरातील नऊ बड्या बांधकाम व्यवसायिकांनी तब्बल ५००० ग्राहकांची फसवणूक केली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारस निदर्शनास येणे, ठाण्यातील बड्या बांधकाम व्यवसाय आणि ग्राहकांना लवकर सदनिका देण्याचे प्रबळ प्रलोभन दाखवून व्यवहार केले परंतु इमारतीची कामे मात्र पूर्ण केलेली नसणे, काही व्यावसायिकानी पार्किग तरण तलाव, उद्यान, क्लब हाउस, जिम या सुविधा देण्याचे आमिष दाखवून सदनिकांची विक्री केली असणे, या सर्व सुविधांमुळे बँकाँकडून ग्राहकांनी कर्ज घेतले त्या कर्जाचे हप्ते सुरू होणे, परंतु सदनिका मात्र त्यांच्या ताब्यात मिळत नसल्याने ठाणेकर ग्राहकांनी लोकप्रतिनिधीकडे म्हणणे मांडत नाराजी व्यक्त करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संजय केळकर , वि. स. स. | कित्ता |
| १६२. | "राज्यात महिला अत्याचाराची प्रकरणे वाढत असणे, दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी अकोल्यात एका गावगुंडाने १४ वर्षीय मुलीला सिगारेटचे चटके देत तिच्यावर बलात्कार करणे, दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी मुंबईत दोन इसमांनी एका १४ वर्षीय मुलीवर धावत्या टॅक्सीत बलात्कार करणे, दिनांक १८ जून, | श्री. रोहित पवार, श्री. अनिल देशमुख, श्री. सुनिल प्रभू, श्री. राजकुमार पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | २०२३ रोजी एका २० वर्षीय तरुणीवर धावत्या लोकलमध्ये महिलांच्या डब्यात चढून बलात्कार केला जाणे, अशाप्रकारे सार्वजनिक ठिकाणी देखील महिला असुरक्षित असणे, राज्यातील शहरे दिवसेंदिवस महिलांसाठी असुरक्षित असणे, माहे जानेवारी, २०२३ ते ऑगस्ट, २०२३ या कालावधीत मुंबईत विनयभंग आणि छेडछानीच्या १,२५४ तर बलात्काराच्या ५४९ घटना घडणे, याच कालावधीत पुण्यात विनयभंग आणि छेडछानीच्या ३६४ तर बलात्काराच्या १२४ घटना घडणे, नागपूरात विनयभंग आणि छेडछानीच्या ३०४ तर बलात्काराच्या १६५ घटना घडणे, एनसीआरबी (NCRB) च्या अहवालानुसार महिला अत्याचाराच्या बाबतीत महाराष्ट्र देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असणे, राज्यातील महिला सायबर गुन्हेगारांच्या फसवणुकीला बळी पडत असणे, राज्यात नोंद होणाऱ्या सायबर गुन्ह्यांमध्ये १/३ गुन्हे हे महिलांच्या बाबतीत घडणे, राज्यात दररोज सरासरी एका महिलेसोबत सोशल मिडीयाद्वारे पाळत ठेवणे अथवा धमकावले जाण्याची घटना घडत असणे, त्यामुळे महिलांच्या सायबर सुरक्षेसाठी विशेष तरतुदी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. प्रमोद पाटील, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. अमिन पटेल, श्री. विकास ठाकरे, श्री. सुनिल केदार, श्री. अबू आजमी, वि. स. स. | |
| १६३. | "माहे नोव्हेंबर, २०२३ च्या सुमारास ट्रॉंबे येथील मुंबई-पोलिसांनी अनधिकृत नर्सिंगहोमच्या माध्यमातून बालकांची-विक्री करणाऱ्या बनावट डॉक्टर-दलालासह-पाच-महिलांच्या टोळीचे प्रकरण उघडकीस येणे, गंभीर बाब म्हणजे या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या श्रीमती ज्युलिया लॉरेन्स फर्नांडिस या महिले विरोधात नोंदविण्यात आलेला हा सातवा गुन्हा असणे, शिवाजीनगर, मुंबई येथील रहमानी नर्सिंग होमच्या मदतीने श्रीमती फर्नांडिस सदर रॅकेट चालवत असल्याचे तपासात उघडकीस येणे, सदर नर्सिंगहोम अनधिकृतरित्या उभारून एकूण ५२-प्रसूती झाल्याचे | श्री. निलेश लंके, श्री. राजकुमार पटेल, श्री. अबू आजमी, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | उघडकीस येणे, अपत्य नसलेल्या स्त्री-पुरुषांना मुलगी सात लाख, तर मुलगा आठ-दहा लाख रुपयांनी विक्री करण्यात येणे, या प्रकरणातील मुख्य आरोपी फर्नांडिस या महिले विरोधात यापूर्वीच पाच-सहा गुन्हे नोंदवून सुध्दा तिला प्रत्येक वेळा दोषी ठरवणे, परंतु पोलिसांकडून न्यायालयात कच्चे पुरावे सादर केल्याने न्यायालयाने तिची जमिनीवर केलेली सुटका, श्रीमती फर्नांडिस हिच्याबरोबर पोलीस कर्मचारी/अधिकारी याचं असलेले संबंध, प्रत्येक गुन्ह्याच्या वेळेस तिला जामीन मिळण्याकरता पोलीसांकडून सादर करण्यात आलेले बनावट पुरावे, एकाच गुन्ह्यात सहा-सात वेळा अटक होऊन सुद्धा तिच्यावर कोणतीच कार्यवाही न झाल्यामुळे तिची वाढत असलेली गुन्हेगारी, शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, यामुळे गोरगरीब-महिला तसेच अपत्यहीन-दांपत्य यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या फर्नांडिस व तिच्या सर्व सहकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १६४. | "नोव्हेंबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास मिरारोड येथील काशिमिरा महाजनवाडी भागांतील जिग्नेश देसाई या बिल्डरने सण-२०१२ मध्ये चार मजल्याची इमारत बांधायला घेणे, सदर इमारत पाच मजल्याची असल्याचे ग्राहकांना खोटे सांगून ग्राहकांकडून लाखो रुपये जमा करणे, २०१२ पासून ग्राहकांकडून पैसे घेऊनही २०२३ पर्यंत ग्राहकांना बिल्डरने सदनिकेचा ताबा न देणे, ग्राहकांनी सदर बिल्डर विरोधात स्थानिक पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर पोलिसांनी ग्राहकांना दिलेल्या माहितीनुसार बिल्डिंगला फक्त चार माळ्यांची परवानगी असणे, जिग्नेश देसाई यांनी फक्त पाचव्याच नाही तर सातव्या माळ्याचे फ्लॅट अन्य ग्राहकांना विकल्याचे ग्राहकांकडून बेकायदेशीरपणे पैसे वसूल केल्याची बाब उघडकीस येणे, ग्राहकांना खोटी माहिती देऊन पैसे वसूल | श्री. राजकुमार पटेल, श्री. निलेश लंके , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | करणाऱ्या संबंधित बिल्डरविरोधात पोलिसांनी कोणताही गुन्हा दाखल न करणे, पोलीस व बिल्डर यांच्यात आर्थिक हातमिळवणी झाली असल्याची खात्री ग्राहकांना पटणे, इमारतीला चार माळ्यांची परवानगी असताना सातमाळ्यापर्यंत परवानगी असल्याचे अनेक ग्राहकांना सांगून केलेल्या आर्थिक फसवणूक विरुद्ध ग्राहकांना न्याय मिळण्याकरता स्थानिक पोलीस प्रशासनाकडे तक्रार करूनसुद्धा ग्राहकांना न्याय मिळत नसणे, बिल्डर विरुद्ध तातडीने कारवाई करण्याची मीरारोड मधील हजारो ग्राहक व नागरिकांची होत असलेली मागणी, त्याकडे पोलीस प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, ग्राहकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप त्यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १६५. | "पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील सोमवार पेठ आणि भवानी पेठ येथील पोलीस लाईनची उभारणी १९२० साली झालेली असून आज त्याठिकाणी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची अत्यंत दूरावस्था झालेली असणे. सदर ठिकाणी पाण्याची लाईन ड्रेनेज आणि लाईट इत्यादी गोष्टींसाठी पोलीस कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे. सदर ठिकाणी राहणारे पोलीस कुटुंबीय या सर्व गोष्टी ची दुरुस्ती व्हावी म्हणून कित्येक वर्षापासून मागणी करीत असणे, यासाठी भवानी पेठ पोलीस लाईन मधील इमारतीच्या दुरुस्तीसाठी व पाणी ड्रेनेज लाईट इत्यादी विषयांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता त्याचप्रमाणे सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून या इमारती धोकादायक झालेल्या असतील तर नव्याने इमारतीची उभारणी करण्याची आवश्यकता, यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल कांबळे , वि. स. स. | कित्ता |
| १६६. | "धुळे तालुका व जिल्ह्यात उच्चशिक्षित तरुण व तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणावर असणे, धुळे जिल्ह्यात शेकडो | श्री. कुणाल पाटील , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | तरुण तरुणी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून शासनाचा इतर शासकीय विभागात भरती होण्यासाठी प्रयत्नशील असणे, शासकीय विभागात नोकरी मिळेल या आशेने हजारो तरुण, तरुणी हे रात्रंदिवस अभ्यास करीत असणे, परंतु गेल्या ५ ते १० वर्षांपासून शासन भरतीप्रक्रिया करीत नसणे, राज्य शासनाच्या सर्व शासकीय विभागात हजारो पदे रिक्त असून ७५ हजार रिक्त पदांची भरती करण्याचे शासनाचे नियोजन असणे, परंतु जाहिराती वेळेवर प्रसिद्ध न होणे, त्यामुळे बेरोजगारीच्या प्रमाणात प्रचंड वाढ होणे, धुळे तालुका व जिल्ह्यात अनेक तरुण-तरुणी पोलीस भरतीचा सराव, व अभ्यास करीत असणे, सन २०२४ च्या आत पोलीस भरती राबविण्यात यावी, अशी त्यांची मागणी असणे, तशा प्रकारचे निवेदन त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे दिलेले असणे, परंतु शासनाचे भरती प्रक्रिया करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने बेरोजगार तरुण, तरुणींमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, शासनाने तातडीने पोलीस भरती प्रक्रिया राबवून बेरोजगारांना दिलासा देण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १६७. | "दिनांक २३ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास कराड (जि.सातारा) येथील मुजावर कॉलनीतील शांतीनगरमधील मुबारक मुल्ला यांच्या घरात संशयास्पदरित्या भीषण स्फोट होऊन, त्यांच्या घरातील पाच जणासह शेजारील हिंदु कुटुंबांतील १० ते १२ व्यक्तीही गंभीररित्या जखमी होणे, तसेच घराच्या पडझडीसह अन्य मालमत्तेचे व सहा दुचाकीचे नुकसान होणे, पोलीसांनी घटनास्थळाची पहाणी केली असता त्यांचे घरात असलेले तिन्हीही गॅस सिलेंडर व शेगडी सुरक्षित व सुस्थितीत असल्याचे त्याचप्रमाणे सदरहू गॅस सिलेंडर शेगडी मध्ये गळती नसल्याचे व दुर्घटनाग्रस्त सिलेंडर मिळालेले नसणे, शरीफ मुल्ला नामक व्यक्तिच्या घरात घातक रसायने, | श्री. नितेश राणे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | विघातक साधनसामग्री मोठ्या प्रमाणात सापडणे, अनधिकृतपणे रसायनासोबत काही विध्वसंक कारवाया करीत असल्यालाही समोर येणे, मात्र संबंधित व्यक्ती आणि पोलीस हा स्फोट गॅस सिलेंडरचाच असल्याचे सांगून जाणीवपूर्वक दिशाभूल करत असल्याने येथील रहिवाशांनी, लोकप्रतिनिधीनी या संशयास्पद स्फोटाची केंद्रीय तपास यंत्रणाच्या माध्यमाद्वारे तपास करण्यात यावा अशी मागणी केलेली असणे, या स्फोटासंदर्भात येथील रहिवाशांनी गंभीर आरोप व संशय व्यक्त केलेला असल्याने विनाविलंब रहिवाशांच्या मागणीप्रमाणे या संशयास्पद स्फोटाची केंद्रीय तपास यंत्रणेमार्फत तपासून सर्व संबंधित गुन्हेगार व त्यांना पाठीशी घालणाऱ्या पोलिसांविरोधात कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १६८. | "जि.पालघर, भाईंदर, काशिमीरा येथील सी मॅजिक ऑर्केस्ट्रा या बारवर टाकलेल्या धाडीमध्ये काशिमीरा पोलीसांनी कर्मचाऱ्यांनाच ग्राहक म्हणून दाखवून कर्मचाऱ्यांवर नुकताच गुन्हा नोंद केल्याची घटना घडणे, या धाडीत पाच मुलींना पकडणे, ८ सिंगरची परवानगी असतानाही प्रत्यक्षात ३१ मुली सिंगर म्हणून काम करीत असल्याचे दाखविणे, सदर प्रकरणी पोलिसांनी १३ जणांवर गुन्हे दाखल करण्यात येणे, त्यामध्ये वेटर व ग्राहकांचा समावेश असणे, बारमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना चक्क ग्राहक म्हणून अटक केल्याची पोलीस दप्तरी नोंद करण्यात येणे, कशिश मॅजिक बारवर पोलिसांनी धाड टाकून १६ जणांना अटक करणे, त्यावेळी देखील पाच कर्मचाऱ्यांना ग्राहक दाखवून अटक करणे, त्यानंतर काशिमीरामधील सी क्विन या बारवर टाकलेल्या धाडीत देखील काही कर्मचाऱ्यांना ग्राहक अशी नोंद करून पकडण्यात येणे, सदरहू तिन्ही बारवरील कारवाया काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम यांच्या आदेशानुसार | श्री. नितीन पवार,<br>श्री. निलेश लंके,<br>श्री. किशोर जोरगेवार ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अधिकारी योगेश काळे, शिवाजी खाडे, अशोक भानसी, प्रताप पाचुंदे, राहुल सोनकांबळे, विरकर, मोहिते, कांबळे, शिंदे, निकम यांच्याकडून करण्यात येणे, याची उच्चस्तरीय चौकशी नेमून वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संदीप कदम यांची तात्काळ बदली करून त्यांची विभागीय चौकशी करण्याची तसेच संबधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १६९. | "जि.पालघर, मीरा-भाईंदर महापालिका हद्दीतील सिल्व्हर पार्कजवळील आशादीप बिल्डींगचे बांधकाम करण्यासाठी विकासक उमराव ओस्तवाल व कुलदीपसिंह ओस्तवाल यांनी महापालिकेची चार मजल्याची परवानगी घेऊन त्यावर तीन मजल्याचे बेकायदेशीर बांधकाम केल्याचे निदर्शनास येणे, विकासकाने अनधिकृत बांधकाम केलेल्या सात मजली इमारतीतील फ्लॅटची ग्राहकांना इमारत अधिकृत असल्याचे दाखवून व त्यांची फसवणूक करून फ्लॅटची विक्री करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करणे, विकासकाने बांधलेल्या सात मजली इमारतीमध्ये तीन मजले अनधिकृत बांधकाम करण्यासाठी महापालिकेतील अधिकाऱ्यांचे सही शिक्के स्वत: मारुन बनावट बांधकाम परवानगी पत्र तयार करण्यात येणे, सामाजिक कार्यकर्ते शिजॉय मॅथ्यु यांनी आशादीप या इमारतीमधील बेकायदा बांधकामाबाबत महापालिका व पोलीस आयुक्त यांच्याकडे कागदोपत्री पुराव्यासह लेखी तक्रार करण्यात येऊनही यावर कोणतीच कारवाई न होणे, यासंदर्भात काशिमीरा पोलीस ठाण्यात तक्रार केली असता सदर प्रकरणात पोलिसांनी आर्थिक संगनमत करून विकासकास कारवाईपासून वाचवून आर्किटेक्ट सुब्रमण्यम राव यांचा मृत्यू झालेला असतानाही खातरजमा न करता त्यांच्या नावे गुन्हा दाखल केल्याचा प्रकार उघडकीस येणे, पोलिसांनी मृत | श्री. निलेश लंके , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | आर्किटेक्टवर गुन्हा दाखल करून प्रकरण अर्थपूर्ण व्यवहार करून दडपून टाकल्याचा घडलेला प्रकार, या प्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने चौकशी करून त्यांना निलंबित करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १७०. | "बालकल्याण समितीने, रमामाई मुक्ती मिशन केडगाव, (ता.दौंड, पुणे) येथे अनुसूचित जातीच्या "खाटिक" समाजातील दोन अल्पवयीन हिंदू मुलींना दौंड, येथे परदेशी निधीद्वारे समर्थित पंडिता रमाबाई मुक्ती मिशन या ख्रिश्चन संस्थेत सामील होण्यास सक्ती केल्याची अत्यंत गंभीर बाब निदर्शनास येणे, संबंधित मुलीच्या आईचा कोविड मुळे मृत्यू झाल्यामुळे मुलीच्या मावशीने सदर मुलींना रमाबाई मुक्ती मिशनमध्ये सामील होण्यासाठी संध्या वासवे नामक महिलेच्या प्रभावाखाली भाग पाडणे, धर्मांतर करण्यासाठी मुलींच्या पालकांना मोठे आर्थिक आमिष दाखविणे, मुलींना मिशनच्या वसतिगृहात गैरवर्तनाला सामोरे जावे लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, त्यांच्यावर शारीरिक, मानसिक अत्याचार केले जात असल्याची बाब निदर्शनास येणे, परदेशी नागरीक आल्यावर फाटलेले कपडे आणि वेडेवाकडे केस कापून त्यांच्या सोबत फोटो काढण्यास भाग पाडणे, विद्यार्थिनींना हिंदू देवतांची पूजा करू न देणे, याबाबत भारतीय मानवाधिकार परिषदेने अभ्यास करून तयार केलेला अहवाल पोलिसांना सुपूर्द करणे, पुणे शिवाजीनगर पोलीस स्टेशन मध्ये दिनांक ८ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात येणे, त्यानंतर सदर संस्थेवर प्रशासक बसविण्याबाबत अनेक सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी यांनी शासनाला पत्रव्यवहार करणे, परंतु सदर गंभीर बाबीकडे अद्याप पर्यंत गांभीर्याने न पाहिल्यामुळे पालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राम सातपुते , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १७१. | "महाराष्ट्रामध्ये मंत्री, खासदार, आमदार लोकप्रतीनीधी हे कुठल्याही गावामध्ये किंवा शहरामध्ये शासकीय कार्यक्रम करीत असतांना शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहचाव्यात किंवा ते शासकीय काम चांगल्या पद्धतीने व्हावे त्यांचा भुमीपुजन समारंभ असेल लोकार्पण समारंभ असेल किंवा लोकांना लाभ देण्याचा विषय असेल हे काम करीत असतांना आजकाल राज्यामध्ये वेगळे वातावरण तयार होणे, एक वेगळी स्टाईल आलेली आहे कोणीही यायच आणि कार्यक्रमांमध्ये गोंधळ घालायचा, कार्यक्रम बंद पाडायचा हा कार्यक्रम आम्ही होऊ देणार नाही, घेऊ देणार नाही एखादा आमदार, मंत्री गेला तर त्याला आडवायच कोण्या मंत्र्याच्या अंगावर शाही फेकायची आणि लोकप्रतीनीधींचा अशा अपमान करायचा देशामध्ये शासन, प्रशासन, न्यायपालीका आणि पत्रकारीता हे महत्वाचे चार स्तंभ आहे असे असतांना प्रशासनाच्या कामामध्ये अडथळानिर्माण झाला तर आपण ३५३ चा गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कार्यवाही करावी परंतु लोकप्रतिनीधी शासन असतांना जे कायदे करतात जे लोकांकरीता काम करीतात जी योजना करीतात यांचे कार्यक्रम अशाप्रकारे बंद पाडीत असतील गावबंदी केल्या जात असेल किंवा त्यांच्या कार्यक्रमात येऊ दिल्या जात नसेल तर त्या विभागाच्या शासकीय कर्मचाऱ्यांनी किंवा लोकप्रतिनीधींच्या अंगरक्षकांनी किंवा लोकप्रतिनीधींच्या अधिकृत स्वीय सहायक यांनी त्यांच्या विरोधात शासकीय कामामध्ये अडथळा आणल्याची तक्रार दाखल केल्यावर ३५३ सारखा गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संजय गायकवाड, वि. स. स. | कित्ता |
| १७२. | "शामनगर, जोगेश्वरी ( पूर्व) येथे अस्तित्वात असलेली मेघवाडी पोलीस स्टेशनच्या अंतर्गत त्यांच्या मागणीवरुन एकमजली शामनगर पोलीस बीट चौकीचे पुर्नबांधणीचे काम आमदार विकास निधीतून होणे, सदर पोलीस बीट चौकी ही भौगौलिक दृष्टया कायदा व सुव्यवस्थेच्या | श्री. रविंद्र वायकर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अनुषंगाने अत्यंत महत्वाची असणे, आपतकालीन परिस्थितीत पोलीस विभागाला जादा बंदोबस्ताची आवश्यकता असल्यास पोलीस कर्मचारी या चौकीत वास्तव्यात राहत असल्याने त्यांच्या करिता पोलीस बीट चौकीत प्रसाधन गृह, स्नानगृह यासारख्या सुविधांचा समावेश पुनर्बाधणीच्या कामात करण्यात येणे, सदर पोलीस बीट चौकीचे कामपूर्ण झाल्यानंतर शासनाच्या धोरणानुसार व इतर लोकप्रतिनिधिंनी ज्याप्रमाणे त्यांनी केलेल्या विकास कामांवर त्यांचे नामफलक व छायाचित्र लावले जातात त्यांचप्रमाणे सदर पोलीस बीट चौकीवर ज्या लोकप्रतिनिधिंच्या आमदार निधीतून काम करण्यात आले त्याचे नामफलक व छायाचित्रे लावण्याात आली असता काही समाज विघातक प्रवृत्तीच्या तक्रारीची दखल घेत पोलीस विभागाने रातोरात पोलीस बीट चौकीवरील नावफलक कोणतीही पूर्वसूचना न देता काढून टाकण्यात आल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, ज्या आमदार निधीतून कोणते काम झाले याबाबत सर्वसामान्य जनतेला माहिती मिळावी याकरिता सदर नावफलक लावले जातात असे फलक कोणतीही शहानिशा न करता एका तक्रारीवरून काढून टाकण्यात येणे ही अत्यंत खेदाची बाब असणे, शासनाकडून अशा सूचना असतील तर मुंबईतील विविध विभागात आमदार निधीतून झालेल्या कामावरील नावफलक व फोटो देखील काढून टाकणे गरजेचे, परंतु तसे न होता जाणीवपूर्वक कांही समाज विघातक लोकांकडून सदर कृत्य करण्यात येणे, तसेच उदघाटन न करता चौकशी सुरू करणे शासनाने चौकशीची आवश्यकता व यास जबाबदार असणाऱ्या विरुध्द कडक कारवाईची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १७३. | "ठाणे जिल्ह्यातील जेष्ठ नागरीक व महिला यांची फसवणुक करून त्यांची जमीन व पैसा हडपल्याने त्यांच्या सुरक्षेला मोठा धोका पोहोचलेला असल्यामुळे | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | त्यासंदर्भात वेळोवेळी जेष्ठ नागरीक पुरुषोत्तम महिजीभाई पटेल व ईतर नागरीकांनी अप्पर पोलीस महासंचालक नागरी हक्क संरक्षण मुंबई व पोलीस अधिक्षक नागरी हक्क संरक्षण नवी मुंबई यांच्याकडे दिनांक २८ जून, २०२३ रोजी रीतसर तक्रार देऊनही त्याबाबत संबंधित जेष्ठ नागरीक व महिलांना तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीच कारवाई संबधित अधिकाऱ्यांनी केली नसणे, ठाणे पोलीस आयुक्तालय, मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय व पोलीस अधिक्षक, ठाणे यांच्याकडे कित्येक वर्षापासून तक्रारी प्रलंबित असणे व त्याची दखल गैरव्यवहारामुळे पोलीस अधिकारी घेत नसल्यामुळे संबंधित जेष्ठ नागरीक व महिलांनी नागरी हक्क संरक्षण यांच्याकडे न्याय मागणे, विधवा महिला व जेष्ठ नागरीक यांच्या मिळकतीचे खोटे कागदपत्र बनवण्यात आल्याने सुद्धा अ पोलीस अधिकाऱ्यांकडून कोणत्याच प्रकारची दखल घेतली नसणे, त्यामुळे त्यांच्यामध्ये नाराजी पसरलेली असणे, सदर जेष्ठ नागरीक व दुर्बल महिला यांची फसवणुक करून त्यांची जमीन व पैसा हडपल्याने त्यांच्या सुरक्षेला मोठा धोका पोहोचविणाऱ्यावर कठोर शासन करण्याची आवश्यकता, यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १७४. | "जि. जळगांव, भडगांव तालुक्यातील, गोंडगाव येथील एका ८ वर्षांची मुलगी दिनांक २९ जुलै, २०२३ रोजी बेपत्ता झाली व दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी मुलीचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून येणे, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी भडगांव शहरात आरोपीला कठोर शिक्षा होण्यासाठी मुक मोर्चाचे आयोजन करणे, सदर घटनेचे विश्लेषण यु-ट्युब चॅनेल ध्येय न्युज, पाचोरा यावर दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सायंकाळी ०७.०० वा. प्रसारित केल्यावर स्थानिक आमदाराने संपादकास दूरध्वनीवरून अर्वाच्य भाषेत आई-वडीलांवरून शिव्या देऊन जीवे मारण्याची धमकी देणे, दिनांक ५ ऑगस्ट, | श्री. सुनिल प्रभू , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | २०२३ रोजी स्थानिक आमदारांचे नातेवाईक, हितचिंतक, गुंड व ठेकेदार इत्यादि संपादकाच्या घरासमोर जमणे, संपादकाने पोलीस संरक्षण देण्याची मागणी करूनही त्याची दखल न घेणे, भारतीय घटनेने वृत्तपत्र स्वातंत्र्याचे स्थानिक आमदाराने उल्लंघन करणे, स्थानिक आमदाराविरुद्ध गुन्हा नोंदवून कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १७५. | "जि.रत्नागिरी, ता.दापोली, कादिवली (गोपाळ वाडी) येथील जयेश रामचंद्र माने हे दिनांक १६ जून, २०२३ रोजी आपल्या मोटर सायकलने घरी परतत असताना रात्रौ ०९-४५ च्या सुमारास त्यांच्या झालेल्या निर्घुण हत्या प्रकरणाची दापोली पोलीसांनी पाच महिने होऊनही अद्याप आरोपीस अटक करणेबाबत कोणतीच कारवाई केली नसल्याचा संतापजनक प्रकार दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी निदर्शनास येणे, मृत जयेश माने हे जांबोकोड येथे राहणारे वैभव गुजर यांच्याकडे चालक म्हणून काम करीत असताना तीन महिन्यांचे थकीत वेतन वारंवार मागणी करूनही न येणे, त्यामुळे गुजर-माने यांच्यामध्ये मोठे भांडण होणे, वेतनाबाबत तगादा लावल्यामुळे रागाने वैभव गुजर यांनी वेतन देणेकरिता जयेश माने यांना फोन करून बोलावले असता माने रात्रौ त्यांच्या घरी जाणे, त्यानंतर ते परत कधीच घरी न येणे, यामुळे जयेश माने यांच्या कुटुंबियांनी वैभव गुजर यांनीच जयेशची हत्या केल्याचा आरोप करण्यात येणे, तसेच वैभव गुजर यांच्याकडे काम करणाऱ्या आतापर्यंत तीन कामगारांचा अशा प्रकारे हत्या झाल्याच्या घटना घडणे, जयेश माने यांच्या हत्येबाबतचे पुरावे पोलिसांनी आर्थिक संगनमताने नष्ट करून सदरची हत्या अपघात झाल्याचे भासवत वैभव गुजर यांना बेकायदा संरक्षण देण्याचा प्रकार घडणे, यामुळे न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या माने यांच्या कुटुंबावर झालेला अन्याय, याकडे झालेले | श्री. सुनिल प्रभू , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १७६. | "मीरा भाईंदर शहरातील गुंड प्रवृत्तीचे श्याम सुंदर अग्रवाल यांनी फसवणूक केल्याप्रकरणी चौकशी करण्यासंदर्भात गत अधिवेशनात लक्षवेधी सादर करण्यात येणे, त्यावेळी मा.गृहमंत्री यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एस.आय.टी स्थापन करण्याची घोषणा करणे, त्याअनुषंगाने एस.आय.टी.ची स्थापना करण्यात येणे, परंतु एस.आय.टी.च्या प्रमुखांपासून काही पोलीस अधिकारी माहिती लपवत असून एस.आय.टी. ला विश्वासात न घेताच कार्यवाही करीत असणे, डी.बी. मार्ग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी आरोपींना वाचविण्यासाठी घाईघाईने न्यायालायामध्ये खरी सत्यता लपवून दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ रोजी सदरचे प्रकरण ‘B’ summary (खोटा गुन्हा) असल्याने सदरचा तपास बंद व्हावा अशी याचिका दाखल करणे, त्यामुळे आरोपी व पोलीस निरीक्षक यांच्यात आर्थिक संगनमत असल्याचे स्पष्ट होणे, सदरचे प्रकरण हे एस. आय. टी. कडे वर्ग न करता ‘B’ summary (खोटा गुन्हा) असल्याचे भासवून परस्पर न्यायालयात जाणे या संदर्भात एस.आय.टी प्रमुखांची मान्यता न घेणे ही गंभीर बाब असणे, सदर प्रकरणामध्ये पोलिसांचे संगनमत असेल तर त्याची ही चौकशी केली जाईल असे आश्वासन गृहमंत्र्यांनी सभागृहात दिलेले असणे, तथापि याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करून अंडरवर्ल्ड गँगशी संबधित असलेला मोक्का आरोपी श्री.श्यामसुंदर अग्रवाल यांच्याशी आर्थिक संगनमत करणाऱ्या पोलीस निरीक्षकांना बडतर्फ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. किशोर जोरगेवार , वि. स. स. | कित्ता |
| १७७. | "महाराष्ट्रात धार्मिक तणावाच्या घटनासमोर येत असताना दिनांक ११ जून, २०२३ रोजी व त्यासुमारास | ॲड. राहुल ढिकले , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | मालेगाव येथे अंदाजे ११/०० वाजेपासुन ते दुपारी ०१/०० वा मालेगाव येथील एम.एस.जी कॉलेज, कॉन्फरन्स हॉलकॅम्प रोड येथे हिंदू मुलांचा धर्मांतराचा प्रकार उघडकीस येणे, संबंधित कार्यक्रमात हिंदू विद्यार्थ्यांची संख्या जास्त असतांना कार्यक्रमाची सुरुवात एका छोट्या इस्लामिक प्रार्थनेने करण्यात येणे, सदर कार्यक्रमात करिअर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन केलेले असणे, सदर कार्यक्रमात उपस्थित दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना आर्मी, नेव्ही, एअर फोर्स भरती, अभ्यासक्रम आदीसंदर्भात माहिती देण्याचे सोडून नमाज पठन करणे, नमाज पठन केल्यामुळे मन प्रसन्न होऊन अभ्यास करण्यास उर्जा निर्माण होते, अभ्यास करण्यासाठी व इतर कामांसाठी दिवसभरात खुप वेळ देता येतो त्यामुळे नमाज पठणाचे वेगवेगळे फायदे मिळत राहतात अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणे, तसेच एकंदरीत हिंदु धर्माविषयी तुलना करून ईस्लाम धर्म कसा चांगला आहे याबाबत माहिती देणे, कार्यक्रम संपतेवेळी मोठ्या संख्येने विविध हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी हॉलमध्ये घुसणे आणि धर्मांतराचा प्रकार उघडकीस आणणे, तसेच कार्यक्रमात पुण्यातील डिफेंस करियर इंस्टीट्यूटचे अनीस कुट्टी यांना कॉलेजमध्ये निमंत्रीत केलेले असणे आणि त्यांनी सर्व माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना देणे, मात्र अद्याप सदरील संस्थेवर पोलिसांनी कोणत्याही प्रकारची कारवाही न करणे, सदर घटनेसंदर्भात केंद्रीय बाल हक्क आयोगाने दखल घेणे आणि आयोगाने नाशिक जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस देणे, त्यानंतरदेखील अनिस कुट्टी यांच्या संस्थेवर ठोस अशी कारवाई न होणे, महाराष्ट्रासह मालेगाव शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, त्यानंतर दिनांक २ जुलै, २०२३ रोजी मोठ्या संख्येने सकल हिंदू समाजाचा हिंदू जन आक्रोश मोर्चा मालेगावात निघणे आणि तरीसुद्धा मुख्य आरोपी अनिस कुट्टी याला अटक न होणे, याप्रकरणाची राज्यभरातील | | |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नागरिक व लोकप्रतिनिधीकडून घडलेल्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १७८. | "राज्यासह देशात अनेक ठिकाणी शासन अर्थसहाय्यित मदरसे सुरू असणे, उत्तरप्रदेशमध्ये मदरस्यातून हिंदू धर्मीय मुलेदेखील राहत असल्याची धक्कादायक बाब दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, वास्तविक पहाता १४ वर्षांखालील प्रत्येक मुलाने शालेय शिक्षण घेणे गरजेचे असणे, तसेच हिंदू धर्मीय मुलांनी मदरस्यात राहणे अपेक्षित नसणे, परंतु इयत्ता १० वी आणि १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षा सहजपणे उत्तीर्ण होण्यासाठी हिंदू धर्मीय मुले मदरसा बोर्डाचा आधार घेत असल्याचे उघड होणे, त्यामुळे हिंदू धर्मीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारमय होण्याची शक्यता असणे, शिवाय स्वधर्माविषयीची आपुलकीची भावना कमी होण्याची निर्माण झालेली दाट शक्यता, यास्तव राज्यातील मदरस्याची तपासणी करून त्यात राहत असलेल्या हिंदूधर्मीय मुलांना शालेय शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. मोहन मते,<br>वि. स. स. | कित्ता |
| १७९. | "पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पांतर्गत धामणी आणि कवडासा उन्नेयी बंधारा पूर्ण भरले असून रब्बी हंगामात डहाणू आणि पालघर तालुक्यातील जवळपास १२ हजार हेक्टर शेतजमिनीला सिंचनाचे पाणी देण्यात येते, परंतु धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा असून जलसिंचन विभागाचे अधिकारी शेतकऱ्यांना सिंचनाकरिता पाणी उपलब्ध करून देत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, परिणामी स्थानिक शेतकऱ्यांच्या पिकाला पाणी मिळत नसल्याने निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल भुसारा ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८०. | "तत्कालिन जलसंपदा मंत्री यांनी सन २०२१ च्या पावसाळ्यात भेट दिली असता कानडगाव (क), बनोटी, मोहळाई, अंजना नदी, बोरमाळ तांडा, हरसवाडी, मोहरा, नागद, लगंडातांडा, बेलखेडा, नांदगांव, अमदाबाद, नागदरपूर, घाटशेंद्रा, बहिरगांव, पांगरा, वासडी, सारोळा या गावात पुराचे पाणी घुसून नुकसान होत असल्याचे निदर्शनास आल्यावर सदर ठिकाणी पूर संरक्षण भिंतीचा प्रस्ताव सादर करण्याचे दिलेले आदेश, त्यानंतर सदर आदेशानुसार प्रस्ताव सादर करण्यात येणे, सदर प्रश्न विधानसभा सभागृहात लक्षवेधी सूचनेनुसार अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ च्या अधिवेशनात मांडण्यात आला असता विद्यमान उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्त्तरात प्रस्तावित सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक कार्यालयास सादर करण्यात आला असून त्यावरील उपस्थित त्रुटीची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात येणे, त्यानंतर उपस्थित त्रुटींची पूर्तता करूनही आजतागायत त्यास अद्यापपर्यंत कोणतीच मंजूरी न देणे, यामुळे या गावांत आताही पूराचे पाणी घूसून गावकऱ्यांचे नुकसान होणे, शासनाच्या मंजुरीअभावी तेथील ग्रामस्थांना नेहमीच पूराचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता शासनाने तातडीने गावातील पूर संरक्षण भिंतीच्या प्रस्तावाना तातडीने मान्यता देऊन निधी वितरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. उदयसिंग राजपुत, वि. स. स. | कित्ता |
| १८१. | "परतूर विधानसभा मतदारसंघातील मौजे टाकळखोपा ता. मंठा जि.जालना येथील पूर्णा नदीवरील कोल्हापुरी बंधारा मागील अनेक दिवसांपासून फुटलेला असून नदी पात्रातील पाणी वाहून जात आहे त्यामुळे परिसरातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न निर्माण | श्री. बबनराव यादव (लोणीकर) वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | झाला आहे. मागील अधिवेशनामध्येदेखील या बंधाऱ्याचे उच्च पातळी बंधाऱ्यात रूपांतर करणेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता, त्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात दिलेले असताना कोणतीही निर्णय घेण्यात आला नाही. या फूटलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याचे रूपांतर उच्च पातळी बंधाऱ्यात केल्यास इंचा, टाकळखोपा, वाघाळा, तळणी, सासखेडा, दुधा, किर्ला, तुपा, दहा, दहा तांडा येथील शेतीसाठी हजारो हेक्टर सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे असे असताना शासन याबाबत गंभीर नाही असेच निदर्शनास येत आहे. या ठिकाणी उच्च पातळी बंधारा बांधकाम करण्यात आल्यास परिसरातील अनेक गावांसह परतूर शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न संपुष्टात येऊ शकतो. यासाठी लागणारा भरघोस निधी शासन स्तरावर तात्काळ मंजूर करणे अपेक्षित आहे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १८२. | "यवतमाळ जिल्ह्यातील ताडसावळी तालुका घाटंजी जि. यवतमाळ येथे निम्न पैनगंगा प्रकल्प अस्तित्वात येत असणे, मोठ्या प्रकल्पाऐवजी उच्च पातळी बंधारा तयार करण्याची शेतकऱ्यांची मागणी असणे, उच्च पातळी बंधाऱ्यामुळे २५ गावांतील सर्व शेतकऱ्यांची शेतजमीन सिंचनाखाली येत असणे, उच्च पातळी बंधारे बांधल्यास शासनाच्या कोट्यवधी रुपयांची बचत होत असणे, उच्च पातळी बंधारे बांधण्यासाठी कोणत्याही गावाचे पुनर्वसन करण्याची गरज नसणे, निम्न पैनगंगा प्रकल्पाचे रुपांतर उच्च पातळी बंधाऱ्यात व्हावे ही गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. अमिन पटेल, श्री. विश्वजित कदम, श्री. संजय जगताप, श्री. सुनिल केदार, श्रीमती सुलभा खोडके, श्री. शिरीष चौधरी, श्री. विक्रमसिंह सावंत, वि. स. स. | कित्ता |
| १८३. | "पश्चिम विदर्भातील सिंचन अनुशेषग्रस्त तसेच खारपाण पट्ट्याच्या विकासाला चालना देण्यासाठी पूर्णा नदीवरील व काटीपाटी बॅरेज प्रकल्पास केंद्र शासनाकडून बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत रुपये ३३० कोटीची | श्री. रणधीर सावरकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | निधीची उपलब्धता असणे, काटीपाटी बॅरेज प्रकल्पास कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी दिनांक १४ जुलै, २००९ अन्वये ६४.३२ कोटी रुपये किमतीस प्रशासकीय मान्यता असणे, सदर प्रकल्पावर सन २०११-१२ ते २०१९-२० दरम्यान २.५५ कोटी रुपये खर्च असून प्रकल्पाचा रु. ३४०.६० कोटी किमतीचा सुधारित प्र.मा प्रस्ताव शासनास सादर असणे, सदर सुधारित प्र.मा. प्रस्ताव व राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांना दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी सादर असणे, सदर प्रकल्पास राज्य शासनाकडून सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रतीक्षाधीन असणे, मार्च २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कपात सूचना ४०५८ अन्वये सन २०२२-२३ वर्षाकरिता सदर प्रकल्पास रु. १० कोटी रुपयाची तरतूद असणे, काटीपाटी प्रकल्प खारपाण पट्ट्यात मोडत असल्याने लाभ व्यय गुणोत्तर आर्थिक परतावा दर, सिंचन क्षेत्राची प्रती हेक्टर किंमत असे कोणतेही मापदंड लागू नसणे, सदर प्रकल्प अनुशेषग्रस्त विदर्भातील असून अकोला जिल्ह्यातील खारपाण पट्ट्यातील १८०० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार असणे, काटी पाटी प्रकल्प दीर्घ काळापासून सुधारीत मान्यतेकरिता शासनाकडे प्रलंबित असून तातडीने मान्यता देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १८४. | "राज्यात पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यामधील दुष्काळी बारा गावातील नागरिकांनी केंदूर तालुका शिरूर येथे दिनांक २१ नोव्हेंबर, २०२३ पासून साखळी उपोषण सुरू करणे, शिरूर तालुक्याच्या दुष्काळी भागातील बारा गावांच्या पाणी प्रश्नावर २००१ मध्ये मुंबईत उपोषण केले त्यावेळी केंद्र सरकारकडून १२६ कोटीची योजना मंजूर झाली होती, मात्र दहा टक्के लोक वर्गणीच्या अटीने ती अद्याप पूर्ण झाली नसणे, त्यानंतर पाठपुरावा करत नुकताच उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांना १५० कोटींची उचल पाणी योजना करंदीहून | श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | पाबळ केंदूरसाठी शक्य असल्याचा अहवाल सादर करण्यात येणे, सदर अहवाल अद्याप शासनाकडे प्रलंबित असल्याने ही बारा गावे दुष्काळीच असणे, त्यामुळे केंदूर तालुका शिरूर येथे साखळी उपोषणकर्त्यांनी नवव्या दिवशी हि उपोषण सुरू ठेवणे, तसेच शिरूर तालुक्यातील दुष्काळी बारा गावांसाठी कळमोडी धरणावरून किंवा डिंबे कालव्यावरून बारा गावाच्या पाण्याची योजना शक्य असल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये केंदूर, पाबळ, कान्हूर, मलठण, हिवरे, मिडगूलवाडीसह बारा दुष्काळी गावांना पाणी मिळणार असणे, त्यामुळे या बारा गावातील शेतकऱ्यांनी साखळी उपोषण सुरू ठेवत पुढे तीव्र उपोषण करण्याचा इशारा दिलेला असणे, त्यामुळे शिरूर तालुक्याच्या दुष्काळी भागातील बारा गावांच्या पाणी प्रश्नाबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १८५. | "माहे नोव्हेंबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास मु. पो. रामराज (ता.अलिबाग, जि. रायगड) येथील साबरकुंड मध्यम धरण प्रकल्पाला १९८२ मध्ये ११ कोटी ७१ लाख खर्चासह शासनाने मंजुरी दिल्याची बाब उघडकीस येणे, अद्यापी सदर प्रकल्पाच्या निर्माणास सुरुवात न होणे, इतक्या वर्षांच्या अक्षम्य विलंबाने प्रकल्प खर्चात ७५० कोटी रुपयापर्यंत झालेली अभुतपूर्ण वाढ, या प्रकल्पामुळे अलिबाग तालुक्यातील ३३ गावातील २५२८ हेक्टर जमिन सिंचनासाठी येणार असणे, प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन भुसंपादनाचा मोबदला शासकीय नियमाप्रमाणे मिळण्याची होत असलेली मागणी, पालकमंत्री यांनी ९ डिसेंबर, २०२२ रोजी या प्रकरणी सर्व संबंधित विभागांची जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेली बैठक २५ डिसेंबर, २०२२ रोजी सर्व ग्रामस्थांनी जलसंपदा मंत्री यांना आपल्या मागण्याचे निवेदन सादर करणे, म. वि. आ. सरकारने मे, २०२० मध्ये झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये या साबरकुंड | श्री. महेंद्र दळवी , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | मध्यम धरण प्रकल्पाच्या ७४२ कोटी ८८ लाख रुपयांच्या सुधारित अंदाजित खर्चास दिलेली प्रशासकीय मान्यता, संपूर्ण अलिबाग तालुक्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्प अभावी तालुक्यातील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी, भात शेती, फळबाग शेती व अन्य पिकांच्या सिंचनासाठी कोणतीही उपाययोजना नसल्याचे गेल्या ४० वर्षात फक्त मान्यता दिल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आल्याने रायगड जिल्ह्यातील लाखो नागरिकांचा शासनावरील उडालेला विश्वास, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. | | |
| १८६. | "नंदुरबार जिल्ह्यातील सिंचनाचा विकास विहित कालावधीत न झाल्याने तेथील जनतेला सतत दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत असणे, जिल्ह्यातून प्रमुख तापी नदी वाहत असणे, मात्र इतर जिल्ह्याप्रमाणे नंदुरबार जिल्ह्यात शासकीय सिंचन योजना नगण्य असणे, सन २००७-२००८ साली तापी नदीवरील सारंखेडा सुलवाडा प्रकाशा येथे बॅरेज उभारले असणे, पूर्ण क्षमतेने पाणीसाठा होत असणे, मात्र बंद पडलेल्या उपसा सिंचन कार्यान्वित नसणे, परिणामी नंदुरबार जिल्ह्यातील अत्यंत सुपीक परंतु पाण्यावाचून वंचित राहिलेल्या उर्वरित क्षेत्राचा पूर्णपणे विकास झाला नसणे, तसेच शहादा तालुक्यातील गोमाई मध्यम प्रकल्प तत्कालीन शासनाच्या कुचकामी धोरणामुळे रद्द झालेला असणे, गोमाई नदीवर बॅरेज बांधण्यासाठी शासनाकडे मागणी होत असणे, बॅरेज प्रकल्पामुळे तालुक्यातील १४ गावातील ८० टक्के आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतजमिनी सिंचित होणे, परिणामी प्रलंबित सिंचन प्रकल्पामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, प्रकल्पास शासनाने तांत्रिक मंजुरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजेश पाडवी , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८७. | "खडकवासला संयुक्त प्रकल्प प्रणालीमध्ये खडकवासला, पाणशेत, वरसगाव, टेमघर या चार धरणांचा एकूण पाणीसाठा २९.१५ टिएमसी असणे, या पाणीसाठ्यातून दरवर्षी नियोजनाप्रमाणे नविन मुठा उजवा व डावा कालव्याद्वारे इंदापूर, बारामती, दौंड, हवेली तालुक्यातील शेती सिंचनासाठी व पिण्याच्या योजनांसाठी, पुणे शहर पिण्यासाठी पाणी तसेच जाणाई शिरसाई उपसा सिंचन, सनसर जोडकालव्याला पाणीपूरवठा होत असणे, गेल्या २ दशकांपासून पुणे शहराचा विस्तार वेगाने झाला असता, ठरवून दिलेल्या कोट्यापेक्षा जास्त वापर होत असणे, याचा परिणाम इंदापूर, दौंड तालुक्यातील शेती सिंचन क्षेत्रावर होत असणे, इंदापूर तालुका हा अवर्षणग्रस्त तसेच टेलला असल्यामुळे दरवर्षी पाणी कोट्यापेक्षा कमी मिळत असणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, मुळशी व मावळ तालुक्यात टाटा पॉवर कंपनीने स्वातंत्र्यपूर्व काळात ६ धरणे वीज निर्मितीसाठी बांधलेली असणे, सध्या वीज निर्मिती मोठ्या प्रमाणावर इतर स्त्रोतातून उपलब्ध होत असणे, विशेषत: टाटा जलविद्युत प्रकल्पातून वळविण्यात येणारे पाणी भीमा या तुटीच्या खोऱ्यात पिण्यासाठी व सिंचनक्षेत्रासाठी उपलब्ध होणेसाठी शासनाकडून समिती गठीत करण्यात येत असणे, या गठीत केलेल्या तज्ञ सुर्वे समितीचा अहवाल तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, यामुळे पुणे शहरासह खडकवासला कालवा साखळीस पाण्याची उपलब्धता होणार असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. दत्तात्रय भरणे , वि. स. स. | कित्ता |
| १८८. | "रत्नागिरी जिल्ह्यातील पोयनार पाटबंधारे योजना तसेच खेड तालुक्यातील न्यू मांडवे प्रकल्प सन १९९४ सुरू होऊनही अद्याप दोन्ही प्रकल्प अपूर्ण अवस्थेत असणे, भूसंपादन, शेतकऱ्यांचा मोबदला, बाधित होणारे शेतकरी तसेच स्थानिक जनता आजही मूलभूत सोयी- | श्री. योगेशदादा कदम , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सुविधांपासून जसे की, वाड्या-वस्त्या रस्ते, शाळा, आरोग्य, वीज व पाणी यांसारख्या बाबींपासून वंचित राहणे, त्याच प्रमाणे न्यू मांडवे प्रकल्पांमुळे १५ ते २० टंचाईग्रस्त गावांना त्याचा लाभ मिळणार असून, हजारो हेक्टर जमीन ओलीताखाली येणार असली तरी वरील दोन्ही प्रकल्प मागील ३० वर्षे रखडलेले असणे, त्यामुळे या बाधित लोकांचे अद्याप ही कायमस्वरुपी पुनर्वसन न होणे, तसेच आर्थिक मोबदला न मिळणे, त्यामुळे या जनतेत शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र नाराजी, त्यामुळे असे झाले नाही तर येत्या काळात प्रकल्पग्रस्त जनता आंदोलन करण्याच्या पवित्र्यात असणे, शासनाच्या अशा अनास्थेमुळे रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील न्यू मांडवे प्रकल्प तसेच पोयनार पाटबंधारे योजनेच्या प्रकल्पांतर्गत राहणाऱ्या जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १८९. | "राज्यात चिबड, पाणथळ व क्षारयुक्त जमिनींचे प्रमाण वाढणे, IRD माध्यमातून सदर जमिनीच्या निर्मुलन कार्यक्रम आखणे, दौंड तालुक्यातील उक्त शेतजमिनीचे सर्वेक्षण पूर्ण करून प्रस्ताव सादर करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी करणे, सुधारित धोरण राबविण्याबाबत व नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत कार्यवाही होत नसणे तसेच पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्प ते लोणी काळभोरपर्यंत बंदनळी कालव्याचा प्रस्ताव मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने कालव्याच्या पाण्याची नासाडी होणे, यासाठी २००० कोटीचा खर्च अपेक्षित असणे याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित असणे, खडकवासला कालवा, चाऱ्याची दुरवस्था झालेली असणे, दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर असणे, जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्याने परिसरातील ४० हून अधिक गावांना दुष्काळाचा सामना करावा लागणे, या योजनेचा ८५८.०८ कोटीचा चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव तयार | ॲड. राहूल कुल,<br>श्री. जयकुमार गोरे ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | करण्याची कार्यवाही प्रलंबित असणे, वॉल्व, विमोचक, जोडणी आहेत त्या ठिकाणी गंज लागण्याचे प्रमाण मोठे असल्यामुळे पाण्याची गळती होणे, उक्त प्रकल्पास आशियन बँकेच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन प्रकल्पासाठी निधी देण्याची तयारी दाखविणे, कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समूहास वीज निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्प्या टप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास गट गठीत करण्यात आलेला असणे, सुर्वे समितीचा अहवाल प्रलंबित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १९०. | "वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनीपैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हे. जमीन जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्याचा प्रस्ताव मा. कार्यकारी अभियंता, भातसा धरण, व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांनी जा.क्र.भाधव्यवि/प्रशा-४/२३४३/सन २०२०, दिनांक १५ सप्टेंबर, २०२० अन्वये मा.जिल्हाधिकारी जि.नाशिक या कार्यालयास सादर करण्यात येणे, त्यानुसार उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, जि.नाशिक यांनी पत्रक्र. भूसंपादन/कावि/९६२ दिनांक ६ ऑक्टोबर, २०२० अन्वये "सदर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नसल्याचे व सदर जमिनीचे प्रचलित शासन निर्णयानुसार जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यास हरकत नसल्याचे" प्रमाणपत्राची मागणी करण्यात येणे, त्यानुसार सदर प्रकरणी ना-हरकत प्रमाणपत्र देणेसाठी शासनाकडून मान्यता मिळणे करिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे पत्र क्र.कोंपाविम/तां-३/वैतरणा जलविद्युत/२६७४/सन २०२० दिनांक २९ ऑक्टोबर, २०२० अन्वये शासनास सादर करण्यात येणे, त्यानुसार नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनीपैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हेक्टर जमिनीपैकी सनं.२७/१ | श्री. हिरामण खोसकर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नागोसली, ता. इगतपुरी, जि.नाशिक मधील ७ एकर २८ गुंठे क्षेत्रापैकी १.४८ एकर जमिन ही नागोसली ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी बांधकाम व इतर सुविधांसाठी जमिनी प्रचलित रेडी रेकनरनुसार दर आकारुन कायम स्वरुपी हस्तांतरीत करण्यास व उर्वरित अतिरिक्त ६२२.६२ हेक्टर जमिन महसूल विभागाचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करून जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे कामी " ना हरकत प्रमाणपत्र " देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास शिफारस करण्यासाठी मंजूरी देण्यास नियामक मंडळाची एकमताने मान्यता देण्यात येणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी सतत पाठपुरावा करून मा.मंत्री, जलसंपदा यांनी दिनांक २५ जुलै, २०२० रोजी वैतरणा जलविद्युत प्रकल्पाचा केलेल्या दौऱ्यादरम्यान अतिरिक्त जमीन मूळमालकांना परत देण्याची केलेली मागणी, परंतु अद्यापही यावर कोणतीच कार्यवाही न झाल्याने या जमिनीच्या मूळ मालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १९१. | "सातारा जिल्ह्यातील गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन (जिहे कठापूर) या योजनेअंतर्गत माण तालुक्यातील दुष्काळी भागातील सिंचनापासुन वंचीत असलेल्या गावांचा समावेश नव्याने करण्यात आला असणे, यासाठी शासनाने पाणी मंजूर करण्याची नितांत आवश्ययकता असणे, सदर गावांचा प्रकल्पात समावेश करुण प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन तसेच त्यास लागणाऱ्या निधी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी होत असणे, या वर्षी दुष्काळी परीस्थीतीत आंधळी धरणात पाणी साठा झाला नसल्याची बाब निदर्शनास येणे, सदर धरण जिहे कठापूर प्रकल्पाद्वारे भरून समावेश केलेल्या गावांना दुष्काळपासून मुक्त करण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. जयकुमार गोरे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १९२. | "राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होणे, राज्याच्या धरणातील पाणीसाठा ६६ टक्क्यावर येणे, मराठवाड्यातील जिल्ह्यात बहुतांश भागात पाणीटंचाई जाणवणे, शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढण्याची शक्यता असणे, नागरिकांवर भटकंतीची वेळ येणे, मराठवाड्यात १४१ टँकरने पाणीपुरवठा केला जात असणे, लातूर जिल्ह्यातील धरणात ३५-४० टक्के पेक्षा कमी पाणीसाठा असणे, मांजरा प्रकल्पावर पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून असलेल्या लातूर, केज, धारूर, कळंब आणि आंबेजोगाई ही शहरे व इतर १७ गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागणे, तत्कालीन विभागीय महसूल आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी यासाठी सन २०५० पर्यंतच्या संभाव्य लोकसंख्येसाठी ४.० टीएमसी पाणी आरक्षण प्रस्ताव कृष्णा खोऱ्यातील उजनी प्रकल्पातून मंजुरीसाठी शासनास सादर केलेला असणे, अंतर खोरे पाणी वापराला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती असल्याने पाणी मिळण्याची शक्यता नसणे, कोकण खोऱ्यातील वळण योजनांच्या आधारित मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प प्राथमिक अवस्थेत असणे, इतर कोणत्याही खोऱ्यातून लातूरला पाणी वाहन करणे शक्य नसणे, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी शासनाने १९.२९ टीएमसी पाणी वापरास मान्यता प्रदान केली असणे, गोदावरी पाणी तंटा लावदाची खोरे/उपखोरे अंतर्गत वापरावर बंदी नसणे, एकात्मिक कृत राज्य जल आराखड्यानुसार पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या गावांना प्राधान्याने पाणी देण्याची तरतूद असणे, भविष्यातील पाण्याची टंचाईने गंभीर रूप धारण करणे, पाण्याची सुरक्षितता निर्माण करण्याची गरज असणे, अवलंबित नागरिकांना नैसर्गिक हक्काचे पाणी देण्याबाबत शासनाचा निर्णय झाला नसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने पाणी आरक्षण देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. धिरज देशमुख, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १९३. | "शासनाने राज्यातील खाजगी बागायतदार व सहकारी पाणीपुरवठा संस्था यांची पाणीपट्टी आकारणी ही घनमापन पद्धतीने करणेबाबत आणि त्यासाठी सर्वांना जलमापक यंत्र बसविणे अनिवार्य केले असणे, सध्याचा ऊस बागायती क्षेत्रासाठी असणारा रुपये ११२२/- प्रति हेक्टरी दर हा रुपये ११३००/- प्रति हेक्टरी असा आकारणी केला जाणार असून २० टक्के लोकल फंडासह रुपये १३६०८/- प्रति हेक्टरी अशी वसुली होणार असल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणार असणे, त्यामुळे ही दरवाढ शेतकऱ्यांना मिळणारी नसून शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य उद्ध्वस्त करणारी असणे, राज्यातील शेतकरी अडचणीत असताना फक्त महसूल वाढविण्यासाठी काढलेला हा आदेश शेती व्यवसायास मारक आहे आणि त्याची सक्तीने अंमलबजावणी करणार असाल तर सर्व शेतकऱ्यांच्या खाजगी आणि सहकारी पाणीपुरवठा संस्था शासनाने त्यांची कर्जे भागवून आणि योग्य ती किंमत निश्चित करून आपल्या ताब्यात घ्याव्यात, तसेच शासनाने त्यांचा सर्व वार्षिक खर्च करावा आणि कालव्याद्वारे दिल्या जाणाऱ्या माफक दराने पाणीपट्टी आकारून शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर पाणीपुरवठा करावा, कर्नाटक सरकार त्यांच्या शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा करते तसे आपल्या सरकारने शेतकऱ्यांना किमान पाणीपुरवठा तरी मोफत करावा, राज्यातील सहकारी पाणीपुरवठा संस्थांच्या शासकीय पाणीपट्टी दरामध्ये केलेली वाढ रद्द करणे व जलमापक यंत्र बसविण्याची सक्ती रद्द करणेबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री.पी.एन.पाटील, वि. स. स. | कित्ता |
| १९४. | "राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाच्या दिनांक २८ जून, २०२३ रोजी शासन निर्णयानूसार महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांना बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियमानूसार जलसंपदा विभागातील | श्री. विक्रमसिंह सावंत, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना करण्यात येणे, परंतू पुणे विभागाचे मुख्य अभियंता श्री. हनुमंत गुणाले यांची बदली झाली असताना देखील ६ महिन्यांपासून पुणे विभागाचा पदभार सोडला नसणे, मागील ६ महिन्याच्या कालावधीत बदली आदेशानंतरही पुणे जलसंपदा विभागांतर्गत अंदाजे ३ ते ३.५ हजार कोटीच्या निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन त्यास त्यांनी मान्यता देणे, अशाप्रकारे बेकायदेशीर पदभार असताना सुध्दा इतकी मोठी निविदांना मंजूरी देण्यात आल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याची जनमानसात होत असलेली चर्चा, परिणामी आम जनतेत राज्य शासनाबाबत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून बेकायदेशीरपणे निविदा मंजूर करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्याविरुध्द याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १९५. | "रुख्माई कोल वॉशरीला महिन्याकाठी एक लाख ६५ हजार टन कोळसा वॉश करून महाजन कोला देण्याबाबत सांगण्यात येणे, मुंगोली, पैनगंगा, निलजई व पवनी या कोळसा खाणींचे डीओ रुख्माईला दर महिन्यात देण्यात येणे, मागील महिन्यात कोराडी व भुसावळ वीज केंद्रात ग्रेड जी १३ ऐवजी जी १५ चा कोळसा पोहोचल्याने रुख्माईची रॅक लोडिंग थांबविण्यात आली असणे, त्यामुळे वॉशरीत दोन लाख टन कोळसा जमा झालेला असणे, या प्रकरणी कोणतीही चौकशी व कार्यवाही न करता सर्व सेटिंगच्या माध्यमातून पुन्हा लोडिंग सुरू करण्यात येणे, स्वच्छ कोळशाचा वापर केल्यास वीजनिर्मिती संच अधिक क्षमतेने काम करतो, प्रदुषण कमी होते आदि कारणे देत महानिर्मितीने पुन्हा स्वच्छ कोळसा वापरणे सुरू करणे, यासाठी यंदा राज्य खनिकर्म महामंडळाने निविदा काढून हे काम हिंदू महामिनरल, एसीबी, रुख्माई या खाजगी कंपनींना देण्यात येणे, रिजेक्ट कोलच्या नावाखाली दर्जेदार | श्री. सुनिल केदार,<br>श्री. अस्लम शेख,<br>श्री. सुभाष धोटे ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कोळसा खुल्या बाजारात विकूण करोडो रूपयांचा घोटाळा करण्यात येणे, महाजन कोला रॅकद्धारे पाठविण्यात येणारा कोळसा नित्कृष्ट दर्जाचा असून त्यात दगड व वरून बारीक कोळशाची भुकटी टाकली जात असणे, हा सगळा गोरखधंदा महाजनकोच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोल वाशरी कडून करण्यात येणे, या प्रकरणाची वारंवार तक्रार होऊन सुद्धा कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसल्याने नागरिकात पसलेले तीव्र असंतोष परिणामी या प्रकरणी एसआयटीद्वारे चौकशी करण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १९६. | "महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ ते महावितरण कंपनीपर्यंतचा कार्यकाल पाहता जे तळागाळात कार्यरत असणाऱ्या लाईनस्टाफ कर्मचारी यांच्या ज्वलंत प्रश्नासंदर्भात प्रशासनस्तरावर मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व मा.संचालक मानव संसाधन स्तरावर दोन बैठका होऊनही लेखी स्वरुपात कोणताही ठोस निर्णय न झाल्याने महाराष्ट्र राज्य वीज लाईन स्टाफ बचाव कृती समिती यांनी हिवाळी अधिवेशन २०२३ दरम्यान आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संजय गायकवाड, श्री. मोहनराव हंबर्डे, श्रीमती जयश्री जाधव, श्री. राजु आवळे, श्री. ऋतुराज पाटील, वि. स. स. | कित्ता |
| १९७. | "राज्य शासन कृषी धोरण २०२२ च्या निधी अंतर्गत महावितरण हिंगोलीने गोरेगाव-\| & गोरेगाव- \|\| सेक्शन सेनगाव S/Dn, हिंगोली डिव्हिजन हिंगोली सर्कल नांदेड झोन अंतर्गत शेती पंपाकरता विद्युत जोडणी कामाच्या निविदा माहे जानेवारी, २०२३ मध्ये काढून ही अद्याप पर्यंत सदर कामे सुरू न झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे शेती पंप धारक शेतकरी आपल्या हक्काच्या वीज जोडणी पासून वंचित असल्याने शेती पंपधारकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान | श्री. तान्हाजी मुटकुळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | होत असून सर्वत्र नाराजी व्यक्त होणे, महावितरण ने काढलेल्या निविदा क्रमांक ४० व ४१ ज्या कंपनीला मिळाल्या त्या कंपनीवर नियमाप्रमाणे कारवाई करून लागणाऱ्या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांची ही चौकशी करण्याची मागणी जनतेतून होणे, उक्त कंपनीचे कंत्राट रद्द करून हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक कंपनीला या शेतीपंपाचे काम देण्यासाठी पुन्हा नव्याने निविदा काढून तात्काळ देण्याबाबत व उक्त मागणीनुसार, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १९८. | "राज्यातील चंद्रपूर जिल्हा स्थित चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशन येथे आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये एकाच कंत्राटदाराला सुमारे १० कोटींची कामे कोणत्याही निविदा स्पर्धेविना मिळाली असणे, चंद्रपूर वीज केंद्रात अँशबंडसह करण्यात येणाऱ्या विविध कामात दरवर्षी कोट्यवधीचा निधी खर्च केला जात असणे, सदरहू कामे दरवर्षी एकाच कंत्राटदाराला वारंवार मिळत असल्याचे निदर्शनास येणे, यात CSTPS मधील काही अधिकारी कंत्राटदारांसोबत भागीदारीत काम करीत असल्याचे निदर्शनास येणे, चंद्रपूर वीज केंद्राच्या वसाहत परिसरात असलेल्या रुग्णालयाच्या इमारतीचे नूतनीकरण करण्याचा प्रस्तावाला मंजुरी मिळाली असून या कामाचे सुमारे लाखो रुपये किंमतीचे कंत्राट त्याच कंत्राटदाराच्या घश्यात घालण्याचा पर्यंत संबंधित अधिकाऱ्यांकडून सुरू असल्याचे माहे सप्टेंबर २०२३ रोजीचे सुमारास निदर्शनास येणे, निविदा प्रक्रियेमध्ये स्पर्धा होत नसल्याने यात शासनाचे मोठे नुकसान होत असणे; चंद्रपूर वीज केंद्रातील कामांच्या निविदांमधील व्याप्त गैरव्यवहार, भ्रष्टाचार व सावळागोंधळ प्रकरणी तक्रार करूनही संबंधित यंत्रणा/शासनामार्फत अद्यापी कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने, सर्वसामान्य जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुभाष धोटे, श्री. सुनिल केदार, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री . अमिन पटेल, श्री. विकास ठाकरे, श्री. विश्वजित कदम, श्री. संजय जगताप, श्रीमती सुलभा खोडके, श्री. शिरीष चौधरी, श्री. विक्रमसिंह सावंत, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १९९. | "दीपनगर, तालुका भुसावळ येथील थर्मल पॉवर स्टेशनच्या राखाडमुळे आजूबाजूच्या शेतकऱ्याचे होणारे नुकसान, प्रकल्प सुरू करताना स्थानिकांना रोजगाराचे दिलेले आश्वासन, CSR फंडातून होणारे कामाचे अव्यवस्थित वितरण, प्रकल्पबाधित योजनाची मर्यादा ५km पर्यंत असणे, जुने २१०KW चे संचातून निर्माण होणाऱ्या राखेचे प्रदूषण, तसेच राख मिश्रित पाणी तापी नदी पात्रात जाणे, फ्लाय ऍशची मोठ्या प्रमाणावर होणारी अफरातफर, फ्लाय ऍश बल्कर मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय महामार्गाच्या सर्विस रोड वर उभे करणे, फ्लाय ऍश ओव्हरलोड भरण्यासाठी आजूबाजूच्या शेतात फ्लाय ऍश एक बल्कर मधून दुसऱ्या बल्कर मध्ये भरताना होणारा प्रचंड राखेंचा धूरळा तयार होणे त्यामुळे प्रदूषण व अपघाताची शक्यता याकडे होणारे दुर्लक्ष, पॉड अँश बाबत वेल्हाळे गावा जवळील तलावाचे होणारे नुकसान, पॉड अँशच्या पाईप मुळे शेतकऱ्यांना जाण्या-येण्यासाठी होणारा त्रास, पॉड अँशला प्रचंड मागणी असल्याने वेल्हाळे गावाजवळील शेतामध्ये राखेचे साठे करणे परिणामी आजूबाजूच्या शेताचे होणारे नुकसान कालांतराने लोकांना श्वसनाचा त्रास, सदर पॉड अँश उघड्या लॉरी तुन होणारी वाहतूक, प्रचंड ओव्हरलोड गाड्यामुळे होणारे रस्त्याचे नुकसान, रस्त्यासाठी लोकांच्या तक्रारी लोकप्रतिनिधी कडे कारणे, लोकप्रतिनिधीनी विविध जबाबदार संस्थाकडे तक्रारी करणे परिणामी लोकांमध्ये पसरलेला असंतोष आणि द्वेषची भावना यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संजय सावकारे , वि. स. स. | कित्ता |
| २००. | "धानोरा १३२ के. व्ही. स्टेशनचे काम मंजूर असून Mesars Bhuvneshwari electrical & Contractor यांना या कामाचा दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असणे, तद्नंतर ही सदरचे कंत्राटदार काम सुरू करण्यास टाळाटाळ करत असणे, सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता (प्रकल्प) | श्रीमती लताबाई सोनवणे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अउदा बांधकाम विभाग म.रा. विद्युत पारेषण कंपनी, मर्यादित जळगांव, व कार्यकारी अभियंता (स्था) अउदा स्था. बां.व.सु. विभाग, जळगांव यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तोंडी व लेखी सुचना देवूनही संबंधीतांनी कारवाईस होत असलेले दुर्लक्ष व कंत्राटदारास पाठीशी घालण्यात येणे, तथापी कार्यकारी अभियंता (स्था) उदा स्था. बां.व.सु. विभाग, जळगांव यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजी चे पत्राद्वारे संबंधीत कंत्राटदार यांनी वैयक्तीक अडचणींमुळे हे काम करण्यास असमर्थता दर्शवून काम वेळे आधी बंद करण्याबाबत विनंती केलेली असणे, तसेच सदरचा कंत्राट रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यालय महापारेषण मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेली असणे, शासनाने उक्त प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांची व ठेकेदाराची चौकशी करून दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच धानोरा १३२ के.व्ही.स्टेशनचे काम तातडीने पुर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २०१. | "गोंदिया जिल्ह्यांतर्गत गोंदिया तालुक्यामध्ये कृषी पंपाधारकांनी वीजमागणीचे डीमांड भरणे, अर्ज केलेले ५००० विजजोडणी प्रकरणे प्रलंबीत असणे, ५०० पेक्षा जास्त कृषी पंपधारकांच्या रोहीत्रांची क्षमतावाढ तथा २०० नविन रोहीत्रांची मागणी असणे, रावणवाडी उपकेंद्राची तात्काळ क्षमतावाढ गरजेची असुन ACF तांत्रीक मान्यता मिळुन देखील निधी अभावी काम सुरू झालेले नसणे, गोंदिया ग्रामीणमध्ये चंगेरा व बटाना येथे नविन उपकेंद्राला मंजुरीची गरज असणे, जिल्ह्यामध्ये रात्रीला हिंस्त्र प्राण्याचा संचारामुळे कृषीपंपाना दिवसा १२ तास विजपुरवठा करणे, कृषी पंपधारकांना प्रती युनीटऐवजी प्रतीहॉर्स पावरप्रमाणे बील आकारण्याची मागणी असणे, गोंदिया शहरातील प्रलंबीत भूमीगत विजवाहीन्याची कामे पूर्ण करणे, गोंदिया व गोरेगाव | श्री. विनोद अग्रवाल, श्री. विजय रहांगडाले, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | तालुक्यांना मुंडीपार १३२ केव्ही उपकेंद्रावरुन विजपुरवठा करण्यात येणे, सदर उपकेंद्रामध्ये बिघाड झाल्यास गोंदिया तालुक्यात अंधार होणे, गोरेगाव येथे नविन १३२ केव्हीच्या उपकेंद्राची उभारणी करून गोरेगाव तालुका मुंडीपार उपकेंद्रामधुन वगळण्यात येणे, गोंदिया ग्रामीणमध्ये विजग्राहक जास्त असल्याने रावनवाडीला नविन उपविभाग सुरू करणे, जिल्ह्यातील विजवितरण कंपनीकडे तांत्रीक मनुष्यबळाचे कमतरतेमुळे विजपुरवठयावर विपरीत परिणाम होणे, घरगुती विज वापराचे युनीटमध्ये दरवाढीसह विज गळतीच्या अधिभाराचा भुर्दंड सामान्य नागरिकांवर येणे, नागरिकांमध्ये वारंवार खंडीत होणारा विजपुरवठा, विजबीलाचे दरवाढीमुळे तथा निधी अभावी प्रलंबीत कामांमुळे असंतोष पसरलेला असणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २०२. | "सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्याची भौगोलिक रचना सध्याचे ग्राहक संख्या व प्रलंबित ग्राहकांची संख्या या तालुक्यात मोठ्या संख्येत असल्याने उपकेंद्र व फीडर लक्षात घेता अक्कलकोट येथे महावितरणचे अतिरिक्त नवीन उपविभागीय कार्यालयाची निर्मिती करणे अत्यंत गरजेचे असून तसा प्रस्ताव महावितरणच्या मुख्य कार्यालयास सादर करण्यात आला आहे त्यास तातडीने मंजुरी मिळावी अशी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांची मागणी असणे, तसेच RDSS योजनेअंतर्गत अक्कलकोट विधानसभा क्षेत्रात अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर, वितरण रोहित्रे, नवीन ३३ k.v. उपकेंद्रे प्रस्तावित केली असून यामध्ये किणी, अक्कलकोट शहर, भुरीकवठे येथे अतिरिक्त पावर ट्रान्सफर व बोरोटी (बुद्रुक), कर्जाल धोत्री (दोड्डी), गंगेवाडी येथे नवीन ३३ k.v. उपकेंद्र प्रस्तावित असून सदर कामे तात्काळ मंजूर करून कामे सुरू करण्याची येथील शेतकऱ्यांची मागणी असणे, | श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अक्कलकोट तालुका हा दुष्काळी तालुका म्हणून गणला जात असल्याने या तालुक्यात अनेक विजेच्या समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने येथील समस्या कायमस्वरूपी सोडवणे गरजेचे असणे, त्यामुळे अक्कलकोट येथे महावितरण कंपनीचे नवीन उप विभागीय कार्यालय मंजूर करून अक्कलकोट तालुक्याला शासनाने न्याय देण्याची जनतेतून मागणी होत असणे, यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २०३. | "महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादीतमार्फत (महाजेनको) कोल इंडियाच्या (SECL) कुसमुंडा, गेवरा व दिपका या तीन डेपोमधून १० लाख मेट्रीक टन कोळशाचा पुरवठा करण्यासाठी रोड कम रेल्वे (RCR) या तत्वावर निविदा मागविण्यात येणे, सदर निविदा प्रक्रियामध्ये एकंदरीत नऊ कंपन्यांनी सहभाग घेणे, त्यापैकी मे.बीकेबी ट्रान्सपोर्ट प्रा.लि.व मे.कोहली रोडलाईनस अनुक्रमे एल-१ व एल-२ ठरणे,महाजेनकोने झारखंडच्या मे.बीकेबी ट्रान्सपोर्ट प्रा.लि.यांना दिनांक १६ मे, २०२३ रोजी लेटर ऑफ अवार्ड (LOA) देणे,महाजेनकोने सदर कंपनीस बँक हमी व Additional Performance Security म्हणून सुमारे ७० कोटी इतकीरक्कम ७ दिवसात भरण्याबाबत कळविणे,परंतु सदर कंपनीने अद्यापपर्यंत सुरक्षा रकमेचा भरणा केलेला नाही व पुरवठाही सुरू केलेला नसणे, मे.बीकेबी ट्रान्सपोर्ट प्रा.लि.व मे.कोहली रोडलाईनस् यांनी अत्यंत कमी दराने निविदा भरल्यामुळे या दराने काम करणे सदर कंपन्यांना शक्य झालेले नसणे,सदर कंपन्यांनी आर्थिक क्षमता नसताना, कमी किंमतीच्या निविदा भरल्या असल्याचे दिसून येणे, कोळशाचा पुरवठा न झाल्यामुळे, महाजनकोचे कोट्यांवधीचे नुकसान होणार असून सदरच्या नुकसानीस वरील कंपन्या जबाबदार असणे, नियमांकडे दुर्लक्ष करून ६५.२१ कोटी रुपयांची सुरक्षा रक्कम थेट माफ करणे | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. धिरज देशमुख , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | तसेच मे.बीकेबी ट्रान्सपोर्ट प्रा.लि.ला केवळ फायद्यासाठी ४.५२ कोटी रुपये भरपाई म्हणून देण्याचे आदेश जारी केले असणे, या नुकसानीबाबत सदर कंपन्यांना दंड करून तसेच त्यांना काळ्या यादीत टाकून नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच कोळसा पुरवठा सुरळीत करण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २०४. | "शेतकऱ्यांची असलेली बुलडाणा जिल्हा बँक दिलेल्या कर्जाची वसुली नसल्याने बँक अवसायनात निघणे, केंद्र शासन, राज्य शासन व नाबार्ड यांचेकडून प्राप्त झालेल्या अर्थसहाय्यातून बँकेने परवाना टिकवून ठेवला असला तरी परवाना प्राप्त झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्यासाठी ठेवीदारांकडून पाठपुरावा सुरू असल्याने बँकेची पत टिकवून ठेवण्यासाठी ठेवीदारांच्या मागणीनुसार त्यांना ठेवी परत करणे, बँकेस काही प्रमाणात नवीन ठेवी प्राप्त होवून सुद्धा पूर्वीच्या ठेवीदारांना मोठ्या प्रमाणात ठेवी परत केल्यामुळे ठेवींमध्ये रु. १२९.७७ कोटीची घट होणे, बँकेच्या ठेवीदारांच्या परत केलेल्या ठेवी, जास्त नफा मिळवून देणाऱ्या कर्जात झालेली वाढ व व्यवस्थापन खर्च लक्षात घेता बँकेस प्राप्त झालेला निधी वरील आवश्यक त्या ठिकाणी खर्च झालेला असून बँकेचा व्यवसाय वाढविण्यासाठी सद्य:स्थितीस बँकेस ठेवी किंवा Soft Loan या स्वरुपात निधीची अत्यंत आवश्यकता असल्याने, राज्य शासनाकडून रु. ३००.०० कोटीच्या Soft Loan मिळण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करणे, यातुन बँकेचा संचित तोटा भरला जावून बँक सुस्थितीत येवून निरनिराळे उत्पन्नाचे स्रोत निर्माण होणे, त्यातून व्यवसायवृद्धी होवून संचित तोटा कमी करून बँकेच्या नफ्यात वाढ होण्याची शक्यता यासाठी बँकेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार शासनाचे Soft Loan उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती श्वेता महाले , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०५. | "राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सेवाग्रामला दोन वर्षापासून संवर्धन निधी देण्यास राज्य सरकारकडून टाळाटाळ करण्यातयेत असून जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत दरवर्षी १० कोटी रूपये उपलब्ध करून देण्याच्या शासकीय आदेशाची जिल्हा प्रशासनाकडून पायमल्ली होत असल्याची माहिती माहे नोव्हेंबर, २०२३ च्यासुमारास निर्देशनास येणे, राज्य सरकारच्या नियोजन विभागाने दिनांक २९ जून, २०२२ रोजी सेवाग्राम जिल्हा वर्धा विकास आराखडा अंतर्गत राष्टपिता महात्मा गांधी एक अनुभुती या विशेष कार्यक्रमाला मंजुरी प्रदान करून त्याप्रमाणे शासकीय परिपत्रक प्रसिद्ध करणे, या कार्यक्रमाअंतर्गत सेवाग्राम येथे इअर ॲक्टिव्ह प्रदर्शन, थ्री डी मल्टिमिडीया, चरखा भवन, महात्मा गांधी यांचे शिल्प, आर्चाय विनोबा भावे यांचे शिल्प, आंतरराष्ट्रीय ग्रंथालय, प्रदर्शनीभवन, चौकांचे सौंदर्यीकरण, यात्रीनिवास, धाम नदींवरील सौंदर्यीकरण आदी सुविधांचे निर्माण करण्यात आले असून या सर्व सुविंधाची देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी विशेषबाब म्हणून दरवर्षी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून १० कोटी रूपये निधी देण्याबाबतचे आदेश असतांनासुध्दा अघापहीनिधी उपलब्ध करून देण्यातआलेले नसणे, लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, वर्धा यांना लेखीनिवेदन देऊन उपरोक्त निधी उपलब्धकरून देण्याची मागणीकरणे, तरीसुद्धा जिल्हाधिकाऱ्याकडून अद्यापही निधी उपलब्ध करून देण्यात आलेले नसल्यामुळे सेवाग्राम येथील विकास कामे ठप्प पडलेले असल्याने नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी राष्टपिता महात्मा गांधी यांच्या सेवाग्रामला दोन वर्षापासून संवर्धन निधी तातडीने मिळण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल केदार,<br>श्री. अस्लम शेख,<br>श्री. सुभाष धोटे ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०६. | "गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा या चारही जिल्ह्यातील राईस मिल धारकांनी गुणवत्ता नियंत्रक अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक आदिवासी विकास महामंडळ व मार्केटींग फेडरेशन यांच्यासोबत संगनमत करून भरडाईसाठी राईस मिलला मंजूरी देताना मोठ्या प्रमाणात गैरप्रकार, धानखरेदीत, मिलिंगमध्ये, लॉट वाटपात करोडो रुपयांनी घोटाळा करणे, बनावट बँक गँरटीवर करोडो रूपयाच्या धानाची भरडाई करणे, राईस मिलकडून भरडाई केलेला तांदुळ पुरवठा न करता त्या ऐवजी तेलंगणा व छतीसगड राज्यातून नित्कृष्ट, कमी भावाचा व खाण्या अयोग्य तांदुळ आणून पुरवठा करणे, वडसा येथील एका राईस मीलकडे विद्युत पुरवठा नसताना सुध्या दोन वर्ष मिलिंग केली असल्याचे दाखवून त्याला करोडो रुपये देण्यात येणे, देसाई गंज परिसरातील राईस मील सह गडचिरोली जिल्ह्यातील राईस मीलला मिलिंगसाठी देण्यात आलेले धान आणि त्यांना आलेली विद्युत देयके याची तपासणी केल्यास विद्युत वितरण कंपनीसह शासनाची फसवणूक करणे, आरमोरी व कुरखेडा येथील गोदाम अधिकाऱ्याची बदली व अतिरिक्त कार्यभार देताना करण्यात आलेली अनियमतता, गुन्हे दाखल करण्याबाबत, देसाई गंज येथील चार राईस मिलवर कार्यवाही करण्याबाबत गडचिरोली जिल्ह्याधिकारी यांना वरिष्ठ अधिकाऱ्याकडून पत्र येऊन सुध्या अद्यापही कार्यवाही झालेली नसणे, लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी जिल्हाधिकारी गडचिरोली, मंत्री व प्रधान सचिव अन्न व नागरी पुरवठा विभाग यांच्याकडे तक्रार केली असताना चौकशी करण्यात आलेली नसल्यामुळे नागरिकांत पसरत असलेले तीव्र असंतोष या प्रकरणाची एसआयटी मार्फतीने चौकशी करून कारवाई होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल केदार,<br>श्री. अस्लम शेख,<br>श्री. सुभाष धोटे,<br>श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०७. | "राज्यातील शासनाच्या स्वस्त धान्य द्वार पोहोच योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकानापर्यंत वाहनाद्वारे पोहचविण्याचा जळगांव जिल्ह्याचा कंत्राट लातूर येथील राज ट्रान्सपोर्ट नावाच्या कंपनीने घेतलेल्या असून हा कंत्राट घेत असतांना शासनाने घालून दिलेल्या अटी शर्ती जशा की, वाहनास जीपीएस असणे आवश्यक , वाहनाचे फिटनेस करणे आवश्यक, वाहनाचा विमा असणे आवश्यक, तसेच योजनेअंतर्गत करीत असलेल्या वितरणाच्या नोंदी ठेवणे व कुठल्याही प्रकारचा करारनामा नसणे, इतर सर्व अटी शर्तीचा भंग करून संबधित कंत्राटदार कंपनी हा कंत्राट राजरोसपणे चालवित असून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करणे, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करâन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. चंद्रकांत पाटील, वि. स. स. | कित्ता |
| २०८. | "राज्यात शासनाने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केलेली असणे, परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळालेला नसणे, त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला असणे, शेतीवर बोजा चढवला असल्याने शेतकऱ्यांना वाटणी करता येत नसणे, त्यामुळे खरेदी-विक्री करणे ही शक्य नसणे, राज्यात गेल्या वर्ष दोन वर्षांपासून अतिवृष्टी, अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या शेतमालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असणे, त्यामुळे शेतकरी अजूनही आर्थिक संकटात सापडलेला असणे, तसेच राज्यात महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी योजनेत पात्र असणाऱ्या सुमारे साडेसात लाख शेतकऱ्यांना अद्यापही अनुदान मिळालेले नसणे, व सुमारे साडेचार लाख जिल्हा बँकेचे खातेदार व राष्ट्रीयकृत बँकांचे सुमारे तीन लाख कर्जदार अद्यापही अनुदानाच्या प्रतीक्षेत असणे, महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी सन्मान योजनेअंतर्गत नियमित कर्ज भरलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते, पण या शासनाने | श्री. कुणाल पाटील, श्री. अशोकराव चव्हाण, डॉ. राजेंद्र शिंगणे वि. स. स | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | सदर अनुदान अद्यापही दिलेले नसणे, राज्यातील २३ लाख ५० हजार शेतकरी त्यास पात्र असून सदर शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यासह प्रोत्साहनपर अनुदान तातडीने देण्याची आवश्यकता असणे, परंतु शासनाचे या बाबींकडे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, व प्रोत्साहनपर अनुदान तातडीने देण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २०९. | "छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या, आदर्श नागरी महिला सहकारी बँकेत २०१६ ते २०१९ काळातील गैरव्यवहार उघडकीस येणे, बिनातारण कॅशक्रेडीट कर्ज वाटप केल्याचे लेखापरिक्षक यांनी फिर्याद करणे, कर्ज देताना तारण घेतलेली मालमत्ता कर्ज रकमेएवढी नसणे, कर्ज रकमेचा ७/१२ वर बोजा नसणे, कर्ज एकाच्या नावे उचलने दुसरे कर्ज नावावर असल्यामुळे चेक पत्नीच्या बचत खात्यावर जमा करून रक्कम उचलणे, एकच प्रॉपर्टी मॉर्गेज केलेली असणे, कर्ज प्रकरणामध्ये नोटरीद्वारे इक्विटेबल मॉर्गेज करणे, रजिस्टर मॉर्गेज नसणे, बँकेत, पतसंस्थेत लोकांच्या ठेवी अडकलेल्या असणे, बँकेचे ठेवीदार रामेश्वर नारायण इथ्थर यांनी आत्महत्या करणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे ४० ते ४५ लोकांच्या नावे १०० कोटी रु. कर्ज परस्पर उचलणे, बँकेकडून नोटिस आल्यानंतर आपल्या नावे कर्ज असल्याचे कळणे, त्या कर्जदारा पैकी काही जण मृत व या बँकेशी कधीच संबंध आलेला नसणे, कर्ज खात्यासाठी संचालकाने स्वतःचा च मोबाइल क्रमांक व कागदपत्रांवर खोट्या स्वाक्षरी करणे, हे कर्जदार व्यक्ति हातगाडी,भाजी विक्रेते, नौकरी, मोलमजुरी करणारे असणे, पतसंस्था, बँकेमध्ये अडकलेल्या ठेवीदारांमध्ये व परस्पर नावे कर्ज उचललेल्या कर्जदारामध्ये असंतोष असणे, लोकांचा | श्री. हरिभाऊ बागडे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सहकार क्षेत्रावरील विश्वास कमी होणे, खातेदारांच्या ठेवी परत मिळणे बाबत व कर्जदारांच्या नावावर असलेले कर्ज बेबाकी मिळण्यासाठी असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २१०. | "मुंबई उपनगर बोरीवली मधील अनेक गृहनिर्माण सोसायट्या अद्याप कन्व्हेयन्स डिडपासून वंचित असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, जमीन मालक आणि विकासक यांना इमारतीच्या जमिनीची मालकी सोडायची नसल्याने सोसायटीच्या नावे कन्व्हेयन्स डिड होत नसल्याचे आढळून येणे, या संदर्भात सहकार विभागाने धोरण आखण्याची आवशक्यता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनील राणे , वि. स. स. | कित्ता |
| २११. | "अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंक लि. मध्ये अल्पमतात असलेले अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचेव्दारे नियमबाहय, मनमानी, भ्रष्ट कारभारामुळे अंदाजे २५०० कोटी रुपयाच्या सभासदांच्या मुदती ठेवी ला धोका निर्माण होणे, संचालक मंडळाच्या सभेत अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचे बहुमत नसतांना गैरकायदेशीपणे समित्यांचे गठण करून विविध विषयांना मान्यता देणे व त्यास संचालक मंडळाची कोणतीही मान्यता नसणे, संचालकांना इतिवृत्त किंवा माहिती हेतुपुरस्पर उपलब्ध करून न देणे, राज्यात बँकेच्या कार्यकारी समितीचा कोरम ५० टक्के च्या आत नसतांना सदर बँकेमध्ये आवश्यक ८ ऐवजी ६ संचालकाचा अवैधरित्या कोरम करून नियमबाहय कामकाज सुरू असणे, दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या कार्यकारी समितीची विसावी सभेमधील विषय सुचीतील विषय क्र. ११ अनुषंगाने अवैधरित्या गठीत कार्यकारी समितीने प्राप्त अर्जापैकी मर्जीतील ११०५ जणांना वैयक्तीक सभासद करून पदाचा दुरुपयोग करणे, या गंभीर बाबी बॅकेचे नियंत्रक असलेले श्री कहाळेकर, विभागीय सहनिबंधक, अमरावती यांचेकडे वेळोवळी लेखी निदर्शनास आणूनही | श्री. बळवंत वानखडे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बाळासाहेब थोरात, श्री. अमित झनक, श्री. सुनिल केदार, श्री. राजेश एकडे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अद्याप या नियमबाहय कामकाजाची चौकशी न करता नियमानुसार कार्यवाही न करणे, अवैध कार्यकारी समितीच्या माध्यमातुन अध्यक्ष व उपाध्यक्ष नियमबाहय कामकाज करून बँकेला आर्थीकदृष्टया डबघाईस आणीत असतांना याकडे नियंत्रक म्हणून विभागीय सहनिबंधक यांचे हेतूपुरस्पर समर्थन व याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २१२. | "पेण अर्बन बँक यांच्या रायगड जिल्ह्यामध्ये १५ व मुंबई मध्ये ३ अशा एकूण १८ शाखा असणे, सदर बँकेमध्ये ७५८ कोटी रुपयांचा महाघोटाळा झाल्यामुळे दिनांक २३ सप्टेंबर, २०१० रोजी रिझर्व बँकेने निर्बंध आणल्याने सदर बँक बंद होणे, या बँकेमध्ये एकूण १ लाख ९८ हजार ठेवीदार असून सदर बँकेत ४२ हजार भागधारक असणे, सर्व ठेवीदार व भागधारक यांना न्याय मिळवून देण्यासाठी पेण अर्बन बँक संघर्ष समिती स्थापन केलेली असणे, सदर समितीने वारंवार शासनाकडे न्याय मिळण्याबाबत मागणी केलेली असणे, पेण अर्बन बँक बंद झाल्यामुळे अनेक लोकांचे संसार उध्वस्त झाले असून मानसिक तणावामुळे आजपर्यंत जवळपास ४०० लोकांचा मृत्यु झालेला असणे, त्याच प्रमाणे सदर बँकेतील हजारो ठेवीदार व खातेदार आर्थिक संकटात सापडणे व त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत असणे, याप्रकरणी चौकशी करून पेण अर्बन बँक ठेवीदार व खातेदार यांना योग्य तो न्याय मिळवून देण्यात यावा अशी मागणी कर्जत येथील लोकप्रतिनिधींनी मा. सहकार मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी व तत्पूर्वी अनेक वेळा केलेली असणे, शासनाने याप्रकरणी विशेष लक्ष देऊन पेण अर्बन बँक ठेवीदार व खातेदारांना न्याय मिळवून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. महेंद्र थोरवे , वि. स. स. | कित्ता |
| २१३. | "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती या योजनेंतर्गत नियमितपणे परतफेड करणारे शेतकऱ्यांना | श्री. प्रकाश आबिटकर, श्री. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | रु.५० हजारापर्यंत प्रोत्साहनपर अनुदानाचा निर्णय घेणे, कोल्हापूर जिल्ह्यातील पीक कर्जाची नियमित परतफेड करणारे व योजनेमध्ये पात्र असणारे शेतकरी तांत्रिक कारणाने वंचित राहणे, जिल्ह्यात सन २०१५-१६ ते सन २०२१-२२ यावर्षी बँकेच्या हंगामानुसार नियमित कर्ज उचल करून परतफेड करणे, तथापी, त्यांनी सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या आर्थिक वर्षात २ हंगामाची उचल एकच आर्थिक वर्षात करून हंगामासाठी निश्चित केलेल्या परतफेड तारखांना कर्जफेड केलेली असून सुद्धा सदर शेतकरी या योजनेपासून वंचित रहाणे, अशी खाती सुमारे २८ हजार असून ६८ हजार शेतकरी वंचित असणे, काही शेतकऱ्यांनी सन २०१७-१८, सन २०१९-२० या ३ आर्थिक वर्षात एकवेळ कर्ज उचल करून विहित मुदतीत परतफेड करणे, सन २०१७-१८ पूर्वी व सन २०१९-२० नंतर कर्ज उचल केलेली आहे व ती मुदतीत परतफेड केलेली असणे, तरीही शेतकरी योजनेपासून वंचित रहाणे, यापूर्वी झालेल्या सर्व कर्जमाफी योजनेंपासून हे शेतकरी वंचित राहिल्याने या शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरणे, नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या व तांत्रिक त्रुटींमुळे अपात्र झालेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री महोदय यांचेकडे करणे, अशा वंचित लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ देण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | चंद्रकांत पाटील , वि. स. स. | |
| २१४. | "राज्यात पालघर जिल्ह्यामध्ये मुंबई-बडोदा महामार्गाच्या भरावासाठी साखरे धरणातील गाळ वापरण्याची परवानगी प्रशासनाने ठेकेदार मोटे कार्लो या कंपनीला दिली असतांना सदर कंपनीने धरणातील गाळ काढण्याऐवजी डहाणू तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी, डोंगर व टेकडया पोखरुन माती उत्खनन केले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, उक्त ठेकेदारांनी | श्री. विनोद निकोले , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रशासनाने उत्खनन केल्याच्या निषेधार्थ डहाणूवासियांनी काम बंद करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयावर मोर्चा काढलेला असणे, त्याअनुषंगाने शासनाने सखोल चौकशी करून दोषी ठेकेदारांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २१५. | "मौ.शेज बाबुळगाव (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथे श्री.भाऊसाहेब पाटील यांनी काही स्थानिक राजकीय नेते व नोंदणी विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या संगनमताने मूळ मालकाची जमीन बनावट कागदपत्रे तसेच खरेदी खताच्या आधारे स्वतःच्या नावावर करणे, सदर प्रकार संबंधित जमिनीचे मूळ मालक श्री.सुहास साळुंखे व श्री.विकास साळुंखे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी मोहोळ तालुक्याचे नोंदणी दुय्यम निबंधक श्री.धनंजय गोरे, श्री.गोविंद गीते, सह जिल्हा निबंधक तसेच पोलीस निरीक्षक श्री.विनोद घुगे व सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे यांच्याकडे तक्रार करणे, श्री.गोरे यांनी तत्काळ पोलीस फिर्याद देणे अपेक्षित असताना आरोपीच्या संगनमताने तक्रार दाखल करण्यास दिरंगाई करणे, सह जिल्हानिबंधक श्री.गीते यांनी तत्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊनही श्री.गोरे यांनी १ महिना इतक्या विलंबाने फिर्याद दाखल करणे, यामुळे आरोपी श्री.पाटील मूळ जमीन मालक श्री.साळुंखे यांना तक्रार मागे घेणे बाबत धमकी देणे, पोलीस तपास अधिकारी श्री.झाल्टे व दुय्यम निबंधक श्री.गोरे यांनी देखील तक्रारदारांवर दबाव टाकणे, तक्रारदार मराठवाडा भागातील रहिवासी असल्याने मोहोळ तालुक्यातील त्यांच्या मालकीची जमीन भविष्यात विकू देणार नाही अशी धमकी देणे, तक्रारदारावर तक्रार मागे घेण्यासाठी दबाव आणल्यामुळे दबावाला बळी पडून सदर जमिनीचे उलट खरेदी खत उरकण्यात येणे, याप्रकरणी सखोल | श्री. विजय वडेट्टीवार , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | चौकशी करून संबंधित दोषी प्रशासकीय अधिकारी व दुय्यम निबंधक श्री.गोरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करून मोहोळ पोलीस स्टेशन येथे दाखल फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २१६. | "मुंबईतील कांदिवली (प) येथील चारकोप परिसरातील सुमारे ११६ एकर भूखंड औद्योगिक वापरासाठी दिलेला असतानाही या भूखंडाचा वापर बार, रेस्तराँ, कापड दुकाने आदिंसाठी केला जात असणे, या शासकीय भूखंडाचा औद्योगिक वापर करण्याचा आदेश महसूल विभागाने सन १९६१ मध्ये निर्गमित करणे, त्यानुसार १५० भूखंड औद्योगिक वापरासाठी वितरित करण्यात आले, दरम्यानच्या काळात हे भूखंड प्रति चौ. मीटर ६६ रुपये दराने कब्जे हक्काने व काही अटी शर्तींच्या अधीन राहून प्रदान करण्याचे आदेश देणे, २००४ मध्ये ही वसाहत उद्योग विभागाकडे हस्तांतरीत करून तिचे व्यवस्थापन म.औ.वि.म.कडे सोपविणे, म.औ.वि.म.ने या शासकीय औद्योगिक वसाहतीचे हस्तांतरण कांदिवली को-ऑप. इंडस्टिर्यल इस्टेटकडे सोपविणे, त्यानंतर या ठिकाणी औद्योगिक वापर वगळून या भूखंडाचा वापर अनधिकृतरित्या सुरू असलेले रेस्तराँ, बार, लॉज, कपड्याचे शोरूम तसेच अनेक अनधिकृत बांधकामांसाठी होणे, या अनधिकृत बांधकामांमध्ये अनेकांनी कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक करणे, औद्योगिक वापर वगळता अन्य व्यवसाय सुरू करताना जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेता शासकीय भूखंडाकरिता थेट पालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाकडून परवानगी घेणे, याकडे मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेले दुर्लक्ष, शासकीय भूखंडाचा अन्य वापर करताना वा विक्री करताना ५० टक्के अनर्जित रक्कम जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा न करणे तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची परवानगी न घेणे, परिणामी शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. योगेश सागर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | बुडणे, याप्रकरणी तक्रार दाखल करूनही महसूल अधिकाऱ्यांकडून कारवाईबाबत दिरंगाई करण्यात येत असणे, यासंपूर्ण प्रकरणात कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार होऊन महसूल, उद्योग तसेच मुंबई महानगरपालिकेचे बरेच अधिकारी यात गुंतले असल्याचा संशय, याबाबत सखोल चौकशी करून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २१७. | "राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रतिबंध लावण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन केलेली होती, मात्र त्या समितीचा जणू फज्जा उडाला असणे, भद्रावती तालुक्यातील तिरवंजा परिसरात माफियांकडून हजारो ब्रॉस अवैध गौण खनिजाचे उत्खनन झाल्याची तक्रार नागरिकांनी केली असता माफियांना वाचविण्यासाठी महसूल विभागाचे अधिकारी यांनी ज्या परिसरात गौण खनिजाचे अवैध उत्खनन झाले तो चेक तिरवंजा परिसर सोडून तिरवंजा मोकासा येथील परिसरातील उत्खनन मोजमाप करण्याचे आदेश दिल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, यामुळे शासनाच्या कोट्यावधी रुपयांचा महसूलाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, सदरहू प्रकरणात अवैध गौण खनिज माफिया जेवढे दोषी आहे त्यापेक्षा जास्त महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी सुद्धा दोषी असणे, वनविभागाच्या परिसरातील महसूल जागेवर गौण खनिज उत्खननाची परवानगी देणेच गैर आहे मात्र कुठलीही शहानिशा न करता ही परवानगी देण्यात आली आणि वनविभागाच्या जमिनीतून सुद्धा गौण खनिज उत्खनन करण्यात आल्याची शंका असल्याने या संदर्भात वनविभागाने चौकशी करण्याची आवश्यकता असणे, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय निष्पक्ष चौकशी करून दोषींना कठोर शासन करण्याची आवश्यकता असणे, याकडे जिल्हा प्रशासनाचे/शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे विभागातील सर्वसामान्य | श्री. सुभाष धोटे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | जनतेत शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २१८. | "पुणे जिल्ह्यामधील भोर तालुका डोंगर पायथ्याशी वसलेले असून सदर ठिकाणी पर्जन्यमान हे तुलनेने अधिक असून, तसेच भौगोलिक रचना ही डोंगराला लागूनच आहे. विकासकांनी डोंगर-उतार फोडून/उत्खनन करून राष्ट्रीय नैसर्गिक साधन संपत्तीचे नुकसान करून, सर्व शासकीय नियम पायदळी तुडवत, अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात रिसॉर्ट, हॉटेल्स व बंगले बांधण्यात आले आहेत. तसेच विकासकांनी डोंगर माथ्यावर व टेकडीच्या उतारावर बांधकामास परवानगी नसल्याचे न्यायालयाने दिलेल्या आदेशाची पायमल्ली झाली असून विकासकांनी शासनाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या आद्यदेशाला पूर्ण हरताळ फासला जाणे, त्यामुळे माळीण गाव सदृश दुर्घटना घडून जीवित व वित्तीय हानी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे भोर तालुक्यातील अनेक गावांच्या सुरक्षतेचा प्रश्न एरणीवर आला असणे,  हे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिसत नसणे सदर दोन्ही तालुक्यातील भविष्यात काही दुर्घटना घडल्यास त्याला जिल्हाधिकारी व शासन जबाबदार राहिले असून, तरी याची चौकशी करून सर्व शासकीय नियम धाब्यावर बसवुन अनधिकृतपणे बांधलेल्या रिसॉर्ट, हॉटेल्स, बंगले यांचे करीत असलेल्या बांधकामावर स्थगिती आदेश देण्यात यावेत आणि विकासकावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी या लक्षवेधी मार्फत मी शासनाचे लक्ष वेधीत आहे, यावर शासनाने याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. दिलीप लांडे , वि. स. स. | कित्ता |
| २१९. | "गर्व्हनर व बेरार यांनी दिनांक ०७ मे, १९४२ रोजी उमरी ता. केळापुर जि. यवतमाळ येथील स.नं. ३३ मधील १४ एकर ३१ गुंठे जमीन फ्रि मेथेडीस्ट मिशन उमरी यांना टी.बी. हॉस्पीटलसाठी लिजवर देणे, स.नं. ३७ मधील | श्री. मदन येरावार, श्री. नामदेव ससाणे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | १३ एकर १० गुंठे जमीन शाळा व होस्टेलचे बांधकामासाठी दिलेली असणे, स.नं. ३८ मधील ५ एकर २५ गुंठे जागा तलावासाठी दिलेली असणे, टी.बी. हॉस्पीटल बंद पडल्यानंतर परवानगी न घेता इंग्लीश मेडीअम स्कुल सुरू असणे, वापराचा मुळ उद्देश बदलल्यामूळे SDO केळापुर यांचेकडे प्रकरण दाखल करणे, शर्त भंग झाल्याने SDO यांनी जमीन शासन जमा करणेबाबत आदेश पारीत करणे, जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी SDO केळापुर यांचा आदेश कायम ठेवने, तसेच मा. उच्च न्यायालय यांचे आदेशावर जिल्हाधिकारी यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२२ ला आदेश पारीत करून अपीलार्थी संस्थेचा अर्ज फेटाळने व संस्थेकडे टी. बी. हॉस्पीटल, तलाव, शाळा होस्टेल करीता अर्जित जमिनीचा वापर त्याच प्रयोजनाकरीता करण्यात आला नसल्याने न्यायालयाने जमीन शासन जमा करणेचा आदेश दिला असतानाही प्रशासनाने कोणतीही कारवाई केलेले नसणे, काही अधिकाऱ्यांनी पैशांची देवाणघेवाण केल्याचीबाब निदर्शनात येणे, यासंदर्भात चौकशी लावण्याची मागणी होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २२०. | "ठाणे जिल्ह्यातील तालुका ठाणे मौजे-बाळकुम विभागात शेतकऱ्यांच्या जमिन मिळकतीमध्ये बेकायदेशीर फेरफार नोंदी करण्यात आलेबाबत तेथील अनेक शेतकऱ्यांनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ रोजी अधिक्षक भुमिअभिलेख पोलीस उपायुक्त व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रारी दाखल केले असतांना तहसिलदार भूअभिलेख रेकॉर्ड शाखा यांच्या विभागात पिकपाणीच्या उताऱ्यामध्ये बेकायदेशीर नोंदी घेऊन बनावट पिकपाणीचे उतारे घडवून संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांनी गैरव्यवहारातून गैरप्रकार करून बाळकुम माजीवाडा तथा घोडबंदर रोडवरील जमिनींमध्ये बिल्डरांचा करोडो रुपयांचा फायदा केलेला आहे मौजे-बाळकुम स्थित | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सोनीबाई बाळ्या पाटील यांना जुना सर्व्हे क्रं. ९३/२१ ही जमिन गटबुक गुणाकार बुक आकारबंद व हिस्सा फॉर्म नं. ४ प्रमाणे फेरफार क्रं. २५०८ ने मिळालेले असतांना तात्कालीन तलाठ्यांनी विना फेरफार तिन्हाईत ईसमांचा सातबारा घडवुन आणल्याने या प्रकरणाची पोलीस उपायुक्तांमार्फत सखोल चौकशी करण्याची आवश्ययकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २२१. | "ठाणे महानगरपालिका हद्दीतील मौजे-माजीवाडा या जमिनीमध्ये विशेष नगर वसाहत उभी करत असताना मौजे-माजिवाडा येथील फेरफार क्रं. ५२६, ५७१, ६२१, ६३२ पाहता वर्मा कुटुंबियांनी १५ वर्षाच्या गहाणखताने जमिन घेणे,सदर जमिन खालसा करण्यात येऊन माजिवाडा टेनेंन्ट फर्मिंग सोसायटी यांना कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदी खताने जमिन शासनाने देणे,परंतु १९९९ नंतर कॅपस्टोन कंपनीने त्याठिकाणी खरेदी विक्री चालू करत असतांना ४४ वर्षाचे विलंब मुदत माफ करून माजिवाडा टेनेंन्ट फर्मिंग सोसायटीचे खरेदी दस्त रद्द न करता नाव कमी करून विकासक कॅपस्टोन कंपनीला ही जागा डेव्हंलप करण्यासाठी शासनाची परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करून वर्मा कुटूंबियांचे सातबाऱ्यावरील इतर हक्कात नोंद घेतल्यानंतर तात्काळ भोगवटदार सदरी नोंद घेऊन कॅपस्टोन कंपनीला जमिन विकण्यात येणे, या जमिन प्रकरणातील गैरप्रकार पाहता फेरफर क्रं. १३९९ मध्ये कुठल्याही प्रकारचे आदेश हुकूम झालेले नसल्यामुळे तात्कालीन तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करून फेरफारामध्ये बेकायदेशीर नोंदी केल्याने विकासकाने याचा पुर्ण फायदा घेऊन बनावट पध्दतीने झालेल्या टायटल शिर्षक बेकायदेशीर असणे,शासनाने विशेष नगर वसाहतचा दर्जा न देण्यासाठी तथा तो दर्जा रद्द करण्यासाठी शासनाकडून तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २२२. | "ठाणे जिल्ह्यातील भुमि अभिलेख विभागात अनेक मिळकत पत्रीकांसह चुकीच्या पद्धतीने चौकशी नोंद करून सातबाऱ्यावरील भोगवटदार व कुळखातेदारांची खातरजमा न करता मिळकतपत्रीका घडवण्यात येणे,मौजे-नारपोली येथील मिळकतपत्रीका क्रमांक ८२०५ ते ८०३२ व ८४५२ ते ८४५४ तथा ७९२८ ते ८२३७ अश्या मिळकतपत्रींका घडवत असतांना जुने १९७० पासूनचे सातबाऱ्याची खातरजमा न करता चुकीच्या पद्धतीने भूमापन करण्यात येणे, मुळ खातेदाराची खातरजमा न करता त्याठिकाणी मिळकतपत्रिका घडवण्यात येणे, काळुराम पांडुरंग धापसी यांच्या पुर्वजांवरुन तिन्हाईत व्यक्तीच्या झालेल्या चुकीच्या नोंदीमुळे अनियमिततेमुळे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे , वि. स. स. | कित्ता |
| २२३. | "राज्यांत बहुसंख्य आदिवासी जिल्ह्यातील आदिवासी जमिन मिळकतीसाठी मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक १२०/२०१० व सन २०१३ मध्ये आदिवासी शासन निर्णय २०१३/प्रकरण क्रमांक २५ प्रमाणे मा उच्च न्यायालय व शासनाकडून आदिवासी जमिन मिळकतीबाबत निर्देश मिळालेले असणे, जुन्या १९७५ पासूनचे आदिवासी जमिन मिळकतीमध्ये कलम ३६ ची परवानगी न घेतलेल्या अशा बिगर आदिवासी प्रकरणांमध्ये पुनर्विलोकन करून संबंधित बिगर आदिवासींचे फेरफारांच्या नोंदी कमी करणेसाठी दिनांक ४ डिसेंबर, २०२३ रोजी मा.जिल्हाधिकारी, ठाणे व जिल्हाधिक्षक, भुमिअभिलेख यांना आदिवासी नागरीकांनी तक्रार दिली असून तक्रारीबाबत कोणतीही पुनर्विलोकनाखाली कोणतीच कारवाई होत नसल्याकचेदिसुन येणे,शासनाने या प्रकरणांची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| २२४. | "ठाणे जिल्हा ग्रामिण नोंदणी विभागामधील मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ५३ (अ) व कलम २८ प्रमाणे कारवाई करणेसाठी नोफिल पटेल या तक्रारदाराने दिनांक २७ नोव्हेंबर, २०२३ रोजी नोंदणी महानिरीक्षक तथा नोंदणी उपमहानिरीक्षक यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात येणे, सदर तक्रारीवरून विभागाकडून कोणतीच कारवाई केली नसल्या्ने तक्रारदाराने व इतर नागरीकांनी अभय योजनेखाली त्यांचे दस्त अभिनिर्णित करणेसाठी कमी पडलेले मुद्रांक शुल्क भरणेसाठी वारंवार सांगणे, संबंधित विभागाकडून अभय योजनेखाली मुद्रांक शुल्क आकारून तात्काळ नागरीकांना नोटिसीअंती माहिती देऊन मुद्रांक शुल्क भरून घेत नसल्याने शासनाचा महसूल बुडत असणे, मुद्रांक शुल्काबाबत शासनाने घ्यावयाची भूमिका, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |
| २२५. | "धुळे जिल्ह्यातील तालुका धुळे, नांदाळे खुर्द गावांमधील शेतकऱ्यांच्या काही जमिनीमध्ये बेकायदेशीर फेरफारांची नोंद होणे, फेरफार क्रमांक ५२५, ६६२ व त्यापुढील इतर फेरफार तत्कालीन तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी गैरव्यवहारातून गैरप्रकारे नोंद घेतल्याने मौजे-नांदाळे खुर्द जुना सर्व्हे क्रंमाक ६० मध्ये अनियमितता व अनेक बेकायदेशीर त्रुटी निर्माण होणे, या सर्व फेरफारांचे उपविभागीय अधिकारी यांनी पुनर्विलोकनाची कारवाई होणे गरजेचे असल्याने त्याचप्रमाणे सदर प्रकरणामध्ये विकासकांनी कोणतीच तपासणी न करताच बनावट शेतकऱ्याकडून जमिन खरेदी केली असणे, सदर खरेदी व्यवहार हा बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे जे मूळ शेतकरी आहेत त्यांच्या जमिनीमध्ये बेकायदेशीर फेरफार झाले आहेत त्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळण्याकरिता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २२६. | "राज्यत शासनाच्या महसूल विभागातील नोंदणी विभागामध्ये जमीन व सदनिका व्यवहारामध्ये अनेक जुने दस्तांची नोंदणी होणे अथवा अभिनिर्णित होणे, बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असून जुने अभिनिर्णित व इतर जुने दस्त यांच्यावरती दंडात्मक कारवाई दोनशे पट असल्याने दस्तधारक घाबरुन दस्त नोंदणी अभिनिर्णित करीत नसणे, कमी पडलेला मुद्रांक शुल्क भरत नसल्याने मुद्रांक शुल्काच्या व आकारण्यात आलेल्या दंडात सुट माफी मिळावी म्हणुन महाराष्ट्रातील असे दस्त अभिनिर्णित झाल्यास महाराष्ट्र शासनाला वीस हजार कोटी रुपये पर्यंतचे उत्पन्न या मुद्रांक शुल्क मिळण्याची शक्यता असणे, शासनाने तात्काळ दंडात्मक कारवाई माफ करून सहा महिन्यासाठी अभय योजनेची धोरणात्मक तरतुद तात्काळ करण्याळची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे , वि. स. स. | कित्ता |
| २२७. | "भिवंडी ता.जि. ठाणे येथील गेल्या चार वर्षात दिवाणी न्यायालयाकडून वारसाने दाखल करणे कामी दिलेल्या आदेश दिवाणी वारस प्रमाणपत्रामधील मौजे-भरोडी व कोलिवलीतील सर्व सर्व्हे नंबरसाठी पुनर्विलोकन घेण्यासाठी व टेमघर येथील सर्व्हे क्रमांक १२५ व इतर २०१६ मध्ये कुठलाही फेरफार न टाकता कमी केलेल्या नावाचे अंमल देणे कामी कामत घर सर्व्हे क्र. १३५/२ मध्ये नाव कमी करण्यासाठी सख्ख्या बहिण कुटूंबदारांची जबाब प्रतिज्ञापत्र न घेता फेरफार क्रं. १७०३ ने बहिणींची नोंद कमी केल्याने पुनर्विलोकन घेऊन नव्याने बहिणींची नावे वारसाने दाखल करणे कामी व इतर शेतकऱ्यांची लाखीवली व इतर सहा गावे यांचे वारसांची नावे दाखल करणे कामी अनेक शेतकऱ्यांनी अर्ज केले असणे, भिवंडीतील अनेक जमीन मिळकतीत कुटूंब प्रमुखांनी भाऊबंधकी व बहिणींचे वारस लपवून प्रतिज्ञापत्र सादर करून सात-बारा सदरी वारस लावतांना प्रतिज्ञापत्रात वारसांची माहिती लपवल्यास कलम १९८, १९९, २०० व | श्री. राजु आवळे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | १९३/२ प्रमाणे शिक्षेसपात्र राहू असे जमीन मिळकतीतील कुटूंब प्रमुखाने प्रतिज्ञापत्र दिल्याने अशी खोटी माहिती देऊन व लपवून प्रतिज्ञापत्रावरून फेरफार टाकणाऱ्यांचे फेरफार रद्द करून वारसांची फेरचौकशी होण्यासाठी प्रधान सचिव, महसुल विभाग यांच्याकडे दिनांक १३ डिसेंबर, २०२१ रोजी रोहिदास तरे यांच्या तक्रारीवरुन पुनर्विलोकनाचे आदेश महसुल मंत्री यांनी दिले असल्यामुळे अशा खोट्या प्रतिज्ञापत्रांमुळे अर्ध न्यायिक प्रकरणे वाढविणे, या प्रकरणांची समस्या कमी होण्यासाठी उप विभागीय अधिकारी तथा तहसिलदार यांच्याकडे तात्काळ पुनर्विलोकनाचे कायदेशीर कामकाजासाठी शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी पुनर्विलोकनाचे कामकाज प्रक्रिया राबवण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय अवलंबून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २२८. | "मुंबई उपनगर जिल्हा व ठाणे जिल्ह्यातिल भूमि अभिलेख विभागातील मिळकत पत्रीकेवरील चौकशी नोंदप्रमाणे नोंदी घेत असतांना अनेक नोंदी चुकीच्या पध्दतीने घेण्यात येणे, चौकशी नोंदीवरून मिळकत पत्रिका घडवण्यात आल्या परंतु तत्पूर्वी सदर मिळकत पत्रिका म्हणजे महसुल विभागातील सातबारा हाच मूळ भोगवटदार यांचे मिळकत कार्ड असणे, परंतु मिळकत पत्रिकेवरती नोंदी तबदील करते वेळेस सातबाऱ्यावरील फेरफार जागेवरील कब्जा आकारबंद याचा सखोल अभ्यास न करताच काही चुकीच्या मिळकत पत्रीकेच्या नोंदी घडुन आले असणे, तसेच क्षेत्र सुध्दा जुळुन आलेले नसून बनवाट बिनशेतीच्या आधारे भाडेकरुलाच मिळकत पत्रिकेवरती बेकायदेशीर मालक बनवण्याचे काम गैरव्यवहारातून घडले असल्याचे मरोळ व मूळगाव येथील काही प्रकरणांमध्ये दिसून आल्याने काही मिळकत पत्रिकेवरील कुठलाही कायदेशीरपुरावा नसतांना तिऱ्हाईत ईसमांची नावे लावण्यात आल्याचे | श्री. राजु आवळे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अनेक तक्रारी संबंधित विभागाकडे धुळखात पडणे, त्याची कुठलीही खातरजमा व त्यावरची ठोस कारवाई शासनाकडून केली जात नसल्याने त्याबाबत अनेक नागरीकांनी दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ रोजी व गेल्या दोन वर्षात जमा बंदी आयुक्त अधीक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगरे व नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांना रीतसर निवेदन देणे, सदर कायद्यात अनेक कायदेशीर तरतुदी असतांना त्याचा उपयोग संबंधित अधिकारी करत नसून भूमि अभिलेख विभागामध्ये कायदेशीर मिळकत पत्रिका घडवणे व मोजणी करून सिटीएस नकाशे देणेबाबत भूमि अभिलेख विभाग चाल ढकल करित असणे, त्यामुळे यासर्व प्रकरणाचे शासनाने सखोल चौकशीकरून भूमि अभिलेखमधील जुने कायदे रद्द करून सरळ-सरळ मार्गाने खोट्या व बनावट पध्दतीने झालेल्या मिळकत पत्रीका या रद्द करणे कामी व बिनशेती खरेदी खताने आलेल्या अर्जावरुन तात्काळ मिळकत पत्रिका घडवण्याची कारवाई यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २२९. | "पालघर-वसई-भिवंडी येथून जाणाऱ्या मुंबई-वडोदरा राज्यमार्ग हायस्पीड बुलेट ट्रेन समृध्दी मार्ग या भुसंपादित होणाऱ्या प्रकल्पबाधित अनेक शेतकऱ्यांना मोबदलाच मिळाला नसणे, सदर भूसंपादनात झालेल्या घोटाळ्यामध्ये अनेक अधिकारी करोडो रुपयांचा गैरव्यवहार करून निलंबित झाल्याने त्याबाबत शासनाने घोटाळा झालेल्या एकूण २० प्रकरणामध्ये कोकण विभागीय आयुक्त यांची एक समिती स्थापन करून ३ महिन्याचा कालावधीमधील शासनास अहवाल सादर करावयास सांगितले असता संबंधित समितीचे अध्यक्ष यांनी निलंबित अधिकारी व भूसंपादनाचे पैसे परस्पर लाटणाऱ्या बनावट शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी व पुरावे नष्ट करण्यासाठी ११ महिन्याचा मुद्दाम पुरेसा वेळ घेतल्याने ज्या भूसंपादित शेतकऱ्यांचे जमिनी हडपुन | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | बनावट कागदपत्र सादर करून परस्पर भूसंपादनाचे १५० कोटी रुपये हडपल्याने बनावट सह्या बनावट अंगठ्यांचे साठेकरार असल्याचे सिध्द होणे, बनावट व भामटे शेतकऱ्यांवरती गुन्हा दाखल न झाल्यामुळे जनतेमध्ये शासनाच्या अधिकाऱ्यांच्याविरुध्द असंतोष निर्माण होणे, शासनाच्या भूसंपादित गठीत समितीवरील नेमलेल्या अधिकाऱ्यांवर नाराजी निर्माण होणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २३०. | "पुणे जिल्ह्यातील ता. आंबेगाव, मौजे-साकोरे येथील बहुतांश जमिनी या भोगवटदार वर्ग- २ मध्ये असून संबंधित शेतकऱ्यांनी अविभाज्य शर्तीखाली असलेल्या जमिनीसाठी महसूल खात्याच्या विविध अधिकाऱ्यांकडे मागील कित्येक वर्षापासून निवेदन प्रस्ताव दाखल होणे, संबंधित विभागाने शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून न घेता त्यांचे प्रकरण प्रलंबित ठेवणे, मौजे-साकोरे या गावातील सर्व्हे कं १२७, ४ व ४० हे सर्व्हे क्रमांकाच्या जमिनी भोगवटदार वर्ग-२ मध्ये असल्यामुळे भोगवटदार वर्ग-१ करण्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित महसूल विभागास प्रस्ताव दाखल करूनही तसेच अविभाज्य शर्तीखाली मुल्यांकन दराच्या ५० टक्के नजराना भरण्यास तयार असुनही महसूल विभाग शासनाचे नुकसान करित असणे, सदर जमीन ही वडिलोपार्जित खरेदी-विक्रीने आलेली असून सुध्दा सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ मध्ये अन्यायकारक टाकण्याचे काम मागच्या तात्कालीन शासन काळात झालेले असुन त्याबाबत मालकी हक्क कोणाची आकारफोड पिकपाणी व छापील उतारे व फेरफार हे सर्व तपासून शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |
| २३१. | "मोहोदा अडगाव बू.ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती गावातील गायरान चराईसाठी साल (१९११) वर्षापासून | ॲड. आकाश फुंडकर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सोडलेली शासनाची शेतजमीन जमीन मौजा आडगाव बू. शेत सर्व्हे न. (सर्व्हे नं. २८ क्षेत्रफळ ९ हेक्टर ८४ आर) (सर्व्हे नं. ८६ क्षेत्रफळ ३ हेक्टर २२ आर) (सर्व्हे नं. ८९ क्षेत्रफळ २ हेक्टर ७ आर) अशी एकूण जमीन (१५ हेक्टर १३ आर) एवढी असणे, ही जमीन पदाचा गैर वापर करून विक्री केलेली असणे, जमिनीच्या विक्री विरोधात गावकरी यांच्या वतीने तक्रार केली असता मा. जिल्हाधिकारी यांनी चौकशीचे आदेश देण्यात येणे, परंतु जिल्हाधिकारी यांच्या पत्राचा अवमान होणे, सदर जमीन ही गुरे चरायची जमीन व स्मशान भूमीची असल्यामुळे या जमिनीची कुठल्याही पद्धतीने विक्री होऊ नये असा ग्रामसभेचा ठराव सर्वांच्या मते पारित करण्यात येणे, सदर व्यवहार हा गैर कायदेशीर होणे, शासनाची व ग्रामपंचायत गावकरी मंडळीची फसवणूक करून या जमिनीची विक्री पदाचा दूर उपयोग करून करण्यात येणे, सदर शेतजमीन ही २०० वर्षांपूर्वी गुरे चराईसाठी सोडलेली असणे व गावातील ७० वर्षापासून ३० लोकांची राहण्याची वस्ती असणे, गायराण जमीन खरेदी विक्रीची परवानगी नसताना सुद्धा सदर जमीन विक्री करण्याची परवानगी देणाऱ्या अधिकारी व संबंधितांची चौकशी करून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच सदर शेत जमीन पूर्ववत चराईसाठी मोकळी करून देण्याकरीता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २३२. | "जि. पालघर, वसई तालुक्यातील नागरिकांशी गैरवर्तणूक करणारे नायब तहसिलदार चंद्रकांत पवार यांच्या बदलीसाठी तहसिलदार कार्यालयावर नागरिकांनी मोर्चा काढून तीव्र आंदोलन करणे, पवार हे त्यांचेकडे विचारणा करणाऱ्यांना धमकाविणे, तक्रारदारांवर खोट्या तक्रारी दाखल करणे, महिलांना अर्वाच्च भाषेत बोलणे, ई. गैरवर्तणुकीमुळे जनतेत प्रचंड संताप निर्माण होणे, जिल्हाधिकारी आणि तहसिलदार यांचेकडे अनेकांनी तक्रारी करूनही अद्याप यावर | श्री. सुरेश भोळे,<br>श्री. नितीन पवार,<br>श्री. निलेश लंके,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात न येणे, पवार यांना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ लाच घेताना अटक करूनही शासनाने त्यांची नायब तहसिलदार पदावर नियुक्ती करणे, वाडा आणि पालघरमध्ये महा-ई केंद्रामार्फत बनावट दाखले देऊन भ्रष्टाचार केल्याप्रकरणी पवार यांना सेवेतून निलंबित करण्यात येऊनही पुढे त्यांची चौकशी करणेबाबत कोणतीच कारवाई करण्यात न येणे, पवार यांच्या कार्यालयात गौण खनिजच्या गाड्या पकडून अक्षय गोवठले या खाजगी व्यक्तीमार्फत वसुली केली जाणे, अशा अनेक मागण्या करण्यात येऊनही त्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने मोर्चाचे आयोजन करण्यात येणे, पवार यांच्यावर ज्या ज्या वेळी भ्रष्टाचाराचे आरोप झाले त्यावेळी त्यांनी वरिष्ठांबरोबर आर्थिक संगनमत करून आपली नोकरी सुरक्षित ठेवण्यात यशस्वी होणे, या सर्व प्रकारास त्यांचे वरिष्ठ असलेले तहसीलदार यांचाही पाठिंबा असल्याचा असलेला संशय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २३३. | "नागपुर रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ या मार्गावरील रत्नागिरी कोल्हापूर विभागातील रस्त्याचे विस्तारीकरण, चौपद्रीकरण या कामासाठी भुसंपादनाचे काम विशेष भुसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापुर यांच्यामार्फत सुरू असून करवीर तालुक्यातील प्राधिकरणात असलेल्या गावातील अंतिम निवड करीत असताना येथील जमिनीला देण्यात येणारा भाव हा प्राधिकरणाच्या बाहेर असणाऱ्या जवळच्या गावांच्या दरापेक्षा प्रती गुंठा अडीच ते तीन लाख रुपयांनी कमी असणे, सदर गावे प्राधिकरण क्षेत्रात असल्यामुळे त्यांचे नुकसान झाले असणे, प्राधिकरणाचा कोणताही फायदा या भागांना मिळालेला नाही, तसेच याच रस्त्याच्या भूसंपादनासाठी प्राधिकरणा बाहेरील | श्री. पी. एन. पाटील (सडोलीकर), वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | डोंगराळ व दुर्गम भागातील जमिनीला जादा दर दिला असणे, त्यामुळे उपरोक्त प्राधिकरण क्षेत्रातील या शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, त्यांना देण्यात येणारा मोबदला तूटपुंजा असल्यामुळे त्यांचेवर अन्याय झाला असणे, परिणामी त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून सध्याची भौगोलिक परिस्थिती आणि बाजारभाव पाहता प्राधिकरण हद्दीत समाविष्ट असणाऱ्या करवीर तालुक्यातील प्राधिकरण क्षेत्रात येणाऱ्या गावांतील जमीनीला देण्यात येणारा मोबदला प्राधिकरणाच्या बाहेर असणाऱ्या जवळच्या गावाप्रमाणे देण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २३४. | "भिवंडी तालुक्यातील अनेक देवस्थानांच्या जमिनी सारामाफीचे असुन मागील काळातील तात्कालीन महसुल मंत्र्यांनी दिंडोरी येथील सारामाफीच्या देवस्थान जमिनींना वर्ग-१ मध्ये करण्याचे आदेश दिले होते त्याचप्रमाणे भिवंडी येथील भिवंडी कणेरी फेणेगांव अंजुरदिवे येथील वज्रेश्वरी संस्था देवस्थानाच्या जमिनीसुध्दा सारामाफीच्या असल्यामुळे तथा अंजुर दिवे येथील सद्गुरु पद्मनाचार्य स्वामी या देवस्थानाच्या जमिनीसुध्दा सारामाफीच्या असल्यामुळे त्यामध्ये विक्रीने घेतलेल्या जमिनी व कुळाने आलेल्या जमिनींना थेट वर्ग-१ ने सारामाफी देण्यासाठी वेळोवेळी महसुल खात्याला शेतकऱ्यांनी निवेदन दिलेले आहेत परंतु देवस्थानच्या विश्वस्तांनी सारामाफी असलेल्या देवस्थानमधील कुळांना विक्रिकरांना थेट त्यांच्या जमिनीतून हद्दपार करण्यासाठी उपविभागीय अधिकारी भिवंडी यांच्याकडे बेकायदेशीर दावे दाखल करून शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कार्य चालु असल्याने दावा फेटाळुन कुळखातेदार विक्रीदार शेतकऱ्यांना कायदेशीर मालक बनवण्यासाठी शासनाने अहवाल मागवून शेतकऱ्यांच्या बाजुने धोरणात्मक निर्णय | श्री. बळवंत वानखडे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | होणे कामी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २३५. | "तहसीलदार, भिवंडी शेतजमिन न्यायाधिकरण विभागातील तात्कालिन तहसीलदार, शशीकांत गायकवाड यांच्या अनागोंदी अनियमित गैरप्रकार केल्याबाबत अनेक तक्रारी संबंधित विभागांकडे नागरीकांनी केल्याने आव्हानित केलेले दाव्यांमध्ये तपासणी केली असता मोठ्या पद्धतीने गैरव्यवहार केलेला दिसून येतो शशीकांत गायकवाड यांनी मौजे राहनाळ येथील सर्व्हे क्रं ५३/२ व ५२/८ मध्ये मुळ कुळवहिवाट जुने दस्त फेरफार क्रमांक ५७८ मध्ये मंजुर कुळांची संपूर्ण यादी मध्ये कुळखातेदाराचे नावच नसतांना गैरकायदेशीर बनावट घडलेल्या फेरफारावरून ७० (ब) व ३२ (ग) मंजुर केल्याने तसेच मौजे कशेळी येथील सर्व्हे क्रमांक ४८ मध्ये लहू कृष्णा म्हात्रे संरक्षित कुळ असतांना त्यांना डावलुन कुळाने कमी झालेले विठु नारायण म्हात्रे यांच्या नाव ६० वर्षापुर्वी कमी केले असतांना त्यांच्या वारसांना ७० (ब) ३२ (ग) ने कुळ घोषित करण्यात आल्याने शेतजमिन न्यायाधिकरण कुळवहिवाट शाखेमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार चालत असल्याचे दिसुन आल्याने जनतेमध्ये असंतोष निर्माण झाल्याने अर्धन्यायिक प्रकरणातील पारदर्शकता नष्ट झाल्याने शासनाने अशा प्रकरणामध्ये तात्काळ पुनर्विलोकन घेण्यासाठी संबंधित विभागाला तात्काळ आदेश देणे कामी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. बळवंत वानखडे , वि. स. स. | कित्ता |
| २३६. | "मुंबई-वडोदरा या ड्रीम प्रोजेक्टमध्ये भिवंडी तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित होणे, या जमीन मालकांना शेतजमिनीचा बाजारभावाप्रमाणे कोटयावधी रुपयांचा मोबदला मिळत असतांना अनेक गैरव्यवहार नुकतचे समोर येणे, बनावट शेतकऱ्यांनी बळकावलेले ११ कोटी, आदिवासी वृध्द महिलेची फसवणूक करून ५८ लाख रुपये बळकावल्या | श्री. उदयसिंग राजपुत , वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येणे, तसेच एका जमिन प्रकरणी शेतकऱ्यांची फसवणूक करीत तब्बल १६ कोटी रुपयांचा मलिदा भू-माफियाने लाटल्याचा प्रकार उघडकीस येणे, यासंदर्भात भिवंडी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे बाधित शेतकऱ्यांनी तक्रार करून कोणतीच कारवाई न होणे, या संदर्भात कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे बाधितांना मानसिक व शारीरिक तणाव होऊन त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होणे, अशा प्रकारे यापूर्वीही अनेक प्रकरणात जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांचा निलंबनाचा प्रस्ताव सादर महसूल मंत्र्यांकडे सादर असतांना त्यांची सक्षम प्राधिकारी एस आर ए ३ या पदी नियुक्तीबाबतची टिप्पणी करून मा.मुख्यमंत्री यांनी मंजूर करून महसूल मंत्री यांच्या पाठविण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २३७. | "सन २०२३ मध्ये ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग येथे कोतवाल भरती प्रक्रियेमध्ये श्रीमती दुर्वा अमित गंगावणे (रा.पिंगुळी (गुढीपूर), ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) यांच्यावर अन्याय झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये उघडकीस येणे, श्रीमती गंगावणे यांनी कोतवाल भरती प्रक्रिया जाहिरनाम्यानुसार त्यांनी कुडाळ तालुक्यातून अनुसूचित जमाती प्रवर्गातून सजा-वालावल कोतवाल पदासाठी अर्ज केलेला असणे, सदर पदासाठी दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी परिक्षा घेण्यात येऊन निकाल जाहिर करणे, सदर निकालानुसार श्रीमती अर्चना संतोष पवार यांना सजा-वालावल या ठिकाणी कोतवाल पदासाठी पात्र करण्यात येऊन कोतवाल पदाच्या निवडीसाठीच्या अटींची पूर्तता करीत नसताना देखील त्यांची नियुक्ती करण्यात येणे, श्रीमती पवार यांचा अर्ज तपासणी कर्मचाऱ्यांनी स्पष्टपणे शेरा ठेवून अपात्र केल्याचे आढळून येणे, तरीदेखील त्यामध्ये फेरबदल करून श्रीमती पवार यांना जाणीपूर्वक पात्र करण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे श्रीमती पवार यांनी कुडाळ | श्री. मंगेश कुडाळकर, वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | तालुक्यातील रहिवाश दाखला मिळविण्यासाठी तहसिलदार, कुडाळ यांच्याकडे खोटी कागदपत्रे सादर केल्याची बाब उघडकीस येणे, भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उप विभागीय अधिकारी, कुडाळ यांच्याकडे असणे, त्यामुळे श्रीमती अर्चना संतोष पवार यांनी शासनाची दिशाभूल करणे तसेच त्यांची कोतवाल पदावर झालेली नियुक्ती रद्द करण्याची मागणी श्रीमती गंगावणे यांनी शासनाकडे करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २३८. | "नाशिक जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सहनिबंधक जमिनीचे बनावट कागदपत्रे व बनावट खरेदी खत तयार करून त्या जमिनी विक्री करणारी टोळी कार्यरत असणे, असाच गंभीर प्रकार नाशिक वडाळा येथे बनावट व्यक्ती उभी करून भूखंड हडपल्याची बाब समोर येणे, त्याचप्रकारे नाशिक मनपा हद्दीत गंगापुर शिवारातील सर्व्हे क्र.५८ चा हिस्सा क्र.४ मधील प्लॉट क्र. ५, ६, २४, ४०, ४४, ४८, ५०, ५१ व ५८ च्यासंदर्भात योगेश तारगे यांचेसह अन्य ९ जण प्लॉट धारकांचा सहाणे यांच्यासोबत खरेदीचा व्यवहार करून व्यवहारापोटी प्रत्येकाला सहाणे यांनी व्यवहारापोटी रक्कम देणे, यास प्लॉटचे खरेदी खताचे मुळ दस्त १९७७ मध्ये नोंदविण्यात येणे, सात-बारा सदरी कब्जेदार व्यक्तींची नावे दाखल नसणे, सदर दस्ताची नोंद करण्यासाठी नावे लावण्यासाठी दाखल केली असता दस्त दुय्यम निंबधक कार्यालयात पडताळून बघितले असता मूळदस्त वेगळेच असल्याचे आढळणे, सदर व्यवहारात फसवणूक असल्याचे लक्षात आल्यानंतर खरेदीदार सहाणे यांनी सखोल चौकशी केल्यावर दुय्यम निबंधक यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने सर्व प्लॉटचे बनावट दस्त तयार केल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, या दस्तांसाठी सरकारी सही व शिक्के सरकारी भरणा पावती इत्यादिचा गैरवापर करणे, बनावट दस्त खरे | श्रीमती सरोज आहिरे, वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | असल्याचे सहाय्यक निंबधक यांनी दस्तावर आपली स्वाक्षरी देखील केल्याचे निदर्शनास येणे, हा गंभीर प्रकार असून यातून बनावट दस्त करून फसवणूक व शासनाचे नुकसान होणे, फसवणूक टोळीत अधिकारी विजय राजुळे याचा सहभाग उघड होणे, संबंधित दुय्यम निबंधक यांनी यापूर्वी देखील नाशिक जिल्ह्यात लोकांच्या जमिनीचे असेच बनावट दस्त नोंदवून शासनाची फसवणूक करणे व असे सर्व गैरव्यवहार करून आर्थिक लाभ घेणे, याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दुय्यम निबंधकांसह अन्य यांच्या विरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २३९. | "मौजे बेलवंडी, ता. श्रींगोदा, जि.अहमदनगर या ठिकाणी सन २००४ ते २००९ या कालावधीत राज्य शासनाच्या वने विभागामार्फत बिबट सफारी पार्क होण्यासाठी परवानगी देण्यात येणे, या पार्कसाठी निधीची तरतूद करण्यात आली असणे, सदर ठिकाणी निधी मंजुर झालेला असतानाही बिबट सफारी पार्कचे काम अद्याप सुरू झालेले नसणे, सदरची कामे लवकरात लवकर पूर्ण करणेसाठी शासनामार्फत उपाययोजना करण्याची आवश्यकता असतानाही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, श्रीगोंदा, जि. अहमदनगर तालुक्यातील अनेक गावांमध्ये बिबटे मोठ्या प्रमाणात आढळून येत असल्याने सदर भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, याकडे वन विभागाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने तातडीने बिबट सफारी पार्क उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. बबनराव पाचपुते, श्री. राम सातपुते , वि. स. स. | कित्ता. |
| २४०. | "प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कार्यालयाने २०१८-१९ मध्ये रोपवनाकरिता कुंपनासाठी महाराष्ट्राकरिता चैन लिंकचे मॉडेल तयार करणे, एम.एस. रेड्डी या अधिकाऱ्याने स्वत:च्या अधिकाराचा गैरवापर करून चैन लिंक ऐवजी | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | परदेशी कल्पना असलेली फिक्स नॉट फेन्सिंगचा निर्णय घेणे, आर्थिक लाभासाठी महिला कंत्राटी अभियंत्याची तात्पुरत्या स्वरूपात अभियंता पदावर नेमणूक करून करोडो रूपयांच्या कामांची तयार करून घेतलेली जास्तीची अंदाजपत्रके, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या कामाचे झालेल्या लेखापरिक्षणामध्ये ६ आक्षेप नोंदविण्यात येणे, कंत्राटी अभियंत्याची नेमूणक २ वर्षापर्यंत तसेच नेमणूक व सेवा ४ वर्षापेक्षा जास्त नसणे अपेक्षित असताना या महिलेस अधिक काळ एकाच ठिकाणी ठेवणे, फिक्स नॉट फेंसिंगसाठी वापरलेल्या हाय टेन्सील तारेचा दर १०० रूपये किलो असताना अंदाजपत्रक २२३ रूपयांचे बनवून शासनाची दिशाभूल करणे, रोपवनसाठी चैन लिक फेसिंगच्या ऐवजी २.४४ एम.एम.जाडीची हायटेन्सिल तार वापरण्याची तरतूद फिक्स नॉट फेसिंगच्या अंदाजपत्रकात करणे, ही जाळी बसविण्यासाठी एकूण खर्चाच्या तब्बल ३० टक्के मजुरी दाखविणे, मेळघाट वन्यजीव विभाग परतवाडामधील एकूण २७ अंदाजपत्रकात संगनमताने करोडो रूपये जास्तीचे दाखविणे, १० टक्के ऐवजी २० टक्के अतिरिक्त दर लावणे, अशा प्रकारे संबंधित अधिकारी/कंत्राटदाराने केलेला करोडो रूपयांचा भ्रष्टाचार व गैरव्यवहाराची त्रयस्थ यंत्रणेकडून चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २४१. | "रेहकुरी माळढोक अभयारण्य ता.कर्जत, जि.नगर येथे मोठ्या प्रमाणात अवैधरित्या खाणकाम व अवैध स्टोन क्रशरचे काम करण्यात येणे, १० खाणी व ०८ स्टोन क्रशर युनिट माळढोक पक्षी अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात कार्यरत असणे, अभयारण्याच्या सिमेपासून एक किमी अंतरावर अनधिकृत ०५ खाणी व ०५ स्टोन क्रशर युनिट कार्यरत असून एकूण १५ खाणी आणि १३ स्टोन क्रशर अवैधरित्या सुरू असणे, सदर खाणी बंद करण्याची जबाबदारी सनियंत्रण समितीची | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | असताना कार्यवाही न झाल्याने आजही खाणी सुरू असणे, हे अवैध काम सुरू असल्याचे उघडकीस आणून जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करून गुन्हे नोंद करून दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षकावर असताना त्यांनी कार्यवाहीबाबत महसूल विभागाला विचारणा करून खाणींवर कारवाई न केल्याने तसेच तत्का.उप वन संरक्षकांनी येथील खाण कामास ना हरकत परवानगी दिल्यामुळे त्यांच्या कृतीबाबत निर्माण झालेला संशय, यामुळे पर्यावरण वन व जल वायु परिवर्तन मंत्रालय, दिल्ली यांचे राजपत्र, ॲनेक्स-II चा भंग होणे,खाणी व स्टोन क्रशरवर Environmental Protection Act-१९८६ नुसार फौजदारी कारवाई करण्यास केलेली टाळाटाळ, महसूलाचे झालेले प्रचंड नुकसान, याबाबत त्रयस्थ यंत्रणेकडून चौकशी करून दोषी अधिकारी व खाण आणि क्रशर चालकांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २४२. | "मौजे पेडगाव (ता. श्रींगोदा, जि.अहमदनगर) येथे अखंड महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती संभाजी महाराज यांना भुईकोट किल्ला बहाद्दुर गड येथे कैद करण्यात आलेला हा किल्ला असणे, या किल्ल्याची पुरातत्व विभागाकडून देखभाल करण्यात येत असणे, परंतु सदर किल्ल्याच्या डागडुजी व संवर्धनाकडे पुरातत्व विभागाकडून होत असलेले दुर्लक्ष, किल्ला संवर्धनासाठी शासनामार्फत उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. बबनराव पाचपुते,श्री. राम सातपुते , वि. स. स. | कित्ता |
| २४३. | "गेल्या कांही दिवसापासून राज्यात सुरू असलेला अवकाळी पाऊस, अवकाळी पावसाने उत्तनमधील (भाईंदर) मच्छीमारांना मोठा फटका बसणे, पावसाचा इशारा मिळाल्यानंतर ७-८ दिवसापासून मासेमारी नौका किना-यावर उभ्या असणे, त्यामुळे मच्छीमारांचे लाखो | श्रीमती गीता जैन , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | रुपयांचे झालेले नुकसान, वादळाचा इशारा मिळताच मासळी न पकडता मच्छीमार नौकांना किना-यावर यावे लागत असल्यामुळे येण्या-जाण्याचा डिझेल, बर्फ व अन्य साहित्यावर झालेला खर्चाचा बोजा, तसेच नौकेवर असलेल्या खलाशांना ठरवून दिला पगार द्यावा लागत असल्यामुळे मच्छीमारांचे होणारे आर्थिक नुकसान, शासनाने शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांच्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई द्यावी अशी मागणी मच्छीमार संघटनांकडून शासनाकडे करण्यात येणे, शेतक-यांप्रमाणेच नैसर्गिक संकटात सापडलेल्या मच्छीमारांनाही राज्य शासनाकडून नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २४४. | "मुंबईतील जे. जे. रूग्णालयातील शिकाऊ परिचारिकांच्या वसतिगृहाची विद्युत देयके वेळेवर न भरल्याने दिनांक ९ नोव्हेंबर, २०२३ पासून ¾ दिवस विद्युत पुरवठा बंद असणे, विज पुरवठ्याअभावी वसतिगृहाचा पाणी पुरवठाही बंद असणे, या संदर्भात जे.जे. रूग्णालयाच्या अधिष्ठाता व प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने शिकाऊ परिचारिकांनी आंदोलन करणे, सदर रूग्णालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर बांधकामे चालू असणे, जलनि:सारण वाहिनी फुटलेली असणे, त्यामुळे १४ निवासी डॉक्टरांना माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात डेंग्यू व मलेरियाची लागण होणे, डेंग्यु व मलेरियाची साथ आटोक्यात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती यामिनी जाधव , वि. स. स. | कित्ता |
| २४५. | "मुंबईतील जे.जे. व जी.टी. रुग्णालयातील खाजगी पॅथोलॉजिस्टची रुग्णांच्या तपासणीसाठी चढाओढ सुरू असून रुग्णालयाच्या गेटवरच टेक्निशियन तग धरून उभे राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या सुमारास निदर्शनास येणे, या लॅबचे टेक्निशियन थेट | ॲड. आशिष शेलार,<br>श्री. किसन कथोरे,<br>श्री. योगेश सागर,<br>श्री. सुनिल केदार,<br>श्री. सुभाष धोटे, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | वॉर्डमध्ये जाऊन रुग्णाचे नमुने गोळा करत असणे, परंतु रुग्णालय प्रशासनाने त्यांच्यावर पोलीस कारवाई सुरू केल्यावर आता या लॅबचे टेक्निशियन गेट बाहेर उभे राहून रुग्णांना लॅबमध्ये घेऊन जात असल्याचे उघडकीस येणे, खाजगी लॅबमध्ये रुग्णांचे नमुने घेऊन नातेवाईक जाऊन अर्ज भरतात मात्र काही नमुन्यांची चाचणी केली जात नसून फक्त रिपोर्ट दिला जाणे, या रिपोर्टसाठी डॉक्टरला स्वाक्षरीसाठी अधिक दलाली मिळत असणे, जे. जे. आणि जी.टी रुग्णालयांच्या परिसरात असलेल्या खाजगी लॅबमध्ये काही डॉक्टरांची भागीदारी असल्याचे आढळून येणे, मशीन बंद आहे असे सांगून रुग्णांना या लॅब मधूनच चाचण्या करण्याचे सल्ले संबंधित डॉक्टर देत असल्याची माहिती समोर येणे, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून दोषी डॉक्टरांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. विकास ठाकरे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. संजय जगताप, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. अस्लम शेख, श्री. शिरीष चौधरी, श्री. अबू आजमी, श्री. बाळासाहेब थोरात, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. राजेश एकडे, श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | |
| २४६. | "सांगवी (जि.सांगली) शासकीय रुग्णालय व मिरज शासकीय रुग्णालय येथे दररोज सुमारे ८०० ते ८५० गरीब रुग्ण उपचारासाठी येणे, दोन्ही रुग्णालयांत महिन्याला १७०० ते २००० शस्त्रक्रिया करण्यांत येणे, या रुग्णालयात फक्त तीनच डॉक्टर उपलब्ध असणे, त्यांच्यावर मोठा भार पडत असून रुग्णालयात ८०० ते ९०० महिला बाळंतपणासाठी येत असतांना फक्त दोनच तज्ञ डॉक्टर कार्यरत असणे, विभागात एचओडी हे प्रमुख पद रिक्त असल्यामुळे गरीब महिला रुग्णांची होत असलेली हेळसांड, रुग्णालयात गंभीर आजार २५०० ते ३००० रुग्ण महिन्यांला उपचारासाठी येणे, तेथे सुध्दा फारच कमी प्रमाणात डॉक्टर असल्यामुळे रुग्णांना परत जावे लागणे, या विभागात २८ डॉक्टरांची गरज असतांना फक्त ७ डॉक्टरांवरच हे विभाग अवलंबून असणे, अस्थिव्यंग विभागात सुमारे ६० ते ७० लाख रुपयांचे शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य उपलब्ध असणे, परंतु साहित्य वापरणाऱ्या तज्ञ डॉक्टरांची | श्री. जयंत पाटील , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कमतरता असल्याने हे साहित्य धूळ खात पडणे, रुग्णालयातील परिचारिका वर्ग ३ ते वर्ग ४ चे कर्मचारी ३५ ते ४० टक्के कमी असणे, या रुग्णालयात जीवनावश्यक व इतर औषधे सुध्दा ८० टक्के कमी प्रमाणात असणे, त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना बाहेरुन औषधे विकत आणावी लागणे, जिल्ह्यातील नागरिकांत या दोन्ही रुग्णालयांबद्दल निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २४७. | "मुंबईमध्ये नामांकित रूग्णालयामधील एक रुग्णालय सर जे.जे. ग्रुप रुग्णालय असणे, या रुग्णालयात अनेक सोयी सुविधांचा अभाव असणे, या रुग्णालयात औषधांचा तुटवडा असणे, सिटी स्कॅन मशीन एम.आर.आय मशीन बंद असणे, रुग्णांना औषधे बाहेरून घेण्यासाठी भर दिला जाणे, बहुतांश वैद्यकीय चाचण्या बाहेरून करून घेतल्या जाणे, ऑपरेशन थियेटर मागील काही काळापासून बंद असल्याची धक्कादायक बाब समोर येणे, महापलिकेच्या नायर रुग्णालयात देखील रुग्णांचे हाल होत असणे, त्याचप्रमाणे कामा रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालय, जी. टी. रुग्णालय येथे देखील औषधांचा तुटवडा निदर्शनास येणे, त्यामुळे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक त्रस्त असणे, परिणामी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. अमिन पटेल, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. अस्लम शेख, श्री. नानाभाऊ पटोले, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. धिरज देशमुख, श्री. विकास ठाकरे , वि. स. स. | कित्ता |
| २४८. | "मुंबईच्या पश्चिम उपनगरातील जोगेश्वरी (पूर्व) येथे ऑल क्युअर सुपर स्पेशालिटी रुग्णालय असून तेथे तातडीने उपचार करण्यासाठी रुग्ण दाखल होत असणे, रुग्णालयात दाखल असलेल्या अनेक रुग्णांवर उपचार करतेवेळी रुग्णालय प्रशासनाकडून रुग्णांच्या नातेवाईकांकडून पैसे उकळत असणे, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजी श्री.दत्ताराम धोंडू जोशी (रा.रामनगर, बांद्रेकरवाडी, जोगेश्वरी (पूर्व)) यांना त्यांच्या राहत्या घरी त्रास होऊ लागल्याने त्यांना सदर | श्री. सुनिल केदार,श्री. अबू आजमी , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | रुग्णालयामध्ये दाखल करणे, पैसे घेतल्यानंतर रुग्णालय प्रशासनाकडून त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात येणे, त्याचदरम्यान दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी रात्रौ त्यांना रुग्णालय प्रशासनाकडून मृत घोषित करणे, यानंतर त्यांच्याकडून उर्वरित रक्कम तातडीने भरण्याची मागणी करण्यात येणे, त्यानुसार श्री.जोशी यांच्या घरच्यांनी सदर रकमेची भरणा करण्यात आल्यानंतर दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी ते जिवीत असल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात येणे, श्री.जोशी यांच्या नातेवाईकांना न कळविता रुग्णालय प्रशासनाकडून त्यांना व्हेंटिलेटर लावण्यात येणे, शनिवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२३ रोजी श्री.जोशी यांना पुन:श्च मृत घोषित करून पैशांची भरणा केल्यानंतरच आपणास श्री.जोशी यांचे शव ताब्यात देण्यात येईल असे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात येणे, अशा प्रकारच्या घटना सदर रुग्णालयामध्ये वारंवार घडत असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत रुग्णांच्या नातेवाईकांकडून सदर रुग्णालयावर तसेच संबंधित दोषींवर तातडीने कारवाई करून रुग्णांच्या नातेवाईकांकडून रुग्णालयाकडे भरणा केलेली रक्कम त्यांना परत करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २४९. | "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करीत राज्य सरकारच्या मान्यते शिवाय विविध पदे मंजूर करणे , लेखापरीक्षण अहवाला मधून अनेक नियमबाह्य प्रकार केल्याचे समोर येणे, शासनाच्या त्रिसदस्य समितीने २०१८ ते २०२३ या कालावधीतील कामकाजाचे लेखापरीक्षण करण्यात येणे, विद्यापीठाची विभागीय केंद्र, बांधकामांचे निर्णय, कर्मचारी गट विमा अग्रीमांचे समायोजन यासारख्या अनेक बाबी नियमानुसार नसल्याचे अहवाला स्पष्ट होणे, सरकारची मान्यता न घेता नऊ पदांच्या १८१ जागांची | श्री. नितीन पवार, श्री. दिलीपराव बनकर, श्रीमती देवयानी फरांदे , वि. स. स. | किता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | निर्मिती करणे, परवानगीशिवाय अधिकारी कर्मचाऱ्यांना ९० लाख ४३ हजारांचे प्रोत्साहन पर भत्ते वितरित करणे, विद्यापीठातील तीन कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांकडून आरोग्य विज्ञान विद्यापीठा मार्फत अभ्यासक्रम पूर्ण करून परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडे ऑनलाइन अर्ज दाखल करून घेण्याचे शुल्क परस्पर कर्मचाऱ्यांच्या खात्यात वळवून ९ कोटी रकमेचा अपहार करण्याची घटना निदर्शनास येऊन देखील संबंधित कर्मचाऱ्यांवर विद्यापीठ प्रशासनाने गुन्हा दाखल न करणे, असताना देखील याबाबत कोणतीही ठोस कारवाई करण्यात न येणे, अनियमित्ता करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना संरक्षण देण्याची भूमिका प्रशासनाने घेतली असणे त्यामुळे भविष्यात देखील अशाच प्रकारे अनिमितता होण्याचा वाढलेला धोका याबाबत शासनाने सक्तीने तात्काळ कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २५०. | "महाराष्ट्र वैद्यकीय परिषद मुंबई येथे सरळ सेवा भरती अंतर्गत भरती प्रक्रिया करताना मोठ्या प्रमाणावर अनियमितता करण्यात येणे, सरळ सेवा भरती करताना तसेच पदोन्नती करताना शैक्षणिक अर्हता , किमान अनुभव, पात्रता व वयोमर्यादा या मूलभूत पात्रतांचा विचार न करता भरती प्रक्रिया करण्यात येत असणे, याबाबत डॉक्टर संजय सुरासे, वैद्यकीय अधीक्षक, ग्रँड शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करून चौकशी करण्यात येणे, या चौकशीत बारावी पास असणारी व्यक्ती टंकलेखनाची आवश्यक पात्रता पूर्ण न करता व संगणक हाताळण्याचे एम एस सी आय टी प्रशिक्षण पूर्ण न झालेल्या व्यक्तीची निवड करण्यात येणे, याबाबत वृत्तपत्रातून कोणतीही आवश्यक जाहिरात न करता भरती प्रक्रिया करण्यात येणे आदी अनिमितता झाल्याचे स्पष्ट होणे, याबाबतची | श्री. नितीन पवार, श्री. दिलीपराव बनकर, श्रीमती देवयानी फरांदे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अनिमितता दूर करण्यासाठी संबंधितांवर सुयोग्य कारवाई करण्याची शिफारस समितीने केली असणे, असे असताना देखील याबाबत कोणतीही ठोस कारवाई करण्यात न येणे, अनियमितता करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना संरक्षण देण्याची भूमिका प्रशासनाने घेतली असणे, त्यामुळे भविष्यात देखील अशाच प्रकाराने अनियमितता होण्याचा वाढलेला धोका, याबाबत शासनाने सक्तीने तात्काळ कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २५१. | "भंडारा जिल्ह्यातील "अरोमीरा स्कुल ऑफ नर्सिंग" आणि "अरोमिरा कॉलेज ऑफ नर्सिंग" हे दोन्ही महाविद्यालय हे एकाच व्यक्तीच्या मालकीची असून एकाच इमारतीमध्ये ३ कोर्सेस (ANM, GNM आणि Bsc नर्सिंग) चालविले असणे, त्यासाठी आवश्यक सुसज्ज इमारत नसणे, सदर महाविद्यालयाकडुन परवानगी घेतांना सादर केलेली कागदपत्रे हे बनावट असल्याचे निदर्शनास येणे, "अरोमीरा स्कूल ऑफ नर्सिंग" या महाविद्यालयाने ए.एन.एम. चा कोर्स शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची केलेली फसवणूक, ए.एन.एम. कोर्स करिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे सांगून त्यांच्याकडून शुल्क आकारण्यात येणे, परंतु वास्तविक त्यांचेप्रवेश महाविद्यालयात घेण्यात आलेले नसणे, सदर महाविद्यालयाची इंटेक्स कॅपॅसिटी फक्त २० एवढी असतांनाही २० पेक्षा जास्त ॲडमिशन घेणे, त्यामुळे काही विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन विद्यापीठात झाले असून काहींचे झालेले नसणे, जे विद्यार्थी नियमितपणे महाविद्यालयात येत होते त्यांचेच रजिस्ट्रेशन महाविद्यालय प्रशासनाने केलेले नसणे, परिणामी तब्बल १८ विद्यार्थिनींना परीक्षेला बसता न आल्याने त्यांचे ५ वर्ष वाया जाणे, याबाबत विद्यार्थ्यांनी विचारणा केली असता विद्यार्थ्यांना "तुम्ही चुपचाप GNM ला प्रवेश घ्या किंवा पुढच्या सत्रात | श्री. किशोर जोरगेवार , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | परीक्षा द्या नाहीतर तुमचा भविष्य बरबाद करू" असे धमकावण्यात येणे, त्यांना मानसिक त्रास देण्यात येणे, शासनाने सदर प्रकरणी तातडीने चौकशी करून विद्यार्थ्यांच फसवणूक करून त्यांचे शैक्षणिक नुकसान करणाऱ्या उक्त महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २५२. | "सोलापूर जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अडीच कोटी रुपयांची पुस्तके दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी पुरविण्यात येणे, ग्रंथालय संचालकांनी शासन निर्णय करून स्वत:च्या अधिकारात नसतानादेखील दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी परिपत्रक काढून मोहरबंद तीन निविदा मागवून आपल्या मर्जीतल्या माणसांना विकत घ्यायला पुरवठा आदेश दिलेला असणे, सदरची रक्कम शासन निर्णयानुसार तीन लाखापेक्षा अधिक असताना देखील ई-टेंडरद्वारे निविदा न काढता मोहरबंद मौखिक सूचनेच्या आधारे निविदा काढणे, संचालक यांची नियुक्ती सन २०२२ मध्ये लोकसेवा आयोगाकडून फक्त मुलाखत घेऊन झालेली असणे, सदरचे ग्रंथालय संचालक हे शासन नियमानुसार पात्र नसतानादेखील संबंधित अधिकाऱ्यांशी आर्थिक संगनमत करून सेवेमध्ये समाविष्ट झालेले असणे, सदर संचालकांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी शासन निर्णयाची पायमल्ली करून शासनाची जवळपास अडीच कोटी रुपयांचे नुकसान करणे, त्यामुळे सदर भ्रष्टाचार करणाऱ्या संचालकाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. हिरामण खोसकर ,<br>वि. स. स. | कित्ता |
| २५३. | "राज्यातील विद्यापिठात व महाविद्यालयात प्राध्यापकांच्या हजारो जागा रिक्त असणे, या जागा रिक्त असल्यामुळे तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर व अभ्यासावर होत असलेला विपरित परिणाम, तसेंच त्याची गुणवत्ता ढासळत असणे, प्राध्यापकांच्या हजारो | श्री. चंद्रकांत नवघरे ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | जागा रिक्त असल्यामुळे नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले व पीएच.डी उत्तीर्ण झालेल्या पात्रताधारक तरुण/तरुणी पूर्णवेळ प्राध्यापकांची नोकरी मिळेल या आशेवर असणे, उच्च शिक्षण घेतलेल्या तरुण/तरुणी प्राध्यापकांची जागा मिळत नसल्यामुळे गुणवत्ताधारक तरुण/तरुणी तासिका तत्वावर नाईलाजाने काम करीत असणे, त्यामुळे त्यांच्या पसरलेला तीव्र असंतोष, नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व पीएच.डी उत्तीर्ण झालेल्या पात्रताधारक उमेदवारांची पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २५४. | "नाशिक येथे (जि.नाशिक) आदिवासी विकास महामंडळाच्या धान खरेदी योजनेअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील पळशीण येथील धान खरेदी केंद्रावर धान खरेदी केल्याचे दर्शवून बनावट शेतकऱ्यांची नांवे ६५ हजार ५०० क्विंटल धान खरेदी करून गोडाऊनमध्ये हे धान ठेवल्याचे दाखविण्यात येणे, यासंदर्भात चौकशी केली असतां १० कोटीं रुपयांचे ५२ हजार क्विंटल धान गोदामातून गहाळ झाल्याचे आढळून येणे, आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी कागदोपत्री धान खरेदी करून शासनाची आर्थिक फसवणूक करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊन सुद्धा अद्याप कारवाई करण्यात न येणे, याप्रकरणाची चौकशी करून संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी, संबंधित लोकप्रतिनिधींनी मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ रोजी लेखी पत्राद्वारे करणे, यासंदर्भात चौकशी करून संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती सरोज आहिरे, वि. स. स. | कित्ता |
| २५५. | "मुख्यमंत्री कक्ष विभागीय आयुक्त स्थित अमरावती विशेष कार्य अधिकारी यांनी व विभागीय आयुक्त | श्री. रवि राणा, श्री. प्रकाश भारसाकळे , | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अमरावती कार्यालयाने स्थानिक लोकप्रतिनिधीचे व म.कृ.स.चे महासचीव उमेश ढोणे यांचे निवेदनाप्रमाणे अनुक्रमे त्यांचे पत्र क्र. ४०९/२०२३ दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ व पत्र क्र.७१७/२०२३, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२३ रोजीचे मा.मुख्यमंत्री कार्यालय, संबंधित मंत्रालय यांना आयुक्त कार्यालय अंतर्गत येणाऱ्या पाच जिल्ह्यातील कोळी महादेव अनुसूचित जमातीच्या समस्या सोडविण्यासंबंधी शासनाकडून निर्णय घेणेबाबत पत्र पाठविले असणे, कोळी महादेव अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र त्या-त्या उप विभागीय अधिकारी (महसूल) यांचेकडून मिळावे जे ते देत नसणे ज्यामुळे भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारापासून वरील समुदाय वंचित राहत असणे, उपविभागीय अधिकारी यांच्याकडून कोळी महादेव अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता केवळ महाराष्ट्र शासनाच्या २००० च्या कायद्यात सांगितलेल्या कागदपत्राची पुर्तता करून देण्यात यावी, कायद्या बाहेरील व कायद्यात नमूद नसलेल्या कागदाची मागणी करु नये, या कायद्यात कुठेही मानवी दिनांक च्या पूर्वीचा कोळी महादेव अनुसूचित जमातीच्या नोंदी आवश्यक असल्याचा उल्लेख नाही. परंतु उपविभागीय अधिकारी हे जमातीसाठी लागु नसलेल्या सामाजिक कल्याण विभागाचा सन २०१३ च्या नियमांमधील १९५० च्या पूर्वीचा मानवी दिनांक चा कारण सांगून कोळी महादेव जमातीच्या अर्जदारांचे अर्ज नाकारतात हि नेहमीची समस्या दुर करण्यासाठी व इतर महत्वाचे निर्णय घेणेसाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | वि. स. स. | |
| २५६. | "आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या ब्रिटीश मानव वंश शास्त्रज्ञ आर. ई. इंथोवेन यांच्य मानव वंश शास्त्रीय संदर्भ ग्रंथामधील पृष्ठ क्रमांक २४५ वर आदिवासी कोळी समुहाचे कोळी महादेव किंवा डोंगर कोळी, कोळी ढोर किंवा टोकरे कोळी, केळी मल्हार | श्रीमती जयश्री जाधव, श्री. बळवंत वानखडे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | आणि सोन कोळी असे चार मुख्य पट दिलेले असणे, तसेच पृष्ठ क्र. म्हणजे "कोळी" हा अस्पष्ट अर्थाचा शब्द आहे" ज्याचा अर्थ अनेक जमातींचा समावेश "कोळी" मध्ये आहे असे म्हटले असणे, नमूद केल्याप्रमाणे च्या पृष्ठ क्र.२४५ आणि ४०० वरील कोळी समुहापैकी "कोळी महादेव" जमातीला शासन आदेश दिनांक २९ मे, १९३३ मध्ये सर्वप्रथम दर्जा दिला असणे. प्रसिध्द ब्रिटीश मानव वंश शास्त्रज्ञ आर. ई. इंथोवेन यांनी संपादित केलेले मधील पृष्ठ क्र. १९९ वरील सप्लीमेंटरी रुल क्र. ४ मध्ये आदिवासी कोळी समुहातील सर्व जमाती किंवा त्यांचे उपगट यांची जन्म-मृत्यू रजिष्टरमध्ये "कोळी" अशा नोंदी करण्यासाठी आदेश दिले असल्याने कोळी ही "कोळी महादेव किंवा डोंगर कोळी", "कोळी ढोर किंवा टोकरे कोळी" आणि "कोळी मल्हार" या अनुसूचित जमातींची "सामान्य संज्ञा" ठरते, त्यामुळे १९५० पुर्वीच्या "कोळी" नोंदीद्वारे अनुसूचित जमातीचे दावे नाकारणेत येऊ नये. ताबडतोब शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा अशी मागणी असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २५७. | "आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया सुरू असणे, परंतु वसतिगृह प्रवेश क्षमता कमी असल्याने ११ वी १३ वीच्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहावे लागणे, यामुळे विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय होणे. या सर्व बाबींचा शिक्षणावर परिणाम होत असणे, काहींना शिक्षणापासून वंचित राहावे लागत असणे, या सर्व बाबींचा विचार करून वसतिगृहांची प्रवेश क्षमता वाढवणे व नवीन वसतिगृह निर्मिती संदर्भात याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | डॉ. किरण लहामटे , वि. स. स. | कित्ता |
| २५८. | "राज्यातील ४९९ शासकीय आश्रम शाळांमधून जवळपास २ लाख विद्यार्थी शिक्षण घेत असून या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षातील जवळपास ६ महिने उलटून गेले तरी | श्री. सुनिल प्रभू , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अद्याप गणवेश, नाईट ड्रेस, मौजे, बुट आदि साहित्यांपासून वंचित रहावे लागल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच दिनांक १० डिसेंबर, २०२३ रोजी निदर्शनास येणे, आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना निविदेद्वारे निकृष्ट दर्जाचे शालेय साहित्य पुरविण्यात येते म्हणून शासनाने थेट लाभार्थ्यांच्या बँक (डीबीटी योजने) द्वारे खात्यात पैसे जमा करणे, मात्र विद्यार्थी ठरवून दिलेल्या वस्तु घेत नसल्याने सुविधांपासून वंचित रहाण्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्याने शासनाने दिनांक ३१ जुलै, २०२३ पासून डीबीटी योजनेतून गणवेश संच, नाईट ड्रेस, शालेय साहित्य वगळण्याचा निर्णय घेण्यात येणे, त्यानंतर निविदेद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांना ठेकेदारातर्फे पुरविलेली गादी, चादर, ब्लँकेट, बेडशीट आदि निकृष्ट दर्जाचे व जादा दर आकारून पुरविणे, आदि जादा दराने खरेदी केलेल्या साहित्यांचे दर हे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबईने ठरविलेल्या दरापेक्षा ३ कोटी रुपये जादा दराने असणे, तसेच खरेदी केलेल्या निकृष्ट दर्जाच्या साहित्यांची गुणवत्ता न तपासता ठेकेदाराची देयके अदा करणे, यामुळे शासनाच्या खरेदी धोरणाची आदिवासी विभागाकडून उल्लंघन झाल्याचे निदर्शनास येणे, सदरहू घोटाळा शासनातील अधिकारी व ठेकेदारांच्या संगनमताने करण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २५९. | "राज्यातील काही आदिवासी व्यक्तींनी आपल्या पारंपरिक पुजा पद्धती व आपल्या धर्माचा त्याग करून इस्लाम/ईसाई धर्म स्वीकारणे, इतर धर्म स्वीकारून सुद्धा सदर आदिवासी व्यक्ती आदिवासी विकास विभागामार्फत मिळणारे सर्व लाभ तसे आरक्षण सुद्धा घेत असणे, असा दोन्ही बाजूंचा लाभ घेण्याचा प्रकार सुरू असून त्याचे नुकसान खऱ्या सर्वसामान्य गरीब आदिवासींना होत असणे, अशाप्रकारे आदिवासी समाज धर्मांतरीत होत राहिल्यास आदिवासी समाजाच्या | डॉ. देवराव होळी , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अस्तित्वाला धोका निर्माण होणे, त्याचा गंभीर परिणाम होऊन आदिवासींची रुढी परंपरा व देव पद्धती संपणार आणि कालांतराने संविधानाने दिलेले आरक्षणही संपण्याची भिती निर्माण होणे, त्यामूळे आपल्या आदिवासी पूजा ,पद्धती, परंपरा, संस्कृती, सोडून दुसरा धर्म स्वीकाणाऱ्यांना आदिवासी समाजाच्या सूची मधून (डी- लिस्टिंग) वगळण्यात यावे याकरिता राज्यात मुंबई महानगर, नाशिक, नागपूर येथे लाखोंच्या संख्येने मोर्चे निघणे, या मोर्चातून मुख्यतः अन्य धर्मात धर्मांतरित होणाऱ्या व्यक्ती व समुदायाला अनुसूचित जमातीच्या सूचीतून व आरक्षणाच्या फायद्यातून निष्कासित करण्यात यावे यासाठी मागणी करण्यात आलेली असणे, अशाप्रकारे बनावट आदिवासी संख्या वाढत असल्याने आदिवासी समाजात इतर धर्मांचे अतिक्रमण वाढत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे त्यांना आदिवासी समाजाच्या आरक्षणातून वगळण्याची व तात्काळ आदिवासी धर्मांतर विरोधी कायदा करण्याची नितांत आवश्यकता यासंदर्भात याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २६०. | "राज्यातील जवळपास २७ हजार संगणक परिचालकांमार्फत शासनाच्या अनेक योजना व सुविधा ग्रामपंचाय स्तरावरील सर्वसामान्य ग्रामस्थांना पुरविण्यात येत असणे, डिजिटल सेवा पुरविणारे संगणक परिचालक किंवा डाटा एंट्री ऑपरेटर यांना मानधन स्वरूपात केवळ ६ हजार ९३० रूपये दिले जात असल्यामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, सदरहू मानधन वेळेत न मिळणे, ऑगस्ट, २०२३ मध्ये नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील हिप्परगाथाडी येथील परिचालकाने मिळत असलेली तुटपुंजी रक्कम व शासनाच्या उदासीन धोरणाला कंटाळून आत्महत्या करण्याची गंभीर बाब घडणे, दिनांक ६ जून, २०१८ रोजी शासनाकडे सादर करण्यात आलेल्या यावलकर | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अशोकराव चव्हाण, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती सुलभा खोडके, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | समितीच्या शिफारशीनुसार संगणक परिचालक पद कायस्वरूपी निर्माण करून त्यांना जिल्हा परिषद, नगरपंचायतीमधील कर्मचाऱ्यांप्रमाणे किमान वेतन लागू करण्याची व इतर सर्व सुविधा देण्याची त्यांची मागणी असणे, परंतु तोपर्यंत त्यांच्या मानधनात वाढ करून ते वेळेवर देण्याची मागणी, संगणक परिचालकांकडून विविध सनदशीर मार्गाने शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येणे, परंतु स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी काम करणाऱ्या संगणक परिचालकांच्या मागण्यांकडे झालेल्या दुर्लक्षामुळे त्यांच्यामध्ये व त्यांच्या कुटुंबियांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने अभय यावलकर समितीच्या शिफारसी लागू करून संगणक परिचालकांच्या मागण्या मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. राजेश एकडे, श्री. बळवंत वानखडे, श्री. संग्राम थोपटे, श्री. रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. प्रकाश सोळंके, श्री. बबनराव यादव, वि. स. स. | |
| २६१. | "बांधपाडा, ता.उरण, जि.रायगड ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत ग्रामविकास अधिकारी यांनी शासकीय निधीचा अपहार करण्यासाठी रस्ता व गटार सफाईच्या कामामध्ये खोटया स्वाक्षऱ्या व कागदपत्रे यातून रु.१० लक्षचा अपहार करणे कामाची अदाजपत्रकें, मुल्याकने उपअभियंता बां.उपविभाग पनवेल यांच्यामार्फत देण्यात आल्याचे दर्शविणे परंतु उपअभियंताच्या खोट्या स्वाक्षऱ्या करून अपहार करणे हि बाब वसुलपात्र असल्याचे दोषारोप पत्रातील विविरणपत्रामध्ये मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड यांनी नमूद केलेले असतांना ग्रामविकास अधिकारी यांच्यावर कारवाई न होणे, सदर ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ मधील नमुद वित्तीय औचित्य सुत्रांचे पालन केलेले नसणे ई निविदा पद्धत न वापरता पुरवठादारांची निवड करणे निधी खर्चात अनियमितता केलेली असणे, दिवाबत्ती साहित्य खरेदी करताना देखील ईनिविदा न करणे, साठारजिस्टरला नोंद न घेणे खरेदी प्राप्त साहित्य उपलब्ध करून न देणे या सुत्रांचा | ॲड. माणिकराव कोकाटे, श्री. दिलीपराव बनकर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | भग करणे याशिवाय ग्रामपंचायत चाणजे अंतर्गत वसूल घरपट्टीची रु.९ लक्ष ग्रामनिधी खात्यावर न भरता स्वतःकडे बाळगणे ग्रामपंचायत अंतर्गत कामे करणाऱ्या कंत्राटदारांकडून मोठमोठ्या रक्कमा हया स्वतःच्या खात्यावर वर्ग करणे अशाप्रकारे महा.जि.प.जि.सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ चे कलम ३ चा भंग करणे असे असतांना सदर ग्रामविकास अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई न होणे, त्यामुळे येथील नागरीकामध्ये शासनाविषयी प्रचंड असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २६२. | "अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यामध्ये ऋणमोचन हे संत गाडगेबाबा महाराज यांची कर्मभुमी असलेले व नावरुपास आले असणे, विशेषत शासनाने या स्थळास "ब" वर्ग तिर्थक्षेत्र घोषीत करणे, या गावात मोठ्या प्रमाणात विकास कामे करण्याची निंतात आवश्यकता, याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाच्या संबधीत विभागाकडे वारंवार मागणी करणे, यामध्येच संत गाडगेबाबा यांचा भव्यपुतळा उभारण्यासाठी अतीरिक्त ५० लक्ष रुपयांची मागणी करणे, यासंबधी ग्रामविकास विभागाचे क्र.पुतळा २०२३/प्र.क्र.२६३/यो-११, दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ हे जिल्हाधिकारी, अमरावती यांना पत्र प्राप्त असून सुद्धा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अमरावती यांचेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, या संबंधाने पुन्हा लोकप्रतिनिधींनी ५० कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर करून ५० लक्ष रुपये पुतळा उभारणीसाठी निधी मंजूर करण्याची मागणी करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. रवि राणा ,<br>वि. स. स. | कित्ता |
| २६३. | "पंचायत समिती हिंगणा, जि.नागपूर येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम यास दिनांक २३ २०१९ रोजी रु.३१८.२६ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे, त्याकरिता सन २०१८- | श्री. समिर मेघे,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | १९, २०२०-२१ आणि २०२१-२२ या वर्षांमध्ये एकूण रु.२७०.२३ लक्ष निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेला असणे, त्यापैकी रु.१७७.४४ लक्ष एकूण खर्च करण्यात येणे, परंतु इतका मोठा कालावधी झाल्यानंतरही अताशा कन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराच्या अनियमीतपणामुळे सदर काम अद्यापही अपूर्ण स्थितीत राहिलेले असणे, त्यामूळे शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीपैकी रु.९२.७९ लक्ष अखर्चीत निधी शासनखाती जमा करण्यात आलेला असणे, प्रस्तुत इमारतीचे काम ४ वर्षाचे कालावधीत न झाल्यामुळे पंचायत समिती कार्यालय जुन्या व जीर्ण इमारतीमध्ये केवळ अताशा कन्स्ट्रक्शन या कंत्राटदारामुळेच सुरू असणे, त्यामुळे सदर इमारतीचे बांधकाम घेणाऱ्या कंत्राटदारावर तातडीने प्रशासकीय कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, या बाबत शासन स्तरावरुन कंत्राटदार अताशा कन्स्ट्रक्शन यांना काळ्या यादीत समाविष्ट करून कारवाई करण्याकरीता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २६४. | "मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील मंजुर रस्ते कामांच्या कार्यान्वयनाची गती व कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे निदर्शनास आले असणे, याबाबतची सूचना, आढावा व स्थिती संस्थेच्या संबंधीत अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणून दिलेली असणे, सन २०१९ ते २०२२ या दरम्यान सुरू झालेली / पूर्ण करावयाची खाली नमूद केलेली कामे अद्यापी अपूर्ण स्थितीत असणे, येथील ११ रस्त्यांची कामे अद्यापी अपूर्ण स्थितीत अथवा बंद स्थितीत असल्याचे दिसून येते याबाबत वारंवार स्थानिक स्तरावर संबंधित अधिकाऱ्यासोबत चर्चा करून कामांची गती वाढवून ती पुर्णत्वास नेण्याबाबतच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी सूचना देऊनही त्याकडे गांभीर्याने पाहील्या जात नसणे, हिंगणा येथील अपूर्ण रस्त्यांची कामे पूर्ण करणे व सुरू | श्री. समिर मेघे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | असलेली कामे दर्जेदार करण्याबाबतच्या सुचना शासन स्तरावरुन देण्यात याव्यात, त्याचप्रमाणे महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नागपुर अंतर्गत मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत रस्त्यांची कामे अधिक दर्जेदार कशी करता येईल याबाबत शासन स्तरावरुन धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २६५. | "बीड मतदार संघामध्ये सन २०१८-१९ ते नोव्हेंबर, २०२३ या कालावधीमध्ये कार्यारंभ आदेशासहित मंजूर असल्या कारणाने संबंधित कंत्राटदाराने होत असलेल्या कामाचा दर्जा शासन प्रणालीप्रमाणे राखणे गरजेचे असणे, परंतु (१) MDR-३१ Near Beed to Aher Dhanora.Warwati Bhalwani-Up to Beleshwar A/R Road KM ०/०० to २४/०० Tq. Beed. (२) construction of bridge @ ch २/३६० MDR २८ to Gajipur tq.shirur (k) (३) khamba limba poundul to naryangadh ketura tq.shirur (k) तीनही कामामध्ये कंत्राटदार व अधिकारी वर्गाने संगनमत करून दर्जाहीन, कामात दिरंगाई व निकृष्टरित्या कामे केलेली आहेत व होत असणे, सदरील कामांचे गुणवत्ता नियंत्रण, बाह्य यंत्रणा यांच्या मार्फत चौकशीची मागणी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून होणे, तसेच काही ठरावीक अधिकारीच गेल्या अनेक वर्षापासून एकाच तालुक्यात काम पाहत असल्यामुळे अर्थपूर्ण व्यवहाराने कामे होत असल्याच्या देखिल तक्रारी प्राप्त असणे, सर्व कामांची स्तरनिहाय तथा निविदा प्रक्रिया होत असतांना मुळ अंदाजपत्रकाच्या उपर जावून निविदा प्रक्रिया झालेली असणे,त्याची तात्काळ चौकशी होणे गरजेचे असणे, तोपर्यंत कामावर झालेला खर्च अथवा पुढील देयके किंवा कामावरील दुरूस्तीचा खर्च आपणाकडून देणे नियमोचीत योग्य होणार नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संदिप क्षिरसागर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २६६. | "बाह्य रस्ते योजनेत समाविष्ट करणे, ग्रामीण रस्ते दर्जोन्नत करणे यासाठीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने तयार करून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करणे, ईतर जिल्हा, प्रमुख जिल्हा मार्ग आहेत त्याचे श्रेणीवर्धन करून दर्जोन्नत करण्याचे सुद्धा काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणे, परंतु काही दिवसांपासून रस्त्यांचे श्रेणी वर्धन किंवा दर्जोन्नत करण्याचे काम थांबलेले असल्याने राज्यातील अनेक रस्त्यांचे दर्जोन्नत प्रस्ताव पडून असणे, यामध्ये ग्राम विकास आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात रस्ते दर्जोन्नत कुणी करावे यासाठीचा काही झारीतील शुक्राचार्यांचा वाद असल्याचे समजणे, यामुळे राज्यातील रस्ते श्रेणीवर्धन प्रक्रिया ठप्प झाल्याने रस्ते विकसावर झालेला विपरित परिणाम, यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून रस्त्यांचे श्रेणी वर्धन, दर्जोन्नत करण्याचे सादर तसेच सादर करावयाचे राहिलेले प्रस्ताव तातडीने मागवून रस्त्यांचे श्रेणी वर्धन करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती श्वेता महाले , वि. स. स. | कित्ता |
| २६७. | "राज्यात परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यात श्रीसंत जनाबाईच्या जन्माने पावन झालेल्या गोदावरी काठावरील स्थानास दक्षिण काशी म्हणून ही ओळखले जात असणे पुण्यश्लोक राजमाता आहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या प्राचिन व पवित्र घाटावर राज्यभरातून व शेजारील राज्यातील नागरिक येथे दशक्रिया विधी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सतत येत असणे, व संत गजानन महारांजाची पालखी तेथे विसावा घेत असणे, या घाटाची व मंदिरांची वर्षोनुवर्षे कोणतीच देखभाल दुरुस्ती होत नसल्याने या मंदिरांचे अस्तिवच नष्ट होत असणे, मंदिराच्या पाठीमागे असलेला नाला खचत असल्याचे निर्दशनास येऊन मंदिरास त्याचा धोका निर्माण झाल्याचे समोर येणे, त्यासाठी या क्षेत्रास तात्काळ पर्यटन तथा तिर्थ क्षेत्र ब व क वर्गाचा दर्जा | श्री. रत्नाकर गुट्टे, श्री. रोहित पवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | देऊन पुरेश्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांमधून व लोकप्रतिनीधी कडून वेळोवेळी करूनही प्रशासन कोणतीच दखल घेत नसणे, शासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत व थोर संत जनाबाईच्या जन्माने पावन झालेल्या जनाईनगरीच्या भूमिचे रक्षण करणे गरजेचे असणे व दिनांक ६ नोव्हेंबर, २०२३ रोजी ५० कोटीनिधी मंजूर करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नांदेड यांनी प्रशासकीय मान्यतेस्तव जिल्हा नियोजन अधिकारी यांच्या माध्यमातून शासनाकडे सादर केला असणे, यावर शासनाने तात्काळ प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २६८. | "मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील चौक येथे जंजिरे-धारावी किल्ला संवर्धन, जतन व दुरुस्ती करणे, घोडबंदर किल्ला परिसरात शिवसृष्टी प्रकल्प उभारणे आणि धारावी मंदिर परिसर विकसीत करणे इत्यादी स्थळांच्या विकासासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून निधी उपलब्ध करून देण्यास शासनस्तरावरुन मंजूरी देण्यात आलेली असणे, तथापी सदर स्थळांचा समावेश राज्याच्या पर्यटन स्थळांच्या बृहत आराखड्यात नसल्याने सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करता न येणे, नगरपालिका क्षेत्रातील चौक येथील जंजिर धारावी किल्ला पडीक अवस्थेत असून सदर किल्ला संवर्धन व दुरुस्तीसाठी पुरातत्व विभागाने नाहरकत पत्र दिलेले असणे, ४०० वर्षा पुर्वीच्या घोडबंदर किल्ल्याचे संवर्धन व दुरुस्तीचे काम पुरातत्व विभागाच्या नियंत्रणाखाली सुरू असून किल्ला शेजारील पुरातत्व विभागाच्या जागेत शिवसृष्टी प्रकल्प उभारण्यास पुरातत्व विभागाने नाहकरत दिलेले असणे, त्याच प्रमाणे स्थानिक कोळी-आगरी समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या प्राचिन धारावी देवीचे मंदिरात राज्याच्या विविध भागातून भाविक मोठ्या प्रमाणात | श्रीमती गीता जैन, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | दर्शनास येत असून त्यांची होत असलेली गैरसोय, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पर्यटन स्थळांचा राज्याच्या बृहत आराखड्यात समावेश करण्यात यावा अशी मागणी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांचेकडे नोव्हेंबर, २०२३ मध्ये करणे, मागणीच्या अनुषंगाने शासनाने उक्त पर्यटनस्थळांचा बृहत आराखड्यास समावेश करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २६९. | "बीड जिल्ह्यात जलजीवन मिशनअंतर्गत नळ पाणीपूरवठा योजनेच्या कामाची एकत्रित निविदा काढण्यात आलेली असणे, त्यानुसार बेलवाडी, काकडहिरा, दहिफळ, कोल्हारवाडी, पोथरा/मुर्शदपूर, मांडवखेल, कोळवाडी, काटवटवाडी, हिंगणी बु., कानडीघाट, सौंदाणा, बाभळवाडी, बोरफडी, चिंचोलीमाळी तसेच इट, ता. बीड या गावातील कामाचे शुभारंभ आदेश एम.टी. फड या कंत्राटदारास तर शिरुर का. तालुक्यातील बरगवाडी, खरगवाडी, टाकळवाडी, वंजारवाडी, घुगेवाडी, हाटकरवाडी, आवळवाडी, मलकाचीवाडी, नागरेवाडी, डोळ्याचीवाडी, धनगरवाडी ता. शिरुर का. या गावाच्या कामाचे शुभारंभ आदेश विजय कन्स्ट्रक्शन, माधवबाग, परळी वै.जि.बीड या कंत्राटदाराच्या नावे कार्यारंभ आदेशासहित अंतिम करण्यात येणे, तथापि, सदर कंत्राटदारांविरुद्ध कामे प्रलंबित ठेवल्याबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी असणे तसेच निविदा भरताना सदर कंत्राटदाराने अनुभव प्रमाणपत्र, बीडकॅपॅसिटी प्रमाणपत्र, आय.टी.आर.आदी प्रमाणपत्रे बनावट , चुकीचे आणि बनावट तयार केले असल्याचे आढळून येणे, नळपाणीपुरवठा योजनांच्या कामात नफ्याची कामे उदा.पाईप खरेदी व इतर यांसारख्या कामांची देयके उचलून कामे प्रलंबित ठेवल्याच्याही अनेक तक्रारी कंत्राटदाराविरुद्ध दाखल | श्री. विजय वडेट्टीवार, श्रीमती नमिता मुंदडा, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | केलेल्या असणे, त्यामुळे या कामांची सखोल चौकशी करून चौकशी पूर्ण होईपर्यत सर्व देयके स्थगित करण्याची मागणी करण्यात येणे, त्याप्रकरणी सभागृहात झालेल्या चर्चेदरम्यान, याप्रकरणी शासनस्तरावर उच्चस्तरीय समिती नेमून १ महिन्यात कारवाई करावी, असे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी सभागृहात सांगितले असतांना अद्याप समिती नेमण्यात न येणे, त्यामुळे कोट्यावधी रुपयांची योजना अंमलात न येणे, परिणामी, जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २७०. | "पनवेल व उरण (जि.रायगड) तालुक्यात पाणीपुरवठा करण्याकरिता सिडको प्रशासनाला 'नवी मुंबई महापालिका', महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एमआयडीसी या घटकांवर अवलंबून रहावे लागत असणे, पाणी पुरवठयासाठी सिडको, पनवेल महापालिकेला नवी मुंबई महापालिकेच्या मर्जीवर अवलंबून रहावे लागणे, सिडको प्रशासनाच्या नियोजन शुन्य कारभारामुळे उरण व पनवेल तालुक्यातील नागरिकांना अनेक वर्ष सातत्याने अपुऱ्या व कमी पाणीपुरवठयाचा सामना करावा लागत असणे, मोठ्या प्रमाणात निर्माण होणारे गृहनिर्माण प्रकल्प, नैना प्रकल्प या प्रकल्पांमुळे वाढती लोकसंख्या पाहता भविष्यात नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार असणे, अपुऱ्या पाणी पुरवठयामुळे उक्त विभागातील नागरिकांच्या रोषाला स्थानिक लोकप्रतिनिधींना सातत्याने सामोरे जावे लागत असणे, पनवेल महापालिका, नवी मुंबई महापालिका, पनवेल व उरण तालुक्यातील गावे यांना पाणीपुरवठा करणाऱ्या MJP, MIDC, NMMC, CIDCO या संस्थांमार्फत मिळणाऱ्या पाण्याच्या नियोजनासाठी शासनाने तातडीने सक्षम प्राधिकरण बनवण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. प्रशांत ठाकूर, श्री. समीर कुणावार, श्री. महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २७१. | "आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यातील अनेक गावामध्ये जल जिवण मिशन अंतर्गत निकृष्ठ दर्जाची पाईप वापरू पाईप लाईन टाकली असणे, परंतु नालीचे खोदकाम अत्यंत कमी करून पाईपचे खाली कोणत्याही प्रकरचे मुरूम किंवा रेती टाकल्या गेली नसणे, तसेच पाईप लाईन टाकल्यानंतर त्यांचेवर कॉक्रीट सुद्धा करण्यात आलेले नसणे, त्यामुळे वेळोवेळी पाईप लाईन फुटुन पाण्याचा अपव्यय होत असणे, नागरिकांना पाण्यापासुन वंचीत राहुन त्रास सहन करावा लागत असणे, तसेच अनेक गावा मधे पाण्याच्या टाकीचे बांधकाम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे करण्यात येत असणे, मात्र याकामावर कोणत्याही अधिकारी वर्गाचे लक्ष नसणे, त्यामुळे अधिकारी व कंत्राटदार यांचे या कामात संगणमत असणे, त्यामुळे शासनाचे कोट्यावधी रूपयाचे कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनात येत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. दादाराव केचे , वि. स. स. | कित्ता |
| २७२. | "राज्यातील ४४ पथकर नाके बंद करण्याबाबत तसेच मुंबईच्या प्रवेशव्दारावरील पथकर नाक्यांवर केलेली पाच रुपयांची पथकराची दरवाढ मागे घेण्याबाबत महिन्याभरात निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये मुख्यमंत्री महोदयांनी एका लोकप्रतिनिधींना दिले असल्याचे माध्यमातून उघड झाले असणे, मुंबईच्या वेशीवरील पथकर नाक्यांवर वाहनांची मोजदाद कॅमेऱ्याव्दारे करण्याचा निर्णयही सरकारने घेतला असणे, सर्व टोलनाक्यांवर छोट्या वाहनांना टोलमध्ये सवलत दिल्याची घोषणा याच काळात मा.उपमुख्यमंत्री, गृह यांनी असणे, मुंबईच्या वेशीवरील टोल नाक्यांवर एमएच ०४ नोंदणी झालेल्या वाहनांना टोलमधून सवलत देण्याबाबत विचार करीत असताना नवी मुंबई व अन्य भागातून येणाऱ्या वाहनांचाही विचार झाला पाहिजे, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी राज्यशासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२३ वा त्यासुमारास | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | केली असणे, टोल आकारणीबाबत वेगवेगळ्या प्रकारची वक्तव्ये सरकारकडून होत असल्यामुळे राज्यातील नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण पसरले असणे, याबाबत शासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन नागरिकांना टोल मधून दिलासा देण्याची आवश्यकता, तथापि, शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २७३. | "अमरावती जिल्ह्यातील माहुली जहागीर येथील पोलीस ठाण्यामागे अनाधिकृत गोदामात २ कोटी ३९ लाख रूपयांचे बनावट रासायनिक खत व जैविक खत जप्त करणे, जप्तीमधील ११७६९ बॅग रासायनिक खत व जैविक खताचे नमुने परीक्षणात नापास ठरले असताना सुद्धा त्या कंपनीवर कार्यवाही करावयाचे सोडून हा खत कृषी विभागाने त्याच कंपनीला परत देणे, अमरावती येथील खताच्या गोदामात धाड टाकून जवळपास ५४ लाखांचा मुदेमाल जप्त करणे, यवतमाळ जिल्ह्यातल शंकरगनर येथील कृषी केंद्राचे संचालक गजानन सुरोशे यांच्या घरात ३० ऑगष्ट २३ रोजी धाड टाकून ८३० खताच्या बॅग जप्त करणे यवतमाळ जिल्ह्यातील अडगाव येथे जिल्हा गुणनियंत्रण पथक व पोलिसांनी छापा टाकून २० लाख ९४ हजार ५६९ रूपयांची बनावट कीटकनाशके जप्त करणे, जळगाव जिल्ह्यातील भादलीच्या गोदामातुन १२ लाख रूपयांचा बनावट खत, धुळे जिल्ह्यात काही गोदामात धाड टाकूण लाखो रूपयांचे बनावट खत, महाराष्ट्रात येणाऱ्या जबलपुरातील गोदामात ६८४ बनावट रासायनिक खताच्या बॅग कृषी विभागच्या धाडीत जप्त करणे, राज्यातील अनेक जिल्ह्यात बनावट बि-बियाणे व रासायनिक खताची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असणे, याबाबतकंपनीवर कोणतीच कार्यवाही होत नसल्याणे शेतकऱ्यात पसरत असलेले तीव्र असंतोष याबाबत एसआयटी द्वारे चौकशी करून संबंधितावर कारवाई होण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल केदार,<br>श्री. अस्लम शेख,<br>श्री. सुभाष धोटे,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २७४. | "अमरावती जिल्ह्यात यावर्षीच्या सरासरी पावसाच्या तुलनेत दर्यापूर अंजनगावसुर्जी तालुक्यात अत्यल्प पाऊस झाला असून यंदाच्या हंगामात मान्सूनच्या तीन आठवड्याचा विलंब झाल्याने पेरण्या लांबल्या असणे, दोन्ही तालुक्यात माहे जुलै ते ऑगस्ट या महिन्यात पावसाचा २१ दिवसापेक्षा जास्त खंड पडल्यामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन पिकांच्या वाढीवर तसेच संभ्याव उत्पादनावर मोठा परिणाम झाला असणे, पंतप्रधान पीकविमा योजनेअंतर्गत खरीप हंगामात पावसाचा २१ दिवसापेक्षा जास्त खंड असल्यास तातडीची नुकसान भरपाई म्हणून नुकसानभरपाईच्या २५ टक्के आगाऊ रक्कम दिल्या जाते असा नियम असून दर्यापूर अंजनगावसुर्जी तालुक्यात पावसाचा २१ दिवसापेक्षा जास्त खंड पडल्यामुळे सोयाबीन तूर कपाशी मुंग उडीद अन्य खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असणे, पावसाचा मोठ्या प्रमाणात खंड पडल्याने एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या निकषानुसार सरसकट नुकसानभरपाई देऊन शेतकऱ्याना दिलासा देण्याची आवश्यकता असणे, माहे जुलै ते ऑगस्ट, २०२३ या महिन्यात दर्यापूर अंजनगावसुर्जी तालुक्यात पावसाचा २१ दिवसांपेक्षा जास्त खंड पडल्याने नुकसानग्रस्त पिकांचे खरीप पीकविमा योजनेअंतर्गत पीकविम्याची रक्कम तातडीने अदा करण्याची नितांत आवश्यकता असणे , परंतु पीकविमा कंपनीमार्फत अद्यापही याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. बळवंत वानखडे, वि. स. स. | कित्ता |
| २७५. | "पुणे शिवाजीनगर येथे शासकीय कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर पोलीस ग्राऊंड, COEP कॉलेज, औंध आय टी आय, Polytechnic कॉलेज कार्यरत असणे, या शासकीय संस्थांच्या मैदानामध्ये नागरिकांना व्यायामासाठी व खेळण्यासाठी परवानगी नाकरण्यात | श्री. सिध्दार्थ शिरोळे, श्री. सुनिल कांबळे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | येणे, पुणे शिवाजीनगर मध्ये मोजकीच मैदाने असणे व त्यातही नागरिकांना व्यायामासाठी परवानगी देण्यात न येणे, यामुळे नागरिक व्यायामासाठी जाणार कुठे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित होणे, त्यामुळे शिवाजीनगर येथील नागरिकांमध्ये तीव्र नाराजीची भावना असणे, ही सर्व शासकीय संस्थांची मैदाने नागरिकांना व्यायामासाठी व मुलांना खेळण्यासाठी तातडीने खुली करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २७६. | "महाराष्ट्र राज्यातील इमारत बांधकाम व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या माध्यमातून सन २०२० ते ३१/१०/२०२३ या कालावधीतील अटल आहार योजनेत हजारो कोटी झालेला गैरव्यवहार कामगाराच्या बनावट नोंदणी आखडा फुगवीणे, खोटे बिले तयार करणे, अनेक जिल्ह्यात आहार पुरवठादार व सहाय्यक कामगार आयुक्त कामगाराच्या माध्यमातून शासनाची केलेली दिशाभूल, राज्यातील ३ कंपन्यांना संधी देऊन ४२ प्रभागामध्ये सन २०१९ ते २०२३ या कालावधीत कोट्यवधी रुपयाचे बनावट बिले लाटण्यात आले करारनाम्यातील अटीशर्तीनुसार आहारपूरवठा न करणे आदेशातील अटी शर्ती भंग करून संगनमतातून गुनिना कॅमर्शियल लिमिटेड मे. इंडो अलाईट फुट्स लि., मुंबई, मुंबई पारसमल पगारिया जस्ट किचन नागपूरच्या माध्यमातून शासनाची दिशाभूलकरून अधिकाऱ्यासह नियमबाह्य अटलआहार वाटप व सुरक्षाकीट वाटप योजनेत झालेला भ्रष्टाचार चंद्रपूर जिल्ह्यातून प्राप्तझालेल्या तक्रारीकडे होणारे दुर्लक्ष व चौकशी ला होणारे विलंब पावसाळी अधिवेशन मा. मंत्री, कामगार यांनी घोषित केलेल्या चौकशी समिती कडून अहवाल सादर करण्यास होणारे विलंब अधिवेशन कालावधीनंतर लाभार्थ्यांची झालेली घट पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी यांच्या कडे दिलेल्या तक्रारी व कारगार विभागाकडे प्राप्त झालेल्या अहवालावर कार्यवाही | श्री. सुनिल केदार,<br>श्री. अस्लम शेख,<br>श्री. सुभाष धोटे ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | करण्यास होत असलेली दिरंगाई कामगाराची झालेली फसवणूक कामगारांचा वाढता असंतोष सातत्याने वर्तमानपत्रात झळकणाऱ्या बातम्या लोकप्रतिनिधिकडून वाढत्या तक्रारी दोषीवर कार्यवाही करण्याकरिता शासनाकडून होणारी दिरंगाई, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २७७. | "राज्य शासनाने कंत्राटी भरती रद्द केलेली असतानाही दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यातील कंत्राटी भरतीसाठी नियुक्त केलेल्या ९ कंपन्यांना ९ महिन्याची दिलेली मुदतवाढ, प्रत्येक कंपनीवर शासन दरमहा ६०० कोटी रुपये खर्च करणार असणे, राज्यातील रुग्णालयांची ६३८ कोटी रुपयांची कामे खासगी कंपनीला देण्यात येणे, खासगी कंपनीकडून कामगारांना मिळणारे अल्प वेतन, कामगारांची होणारी पिळवणूक, खाजगी कंपनी आणि राज्य शासन यांच्यात असणारे संगनमत, कंत्राटी भरतीमुळे सुशिक्षीत बेरोजगारीमध्ये आणि सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, शासनाने कंत्राट भरतीसाठी नियुक्त केलेल्या उक्त सर्व कंपन्यांना दिलेली मुदतवाढ तातडीने रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. भास्कर जाधव, श्री. अजय चौधरी, श्री. संजय गायकवाड, डॉ. राहूल पाटील, श्री. रविंद्र वायकर , वि. स. स. | कित्ता |
| २७८. | "नोव्हेंबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे नोंदणीकृत कामगारांची आरोग्य तपासणी एच. एल. एल. लि. या संस्थेमार्फत केली जात असणे, श्री. उमेश अग्निहोत्री यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी कामगार मंत्री, दिनांक ०८ जून, २०२३ रोजी जिल्हाधिकारी वर्धा, ०५/०६/२०२३ रोजी अप्पर कामगार आयुक्त - नागपूर, यांना लेखी निवेदन पुराव्यासह सादर केल्याची बाब उघडकीस येणे, वर्धा जिल्ह्यात २०२०/२१ ते २०२३ या ५ वर्षांच्या काळात ३५,९३१ कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात येणे, त्या तपासणीचे रिपोर्ट त्या कामगारांना अद्यापी देण्यात न येणे, संबंधित | श्री. निलेश लंके, श्री. राजकुमार पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अमिन पटेल, श्री. धिरज देशमुख, श्री. राजेश एकडे, श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कंपनीला सन २०२० पासून ९,३६,३७,१२५ रु. अदा करण्यात येणे, म्हणजेच ३५, ९३१ कामगारांना सरासरी २,६०६ रुपये एका कामगारा मागे शासनाने खर्च करणे, आरोग्य तपासणी करिता हा दर सर्वच्च असणे, ३५९३ कामगारांना तपासणी अहवाल न देता कामगार कामगार विभागाचे अधिकारी व एच. एल. एल. लि. यांच्यात झालेल्या आर्थिक हात मिळवणी मुळे कंपनीचा बेकायदेशीर केलेल्या कोट्यवधी रुपयांचा फायदा, यामुळे वर्धा जिल्ह्यातील लाखो कामगार व त्यांच्या कुटुंबियांचा शासनाच्या या योजनेवरील उडालेला विश्वास व एच. एल. एल. लि. आणि संबंधित अधिकारी शासनाची फसवणूक करून कोट्यवधी रुपयांची लूट करत असल्याबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २७९. | "राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील मे. लॉयडस मेटल स्टील प्लांट, घुग्गुस ह्या कारखान्याकडून कामगारांचे आरोग्य, सुरक्षा व परिसरातील पर्यावणाबाबत सुरुवातीपासून ते आजतागायत औद्योगिक स्वास्थ्य व सुरक्षा नियमांचे सर्रासपणे उल्लंघन केले जात असणे, या कंपनीमध्ये व परिसरात नेहमीच गंभीर स्वरूपाचे तसेच किरकोळ प्राणघातक, गंभीर असे अनेक अपघात घडले असणे, प्रदूषण विषयक मानकत्वाचे पालन सदर कंपनीकडून होत नसल्याने सदरहू कंपनीला non compliance of consent condition बाबत नोटीस बजावण्यात येणे, दिनांक ७ डिसेंबर, २०२२, दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ आणि दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी environment MT १९८६, water pollution MT १९७४, MT pollution अशा विविध प्रकरणात कंपनीला नोटीस देण्यात आलेली असणे, सदरहू कंपनीमुळे घुग्गुस आणि परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या वाढत असणे, यामुळे सदरहू उद्योगावर तात्काळ विशेष समिती नेमून या सर्व प्रकरणांचे सोशल ऑडिट करण्याची तसेच | श्री. सुभाष धोटे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | पर्यावरण कायदा १९८६ ची विविध कलमे व फॅक्टरी ऍक्ट कायद्याचे वारंवार उल्लंघन होत असल्याने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, सदर प्रकरणी संबंधित कोल माईन्स प्रशासन, स्थानिक यंत्रणा/शासनामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे; याकडे कंपनी प्रशासनाचे/शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे विभागातील सर्वसामान्य जनतेत शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २८०. | "जि.ठाणे, पोखरण रोड नं.२ येथील मे. डब्ल्यु. जी. फोर्ज अलाईड (वायमन गार्डन) इंडस्ट्रिज लि. या फोर्जींग कंपनीच्या व्यवस्थापनाने जुलै-ऑगस्ट, १९८४ मध्ये थकीत वीज बिलाचे कारणास्तव व कुडाळ येथील कंपनी १९८६ साली आजारी दाखवून टाळेबंदी केल्याने अद्याप कंपनीतील २००० कामगारांना देय थकीत रक्कम देण्यात आली नसल्याचा गंभीर प्रकार नुकताच उघडकीस येणे, ठाणे २७०० तर कुडाळ कंपनीमध्ये ३०० असे एकूण ३००० कामगारांपैकी १००० कामगारांना थकीत रक्कम देणे, उर्वरित २००० कामगारांना ३४ वर्षाची देणी न दिल्याने सदरहू कामगारांवर उपासमारीचे संकट कोसळणे, सदरहू कंपनी २००३ मध्ये आनंद अगरवाल यांना ६५.८०कोटी रुपयास विकणे, अगरवाल यांनी सदरहू मालमत्ता मे.दर्शन हिरानंदानी प्रॉपर्टीजला विकसीत करण्यासाठी देणे, ६५.८० पैकी १३ कोटी १००० कामगारांना वितरीत करणे, ठाणे-कुडाळ येथील ११५ कोटीची कंपनीची जमीन मे.हिरानंदानी यांनी कामगार आयुक्त, मुंबई मजदूर युनियन,कंपनीचे संचालक याच्याबरोबर आर्थिक संगनमत करून तसेच कंपनीत दत्ता सामंत याची युनियन असताना हिरानंदानी यांनी मुंबई मजदूर युनियनचे नांव समाविष्ट करून लिलावाद्वारे ६५ कोटीला विकत घेऊन यामध्ये ५० कोटीची नफेखोरी करणे, सदरहू रक्कम कामगारांना | श्री. सुनिल प्रभू , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | दिली असता कामगारांच्या कुटुंबियांना उपयोग झाला असता, परंतु, शासनातील अधिकारीच अमिषाला बळी पडल्याने कामगाराचे झालेले आर्थिक नुकसान, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २८१. | "गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड, अहेरी आणि मुलचेरा तालुक्यात रोजगार हमी योजनेत अंदाजे १० कोटी रुपयांचा गैरव्यवहार निदर्शनास येणे, या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्याकडून चौकशी समिती नेमण्यात येणे, या चौकशी समितीने प्रत्यक्षात कामे न करता १० कोटी रुपये उचलल्याचा अहवाल जिओ टॅगच्या फोटोसह मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., गडचिरोली यांचेकडे सादर करणे, या अहवालात रोहयो कामांच्या गैरव्यवहार प्रकरणी आर्थिक अपहार झाल्याचे स्पष्ट अभिप्राय असून तिनही गटविकास अधिकाऱ्यांसह २३ अधिकारी/ कर्मचारी दोषी असल्याचा ठपका ठेवणे, परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., गडचिरोली यांनी श्री.स्वप्नील मगदुम, गटविकास अधिकारी व श्री.सुलतान आझम, शाखा अभियंता यांच्याशी आर्थिक संगनमत करून फक्त ग्रामसेवकांचे निलंबन व कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्ती करणे, तथापि या आर्थिक गैरव्यवहाराचे मुख्य सुत्रधार असणाऱ्या गटविकास अधिकारी व शाखा अभियंता यांच्यावर केवळ वेतनवाढ थांबविणे, विभागीय चौकशी प्रस्तावित करणे यासारखी किरकोळ कारवाई करून कोणतीही ठोस कारवाई करण्यात न येणे, यासंदर्भात चौकशी समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधित गटविकास अधिकारी व शाखा अभियंता यांना तात्काळ सेवेतून निलंबित करून त्यांना पाठीशी घालणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली या तिघांची आर्थिक गुन्हे विभागांकडून चौकशी करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २८२. | "महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ शिबिर कार्यालय बांधकाम भवन नाशिक येथील महिला कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा जीवन पवार अहिरे यांनी शासकीय सेवेत वरिष्ठ पदावर कार्यरत असताना देखील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाची सिंचन विहिरीचा लाभ घेऊन शासनाची फसवणूक केल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, श्रीमती अहिरे यांची स्वमालकीची शेत जमीन गट नंबर ७२५/२ मौजे छडवेल पखरून (ता.साक्री जि.धुळे) येथील क्षेत्रामध्ये सिंचन विहीर अनुदान रुपये तीन लक्ष स्वरूपात मिळवून घेणे, श्रीमती पवार अहिरे यांनी स्वतःच्या नावाने जॉब कार्ड बनवून घेणे, पंचायत समिती साक्री, तालुका साक्री, जिल्हा धुळे येथे प्रस्ताव मंजुरीसाठी देणे, सदरच्या प्रस्तावात ग्रामसभेचा ठराव नंबर २१ ग्रामपंचायत छडवेल यांनी पारित केलेला आढळून येणे, सदर योजनेचा लाभ मिळवून देण्यात ग्रामपंचायत रोजगार सेवक, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांनी संगनमत केल्याचे आढळून येणे, सदरची असे असताना देखील याबाबत प्रशासनाने कोणतीही ठळक कारवाई करण्यात न येणे अनियमितता करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना संरक्षण देण्याची भूमिका प्रशासनाने घेतली असणे त्यामुळे भविष्यात देखील अशाच प्रकारे अनियमितता होण्याचा वाढलेला धोका याबाबत शासनाने सक्तीने तात्काळ कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. नितीन पवार , वि. स. स. | कित्ता |
| २८३. | "चिखली मतदार संघात मातोश्री शेत रस्ते योजने अंतर्गत ४४५ किलोमीटरचे रस्ते मार्च, २०२२ पासून मंजूर असणे, सदर रस्त्यांची कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीने जि. प. बांधकाम विभाग १९१ व सार्वजनिक बांधकाम विभाग ९२ याप्रमाणे यंत्रणा निश्चितीचे ठराव दिलेले असणे, तहसीलदार चिखली व | श्रीमती श्वेता महाले , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | बुलढाणा यांनी आतापर्यंत ५३ शेत रस्त्यांना प्रशासकीय मान्यता व काम सुरू करण्याचे आदेश दिलेले असणे, २५ लक्ष रु किमतीचे वरील २ किमीचे लांबीचे शेत रस्त्यांना प्रमा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी व मुकाअ जि. प. यांना असताना १ किमी वरील रस्त्यांना प्रमा झालेली नसणे, कार्यारंभ आदेश दिलेल्या ५३ पैकी फक्त २ शेत रस्त्यांचे मातीकाम पूर्ण झालेले असणे, इतर रस्त्यांचे काम सुरू करण्यासाठी यंत्रणांनी कोणतीही हालचाल केलेली नसणे, सदर योजनेकडे पाहण्याचा यंत्रणांचा दृष्टिकोन अतिशय नकारात्मक असणे, हिच परीस्थिती पुर्ण जिल्ह्यात असणे, जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची बुलढाणा जिल्ह्यात एकही सभा घेण्यात आलेली नसणे, त्यामुळे या रस्त्यांबाबत जिल्हा स्तरा वरूनच उदासिनता असणे, सदर योजनेत १०० तास जेसीबी लावण्याची तरतूद आहे मात्र त्याची देखील दर जिल्हास्तरीय समितीने कोणतेही निर्देश दिलेले नसणे, यामुळे पांदण रस्ते मंजुर असूनही होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण होणारा तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २८४. | "जळगांव जिल्ह्यात हवामान आधारित फळपीक विमा योजना सन २०२२-२३ अंतर्गत जवळपास ७८ हजार शेतकऱ्यांनी जिल्ह्यात पिकविमा काढणे, त्यापैकी आजपावेतो ४३,६६७ एवढ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर विम्याची रक्कम भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली असून प्रत्यक्ष विम्याची फक्त ३२,५०० शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणे, यापैकी ११,१६७ शेतकऱ्यांची रक्कम अजूनही जमा झालेली नसणे, ७८,००० पिकविमा काढलेल्या शेतकऱ्यांपैकी १०,६१९ शेतकऱ्यांची प्रकरणे कृषि विमा कंपनीने राज्य शासनाची एमआरएसएसी, नागपूर या संस्थेमार्फत अवेळी सर्वेक्षण करून घेतल्यामुळे ही प्रकरण क्रॉप नोट फाउंड म्हणून अपात्र करण्यात आलेली असणे, प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी | श्री. चंद्रकांत पाटील, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | ज्या वेळेस पिक विमा काढला तेव्हा केळी व इतर पिके यांची लागवड केलेली होती, परंतु कंपनीच्या अशा धोरणामुळे हजारो शेतकरी त्यांच्या हक्काच्या पिक विम्याच्या रकमेपासून आजही वंचित असणे, तसेच ओव्हर इन्शुरन्सच्या नावाखाली ११,३६० शेतकऱ्यांची प्रकरणे आजही प्रलंबित असणे, परिणामी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २८५. | "भोर, जि. पुणे शहरालगत सुमारे २५ एकर जागेत यापूर्वी दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी नुसार झालेल्या उच्चाधिकार समितीच्या ५३ व्या बैठकीत आय.टी. पार्क तथा एम.आय.डी.सी. बाबत मंजुरी देण्यात आली असून २५ एकर जमीन भोर नगरपरिषदेच्या ताब्यात असणे, येथील मौजे उत्रौली व वडगांव डाळ येथे दिनांक २१ ऑक्टोबर, १९९२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम १९६१ नुसार संपादनाची प्रकिया सुरू करण्यात येणे, त्यामुळे येथील जमिनीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ असा शेरा असणे, याशिवाय सदर दोन गावांमधील सुमारे २१३.३३ हे क्षेत्र संपादन करण्यासाठी उद्योग, ऊर्जा, कामगार विभागाने दिनांक २१ ऑक्टोबर, १९९२ रोजी अधिसूचना काढून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या तरतुदी लागू केल्या असणे, सदर अधिसूचनेनुसार भूसंपादनाची प्रकिया उपविभागीय अधिकारी, भोर यांच्याकडून कार्यान्वित होणे व संबंधितांना व्यक्तिगत भूसंपादनाच्या नोटिसा बजावण्यात आल्या असणे, परंतु अद्यापही सदर जमीन उद्योग विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील बेरोजगार तरुणांत पसरलेले तिव्र असंतोषाचे वातावरण यामुळे शासनाने सदर जमीन उद्योग विभागाला वर्ग करून येथे एम.आय.डी.सी. व मिनी एम.आय.डी.सी. करण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संग्राम थोपटे, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. शिरीष चौधरी, श्री. संजय जगताप, प्रा. वर्षा गायकवाड , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २८६. | "कोल्हापूर शहरासह संपूर्ण जिल्ह्यात फौंड्री व्यवसाय अनेक काळापासून पिढ्यान्-पिढ्या, चालत असणे, शहरातील काही व्यवसाय, ज्यात गूळ, कोल्हापुरी चप्पल, अशा अनेक उत्पादने देशात प्रसिद्ध असणे, त्यात महाराष्ट्र राज्यातून कोल्हापूर जिल्ह्यातील हा फौंड्री व्यवसाय सदर व्यवसायाला अनुकूल वातावणनिर्मिती असल्यामुळे मागील काळात सदर व्यवसायला मोठ्या प्रमाणात चालना मिळत असे, तसेच आशिया खंडात सर्वात चांगला प्रतीची कास्टिंग, ऑटो टेक्सटाइल व कृषी अवजारे, बनवण्याची सदर उद्योग म्हणून ओळखले जात होते, त्यामुळे कोल्हापूर शहराची उद्योग हब म्हणून ओळख होती, पर्यायाने राज्य, देशाच्या महसुलात, विविध करमधून वाढ होत होती, परंतु मागील काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्ती मुळे व शासनाच्या उदासीन उद्योग धोरणामुळे कोल्हापुरातील सध्या स्थितीत सदर फौंड्री व्यवसाय परराज्यात जाण्याच्या मार्गावर असणे, विशेषतः लुधियाना पंजाब, कर्नाटक राज्यात स्थिरवण्याच्या तयारी असणे, महाराष्ट्रात वीज दर जवळपास दोन पट जास्त असणे, त्यामुळे हा विजेच्या दराचा जादा भार सदर उद्योजकाच्या अर्थिक्तेवर मोठ्या प्रमाणावर ताण पडणे, त्यामुळे उत्पादन परवडत नसणे परंतु हे उद्योग विजेचे दर महाराष्ट्राच्या तुलनेत इतर राज्यात ५०% पेक्षा कमी असणे, तसेच महाराष्ट्रातील उद्योग धोरणा पेक्षा इतर राज्यात उद्योग धोरणा चांगले असल्याची भावना उपरोक्त फौंड्री व्यावसायिक यांच्यात निर्माण झालेला शासनाने तातडीने उपाययोजना करून कोल्हापूर शहरातील फौंड्री व्यवसायाला चालना मिळावी परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा उपाययोजना याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती जयश्री जाधव, वि. स. स. | कित्ता |
| २८७. | "चंद्रपूर जिल्ह्यातील कुसुंबी, ता.जिवती येथील आनंदराव मेश्राम व इतर २४ आदिवासींची ६३.६२ हे. आर जमीन मागील ४२ वर्षांपासून माणिकगड कंपनीने | डॉ. देवराव होळी, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | बेकायदेशीररित्या बळकावलेली असणे, कंपनीने स्थानिक प्रशासनिक अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन दिनांक १९ मार्च, १९८५ पासून बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचे निदर्शनास येणे, त्या जमिनीचा योग्य तो मोबदला या मिळावा याकरीता मागील ४२ वर्षांपासून आदिवासी बांधवांनी सातत्याने तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे न्याय मागण्यासाठी या हक्कासाठी लढा सुरू असणे, यासंदर्भात आतापर्यंत विधानसभेत लक्षवेधी, तारांकित प्रश्न होऊन त्यावर शासनस्तरावर चर्चा होणे, सदर प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांच्या अटकेचे ही आदेश होणे, तद्नंतर १९८५ मध्ये मोबदला दिल्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून खोटे शपथपत्र न्यायालयात सादर करणे, मात्र वास्तविक असा कोणत्याही प्रकारचा मोबदला दिल्याबद्दलचा पुरावा शासन स्तरावर नसणे, यावरून अजूनही या शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला न मिळाल्याचे सिद्ध होणे, करिता सदर जमिनीचे एमआयडीसी मार्फत शासनाने अधिग्रहण करून जमीन ताब्यात घेऊन या शेतकऱ्यांना मोबदला देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २८८. | "नागपूर जिल्ह्यातील रामटेक व पारशिवनी तालुक्यातील नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याबाबत निर्णय घेण्यास होत असलेला विलंब, प्रस्तावित जागा नगर परिषद क्षेत्रात असणे, जमीन अकृषिक असल्याचे कारण सांगुन प्रस्ताव मंजूर करण्यास विलंब होणे, वारंवार दफ्तर दिरंगाईमुळे औद्योगिक क्षेत्र विकसित न होणे, शासनास या विलंबामुळे मोठे आर्थिक नुकसान होणे, वारंवार बैठका होऊन उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत निर्णय होऊनही Chapter-६ ची प्रक्रिया सुरू न होणे, मागील ५० वर्षांपासून प्रस्तावित औद्योगिक क्षेत्र विकसित न झाल्याने स्थानिक बेरोजगार यांच्या मनात निर्माण होत | ॲड. आशिष जयस्वाल, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | असलेली नैराश्याची भावना, नागपूर येथील हिंगणा औद्योगिक क्षेत्रात भूखंड उपलब्ध नसणे, एका बाजुला नागपूर या महानगरात शेकडो उद्योजक गुंतवणुक करण्यास इच्छुक असताना शासनाच्या अनास्थेमुळे या विलंबामुळे शासनाचे महसूलाचे नुकसान होणे व आर्थिक उन्नतीला बाधा येणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी रामटेक येथील आमडी व पारशिवनी येथील कन्हान या औद्योगिक क्षेत्राबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता व Package scheme of Incentive देऊन या क्षेत्राच्या प्रगतीच्या दृष्टीने व गुंतवणुक शेजारच्या राज्यात जाऊ नये याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २८९. | "आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक कर्मचारी आदिंनी राज्यातील प्रत्येक जिल्हापातळीवर आपल्या प्रमुख मागण्यांकरिता दिनांक १८ ऑक्टोंबर, २०२३ पासून बेमुदत संपावर जाण्याचा दिलेला इशारा, आशा स्वयंसेविकांना ऑनलाईन कामे करण्यासाठी होत असलेली सक्ती व दडपशाही त्वरित थांबवावी, गटप्रवर्तकांना शासकिय कर्मचाऱ्यांचा दर्जा जोपर्यत दिला जात नाही तोपर्यत कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन दयावी, आदि मागण्यांसंदर्भात पुकारलेला बेमुदत संप, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संजय पोतनीस,<br>श्री. बबनराव यादव,<br>श्री. रोहित पवार,<br>डॉ. जितेंद्र आव्हाड,<br>श्री. अनिल देशमुख,<br>श्री. सुरेश भोळे,<br>ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे),<br>श्री. विक्रमसिंह सावंत, वि. स. स. | कित्ता |
| २९०. | "गत १५ वर्षापासुन अतिशय तुटपुंज्या मानधनावर खेडोपाडी व शहरात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी आरोग्य सेविका / सहाय्यीका प्रयोग शाळा तंत्रज्ञ / औषधी निर्माण अधिकारी / वैद्यकीय अधिकारी इत्यादी संवर्गात कंत्राटी कर्मचारी आरोग्य सेवा देत असणे, नुकत्याच कोरोना महामारीत देवदूतसारखे कोविड महामारीवर देखील मात करण्यासाठी रात्रदिवस आरोग्य सेवा दिलेली असणे, मा. सार्वजनिक आरोग्य | श्री. दिपक चव्हाण,<br>श्री. चंद्रकांत नवघरे,<br>श्री. सुरेश भोळे,<br>डॉ. विनय कोरे,<br>श्री. देवेंद्र भुयार,<br>श्री. सुनिल प्रभू ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | मंत्री यांच्या कक्षात दिनांक २० मार्च, २०२३ रोजीच्या बैठकीत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी नर्सेस शहरी व ग्रामीण एएनएम जीएनएम / एलएचव्ही / प्रयोगशाळा तंत्रज्ञ / औषध निर्माण आधिकारी / वैद्यकीय अधिकारी तसेच एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीबाबत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मा. मंत्री महोदयांकडून देण्यात येणे, तथापि, ५ महिने होऊनसुद्धा समायोजनाची कार्यवाही तसेच प्रलंबित प्रश्नांबाबत कार्यवाही न झाल्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यात पसरलेला तीव्र असंतोष, परिणामी, कार्यवाही न झाल्याने संघटनेमार्फत पाठपुरावा म्हणून दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ पासून संघटनेने आंदोलन करण्याचा निर्णय घेऊन राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी व त्याच्या संवर्गनिहाय संघटनांची कृती समिती करून आंदोलनाचा निर्णय घेण्याची आलेली वेळ, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २९१. | "राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये विविध स्तरांवरील डॉक्टरांच्या मंजूर ५७ हजार ७१४ पदांपैकी २० हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याचे नोव्हेंबर २०२३ मध्ये निदर्शनास येणे, सुपर स्पेशालिटी संवर्गातील १ हजार ७०७ मंजूर पदांपैकी ८९३ पदे रिक्त असल्याचेही निदर्शनास येणे, ही रिक्त पदे भरण्यासाठी राज्य सरकार आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत असल्याचा दावा शासनाने केला असून आरोग्य विभागाच्या बळकटीसंदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संजय केळकर, श्री. किसन कथोरे, ॲड. आशिष शेलार, श्री. मंगेश चव्हाण, श्री. योगेश सागर, श्री. गणपत गायकवाड, श्री. कुमार आयलानी, श्रीमती श्वेता महाले, श्री. रणधीर सावरकर, वि. स. स. | कित्ता |
| २९२. | "सासवड (जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयात येथील शासकीय आरोग्य सेवेचे मुख्य रुग्णालय असणे, येथे आंतररुग्ण व बाह्यरुग्ण कक्षात मोठ्या संख्येने रुग्ण येत | श्री. संजय जगताप, श्री. अशोकराव चव्हाण, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | असणे, त्यामुळे एकीकडे जेजूरीच्या ग्रामीण रुग्णालयास चांगली इमारत व सुविधा देताना सासवडच्या ग्रामीण रुग्णालयाची क्षमता वाढीसाठी आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर) सहसंचालक, यांच्यामार्फत शासनास प्रस्ताव देणे, त्यास मान्यता मिळून ५ वर्षे उलटली असणे, परंतू या सर्व सुविधा कागदावरच असणे, वास्तविक येथे उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीसाठी अंदाजपत्रक व नकाशे तयार असून शासकीय महसूल यंत्रणेच्या अनास्थेपोटी कोरोना कालावधीचे कारणे देत श्रेणीवर्धन रखडले असणे, त्यामुळे शासनाने माहिती घेवून हे श्रेणीवर्धनाची प्रक्रिया तातडीने पार पाडावी अशी येथे मागणी होत असतानाही शासनाकडून कारवाईस होत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. बाळासाहेब थोरात,<br>ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे),<br>प्रा. वर्षा गायकवाड,<br>श्री. संग्राम थोपटे,<br>श्री. विकास ठाकरे,<br>श्री. अस्लम शेख,<br>वि. स. स. | |
| २९३. | "राज्यात झिकाच्या वाढत्या संसर्गामुळे पाच रुग्ण दिनांक १६ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या सुमारास आढळुन येणे, माहे ऑक्टोबरपासुन इचलकंरजीमध्ये दोन रुग्ण आढळुन येणे, तर पुणे, पढंरपूर आणि कोल्हापूरमध्ये प्रत्येकी एक रुग्ण आढळुन येणे, झिका विषाणु हा फ्लॅव्हिव्हायरस प्रजातीचा असून तो एडीस डासांमार्फत पसरणारा विषाणुजन्य आजार असणे, हा डास चावल्याने डेंग्यु, चिकनगुनिया आणि पिवळा ताप लागण होणे, डेंग्यु आजाराप्रमाणेच झिका संशयित रुग्णाचे रक्त २ ते ८ अंश तापनात शीतशृंखला आबाधित तपासणीसाठी पाठविण्यात येणे, झिका आजारावर कोणतेही विशिष्ट औषध अथवा लस उपलब्ध नसणे, यंदा झिकाचा पहिली महिला रुग्ण येरवड्यातील प्रतिकनगरमध्ये आढळून येणे, सदरहु महिलेला केरळ राज्यातील अनेक नागरिक उपस्थित असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील एका सांस्कृतीक कार्यक्रमात झिकाची लागण होणे, तसेच शेजारील कर्नाटक राज्यात झिकाचे आजार पसरविणाऱ्या डासांचा मोठ्या प्रमाणात प्रसार होणे, | श्री. सुनिल प्रभू ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | त्यामुळे शासनाने राज्यात झिकाचा वाढता प्रसार रोखण्यासाठी वेळीच प्रतिबंधात्मक उपाय योजंनाची प्रभावीपणे अंमल बजावणी करण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी झिकाबाबत राज्यातील जनतेत पसरलेले तीव्र असंतोष व भितीचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २९४. | "भिवंडी शहरातील स्व. इं. गां.स्मृती उपजिल्हा रुग्णालयात मधील काही विभाग डॉक्टरांअभावी बंद असणे, डॉक्टरांसह अन्य महत्त्वाची पदे रिक्त असणे, रुग्णालयातील मंजूर पदांची संख्या ९४ असणे, या पदामध्ये अनेक महत्त्वाच्या पदांसह इतर पदांचा समावेश असणे, मात्र, सध्या ६१ पदे भरलेली असून ३३ पदे रिक्त असणे, रिक्त पदांमुळे रुग्णांना सेवा देताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत असणे. चारपैकी दोन रुग्णवाहिका चालू असणे, या दोन्ही रुग्णवाहिका अगोदरच रुग्णांना घेऊन गेल्यावर इतर रुग्णांना त्याचा त्रास सहन करावा लागत असणे,तसेच शासकीय रुग्णवाहिका क्रमांक MH- ०४-KU-०२६८ माझ्या आ.स्था.वि निधीतून देण्यात आली असणे, दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ आंतररुग्ण मुंबईला पुढील उपचारासाठी स्थलांतर करण्यात येत असताना कंत्राटी वाहनचालक यांच्याकडून ठाणे येथे रुग्णवाहिकेचा अपघात झाला असणे, याबाबतीत कोणत्याही प्रकारे कारवाई झालेली दिसून येत नसणे, तसेच सदर अपघातग्रस्त शासकीय रुग्णवाहिका अजूनही दुरुस्ती झालेली नसणे, याबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांना दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी सखोल चौकशी करण्याबाबत निवेदन देण्यात आले असणे, रुग्णालयाच्या २०० खाटांचा पदनिर्मितीचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे प्रलंबित असणे, तसेच रुग्णालय परिसरातील रुग्णांच्या सेवेकरिता अपुरे असून रुग्णालयाच्या दुरावस्थेसह | श्री. रईस शेख , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नागरिकांना उत्तम सेवा सुविधा मिळण्याकरिता सदनामध्ये अनेक वेळा विविध आयुध्यांच्या माध्यमातून मागणी करूनही कोणताही न्याय मिळत नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २९५. | "मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी अमरावती स्थित कार्यालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१६३/२०२३ दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी अप्पर मुख्य सचिव मुख्यमंत्री सचिवालय मंत्रालय मुंबई यांना अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींचे मागणी प्रमाणे सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे यांचे आस्थापनेवरील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) या पदाचे वेतन तफावत सुधारणा करण्यासाठी तसेच या पदाच्या पद शुरखलेत बदल करण्यासाठी पत्र पाठवले असणे, तसेच आरोग्य संघटनेच्या महिला जिल्हा उपाध्यक्ष पुष्पा नारायण वाणखडे यांचे निवेनाद्वारे केलेली मागणी अमरावती जिल्हा परीषद आरोग्य सेविका व एल. एच.व्ही. या प्रर्वागाच्या मागण्या मंजूर करण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयकडे विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती येथील उपायुक्त आस्थपणा यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजी पत्र पाठवले असणे, तसेच वरील मागण्या मंजूर करण्यासाठी सातत्याने पत्र पाठवले जात असणे, तरीपण अद्याप पर्यंत शासनाकडून कोणताच निर्णय झाला नसणे, त्यामुळे वरील आरोग्य कर्मचारी, अधिकारी यांच्यामद्ये असंतोष, चीडीची भावना लक्षात घेता शासनाने वरील नमूद मागण्यासंबधी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. रवि राणा ,<br>वि. स. स. | कित्ता |
| २९६. | "राज्यांचे विद्यमान मंत्री सार्वजनिक आरोग्य मंत्रालय यांचेकडे स्थानीक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या निवेदन तक्रारी विचारात घेऊन जिल्हाधिकारी अमरावती यांचे | श्री. रवि राणा ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कार्यालयाचे पत्र क्र.८१४/२०२३, दिनांक २१ जून, २०२३ रोजी पत्र पाठवले असणे ज्या मद्ये अमरावती जिल्ह्यातील गणोरी तालुका भातकुली प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधकामासाठी निधी मिळणेबाबत तसेच सहसंचालक हि. ह. रो. ज. रो. पुणे- ६ यांचे आस्थापने वरील वैज्ञानिक अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचे वेतन तफावतमध्ये सुधारणा करणे व ईतर त्यांचें मागण्या शासणाकडून मंजूर करणे, जि. प., अमरावती येथील आरोग्य सेविका व एल. एच. व्हीं. यांचे मागणी मंजूर करण्यासाठी वरील प्रमाणे पत्र पाठवले जात असणे, अद्यापपर्यंत शासनाकडून वरील प्रस्तावामध्ये कोणताही निर्णय झाला नसणे, यामुळे संबंधितांमध्ये असंतोष उफाळला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २९७. | "शासनाचे आरोग्य विभागाकडून राज्यातील रुग्णालयाची यांत्रिकी पद्धतीने बाह्यस्त्रोत्राद्वारे स्वच्छता एजन्सी नेमण्यासाठी दिनांक २१ एप्रिल, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यांत आलेला असणे, सदर निर्णयानुसार शासनाकडून रु.७७/- कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिलेली असणे, तथापि सदर कामास शासनाकडून पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येणे, तथापि यांत्रिकी पद्धतीने बाह्यस्त्रोत्राद्वारे स्वच्छता एजन्सी नेमण्यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी वित्त विभागाकडून रितसर परवानगी घेण्याबाबत तसेंच वाढीव रक्कम अदा करण्याबाबत देखील मंजुरी प्रदान करण्याबाबत संभ्रमावस्था निर्माण झालेली असणे, दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या रुपये रु. ६३८/- कोटी इतक्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने काढण्यात आलेल्या निविदेमध्ये १) क्रीस्टल इंटीग्रेटेड सर्विस लि. २) ब्रिस्क इंडिया प्रा.लि. ३) बिव्हिजी इंडिया लि. या तीनच कंपन्या सदर निविदेत भाग घेऊन त्यांचा त्याचा लाभ मिळण्यासाठी शासनाकडून सदर वाढीव रकमेस | श्री. देवेंद्र भुयार , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रशासकीय मान्यता प्रदान करून शासन निर्णय काढण्यात आल्याचा व्यक्त होत असलेला संशय, त्यामुळे गरज नसतांना रुपये ६३८ कोटी रक्कमेची सुप्रमा दिल्यामुळे शासन निधीचा झालेला अपव्यय व त्यामध्ये शासकीय अधिकारी सामील असल्याचा होत असलेला संशय व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २९८. | "शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्यस्तरीय वाहनचालक पुरवठा व आहारसेवा पुरवठा या टेंडरमध्ये खोटे तांत्रिक कागदपत्रे व अनुभव प्रमाणपत्र यशोधरा महिला औद्योगिक सेवा सहकारी संस्था मर्यादित नाशिक आणि राजश्री शाहू नागरी सहकारी संस्था, पालघर या संस्थांनी सादर करून निविदा मिळविलेल्या असणे, तथापि सदर बनावट प्रमाणपत्रांची बाब निदर्शनास येणे, त्यामुळे शासनाने टेंडरमधील अटी व शर्ती तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कारवाई केली नसल्यास, विलंब का करण्यांत आला याबाबत संभ्रमावस्था असणे, तसेंच सदर फसवणुकीचा प्रकार उघडकीस येणे, त्यानंतर याप्रकरणी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई यांनी दोन्ही संस्थांचा अनुभव प्रमाणपत्र व कागदपत्रांची तपासणी करून आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्यभवन, मुंबई यांना अहवाल सादर करण्यांत आलेला असणे, परिणामी शासनाने याप्रकरणी चौकशी करून संबंधित संस्था व अधिकारी यांचेविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. देवेंद्र भुयार, वि. स. स. | कित्ता |
| २९९. | "पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हे व मुळशी या तालुक्यातील राज्य मार्ग ४.९० कि.मी. तसेच प्रमुख जिल्हा मार्ग १२८.५५ कि.मी. असे एकूण १३३.४५ कि.मी. रस्ता | श्री. संग्राम थोपटे, श्री. बाळासाहेब थोरात, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अतिशय खराब झाला असल्याचे नुकतेच आढळून येणे, यामुळे वाहतूक सुरळीत व सुरक्षितपणे होत नसणे, यामुळे या रस्त्यावर अनेक वेळा लहान-मोठे अपघात होत असल्याचे आढळून येणे, अपघातात अनेकांचा बळी जात असून अनेक जखमी होत असल्याचे आढळून येणे, यामुळे प्रवाशांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत असणे, यामुळे प्रवाशांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण पसरणे, यामुळे रस्ता वाहतूकीसाठी सुरळीत व सुरक्षित होण्यासाठी या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधीची आवश्यकता असतानाही हिवाळी अधिवेशन, नागपूर येथील पुरवणी मागण्यात एकही रुपयाच्या निधीची तरतूद नसल्याचे आढळून येणे, त्यामुळे निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. नानाभाऊ पटोले, श्री. शिरीष चौधरी, श्री. संजय जगताप, प्रा. वर्षा गायकवाड , वि. स. स. | |
| ३००. | "तालुका, जिल्हा नांदेड येथील मौजे एमशेटवाडी येथील, पुलाच्या चुकीच्या बांधकामामुळे गावातील पुलाच्या पाण्यामुळे मोठे नुकसान होत असणे, तसेच नदीची दिशा बदलत असणे, तसेच सदर पुलांचे बांधकाम चालू असताना सदरील होणाऱ्या नुकसानीचे बाबत लेखी अर्ज व तक्रार बाधित शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे केकेली असणे, पण संबंधित विभागाने काणेतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे एमशेटवाडी येथील बाधीत गट क्र. १६ या शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी जाऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले असणे, परंतु सदर नुकसानीमध्ये शेतीतील माती व पिके पाईप लाईन वाहुन गेले असल्यामुळे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असणे, परंतु बाधित शेतकऱ्यांना त्याचे नुकसान देखील मिळाले नसणे, त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या भविष्यात शेती ही अबाधित रहावी म्हणून पुलाची दिशा व शेतकऱ्यांच्या शेतीच्या बाजुने गाले वाढवुन कार्यवाही करावी व पुलाचे बांधकामाचे अलाईनमेन्ट चुकल्यामुळे पुलाचे दुरुस्त करणे शेतीला | श्री. मोहनराव हंबर्डे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | संरक्षक भिंत बांधून देणे ही मागणी शेतकऱ्यांची असणे, तसेच सदर रोड क्र. सी.डी. आर. २३ असा असल्याने शासनाने तातडीने पाहणी करून अलाईनमेंन्ट दुरुस्ती करून नदीच्या पात्राचा प्रवाह पूर्ववत करून द्यावा अशी मागणी असताना प्रशासनाने कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्यामुळे शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची भावना पसरलेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३०१. | "अमरावती जिल्ह्यातील धारणी, चिखलदरा व इतर तालुक्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत व इतर योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निकृष्ट दर्जाचे काम सुरू असणे, सुरू असलेल्या कामाची चौकशी करून कारवाई करण्यासंबंधी अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतीनिधी यांचे तक्रारीवरुन शासनाने सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय पुणे दिनांक २३ ऑक्टोबर, २०२३ पत्र क्रमांक ९२/२०२३० सेवा ब - येणे प्रमाणे मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग अमरावती यांना आदेशित केले असूनही अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नसणे, या संबंधात जिल्ह्यातील सर्व संबंधित लोकांनी वारंवार लोक प्रतिनिधिना विचारणा होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. रवि राणा , वि. स. स. | कित्ता |
| ३०२. | "भिवंडी-वाडा-मनोर रस्ता रुंदीकरणासाठी केंद्र शासनाच्या नॅशनल हायवे ॲथोरिटीने ६५० कोटीची निविदा मंजुर करून सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांच्यामार्फत सदर रस्त्यांचे रुंदीकरण भूसंपादनाची जबाबदारी बांधकाम विभाग व मोजणी करण्याचे काम भूमि अभिलेख यांच्याकडे दिली असतांना २००७ ते २०२३ पर्यंत भिवंडी-वाडा-मनोर रोडवर भूसंपादित करण्यात आलेले पिडीत शेतकऱ्यांचा मोबदला परस्पर भामट्या शेतकऱ्यांना देऊन निकृष्ट दर्ज्याचे रोडरस्त्यांचे | श्री. राजु आवळे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | काम गैरव्यवहारातून झालेले असल्यामुळे ६५० कोटीचा घोटाळ्याबाबत नागरीकांनी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जमाबंदी आयुक्त तथा महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक खाते यांना दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ रोजी तक्रार करूनही संबंधित खात्यांनी अद्यापपर्यंत कारवाई न होणे, आदीवासी गरीब शेतकरी या भूसंपादनाचा मोबदला न मिळाल्यामुळे देशोधडीला लागले असल्याच्या कारणाने याची सीआयडी तथा एसआयटी मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३०३. | "सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अधिनस्त नागपूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मौदा अंतर्गत लापका घोराड नवेगाव गोराड प्रजीमा किमी २/२०० मध्ये गावाजवळ पुलाचे बांधकाम आदित्य कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांच्यामार्फत सुरू असणे, दिनांक १५ मार्च, २०२० रोजी सुट्टीच्या दिवशी पुलाच्या स्लॅबचे कॉंक्रीटचे काम करण्यात येणे, यावेळेस सार्वजनिक बांधकाम विभागाचा अभियंता जागेवर उपस्थित नसणे, कंत्राटदाराद्वारे निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून काम केल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे सदर स्लॅब खाली कोसळल्याची दुर्दैवी घटना घडल्याचे निदर्शनास येणे, मात्र कोणताही मजूर घटनास्थळी उपस्थित नसल्याने जीवित हानी झालेली नसणे, घडलेल्या घटनेसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने आदित्य कन्स्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत टाकणे, याबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, नागपूर यांच्यामार्फत दिनांक २० जुलै, २०२१ रोजी शासनास सादर करणे, परंतु अद्यापपर्यंत कंपनीवर कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, विदर्भात अनेक ठिकाणी आदित्य कन्स्ट्रक्शन कंपनीद्वारे अनेक बांधकाम कामे घेणे, सदर कामे ही दुसऱ्या कंत्राटदारास सबलेट करणे तसेच सदर कामे मुदतीमध्ये पूर्ण न करणे, त्यातही गैरप्रकार करणे, | श्री. देवेंद्र भुयार, ॲड. आशिष जयस्वाल, श्री. नरेंद्र भोंडेकर, श्री. टेकचंद सावरकर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | यासंदर्भात अनेक कार्यकारी अभियंता यांची तक्रार असणे, परंतु सदर कंस्ट्रक्शन कंपनीवर कोणतीही कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३०४. | "सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करण्यात आलेली कामे ही कार्यकारी अभियंता सा.बां.यांचे संगनमताने ठेकेदाराना ३० ते ६८ बिलोने देऊन सदरची कामे निकृष्ट झाल्याने या कामांची चौकशी घेणेबाबत अनेक तक्रारी दाखल असणे. या कामाची निविदा प्रक्रिया राबविताना परफार्मन्य रक्कम न भरणे, अनेक कामांची बिलोची रक्कम शासनाला जमा न करणे, बिलो कामातील रक्कमेतून पॅचेस दाखवून खर्च केल्याचे नमूद करणे, ३० टक्के वरील बिलोच्या प्रत्येक कामांची मुख्य अभियंता नागपूर यांची मान्यता न घेता कार्यकारी अभियंता व शाखा अभियंता यांनी गंभीर स्वरुपाची अनियमितता करणे व ठेकेदार यांनी संगनमताने भ्रष्टाचार करणे, याबाबतचे दिनांक ३० नोव्हेंबर यांचे अधिक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नागपूर यांना पत्र देऊन देखील सदर कार्यवाही जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे, याबाबत कार्यकारी अभियंता व संबंधित शाखा अभियंता यांचे गंभीर अनियमितता केल्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती सरोज आहिरे, वि. स. स. | कित्ता |
| ३०५. | "वजेश्वरी, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील भिवंडी-वाडा-महामार्गाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे तेथे मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असणे, श्री. आकाश जाधव (वय २२) या तरुणाचा खड्ड्यामुळे अपघात होणे, उपचारादरम्यान दि.३१.८.२०२३ रोजी त्याचा दुर्दैवी मृत्यू होणे, सदर रस्त्याचे निकृष्ट काम व त्यावरील अपघातास मे. जिजाऊ कन्ट्रक्शन रोड बिल्डर्स प्रा. लि. कंपनी जबाबदार असून त्याच्याविरुद्ध मयत आकाश जाधव यांच्या वडिलांनी दिनांक ७ सप्टेबर, २०२३ रोजी | श्री. अमित साटम, श्री. सचिन कल्याणशेट्टी, श्री. समाधान अवताडे, श्री. महेश लांडगे, डॉ. पंकज भोयर, श्री. नारायण कुचे, ॲड. आकाश | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | गणेशपुरी पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणे, या रस्त्यावरी अपघातांना जबाबदार असणा-या कंत्राटदार कंपनीला काळ्या यादीत टाकण्याबाबतची मागणी श्रमजीवी संघटनेने केली असणे, उक्त प्रकरणी शासन चौकशी करून सबंधीत मे. जिजाऊ कन्ट्रक्शन रोड बिल्डर्स प्रा. लि. कंपनीस काळ्या यादीत टाकून फौजदारी कारवाई करण्याची गरज, यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | फुंडकर , वि. स. स. | |
| ३०६. | "चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समिती अस्तीत्वात असणे, सदर तालुक्यात कांदयाचे उत्पादन अत्यल्प होत असल्याची माहिती कृषी विभागात मार्फत दिलेली असणे, सदर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा विक्रीसाठी आलेला नसणे, तरी देखील तेथील कर्मचारी व काही संचालक मंडळी यांनी मिळुन कांदा उत्पादक तालुक्यात असल्याचे दाखवलेले असणे, शासनाची त्यातुन दिशाभुल केलेली असणे, शासनाच्या कांदा अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात कांदा विक्री केलेली नसतांना जमा झालेली असणे, जमा झालेली रक्कम मागण्यासाठी काही संचालक मंडळींनी दलालाची निवड केलेली असणे, शेतकऱ्यांना मिळालेली अनुदान परत करण्यासाठी दलालाचा दबाव असणे, यामुळे शासनाच्या पैशाचा अपव्यय होत असणे, सामान्य नागरीकांची दोषी अधिकारी व संचालक मंडळावर कार्यवाहीची मागणी होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विकास ठाकरे, श्री. सुनिल केदार, श्री. शिरीष चौधरी, श्री. संजय रायमुलकर , वि. स. स. | कित्ता |
| ३०७. | "परभणी जिल्ह्यातील जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जानेवारी २०२० ते २०२२ पर्यंत कार्यरत असणाऱ्या अशासकीय प्रशासक मंडळाच्या कार्यकाळातील सन २०२१-२२ च्या लेखापरीक्षण अहवालात १७ गंभीर दोष ठेवल्याची बाब माहे ऑक्टोबर २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास | श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | निदर्शनास येणे, या सतरा गंभीर दोषांच्या चौकशीसाठी तीन सदस्य समिती ही गठीत करण्यात आली असणे, या समितीने तत्कालीन अशासकीय प्रशासक व सर्वच अशासकीय संचालक मंडळासह तत्कालीन रोखपाल, भूखंड विभाग प्रमुख आदींना नोटिसा बजावून तात्काळ खुलासा करण्याचे आदेश दिले असणे, या चौकशी समितीने बजावलेल्या नोटीसीमध्ये भूखंड वाटप, भूखंड नामांतराची चौकशी व तब्बल १४ भूखंड धारकांना प्लॉट वाटताना रस्त्याची जागा कमी करून सदर प्लॉटच्या मागील व महामार्गाच्या जागेतील जमीन घेऊन नवीन प्लॉट काढून वाटप करणे, वरुड रस्त्याच्या लगतची प्लॉट व्यतिरिक्त ३० बाय २० जागा भाडेतत्त्वावर देण्यापूर्वी १२ (१) ची मंजुरी न घेणे आदी बाबींचा समावेश असणे,त्यामुळे अशासकीय प्रशासक मंडळावरील चौकशी तात्काळ पूर्ण करून दोषी असणाऱ्यावर शासन तात्काळ कारवाई करण्याची मागणी स्थानिक जनतेतून होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३०८. | "कै. शेषराव पाटील जिनींग व प्रेसिंग सहकारी संस्था, पुसद (जि.यवतमाळ) या संस्थेच्या मालकीच्या जिनिंगच्या जमीन व मालमत्तेच्या विक्री प्रक्रियेकरीता दिलेल्या जाहिराती विषयी दिनांक १९ मे, २०२२ रोजी दैनिक भास्कर, नागपूरच्या अंकामध्ये सदर जाहिरात प्रकाशित झाल्याबाबतचा उल्लेख विक्री प्रक्रियेतील दस्तऐवजांमध्ये नमूद असणे, दैनिक भास्करच्या मूळ आवृत्तीमध्ये कुठेही जाहिरात समाविष्ट नसणे, या विक्री प्रक्रियेकरिता बनावट व खोट्या प्रती छापल्या असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवडयात समोर आलेली असणे, वितरीत झालेल्या मुळ आवृत्तीत ही जाहिरात प्रसिद्ध झालेली नसणे, या प्रकरणातून कोट्यवधी रुपयांचा खोटा व्यवहार झालेला असणे, नागपूर जिल्हा माहिती अधिकारी व माहिती संचालक तसेच दैनिक भास्करच्या कार्यालयाशी संपर्क करून | श्री. कैलास गोरंट्याल , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | वस्तूस्थितीची शहानिशा करण्याचा प्रयत्न केला असता कोणीच प्रतिसाद दिलेला नसणे, जमीन व मालमत्तेचे खरेदीदार R.C.Plasto Tanks & amp; Pipes Pvt. Ltd. Nagpur या कंपनीच्या वतीने खरेदी करणारे श्री.रोहित जरूळकर, खरेदीचा अधिकार देणारे कंपनीचे संचालक श्री.निलेश अग्रवाल तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. विजयराव चव्हाण व कार्यकारी संचालक श्री. शरद चव्हाण पाटील तसेच इतर संबंधितांवर खोटे वृत्तपत्र छापणे हा फौजदारी गुन्हा असणे, दोषींवर फौजदारी खटला दाखल करून हा खरेदी व्यवहार रद्द करण्याची कारवाई, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३०९. | "नाशिक जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, थेट पणन परवानाधारक, खाजगी बाजार व नाफेड खरेदी केंद्र यांचेकडील कांदा अनुदानासाठी पात्र असलेले एकूण १७२१५२ लाभार्थी शेतक-यांना २०२३ मध्ये शासनाकडून ४३५.६१ कोटी अनुदान मंजूर करण्यात आलेला असणे, सहकार व पणन विभागाकडील दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार कांदा अनुदानापैकी पहिला टप्पा प्रत्येकी लाभार्थी रु.१०,०००/- (अक्षरी रुपये १० हजार) अदा करण्यात आलेला असणे, सहकार व पणन विभागाकडील दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार मंजूर कांदा अनुदानापैकी दुसरा टप्पा प्रत्येकी लाभार्थी रु.१०,०००/- (अक्षरी रुपये १० हजार) अदा करण्यात आलेली असणे, अद्यापपावेतो शासनाकडून ०२ टप्प्यात प्रत्येक लाभार्थ्यांस एकूण रु.२०,००० पर्यंतची संपूर्ण रक्कम संबंधीत लाभार्थ्यांना अदा करण्यात आलेली असणे व २१२.८३ कोटी रुपये रक्कम अदा करणे बाकी असणे, उर्वरीत रक्कम अदा करण्याकरीता शासनाने तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | डॉ. राहूल आहेर ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३१०. | "राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA-रमसा) यांनी डाटा चोरी करण्याच्या आरोपामध्ये ब्लॅक लिस्ट करण्यात आलेल्या पुणे येथील 'लॅण्ड ए हैंड' या एनजीओ ला व्यावसायिक शिक्षा ट्रेनिंग करण्याकरिता पर्यवेक्षण आणि तपासणी करण्याची जबाबदारी देण्याची गंभीर बाब उघडकीस येणे, या संस्थेला सध्या सुरू असलेल्या ट्रेनिंगचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी तसेच पूर्वी झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांची देखील तपासणी करण्याची जबाबदारी देण्यात आली असणे, पूर्वी पर्यवेक्षण करण्याचे काम रमसाच्या अधिकाऱ्यांकडूनच केले जाणे, ब्लॅक लिस्ट असलेल्या संस्थेस ही जबाबदारी देण्याबाबत विचारणा केली असता रमसाच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला या संबंधी कल्पना नसल्याचे सांगून चालढकल करणे, रमसाच्या माध्यमातून व्होकेशनल ट्रेनिंगकरिता करोडो रूपयांचे बजेट दिले जात असून यातील १५ टक्के रक्कम मॅनेजमेंट आणि मॉनिटरिंग करिता राखीव ठेवली जात असणे, आता या ब्लॅक लिस्ट असलेल्या "लॅण्ड ए हैंड" या संस्थेला ही रक्कम मिळणार असून यामध्ये काहीतरी गोडबंगाल असल्याचे बोलले जात असणे, व्यावसायिक शिक्षा ट्रेनिंगचे पर्यवेक्षण आणि तपासणीचे काम ब्लॅक लिस्ट असलेल्या संस्थेला देण्याऐवजी अटी शर्ती पूर्ण करणाऱ्या योग्य त्या अनुभवी संस्थेस काम मिळण्यासाठी पारदर्शकपणे निविदा प्रक्रिया राबविण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केंद्र सरकारकडे योग्य तो पाठपुरावा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अशोकराव चव्हाण , वि. स. स. | कित्ता |
| ३११. | "राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना एकाच पद्धतीचा गणवेश देण्याच्या शासनाच्या धोरणामुळे सोलापूर रेडीमेड कापड उत्पादक संघावर मोठ्या प्रमाणात निर्बंध येत असल्याने सोलापूर रेडीमेड उद्योग नामशेष होणार असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास येणे | श्री. सुभाष देशमुख, श्री. सचिन कल्याणशेट्टी, श्री. विजयकुमार देशमुख, श्री. समाधान अवताडे , | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | यामध्ये हजारो कामगार व छोटे उत्पादकांचा समावेश असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात उपासमार होणार असणे त्यामुळे सोलापूर रेडीमेड कापड संघाने पूर्वीची अस्तित्वात असणारी पद्धत अवलंबण्याची मागणी शासनाकडे करणे या मागणीला स्थानिक लोकप्रतिनिधी यांनीही पाठिंबा देऊन माननीय शिक्षण मंत्री महोदयाकडे याबाबत निवेदन दिले असणे सर्व जिल्हा परिषद शाळातील विद्यार्थ्यांना गणवेश देत असताना शासन जिल्हा वाईज निवेदन काढता सेंट्रल निविदा काढणार असल्याने हे गणवेश महिला बचत गट गटाकडून न बनवता थेट एखाद्या कंपनीकडून बनवण्याची शक्यता निर्माण झालेली असणे यामुळे सोलापूर रेडीमेड संघाकडून नाराजी व्यक्त होत असणे त्यामुळे संघाचे व बचत गटाचे ही नुकसान होणार असणे यामुळे हे गणवेश पूर्वीच्या पद्धतीने देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | वि. स. स. | |
| ३१२. | "राज्यातील महानगरपालिकांच्या हद्दीमध्ये वाढ झाल्यामुळे नव्याने समाविष्ट झालेल्या अनेक गावांमधील आधीच अस्तित्वात असलेल्या अनुदानित/विनाअनुदानित, स्वयं अर्थसहाय्यित शाळा/महाविद्यालये मनपा हद्दीत समाविष्ट होणे, या शाळा/महाविद्यालयांच्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या, ग्रामपंचायत किंवा तत्सम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काळापासूनच्या इमारतीत, प्रत्यक्षात ३५/४० वर्षांपासून शिक्षण खात्याच्या रीतसर परवानगीने शाळा सुरू असणे, आता मनपा क्षेत्रामध्ये समाविष्ट झाल्याने दर्जावाढ किंवा त्याच इमारतींमध्ये/प्रांगणात स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर मराठी/ इंग्रजी माध्यमाचे अभ्यासक्रम नव्याने सुरू करणे अथवा प्राथमिक ते माध्यमिक दर्जावाढीसाठी, नववी ते बारावीच्या तुकड्या सुरू करण्यासाठी मान्यता घेणे इत्यादी कामांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार परवानगी घेण्याच्या कामी पूर्वीच्या पक्क्या इमारतींसाठी सुद्धा मनपा बांधकाम नियमानुसार | श्री. चेतन तुपे ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | नव्याने Commencement/Completion Certificate इ.दाखले मागणी, परवानग्या दीर्घकाळ प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्य महागड्या खाजगी शाळांमधून शिक्षण घेण्याची आलेली पाळी त्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणावर होत असलेले शैक्षणिक/आर्थिक नुकसान, होत असलेली ससेहोलपट, पूर्वीपासूनच रीतसर सुरू असलेल्या, मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट पूर्वीच्या ग्रामपंचायत हद्दीतील शाळांना दर्जावाढ, तुकडीवाढ, इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करणे इत्यादींसाठी परवानग्या देताना बांधकाम विषयक आणि अन्य जाचक अटी काढून सरसकट परवानग्या देण्यासाठी सर्वसमावेशक धोरण आखून सत्वर अमलात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३१३. | "राज्यात अन्न व औषधांच्या नित्कृष्ट दर्जामुळे सामान्याचे आरोग्यहित धोक्यात येऊ नये यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून सातत्याने धडक मोहिम राबविल्या जात असणे, राबविण्याची जबाबदारी ज्या औषधनिरीक्षकांवर असते त्यापैकी २१ पेक्षा जास्त औषध निरीक्षक बनावट असल्याची धक्कादायक माहिती दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास येणे, सन २०१० मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने औषध निरीक्षक पदासाठी भरती प्रक्रिया राबविली असून ८१ नावांची शिफारस केली असणे, सन २०१२ मध्ये या पदांसाठी नियुक्ती दिलेली असणे, दोन वर्षाच्या कालावधीत उमेदवारांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची छाननी करणे अपेक्षित असतांना प्रत्यक्षात तसे करण्यात आलेले नसणे, याच संधीचा फायदा नवनियुक्त औषध निरीक्षकांनी करून चक्क कमी शैक्षणिक अर्हता असलेले कागदपत्र, बनावट प्रमाणपत्र सादर करणे, लेखी परीक्षेमध्ये गुणवत्तेच्या कसोटीवर चोख नसलेल्या उमेदवारांना तोंडी परीक्षेमध्ये झुकते माप देणे, पात्र निकषांची पूर्तता केलेली नसतांनासुध्दा बनावट कागदपत्राच्या आधारावर | श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्रीमती लताबाई सोनवणे, श्रीमती मंजुळा गावीत, श्री. मोहन मते, श्री. अजय चौधरी, डॉ. राहूल पाटील, श्री. सुनिल प्रभू, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. रविंद्र वायकर, श्री. अबू आजमी , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | २१ पेक्षा जास्त औषध निरीक्षकांची वरीष्ठ अधिकाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग करून नियमबाह्यरित्या या नियुक्त्या करणे, या नियुक्तीमध्ये शासनाच्या डोळयात धुळफेक करून गेल्या दहा वर्षापासून हे बनावट औषधनिरीक्षक विभागामध्ये कार्यरत असून शासनाकडून लाखो रुपयांची उचल करीत असणे, यासंदर्भात शासनाकडे लेखी तक्रार केली असतांनासुध्दा याप्रकरणाची चौकशी होत नसल्याने नागरिकांत पसरत असलेला तीव्र असंतोष, परिणामी याप्रकरणी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३१४. | "राज्यात ड्रग्जमाफियांनी नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, संभाजीनगर, पैठण, नालासोपारा इ. ठिकाणी ड्रग्जचे कारखानेच उघडल्याचे निदर्शनास येऊन एकाच शहरात अब्जावधी रुपयांचा ड्रग्जचा साठा आढळून येणे, अशा प्रकारे एका बाजूला संपूर्ण राज्यच नशेच्या गर्तेत अडकले असताना स्वतंत्र अमली पदार्थविरोधी टास्क फोर्स निर्माण करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेऊन पुरेशा मनुष्यबळाअभावी हा विभाग कार्यान्वित न होणे, परिणामी राज्यातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्जचे कारखाने पोलिसांनी उध्दवस्त करणे, या कालावधीत मुंबई पोलिसांनी मागील दोन वर्षात ५ हजार २४३ कोटी एमडी जप्त करून आजपर्यंत ४९५ गुन्ह्यांची झालेली नोंद, संभाजीनगरमध्ये २५० कोटीपेक्षा जास्त किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आल्याची माहिती केंद्रीय महसूल गुप्तचर विभागाकडून प्रसिध्द होणे, नाशिक व सोलापूर ड्रग्ज तस्करीतील ७१८ आरोपींना अटक करण्यात येणे, तसेच मुंबई पोलिसांनी सन २०२३ मध्ये ३७१ कोटींचा अमली पदार्थांचा साठा जप्त करून १८ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत अमली पदार्थांचे ११८९ गुन्हे दाखल करून १४६५ आरोपींना झालेली अटक, इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्जची तस्करी राज्यात सुरू असताना | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. सुरेश वरपुडकर, डॉ. नितिन राऊत, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. अमित देशमुख, श्री. धिरज देशमुख, श्री. अमित झनक, श्री. विश्वजित कदम, श्री. सुभाष धोटे, श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. संजय जगताप, श्री. विक्रमसिंह सावंत, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | ती रोखण्यात शासनाला आलेले अपयश, परिणामी ड्रग्जच्या विळख्यात अडकलेल्या तरुण पिढीचे आयुष्य उध्वस्त होण्याची जनमानसात निर्माण झालेली भीती, याबाबत शासनाने करावयाची तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३१५. | "जोगेश्वरी पूर्व येथील शिवटेकडी, प्रतापनगर, दत्ततटेकडी, दुर्गानगर हा भाग ना विकास क्षेत्रामधून वगळून २०२४ च्या विकास आराखडयात या भागाचा समावेश रहिवाशी क्षेत्रात होणे, या भूखंडावर ६० वर्षापासून राहणा-या झोपडीधारकां झोपुयो राबविण्याची मागणी, लोकप्रतिनिधिंनी संबंधित विभागाकडे व शासनाकडे सातत्याने केलेला पत्रव्यवहार, सदर भूखंडावर एसआरए योजना राबवून झोपडीधारकांचे पुनर्वसन गरज, त्याच बरोबर न.भू.क्र. ८१ ते १३२ मौजे मजास मेघवाडी ही ६५ वर्षापासून लोकवस्ती अस्तित्त्वात असणे, सदर भूभाग हा विकास नियोजन आराखड्यात मनोरंजनाचे मैदान व उद्यानसाठी आरक्षित असल्याने विकास रखडणे, सन २००५ मध्ये झालेल्या पूरसदृश परिस्थितीचा या भागास मोठा तडाखा बसलेला असणे, या भूखंडावर भूधारक मालकांची संख्या ही जास्त असल्याने खेळाचे मैदान, मनोरंजनाचे मैदान या धोरणात्मक आरक्षणात असल्याने झोपडपट्टीच्या पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित, विकास नियोजन आराखडा २०१४-३४ मध्ये ज्या भागात झोपडपट्टीवस्ती आहे परंतु त्या भूखंडावर जर इतर आरक्षणे असल्यास ज्यामुळे त्या झोपडपट्टीचा पुनर्विकास होणे शक्य होत नसेल त्या भूखंडावरील झोपडीधारकांना पुनर्वसनाचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून सदर आरक्षित भूखंडावरील ६५ज्ञ् भूभाग हा रहिवाश्यांसाठी अर्थात विकासासाठी व उर्वरित ३५ज्ञ् भूभाग हा त्यात असलेली आरक्षणे कायम ठेवण्याचा निर्णय अश्या भूखंडावर वसलेल्या झोपडीधारकांना पुनर्वसनाच्या होणे शक्य, सर्व झोपड्यांचा पुनर्विकास कामी शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. रविंद्र वायकर वि. स. स | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| ३१६. | "मुंबईमध्ये पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या (पीएमजीपी) ६६ इमारती असणे, त्यापैकी बहुतांश इमारती या उमरखाडी, कामाठीपुरा विभागात असणे, या इमारती जुन्या व जीर्ण झालेल्या असणे, मागील काही वर्षापासून या इमारतींची दुरुस्ती झालेली नसणे, छताचा भाग कोसळणे, पाणी गळती, घरांच्या भिंतीची पडझड होणे यासारख्या प्रकारांमुळे येथील रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन राहणे, या इमारतींच्या दुरुस्तीसाठी म्हाडाकडे पाठपुरावा केला असता दुरुस्ती निधी उपलब्ध नसल्याचे म्हाडाकडून सांगण्यात येणे, या इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रकल्पाला गती मिळावी याकरीता अनेक बैठका शासन स्तरावर होणे, परंतु अद्याप कोणतीही कारवाई न होणे, या इमारतींमधील रहिवाशी सतत भीतीच्या छायेत असणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. अमिन पटेल, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. अस्लम शेख, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अमित देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. सुनिल केदार , वि. स. स. | कित्ता |
| ३१७. | "मुंबईतील काळा चौकी भागातील जिजामातानगर झोपडपट्टीचा पुनर्वसन प्रकल्प गेल्या अठ्ठावीस वर्षापासून रखडलेला असणे, कायदेशीर प्रक्रिया न राबवता मेसर्स शांती ओम रेसिडेन्सी प्रायव्हेट लिमिटेड यांची विकासक म्हणून २०११ मध्ये नेमणूक झाली असणे, २०१५ मध्ये शासकीय परवानगी मिळून सुध्दा कंपनीने काम केलेले नसणे, प्रकल्प दुसऱ्या विकासकाला विकण्याचा प्रयत्न केला गेला असणे, जागा विकून त्यातून पैसे उभे केले असताना आजपर्यंत जिजामाता नगरचे स्लम घोषित झालेले नसणे, सन २०१७ मध्ये कंपनीचे ८६ टक्के भागाची परस्पर विक्री केली असणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कोणतीही कारवाई केली नसणे, याच विकासकाला प्राधिकरणाने दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ ला पुन्हा काम करण्याची परवानगी दिली असणे, तथापि, अद्याप काम सुरू झाले नसणे, रहिवाशांना भाडे सुध्दा दिलेले नसणे, जिजातामाता नगर झोपडपट्टी | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अजय चौधरी , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | पुनर्वसन प्रकल्पात सन १९९५ पासून झालेल्या आर्थिक घोटाळ्याची चौकशी करण्याची लोकप्रतिनिधींनी त्यांच्या पत्रान्वये मागणी केली असणे, तथापि, शासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३१८. | "मुंबई उपनगर जिल्हा बोरिवली येथील अनेक सरकारी जमिनीवर झोपडपट्या मोठ्या प्रमाणावर असणे, सदर झोपडपट्यांबाबत राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या अंतर्गत झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे, त्यामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची पात्रता आणि योजनेचा मिळणारा लाभ याबाबतची निश्चिती करणे, बोरिवली, चारकोप, कांदिवली या ठिकाणी म्हाडाच्या जमिनीवर असलेल्या अनेक सोसायट्यांना देण्यात आलेले भूखंड तसेच दिलेल्या भूखंडावर केलेल्या बांधकामाची स्थिती/लोकसंख्या त्यामुळे सार्वजनिक व्यवस्था जसे पिण्याच्या पाण्याची जिर्ण झालेली पाईपलाईन, सांडपाणी वाहिन्यांची झालेली जिर्ण अवस्था, त्याचप्रमाणे कचरा वर्गीकरणाचे सुरू न झालेले प्रकल्प, अरूंद रस्ते अशा कात्रीमध्ये सापडलेल्या नागरीकांना दिलासा देऊन राहण्याजोग्या सुविधांबाबत आराखडा मंजूर करण्याची आवशक्यता, शासनाने याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनील राणे , वि. स. स. | कित्ता |
| ३१९. | "दिनांक २२ मार्च २०१६ रोजी शासन परिपत्रकाद्वारे म्हाडाच्या ५६ वसाहतीतील सन १९९८ ते २०१८ या कालावधीमधील थकीत सेवा शुल्काचा भरणा करण्याकरिता अभय योजना लागू करणे, सदर अभय योजना लागू होऊन देखील अद्याप म्हाडा रहिवाशांकडून थकीत सेवा शुल्क भरण्याकरिता उदासीनता असणे, वारंवार म्हाडा रहिवासी यांच्याकडून थकीत सेवा शुल्क माफ करण्याची मागणी येणे, दिनांक १४ मे, २०२३ ला म्हाडाच्या बृहन्मुंबई मधील ५६ वसाहतीतील संस्थेकडील सन १९९८ ते २०१८ या | श्री. मंगेश कुडाळकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | कालावधीतील वाढीव सेवाशुल्क माफ करण्यात करण्याबाबत सर्व गृहनिर्माण संस्थांनी मागणी करणे, सदर मागणीच्या अनुषंगाने सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय यांनी सेवाशुल्क माफ केल्याचे घोषित करणे, अद्याप म्हाडा प्राधिकरणामार्फत सदर घोषणेच्या अनुषंगाने कारवाई प्रलंबित असणे, सदर निर्णय झाल्यावर अनेक इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास मदत होणे, निर्णय होत नसल्याने नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, शासनाने याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३२०. | "निर्मल सोसायटी, हनुमान नगर, नरशीपाडा येथील भुखंड क्र. १६१, १६१/१ ते २, सर्व्हे क्र.२३. महिन्द्र ग्रीन गेट जवळ, सेट्टीया डेव्हलपर्स यांनी ६० झोपड्यांचे बांधकाम अनधिकृतरित्या केल्याची बाब माहे एप्रिल, २०१३ मध्ये उघडकीस येणे, सदर विभागाचे कनिष्ठ अभियंता श्री. वाघमारे यांच्याशी उक्त बाबीसंदर्भात पाठपुरावा केला असता त्यांनी सदर तक्रार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या सक्षम प्राधिकारी-६ यांच्याकडे असल्याचे कळविले तसेच सदर भुमापकासह सदर जागेची पाहणी देखील करण्यात येणे, पाहणी करतेदरम्यान ६० नवीन झोपडपट्टी बांधल्याचे प्रथमदर्शनी आढळून येणे, त्यापैकी ३७ झोपड्या बंद होते, संबंधित जागेची तक्रार स्थानिक पोलीस ठाणे येथील केली असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नरेंद्र शिंदे यांनी देखील सदर जागेची पाहणी करण्यात येणे, त्यानंतर पोलीसांकडून जागा रिकामी करण्याबाबत धमकी देण्यात येणे तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी विकासकास पाठीशी घालण्याचा प्रयत्न करून स्थानिक रहिवाश्यांना डावलण्याचा प्रकार निदर्शनास येणे, याबाबत स्थानिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, सेट्टीया डेव्हलपर्स या विकासकाकडून शासनाची मोठ्या प्रमाणात फसवणूक | श्री. मंगेश कुडाळकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | करण्यात येणे, सेट्टीया डेव्हलपर्स तसेच तत्कालिन पोलीस अधिकारी, वॉर्ड अधिकारी व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे सक्षम अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांच्यावर शासनाने त्वरित कारवाई करणे अपेक्षित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३२१. | "शासनाने गृहनिर्माण विभागामार्फत म्हाडाच्या कोकण, पुणे, नागपूर व अमरावती मंडळाच्या वसाहतीतील रहिवाश्यांसाठी सेवाशुल्क भरण्यासाठी ई-बिलिंग सेवाचे उद्धाटन केल्याचे जाहीर करून म्हाडा उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या चार म्हाडा मंडळात ऑनलाईन बिलिंगचे केल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, रहिवाश्यांना ई-बिलिंग प्रणालीचा वापर करण्यासाठी म्हाडाचे संकेत स्थळ देखील निर्माण करण्यांत येणे, त्यासाठी त्यानुसार म्हाडा मुंबई व छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंडळातील रहिवाश्यांसाठी ई-बिलिंग प्रणाली सुरू करण्यांत आलेली असणे, तथापि कोकण म्हाडा मंडळाच्या वसाहतीतील रहिवाश्यांसाठी सदर ई-बिलिंग सेवा अद्यापही सुरू करण्यांत आली नसल्याचे दिनांक ६ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे शुल्क भरण्यासाठी महिन्यातील ठराविक तीन-चार दिवस त्या त्या वसाहतीत शुल्क रक्कम घेण्यास कर्मचारी नेमले असेल तरी महिन्याच्या शेवटच्या आठवडयातील तो कालावधी अडचणींचा ठरत असल्याने कोंकण म्हाडा रहिवाश्यांना वांद्रे येथील गृहनिर्माण मंडळ कार्यालयात पदरमोड करून जावे लागण्याची येत असलेली पाळी, परिणामी, म्हाडा कोंकण वसाहतीतील रहिवाश्यांना अकारण होत असलेला त्रास, परिणामी त्यांच्यामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, त्यामुळे कोंकण म्हाडा वसाहतीचे ई-बिंलिग सेवेचे रखडलेले काम तातडीने सुरू करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | डॉ. जितेंद्र आव्हाड , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३२२. | "ग्रामपंचायत अनगर- कोंबडवाडी, नालबंदवाडी, खंडोबाचीवाडी, कुरणवाडी (अ) या चार ग्रामपंचायतीची मिळून अनगर नगरपंचायतची स्थापना दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२१ रोजी होणे, सदर नगरपंचायतमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ची अंमलबजावणी करण्यांत यावी या हेतूने ४७० लाभार्थ्यांचा प्रस्ताव म्हाडा कार्यालयाकडे सादर करण्यांत येणे, सदर प्रस्तावाला केंद्रस्तरीय बैठकीमध्ये अनगर नगरपंचायतीस मिशन सिटीमध्ये संलग्न अंमलबजावणी करण्याच्या अटीने मंजुरी देण्यांत येणे, अनगर नगरपंचायतीचा ४७० लाभार्थ्यांचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आल्याचे म्हाडाद्वारे सांगण्यात येणे, पुन्हा तो प्रस्ताव ३६ व्या slsmc बैठकीत Recertification मध्ये टाकून केंद्र शासनाकडे सादर करण्यांत येणे, या प्रस्तावावरील एकूण २५० लाभार्थ्यांनी बांधकाम सुरू केले असून त्यांना निधी देण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास येणे, अनगर नगरपंचायतीस pmay mission city मध्ये संलग्न करण्यात येऊन प्रस्ताव १०० टक्के Attachmnet देखील करण्यांत येणे, प्रकल्पातील लाभार्थ्यांना बांधकाम परवाने वितरित करून Geo tagging देखील सुरू करण्यांत येऊन प्रस्तावास MIS वर केंद्र शासनाद्वारे मंजुरी देण्यात येणे, परंतु माहे सप्टेंबर, २००३ पासून सदर प्रस्ताव mis पोर्टलवर आढळून न येणे, तसेच Geo tagging देखील बंद झालेले असणे, त्यामुळे योजनेअंतर्गत घरबांधकाम करणाऱ्यांना अनुदान मिळण्यापासून वंचित रहावे लागत असणे, शासनाने याप्रकरणी चौकशी करून लाभार्थ्यांना पुढील कामांना अनुदान चालू करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. यशवंत माने , वि. स. स. | कित्ता |
| ३२३. | "मुंबईतील लालबाग येथील पानवाला चाळ, तारानाथ निवास व परळ येथील नानाभाई चाळ या उपकरप्राप्त इमारतीचा पुनर्विकास गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला असणे, सदर तीन्ही चाळीचे पुनर्विकासाचे | श्री. अजय चौधरी , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | काम करणाऱ्या विकासकांनी म्हाडाकडून एनओसी घेऊनही अद्याप पुनर्विकासाच्या कामास सुरुवात करण्यात आलेली नसणे, मा.उच्च न्यायालयाने पानवाला चाळ पुनर्विकास प्रकल्प ताब्यात घेऊन चाळीतील रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याचे आदेश म्हाडा प्रशासनाला देणे, नानाभाई चाळीचा चाळीतील रहिवाश्यांना संबंधित विकासकांकडून पर्यायी भाडे न दिल्याने व वेळेत पुनर्विकासाचे काम न केल्यामुळे म्हाडा प्राधिकरणाने विकासकास दिलेले नाहरकत रद्द करणे, नानाभाई चाळ, पानवाला चाळ व तारानाथ निवास या तिन्ही चाळीच्या पुनर्विकाससंदर्भातील अधिग्रहनाचा प्रस्ताव म्हाडा प्राधिकरणाने शासनाकडे सादर केलेला असणे, परंतू सदर प्रस्तावावर शासनाने अद्याप कोणताच निर्णय घेतलेला नसणे, परिणामी उक्त दोन्ही चाळींचा पुनर्विकास रखडणे, त्यामुळे रहिवाश्यांमध्ये वाढते असुरक्षितेचे वातावरण, त्यातून वाढता तीव्र असंतोष, शासनाने उक्त दोन्ही चाळींच्या पुनर्विकासाचे काम तातडीने पूर्ण होण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३२४. | "झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्राधिकरणामध्ये प्रशासकीय भ्रष्टाचार होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये उघडकीस येणे प्राधिकरणपामध्ये पैसे देऊन क्रिम पोलिंग मिळविण्याचे प्रमाण दैनंदीन वाढत जाणे, एकाच जागेवर वर्षांनुवर्ष असुनही बदली न होण्यामुळे प्राधिकरणात प्रशासकिय मुजोरी वाढत जाणे, उपमुख्य अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना माहे जानेवारी, २०१७ पासून बदली न करता एकाच पदावर आजतगत कायम ठेवून, शासनाच्या बदली धोरणचे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे होत असलेले उल्लंघन, प्रतिनियुक्तीच्या नियमांना पायदळी तुडवून एकाच व्यक्तीला वर्षोनुवर्ष त्याच जागेवर ठेवल्याने दैनंदीन कामकाजात वाढत असलेली मक्तेदारी, तसेच | श्री. समाधान अवताडे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सर्व सामान्याच्या कामकाजास बसलेली खीळ त्यामुळे हवालदील झालेली जनता, परिणामी सदर अधिकारी व त्यास संरक्षण देणाऱ्या यंत्रणेची सखोल चौकशी करण्याची व तात्काळ बदली करण्याची होत असलेली मागणी,याकडे शासनाने होत असलेली अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३२५. | "राज्यात जवळपास ५० हजार वेश्म संस्था घोषणापत्राद्वारे नोंदणी असणे, घोषणापत्र नोंदणीनंतर सदरची नोंद जरी सहकार निबंधक कार्यालयात करण्याची तरतूद असली तरी विकासकामार्फत नोंदणी केली जात नसणे, वेश्म संस्थेत निवडणुकांबाबत नियम नसल्याने निवडणुकांमध्ये गैरप्रकार होणे, दादागिरी करून काही सभासद वर्षानुवर्षे पदावर राहणे, वेश्म संस्थांच्या लेखापरीक्षणावर शासनाचे नियंत्रण नसणे, लेखापरीक्षण दोषदुरुस्ती अहवाल सादर केले जात नसणे, वेश्म व्यवस्थापक समितीला अपात्र करण्याची तरतूद नसणे, वेश्म संस्थेच्या कारभाराची चौकशी करण्याचे अधिकार शासनास नसणे, वेश्म संस्थेवर प्रशासक नेमणुकीचा तरतूद नसणे, वेश्म संस्थांना अपूर्ण आणि तोकडे नियम लागू असणे, दैनंदिन कामकाज करणे अतिशय आव्हानात्मक असणे, वेश्म उपविधी मर्यादित असणे, वेश्म उपबंधातून बाहेर पडून सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी वेश्म मालकांचा कल वाढत असणे, अशा वेळी वेश्म संस्थाना मोफा अधिनियमाचे कलम १० अन्वये जिल्हा उपनिबंधक यांचे समक्ष सुनवाई घेतली जाणे, अशी सुनवाई घेणे आवश्यक नसल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने, WRIT PETITION NO.८२८३/२०२२ दिनांक ६ डिसेंबर, २०२३ अन्वये नोंदविणे, विकासक वेश्म संस्था नोंदणी करून, बेकायदेशीररित्या पार्किंग, टेरेस आदींवर मालकी हक्क घोषणापत्रात नमूद करून ठेवत असणे, डीड अपार्टमेंट हेच जमिनीचे अभिहस्तांतरण असूनसुद्धा | ॲड. राहूल कुल,<br>श्री. जयकुमार गोरे ,<br>वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | अपार्टमेंटधारकांचे नाव सातबारावर लावण्यास तलाठी नकार देत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३२६. | "सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे सभासदांनी शहर सिटी सर्व्हे नंबर २३२ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येत असलेल्या २३८ पैकी १९० सदनिका पत्रकार संघाने तयार केलेल्या यादीनुसार म्हाडा ने पारित केलेल्या ठराव क्रमांक ६३२१ मधील मुद्दा क्रमांक २.६ नुसार मान्यता मिळण्याची मागणी सोलापूर पत्रकार संघाने केलेली असणे, पत्रकारांसाठी गृह संकुल उभारण्यासाठी श्रमिक पत्रकार संघाचा २००४ पासून पाठपुरावा सुरू असणे, या पाठपुराव्यामुळे सोलापूर शहरातील सिटी सर्व्हे नं. २३२ वर मनपाच्या विकास आराखड्यानुसार असलेल्या पत्रकार भवन व म्युझियम या आरक्षणातून ०.८० हेक्टर इतकी जागा वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यास शासनाने मान्यता दिली असणे, त्यानुसार दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी तत्कालीन महसूल मंत्री महोदयांनी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत गृहनिर्माण योजनेसाठी तात्काळ जागा उपलब्ध करून सूचना म्हाडास करण्यात आलेल्या असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सचिन कल्याणशेट्टी , वि. स. स. | कित्ता |
| ३२७. | "राज्यातील विजाभज प्रवर्गातील बनावट जात दाखले व जातवैधता प्रमाणपत्रांव्दारे नोकरी व शासकीय सवलतीचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांची चौकशी करण्यासाठी एसआयटीव्दारे चौकशी करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये मुख्यमंत्री इ.मा.ब.क. मंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे करणे सन १९३१ च्या जातनिहाय जनगणनेनुसार राज्यात एकूण १८ ते २० हजार लोकसंख्या मूळ राजपूत भामटा प्रवर्गाची असून बुलढाणा जिल्ह्यातील चिखली लोणार नांदूरा तालुक्यात ५ ते ७ हजार बनावट प्रमाणपत्र समितीने वितरित केल्याचे निदर्शनास येणे | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. सुरेश वरपुडकर, डॉ. नितिन राऊत, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. अमित देशमुख, श्री. धिरज देशमुख, | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सामाजिक न्याय विभागाने बनावट जात वैधता प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी नेमलेल्या वारे समिती यवतमाळने १५६८ पैकी फक्त ५० प्रकरणांची तपासणी केली असता ४७ प्रकरणे अवैध ठरवून उर्वरित २ प्रकरणांबाबत प्रस्ताव दाखल न करताच दिल्याचे निदर्शनास येऊन ७ महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही याप्रकरणी संबंधित दोषी जात प्रमाणपत्र घेणाऱ्या व देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई केलेली नसणे तसेच राज्य मागासवर्ग आयोग अहवाल क्र.४९/२०१४ अद्याप शासनाकडून स्वीकारण्यात न आल्याबाबत चौकशी करून तातडीने एसआयटीव्दारे चौकशी करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी, आरक्षण बचाव संघर्ष समिती अध्यक्ष राष्ट्रीय अखिल भारतीय राजपूत भामटा युवक आघाडी यांनी शासनाकडे केलेली असणे याबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्यास नागपूर येथे आंदोलन करण्याची घोषणा संघटनेमार्फत केलेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. अमित झनक,<br>श्री. विश्वजित कदम,<br>श्री. सुभाष धोटे,<br>श्री. सुनिल केदार,<br>श्री. विकास ठाकरे,<br>श्रीमती प्रतिभा धानोरकर,<br>श्री. संजय जगताप,<br>श्री. विक्रमसिंह सावंत, वि. स. स. | |
| ३२८. | "राज्य उत्पादन शुल्क विभागात लघुलेखक, लघुटंकलेखक, जवान, वाहनचालक, चपराशी अशी पदे भरण्याकरिता माहे डिसेंबर, २०२३ च्या सुमारास जाहिरात काढण्यात येणे, यात आदिवासींना केवळ "जवान" या एकाच संवर्गातील ५६८ जागांपैकी केवळ ३ जागा राखीव असणे, या पदभरतीमध्ये अनुसूचित जाती, इतर मागासप्रवर्ग, विशेष मागासप्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब,क,ड), आर्थिक दुर्बल घटक अशा प्रवर्गाना त्यांच्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार आरक्षित पदे उपलब्ध असून फक्त आदिवासींची पदे कमी करण्यात येणे, हा आदिवासी उमेदवारांवर अन्याय असणे, परिणामी त्यांच्या निर्माण झालेली असंतोषाची व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल भुसारा , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३२९. | "मेसर्स सुला विनियार्डस् लिमिटेड, गोवर्धन, ता.जि.नाशिक व मे. सुला विनियार्डस् लि., जऊळके (वणी), ता. दिंडोरी, जि.नाशिक या वाईन उत्पादक कंपन्या वाईन उपभोक्त्यांकडून उत्पादन शुल्क वसूल करतात मात्र त्याचा भरणा शासनास करीत नाहीत, अशी तक्रार सन २००७ मध्ये करण्यात आली असून आजपर्यंत १६ वर्षे या कंपन्यांनी न्यायालयीन वाद निर्माण करून दीडशे कोटी रुपयांचे शुल्क थकविले असणे, शासनाने वाईनरी उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी उत्पादन शुल्क माफ केले असताना काही वाईनरी उद्योगांकडून मात्र शासनाची फसवणूक केली जात असणे, सुला विनियार्डस् या कंपनीकडून हॉटेल, रिसॉर्ट, वाईन फेस्टिवल व्यवसायही केला जात असून या माध्यमातून शासकीय करचोरीच्या तक्रारी येत असणे, अंमलबजावणी यंत्रणेकडून शुल्क वसुलीबाबत प्रामाणिक प्रयत्न होत नसल्यामुळे कंपनीला कालापव्यय करण्यास मोकळीक मिळाली असणे, कंपनीकडून शासनाची फसवणूक होत असताना उत्पादन वाढविण्यास कंपनीला मान्यता दिली जात असणे, सन २००७ ते २०२३ या काळात शुल्क वसुली, कंपनीने शासनाची केलेली फसवणूक, आदरातिथ्य व्यवसायातून केलेली करचोरी याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याची होत असलेली मागणी, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी वाईनरी उद्योगामध्ये चुकीचा संदेश जात असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुभाष धोटे , वि. स. स. | कित्ता |
| ३३०. | "राज्यातील अंगणवाडीसेविकांनी आपल्या प्रमुख मागण्यांकरिता दिनांक ४ डिसेंबर, २०२३ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत उपोषण करण्याचा दिलेला इशारा, अंगणवाड्यांमधील कामाच्या सर्व नोंदी ऑनलाईन करण्यासाठी अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या मोबाईलवरच नोंदी करण्याची सक्ती करण्यात | श्री. रवींद्र धंगेकर, श्री. संग्राम थोपटे, श्री. कुणाल पाटील, श्री. प्राजक्त तनपूरे, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. हिरामण | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | येणे, परंतु शासनाने सहा वर्षापूर्वीच कालबाह्य झालेले आणि त्यावेळीसुध्दा तांत्रिकदृष्ट्या व्यवस्थित नसलेले मोबाईल हँडसेट हे अंगणवाडी सेविकांना दिले असल्याने अंगणवाडी सेविकांनी न्यायालयात धाव घेतल्यानंतर मा. न्यायालयाने सरकारला अंगणवाडी सेविकांना नविन मोबाईल देण्याबाबत आदेश देऊन ही अंगणवाडी सेविकांना नविन मोबाईलच दिले नसल्याने अंगणवाडी सेविका ऑनलाईन नोंदी करणार कशा असा संभ्रम अंगणवाडीसेविकांमध्ये निर्माण होणे, गर्भवती व बालकांचे लसीकरण, गृहभेटी, बालकांच्या दैनंदिन नोंदी, स्तनदा माता आणि मुलीच्या आरोग्य नोंदी, पुरक पोषण आहार माहिती, अंगणवाड्यांमधील बालकांची माहिती, औषधांचे वाटप बालकांच्या वजन व उंचीच्या नोंदी, आदि नोंदी अंगणवाडी सेविकांच्या खाजगी मोबाईलवर करण्याची सक्तीमुळे अंगणवाडी सेविकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, मा. न्यायालयाच्या आदेशाची अद्याप पूर्तता न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | खोसकर, श्री. अबू आजमी, श्री. राजु आवळे, श्री. लहू कानडे, डॉ. विनय कोरे, श्री. मानसिंग नाईक, श्री. रवि राणा, श्रीमती अश्विनी जगताप, श्री. संजय रायमुलकर, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. सुरेश वरपुडकर, डॉ. नितिन राऊत, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. अमित देशमुख, श्री. अमित झनक, श्री. विश्वजित कदम, श्री. सुभाष धोटे, श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. संजय जगताप, श्री. विक्रमसिंह सावंत, श्री. राजु पारवे, श्री. रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अनिल देशमुख, | |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | | श्री. दत्तात्रय भरणे, श्री. दौलत दरोडा, श्री. प्रकाश आबिटकर, श्री. संजयमामा शिंदे, श्री. चंद्रकांत पाटील, श्रीमती सरोज आहिरे, श्री. मंगेश चव्हाण , वि. स. स. | |
| ३३१. | "जिल्हा कार्यक्रम अधिकारी बालकल्याण महिला व बालविकास, जि.प.पुणे यांनी दिनांक १७ मे, २०२३ रोजी समानीकरण बदल्या करतांना दिनांक ५ मे,२०१४ च्या शासन निर्णयानुसार करण्यात आलेल्या नसणे, शासन निर्णय दिनांक १५ मे,२०१४ मधील सर्वसाधारण सुचनेनुसार बदली प्रक्रिया राबविण्यापूर्वी ज्या तालुक्यात पदांची रिक्तता जिल्ह्याच्या सरासरीपेक्षा जास्त असणे, अशा तालुक्यातील रिक्त पदे प्रशासकीय विनंती बदली प्रक्रियेमध्ये प्राधान्याने भरणे आवश्यक असतांना त्या पध्दतीने या बदल्या करण्यांत आलेल्या नसणे, सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार बदली पात्र कर्मचाऱ्यांमध्ये सर्वात सेवाजेष्ठ कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठतेनुसार पुरेशा प्रमाणात जेष्ठता सूची प्रसिद्ध करून हरकती व सुचना मागविण्यात येऊन अंतिम जेष्ठतासुची बदल्यांची कार्यवाही न करणे, सेवा जेष्ठता यादीचा विचार करण्यांत आलेला नसणे, सदरील बदली प्रक्रिया ही शासन निर्णय दिनांक १५ मे, २०१४ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार झालेली नसणे, याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ च्या पत्राद्वारे जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बालकल्याण (महिला व बालविकास) यांनी दिनांक १७ मे,२०२३ रोजी नियमबाह्य राबविण्यात आलेली समानीकरण तत्वावर करणेत आलेली बदली प्रक्रिया रद्द करणेबाबत आदेशित करणे व विभागीय आयुक्त यांचे | श्रीमती सरोज आहिरे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२३ या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेवर नियमबाह्य बदली प्रक्रिया राबविण्याप्रकरणी कार्यवाहीचे आदेश देऊनही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३३२. | "राज्यात एक लाख दहा हजार अंगणवाड्या कार्यरत असणे, सदर अंगणवाड्यांमार्फत कुपोषण निर्मूलनाचा कार्यक्रम राबविला जाणे, यासाठी सहा महिने ते तीन वर्षे, तीन वर्षे ते सहा वर्षे स्तनदा माता व गरोदर माता यांना पूरक पोषण आहार पुरवठा केला जात असणे, शासनाच्या धोरणाप्रमाणे पूरक पोषणपुरवठा आहार हा विहित मुदतीत आणि मागणी केल्यानंतर विहित कालावधीमध्ये पुरवठा करणे आवश्यक असणे सदर पुरवठादाराने दिलेल्या कालावधीमध्ये आहार पुरवठा केला नाही तर संबंधित पुरवठादाराला दंड आकारणी करावयाची असणे, जे पुरवठादार आहार पुरवठ्याच्या पोहोच पावत्या त्यांच्या कार्यालयामध्ये प्रिंट करीत असणे व कार्यालमध्ये प्रिंटिंग वेळेस प्रिंट केलेला दिनांक हा पुरवठादार वाटपाचा दिनांक दाखवत असणे, वास्तविक ज्यादिवशी आहार वाटप करतात  तोच दिनांक त्या पावत्यावर टाकणं आवश्यक असताना अंगणवाडी सेविकांना दहशत दाखवून दिनांक टाकून त्यांना दिनांक टाकु दिला जात नसणे व त्यामुळे अंगणवाडीला आहार पुरवठा हा वेळेत होत नाही, पर्यायाने मुलांनाही आहार वेळेत दिला जात नसणे, त्यामुळे कुपोषणामध्ये कमी नसणे, आहार उशिरा पुरवठा केल्यामुळे जो दंड संबंधित पुरवठादार यांना होणे आवश्यक आहे तोही लावला जात नाही यामध्ये शासनाचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान होणे, यासर्व गंभीरप्रकाराची एसआयटी स्थापन करून चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती सरोज आहिरे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३३३. | " गडचिरोली जिल्हा क्रीडा संकुल च्या पहिला टप्प्यातील कामाची दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी २४ कोटी ३१ लक्ष रुपयाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन १८ महिन्याचा कालावधीत निश्चित करून बांधकाम सुरू होणे, परंतु सदर कामाची प्रगती खूपच मंद असल्याने ३४ महिन्याच्या कालावधीनंतरही वापरासाठी हस्तांतरित होईपर्यंत कोणतीही इमारत पूर्ण न होणे, १८ महिन्यांच्या कालावधीनंतर दररोज पाचशे रुपये कमी दंड असल्याने कंत्राटदाराने अजूनही मनुष्यबळ व यंत्रसामुग्री त्यात गुंतवलेली नसणे, दिनांक १ जून, २०२३ पासून दररोज ५ हजार रुपये दंड रक्कम ठोठावूनही कंत्राटदार कोणत्याही पत्राचे पालन करण्यास प्रतिसाद न देणे, कंत्राटदाराला फक्त कामे करण्यात व निकृष्ट दर्जाची कामे करण्यात रस असून जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ साठीही त्यांनी अशाच प्रकारचे निकृष्ट दर्जाचे काम केल्याने या कंत्राटदादाला काळया यादीसाठी नोटीस बजावलेली असणे, सदर कंत्राटदार मनमानी पद्धतीने काम करीत असून यास कत्राटदाराकडे काम राहिल्यास सदर काम पूर्ण होणे शक्य नसणे, केलेल्या कामाची गुणवत्ता तपासून सदर कंत्राटदाराला काळे अधिक टाकण्याची आवश्यकता, सदर कंत्राटदराची निविदा प्रक्रिया तातडीने रद्द करून पुढील उर्वरित कामांसाठी नवीन निविदा प्रक्रिया राबवून दुसऱ्या कंत्राटदाराला देण्याच्या दृष्टीने शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | डॉ. देवराव होळी , वि. स. स. | कित्ता |
| ३३४. | " राज्यात विविध प्रकारात मागील अनेक वर्षापासून महाराष्ट्रातील खेळाडू उल्लेखनीय कामगिरी करीत असून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके पटकावून प्राविण्य प्राप्त करीत असणे, या प्राविण्य प्राप्त खेळाडूंना राज्य शासनाकडून शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असणे, सदर खेळाडूंना शासनामध्ये नोकरी देण्याकरिता आरक्षणाची तरतूद | कॅप्टन आर. सेल्वन , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | करण्यात येणे, परंतु मागील अनेक वर्षांपासून क्रीडा क्षेत्रासाठी आरक्षित असलेली पदे भरण्यात आली नसल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील वर्ग -१ व वर्ग -२ करिता क्रीडा क्षेत्रातील पात्र उमेदवारांची भरण्यात येणारी पदे सन २०१७ पासून भरण्यात आली नसल्याची बाब समोर येणे, राज्यातील शिवछत्रपती पुरस्कारतीना तसेच इतर आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगिरी या आधी देण्यात येणारी रोख रक्कम देखील बंद करण्यात आली असणे, राज्यात पॉवर लिफ्टिंग खेळात प्राविण्य प्राप्त खेळाडूंना ५% कोट्यात नोकरी देण्याची तरतूद असतानाही त्याची अंमलबजावणी न होणे, राज्यातील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना राज्य शासनामध्ये नोकरिकरिता असणारा आरक्षित कोटा मागील अनेक वर्षांपासून बंद असल्यामुळे खेळाडूंमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना सदर खेळाडूंना शासकीय सेवेत समाविष्ट करून प्रोत्साहित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३३५. | " राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) तासिका तत्वावर काम करणारे ४००० हजार कर्मचारी अनेक वर्षांपासून काम करीत असणे, शासनाने नुकतीच १,४५७ कर्मचारी नेमण्याची घोषणा केलेली असणे, या घोषणेनुसार पद भरती केल्यास बऱ्याच वर्षांपासून तासिका तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर भीषण अन्याय होत असणे, आतां तासिका तत्वावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना कामावरुन काढल्यास त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची परिस्थिती ओढावणार असणे, आता जे कर्मचारी तासिका तत्वावर काम करतात त्यांना या कामाचा अनुभव असल्यामुळे त्यांना आता नवीन पद भरती करण्याऐवजी या आधी तासिका तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पूर्णवेळ नियुक्त करण्याची व त्यांच्या अनुभवाचा फायदा घेण्याची तसेंच त्यांच्या कुटुंबियांवर ओढवणारी उपासमारीची परिस्थिती | श्री. चंद्रकांत नवघरे , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | रोखण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३३६. | " मौजे घोडेश्वर ता. मोहोळ जि. सोलापूर जमीन गट नं.२४/१ पैकी क्षेत्र ७६-आर हा सन १९८८ पासून जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन सोलापूर यांचे नावे ७/१२ हक्क पक्की नोंद असणे, सदरच्या जमिनीची नोंद 'रस्ता पड' अशी असणे, सदरची जमीन धरणग्रस्त श्रीमती सिताबाई मखरे यांना जमीन भोगवटादार वर्ग-१ या धारणा प्रकरणाने मंजूर होणे, दुसऱ्याच दिवशी सदरची जमीन श्री. तन्वीर शेख यांनी विकत घेणे, या जमिनीचे वहिवाटदार शासनच असतानाही तलाठी व मंडळ अधिकारी यांनी बेकायदेशीररित्या भोगवटादार वर्ग-१ अशी नोंद करणे, तलाठी, मंडळ अधिकारी व संबंधित पुनर्वसन अधिकारी यांनी श्री. शेख यांचेशी संगनमत करून रस्ता पड ही नोंद काढणे, सदरची जमीन ही श्री. शेख यांनी श्री.सागर कांबळे यांना खरेदी खताने विकणे, अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी या गटाचे वाटप करता येत नाही असे आदेश दिल्याने प्रकल्पग्रस्तास मंजूर जमीन मंजुरीचे आदेश रद्द न करता तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार व तहसिलदार, मोहोळ यांनी खोटी कागदपत्रे तयार करून रस्ता पड ऐवजी पिक पाण्याची नोंद करून ती जमीन राष्ट्रीय महामार्गाकरिता संपादित करून रुपये ३ कोटी २४ लाख ३०,५८९ इतकी रक्कम मंजूर करून गैरव्यवहार करणे, तसेच मौ.घोडेश्वर येथील गटनं. २४ ते ३० मध्ये रा.मा.क्र.१६६ मार्गावरील भूसंपादनात भ्रष्टाचार झालेला असणे, भूसंपादन तथा उप विभागीय अधिकारी, पंढरपूर यांची याप्रकरणी प्रमुख संशयाची भूमिका असणे, त्यामुळे भूसंपादनाच्या सर्व प्रकरणाची चौकशी करून दोषीअधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता |
| ३३७. | "दिनांक २५, २६ व २७ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यात झालेला गारपिटीसह अवकाळी पाऊस, विदर्भासह | श्री. जयंत पाटील,श्री. वैभव | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | राज्यातील सगळयाच जिल्ह्यात या पावसाने दाणादाण उडवली असून नाशिक जिल्ह्यात द्राक्ष बागांची व कांदा पिकाची झालेली हानी, ठाणे, पालघर रायगडसह पडलेल्या मुसळधार पावसामुळे भात पिकाचे झालेले नुकसान तसेच निफाड व चांदवड तालुक्यासह अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुका नंदुरबार, धुळे, जळगाव व पुणे जिल्ह्यातही मुसळधार पावसाने भात पिकाचे व इतर पिकांचे झालेले नुकसान, कापूस, कांदा, द्राक्ष, केळी, मोसंबी, डाळींब तसेच भात, ज्वारी, गहू, हरभरा इत्यादी पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी होत असलेली मागणी, विविध जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमध्ये अंगावर विज पडून एका तरुणीसह चार व्यक्तींचा झालेला दुर्देवी मृत्यु, शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडलेला असताना आता झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकरी आर्थिक संकटात पुडता बुडालेला असणे, आता शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची व त्यांना आर्थिक मदत त्वरीत मिळण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | नाईक, श्री. किशोर जोरगेवार, श्री. रोहित पवार, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. उदयसिंग राजपुत, श्री. चंद्रकांत पाटील, श्री. किशोर पाटील,श्री. संजय गायकवाड, डॉ. नितिन राऊत, श्रीमती श्वेता महाले,डॉ. राहूल पाटील,श्री. प्रकाश सोळंके, श्री. दिलीपराव बनकर,श्री. रवि राणा,श्री. राजेश टोपे, श्री. अनिल बाबर,श्री. अनिल देशमुख,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे),डॉ. जितेंद्र आव्हाड, वि. स. स. | |
| ३३८. | " बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील महसूल मंडळ बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील सर्वच गावांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा फटका बसलेला असणे, असंख्य घरांची पडझड झालेली असणे, ग्रामीण भागात शेतकांचे भरपूर प्रमाणात नुकसान झालेले असणे, नागरिक व प्रामुख्याने शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात अडचणीत आलेला असणे, शासनाच्या दुष्काळग्रस्त यादीत तालुक्यातील पाच महसूल मंडळांपैकी फक्त तीनच मंडळांचा समावेश करण्यात | श्री. राजेश एकडे, श्री. बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बळवंत वानखडे, श्री. अमित झनक , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र. | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | आलेला असणे, त्यामुळे अतोनात नुकसान झालेल्या उर्वरित मलकापूर व नरवेल या दोन्ही महसुली मंडळातील ग्रामस्थ व शेतकऱ्यावर अन्याय झालेला असणे, दोन्ही महसूल मंडळाचा दुष्काळग्रस्त यादीमध्ये समावेश करण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी होणे, परंतु शासनाने यावर कुठलीही कार्यवाही केलेली नसणे, नागरिक व शेतकरी यांच्यामध्ये त्यामुळे शासनाप्रती प्रचंड असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३३९. | " श्रीगोंदा, जि.अहमदनगर तालुक्यातील मौजे वडगाव शिंदोडी या प्रकल्प बाधित गावचे गावठाणाचे अद्यापपर्यंत पुनर्वसन करण्यात आलेले नसणे, हे गाव घोड धरण प्रकल्पांमध्ये गेले असल्याने तेथील गावक-यांना अद्यापपर्यंत कोणत्यायही सोयी-सुविधा देण्यांत आले नसणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या मनामध्ये शासनाप्रती प्रचंड चिडीची भावना निर्माण झालेली असेणे, सदर गावाचे पुनर्वसन करून त्यांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. बबनराव पाचपुते,श्री. राम सातपुते , वि. स. स. | कित्ता |

***

## विवरण क्रमांक - ३६

## लक्षवेधी सूचनेवरील प्रगतीअहवाल सभागृहासमोर ठेवणे

(म.वि.स. नियम १०५ अन्वये)

| अ.क्र. (१) | विषय (२) | उत्तरीत झालेल्या सूचनेचा दिनांक व सदस्यांचे नांव (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| **१.** | **"हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे वाडा राष्ट्रीय स्मारक अद्याप उभारण्यात आले नसल्याबाबत.** | श्री. दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला. | दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला. |

## विवरण क्रमांक ३७

शासकीय ठराव (म.वि.स. नियम ११० अन्वये).

## निरंक

***

## विवरण क्रमांक - ३८

### अशासकीय ठराव

### ( म.वि.स. नियम १०६ अन्वये)

( १ ) एकूण आलेले ठराव — २६३
( २ ) अमान्य झालेले ठराव — ०७८
( ३ ) मान्य झालेले ठराव — १८७

| अ. क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नाव (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| १ | "मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसह महाराष्ट्र राज्याला ७२० कि. मी.चा समुद्रकिनारा लाभलेला असणे, सदर जिल्हयातील जनतेचे मासेमारी हे प्रमुख उत्पन्नाचे व जिवीताचे साधन असतानादेखील मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे असल्याने त्यांना सोईचे नसणे, मा.खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय कोकणात असावे अशी शिफारस केलेली असणे, सदर शिफारसीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स | ८ डिसेंबर, २०२३ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |

| अ. क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नाव (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| २ | "शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | डॉ. नितीन राऊत, वि.स.स. | ८ डिसेंबर, २०२३ | -- " -- |
| ३ | "राज्यात निरनिराळ्या विभागात येणाऱ्या प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रकल्प सुरू होण्याआधी प्रकल्पग्रस्तांचे योग्यप्रकारे पुनर्वसन करण्याबाबतचा आराखडा राज्य शासनाने तयार करून केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. | ८ डिसेंबर, २०२३ | -- " -- |

***

## विवरण क्रमांक - ३९

## समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव

(म.वि.स. नियम १९४ अन्वये).

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -४०

## समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव (सर्वसाधारण)

(म.वि.स. नियम १६३ अन्वये).

**निरंक**

*****

**विवरण क्रमांक -४१**
**महाराष्ट्र विधानसभा**
**विशेषाधिकारभंग सूचनां संबधी माहिती**
**विधानसभेच्या सन २०२३ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशनामध्ये विधानसभा विशेषाधिकार कक्षाकडे प्राप्त झालेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनांचे विवरणपत्र.**

| आ. क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५६ | श्री. अजय चौधरी, वि.स.स. दिनांक ३०/११/२०२३ | श्री. चक्रधर कांडलकर, उप. आयुक्त (विशेष अभियांत्रिकी), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेविरूद्ध"बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी-दक्षिण प्रभागातील ना. म.जोशी मार्ग आणि गणपतराव कदम मार्ग यावरील डिलाई रोड पुलाच्या (लोअर परेल) पोच रस्त्याचे लोकार्पण तसेच सरकत्या जिन्याचे भूमिपूजन गुरुवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी श्री. दिपक केसरकर, मा. मंत्री, शालेय शिक्षण व पालकमंत्री मुंबई शहर यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका श्री. चक्रधर कांडलकर, उप-आयुक्त (विशेष अभियांत्रिकी), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी महानगरपलिकेच्या वतीने सर्वांना पाठविली होती. | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावीत. |

| आ. क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | सदरहू कार्यक्रम सन्माननीय सदस्यांच्या (शिवडी) या मतदारसंघात असल्याने निमंत्रण पत्रिकेत स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचे नाव छापणे तसेच सन्माननीय सदस्यांना निमंत्रण देणे बंधनकारक असताना निमंत्रण पत्रिकेत सन्माननीय सदस्यांचे नाव न छापल्याने तसेच त्यांना निमंत्रित न केल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय." | | |
| २ | १५७ | श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स. दिनांक ०७/१२/२०२३ | (१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२) श्री. अनिल डिग्गीकर, व्यवस्थापकीय संचालक, सिडको (३) श्री. अस्तिककुमार पांडेय, जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांचेविरूद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिडकोच्या वाळूज प्रकल्पाच्या मागील ३० वर्षापासून चालू असलेल्या भूसंपादन आणि विकास कामातील दिरंगाई, मा. उद्योग मंत्री श्री. उदय सामंत यांनी वाळूज | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावीत. |

| आ. क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकल्पातील भूसंपादनासाठी प्रलंबित १२४.४० हेक्टर, आर क्षेत्रापैकी आगाऊ ताबे घेऊन विकास कामे केलेली ७.३० हेक्टर, आर क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्राचे संपादन न करण्याचा आणि प्रकल्पातील सर्व सोयी - सुविधा, रस्ते आणि विकास सिडकोच करणार असल्याचे सभागृहात वेळोवेळी आश्वासन देणे परंतु आश्वासनानुसार अद्यापपावेतो कार्यवाही न होणे, या विषयी मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २४/३/२०२३ रोजी बैठक घेऊन यंत्रणांना विहित कालावधीत कार्यवाही करण्याचे निदेश देणे. परंतु अद्यापही त्यावर सिडको तसेच जिल्हाधिकारी यांचे मार्फत कार्यवाही करण्यात न येणे. लोकप्रतिनिधी व सर्वसामान्य जनतेकडून प्रकल्प हस्तांतरित करण्यास विरोध असताना सिडकोच्या संचालक मंडळाने प्रकल्प हस्तांतरित करण्याबाबतचा ठराव क्र. १२७७६ दिनांक १४/९/२०२३ रोजी मंजूर करून दिनांक २०/९/२०२३ रोजी शासनास सादर केल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा व पर्यायाने विधानसभा सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग हा होय." | | |

| आ. क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १५८ | श्री. मोहन मते, वि.स.स. दिनांक १८/१२/२०२३ | श्री. राजेश कुमार जयस्वाल, व्यवस्थापकीय संचालक, महारेल यांचेविरूद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "महारेलच्या माध्यमातून नागपूर शहरात ९ उड्डाणपुलांचे उद्‌घाटन व ५ उड्डाणपुलाचे भूमीपूजन रविवार, दिनांक १७/१२/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता व्यंकटेश नगर, नंदनवन येथे मा. श्री. नितीन गडकरी, केंद्रिय मंत्री व मा. श्री. एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. श्री. देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. भूमिपूजन केलेल्या उड्डाणपुलांमध्ये सन्माननीय सदस्य प्रतिनिधीत्व करत असलेल्या दक्षिण-नागपूर मतदार संघातील २ उड्डाणपुलांच्या भूमिपूजनचा समावेश असून स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख सदरहू कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत न केल्याने तसेच सन्माननीय सदस्यांना सदरहू कार्यक्रमास निमंत्रित न केल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला अवमान व विशेषाधिकारभंग हा होय." | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावीत. |

| आ. क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| ४ | १५९ | प्रा. देवयानी फरांदे, वि.स.स. दिनांक १९ डिसेंबर २०२३ | श्रीमती सुषमा अंधारे (उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्या) यांचेविरूद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "विधानसभा सभागृहात अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी गृह विभागाबाबत चर्चा करताना "नाशिक येथील ड्रग प्रकरण" हा विषय सन्माननीय सदस्यांनी विधानसभा सभागृहात उपस्थित केला असता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या नेत्या श्रीमती सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सन्माननीय सदस्यांबाबत आक्षेपार्ह, अपमानजनक, चुकीचे विधान करून मतदारसंघात सदस्यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला व सदस्यांचे नाव असणारे पत्र नागरीक व पत्रकार यांच्यात वितरित करून सदस्यांची जाहीर बदनामी करण्याचा प्रयत्न केला तसेच सदरहू विषय सदस्यांनी प्रथम सभागृहात उपस्थित केला असल्यामुळे भविष्यात हा विषय सदस्यांनी पुन्हा सभागृहात उपस्थित करु नये | दिनांक १९ डिसेंबर २०२३ | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावीत. |

| आ. क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | म्हणून जाणीवपूर्वक पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांवर दबाव आणून त्यांना संविधानिक जबाबदारी पार पाडण्यास अडथळा निर्माण केल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय” | | |

***

# विवरण क्रमांक - ४२

## सांविधिक प्रस्ताव

( म.वि.स. नियम २९० अन्वये )

**निरंक**

***

**विवरण क्रमांक - ४३**

**अंतिम आठवडा प्रस्ताव**

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १. | सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, भास्कर जाधव, नानाभाऊ पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री राजेश टोपे, अमित देशमुख, अस्लम शेख, अमीन पटेल, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री सुनिल प्रभू, रविंद्र वायकर, राजन साळवी, | "राज्यात ढासळलेली कायदा सुव्यवस्था, ड्रग्ज, चरस, गांजा इत्यादी अंमली पदार्थांची अवैध मार्गाने सर्रासपणे सुरू असलेली विक्री, तसेच मेफेड्रॉन (एमडी) चे मोठ्या प्रमाणात सापडलेले अवैध साठे, महिलांवर होणारे अत्याचार, बलात्कार, विनयभंग, अपहरण तसेच कौटुंबिक हिसांचारात झालेली वाढ, उप राजधानी नागपूरमध्ये अधिवेशन सुरू असताना कडेकोट सुरक्षा व्यवस्था असूनही ड्रग्जची खरेदी-विक्री सुरू असल्याचे निदर्शनास येणे, ३०० पेक्षा अधिक मुलींना फसवून व अमिष दाखवून पळवून नेल्याच्या घडलेल्या घटना, विविध पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकांकडून विनयभंगाच्या तक्रारी नोंदवून घेण्यास करण्यात येत असलेली टाळाटाळ, मुंबई पोलिसांच्या आकडेवारीनुसार मुंबईत महिला अत्याचाराच्या एकूण ४,४०३ गुन्ह्यांच्या घटना घडणे, विनयभंग व अश्लील वर्तनाच्या एकूण १,५७२ घटना नोंदविण्यात आल्या असून याच कालावधीत ४४२ बलात्काराच्या गुन्ह्याची नोंद होणे, नागपूर शहरातील गुन्ह्यांचा दर एन.सी.आर.बी.च्या आकडेवारीनुसार मुंबई व | १९ व २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली सदर प्रस्ताव व म.वि.स. नियम २९३ अन्वये दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी विरोधी पक्षाकडून प्राप्त झालेल्या प्रस्ताव व अंतिम आठवडा प्रस्तावावर दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी एकत्रित उत्तर देण्यात आले. |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | प्रकाश फातर्पेकर, सुनिल राऊत, रमेश कोरगांवकर, रोहित पवार, राहुल पाटील, सुभाष धोटे, बाळासाहेब पाटील, संजय पोतनीस, सुरेश वरपुडकर, कैलास गौरंट्याल, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती सुलभा खोडके, श्री राजेश एकडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री बळवंत वानखडे, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, मोहनराव हंबर्डे, धीरज देशमुख, हिरामण खोसकर, रविंद्र धंगेकर, | पुण्यापेक्षा अधिक असणे, नागपुरातील चोरीचा दर राज्यात सर्वाधिक असून हे शहर देशात सहाव्या स्थानी असणे, नागपूर शहरातील सुरक्षित पार्किंगमधून देखील वाहने चोरीस जात असून यासंदर्भात दिवसाला चार-पाच गुन्ह्यांची नोंद होत असणे, बीड जिल्ह्यात अनुसूचित जमातीतील स्त्रीचा तिच्या कुटुंबियांसमोर विनयभंग करण्यात येणे, नुकताच देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा झाला असताना अद्यापि दलित बांधव राज्यात असुरक्षित असून त्यांना मिळणारी अमानुष वागणूक तसेच त्यांना करण्यात आलेल्या मारहाणीत झालेले मृत्यू, राज्यात काही वर्षांपासून लैंगिक शोषणासारख्या सायबर गुन्ह्यांच्या प्रकरणांतही वाढ होत असून या गुन्ह्यांमध्ये उकल होण्याचे प्रमाण अत्यल्प असणे, लैंगिक शोषणासारख्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात खंडणी वसूल करण्याचे व ऑनलाईन फसवणूकीचे प्रकार वाढीस लागणे, मुंबईसह राज्यात अनधिकृतरित्या सुरू असलेल्या लॉटरीने धुमाकूळ घातला असून अनधिकृत मशीन्स अनेक छोट्या दुकानांमध्ये बसवून सर्वसामान्यांची व शासनाची करोडो रूपयांची होणारी फसवणूक, या लॉटरीमुळे अनेक नागरिकांचे संसार उद्‌ध्वस्त होणे, मुंबईतील फोर्ट परिसरात ऑनलाईन बनावट लॉटरीबाबत माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस | |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| | कैलास पाटील, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, पी.एन. (सडोलीकर) पाटील, विनोद निकोले, सुनिल भुसारा, ॲड. अशोक पवार, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, अनिल देशमुख, प्राजक्त तनपुरे, संग्राम थोपटे, जितेश अंतापूरकर, नितीन देशमुख, उदयसिंग राजपूत, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री शिरीष चौधरी, अमित झनक, रणजित कांबळे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सुनिल केदार, | ठाण्यात अनेक गुन्ह्यांची नोंद असणे, तसेच मुंबईतील इतरही अनेक बेकायदेशीर ऑनलाईन लॉटरीविरूद्ध गुन्हे दाखल असूनही संबंधित पोलीस निरीक्षक कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असणे, सायबर क्राईमच्या माध्यमातून सर्वसामान्यांची होत असलेली लाखो रूपयांची फसवणूक, सायबर सुरक्षेसाठी क्षमतावाढ करण्याची गरज, ऑनलाईन गेम्सचा प्रसार करण्यासाठी हिंदी, मराठी चित्रपट कलाकारांसह क्रिकेटर जाहिरात करीत असल्याने याकडे तरूण आकर्षित होऊन आर्थिक अडचण, नैराश्य, शिक्षण व कुटुंबाकडे दुर्लक्ष, कर्जबाजारीपणा, निद्रानाश इत्यादी समस्या उद्धभवून पैसे हरल्याने अनेकांनी आत्महत्या करणे, राज्यात व केंद्रात सत्ता असतानाही विधीमंडळाने मंजूर केलेला आणि केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेला शक्ती कायदा मंजुरीच्या प्रतिक्षेत असणे, महामार्ग पोलीस मदत केंद्र तपासणीच्या नावाखाली वाहनधारक व चालकांची करीत असलेली आर्थिक लूट, परराज्यातून राज्यात चोरट्या मार्गाने अवैधपणे होणारी दारूची वाहतूक, अवैधमार्गाने सुरू असलेली दारूची विक्री तसेच या विभागात सुरू असलेला भ्रष्टाचार, अन्न व औषध प्रशासन विभागाकडून औषधी कंपन्यांवर धाडी घालून कारवाई करण्याचा बनाव करण्यात येणे, पनीर, दूध, मावा, | |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | विकास ठाकरे, राजू पारवे, सहसराम कोरोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, झिशान सिद्धीकी, लहु कानडे, ऋतुराज पाटील, श्रीमती जयश्री जाधव, श्री. राजू आवळे, वि.स.स. | मिठाई इत्यादी खाद्यपदार्थांमधील भेसळ रोखण्यास आलेले अपयश, राज्यात बंदी असलेला गुटखा, सुगंधीत तंबाखू व तत्सम पदार्थांची परराज्यातून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या होणारी वाहतूक व त्यांची ठिकठिकाणी सर्रासपणे सुरू असलेली विक्री, मुंबई, पुणे, नागपूरसह इतर शहरांत निर्माण झालेले प्रदूषण कमी करण्यास शासनास आलेले अपयश, परिणामी लहान बालकांसह सर्वांनाच गंभीर स्वरूपाच्या आजारांनी ग्रासणे, विद्यापिठांमध्ये उच्च शिक्षणात महिलांना आरक्षण नसणे, शालेय शिक्षणाची झालेली दुरवस्था, सिंचनाच्या प्रलंबित योजना पूर्ण करून जलयुक्त शिवार योजना कमी पर्जन्यमान असलेल्या भागात प्राधान्याने राबविण्याची आवश्यकता, विविध महानगरपालिका हद्दीत विकासकांकडून करण्यात आलेले अवैध बांधकाम व त्यातून करण्यात आलेला भ्रष्टाचार, राज्याच्या आर्थिक नियोजनात वाढलेला बेशिस्तपणा, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व भूमिका." | |

## विवरण क्रमांक - ४४
## अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेसंबंधातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक ४५

## सार्वजनिक हितसंबंधातील इतर बाबतीतील प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९३ अन्वये)

(१) प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या - ०३
(२) मान्य सूचनांची संख्या - ०३
(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - ०२

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १. | ॲड. आशिष शेलार, श्री. भरतशेट गोगावले, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, ॲड. माणिकराव कोकाटे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री संजय शिरसाट, किशोर पाटील, अतुल बेनके, नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, सर्वश्री सुनिल शेळके, रणधीर सावरकर, प्रकाश आबिटकर, चेतन तुपे, | "राज्यात गत तीन महिने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा मुद्दा आंदोलने, मोर्चे, अन्न सत्याग्रह इत्यादी माध्यमातून ऐरणीवर आला असणे, काही समाजकंटकांकडून आरक्षण मिळण्याकरिता जाळपोळ, दंगल इत्यादी माध्यमांचा वापर झाल्याचे निदर्शनास येणे, त्यापैकी काही गट मराठा समाजाचा ओबीसीत समावेश न करता स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी करीत असणे, तर काही गट मराठा समाजाला कुणबी ओबीसींचे दाखले द्यावेत म्हणून आग्रही असणे, यासोबतच राज्यातील ओबीसी जनमोर्चा, धनगर, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, बंजारा, मुस्लिम इत्यादी समाजही आरक्षणाच्या मागणीसाठी पुढे आल्याची बाब निदर्शनास येणे, कोळी व महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीत आरक्षणाचा लाभ मिळण्याबाबत व तसे दाखले देण्याबाबत होत असलेली मागणी, महायुती शासनाच्या काळात मराठा समाजाला देण्यात आलेले | १२, १३ व १४ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा होऊन दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी उत्तर देण्यात आले. |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री प्रकाश सोळंके, संतोष दानवे, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री बाळासाहेब आजबे, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, यशवंत माने, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री रमेश बोरनारे, दिपक चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, दौलत दरोडा, संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री, हरिभाऊ बागडे, चंद्रकांत पाटील, बाबासाहेब पाटील, बच्चू कडू, जयकुमार गोरे, दिलीप लांडे, भिमराव तापकीर, योगेश कदम, | आरक्षण परत मिळावे ही मराठा समाजाची अपेक्षा असणे, यासाठी क्युरेटिव्ह याचिकाही दाखल करण्यात आली असणे, न्यायमूर्ती भोसले समितीने सुचविलेल्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या असणे, मराठा आरक्षण प्रश्नी सरकारला मार्गदर्शन करण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तीन निवृत्त न्यायमूर्तींची समिती शासनाने गठीत केलेली असणे, इतर मागास समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची शासनाची भूमिका असणे, केंद्र शासनाच्या विश्वकर्मा योजनेची सांगड घालत राज्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी करून बारा बलुतेदारांना लाभ मिळवून देण्याचे शासनाचे धोरण असणे, राज्यातील बारा जातींचा ओबीसी म्हणून महाराष्ट्राच्या सुचित समावेश असणे, त्याच धर्तीवर केंद्राच्या सुचित समावेश करण्यासाठी तसा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्राकडे पाठविण्यात आला असणे, मराठा समाजाचा इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असणे, निजामकालीन कुणबी समाजाच्या नोंदी तपासण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असणे, सारथी, बार्टी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ व महाज्योतीप्रमाणे इतर मागासवर्गाच्या ओबीसी महामंडळाला समान निधी देण्याचे आदेश अर्थ मंत्रालयाकडून काढण्यात येणे, बंजारा तांडे रस्त्यांना जोडण्यासाठी संत सेवालाल महाराज जोड रस्ते योजना, धनगर वस्त्या रस्त्यांना | |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री. राजेश पवार, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिद्धार्थ शिरोळे, राम कदम, मंगेश चव्हाण, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड. लक्ष्मण पवार, सौ. सीमा हिरे, सर्वश्री राम सातपुते, जयकुमार रावल, डॉ. संजय कुटे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, देवयानी फरांदे, सर्वश्री समाधान अवताडे, कालीदास कोळंबकर, ॲड. राहूल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स. | जोडण्यासाठी यशवंतराव होळकर जोड रस्ते योजना व इतर मागासवर्ग विमुक्त जाती 'अ' भटक्या जमाती 'ब', 'ड' व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना राज्य शासनाकडून लागू करण्यात आली असणे, आरक्षण आंदोलनाकडे राजकीय चष्म्यातून न बघता सर्वच राजकीय पक्षांनी चर्चाविमर्शाच्या माध्यमातून आरक्षण प्रश्नी तोडगा काढण्याची आवश्यकता, अन्य आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी शासन कटिबद्ध असणे, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. | |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २. | सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुरेश वरपुडकर, अमीन पटेल, सुनिल प्रभू, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री रविंद्र वायकर, भास्कर जाधव, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अमित देशमुख, पी.एन. (सडोलीकर) पाटील, शिरीषकुमार नाईक, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री राजेश एकडे, संजय जगताप, बळवंत वानखडे, | "राज्यातील वाढती महागाई, बेरोजगारी, गुन्हेगारी व सामाजिक सलोखा राखण्यात सरकारला आलेले अपयश, पेट्रोल, डिझेल, गॅस, वीज, प्रवास, किराणा, शाळा फी, वैद्यकीय खर्च यात मोठ्या प्रमाणावर दरवाढ झालेली असल्यामुळे गोरगरीब, सर्वसामान्यांना जगणे कठीण झाले असणे, महागाई रोखण्यासाठी शासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नसणे, राज्यात उद्योगवाढीसाठी चालना देण्यास शासनाकडून पावले उचलली जात नसल्यामुळे राज्यात गुंतवणूक होत नसणे, राज्यातील उद्योग बाहेरील राज्यात स्थलांतरीत होणे, परिणामी बेरोजगारी वाढणे, राज्यात विशेषतः विदर्भ, मराठवाड्यात रोजगार आणण्यात सकारात्मक पावले शासनाकडून उचलली जात नसणे, विदर्भासाठी मिहान प्रकल्प महत्वाचा असताना नव्याने उद्योगच न आल्याने मिहानचा उद्देश सफल होत नसणे, कंत्राटी पद्धतीने नोकरभरतीचा निर्णय झाल्याने तसेच एमपीएससीमध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे शासकीय भरती ठप्प झाली असणे, परिणामी बेरोजगारी वाढल्याने युवा पिढीत नैराश्याची भावना निर्माण झाली असणे, तसेच, वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्याने घेतला असला तरी केंद्र शासनाकडे अनेक महिन्यांपासून प्रलंबित असणे, परिणामी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेष निर्मुलनाचे काम थांबलेले असणे, | दिनांक १५, १८ व १९ डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झाली व दिनांक १९ व २० डिसेंबर, २०२३ रोजी चर्चा झालेल्या अंतिम आठवडा प्रस्ताव व सदर प्रस्तावावर दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी एकत्रित उत्तर देण्यात आले. |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | विक्रमसिंह सावंत, राजू पारवे, राजू आवळे, रोहित पवार, मोहनराव हंबर्डे, बाळासाहेब पाटील, राजेश टोपे, कुणाल पाटील, सुनिल राऊत, धीरज देशमुख, सुभाष धोटे, रणजित कांबळे, शिरीष चौधरी, राजन साळवी, शंकरराव गडाख, ऋतुराज पाटील, श्रीमती प्रतिभा धानोरकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री सहसराम कोरोटे, वैभव नाईक, सुनिल भुसारा, संदिप क्षीरसागर, कैलास गौरंट्याल, मानसिंग नाईक, श्रीमती सुमन पाटील, ॲड. अशोक पवार, सर्वश्री हिरामण खोसकर, प्राजक्त तनपुरे, अस्लम शेख, | विदर्भ आणि मराठवाड्यासाठी गत दीड वर्षात सरकारने केलेल्या घोषणांची अंमलबजावणी झालेली नसणे, या भागातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असणे, राज्यात, विशेषतः विदर्भ, मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांची वाढलेली संख्या, कापूस, संत्रा, सोयाबीन उत्पादक सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे अडचणीत आले असणे, धानाला १००० रुपये बोनस देण्याची आवश्यकता, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात झालेली वाढ व शेतीचे झालेले नुकसान, अत्यल्प मिळत असलेली मदत, राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडालेला असणे, औषध व उपकरण खरेदी, पुरवठा, रुग्णालयातील मनुष्यबळ वाढविणे, यातील शासनाच्या निष्क्रियतेमुळे गोरगरीबांना रुग्णसेवा न मिळणे, ठाणे, नांदेड आणि राज्यातील इतर भागात शासकीय रुग्णालयात रुग्णमृत्यूचे व बालमृत्युचे वाढलेले प्रमाण, राज्यात प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नसणे, वैद्यकीय शिक्षण व रुग्णालयातील गैरप्रकार थांबविण्याची आवश्यकता, एमएमआरडीएचे, विशेषतः मुंबई व मुंबई उपनगरातील अनेक विकास प्रकल्प रखडलेले असणे, धारावी पुनर्विकासात शासनाने विकासकधार्जिणी भूमिका घेतलेली असणे, धारावी प्रकल्पाच्या नावावर होणारा टी.डी.आर. महाघोटाळा व दडपशाही, लोकप्रतिनिधी नसताना मुंबई महानगरपालिका | |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | झिशान सिद्धीकी, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, माधवराव जवळगावकर-पाटील, लहु कानडे, संग्राम थोपटे, रविंद्र धंगेकर, वि.स.स. | प्रशासनाकडून अनेक धोरणात्मक निर्णय घेतले जात असून मुंबईकरांच्या पैशाची उधळपट्टी सुरू असणे, मुंबई महापालिका अग्निशमन दलातील अनेक गैरप्रकार उघडकीस येणे, पीएमजीपी योजनेतून जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, मुंबई व राज्यात हवेच्या प्रदूषणाने सर्वोच्च पातळी गाठली असणे, मुंबईतील खुल्या जागा खाजगी संस्थांना देण्याच्या धोरणाचा पुनर्विचार करण्याची गरज, मुंबईतील झोपडपट्टयांना स्लम घोषित न केल्यामुळे पुनर्विकासात निर्माण झालेला अडथळा, नागरी सुविधा न मिळणे, कोळीवाडा व गावठाण विकासाबाबतच्या धोरणात आवश्यक बदल करण्याची आवश्यकता, पनवेल तालुक्यातील रहिवाश्यांनी नैना प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी सुरू केलेले आमरण उपोषण, ठाणे महानगर पालिका क्षेत्रात ५०० पेक्षा जास्त अनधिकृत इमारतींची बांधकामे झाली असून अजूनही सुरू असणे, महानगर पालिकेचे त्यावर कोणतेही नियंत्रण नसणे, महानगर पालिकेने विकासकांना अतिरिक्त टीडीआर बहाल करणे, वाढत्या शहरीकरणामुळे वाहतुकीच्या समस्येसह विविध भागात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली टंचाई, तसेच ठाणे महानगर पालिकेत मोठ्या प्रमाणात सुरू असलेला भ्रष्टाचार, ठाणे (पूर्व) कोपरी भागातील अनेक जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींना विकास आराखड्यामध्ये रस्ता नसल्यामुळे त्यांच्या पुनर्विकासामध्ये निर्माण होत असलेल्या अडचणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची भूमिका. | |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ३. | ॲड. आशिष जयस्वाल, डॉ. संजय कुटे, श्री. सुनिल शेळके, डॉ. संजय रायमूलकर, सर्वश्री संजय गायकवाड, रणधीर सावरकर, चेतन तुपे, नरेंद्र भोंडेकर, किशोर जोरगेवार, समीर कुणावार, निलेश लंके, भरतशेट गोगावले, संजय शिरसाट, दादाराव केचे, प्रकाश सोळंके, रमेश बोरनारे, ज्ञानराज चौगुले, हरिष पिंपळे, बाळासाहेब आजबे, बालाजी कल्याणकर, संतोष बांगर, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री शेखर निकम, सुहास कांदे, चंद्रकांत पाटील, मोहन मते, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री चिमणराव पाटील, | "गत अनेक दशकांपासून विदर्भ विकासासाठी अनेक प्रयत्न करूनही विदर्भात शेती, उद्योग, रोजगार, सिंचन या क्षेत्रात प्रगती व विकास न होणे, विदर्भात असंख्य औष्णिक वीज प्रकल्पामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणे, वाढते तापमान व पर्यावरण बदलामुळे उन्हाळ्यात ४५ डिग्री पेक्षा जास्त तापमानाची दिवसा वाढ होणे, रोजंदारीवर काम करणाऱ्या असंख्य कामगारांचे उष्णतेमुळे मृत्यू होणे, उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे कामगारांचे तसेच उन्हामध्ये काम करणाऱ्या व शारीरिक श्रम करणाऱ्या लोकांचे अत्यंत हाल होणे, वन कायद्याच्या अडचणींमुळे वैनगंगा-पैनगंगा नदी-जोड प्रकल्प व शेतकऱ्यांचे सिंचन प्रकल्प पूर्ण न होणे, परिणामी आर्थिक प्रगतीवर विपरीत परिणाम होणे, विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात जंगल व वनक्षेत्र असल्याने व कायद्याची कठोर व सक्तीने अंमलबजावणी झाल्याने रानडुक्कर, रोहीहरिण यांसारख्या वन्य प्राण्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणे, या वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांच्या शेतामधील उभ्या पिकांचे नुकसान होणे, शासनातर्फे देण्यात येणारी नुकसानभरपाईची रक्कम प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अपुरी असणे, सातत्याने वाघांची संख्या वाढल्याने वाघांचा व बिबट्यांचा गावा गावात प्रवेश वाढणे, गायी व शेळ्यांच्या शिकारीत वाढ होणे, वनक्षेत्रात पर्यटनाला चालना देण्यासाठी व त्या भागाच्या आर्थिक प्रगतीसाठी शासनाला ठोस | दिनांक १९ व २० डिसेंबर, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | मकरंद पाटील, चंद्रकांत नवघरे, यशवंत माने, प्रकाश आबिटकर, प्रताप अडसड, इंद्रनील नाईक, अनिल बाबर, महेंद्र थोरवे, विकास कुंभारे, देवेंद्र भुयार, महेंद्र दळवी, प्रताप सरनाईक, कृष्णा खोपडे, राजू कारेमोरे, योगेश कदम, शांताराम मोरे, ॲड. आशिष शेलार, श्री. मनोहर चंद्रिकापुरे, ॲड. शहाजीबापू पाटील, श्री. प्रदिप जयस्वाल, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री दौलत दरोडा, महेश शिंदे, सर्वश्रीमती लताबाई सोनावणे, श्वेता महाले, श्री. अतुल बेनके, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री किशोर पाटील, | कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता, कोर व बफर गावांच्या संख्येत वाढ होत असणे, अभयारण्य जाहीर होत असल्याने वनक्षेत्रात रहाणाऱ्या लोकांच्या हक्काचे संरक्षण न होणे, मनुष्य व वन्यजीवांच्या संघर्षात वाढ होणे, वन्य प्राण्यांच्या शिरकावामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे होणारे नुकसान वाचविण्यासाठी शासनाने चॅनलींग फेन्सींगची योजना व पुरेसा निधी देऊन शेतकऱ्यांना मदत करण्याची व अनुदान देण्याची तसेच प्रभावी योजना राबविण्याची आवश्यकता, विदर्भात नागपूर बाहेरील क्षेत्रात कापूस व सोयाबीन उत्पादन प्रक्रिया तसेच सूतगिरणी उद्योग उभारण्याची आवश्यकता, मेट्रो रेल्वे तसेच विमानतळाची सुविधा नागपूर खेरीज अन्य जिल्ह्यात मध्यवर्ती ठिकाणी होण्याची आवश्यकता, सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी तापी खोरे व विदर्भ औद्योगिक विकास महामंडळ हे प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्याची आवश्यकता, वाढत्या बेरोजगारीमुळे गुन्हेगारीकडे व आत्महत्येच्या घटनेत होत असलेली वाढ, याबाबत शासनाने वनबाधित लोकांच्या कल्याणासाठी खनिज विकास निधी व मानव विकास मिशनच्या धर्तीवर किंवा डोंगरी विकास निधीच्या धर्तीवर विशेष निधी देऊन या भागाच्या नागरिकांची रोजगार व दरडोई उत्पन्न वाढविण्याच्या योजना राबविण्याची नितांत आवश्यकता, राज्यातील व विशेषतः विदर्भातील तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी पायाभूत | |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | मदन येरावार, बच्चू कडू, जयकुमार रावल, राजकुमार पटेल, प्रशांत बंब, राजेश पाडवी, नितेश राणे, नारायण कुचे, अभिमन्यू पवार, प्रा. डॉ. अशोक उईके, श्री. टेकचंद सावरकर, डॉ. संदीप धुर्वे, श्री. संजिवरेड्डी बोदकुरवार, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री दिलीप बोरसे, समीर मेघे, हरिभाऊ बागडे, किर्तीकुमार भांगडीया, विजय रहांगडाले, डॉ. देवराव होळी, सर्वश्री कृष्णा गजबे, लखन मलिक, राजेंद्र पाटणी, गणेश नाईक, किसन कथोरे, बाबासाहेब पाटील, प्रशांत ठाकूर, संतोष दानवे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, | सुविधांसह ठोस कार्यक्रम आखण्याची आवश्यकता, या सर्व स्थळांची प्रसिद्धी, जाहिरात, माहितीपट व वेगवेगळ्या महोत्सवाच्या माध्यमातून या भागातील सर्व प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्राची वेगवेगळ्या वाहिन्यांवर तसेच विमानतळ व रेल्वे स्थानक व उपहारगृह येथे प्रसिद्धी करण्याची आवश्यकता, वनक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासीं प्रवर्गाच्या कल्याणाकरिता व रोजगाराकरिता योजना राबविण्याची आवश्यकता, विदर्भात औद्योगिक प्रगती करण्याकरिता औद्योगिक क्षेत्र व दरडोई उत्पन्न कमी असलेल्या तालुक्यात व वन क्षेत्रात प्रदूषण विरहीत उद्योगांबाबत धोरण आखण्याची आवश्यकता, विदर्भाच्या सर्वांगीण विकासाकरिता, शासनाने ठोस व कालबद्ध कार्यक्रम घोषित करण्याची आवश्यकता." | |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| | सर्वश्री राणाजगजितसिंह पाटील, सुभाष देशमुख, संभाजी निलंगेकर-पाटील, प्रकाश भारसाकळे, राजेश पवार, मंगेश चव्हाण, सुरेश भोळे, राम सातपुते, बबनराव लोणीकर, संजय सावकारे, तानाजी मुटकुळे, नामदेव ससाणे, डॉ. तुषार राठोड, ॲड. राहूल ढिकले, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मोनिका राजळे, सीमा हिरे, श्री. विजय देशमुख, डॉ. राहुल आहेर, श्री. जयकुमार गोरे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री भिमराव केराम, समाधान अवताडे, काशिराम पावरा, सर्वश्रीमती नमिता मुंदडा, | | |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | मनिषा चौधरी, सर्वश्री योगेश सागर, सुनील राणे, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री. अतुल भातखळकर, अमित साटम, गणपत गायकवाड, किसन कथोरे, सिद्धार्थ शिरोळे, रवि राणा, डॉ. विनय कोरे, सर्वश्री महेश बालदी, प्रकाश आवाडे, श्रीमती अश्विनी जगताप, सर्वश्री राम कदम, विनोद अग्रवाल, संजय केळकर, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. सचिन कल्याण-शेट्टी, वि.स.स. | | |

***

## विवरण क्रमांक ४६
## नियम २९३ अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबीवर चर्चेबाबत अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे
## निरंक

***

## विवरण क्रमांक - ४७

## श्वेतपत्रिका सभागृहाच्या पटलावर ठेवणे

## निरंक

***

## विवरण क्रमांक - ४८

## मत विभाजन

## निरंक

***

**विवरण क्रमांक - ४९**
**महाराष्ट्र विधानसभा**
**तृतीय अधिवेशन, २०२३**
**तारांकित/ अतारांकित/ अल्पसूचना प्रश्न व प्रश्नातुन उदभवलेल्या**
**अर्धा-तास चर्चा**
**यावरील कार्यवाहीचे विवरण पत्र**
**(दिनांक ७ डिसेंबर, २०२३ ते २० डिसेंबर, २०२३)**
**विवरण क्र. १**
**तारांकित प्रश्न**

| | | |
|---|---|---|
| १. | तारांकित प्रश्नांच्या प्राप्त झालेल्या सूचना | ७५८० |
| २. | कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न | ५३१३ |
| ३. | स्वीकृत झालेले तारांकित प्रश्न | २२२ |
| ४. | सभागृहात तोंडी उत्तरीत झालेले तारांकित प्रश्न | ३४ |
| ५. | तारांकित प्रश्नातील अतारांकित करण्यात आलेले प्रश्न | १४४५ |
| ६. | अस्वीकृत केलेले तारांकित प्रश्न | ५३९ |
| ७. | विभागास / मा.सदस्यांना खुलासा विचारलेले तारांकित प्रश्न | -- |
| ८. | स्वीकृत व्यपगत | ६१० |
| ९. | सम्मिलित तारांकित प्रश्न | २४९७ |
| १०. | मा. सदस्यांनी मागे घेतलेले प्रश्न | -- |
| ११. | जादा तारांकित प्रश्न | २२६७ |

**विवरण क्र. २**
**अल्पसूचना प्रश्न**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राप्त झालेले एकूण अल्पसूचना प्रश्न | ०६ |
| २. | स्वीकृत झालेले अल्पसूचना प्रश्न | -- |
| ३. | अतारांकित स्वीकृत झालेल्या अल्पसूचना | -- |
| ४. | उत्तरीत झालेले अल्पसूचना प्रश्न | -- |
| ५. | अस्वीकृत केलेले अल्पसूचना प्रश्न | ०६ |
| ६. | विभागास खुलासा विचारलेले अल्पसूचना प्रश्न | -- |
| ७. | सम्मिलित अल्पसूचना प्रश्न | -- |

## विवरण क्र. ३
## तारांकित प्रश्नाच्या उत्तरातून उद्‌भवलेल्या अर्धा - तास चर्चेच्या सूचना

| | | |
|---|---|---|
| १. | प्राप्त झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या एकूण सूचना | २५ |
| २. | मान्य झालेल्या सूचना | १६ |
| ३. | गत सत्रातील प्रलंबित अर्धा-तास सूचना | -- |
| ४. | चर्चा झालेल्या सूचना | -- |
| ५. | सदस्य अनुपस्थितीमुळे चर्चा न झालेल्या सूचना | -- |
| ६. | सदस्यत्व स्थगितीमुळे चर्चा न झालेल्या सूचना | -- |
| ७. | बॅलेट मध्ये आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना | ०४ |
| ८. | विद्यमान सत्रातील प्रलंबित अर्धा-तास चर्चेच्या सूचना | ०४ |
| ९. | अस्वीकृत झालेल्या सूचना | ०९ |
| १०. | सदस्यत्व स्थगित केल्यामुळे कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना | -- |

## विवरण क्र. ४
## मूळ अतारांकित प्रश्न

| | | |
|---|---|---|
| १. | या सत्रात आलेल्या मूळ अतारांकित प्रश्न सूचनांची संख्या | १२८ |
| २. | स्वीकृत झालेले प्रश्न | ७६ |
| ३. | अस्वीकृत प्रश्न | १७ |
| ४. | विभागास खुलासा विचारण्यात आलेले प्रश्न | -- |
| ५. | सम्मिलित प्रश्न | ३५ |
| ६. | कार्यवाही सुरू असलेले प्रश्न | -- |
| ७. | उत्तरीत झालेल्या प्रश्नांची संख्या ( अता. यादी क्र.१८८ ते २१९ )<br>( मागील सत्रातील स्वीकृत प्रश्नासह ) | १६०० |

***

## विवरण क्रमांक - ५०

## तारांकित व अतारांकित प्रश्नासंबंधी माहिती

| अ. क्र. | प्रश्न | तारांकित | अतारांकित | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | मूळ अतारांकित | तारांकित स्वीकृत प्रश्नातून वेळेअभावी झालेले अतारांकित प्रश्न | |
| (१) | (२) | (३) | (४) | | (५) |
| १ | प्राप्त झालेल्या सूचना | ७५८० | १२८ | -- | ७७०८ (७५८०+१२८) |
| २ | स्वीकृत | २२२ | ७६ | -- | २९८ (२२२+७६) |
| ३ | स्वीकृत व्यपगत | ६१० | - | -- | ६१० |
| ४ | अतारांकित स्वीकृत | १४४५ | - | -- | १४४५ |
| ५ | अस्वीकृत | ५३९ | १७ | -- | ५५६ (५३९+१७) |
| ६ | सम्मिलीत, जादा प्रश्न विभागाकडे निर्देशित केलेले व सदस्यांनी मागे घेतलेले इत्यादी | ४७६४ | ३५ | -- | ४७९९ (४७६४+३५) |
| ७ | प्रश्न तोंडी उत्तरित | ३४ | - | -- | ३४ |

***

# विवरण क्रमांक - ५१

## तारांकित प्रश्नांची विभाग निहाय सांख्यिकीय माहिती

| विभाग (१) | आलेले प्रश्न (२) | कार्य-वाहीत घेतलेले प्रश्न (३) | जादा प्रश्न (४) | सम्मि-लीत (५) | अस्वी-कृत (६) | अतारां-कित स्वीकृत (७) | विभाग/ सदस्या-कडे निर्दे-शित केलेले (८) | तारां-कित स्वीकृत (९) | तोंडी उत्तरीत (१०) | सदस्य अनु-पस्थि-तीमुळे झालेले अतारां-कित (११) | वेळे अभावी अता-रांकित (१२) | मागे घेत-लेले (१३) | स्वीकृत व्यपगत (१४) | तोंडी उत्तरा-च्या शेकडा प्रमाण (१५) | शेरा (१६) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
